म. ग्र. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. ३६३

REFBK-0004305

# परिचय

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं नं.

लेखक

**प्रो. बाळकृष्ण वामन सांवर्डेकर.**

# गोमंतक परिचय

वा. क्र. 8304

REFBK-0004305

बाळकृष्ण वामन सांवर्डेकर

किंमत २ रु.

मुद्रक—

विभाग १ ला—एम्. एन्. कुळकर्णी, कर्नाटक प्रेस, ३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई.

विभाग २ रा—पान १-४८—अनंत आत्माराम मोरमकर, श्री लक्ष्मी-नारायण प्रेस, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई.

पान ४९-११६—रघुनाथ रामचंद्र बखले, मुंबई वैभव प्रेस, सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी, गिरगांव, मुंबई.

प्रकाशक—श्री. तुकाराम मुकुंद सांवर्डेकर, यांनीं एकादशी बिल्डिंग, परेख स्ट्रीट, मुंबई ४ येथें प्रसिद्ध केलें.

# हृद्गतादाखल.

——x——

आमचा गोमंतक प्रात शेंकडों वर्षे फिरंगीसत्तेमुळें महाराष्ट्रापासून सांस्कृतिक दृष्टयादेखील तुटक समजला जात असून, राज्यकर्त्यांच्या भाषेमुळें, जुन्या काळीं झालेल्या धर्मांतराच्या कहरामुळें व इतरहि अनेक कारणांमुळें, आम्हां-विषयीं व आमच्या प्रांताविषयीं असावी तशी माहिती असलेली दिसून येत नाहीं.

म्हणून गोमतकाबाहेरच्या हिंदुबाधवांना–विशेषतः महाराष्ट्रीयांना—गोमतकाची खरीखुरी ओळख करून देतां आल्यास पहावी, एवढयाचसाठीं प्रस्तुत पुस्तकाचा जन्म होत आहे येतें महाराष्ट्र साहित्यसम्मेलन भरण्यापूर्वीच तें तयार व्हावें अशा हेतूनें लेखकानें तें हातीं घेतलें. कामास सुरुवात केल्यावर खुद्द गोमतकीयांना आपल्या प्रांताविषयीं असावी तशी माहिती नाहीं, ही जी समजूत पूर्वी होती तिला दुजोरा मिळाला. कारण, सरकारी असो किंवा खासगी असो, पण आज-कालच्या शिक्षणसस्थांतून देखील गोमतकाच्या पूर्वापार इतिहासाचें शिक्षण मिळण्याची मुळींच सोय नाहीं. अर्थात् वृद्ध मंडळीच्या तोंडून एखादे वेळीं दंत-कथात्मक अशी जी तुटपुजी हकीकत निघत असे, तिजवरच गोमतकीय हिंदूची आजवर सारी भिस्त होती तेव्हा जिज्ञासू गोमतकीयांना देखील आपल्या प्रांताची सारी माहिती संकलित रूपानें प्रस्तुत पुस्तकांतच देतां आल्यास पहावी असा विचार मनांत आला.

हें पुस्तक केवळ इतिहासात्मक नव्हे हें वाचकांच्या लक्ष्यांत येईलच. कारण इतिहास म्हणजे समाजातील घडामोडींचें कार्यकारणभावासहित दिलेलें वर्णन होय, अशी जी एक खरीखोटी समजूत आजला प्रचलित आहे, तिच्या चौकटींत हें बसत नाहीं. तसें तें बसावयाला आणखीहि कित्येक घडामोडींचा यात उल्लेख होणें आवश्यक होतें आणि आलेल्या बऱ्याच मजकुराला काट दिला पाहिजे होता.

पण महत्वाचें व सांगण्यासारखें जें मनांत आलें तें येथें सांगितलें असल्यामुळें यांतील लेखन कथनात्मक स्वरूपाचें झालें आहे. येत्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनापूर्वी पुस्तक तयार करण्याचें कालविषयक बधन असल्यामुळें सर्व बाजूनीं विचार करण्यास व इतर अनेक साधनाची जुळवाजुळव करण्यास सवड नव्हती. केवळ

तीन महिन्यांच्या अवकाशात, रोजचीं इतर कर्तव्यें साभाळून हें पुस्तक पुरें करावें लागलें. अर्थात् यांत पुष्कळ उणीवा आहेत हें लेखक जाणूनच आहे. पण त्यास त्याचा नाइलाज आहे.

लेखन व प्रकाशन या कामीं ज्या अनेक मित्रांची मदत झाली त्यांचे आभार मानायला योग्य असे शब्द लेखकाकडे नाहींत. विशेषतः श्री. यशवतराव सू. सरदेसाई, श्री. दत्तात्रय व्य. पै, श्री. गणपतराव वि. लाड, डॉ. व्यंकटेश पांडुरंग कामत, प्रो. रामचद्र शंकर नायक, श्री. विठ्ठल सदाशिव सुखठणकर, श्री. शिवा फट्ट पै आंगले, श्री. मुकुंद सदाशिव शेळडेंकर, इत्यादि मित्रांनीं जी बहुमोल मदत केली व जिच्या अभावीं हें कार्य मुळींच शक्य झालें नसतें, तिचा उल्लेख न केल्यास अक्षम्य दोषाचा भार शिरावर घ्यावा लागेल; आणि म्हणूनच उपरोक्त मित्रांच्या शालीनतापूर्ण विरोधास न जुमानतां तो करण्यांत येत आहे.

साधनांची जुळवाजुळव करून वारंवार हस्तलिखितांची तपासणी करण्याचें महत्वाचें कार्य श्री. सरदेसाई यांनीं केलें, तर लेखकाला अज्ञात अशी पुष्कळशी नवी माहिती देणें व मुद्रितें तपासण्याचें अत्यत जरूरीचें काम श्री. लाड यांनीं न कटाळतां व आपला अमूल्य वेळ खर्चून केलें; श्री. रामचंद्र नायक यांनीं गोमंतकाचा नकाशा तयार करून दिला व श्री. सुखठणकर यांनीं वै बहुगुण कामत बाघ यांची जुना पोषाख दाखविणारी ऐतिहासिक तसबीर दिली.

अर्थात् पुस्तक तयार होण्याचें बरेंचसें श्रेय या मित्रवर्गांचेंच आहे. लेखक केवळ निमित्तमात्रच आहे.

सांवडें-गोवा.
चै. वद्य ७ मी शके १८५२
ता. २० एप्रिल १९३०

बाळकृष्ण वामन सांवर्डेकर.

# ग्रंथ समर्पण

परमपूज्य मातुःश्री व पूज्यतम मातृभूमि

यांना वंदन करून,

गोमंतकीयांच्या स्वाभिमानरक्षणार्थ,

गोमंतकाच्या गौरवासाठीं

व

गोमंतकाच्या उन्नतीप्रीत्यर्थ

ज्या ज्या महाशयांनीं आजवर परिश्रम घेतले आहेत,

त्या सर्वांच्या चरणीं

ही अल्प कृति समर्पित आहे.


—लेखक

# अनुक्रमणिका.


| | | पृष्ठ. |
|---|---|---|
| प्र० १ लें. | भूगोल व इतिहास... | १ |
| प्र० २ रें. | राजकीय परिस्थिति | ३३ |
| प्र० ३ रें. | जुलुमांची जंत्री | ७६ |
| प्र० ४ थें. | सामाजिक परिस्थिति–ख्रिस्ती समाज | ९७ |


## विभाग दुसरा.


| | | |
|---|---|---|
| प्र० ४ थें. | सामाजिक परिस्थिति–हिंदु समाज | १ |
| प्र० ५ वें | आर्थिक परिस्थिति | २१ |
| प्र० ६ वें. | शैक्षणिक परिस्थिति | २८ |
| प्र० ७ वें. | मराठी भाषेप्रीत्यर्थ गोमतकाचें कार्य | ७६ |
| प्र० ८ वें. | प्रेक्षणीय स्थळें | १०१ |


गोमंतकाचा नकाशा
चिन्हांचे स्पष्टीकरण
किल्ला
गाव
शहर
रस्ता
रेल्वे
पर्वत
नदी
सीमारेषा
देवालय
—x—

स. म. सं. ठाणे.
४३०९
सं. ग्रं. १०

# गोमंतक परिचय

## प्रकरण पहिलें

## गोमंतकाचा भूगोल

**सामान्यवर्णनः**—उत्तरेस तेरेखोलची खाडी व सावंतवाडी प्रांत, दक्षिणेस कारवारांतील माजाळी गांवची हद्द, पूर्वेस सह्याद्रीची गगनभेदी रांग व पश्चिमेस आरबी समुद्र अशा सीमांनीं कवटाळलेला कोंकणचा एक भाग, आज बरींच वर्षे गोमंतक, गोवें या नावांनीं ओळखला जातो परंतु फिरंगी सत्तेखालीं यावयाच्या पूर्वीच्या काळांत गोमंतकाची मर्यादा मुडगेरी गांवापर्यंत जात असे. पण आम्हांला आज या प्राचीन सीमाचें तेवढें महत्व वाटत नाहीं; कारण पोर्तुगीज अमलाखालच्याच प्रांतविशेषाचा परिचय करून देण्यासाठीं असलेल्या या पुस्तकांत अशा प्रकारच्या इतिहाससंशोधनाचा विषय असलेल्या माहितीचा आम्हांला उपयोग नाहीं.

सामान्यत हा लहानसा टापू त्रिकोणाकार दिसतो. त्याची दक्षिणोत्तर लांबी १०५ किलोमिटर (६५ मैल) असून पूर्वपश्चिम रुंदी ६० किलोमिटर (३७ मैल) आहे. क्षेत्रफळ ३८०६ चौरस किलोमिटर (१४८२ चौ मै) असून १९२१ च्या शिरगणतीनें लोकसंख्या ४,६५,४९४ ठरली आहे ह्यांपैकीं २,४५,४९९ क्याथोलिक, २,१८,२२३ हिंदु, ५,४८७ मुसलमान व बाकीचे इतर धर्मीय आहेत.

पूर्व गोमंतक हा सह्याद्रीच्या उतरणींतच वसला असल्यानें तो प्रदेश बराच डोंगराळ आहे; त्यामुळें त्यांतील लोकवस्तीहि पातळ व जमिनी गर्द अशा जंगलानें व्याप्त आहेत सत्तर प्रांत, सांगें कोंसेल्य व काणकोण कोंसेल्याचा पूर्वभाग ह्याच प्रदेशात वसतो त्या मानानें पेडणें कोंसेल्य व फोंडें कोंसेल्य बरेच कमी डोंगराळ आहेत. तरीपण फोंडें कोंसेल्य हा अघशी नदी व दुधसागरची नदी अशा दोन प्रवाहाच्या चिमट्यात वसला असल्यानें तोहि बराच डोंगराळ आहे.

सासष्ट बारदेश व तिसवाडी हे कौंसेल्य जरासे सपाट असून त्यात डोंगर किंवा जगल फारसें नाहीं म्हटलें तरी चालेल.

**डोंगर:**—गोमतकाच्या पहाडी भागांतून, सगळीकडेच सह्याद्रींतून फुटलेले उंच उच डोंगर दिसतात. परंतु त्यातून नांव घेण्यासारखा पहाड म्हणजे, गोमत-काच्या पूर्व सरहद्दीवरील **सोंसोगड** हा होय. सत्तरप्रांतांत सुर्प परगण्याच्या सीमेजवळच तो असून त्याची उंची सुमारें ३८२८ फूट आहे. उचीच्या मानानें ३६३६ फुटांचा ' कात्लांची मावली ' नावाचा दुसऱ्या नबरचा पहाडहि सत्तर प्रांताच्या पूर्व सीमेवर सोंसोगडच्या उत्तरेस थोड्याच अतरावर आहे. **वाघेरी** हा पहाड सत्तर प्रांतातच, केरी व झरमें गावांत, उभा आहे. २२०० फूट उंचीच्या ह्या पहाडावर मधोमधच एक लहानशी जागा गगनचुंबित व दाट झाडीनें युक्त अशी आहे. ती दुरून पाहणारास एखाद्या डोंगरी गडासारखी दिसते. जवळच तेवढ्या उंचीवरहि एक गोड्या पाण्याचा संपन्न झरा आहे. ह्या पहाडावरून सारा तिसवाडी प्रांत, बारदेश व सासष्टचा बराच मोठा भाग पाहतां येतो, **मोर्लेगड** हा डोंगरहि वाघेरीला लागूनच असून त्याची उची २००६ फूट आहे १८४७ त इग्रजी भूगोल मापन खात्यानें या डोंगरावर त्रिकोणमितीचा बिंदु निवडला होता **मोरपीर्ले** हा बाळ्ळी महालांत असून त्याची उची १४५७ फूट आहे या डोंगरावर देखील उत्कृष्ट पाण्याचा झरा आहे.

परतु गोमंतकांतील सर्वांत सुंदर व परिचित असे डोंगर दोनच आहेत. उंचीच्या मानानें त्यांचा क्रम बराच खालीं लागत असला, तरी सामान्यतः सपाट प्रदेशाच्या मधोमध असल्यानें व इतरहि अनेक कारणामुळें, हे डोंगर गोमतकात बरेच प्रसिद्ध आहेत बोरीचा **सिद्धनाथ** हा त्यापैकीं जरा उच आहे. त्याची उंची १२४२ फूट आहे. या डोगरांवर श्री सिद्धनाथाचें एक लहानसें देवालय असून जवळ बरेच झरे आहेत त्यामुळें वर सुमारें २०–२५ घराचा एक लहानसा गावच वसला आहे. झऱ्यांच्या पाण्याचा उपयोग करून डोंगरावर बरीच जमीन सुपारीच्या लागवडीस आणलेली आहे. डोंगरांत दुर्मीळ वनस्पती पुष्कळ मिळत असून त्याच्या निरनिराळ्या उतरणीवर स्लेटीचे, सहाणेचे, गारेचे असे निरनिराळ्या प्रकारचे दगड सापडतात. डोंगरावरून सासष्ट कौंसेल्य व फोंडा महालचा बराच टापू दिसतो. हवा नेहमीं उत्तम असल्यामुळें कधीं कधीं उष्ण-काळांत लोक हवाफेर करण्यासाठीं देखील तेथें जातात. पारोडें येथील **चंद्रनाथ**

हा वर सांगितलेल्या डोंगरापैकीं दुसरा होय. याची उंची फक्त १०५७ फूट आहे. परंतु सभोंवतालच्या विस्तीर्ण जागेंत तेवढ्या उंचीचा दुसरा डोंगर नसल्यामुळें व वर श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवाचें सुंदर देवालय असल्यामुळें हा काहींसा काठेवाडांतील गिरनार पर्वताप्रमाणें दिसतो. त्याच्या उत्तुंग शिखरावरील तें सफेत देवालय, दुरून एखाद्या सापाच्या मस्तकावरील मण्यासारखें शोभिवंत दिसतें. पारोडें गांवांतूनच ह्या डोंगरावर चढण्याची पायवाट आहे व ती ओबडधोबड अशा दगडी पायऱ्यांनीं बांधून काढलेली आहे. ती गर्द अशा नारळीच्या बागेंतून बऱ्याच उंचीपर्यंत जाऊन पुढें आंब्या फणसाच्या वृक्षांच्या दुतर्फा रांगेंतून थेट वर जाते. दुरून पाहणाऱ्या माणसालाहि हे वृक्ष इतर जंगली वृक्षाहून रंगरूपानें भिन्न दिसत असल्यानें हा रस्ता जंगलांतून स्पष्टपणें अजमावता येतो. चढण फार लांब नसली तरी वर जाईतोंवर सशक्त तरुणांना निदान पाऊण तास तरी लागतो. देवळाच्या खालीं काहीं अंतरावर देवस्थानच्या सेवेकरी मंडळीची व इतर लोकांचीहि वस्ती असलेलें एक लहानसें गांव आहे. हा डोंगर चोहोंकडून आपल्या हृदयातून मधुर जलाचा पुरवठा करीत असल्यानें नारळी, पोफळी व जिराईत कृषीहि वर बरीच आहे. देवळात वार्षिक चैत्रीपौर्णिमेची जत्रा भरते व तिला हजारों लोक जातात. डोंगरावरची हवा बरीच गार असल्यानें जवळच्या लोकांना तो महाबळेश्वर सारखा उपयोगी पडतो. सिद्धनाथाच्या मानानें पाहिल्यास यावरील लोकवस्ती जास्त व घराची तशीच पाण्याची सोयहि विशेष आहे म्हणून यावर उन्हाळ्यात बरींच कुटुंबें दरसाल जाऊन राहत असतात. सारा सासष्टप्रांत, केपेचा अघशी नदीकडचा भाग व सागें फोंडेंचा बराच भाग ह्या डोंगरावरून दिसतो. सासष्ट प्रांतांतील नारळीच्या झाडाच्या झालरीनें वेष्टित भातशेती, वरून एखाद्या हिरव्या चौकटीच्या गालिच्यासारखी मधून मधून दिसते. मान उंच करून एखादें घर डोकावून पाहत असल्याचा देखावाहि फारच मनोरम दिसतो. सभोंवतालच्या इगर्जांचीं ( चर्च ) उंच शिखरें यावरून पाहताच पुष्कळशा जुन्या नव्या आठवणींनीं मन व्यग्र होतें. साधेल त्यानें या डोंगरावर एकदां तरी जाऊन यावेंच इतकें हें स्थळ मनोरम आहे.

**नद्या:**—गोमतकांत बहुतेक साऱ्या नद्या सह्याद्रीच्या पहाडांत उगम पावून अरबी समुद्रास मिळतात. ह्या नद्या लांबीच्या मानानें अगदीं सामान्य असल्या तरी सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें त्यांची बरोबरी करणारी एकही नदी सबंध महाराष्ट्रांत नाहीं, असें म्हणणें सत्यास मुळींच सोडून नाहीं. पहाडी प्रदेशात गोड्या पाण्यानें

भरून, गर्द अशा गगनचुंबित वृक्षराजींतून, प्रचंड नागिणीप्रमाणें नागमोडीनें सरपटत व सळसळ असा आवाज करीत येणाऱ्या या साऱ्या गिरिकन्यका, सपाट प्रदेशांत येतांच आपलें मूळचें रानटी स्वरूप त्यागून, जणू काय श्वशुरगृहाच्या समीपतेची ओळख पटल्यामुळें गजगामिनी बनून आपली मूळची बाल्यसुलभ गडबड व चांचल्य त्यागून, गंभीर व कुलस्त्रियोचित विनयानें मंडित दिसतात कधीं नारळीनीं तर कधीं चीप वगैरे झाडांनीं युक्त अशी उभय तीरावरील ती घनदाट, वृक्षराजीनें सभोंवतालच्या सपाट अशा हरितवर्ण शेतांमधून जाणारी गोमतकातील नदी म्हणजे सृष्टीदेवीनें कृपाळु होऊन आम्हां गोमतकीयाना नयनरम्य असे रस्तेच बांधून दिल्यासारखें दिसतें, आणि दिसतें म्हणण्यापेक्षा दिले आहेत हाच शुद्ध प्रयोग सत्यास विशेष धरून होणार आहे. कारण अशी एकहि गोमातकीय नदी नाहीं कीं जिच्यात निदान ५ टनाच्या नावा चालत नाहींत. कांहीं नद्यांतून असा मार्ग ४१५ किलोमीटरचा (२१३ मैलांचाच) मिळतो तर दुसऱ्या कित्येकींतून तो तीस पासून ८० किलोमीटरचा मिळतो विशेषत· मांडवी व अघशी या दोन नद्यानीं स्त्रीस्वभाव सुलभ असा सापत्न भाव सोडून मारलेल्या मिठीमुळें, आम्हाला साऱ्या मध्य गोमतकभर हा दिव्यपथ उपयोगी पडत आहे नील नदी, गंगा नदी इत्यादि इतिहासप्रसिद्ध नद्या आपल्या सृष्टीसौंदर्याबद्दल प्रख्यातच आहेत. परतु गोमतकांत, चादण्या रात्रींचे, वल्ह्याचे तालबद्ध आवाज ऐकत ऐकत होड्यांतून आमच्या नद्याच्या प्रवाहांनीं बनलेल्या चक्रव्यूहांतून ज्यांनीं प्रवास केला असेल त्यांना नील, गगा, किंवा झेलमच्या सौंदर्यांत प्रवाहाच्या प्रशस्तपणाशिवाय आणखी कोणतेंच नाविन्य आढळणार नाही, असें उभय ठिकाणची ओळख असलेल्या प्रवाशांनीं लिहून ठेवलें आहे. अगदीं उत्तरेस सरहद्दीवरची **तेरेखोलची** खाडी १२ मैल लांबीची गोमतक प्रातात वाहते, तिचा उगम मणेरी प्रांतात झाला आहे ह्या नदीकांठीं तेरेखोलचें बदर असून मुखाजवळच उत्तर तीरावर तेरेखोलच्या जुन्या किल्ल्याचे अवशेष आहेत. इतिहासप्रसिद्ध बक्षीबहाद्दर **जिवबादादा केरकर** याचा केरी गांव याच नदीच्या दक्षिण तीरावर आहे. **कायसुवची** खाडी हीदेखील सावतवाडी प्रातांत उगम पावून बार्देश व सांखळी कोंसिल्य, पेडणें कोंसिल्यापासून अलग करीत, सुमारें तेरा चौदा मैल पोर्तुगीज प्रातातून वाहून कायसुवच्या बदरांत समुद्रास मिळते नदीकाठीं कायसुव बंदराशिवाय कोलवाळ हें दक्षिण काठीं व समशेर जगबहाद्दर **लखबादादा लाडांची** जन्मभूमी चिखली गाव हा याच नदीच्या तीरावर आहे. कोलवाळ व लखबादादाचें वास्तव्य स्थान

आरोबा या उभय गांवांत पूर्वी किल्ले होते. शिवाय इतिहासप्रसिद्ध हळर्णेचा किल्लाहि याच नदीतीरीं पेडणें महालांत आहे. कोलवाळ येथें अलिकडे एक बुद्धाची मूर्ति व कांहीं तत्कालिन अवशेष सापडले आहेत

**मांडवी नदीः**—ही गोव्यांतील नद्यात प्रमुख असून तिच्या गणगोताचा विस्तारहि बराच मोठा आहे गोव्याच्या ईशान्य कोपऱ्यातील भीमगडात उगम पावून व सत्तर प्रात मधोमध दक्षिणोत्तर चिरून, भादय या नावानें ती गार्जेपर्यंत येते. येथेंच तिला खाऱ्या पाण्याची जोड मिळते. पुढें अनेक नद्याचें पाणी पोटात घेत ती पिळगाव येथें येते. येथें तिचें पात्र पुष्कळ रुदावतें व त्यांत जुवें, कुभारजुवें कुलालद्वीप, दिवाडी, दिपावती, चोडणे, चूडामणी, आखोडा, खोरजुवें इत्यादि बेटें बनून रायबदर बंदरानजिक सारे फाटे एकत्र होऊन पणजीला कक्षेंत घेतल्यावर आग्वाद व काब या दोन टोंकातून भव्य व मनोहर स्वरूपांत ती आरबीसमुद्रास मिळते साखळीची नदी, डिचोलीची नदी, म्हापशेंची नदी, रगडो, दुधसागरची नदी इत्यादि प्रवाह इच्या गणगोतातील आहेत व भाणस्तार येथून निघालेल्या माशेलांतील नदी या नांवाच्या फांट्यानें हिनें अघशी नदीस मिठी मारली आहे. गोमंतकाची जुनी राजधानी गोवें शहर व नवी राजधानी नवीन गोवें ( पणजी ) ह्याच नदीच्या दक्षिण तीरावर आहेत. नारवें येथें ह्या नदींत एक संगम होऊन ती दक्षिणवाहिनी होते. तेथें जन्माष्टमीची जत्रा भरते. खंडेपार येथें दुधसागरच्या नदीवर एक दगडी पूल आहे तो फारच सुंदर आहे. तसेंच भाणस्तारच्या फांट्यावरहि एक लोखंडी पूल गेल्या सालीं बांधला आहे. नदीमुखाशीं बारदेश प्रांतांत “ रेइज मागुश ” चा किल्ला व आग्वादचा किल्ला व दक्षिण तीरावर काबचा राजवाडा आहेत.

**अघशी ऊर्फ जुवारी नदीः**—ही गोमंतकातच हेमाडबार्से व अष्टाग्रहार प्रांतांत उगम पावून सागें, केपें, फोंडें, सासष्ट, तिसवाडी व मुरगाव या कोंसेल्यांना कुरवाळीत मुरगावच्या आखातांत मांडवी नदीच्या मुखाजवळच समुद्रप्रवेश करते. मुरगावचा किल्ला व रायतूरचा किल्ला हे याच नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर आहेत मुरगांव, रायतुर, कुठ्ठाळ, कुडचडें हीं बदरें दक्षिण तीरावर व अघशी-फोंडा व कवळें येथें जावयाचें दुर्भाट बंदर, बोरी हीं उत्तर तीरावर आहेत सांवर्डें येथें ह्या नदीवर रेल्वेचा उंच दुमजली पूल सुमारें १०० मीटर लांबीचा आहे, वरच्या मजल्यावरून आगगाडी, खालून खटारे वगैरे

जातात ह्या पुलाचें दृश्य फारच मनोहर दिसतें. मांडवी नदीचा फाटा हिला मडकईजवळ मिळतो. तेथें हिचें पात्र सुमारें पाऊण मैल रुंदीचें बनलें असून उत्तरोत्तर विशेषच रुंद होत, मुरगांवच्या समोर त्याला अडीच तीन मैलाची रुंदी प्राप्त होते. दरम्यान कुठ्ठाळ बंदरासमोरच उंदरांचें बेट या नांवाचें व दाबोली गावासमोर सा जासींत नावाचें अशीं दोन बेटेंहि या नदींत आहेत. पारोडेंची कुशावती नदी ही एक व सांतानची नदी दुसरी ह्या हिलाच मिळतात. माशेलातील नदी नांवाचा मांडवीचा जो फांटा हिला मिळतो, त्यावर श्री मंगेशीस जाण्यास उपयोगी पडणारें कुंडई बंदर आहे. पारोड्याच्या नदीवरहि रेल्वेचा लोखंडी पूल चांदर येथें आहे.

**बेतुलची नदी ऊर्फ मिठाची नदी:**—ही सासष्ट प्रांतात वेर्णें गावाजवळ उगम पावून सासष्टप्रांत दक्षिणोत्तर उभाच चिरून बेतूल व केळशी गांवामध्यें समुद्रास मिळते बेतूलचें बंदर याच नदीच्या मुखाशी असून त्या बंदरांतून बराच व्यापार चालतो

**तर्पणची नदी:**—ही काणकोण कोंसेल्यांतील आंबेघाटांत उगम पावून तर्पणबंदराजवळ समुद्रास मिळते. तर्पण येथें हिचें पात्र बरेंच रुंद झालें असून तेथें व्यापारी फत्तेमाऱ्या येतात.

**गाल्जीबागची नदी:**—ही देखील काणकोण महालातच आंबे घाटाच्या एका फाट्यात उगम पावते व गाल्जीबाग येथें समुद्रास मिळते.

**हवापाणी:**—डोंगराळ मुलुख व सपाट प्रदेश असे दोन विभाग स्थूल मानानें होतात, असें आम्ही पूर्वीं सांगितलेंच आहे. त्याच मानानें गोमंतकाचे हवापाण्यासंबधानेंहि दोन विभाग पाडता येतात. सामान्यत' गोमांतकातील हवा नेहमी उष्ण व सर्द असते. जून ते सप्टेंबरपर्यंत झडीचा पाऊस असतो. त्याचें प्रमाण सरासरी २८७९ मिलीमिटर ( जवळ जवळ १०५ इंच ) आहे. अक्टोबर महिनाभर कडाक्याचा उन्हाळा असून अधून मधून पावसाच्या सरी येतच असतात. नवबर ते जानेवारीपर्यंत हवा साधारणपणें गार असते याच वेळीं उत्तरीय वारा सुरू होऊन अंगाला झोंबत असतो. फेब्रुवारीपासून पुन उन्हाळ्यास सुरुवात होऊन मे महिन्यांत उष्णतेची परमावधी होते. या वेळीं पारा जास्तीत जास्ती ९१ पर्यंत चढतो व हिवाळ्यात व पावसाळ्यात ७० पर्यंत उतरलेला दिसतो. समुद्रकाठच्या प्रांतांतून ह्या उष्णतामानांत थोडा फार फेरफार दिसून येतो व तेथील हवा कमी उष्ण असते. डोंगराळ प्रांतांतून व तिसवाडीच्या कांहीं भागां-

तून पावसाळाभर मलेरियाची सांथ असते, त्या मानानें दर्याकाठचा प्रदेश व सपाट प्रदेश रोगरहित दिसतो.

**पिकें:**—सासष्ट, बारदेश व तिसवाडी हे कोंसेल्य व फोंडें कोंसेल्याचा अघशी नदीकडील भाग हे भाताच्या शेतींत उत्कृष्ट समजले जातात. बहुतेक साऱ्या जमिनींतून सर्द ( खरीप ) व वाईंगण ( रब्बी ) अशीं दोन पिकें घेतलीं जातात. शिवाय रताळीं, कलिंगडें, भेंड्या, मुळे, कांदे, इत्यादि वरपिकें, तिसवाडी व बारदेश या कोंसेल्यातून काढण्यांत येतात. नारळाचें उत्पन्न सर्व गोमतकांत सारखेंच येत असतें. परंतु त्यांतल्या त्यात पेडणें, बारदेश, तिसवाडी व काणकोण येथील नारळ खोबऱ्याच्या दृष्टीनें विशेष उपयोगी समजला जातो. फोंडें कोंसेल्य, सांखळीचा कांहीं भाग व काणकोणचा थोडा भाग, यात सुपारीचें पीक विशेष येतें. सासष्ट, तिसवाडी व बारदेश येथें आंब्याचेंहि पीक चांगलें येतें त्याच्या खालोखाल फोंडें, डिचोली वगैरे कोंसेल्यांतहि आंबे होतात परंतु त्याची रुचि तेवढी नसते असें म्हणतात. दरसाल निर्गतीस सुमारें दीड कोटी आंबे जातात. फोंडें कोंसेल्यांतून पावसाळ्याच्या सुरुवातीस बरींच अननसेंहि निर्गत होतात. कायसुवची नदी, बारदेश कोंसेल्यांतील बागची नदी नावाचा लहानसा खारा ओढा, सिकेरीची लहानशी नदी, बेतुलची नदी व मांडवी नदीचा बराच मोठा भाग यातून मिठागरें असून मिठाचें उत्कृष्ट पीक येतें गोव्यातून दरसाल सुमारें पाच कोटी नारळ व १ कोटी मण मीठ निर्गत होतें. ह्या पिकाखेरीज विशिष्ट पीक म्हणून बारदेशच्या मइडें गांवांतील मइडोळीं केळीं फारच उत्कृष्ट व पौष्टिक समजलीं जातात.

**वाहतुकीचीं साधनें:**—याचे स्थूल मानानें लोहमार्ग, जलमार्ग व सडका असे तीन विभाग पाडावे लागतात. सर्वांत महत्वाचें साधन म्हणजे रेल्वेचें होय. सन १८८१ सालीं गोमतकात डब्ल्यु आय. पी. रेल्वेच्या कामास ८० लाख पौंडाचें भांडवल घालून सुरुवात झाली. रेल्वे कंपनी इंग्रजी होती, तेव्हां त्या कंपनीचा पोर्तुगीज सरकारशीं जो करार झाला त्यांत ह्या भांडवलावर पांच टक्के व्याजाची हमी पोर्तुगीज सरकारनें स्वीकारली होती परंतु पुढें दुधसागरच्या घाटांत बोगद्यांसाठीं येत असलेला जबरदस्त खर्च पाहून व कदाचित् पुढें वाहतुक वाढल्यास डबल लाईन घालण्याची जरूरी उद्भवल्यास त्याचीहि सोय सुरुवातीसच करण्याचें ठरून बोगदे, कटिंगें, पुलांचे खांब इत्यादि कामें तेवढ्या रुंदीची मुळांतच बांधण्याची योजना झाली, तेव्हां मूळचें अंदाजपत्रक वाढवून दुरुस्त करण्यांत

आलें. नवीन अंदाज साडे तेरा लख पौंडांचा झाला होता व ह्या जादा भांडव-लावर ६ टक्क्यांची हमी स्वीकारून पोर्तुगीज सरकारनें त्याला मजुरी दिली. रेल्वेचें बांधकाम पूर्ण होऊन ती सदर्न मराठा रेल्वेस जोडून तेथपर्यंत रहदारी सुरू होई तोंवर १८८८ साल उघडलें. सरहद्दीपर्यंत रेल्वेची लांबी ५०* मैलाची असून मुरगांव तें कुळेंपर्यंतचा ३८ मैलाचा भाग सामान्यत सपाटच आहे म्हटलें तरी चालेल. तेथपर्यंतची उंची फक्त २३८ फुटांचीच आहे त्यामुळें या भागांत रस्त्याला शेंकडा एक टक्याचाच कमाल चढाव दिला गेला. पुढचे बारा मैल मात्र चढाव बराच खडा आहे व तो शेंकडा २॥ या मानानें लोडला आहे. कुळें ते क्यासलरॉक ह्या दोन स्टेशनांमधील सपाटीचें अंतर १२८७ फुटाचें आहे. हा सारा घांट वळणा वळणानें गर्द व गगनचुंबित झाडीतून दूधसागराच्या सुंदर धबधब्याच्या लगतूनच गेल्यामुळें प्रवाशांस दर खेपेस हा प्रवास विशेषच आकर्षक वाटतो विशेषतः दुधसागरचा धबधबा, दुधसागर स्टेशनावरून दिसतो. सोनावळीचें स्टेशन व त्यापुढील सुमारें दोन अडीच मैलांचा रस्ता, नाग मोडींतून दिसतो. तें दृश्य फारच मनोरम दिसतें. पावसाळ्यांत जागोजागच्या कडेकपारींतून धवलवर्ण उड्या घेत असलेले अनेक लहान मोठे जलप्रवाह पाहतांच दुधसागररूपी सहस्रफणी नागराजाचीं हीं पिलेंच आपल्या जनकाच्या भेटीस उत्सुक होऊन चोंहोंकडून धावत असल्यासारखीं दिसतात. दुधसागरचें वर्णन स्वतंत्रपणें पुढें प्रेक्षणीय स्थळात येईलच प्रारंभीं ह्या रेल्वेचीं, मुरगांव, वास्कोदिगामा, दाभोली, कांसावली, माजोर्डें, मडगांव, च्यांदर, सांवर्डें, कार्ले, कुळें व दुधसागर येवढींच स्टेशनें होतीं. पण पुढें वाहतुक वाढतांच कुळें व दुधसागरच्या दरम्यान सोनावळी हें स्टेशन आणि दुधसागर व क्यासलरॉक मध्यें करंझोल अशीं दोन स्टेशनें घांटांत गाड्यांना वेळ मोडू नये म्हणून केवळ क्रॉसिंगकरताच उघडण्यांत आलीं. त्यांवर उतारूंची किंवा मालाची चढ उतर होत नसते त्याचप्रमाणें दाभोली स्टेशन हें केवळ उतारूच्या सोयी-साठींच उघडलें आहे. तेथें गाड्या क्रॉस होण्याची सोय नाहीं. रेल्वेच्या सोयीसाठीं मुरगाव येथें कंपनीकडून ११९४ फूट लांब एक धक्का बांधण्यांत आला व लाटा अडविण्यासाठीं त्याला ११७६ फुटांचा आडवा तटहि बांधला गेला.

परंतु सन १९०२ पर्यंत ही रेल्वे पोर्तुगीज सरकारला केवळ गळ्यांतील लोढण्या-सारखी अडचणीची व जबरदस्त नुकसानीची झाली. कारण मूळचें भांडवल व दुरुस्त

---

* **टीप**—सरहद्दीपासून क्यासलरॉक स्टेशनपर्यंतचा सुमारें २ मैलांचा रस्ता सदर्न मराठा रेल्वेनें इंग्रजी अमलांत बांधला आहे.

भांडवल यावरील व्याजचे ७३ हजार पौंड म्हणजे सुमारें [illegible] रुपयाजवळ जाऊ लागलें. मद्रास रेल्वे व जी. आय. पी. रेल्वे यांनीं आपसांत करार करून वाहतुकीचे दर उतरल्यामुळें सदर्न मराठा रेल्वे व [illegible]ु. आय पी. रेल्वे यांची हालचाल थंडावली त्यांतल्यात्यांत आमची रेल्वे परदेशच्या, घाटावर जाण्याच्या वाहतुकीवरच, गोव्यांच्या खास व्यापारापेक्षां परदेशच्या घाटावर जाण्याच्या वाहतुकीवरच विशेष अवलबून असल्यामुळें तिचें तर उत्पन्न मुळींच इतकें बसलें कीं, १८९९ ते १९०१ सालाच्या सुमारास इतर सारी वाहतुक बद पडून केवळ टपाल नेणारी एकच प्यासेंजर गाडी तेवढी तिच्यावरून फेऱ्या करीत होती. त्यामुळें या सुमारास पोर्तुगीज सरकारला व्याजाशिवाय रेल्वेच्या चालू खर्चाची देखील सोय पदरची करावी लागली होती. तिकडे सदर्न मराठा रेल्वेचें उत्पन्नही बरेंच धोक्यांत आलें. तेव्हां उभय रेल्वेच्या अधिकारी मडळाच्या लक्ष्यांत, दोघाचेही हितसंबध एकच असल्याचें येऊन त्यांनीं त्या सामायिक चालविण्याचें ठरविलें, त्याप्रमाणें १९०२ सालीं करार होऊन तेव्हांपासून ह्या रेल्वेचा कारभार सदर्न मराठा रेलवेनें हातीं घेतला.

कराराचा परिणाम लागलीच दिसून आला. वाहतुक भराभर वाढू लागून धक्क्याची लांबी आगबोटीस उणी पडूं लागल्यामुळें तो ८६८ फुटानी वाढविण्यात आला. पाण्यांतील आडव्या तटाची लांबी आणखी ५०० फूट बाहेर नेली गेली व त्याला तेथून धक्क्याशीं समांतर असा एक पुनः ९०० फुटांचा उभा तट पाण्यांतच बांधण्यात आल्यामुळें मूळच्या तीन लहान आगबोटींच्या ऐवजीं आतां एकदम ४ मोठ्या आगबोटी धक्क्यास लागण्याची सोय झाली. १९०३ पासून रेल्वेचें उत्पन्न भराभर वाढत जाऊ लागलें. शेवटीं १९२७ साली ( स्थापनेपासून ४१ वर्षांनीं ) व्याज व खर्च वजा जाता १९९० पौंडाचा नफा, ( पौंडाचा भाव १३॥ रुपये धरल्यास २६८६५ रुपये ) मूळच्या करारामुळें कपनी व पोर्तुगीज सरकार याना आपसास वांटून घेण्यासाठीं मिळाला. अजूनहि वाहतुक वाढतीच आहे त्यामुळें धक्का आणखीहि वाढविण्याची योजना तयार झाली आहे. मालाचा चढउतार करण्यासाठीं एक ते पांच टन शक्तीच्या १६ चक्क्या आहेत माल साठविण्याकरतां तीन मोठाल्या वखारी आहेत. शिवाय रॅली ब्रदर्स कंपनी व व्हॉल कार्ट ब्रदर्स कपनी यांनीं स्वतःची एक एक प्रचड वखार अलीकडेच बांधली आहे ती निराळीच. मुरगांव ते मुंबईचें भाडें तीनही क्लासाचें अनुक्रमें पहिला वर्ग रु. ५०—१० आणे दुसरा वर्ग रु. २५—५ व तिसरा वर्ग ९ रु. ७ आणे असून हा प्रवास २७ तासांच्या

अवधींत होतो. ह्याशिवाय गोव्याहून जातांना प्रत्येक तिकिटीमागें दहा आणे सरकारी कर तिकिटीच्या दरांतच आकारला जातो.

जलमार्गांच्या सोयींत मुबई ते मुरगांववरून दक्षिणेस मंगलोर पर्यंत आठवड्यात दुबार जाणारी आगबोट सर्व्हिस व दुसरी मुंबई ते पणजीपर्यंत फेरी करणारी सर्व्हिस अशा दोन सोई किलीक निक्सन कंपनीच्या बोटीमुळें व "माझी आगबोट कंपनी"ची गोवस्लाईनची सर्व्हिस तिसरी सोय आहे. यांतून हा प्रवास सुमारें १८ ते २० तासात होतो. मुरगांव व पणजी येथें आगबोट धक्क्यास लागत असल्यानें चढ उतारांतही पडावाचा त्रास नसतो. पावसाळ्यांत यांपैकीं केवळ मुबई मगळूर लाइनचीच बोट आठवड्यास एकदा फेरी करते. गोव्यांतून निघताना तिकिटीशिवाय दहा आण्याचा सरकारी कराचा पास निराळा घ्यावा लागतो.

बाह्य प्रदेशाशी दळणवळणाची सोय ह्या कपनीकडून होते तशी अंतर्गत सोयीसाठीं सरकारनें स्वत: चालविलेली "नाव्हेगासाव फ्लुव्हियाल"ची सोय आहे हें खातें नाविक खात्याचें पोटखातें म्हणून काम करतें त्याच्या लहान लहान अशा आठ स्टीम बोटी आहेत. ह्या बोटींकडून खालील फेऱ्या करण्यात येत असतात.

१. पणजी ते सांवर्डें ऊर्फ सासष्टीची फेरी. पणजी येथून सकाळीं ११ ला निघून, मध्यें रायबदर, जुनें गोवें, कुंभारजुवें, कुंडई, डोंगरी, मडकई, उंडीर, दुर्भाट, बोरी, रायतूर, माणकें व सांवर्डें हीं बदरें करते. सावर्डें येथें संध्याकाळचे पाच वाजण्याच्या सुमारास पोंचून दुसऱ्या दिवशीं मिक्स ट्रेनच्या सावर्डें स्टेशनावरील आगमनानतर अर्ध्यातासानें (सुमारें ८ वाजतां) निघून तींच बदरें करून २–२॥ च्या सुमारास पणजीस पोंचते, मात्र दर पंधरवड्यास १० मी ११ शी १२ शीच्या सुमारास तीन दिवस पणजीहून ९ वाजता निघून सांवर्डें येथें २ वाजतां पोंचते व सावर्डेंहून ७ वाजतां निघून पणजीला १२ च्या सुमारास पोंचते, ह्या फेरी दररोजच्या असून भाडें पणजी ते सांवर्डें अपर क्लास २॥ रुपये व लोअर क्लास बारा आणे आहे शिवाय सामानाचें भाडें निराळें द्यावें लागतें दुर्भाट बदर हें फोंडें व कवळें, बांदिवडें, इत्यादि ठिकाणीं देवदर्शनास जाण्यास सोयीचें आहे. पणजीहून दुर्भाट अपर १ रु ८ आणे व लोअर ८ आणे असें भाडें आहे. सांवर्डें येथून हे दर रु. १ व ५ आणे असे

वसतात. मंगेशी, म्हाळसा, वेलिंग वगैरे देवालयें पाहण्यास कुडई बंदर उपयोगी पडतें. पणजी ते कुडई [illegible] लोअर ५ आणे भाडें असून सांवर्डें ते कुडई १ रु. ४ [illegible] व ८ आणे आहे.

सं. ५-५-१०८

२ दुसरी फेरी पणजी ते [illegible] पणजीहून संध्याकाळीं ४॥ च्या सुमारास निघून [illegible] ७॥ वाजतां पोंचते व पुन: दुसऱ्या दिवशीं सकाळीं ७ वाजतां निघून १० वाजतां परत पणजीस पोंचते. ही फेरीहि दररोजची आहे मध्यें रायबंदर, गोवा, करमळीं, पिळगांव, सुर्ले हीं बंदरें लागतात. भाडें अपर रु. १ व लोअर ८ आणे आहे.

३. तिसरी फेरी पणजी ते हळदोणची. रोज संध्याकाळीं ४–४५ ला पणजीहून निघून बिठोण, वडो, एकोशी, पोंबुर्पे, आमाडी व कालवे हीं बंदरें करून ६–३० ला हळदोणेंस पोंचते, व रात्रौ तेथे नांगर टाकून दुसऱ्या दिवशीं सकाळची ७–३० ला हळदोणेंहून निघून वरील बंदरें करीत ९ ला पणजीस परत पोंचते. यातील वडो, आमाडी व कालवे हीं अनियमित बंदरें होत.

पूर्वीं या लाइनच्या बोटी पणजीहून दिवसा दोनदां फेऱ्या करीत असत, पण गेल्या २ वर्षांपासून या २ खेपा वाहतुकीच्या मानानें जरा खर्चाच्या होत असल्यानें, एकच फेरी ठेवली. मात्र या वेळाप्रमाणें सदरहू लाइनीच्या प्यासेंजर्संना ( जे कोणी बोटीनें मुंबईस जात असतात ) मुंबईची बोट गाठतां येऊं लागली

पणजी ते हळदोणचें भाडें अपरक्लास ८ आणे व लोअर क्लास ४॥ आणे आहे.

४. चौथी फेरी मांडवीच्या तरीची होय. हिला, बेतीं वेरेंची फेरी म्हणतात. हिला सकाळीं ६॥ वाजतां सुरुवात होऊन तासा तासाच्या अंतरानें साऱ्या दिवसभर तिच्या येरझारा चालू असतात. मध्यें १२॥ ते १॥ पर्यंत एक फेरी बंद असते. रात्रौ शेवटची फेरी ७॥ साडेसाताना होऊन ही बंद होते.

५ पांचवी फेरी मुरगांव व पणजी दरम्यानची पहाटे पांच वाजतां पणजीहून निघून मध्यें वेरें बंदर व दोनापावलाचें बंदर करून ७ वाजतां मुरगांव बंदरावर मेलट्रेनला टपाल देऊन वास्को बंदर करते. पुढें थोड्याच वेळांत वास्कोहून निघून दोना पावल बंदर करून पुनः मुरगांवीं दहा वाजतां येणाऱ्या मिक्सचे उतारू घेऊन उलट दोनापावल वेरें, वहिन पणजीस येते. तेथून परत निघून सकाळच्या प्रमाणेंच बंदरें करीत मुरगांवाहून निघणाऱ्या मिक्स गाडीला उतारू घेऊन जाते. परत

वास्को ते दोना पाव्लच्या खेपा घालून संध्याकाळीं मेलीचें टपाल घ्यायला मुरगांवीं येते. व तें घेऊन रात्रौ पणजीस पोंचते. मुरगांव ते दोना पाव्ल अपर १८ आणे व लोअर ५ आणे व मुरगाव ते पणजी अनुक्रमें १ रु. १० आणे व ५ आणे असें भाडें पडतें.

**खुष्कीचे रस्ते:**—ह्या रस्त्यांचे तीन प्रकार आहेत. कांहीं रस्ते प्रांतीय महत्वाचे असे आहेत. ते सरकारनें स्वतः बाधलेले आहेत. त्याना राष्ट्रीय सडक (estrada nacional) असें सबोधण्यात येतें. या सडका कोंसेल्यातून रहदारीसाठीं म्युनिसिपालिटयांनीं बाधलेल्या आहेत त्या म्युनिसिपल सडका व ग्रामगडळाकडून तयार झालेल्या सडका सरकारी सडकाची लांबी ३७५ किलोमिटर म्हणजे २४१ मैल आहे व म्युनिसिपल सडकांची लांबी ५३३ किलोमिटर म्हणजे ३५० मैल आहे. असें सरकारी माहितीवरून समजतें. ( Portaria provincial no 594 de 27-XII-1928 )

खालीं केवळ मोठ मोठ्या रस्त्यांचीच माहिती देत आहों.

उभे रस्ते न्हइबाग ते वेरें व बेतीं ( पणजीस पोंचण्यासाठीं ) हा रस्ता ३२ किलोमिटर ( २० मैल लांबीचा ) असून मध्यें पेडणें, धारगळ, कोळवाळ, कुचेली, म्हापसें, साळगांव ह्या स्थानांतून वेरें येथें पोंचतो. पण पणजीस लवकर पोंचण्यासाठीं याची लावी म्हापसें ते बेतीं या फाटयामुळें सुमारें २ मैलांनीं कमी झालेली आहे.

पणजीहून पोळें; ही सडक ८३॥ कि मी. (५२ मै ) असून थोरलें गोवें (कदंबांचें) अधशी कुडाळ (श्री मगेशाचें आद्यस्थान) वेर्णें (श्री म्हाळसेचें आद्यस्थान) मडगांव कुंकळ्ळी. काणकोण, लोलयें वरून माजाळ गांवांतील ब्रिटीश सडकेला मिळते मध्यें अधशी नदीचें पात्र, तर्पण येथें तर्पणच्या नदीचें व लागलीच २ मैलांनीं गाल्जीबागच्या नदीचें पात्र, अशीं तीन पात्रें ओलाडावीं लागतात. बाळ्ळीपासून काणकोण पर्यंत ह्या रस्त्यावर वनश्री फारच मनोहर लागते. विशेषत करमळ घाटांत हा रस्ता वळणावळणांनीं सुमारें २ मैल चढून उतरतो तो भाग सुंदर दिसतो हे दोनही रस्ते जोडताच पेडणें व पोळें हे गोमंतकाचे उत्तर दक्षिण बिंदु साधणारा उत्तर दक्षिण रस्ता बनतो.

**प्रमुख प्रमुख आडचे रस्ते:**—हे सारे सह्याद्रीच्या घाटांत चढतात. किंवा इंग्रजी हद्दींत जातात. त्याची माहिती खालील कोष्टकावरून होईल.

| सरकारी क्रमांक. | कुठून कुठपर्यंत. | लांबी. | मध्यें येणारीं स्थळें. |
|---|---|---|---|
| ३ | कुचेलीपासून सकिरव्हाळ | १२ मैल<br>१९,२ कि | असनोडें, कांसारपाल, दोडो मार्गे. |
| ४ | असनोडें ते सांखळी | ८॥। मैल<br>१४ कि. | डिचोली. |
| ६ | सांखळी ते केळघाट | १३॥ मैल.<br>२२ कि. | हरवळें, वाळपै, म्होवाचें गुडो येथून घाटांत अजून सडक तयार नाहीं. |
| ७ | दोनापाव्ल ते फोंडें. | २२॥ मै.<br>३६ कि. | पणजी, रायबदर, जुनें गोवें, (आदिलशाही) कुडई, मंगेशीं, म्हाडदोळ, फोंडें. |
| ११ | दुर्भाट पासून पिळयें | ९ मै.<br>१५ कि. | कवळें, फोंडें, खडेपार, पिळयें, |
| १२ | उसगाव पासून तिनई. | २२ मै<br>३५॥ कि | पिळयें, मळें, तिनई |
| १० | मडगांव पासून फोंडें | ८ मैल<br>१२ कि. | लोटली, बोरी व फोंडें |
| ९ | कुठ्ठाळ ते मुरगाव | ८ मैल<br>१२ कि. | सांकवाळ, वास्को. |
| १३ | सांवर्डें पासून कुसमण | ४॥ मैल<br>७ कि | |
| १५ | सांवर्डें पासून सांगें वरून कोठार्ली. | ६ मैल<br>९॥ कि | सांगें. |
| १४ | मडगाव ते केपें. | ८॥। मैल<br>१३॥। कि | पारोडें, केपें |

**मोटार सर्व्हिस**—अलीकडे गोमतकभर मोटारी चालतात मोटारीच्या वाहतुकीमुळें सरकारला आपल्या स्टीम बोटींच्या कित्येक फेऱ्यादेखील नुकसान पोंचल्यामुळें सोडाव्या लागल्या आहेत मार्गे सांगितलेल्या फेऱ्यातून पणजी ते सावर्डेंची फेरी, पणजी ते वळवईची फेरी या अजीबात बंद कराव्या लागल्या आणि मुरगांवहून पणजी येथें करण्यांत येणारी फेरी आता दोनापाव्लापर्यंतच होते.

मोटार सर्व्हिसबद्दल सांगायचें झाल्यास, म्हापसें, मडगांव, पणजी अशीं तीन केंद्रें बनवून ही माहिती द्यावी लागेल. पणजीहून कुंभारजुवें, अघशी, फोंडें व

दोनापावल अशा सर्व्हिसेस असून त्या हरवक्त फेऱ्या करतात मोटारची भरती होण्याचीच कायती त्यामध्यें खोटी होते. म्हापसेंहून येरें, बेतीं, हळदोणें, डिचोली, कोलवाळ, हणजुण, हडफडें इत्यादि सर्व ठिकाणीं, साऱ्या दिवसभर मोटारींच्या फेऱ्या होतात त्याचप्रमाणें मडगावांतून, फोंड्याला जाण्यासाठीं रासय बदरात, कुडाळ, मुरगांव, कुंकळ्ळी, असोळणें, चांदर, केपें, सांगें, जाबावली, काणकोण वगैरे ठिकाणी मोटारी सारख्या येरझारा, करीत असतात. त्याच्या भाड्याचे दर जरी म्युनिसिपालटीनें ठरवून दिले आहेत तरी व्यवहारांत त्या दरापेक्षा पुष्कळच कमी दरानें ही वाहतुक होत असून, एकाद दुसरी सर्व्हिस सोडली तर इतर ठिकाणीं त्या दरांत नेहमीं फेरबदल होत असतो. त्याचप्रमाणें कोलवाळच्या पलीकडील धारगळ बदरातून पेडणेंपर्यंत मोटारी चालत असून पेडण्याहून सावतवाडी वेंगुर्ल्यापर्यंत जातां येतें.

मडगांवहून पणजी येथें जावयाला कुडाळच्या मोटारींतून जाऊन तेथें अघशी नदी उतरून पुनः अघशीहून पणजीच्या मोटारींत बसावें लागतें सामान्यत· माणसीं एकदर भाडें १ रु. १ आणा पडतें. पण टुरिंग सीटला हें भाडें १ रु. ५ आणे आहे.

पणजीहून म्हापशाला जावयाला तर उतरताच माणसीं ६ आणे भाड्यानें तेथें पोंचवितात. बेतींतून म्हापशें, डिचोली, सांखळी व वाळपै अशी पोस्टल मोटार सर्व्हिस आहे. तिला वाळपैपर्यंत माणशीं १ रुपया भाडें पडतें.

**बेळगांव लाइनः**—पणजीपासून बेळगावला जायला सकाळीं दहाला "चव्हाण ब्रदर्स"ची लॉरी सुटते ती वाटेंत मंगेशी, म्हाडदोळ, फोंडें, खंडेपार, येथें उतारू घेत लोंडा, खानापूर मार्गानें सध्याकाळीं सुमारें ४॥ ला बेळगांवीं पोंचते.

**कारवारची सर्व्हिसः**—मडगांवांतून सकाळीं ९॥ ला व संध्याकाळीं ७ ला अशा दोनदां मोटारी कारवारला जाण्यासाटीं निघतात त्या कारवारला अनुक्रमें सुमारें दुपारीं दोन व रात्रो बाराला पोंचतात. परंतु मध्यतरीं तर्पणच्या नदीपासून गाळजीबागच्या बदरापर्यंत सुमारें दोन मैल खटाऱ्यांतून जावें लागतें. भाडें तूर्त चढाओढीमुळें १२ आणे आहे.

गोव्यातून इतर प्रांताशीं दळणवळण ठेवणारे मुख्य असे हेच दोन मोटारींचें रस्ते आहेत.

**उतार पेठा:**—जुन्या काळीं सारी वाहतुक बैलांच्या लमाणानींच होई व त्यामुळें जुन्या रस्त्यावरच मूळच्या उतार पेठा होत्या. केळघाटाच्या रस्त्यावर साखळी व डिचोली, म्हापशें, तिनई घाटाच्या रस्त्यावर उसगाव, खडेपार, म्हाडदोळ, फोंडें, दुभांट, दिगीच्या रस्त्यास सांगें, केपें, पारोडें, मडगांव, बाळ्ळी, ह्या उतारपेठा होत्या तेरेखोलच्या खाडीला पेडणेंची उतार पेठ होती; कायसुवच्या खाडीला म्हापशेंची उतार पेठ होती ती अजून भरभराटींतच आहे. बेतुलच्या खाडीला मडगावची उतार पेठ होती. परंतु अलीकडे रेल्वे झाल्यापासून ह्या सर्व पेठांपैकीं केवळ दोनच उतार पेठा टिकल्या. मडगांव हें स्टेशन झाल्यामुळें व म्हापसें हें संपन्न बारदेशाची राजधानी असल्यावरून. त्यांतल्या त्यात म्हापशांपेक्षा मडगाव विशेष भरभराटींत आहे. पणजीचा व्यापार मात्र पूर्ववत् चढताच आहे. नव्या उतार पेठात मुरगावजवळ वास्कोदगामा ही एक व सांवर्डें, कुडचडें स्टेशनची दुसरी, दिवसें दिवस वाढतच आहेत. सावर्डेंच्या पेठेमुळें सांगें, केपें, पारोडें ह्या पेठा मुळींच बसल्या

प्रकरण पहिलें.

## विभाग दुसरा.

# प्राचीन इतिहास.

इतिहासांत गोमतक अथवा गोमातक हें नाव मिळाल्यापासून थेट पोर्तुगीजांच्या स्वारीपर्यंतची माहिती या सदराखालीं आम्हीं देणार आहों.

**गोमंतक हें नांव कसें पडलें**:—असें सांगतात कीं, श्री परशुरामानें पृथ्वी दान केल्यानतर त्रिहोत्रपुराहून गौडसारस्वत ब्राह्मणाना आणवून जेथें यज्ञ केला होता त्या प्रदेशाचें नांव शूर्पारक ( सुपासारखा ) देश असें होतें. परंतु यज्ञीय भूमीजवळच असलेल्या गोमांचल पर्वतामुळें या प्रदेशास गोमतक असें नाव पडलें. दुसरीहि एक व्युत्पत्ति या शब्दाला देतात. गौ, म्हणजे बाण त्याचा मार परशुरामानें केला असता जेथपर्यंत तो बाण पोंचला, तेथें त्या माराचा अत झाला म्हणून गौमांत=अपभ्रष्ट गोमातक कदब जयकेशीनें आपलें राज्य पुन चाल्युक्यवशीय तैलाप राजाकडून मिळवितांच त्यानें आपल्या राजधानीस गोपकपट्टन हें नाव दिलें त्यावरून गोवें हा शब्द बनला. असे निरनिराळे प्रवाद आज रूढ आहेत.

**हिंदु राजे**:—फार प्राचीन काळीं गोमतकात मौर्य वशीय राजांची सत्ता चालत असे अशी दतकथा आहे. त्यांच्यामागून गोमतक, कदब वशीयांच्या हातीं गेला. ह्या वशाचा मूळपुरुष त्रिलोचन किंवा त्रिनेत्र कदब हा गोमंतकांत इ. स. ११० त राज्य करीत होता असें बर्किंघर्हमनें आपल्या प्रवास वर्णनांत नमूद केलें आहे. ह्या पुरुषापासून षष्टदेव ऊर्फ चट्टदेवापर्यंत म्हणजे इ. स. ४७९ पर्यंत कदब वशाची सत्ता गोमतकात निरंकुशपणें चालली होती दरम्यानच्या साडेतीन शतकाच्या अवधींत ह्या वशांत बरेच राजे प्रख्यात व दिग्विजयी होऊन गेले. पैकीं गुहल्लदेव व त्याचा पुत्र चट्टदेव ऊर्फ षष्टदेव हे विशेष प्रख्यात होते. षष्टदेवानें लकाधिपतीला जिंकून त्याला माडलिक बनविलें होतें. त्याची राजधानी

चंद्रपूर म्हणजे आजचें चांदर येथें ... इ. स. ४७९ सालीं चालुक्य वंशीय राजांनीं कदंबाचें स्वातंत्र्य नष्ट करून त्यांस आपले मांडलिक बनविलें. परंतु पुढें इ. स. ८९९ त चालुक्य राजावर बेळगांव नजीक सुगंधवीत ऊर्फ स्तुदती ( आजची सौंदत्ति ) येथील राठ नावाच्या जैन धार्मिक राजानीं स्वारी केली व गोमतक प्रांतासहित सारें राज्य आपल्या सत्तेखालीं नेलें. नंतर इ. स. ९७४ त म्हणजे फक्त पाऊणशें वर्षांनींच चालुक्य वंशीय प्रतापी, तैलाप नावाच्या राजानें आपल्या पूर्वजाचें राज्य राठांकडून परत घेतलें. ह्याच वेळीं षष्टदेवाचा पुत्र जयकेशी यानें संधि साधून तैलापाशीं सख्य जोडलें व आपलें स्वातंत्र्य परत मिळवून **गोपकपट्टन** म्हणजे थोरलें गोवें येथें आपली राजधानी नेली. त्याच्या मागून त्याचा पुत्र विजयादित्य यानें वीस वर्षें राज्य केलें व त्या नंतर त्याचा मुलगा जयकेशी दुसरा यानें राज्य चालविलें. हा राजा विद्वानास उत्तेजन देई व विद्यार्थ्यांस मदत करी. खास चालुक्य वंशीय विक्रमार्क महिपति याच्या मैलाल महादेवी नामक कन्येशीं जयकेशीचा विवाह झाला होता; इतकी त्यानें आपली सत्ता प्रबल करून घेतली होती. द्वारसमुद्राचा राजा बल्लाळ यानें इ स ११२८ सांत साऱ्या कोंकणांत उच्छाद मांडला होता. परंतु त्याचाहि पराभव जयकेशीनें केला होता. इ. स. ११९३ पर्यंत या वंशात शिवचित्त पर्मा-डीदेव, विष्णुचित्त व वीर जयकेशी या नांवाच्या राजांनीं राज्य केलें. त्या सालीं पुन बल्लाळ राजानीं गोमतकावर स्वारी केली व कदंबानां मांडलिक बनविलें. ह्या बल्लाळांच्या अधिसत्तेखालीं कदंब फारच थोडीं वर्षें म्हणजे केवळ १९ वर्षेंच राहिले. कारण १२१२ सालीं देवगिरीच्या यादवांनी गोमंतक आपल्या सत्तेखालीं घेऊन कदम्बांकडून करभार घ्यायला सुरुवात केली. यादवांनीं कदम्बावर १०१ वर्षें अधिसत्ता चालविली.

**मुसलमानांचा प्रथम प्रवेशः**—इ. स. १३१४ सालीं देवगिरीचें राज्य मुसलमानानीं बुडवितांच कदम्बांची सत्ता पूर्णपणें नष्ट झाली. मुसलमानांनीं गोमंतकांत येऊन कदम्ब राजवंश बुडविला व देवालयांत विध्वंस करून सगळीकडे बेबंदशाही माजविली. याच सुमारास वरंगूळच्या राजाचे राजगुरु विद्यारण्य माधव यानीं राजाच्या कोशाध्यक्षाचे पुत्र हरिहरराय व बुक्कराय यानां बरोबर घेऊन तुंगभद्रा नदीच्या तीरीं अनागोंदीच्या जागीं विजयनगर नांवाचें नवीन शहर स्थापून राज्य उभारलें. सिंहासनावर बुक्कराय बसला व विद्यारण्य माधव ह्याला प्रधानपद दिलें हें वर्तमान इ. स. १३३५ त घडलें.

**विजयनगरची सत्ताः—** इ स. १३६७ त, म्हणजे मुसलमानाच्या प्रवेशानंतर फक्त ५३ वर्षांनींच, हरिहरराय विजयनगरच्या गादीवर बसला व त्यानें यति माधवाचार्य याला गोमंतकावर स्वारी करायला पाठवून मुसलमानाना हांकून लाविलें, सप्तकोटीश्वराची पुन स्थापना केली व जुन्या गोव्यांतील गोमाचल तीर्थाचा जीर्णोद्धार करून त्याला माधवतीर्थ हें नांव देऊन, तेथील भूमि ब्राह्मणांस दान दिली. त्यामुळें त्या जागेला ब्रह्मपुरी हें नांव मिळालें. याप्रमाणें मुसलमानांची पहिली राजवटी गोमतकांतून नष्ट झाली. पुढें १४०६ त एका दैवज्ञ ब्राह्मणकन्येमुळें बहामनी फिरोजशहा याचें कृष्णरायाशीं युद्ध झालें व त्यांत विजयनगरच्या राजाचा पराभव होऊन तहांत आपली मुलगी फिरोजशहाला द्यावी लागून वर ४० लक्ष रुपये, पाच मण मोतीं, पन्नास हत्ती व बांकीपूर परगणा इतकी सपत्ती गमावणें भाग झालें त्या अपमानानें कृष्णराय, रामाचें भूशीर येथें ६ महिने एकातवासात राहिला होता. विजयनगरच्या राजाची सत्ता गोमतकावर इ. स. १४६८ पर्यंत म्हणजे १०१ वर्षं राहिली.

**मुसलमानांचा दुसरा प्रवेशः—**इ. स. १४६९ त बाजव्यानां सांगितलेली देणगी विजयनगरच्या राजानें दिली नाहीं या क्षुल्लक सबबीवर महमदशहा बहामनी याच्या महमद गवान नांवाच्या सरदारानें गोवा प्रातावर हल्ला करून तो काबिज केला. गोव्यांत त्या वेळीं अमराजी नांवाचा विजयनगरचा प्रतिनिधी कारभार करीत होता. महमदशहानें या विजयाप्रीत्यर्थ बेदर येथें सात दिवस उत्सव केला व जातीनें गोव्यांत येऊन खुष करून या शूर सरदाराला किस्वरखान असा किताब देऊन सुभेदार नेमलें. इ. स १४७९ सालीं होनावरच्या मलिक हासीम नावाच्या सरदारास तेथील हिंदु राजानें भंडावून सोडलें तेव्हा तो गोमतकांत येऊन बहामनी राजाच्या आश्रयास राहिला. त्यानें आपणासाठीं जें शहर वसविलें तेंच जुनें गोवें होय. तेथेंच मग मुसलमानांनीं राजधानी केली. अमराजीनें मुसलमानांना स्वस्थता दिली नाहीं त्यानें बेळगांवच्या विक्रमराय नावाच्या राजाला गोव्यांवर हल्ला करण्यास प्रवृत्त केलें. परंतु तो गोमतकांत येतो न येतो इतक्यांतच महमदशहानें बेळगांवचाच किल्ला सर करून उलट त्यालाच संकटांत घालून हा बेत फसविला किस्वरखानाच्या मागें फकीर उल्मुल्ख याला गोव्याची सुभेदारी मिळाली. ह्याच्या कारकीर्दींत १४८१ सालीं अमराजीनें मोठें सैन्य घेऊन गोव्यावर स्वारी केली. तेव्हां महमदशहानें युसफ आदिलशहाच्या हाताखालीं मोठी फौज देऊन अमराजीला घालवून दिलें. पुढें इ. स. १४८६ त बहादुर

खिलजी नांवाच्या लष्करी सरदारानें सुभेदाराला पदच्युत करून गोवाप्रांत आपल्या सत्तेखालीं आणला व स्वातंत्र्याची द्वाही फिरविली परंतु इ. स. १४९५ तच महमदशहाबरोबर झालेल्या लढाईंत खिलजी मारला गेला. महमदशहानें मुल्लुख इल मुल्लुख याला सुभेदार नेमलें होतें इ. स. १४९७ त तो वारतांच त्याच्या मुलानें सुभेदारी आपल्या हातीं घेतली. दरम्यानच्या काळांत बेदरच्या राज्यांत अदाधुंदी माजल्याचा फायदा घेऊन उपरोक्त युसुफ आदिलशहानें विजापूर येथें आदिलशाही स्थापन केली. तेव्हां या सुभेदारानें गोव्याचा अधिकार आपणाकडे कायम राखण्यासाठीं आपण युसुफ आदिलशहाचा अंकित आहें असें जाहीर केलें. अशा रीतीनें हा प्रांत आदिलशाही अमलांत आला खरा पण त्याच्याकडेहि तो फार दिवस राहिला नाहीं. कारण पुढें १५१० तच पोर्तुगीजांनीं आपली सत्ता गोव्यांत प्रस्थापित केली, तिचा इतिहास पुढें दिला जात आहे

**मुसलमानी सत्ता किती वेळ टिकली:**—वरील माहितीवरून गोमंतक प्रांतांत ११० ते १३१३ पर्यंत सुमारें १२०३ वर्षेंपर्यंत कदम्बाची सत्ता चालू होती असें दिसून येतें. पुढें १३१३ ते १३६७ पर्यंत म्हणजे चौपन्न वर्षें मुसलमानी सत्ता व १३६७ ते १४६९ पर्यंत विजयानगर व पुनः १५१० पर्यंत मुसलमान म्हणजे एकंदर ९५ वर्षें हा प्रांत त्यांच्या हाताखालीं होता असें म्हणावें लागतें. पैकीं पूर्वींचीं ५४ वर्षें त्यांनीं बेबंदशाहींतच घालविलीं आणि १५ व्या शतकांतील ४१ वर्षें म्हणजे राज्यक्रांति व उलथापालथ अशाखालींच गेल्यामुळें प्रजाजन त्यांच्या राजवटींत अत्यंत त्रासून गेले होते. आणि म्हणूनच १५१० त आल्बुकेर्क येतांच त्यांनीं मोठ्या उत्साहानें फिरंग्यांना सहाय्य केलें त्यांना वाटलें होतें कीं, हे लोक आपल्याला संकटमुक्त करून शांतता देतील पण काळानें त्यासमोर दुसरेंच ताट वाढून ठेविलें होतें. त्याचें पुढें योग्य स्थळीं वर्णन येईलच.

---

# अर्वाचीन इतिहास.

**पोर्तुगीजांचा प्रवेश:**—इ. सन १५१० च्या फेब्रुवारींत फिरंग्यांनीं आफोंस दे आल्बुकेर्क याच्या आधिपत्याखालीं जुनें गोवें शहरांत प्रवेश केला. तुलव देशचा तिमय्या नांवाचा सरदार त्या वेळीं विजनगरच्या आरमारावरील मुख्य अधिकारी होता. व विजयनगरच्या हुकुमावरून त्यानें मुसलमानावर समुद्रमार्गें

हल्ला चढविला होता त्याला आल्बुकेर्कनें जवळ केलें व उभयतांचीं जहाजें व सैन्यें एकत्र करून फारशी लढाई न करतां त्यांनीं गोवें शहर हस्तगत केलें. मुसलमानी सैन्यें भाणस्तारच्या रस्त्यानें पळून गेलें शहराच्या कबजांत पोर्तुगीजांना सासष्ट व बारदेश हे प्रातही मिळाले होते. तेव्हां आल्बुकेर्कनें तिमय्याला गोवें बेटासह सासष्ट व बारदेश प्रांताचा वसूल एक लक्ष कुझाद ( जवळ जवळ २५००० रु. ) ठरवून मक्त्यानें दिला. परंतु लागलीच मे महिन्यांत गोवें शहर व इतर टापू आदिलशाही सैन्यानें परत काबीज केले. तेव्हां आल्बुकेर्कनें पुनः कानानोर गांठलें व त्याच सालच्या नवबर २५ रोजीं वाजत गाजत येऊन गोंवा शहरावर पुनः हल्ला चढविला. घनघोर लढाईनतर त्याच दिवशीं त्यानें तें काबीज केलें. आदिलशाही सैन्यानें आल्बुकेर्कच्या गैरहजीरींत परत १५११ त गोव्याला वेढा दिला होता. परंतु योग्य वेळीं मलाकाहून आल्बुकेर्क परत आला व त्यानें मुसलमानांना हाकून लाविलें. सासष्ट व बारदेश हे प्रांत मात्र आदिलशाही अमलाखालींच राहिले. १५१६ त पुन एकदां आदिलशाही सैन्य गोंव्यावर चालून आलें. परतु हा हल्ला देखील घनघो लढाईनतर परतविला गेला. १५२० त परत मुसलमान गोव्यावर आले तेव्हां आल्बुकेर्कनें विजयनगरच्या दरबारात राजकारण करून त्यांच्या मदतीनें हाही हल्ला परतवून उलट मुसलमानांकडून सासष्ट व बारदेस हे प्रात परत मिळविले. इ. स. १५२४ त रायतूर व बोरी येथें झालेल्या लढाईंत पोर्तुगीजांकडून ते परत आदिलशाही अमलाखालीं गेले. आणि इ. स. १५४३ त दों जुवाव द कास्त्रु यानें फोंडें येथें इब्राहिम आदिलशहाचा मोड करताच ते उभय प्रांत पुन· पोर्तुगीज सत्तेखालीं आले. इ. स. १५५७ त पुन· आदिलशाही सैन्यानें पोर्तुगीजावर हल्ला केला बार्देश प्रातांतील मुराद खानाच्या आधिपत्याखालील सैन्याचा मोड गव्हर्नर फ्रासिस्कु दे बारेंत यानें केला. व सासष्ट प्रातावरील स्वारीचा मुख्य नझीर उल्मुल्ख याचा पराभव जुवाव पेशोत यानें फोंडें मुक्कामीं केल्यानें ही स्वारी देखील फसली. पुनः १५७० त आदिलशाही व निजामशाही हीं होन्ही सैन्यें एकवटून गोव्यातून व इतरत्रही पोर्तुगीजांशीं लढाई चालविली परंतु चेऊल येथें झालेल्या भयकर पराभवानें मुसलमानांचा हा प्रयत्नदेखील फुकटच गेला. तेव्हा मुसलमानानीं तहाचें बोलणें लावलें व सासष्ट व बारदेश प्रात कायमचे पोर्तुगीज सत्तेखालीं आले

**हॉलंडशीं युद्धें**:—ह्यानतर सुमारें तीस वर्षें पोर्तुगीजांना शांततेचीं लाभलीं होतीं. पोर्तुगालवर त्या वेळीं स्पेनच्या फिलिप राजांची सत्ता चालत होती, व त्याचें

हॉलंड, इंग्लंड, इत्यादि प्रोटेस्टंट [illegible] राष्ट्रांशीं युद्ध चालू होतें तें पोर्तुगालाही भोवलें व इ. [illegible] त हॉलंडच्या [illegible] त्यानें गोव्याला वेढा दिला. परंतु पुढें एकाच महिन्यानें त्यांनीं तो उठविला.

इ स १६[illegible]० त पुन्हां गोव्यावर हॉलंडीज चालून आले. या वेळीं त्यांनीं मुसलमानाची मदतहि घेतली होती. त्यांनीं गोव्याला वेढा दिला, मुरगांवला तोफा डागल्या आणि कांहीं काळ मुरगांव येथें तळ देऊन ते निघून गेले.

**मराठे व वाडीकर भोंसले यांच्याशीं युद्धें**:—पुढें सुमारें ५०।६० वर्षें पोर्तुगीजांना शांततेचीं मिळालीं आणि मग गोवें, सासष्ट व बारदेश, या प्रांतांतून चालू असलेल्या जुलुमामुळें, नुकतीच जन्मलेली मराठी सत्ता व वाडीचे भोंसले यांनीं फिरंग्यांबरोबर सारखें शतकभर युद्ध चालविलें.

इ स. १६८३ त श्री छत्रपती संभाजी महाराजांनीं बारदेश प्रांतावर स्वारी केली व रायतूरच्या किल्ल्याला वेढा दिला. व्हायसरॉय कोंद दे आलव्होर हे मराठ्यांच्या हल्ल्यापुढें इतके हतबल व गर्भगळीत झाले कीं त्यांनीं राजदंड जुनें गोवें येथील सें. फ्रान्सिस झेवीयरच्या थडग्यावर वैतागानें टाकून देखील दिला. तेव्हांपासून नव्या गव्हर्नरनें चार्ज घेतानां झेवीयरच्या थडग्यावरून राजदंड घेण्याची वहिवाट पडली. परंतु इकडे मोंगलांशीं अखंड चाललेल्या युद्धामुळें मराठ्यांनां तो वेढा उठवावा लागला. व यापुढें सुमारें २५ वर्षेंपर्यंत मराठ्यांनाच स्वतःचीं संकटें निवारण्याची भ्रांत पडल्यामुळें त्यांचे हल्ले बंद पडले होते. इ. स. १७०६ त पोर्तुगीजांनीं वाडीकरांची खोरजुवें व पनेळें हीं बेटें घेतलीं

इ. स. १७३९ त व्यंकटराव घोरपडे यांनीं सासष्ट प्रांतावर व भोंसल्यांनीं बार्देश प्रांतावर एकाच वेळीं हल्ला करून उभय प्रांत हिसकून घेतले. परंतु १७४१ त कोंद दे येरीसैर यांनीं ब्राझील येथून १२ हजार फौज आणून तिच्या बळावर ते प्रांत परत मिळविले. व उलट वाडीकरावर खंडणी बसविली त्याचप्रमाणें दक्षिणेस सोंधेकरांना मराठ्यांविरुद्ध मदत देण्याचें कबूल करून पोर्तुगीजांनीं त्याच्याकडून पारोडें व तळवडें हे चंद्रवाडींतील गांव आणि फोंडें महालांतील हटकोळण हा गांव मिळविण्याचें वचन त्यांच्याकडून घेतलें. फोंडा महाल व्यंकटराव घोरपड्यांनीं सोंधेकराकडून १७३८ तच घेतला होता आणि सोंधेकरांवर खंडणी बसविली होती म्हणून सोंधेकरानीं हे गांव पोर्तुगीजांनां दिले नाहींत. मराठेशाही त्यावेळीं पेशव्यांच्या हातीं होती व त्यांच्या व भोंसल्याच्या नेहेमीं कटकटी चालू होत्या.

ती संधी साधून फिरंग्यांनीं १७४६ त भोंसल्यांच्या मुलुखावर स्वारी केली व आखाड्याचा जंजिरा किल्ला, तेरेखोलचा किल्ला, रेडीचा किल्ला व सत्तर प्रांत, हाताखालीं घातले. परंतु हे प्रांत त्यांच्याकडे फार काळ राहिले नाहींत.

सोंधेंकरांनीं तीन गांव देण्याचें वचन पाळलें नसल्यामुळें इ. स. १७५४ सालीं त्यांचे काणकोणांतील दोन किल्ले ( रामाच्या भूशीरावरील व सदाशिवगड ? ) फिरंग्यांनीं घेतले व मर्दनगडावर हल्ला केला. परतु केवळ लूटफाट करूनच त्यांना परत यावें लागलें. मराठ्यांशीं हैदराचीं युद्धें चालली होतीं त्यात मराठ्यांचा मांडलीक म्हणून हैदरानें सोंधेकरांचा साराच मुलुख बळकावला. त्यांकडे फक्त गोमंतक व कारवार प्रात तेवढा राहिला. सोंधेंकरानीं हैदराविरुद्ध मराठ्यांशीं मदत मागितली होती पण उत्तर हिंदुस्थानांतील कारस्थानामुळें त्यांना इकडे लक्ष देण्यास फुरसद सापडली नाहीं. अर्थातच सोंधेंकरानीं पोर्तुगीजांकडे मदतीची याचना केली आणि फिरंग्यांनीं देखील त्यांना मदत न करतां केवळ हुलकावणीवरच ठेविलें. शेवटीं सोंधेंकरांनीं पोर्तुगीजांशीं तह केला व अंतरूज ऊर्फ फोंडा, व पच महाल म्हणजे ( १ ) हेमाड बार्शें ( २ ) जांबावली ऊर्फ अष्टाग्रहार, ( ३ ) काकोडें व बाळ्ळीसहीत चद्रवाडी व काणकोण हे प्रांत वीस हजार असर्फ्यांच्या नक्त खडानें त्याना दिलें. मात्र देतांना मुळचीं इनामें, उत्पन्नें, अग्रहार इत्यादि व रहिवाशाचे रीतरिवाज राखण्याची हमी त्यांकडून घेतली होती. तसेच पुनः कधीं काळीं आपली गादी हैदरकडून परत मिळाल्यास हा मुलुखही पोर्तुगीजानीं त्यांना परत द्यावा, असेंहि एक कलम या तहांत होतें.

मराठ्यांना ही बातमी लागतांच अधिसत्तेच्या सबबीवर त्यानीं मर्दनगड हस्तगत करून तेथें ठाणें बसविलें. सन १७५६ त कोंद द आल्व्ह या व्हाइसरॉयनें मर्दनगडावर स्वारी केली परंतु त्यांना मराठ्यांनीं यथास्थित मार देऊन हटविलें. स्वतः व्हाइसरॉय ह्या युद्धात कामास आला.

इ. स १७६३ त व्हाइसरॉय कोंद द यॅग यांच्या हाताखालीं फिरंग्यांनीं पुनः मर्दनगडावर हल्ला करून त्याचा विध्वंस केला. आणि लागोपाठ काणकोणचा रामाच्या भूशीरावरील किल्ला घेऊन काणकोण, जांबावली वगैरे ठिकाणीं आपली सत्ता बसविली. नतर १७९१ त पुन सोंधेंकरांकडचा करार कायम झाला. त्यावेळीं पूर्वीची २० हजार असर्फ्यांच्या जागीं १२ हजार असर्फ्यांची नेमणूक त्यांना ठरविण्यांत आली.

**राजधानीची अदलाबदलः**—इ. स. १७५९ डिसेंबरच्या पहिल्या तारखेस राजधानी जुन्या गोव्यांतून पणजी येथें नेण्यांत आली. पुढें इ. स. १७७४ त जुन्या गोव्यातून प्रमुख प्रमुख कुटुंबें निघालीं होतीं सरकारनें कोमुनिदादीनां शहर पुनः बसविण्यासाठीं सुमारें ८ लाख असर्फ्या खर्च करायला लावलें. परंतु तो उपक्रम निरुपयोगी होऊन इ. स. १८०३ सालीं जुनें गोवें पूर्णपणें मोडून गेलें.

**उत्तर गोमंतकांत सत्ताः**—इ. स. १७८१ सालीं वाडीकराशीं झालेल्या लढाईंत पोर्तुगीजानी पेडणें व भक्तग्राम ( सांखळी ) हे मुलुख मिळविले. परतु ते मिळविण्यास लढाईपेक्षा पोर्तुगीजानीं अंतस्थ फाटाफुटीचाच विशेष फायदा घेतला होता. कोल्हापुरचे छत्रपति व भोंसले याचें युद्ध चाललें होतें त्याचा त्यावेळीं फिरंग्यांनीं चागलाच फायदा घेतला. त्याना पेडणें प्रांत छत्रपतीविरुद्ध वाडकरांनां केलेल्या मदतीदाखल भोगवटयास मिळाला होता. परतु त्यांनीं तो बळकावलाच. व शेवटीं १७८८ सालीं उभयतांत तह होऊन पोर्तुगीजानीं तो कायमचाच आपल्या राज्यास जोडून घेतला. सत्तर प्रांत त्यांनीं पूर्वीच म्हणजे १७४६ सालींच घेतला होता. सत्तरीच्या राण्यांनीं मात्र फिरंग्याना मुळींच स्वस्थ बसूं दिलें नाहीं. इ. स. १७५५ सालींच त्यांनीं पहिलीच उठावणी केली. परत १७८२ सालीं पोर्तुगीजांनीं तो प्रांत आपल्या अमलाखालीं आणला. तथापि तेव्हांपासून १८२२ पर्यंतच्या ४० वर्षांच्या अवधींत राण्यानीं चौदा वेळां स्वातन्त्र्याचे प्रयत्न केले. परंतु चांगल्या नेत्याच्या अभावीं ते फसले व त्यांच्या कपाळीं बडखोर असा शिक्का बसला. १८२३ सालीं पोर्तुगीज गव्हर्नर दों मानुएल दे कास्त्र यानें त्यांनां कडक शासन केलें होतें. तथापि १८२४ त पुनः सत्तर प्रांतांत स्वातंत्र्य युद्ध पुकारलें गेलेंच. पेडण्यापुढें पोर्तुगीजाना सत्ताप्रसार करणें शक्य झालें नाहीं; कारण एक तर स्वतः पोर्तुगीजांची युरोपांतील सत्ताच कमजोर झाली होती शिवाय १८२२ ते १८३२ हा कालविभाग म्हणजे त्याना यादवींचाच गेला होता.

**हिंदी गव्हर्नरः**—दरम्यानच्या काळांत सन १८३५ ते १८३७ ह्या सालीं गोमंतकाच्या इतिहासांत दुसराच एक बनाव बनून आला होता. पोर्तुगाल सरकारनें गोमतकावर बेर्नार्द पेरिश् द सील्व्ह नावाचे एतद्देशीय ख्रिस्ती ब्राह्मण गव्हर्नर नेमले होते. परंतु गोव्यांच्या सैन्यांत लूजो इंडियन ऑफीसर होते त्यानीं बंड पुकारून गव्हर्नरनां पदच्युत केलें होतें

**दिपाजी राण्याचें बंडः**—इसवीसन १८५१ सालीं गव्हर्नर व्हिस्कोंद द व्हील नोव्ह द और्रें यांनीं आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीसच खोट्या माहितीवर

विश्वासून बरेच सुलतानी हुकूम सोडले होते. मोकाशें, इनामें, कुटुंबणें इत्यादिकावर कर बसवून तीं खालसा करणें, ‘ काल्सोर्यु ’ नावाचा जाहीरनामा काढून विजारी न घालणारे पुरुष व चोळ्या न घालणाऱ्या स्त्रिया यांना पकडणें, जगलाचा कायदा जारी करणें, इत्यादि बाबींनीं प्रजेवर शिपायाचे व पाखल्यांचे ( पोर्तुगीज सोल्जरांचे ) अत्याचार सुरू झाले. चोळ्या नसण्याच्या सबबीवर स्त्रियांवर बलात्कार देखील होऊं लागले. तेव्हां १८५२ च्या जानेवारीच्या २६ तारखेस सत्तर प्रांतांतील राण्यानीं दिपाजी राण्याच्या नेतृत्वाखालीं बडाचा झेंडा उभारला सुरुवातीसच त्यानीं सत्तर प्रांतातील नाणसाचा किल्ला घेऊन त्यांतील शस्त्रें हस्तगत केलीं व जिकडे तिकडे लूटफाट चालविली. सरकारनें त्यांवर सैन्य पाठविलें. त्यांपैकीं सामान्य तुकडी दिसल्यास राणे तिचा पाडाव करून शस्त्रें काढून घेत. व मोठी तुकडी सापडल्यास हेमाडबार्सें व फोंडें यातील दुर्गम जगलांत कोठच्या कोठें निघून जाऊन दिसेनासे होत. बंड मोडण्यासाठीं म्हणून नव्या काबिजादींतील प्रजेचे सनदशीर हक्क तहकूब केले. परतु परिणामीं पुष्कळशा सशयी माणसाना धरून गोळी घालून मारण्याशिवाय दुसरा कोणताच फायदा निष्पन्न झाला नाहीं. बड मात्र विशेषच चेतलें. बडवाल्यांनीं सांगें व केपें प्रांतात धुमाकूळ घातला. बंड मोडण्याच्या कामीं खर्चाकरितां ६ लक्ष असर्फ्यांचें कर्ज काढण्यात आलें. परंतु कर्जाचे रोखे घेणारे मिळेनात. तेव्हां ते रोखे लष्करी लोकाकडून जबरदस्तीनें वसूल करण्यात आले. सप्टेंबर महिन्यांत गव्हर्नरसाहेब जातीनें सुमारें चारशें शिपाई घेऊन सत्तर प्रांतात गेले. त्यांना बंडवाले दिसेनात. पुढें सरकारनें इ स १८५४ त पेगाद नांवाच्या लुझो इंडियनास दिपाजी राण्याकडे तहाचें बोलणें करायला पाठविलें. पेगाद याची दिपाजी राण्याकडे मुळची मैत्री होती. तिला स्मरून दिपाजीनें त्याची भेट घेतली तेव्हा पेगाद यानें त्याला गव्हर्नरच्या भेटीस बोलाविलें. त्याप्रमाणें ठरताच पेगाद याचे तीन मुलगे ओलीस ठेवून दिपाजी राणे “ काब ” येथें गव्हर्नरच्या भेटीस गेले परंतु इतर बडखोराना बरोबर घेऊन न येतां एकटाच आल्याच्या सबबीवर गव्हर्नरनें त्यांची भेट न घेतां त्याना परत लाविलें.

राण्यानें गाजें येथें सुखरूप पोंचतांच ओलीस ठेवलेल्या इसमांना सत्कारपूर्वक सोडून दिलें व पुन: लुटफाट दुप्पट जोरानें चालविली पुढें गव्हर्नरसाहेबच कटाळले व त्यांनीं “ कोंसेल्यु गोव्हेर्नातीव्ह ” च्या हातीं राज्यसूत्रें सपवून इ. स. १८५५ त स्वदेशीं प्रयाण केलें. लागलीच कोन्सिलनें राण्याच्या इनामाविषयींच्या वगैरे अटी मान्य केल्या व त्यांनां माफी देऊन बंड शमविलें

**वळवईचें लष्करी बंड:**—गोमतकांत त्या काळीं सुमारें चार पाच हजार शिपाई होते. इ. स १८७० सालीं ह्या लष्करांतील शिपायाचा पगार कमी केला गेला; बरेंचसें लष्कर काढूनही टाकण्याचें ठरलें व उलटपक्षीं केवळ ऑफिसरांचा पगार मात्र वाढविण्यांत आला. सामान्यत लष्करी हुद्दे लूझो इडियन लोकांच्याच हातीं होते. ऑफिसरच्या हुद्यावर ज्या इसमाची बढती व्हावयाची होती, त्यांची निराशा होण्यास लष्करच्या छाटाछाटीचा हुकूम कारणीभूत झाला. तेव्हां त्यांनीं शिपायाना चिथावणी देऊन उठावणी केली. व शिपायानींहि आपापलीं शस्त्रें काडतुसें व निशाणें घेऊन शातपणें वळवई येथें तळ दिला. गव्हर्नरच्या हुद्यावर त्या वेळीं दुसऱ्यानदां गोव्यात आलेले पेस्तान नावाचे सत्तर वर्षांचे वृद्ध गृहस्थ होते त्यांनीं समय ओळखून बडवाल्याच्या पगाराविषयीं तोड काढली व कमी करण्यांत येणाऱ्या शिपायाना आफ्रिकेंत नोकरीस पाठविण्यांत येणार नाहीं इत्यादि अभिवचनें देऊन बंड शमविलें. हें त्यांचें धोरण पोर्तुगाल सरकारला नापसंत पडल्यामुळें बिचाऱ्या वृद्धाला मात्र पदच्युत व्हावें लागलें.

**माशेलांतील बंड व लष्कराची छाटाछाट:**—वळवईचें बंड थांबलें खरें परंतु त्याचीं मुख्य दोन कारणें, ऑफीसराची बढती व लष्करी शिपायाची संख्या कमी करणें तीं कायमच होतीं. पेस्तानच्या मागून आलेले नवे गव्हर्नर व्हिस्कोंद द सां जानुवार्यु यांनीं पब्लिकवर्क्स खात्यात कांहीं जागा निर्माण करून त्यांवर ह्या प्रमोशनवाल्या उमेदवारापैकीं बऱ्याच जणाची सोय लावण्याचा उपक्रम केला. परंतु त्या वर्गांतील असंतोष मुळींच कमी झाला नाहीं. बंडाचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागतांच गव्हर्नरनें उपरोक्त असंतुष्ट उमेदवार व इतर प्रमुख व्यक्ती मिळून आठ इसमांना कैद करून आग्वाद किल्ल्यावर ठेविलें. ता. २२ सप्टेंबर १८७१ रोजीं डिचोलीचें तिसरें बटालियन आपल्या कमाडरला अटकेंत ठेवून बडाचें निशाण उभारून माशेलांत छावणीस राहिलें. गव्हर्नरनें म्हापशेंच्या ४ थ्या बटालियनास पणजी शहर रक्षणाची कामगिरी सांगितली. त्याप्रमाणें त्यानें म्हापशें सोडून पणजीमार्गें कूच केलें. परवरी गावांत पोंचतांच शिपाई व सार्जेंट यानीं कमांडरचा हुकूम मानण्याचें नाकारलें. तेव्हां कमांडरनें त्यांना म्हापशें येथें परत नेऊन रजा दिली. ता. २३ रोजीं तोफखान्याची तुकडी व म्युनिसीपल गार्डच्या हातीं शहररक्षणाचें काम दिलें गेलें. ता. २४ रोजीं फोंडेंचें बटालियन बंडांत सामील झालें. त्यांपैकीं काहीं शिपायी मडगांव येथें जाऊन तेथील पहिल्या बटालियनास बरोबर घेऊन, जुन्या गोव्यांत

तिसऱ्या बटालियननें तळ दिला होता, तेथें त्यानां मिळाले. ही हकीकत पणजी येथें समजताच गव्हर्नरनें शाळा बंद केल्या; लष्करी कॉलेजांतील विद्यार्थ्यांना शस्त्रें दिलीं; आणि मेटेकोट उभारून शहराच्या बचावाची जय्यत तयारी केली. तेव्हां साऱ्या बंडखोर पलटणी मागें सरून पुन: माशेलांत गेल्या, आणि त्यांनीं खालील सात मागण्यांचा खलिता, त्यांचें म्हणणें समजून घ्यावयास गव्हर्नरनें पाठविलेल्या इसमाकडे दिला. १ कैद्याची मुक्तता २ वळवई येथें कबूल केलेला पगार सर्वांना मिळणें. ३ सैन्याचा पगार फोर्त रेसांत मिळणें ( वाढविणें ). ४ विधवांना पेन्शन. ५ दरसाल तीन उमेदवारांची ऑफीसरांत भरती होणें. ६ पोर्तुगालच्या ऑफीसरांच्या आगमनानें येथील ऑफीसराचे हक्क न बुडविणें ७ बंडाची माफी. प्रजा ह्या बंडाच्या विरुद्धच होती. जरूर पडल्यास स्वसंरक्षणार्थ व राज्यरक्षणार्थ आपण शस्त्रें घेऊं असें आश्वासन त्यांनीं गव्हर्नरला दिलें. ही तयारी पाहताच बंडखोरांची गुर्मी बरीच जिरली. शिवाय हें बंड शिपाईलोकांच्या नुकसानीसच कारणीभूत होणार, आणि फायदा झालाच तर तो ऑफीसराचा मात्र होणार, इतकेंच नव्हे, तर तें उपस्थित करण्याचा मुख्य हेतु ऑफीसरांचीच वर्णी लावण्याचा आहे, अशी खरी माहिती सरकारनें शिपायांच्या कुटुंबांत पसरविली. ता. २९ सप्टेंबर रोजीं जनरल पीन्यु हे गव्हर्नरचा जाहीरनामा घेऊन माशेलांत गेले. या जाहीरनाम्यांत बंडवाल्यांना माफी देण्यात आली होती. बंडवाल्या पलटणी ता. १ आक्टोबरपर्यंत आपापल्या छावणींत गेल्या व बंड मोडलें. पोर्तुगाल सरकारनें गव्हर्नरनें दिलेल्या माफीला संमति देण्याचें नाकारलें. व गव्हर्नरला परत बोलावून त्याच्या जागीं जनरल मासेद याची नेमणूक केली. नवे गव्हर्नरसाहेब सोबत पोर्तुगीज सोल्जरची एक पलटण घेऊन राजबंधु दों आगुस्त यांच्यासह स्पेशल आगबोटींतून आले व त्यानीं साऱ्या गोमातकीय सैन्यास रजा दिली फक्त १ पोलीस कोर, १ अबकारी कोर, तोफखान्याची एक ब्याटरी व नुकतीच आणलेली युरोपियन पलटण, एवढेंच लष्कर कायम केलें. अर्थातच लष्करी कॉलेजचीहि आतां जरूरी राहिली नाहीं; तेव्हा तेंहि बंद करण्यात आलें, आणि त्या ऐवजीं धंदेशिक्षणाची शाळा उघडली गेली.

**कुष्टोबाचा पुंडावा:**—इ स. १८६९ त म्हणजे वरील धामधुमी चालू असतानांच भतग्रामच्या ( सांखळी प्रांतांतील कुष्टोबा नांवाच्या दरोडेखोरानें कालें येथील शाबा सावताच्या मदतीनें गोमंतकभर पुंडावा सुरू केला. तो सारखा तीन वर्षें चालला होता. शेवटीं १८७१ सालीं कुष्टोबाला फितुरीनें ठार

करतांच हा पुंडावा बंद पडला. कुष्टोबा गरिबास पीडित नसे उलट त्याचें त्यांना सहाय्यच मिळत होतें त्यामुळें गरीब लोकांत त्याच्याविषयीं बरीच सहानुभूति होती; परंतु साधारण धनिक वर्गाला त्यानें बरेच त्रास दिले होते

**दादा राण्याचें बंड:**—इ. स. १८९४ सालीं मोझांबिक येथें काफीलोकांनीं बंड केल्यावरून पोर्तुगाल सरकार त्यांशीं लढाई चालवीत होतें. तेथें कुमकेसाठीं गोव्यांतील शिपायांनां पाठविण्याचा हुकूम १८९५ सालीं आला. आधींच परदेश-गमन म्हणजे हिंदु लोकांना मृत्युसमान वाटे, त्यांतहि जाणाऱ्या शिपायांना दुसऱ्या वसाहतींत जाण्याबद्दल कोणत्या सवलती मिळावयाच्या तें हुकुमांत उल्लेखिलें नव्हतें. म्हणून त्याच सालच्या सप्टेंबर महिन्यांत शिपाई लोक छावणींतून निघाले व त्यांनीं शस्त्रें वगैरे घेऊन शांतपणें सत्तर प्रांतांतल्या नाणसाच्या किल्ल्यांत तळ दिला. आपल्याला मोझांबिक येथें पाठवू नये एवढीच काय ती त्यांची मागणी होती. परंतु ती पुरविणें गव्हर्नराच्या अधिकारांतलें नव्हतें. म्हणून गव्हर्नर साहेबानीं पोर्तुगालास तारेनें कळविलें. तारेचें उत्तर नकारार्थी आलें व व तें शिपायांना नाणस येथें कळतांच त्यांनीं राणे लोकांना बंडास प्रवृत्त केलें. या बंडाचें नेतृत्व **दादा राणे** अडवईकर यानीं स्वीकारलें.

गोव्यांतील ख्रिस्ती वृत्तपत्रांतून त्या वेळीं कांहीं युरोपियनाविरुद्ध वैयक्तिक स्वरूपाचे कडक लेख येत होते त्या वादामुळें यांत भरच पडली, व बंडास गोमातकीय विरुद्ध पोर्तुगीज असें स्वरूप सरकारात मिळालें. सदनशीर हक्क ताबडतोब तहकूब केले गेले व गोमंतकभर मार्शल लॉ पुकारला गेला. संपन्न अशीं जीं कुटुंबें गोव्यांत होतीं तीं भराभर ब्रिटिश हद्दींत कारवार, खानापूर, बेळगाव, वेंगुर्लें, सावंतवाडी इत्यादि ठिकाणीं पळालीं. धूर्त ब्रिटिश सरकारनें त्यांची बरदास्तहि सुरेख ठेविली. याच शतकाच्या पूर्वार्धांत ब्रिटिशांनीं गोवें घेण्याचे जे प्रयत्न केले व ज्यांची हकीकत स्वतंत्रपणें याच प्रकरणाच्या अंतीं देण्यात येणार आहे, त्यांशीं या बरदास्तीचा संबंध गोवेंकरानीं सहजच लावला.

सरकार गोंधळून गेलें व गव्हर्नर साहेबांनीं ब्रिटिशांची मदत मागण्याचा बेत देखील केला परंतु त्यांचा हा ठराव कौन्सिलांत ५ मतें ठरावाच्या बाजूस तर पांच मतें विरुद्ध पडून गव्हर्नरच्याच कास्टिंग व्होटवर अवलंबून राहिला होता. इतक्यात बंडखोर शिपाई आग्वादचा किल्ला हस्तगत करून पणजीवर चाल करून येण्याच्या बेतांत आहेत अशी बातमी गव्हर्नरच्या आजुदांत द काप ( ऑर्डर्ली ) नें आणली व त्यामुळें कौन्सीलच घाईघाईनें बरखास्त करण्यांत आलें.

नुकतेच परलोकवासी झालेले जनरल गोमिश दे कोश्त हे त्या वेळीं क्याप्टनच्या हुद्यावर होते. त्यांच्या हाताखालीं सैन्याची तुकडी देऊन सत्तर प्रातांत त्याची रवानगी करण्यांत आली. वाटेंत मोर्ले गडावर राण्याचे तिघेच इसम एका झाडाखालीं लपून राहिले होते. त्यांनीं या साऱ्या सैन्याला थोपवून धरिलें; दुपारपर्यंत सरकारी सैन्यानें गोळ्याचा पाऊस पाडला. परंतु त्यानीं झाडें मात्र जखमी झालीं. शेवटीं काडतुसें संपल्यामुळें दोन तोफा मागें टाकून मोर्ले येथूनच सरकारी सैन्य मागें परतलें व त्यांनीं साखळी येथें तळ दिला.

पुढें राजबंधु दों आफोंस व गव्हर्नर जनरल राफायॅल दे आन्द्राद याच्याबरोबर पोर्तुगीज सोल्जराची तुकडी आली. तेव्हां सारा सत्तर प्रांत जाळून पोळून उध्वस्त करण्यांत आला. गोमतकातील बऱ्याच ख्रिस्त्याना बंडात सामील असल्याच्या सशयावरून हद्दपारी भोगावी लागली. त्यांतच बेर्नार्द फ्रांसीस्क द कोश्त हे गोमतकाचे सुपुत्र वृद्धावस्थेंत दीव येथेंच मरण पावले.

क्याप्टन गोमिश दे कोश्त यांनीं मार्शल लॉच्या आधारानें साऱ्या गोमांतकभर, विशेषतः नव्या काबिजादींत, दडेली सुरू केली. तेव्हां हेमाडबार्से येथील सूर्ले गावचे देसाई बाबय सावत हे हेमाडबार्सेच्या रयतांना घेऊन दादा राण्यांना मिळाले. लुटालुटीला मग ऊतच आला. १८९६ च्या मार्च महिन्यातच गव्हर्नर राफायॅल द आंद्राद यानीं अधिकारसूत्रें, राजबधु ड्यूक द पोर्तु यांकडे देऊन प्रयाण केलें. पोर्तुगालहून ड्यूकनां व्हायसरॉयचे अधिकार तारेनें देण्यात आले. त्यानां मुद्दाम प्रयत्नपूर्वकच प्रजेपासून अलग राखण्यांत आले होते. तथापि त्याच्या लक्षांत सारी परिस्थिति आली ताबडतोब त्यानीं मेच्या २७ रोजीं बडखोर शिपाई परत शरण येतील तर त्यांना माफी देण्याचा जाहिरनामा काढला, व लागलीच स्वदेशीं गेले. तेव्हापासून शिपायांचें बड शमत चाललें

ड्यूक द पोर्त परत स्वदेशीं जातांच गोव्याचा कारभार रॉयल कमीशनरच्या हुद्यान्वयें नेव्हिश फेरैर यानीं हातीं घेतला. हे गृहस्थ लुझो इंडियन समाजाच्या आहारीं पूर्णपणें पडले होते. अधिकारसूत्रें ग्रहण करतांक्षणींच त्यांनीं सशस्त्र दिसणाऱ्या व लोकाच्या जीवितवित्तावर हल्ला करणाऱ्या माणसानां पकडून ठार करण्याचा हुकूम सोडला, व तो अमलांत न आणणाऱ्या मुलकी किंवा लष्करी अमलदाराला बडतर्फीची शिक्षाहि त्याच हुकुमात ठरविली. ह्या हुकुमान्वयें पुष्कळ अपराधी निरपराधी इसमांना फोंडें येथे गोळी घालून ठार करण्यांत आलें. एकदां

तर गोळी निसटती लागल्यामुळें तडफडणाऱ्या माणसाला फावड्याचे तडाखे देऊन मग ठार केल्याची बातमीहि युरोपियन वर्तमानपत्र Diario de Noticias मध्यें प्रसिद्ध झाली ! इतका क्रूरपणा त्या वेळीं सरकारनें धरला. याच धादलींत जुवेंकर रावजी राणे यांनां सरकारनें कामुर्लींहून पकडून आणलें व म्हापशास आणतांनां शिपायानीं त्यानां गोळी घालून ठार केलें. ही गोष्ट नादोडेंच्या प्रागांस (पागे) नावाच्या ख्रिस्ती कुटुंबाच्या सांगीवरूनच करण्यात आली, असा त्यावेळीं प्रवाद होता. राणे मंडळींनीं ह्या कृत्याचा सूड पाग्याच्या घरादाराची राखरांगोळी करून व त्यांच्या पुरुषवर्गाचा क्रूरपणानें नायनाट करून घेतला.

ह्या बंडात राणे मंडळीनें हळदुणेची व कोलवाळची इगर्जे व म्हापशेची रेसेबदोरी (खजिन्यातील तिजोरी) लुटली होती. शिवाय सांग्यावरच्या तिजोरी रेसेबेदोरीवर व इतर कैक ठिकाणीं हल्ला केला होता परंतु केवळ थोड्याशा शिपायानिशी रेसेबेदोरीचा बचाव तेथील आदमिनिस्त्रादोर जुवाव द ब्रीत यानें केला. प्रस्तुत लेखकाच्या घरावर तर बंडवाल्यांनीं दोनदा हल्ला केला होता पहिल्या खेपेला भर दिवसा संध्याकाळीं ४ वाजता दरवाजा फोडण्याच्या प्रयत्नांत आंतील गोळीबारामुळें यश न आल्यामुळें घराला पश्चिम बाजूनें आगदेखील घातली होती. पण मागाहून कुडचड्यावर ठेवलेल्या ठाण्यांतील सरकारी तुकडीची मदत येताच बंडवाले बाहेर सांपडलेल्या त्याच्या चुलत्याला पकडून बरोबर घेऊन पळून गेले. या बंडात बारदेशचे व्हिस्कोंद कारवाल्यु, त्याचे मित्र व अनुयायी सामील असल्याबद्दल सरकारास संशय आल्यावरून त्यांस कांहीं काल ब्रिटीश मुलुखांत अज्ञातवास पत्करावा लागला होता. याच धामधुमीचा फायदा घेऊन घाटमाथ्यावरील इंग्रजी हद्दींतील पठाणानीं श्री मंगेश व श्री शांतादुर्गा या प्रसिद्ध देवालयावर हल्ला करून देवतांच्या मूर्ति व बहुमोल जवाहिर घेऊन इंग्रजी हद्दींत पलायन केलें.

शिपायाचा हात बंडातून निघतांच त्याचें मूळचें स्वरूप जाऊन त्याला शुद्ध लुटालुटीचेंच स्वरूप प्राप्त झालें. १८९८ त गव्हर्नरच्या जागीं लोकप्रिय माशाद हे येताच त्यांनीं जगद्गुरू मठ संकेश्वर यांना इतमामानें आमन्त्रण करून थोडीबहुत त्यांच्या मध्यस्तीनें बंडवाल्याना माफी दिली व बंड शमविलें ड्युक द पोर्तु इकडून परत जाईपर्यंतच ह्या बंडाप्रीत्यर्थ पोर्तुगाल सरकारनें सुमारें १० लाख रुपये खर्च केले. शिवाय बंडाचा नायनाट होईतोंवर स्थानिक सरकारासही बराच खर्च आला

बड संपल्यानतर सुमारें तीन वर्षांनीं सत्तर प्रांतात क्याप्टन बारेत नांवाच्या लष्करी अमलदारानें एक गाय गोळी घालून मारली या निमित्तानें दोघां मराठ्या शिपायांनीं परेड चालली असतां त्यावर गोळया घालून त्याचा खून केला होता. त्या खुनाच्या कटांत सामील असल्याचा आरोप ठेवून गव्हर्नर गालयार्दे यानें दादा राण्यांसह बडवाल्यांच्या सर्व प्रमुख इसमास कोर्टमार्शल भरवून आफ्रिका व तिमोर येथें हद्दपार केलें.

**इ. स. १९१२ तील लुटालूटः**—यापुढें १९१२ सालींहि बाळ्ळी महालांतील झील सांवत नावाच्या इसमानें केवळ वैयक्तिक अन्यायामुळें चिडून लुटफाट आरंभिली. त्याला सत्तर प्रातातून हिरबा राणे गुळ्ळेकर यानें कुमेरी ( नाचण्याची भरड कृषि ) च्या आणेवारीच्या अन्यायाच्या सबबीखालीं मदत केली व त्यांन्या गोमतकभर धुमाकूळ घातला. परंतु पहिलेच रिपब्लिकन गव्हर्नर कौसैर द कोश्त यानीं आफ्रिकेंतून लाडी लोकांचें सैन्य आणवून बड मोडून पुष्कळ इसमांना हद्दपार केलें. या पुढील इतिहास म्हणजे चालू घडामोडी. परंतु तो ह्या ग्रथाचा विषय बनू शकत नाहीं. तेव्हा गेल्या शतकात ब्रिटिशांनीं गोवें घेण्याचा जो प्रयत्न केला होता त्याचीच हकीकत सांगावयाची राहिली.

**इंग्रजांनीं गोवें घेण्याचे केलेले प्रयत्नः**—गोवें घेण्याचे प्रयत्न इंग्रजांनीं तीनदां केल्याचें इतिहास सांगतो. पहिला प्रयत्न जनरल मार्किस वेलस्ली यांच्या अमदानींत झाला युरोपांत त्या वेळीं फ्रेंचांशीं लढाई चालली होती. १७८५ पासून १७९३ पर्यंत फ्रेंचांच्या विरुद्ध तुम्हाला मदत देतों असें बोलणें इंग्रजांनीं पोर्तुगेज गव्हर्नराकडे लावलेलें होतें. परंतु त्यानीं तें फेटाळूनच लाविलें होतें. पुढें १७९८ त व्हेग काब्राल नावाच्या गव्हर्नरच्या कारकीर्दींत इंग्रजी आडमीरल रैनर ( Reiner ) यानें चार लढाऊ जहाजांसह गोव्यांच्या खाडींत प्रवेश केला. व ' जरूर पडल्यास गोवा सरकारला मदत करण्याचा हुकूम आपल्याला झाला आहे, ' असा निरोप त्यानें गव्हर्नरला पाठविला. परंतु गव्हर्नरनें त्याची मदत आभारपूर्वक नाकारून त्याला परत लाविलें. त्यानतर लागलीच Josue utlholf नावाचा इंग्रजी वकील गव्हर्नरशीं कांहीं करार करण्याच्या मिषानें गोव्यांत आला व तेथेंच चिकटून राहिला. आणि इ स. १७९९ त कर्नल सर विल्यम क्लार्क याच्या हाताखालीं ८४ वी युरोपियन पलटण, ७७ व्या पलटणीचा कांहीं भाग, तोफखाना व देशी शिपायाचीं दोन बटालियनें गोव्यांत आलीं व त्यांनीं आग्वा-

दचा किल्ला व काबचा राजवाडा हीं ठाणीं हस्तगत करून तेथें तळ दिला. त्याना सामोपचारानेंच परत लावण्याविषयीं पोर्तुगाल सरकारचा गव्हर्नरला हुकूम आला. त्यास अनुसरून गव्हर्नरनें वेलस्लीला खलिता लिहून सैन्य परत घेण्यास कळविलें. वेलस्लीनें जरा माघार घेऊन ८४ वी पलटण खेरीज करून बाकी सैन्य परत बोलाविलें. पण पुढें थोड्याच अवधींत, संपूर्ण ७७ वी पलटण, देशी शिपायाच्या दोन पलटणी व तोफखान्याचे शभर शिपाई परत गोव्यांत आले. गोव्यावर शत्रूचा हल्ला होण्याचा मुळींच सभव नाहीं असे व्हैग काब्राल यानें वेलस्लीला कळविलें. परंतु वेलस्लीनें उलट उत्तर केलें कीं, " तूर्तच्यासारखें गोवें शत्रूच्या हल्ल्याच्या संकटांत केव्हांच नव्हतें " आणि सैन्य कायमच ठेवलें उलट विल्यम क्लार्कनें पोर्तुगीज लष्करावरचे अधिकारहि आपल्यालाच देऊन गव्हर्नरची सत्ताही स्वतःच्या हातीं मानितली व्हैग काब्राल हा गृहस्थ थोडासा उथळ बुद्धीचा व बढाईखोर होता. त्याला पूर्वी इंग्रजी आफिसर आपल्याला सलाम करतात, ह्याचाच आनद वाटे. परंतु विल्यम क्लार्कचें ठुमणें लागतांच त्याच्या डोळ्यांवरची धुंदी पार निघाली. लागलीच आग्वाद व काब येथें जाऊन त्यानें इंग्रजी निशाणें लावलेल्या डोलकाठ्या कुऱ्हाडीनें तोडविल्या. तेव्हां इंग्रजांनीं त्याला ७० हजार रुपयांच्या तहाहयात पेन्शनची लालूचहि दाखविली, परंतु व्हैग काब्रालनें चव-ताळून तीही फेटाळली. इतक्यांत बसोरा नांवाच्या जहाजांतून (Amiens) आमियेंच्या तहाची सुवार्ता गोव्यांत आली. अर्थात् त्यापुढें येथे सैन्य ठेवण्यास कोणतीच सयुक्तिक सबब न राहिल्यामुळें, वेलस्लीनें तें १८१३ त १४ वर्षांनी परत बोलाविलें. परंतु आग्वादचा किल्ला व काबचा राजवाडा मात्र १८१५ चा तह होईपर्यंत इंग्रजांकडेच राहिला.

दुसरा प्रयत्न १८३९ त झाला व तो युरोपांतच झाला. पोर्तुगालातील ब्रिटिश परराष्ट्रीय वकील लॉर्ड हॉवर्ड यानीं ता. १२ मार्च रोजीं गोव्यांतील कांहीं अधि-काऱ्यांविरुद्ध अशी तक्रार केली कीं, ब्रिटिशाविरुद्ध बंड केलेल्या कांहीं फरारी अपराध्यास त्यानीं मदत दिल्याची कागाळी मुंबईसरकारनें केली आहे. शिवाय पोर्तुगीज सरकारकडे ब्रिटिश सरकारचें बरेंच येणेंहि निघत आहे. तेव्हां याच्या भरपाईस पोर्तुगीजाचा हिंदुस्थानांतील मुलूख ईस्ट इंडिया कंपनीला देण्याच्या अटीवर पोर्तुगीज सरकारशीं बोलणें करण्याचा हुकूम ब्रिटिश सरकारनें आप-ल्याला केला आहे. पोर्तुगालतर्फे मुख्य प्रधान व्हिस्कोंद दसा द बांदैर यानीं उत्तरांत असें सांगितलें कीं, " गोव्याच्या गव्हर्नर जनरलकडून आलेल्या माहि-

तीवरून असें दिसून येतें कीं, गोव्याच्या अधिकाऱ्यांनीं फरारी ब्रिटिश अपराध्याकडे ठेविलेल्या व्यवहारामुळें, उभय सरकारात झालेल्या करारास मुळींच बाधा येत नाहीं तेव्हा आपल्या मुंबईच्या अधिकाऱ्याची माहितीच चुकीची आहे असें म्हणावें लागतें. हिंदुस्थानांतील आमचा मुलुख ईस्ट इंडिया कंपनीला देण्याच्या प्रश्नासंबधानें राणीसरकार ( पोर्तुगालांत यावेळीं मेरी दुसरी इची कारकीर्द चालू होती ) हिनें आपल्याला असा निरोप कळवायला सांगितलें आहे कीं, तो प्रांत म्हणजे आमच्या पूर्वजांच्या पराक्रमांचीं ऐतिहासिक स्मारकेंच आहेत असें आम्ही समजतों. अर्थातच तो देण्याविषयींचें कोणत्याहि प्रकारचें बोलणें चालवायला आम्ही मुळींच तयार नाहीं. उलट उभय राष्ट्रात शेंकडों वर्षांचा परस्पर स्नेहाचा संबध असतांना, अशा प्रकारचें बोलणें ब्रिटिश सरकारनें लावावें, याचेंच आम्हाला सखेदाश्चर्य वाटतें "


परंतु हें प्रकरण एवढ्यानेंच संपलें नाहीं. व्हिकोंद द सा द बांदेर यांच्या मागून बारांव द रीवैर बार्बोझ याच्या हातीं मुख्य प्रधानगिरीचीं व परराष्ट्रीय खात्यांचीं सूत्रें येताच लॉर्ड हावर्डनें त्यांच्याशींहि पुनरेव तेंच बोलणें चालू केलें. आणि गोवा, दमण व दीव या प्रांतांची किंमत ५ लक्ष पौंडांत आकारून ती पोर्तुगालाला देऊ केली. परंतु असल्या गोष्टीस हाडाचा पोर्तुगीज आमरणात कबूल व्हावयाचा नाहीं असें सडेतोड उत्तर देऊन बारांव द रिवैर बार्बोझ यानीं हें प्रकरण संपविलें.

तिसरा प्रयत्न, वाडी प्रांतांत फोंड सांवत यानीं ब्रिटिशाविरुद्ध इ स १८४२ त स्वातंत्र्य युद्ध पुकारलें, त्या वेळीं करण्यात आला. त्यानीं इंग्रजांशीं चालविलेल्या लढाईत आउटरम साहेबांनीं सावताचा पुरताच मोड करून, त्यांना कोठेंच आसरा मिळेनासे केलें सावत मंडळीच्या शिरांना हजारों रुपयांचीं बक्षिसेंहि लावलीं गेलीं. त्यावेळीं सावत मंडळीनें गोवा सरकारकडे शस्त्रें ठेवून आश्रय मागितला. गोव्यात फेरैर पेस्तानची कारकीर्द चालू होती त्यांनीं सावताच्या लोकांना अभय वचन देऊन त्याची उत्तम बरदास्त ठेवली. एकंदर १६१ इसम त्या वेळीं शरण आलेले होते व त्यांत सुमारें वीस इसम खानदानीचे होते. ही संधी साधून मुंबई सरकारनें क्याप्टन ऑर्थर नांवाच्या अधिकाऱ्याच्या हाताखालीं एक लढाऊ जहाज देऊन पणजी येथें पाठविलें त्यानें पणजीच्या राजवाड्यावर तोफा रोखून सावंत मंडळीला आपल्या ताब्यात देण्याची मागणी गव्हर्नरकडे केली. गव्हर्नर पेस्तान यांनीं ऑर्थर साहेबाचा उत्तम प्रकारें आदरसत्कार केला व " पोर्तुगालच्या निशाणाच्या



दूधसागरचा धबधबा.

Lakshmi Art Bombay



मुरगाव बदर.

Lakshmi Art, Bombay, 8

आश्रयास आलेल्या लढाऊ लोकांनां आपल्या स्वाधीन करणें हें आंतर्राष्ट्रीय कायद्यास अनुसरून नसल्यावरून तसें केल्यास पोर्तुगालच्या इभ्रतीस धोका येईल तेव्हां हें कृत्य आपण करायला मुळींच कबूल नाहीं. आतां त्यांना न्यायचेंच असल्यास आपल्या तोफांच्या सहाय्यानें आपण तें कृत्य सहज करूं शकाल. परंतु त्याच्या केंसास धक्का लागण्यापूर्वी, गोव्यातील पोर्तुगीज म्हणविणाऱ्या साऱ्या इसमांसही कैद करणें आपल्याला भाग पडेल व तसें झाल्यास पहिला कैदी होण्याचा मान मीच घेईन " असा रोखठोक जबाब दिला. ऑर्थर साहेब आले तसेच परत गेले कारण पोर्तुगीज लोकांवर हल्ला करण्याइतकी शक्ति असली तरी हिंदुस्थानांतील तत्कालीन परिस्थितीमुळें किंवा युरोपियन राजकारणामुळें असो, त्यानां तेवढा हिय्या मात्र झाला नाहीं पुढें वाडीहून पोलिटिकल एजंट जेकब साहेब जातीनें गोव्यात आले व त्यानींहि सावत मंडळी ताब्यात घेण्याबद्दलची पुष्कळ खटपट केली परंतु ती सारी व्यर्थच गेली. शेवटीं १८४७ त पोर्तुगीज सरकारच्याच मध्यस्तीनें सावत मंडळीपैकीं खाशानां माफी मिळाली तरीपण देवाण घेवाणाच्या तत्वावर काहीं इसमांनां काळेंपाणी पहावेंच लागलें. अशा रीतीनें हाहि प्रयत्न व्यर्थ झाला.

ज्ञान कोश विभाग १२ यांत गोव्यांची माहिती पृष्ठ (ग) २३९ ते २४४ वर दिलेली आहे परंतु त्यांत बराच विपर्यास आहे. प्रस्तुत माहिती पोर्तुगीज दप्तरांतील कागदपत्रांवरून व इतिहासातून घेतली आहे. इंग्रजाची मदत पोर्तुगीजांनीं मागितली नसून इंग्रजानीं ती त्यावर लादलेली होती हें त्या कागदपत्रांतून दिसून येतें. सुप्रसिद्ध पोर्तुगीज इतिहासकार पिन्यैरु शागस् यांनींहि आपल्या इतिहासांत अशीच माहिती दिलेली आहे

---

## प्रकरण दुसरें.

# राजकीय परिस्थिति.

**एकतंत्री अमलांतील व्यवस्थाः**—विवेचनाच्या सोयीसाठीं एकतंत्री अमलांतील परिस्थिति, सनदशीर राज्यपद्धतींतील परिस्थिति व रिपब्लिकच्या नंतरची परिस्थिति असे विभाग पाडून त्याप्रमाणें सारी माहिती देण्याचा क्रम

ठेवला गेला आहे, हें प्रारंभींच सांगणें भाग आहे. इ स. १८३५ पर्यंत गोव्याचा राज्यकारभार पोर्तुगीज सरकारकडून, व्हायसरॉय व त्यांचे सेक्रेटरी यांचे मार्फत एकतन्त्री व एकमुखीच चालत असे. जमाबदी खातें व न्यायखातें हींच कायतीं दोन खातीं कांहींशीं स्वतंत्र होतीं. राज्यकारभाराच्या सोयीसाठीं सोळाव्या शतकात सबंध गोवाप्रात पोर्तुगीज सरकारच्या ताब्यांत अजून आला नव्हता. केवळ सासष्ट बारदेश व तिसवाडी ऊर्फ गोवाबेटासह इतर बेटें, असे तीनच प्रात होते. गोमांतकांतील त्यावेळचा राज्यकारभार हा धर्मप्रसाराच्याच दृष्टीनें विशेषतः चालविला जात असल्यानें, त्या काळीं साहजिकच राज्यकारभारात बिशप, धर्मसमीक्षण सभा ऊर्फ इंकिझीशन व जेजुईटादि धार्मिक संस्थाचें प्राबल्य चालत होतें. पोर्तुगीजाना राज्यकारभार सुलभपणें चालविण्यास कोमुनदादी ऊर्फ ग्रामसंस्थाची गोमांतकांतील भरभराटींत आलेली संस्थाच पक्कळशी कारणीभत झाली असल्यामुळें ह्या कोमुनदादीची काहींशी माहिती करून देणें अवश्य आहे.

**कोमुनदादी ऊर्फ ग्रामसंस्था**—इकडे येतानाच पोर्तुगीजांनां सर्वांत नवाईची जी गोष्ट दिसली ती म्हणजे ह्या कोमुनदादी होत. ग्रामसंस्थाचें वर्णन सर हेन्री मेन यांनीं आपल्या "व्हिलेज कम्युनिटीज" या ग्रंथात सागोपाग नसलें तरी बरेंच पूर्णपणें केलें आहे. प्रसिद्ध गोमतकीय ख्रिस्ती लेखक फिलीफ नेरी शाव्हियॅर यांनीं गोमांतकांतील ग्रामसंस्थाचें वर्णन आपल्या बोस्केजु इस्तोरिकु दश् कोमुनिदादीज द गोआ ( Bosquejo Historico Dos Comunidades de Goa) ह्या ग्रंथांत सविस्तर व मार्मिकपणें केलें आहे. युरोपांत अशा प्रकारच्या संस्था होत्या खऱ्या; परंतु धामधुमींत जन्म पावलेल्या व सामान्यत. आजन्म लुटालूट व चाचेगिरींतच वावरणाऱ्या नवजात पोर्तुगीज राष्ट्रामध्यें त्याची माहिती देखील नसल्यास त्यांत नवल नाहीं. गोवेंशहर व त्याच्या सभोंवतालचा प्रांत हस्तगत करतांच आल्बुकेर्कनें ह्या संस्थाकडून आदिलशहाला मिळत असलेल्या करापैकीं एक तृतीयाश त्यांना माफ केला व पोर्तुगीज सरकारतर्फे ग्रामसंस्थांनां आपापल्या साऱ्या चालीरीति बिनधोक चालविण्याची हमी देऊन कौल दिला. ( Bosqu. His. Vol. I, pg. 192 )

पुढें गोवा प्रांत परत लागलीच आदिलशाही अमलामध्यें जातांच हा कौल निरुपयोगी ठरला. नंतर १५१० नवबरांत गोवें शहर आल्बुकेर्कनें परत घेतांच ग्रामसंस्थांच्या गांवकरांकडे परत करार केला, तेव्हां गोवाबेट, चोडण ( चूडाम-

णिब्रेट, ) दिवाडी ( दीपवती ) व जुवें ह्या बेटांतील ग्रामसंस्थांकडून १८ हजार रुप्याची तांगें म्हणजे २४०० रुपये मिळत. सासष्ट प्रांतांतून २७३९३ असर्फी रसद नाणें ( १२८५२। रुपये ) व बारदेश प्रांतातून २८८७१ असर्फी ( १३६८३॥. रुपये ) सरकारदेणें मिळत होतें. पुढें पोर्तुगीजाची सत्ता दृढमूळ होताच त्यानीं कोमुनदादींवर वेळोवेळ हरतऱ्हेचे जुलुमी कर बसविले खरे, परंतु त्याच्या कारभाराची घडी फारसी विसकटून टाकली नव्हती. शेवटीं इ. स. १७७७ सालीं मार्केझ द पोंबालच्या आज्ञेवरून जे नवीन करार केले त्यास अनुसरून, तिसवाडी प्रांत १५८८३=२=३१ असर्फ्या ( सुमारें ७९४१॥। रुपये. ) सासष्ट प्रांत ८६१४९=३=१६ असर्फ्यां ( ४३०४७॥।-८ ) व बारदेश प्रांत ३१५८=२=२३ असर्फ्यां ( म्हणजे १५७९०८=॥। . ) एवढें देणें कोमुनदादींना द्यावें लागत असे. कोमुनदादींतील पूर्वकालीन कारभार साधारणपणें एखाद्या महाजन सत्ताक रिपब्लिकप्रमाणेंच चालत होता. गांवातील एकंदर जमिनीवर कोमुनदादीचीच मालकी होती, व ह्या मालकीबद्दल किंवा वहिवाटीबद्दल, येईल त्या सरकारला, त्याजकडून ठराविक देणें मिळत असे. गावांतील जमिनीच्या उत्तम व कनिष्ट अशा दोन प्रती पाडल्या होत्या. उत्तम जमिनीचा एक भाग त्यानीं कोमुनदादीच्या सेवकजनांसाठीं तोडून दिला होता. दुसरा भाग देवालयें व त्यातील, भट, गायिका, वाजत्री, भाविणी, इत्यादिकाच्या उपजीविकेसाठीं राखून तिसरा भाग संस्थेच्या फंडास राखला ही उत्तम प्रतीची जमीन म्हणजे केवळ जिराइती होती. दुसऱ्या प्रतीची जमीन देखील तीन वांट्यानीं विभागून पूर्ववत् कांहीं भाग देवालयादिकाना सोडला. दुसरा विभाग, रस्ते, कुरणें, तलाव, कालवे, विहिरी, गुराच्या वाटा, स्मशान इत्यादि सार्वजनिक उपयोगाच्या कामासाठीं राखून ठेविला होता. आणि तिसऱ्या विभागांतून कांहीं जमीन कुटुंबण या नावानें कायम धाऱ्यानें खंडास लाविल्या व कांहीं कुळागर, घरमाड, घरभाट, इत्यादि नावाखालीं आपसांतच वांटून घेऊन त्यावर कमीजास्त होणारा कर कांहीं ठराविक विभाज्य पद्धतीनें बसविला. गावचा न्यायमनसुबाही गांवकऱ्यांतच तुटत असे. खासगी मालकीच्या जमिनी अशा पूर्वी फारशा नव्हत्या हें एक कारण व दुसरें आकुंचित क्षेत्रातच न्यायाची पाळी आल्यामुळें आतांच्या प्रमाणें खोटे साक्षीदार अजून जन्म पावावयाचे होतें हें दुसरें, अशा कारणामुळें न्यायहि बराच सोपा होता. कोमुनदादीचा सारा कारभार गांवकऱ्यांच्या सभा भरून त्यांतील ठरावान्वयें चाले. या सभांतील ठराव एक मतानेंच व्हावे लागत, हा त्यात विशेष होता.

समायिक मालकीची जिराइत जमिनीची लागण, काहीं ठिकाणीं चिठ्यांनीं कांहीं ठिकाणीं पाळीनें तर काहीं ठिकाणीं हक्कदारातच लिलाव होऊन मक्त्यानें होई. आणि कोमुनदादीचा सारा खर्चेवेंच जाऊन राहिलेल्या फायद्याची किंवा येणाऱ्या तुटीची गावकऱ्यात वाटणी होई. काहीं ठिकाणीं ही वाटणी तागें, असफ्यीं नावाच्या शेअर्संच्या पायावर, कांहीं ठिकाणीं गांवकरात पुरुषवर्गांच्या सख्येनें भागून तर कांहीं ठिकाणीं तक्षिमांनीं म्हणजे वांट्यानीं विभागला जाई. गावचें दप्तर कुळकर्ण्यांकडेच असे व हे कुळकर्णी देखील वतनदार असत. दरसाल प्रत्येक गावात मक्त्यानें वसुलदार नेमण्यात येई त्याजकडून सारा वसूल होई. त्या कोमुनदादीचा महालचा कारभार देखील असाच प्रजासत्ताक पद्धतीनें चाले. प्रत्येक गांवातून महाल कमीटींत बसण्याकरतां एक एक मुखत्यार निवडला जाई व त्यांच्या सभेमार्फत महालचा कारभार चाले. सरकार देण्याची रकम प्रत्येक कोमुनदादीनें याच मडळाकडे भरावयाची असे. त्यामुळें सरकारला वसुलाच्या बाबतींत हें मडळच जबाबदार असे. महालचें दप्तरहि नाडकर्णी नावाच्या हुद्देदाराकडे असे. महालच्या खर्चासाठीं प्रत्येक कोमुनदादीवर तिच्या मगदुराप्रमाणें कर वांटला जात असे महाल कमिट्याना पोर्तुगीज अमदानीत "काम्र जॅराल दे प्रोव्हींसिय–" (Gamara geral de provincia) अशी सज्ञा मिळाली होती अशा ह्या नमुनेदार कारभारामुळें राज्यकर्त्यांची कामगिरी पुष्कळच सुलभ झाली होती. पोर्तुगीजानीं ह्या संस्था नष्ट न करतां तशाच जतन करून ठेवल्या खऱ्या, परंतु त्यांत त्यानीं जे फेरफार वेळोवेळ केले, त्यामुळें त्यांचें मूळचें राजकीय, सामाजिक व धार्मिक स्वरूप पार बदलून जाऊन, आताशा त्यांना केवळ व्यापारी स्वरूपाच्या कृषिविषयक कपन्याचा आकार प्राप्त झाला आहे. तूर्तांचा त्याचा कारभार कसा चालतो तें याच प्रकरणात पुढें सांगण्यात येईल.

**मुलकी कारभार**:—वर सांगितलेल्या कोमुनदादींच्या माहितीवरून अव्वल पोर्तुगीजशाहींत मुलकी कारभार राज्यकर्त्यांना फारसा भानगडीचा झाला नाहीं. व्हायसरॉय किंवा गव्हरनॅरच्या हाताखालीं सेक्रेटरीएट खात्यांतूनच सारा मुलकी कारभार प्रारंभीं चाले. व्हायसरॉयच्या गैरहजीरींत आर्चबीशप, सेक्रेटरी व हायकोर्टचे चीफजज्ज यांचें कौन्सिल गोव्याचा राज्यकारभार चालवीत असे. प्रारंभीं प्रारंभीं सारा राज्यकारभार उपरिनिर्दिष्ट काम्र आग्रार्यच्या हातून चालविण्यांत येई परंतु मागाहून जुन्या काबिजादींतून प्रत्येक महालावर आदमिनिस्त्रादोर नावाचा

अधिकारी नेमून त्याच्याद्वारें करण्याचा रिवाज पडला. नवीन काबिजादींचा कारभार इतेंदेंसिय जराल दश नोव्हश कोंकीशताश (Intendencia geral das Novas Conquistas) नांवाच्या ठाण्यांतून चालत असे गोमतकांतील लष्करावर कमांडर इन चीफ या नात्यानें गव्हर्नरचाच अधिकार चालत असे.

**न्याय खातें:**—अव्वल पोर्तुगीज अमलांत देखील न्याय खात्याची व्यवस्था काहींशी स्वतन्त्रच होती. इ. स. १५४४ त गोव्याचें हायकोर्ट स्थापन करण्यांत आलें व त्यांत तीन जज्ज नेमण्यात आले. त्यांचे अधिकार प्रारंभीं कांहींसे स्वतन्त्र तर कांहींसे मुलकी कारभाराशीं सलग्न अशा मिश्र स्वरूपाचे असत. तरी देखील धार्मिक जुलुमाच्या काळीं या मिश्र स्वरूपाच्याच न्यायाधिकाऱ्यांनीं ख्रिस्तीकरणातील जुलमांविरुद्ध लोटलीच्या देवालयाच्या प्रकरणासारख्या खटल्यांत हिंदूना न्याय दिला होता. असें जुलमांच्या जत्रींत दिसून येतें. न्यायाधीशांना "दिझेंबार्गादोर" (Desembargador) ही सज्ञा होती. हायकोर्टांतील एक दिझेंबार्गोदोर, प्रोकुरादोर जॅराल द कोरोअ इ फाझेंद या सज्ञेखालीं सरकारी वकीलाचें काम चालवीत असे. इ स १६१७ सालीं ही सख्या चौदापर्यंत वाढविली गेली. इ. स. १७७४ सालीं मार्केझ द पोंबाल यानीं हायकोर्ट काढून टाकून त्याच्याऐवजीं तो अधिकार ओव्हिदोर जॅराल नांवाच्या एकाच जज्जाकडे दिला परंतु ही व्यवस्था मार्केझ द पोंबालच्या मार्गे १७७६ तच बदलली व पूर्वीप्रमाणेंच हायकोर्ट स्थापण्यात येऊन त्यांत चार जज्ज व एक मोर्तबगार अशा पांच अधिकाऱ्याची योजना झाली. इ. स. १८२६ त पोर्तुगालच्या क्रांतींतून उद्भवलेल्या गडबडींत हायकोर्टाच्या जागीं junta de justiça ज्युंत द ज्युस्तीस नांवाच्या मडळाची योजना झाली होती. परंतु पुढें दहाच वर्षांनीं सनदशीर राज्यपद्धतीचें गोव्यांत आगमन होतांच, न्याय खात्याला आजचें स्वरूप प्राप्त होऊन तें अमलबजावणी खात्यापासून पूर्णपणें स्वतन्त्र झालें.

रॅलासाव द गोअ (गोव्याचें हायकोर्ट) त्याच्याखालीं प्रारंभीं (१) मृतव्यक्ति, अनाथ, चर्चें, तबाखू इत्यादींचा न्याय तोडणाऱ्या न्यायाधिशाचें दिवाणी व फौजदारी अधिकार असलेलें कोर्ट, (२) सासष्ट, बारदेश व तिसवाडी महालातून आणि दमण व दीव प्रांतांतून उभय प्रकारच्या अधिकारांचें प्रत्येकीं एक एक कोर्ट, (३) जुन्या काबिजादींतील कोमुनदादींच्या महालांचें प्रत्येकीं एक कोर्ट व (४) नव्या काबिजादींतील इतेंदेंत जॅराल दश् नोव्हश् कोंकीश्तश् हा, मुलकी व न्याय या उभय सत्तेनें मंडित अशा अधिकाऱ्याचें एक कोर्ट, अशीं एकदर

आठ अव्वल कोर्टें चालत होतीं. शिवाय मोझांबिक, मकाव व तिमोरच्या वसाहतींतील अव्वल कोर्टेंहि याच रॅलासांवाच्या हातांखालीं चालत असत. रॅलासांवांतील न्यायसभेचें अध्यक्षस्थान गव्हर्नर साहेबांकडे दिलें गेलें होतें.

**न्यायपद्धतिः**—तिसवाडींतील कोमुनदादींतर्फे चालणाऱ्या, अंतर्गत दिवाणी दाव्यांच्या किंवा त्यांनीं आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्याविरुद्ध दिलेल्या निकालांचें अपील चालविणाऱ्या न्यायकोर्टाची रचना जरा निराळीच होती. तींत गव्हर्नर साहेबांच्या अध्यक्षतेखालीं आर्चबिशप व हायकोर्टाचे दोन जज्ज हे न्याय देत असत. जुन्या काबिजादींतील इतर न्याय वर सांगितलेलीं अव्वल कोर्टें करीत असत.

नव्या काबिजादींतील दिवाणी व फौजदारी न्यायाधिकार वर सांगितल्याप्रमाणें तेथील मुख्य मुलकी अमलदाराकडेच सोपविले होते. दिवाणी दावे पंचायत नेमून आर्बिट्रेशन पद्धतीनें लवादाकडून तोडण्यांत येत. या लवादांना जसा व्यवहाराचा (facto) तसाच कायदा लागू करण्याचा (direito) असे उभय अधिकार असत. इतेंदेंत (मुख्य अधिकारी) यानें हजर रहायचें व निवाड्याची अमलबजावणी तेवढी करावयाची होती. या दिवाणी दाव्यांचें अपील गव्हर्नरकडे चालत असे. फौजदारी कज्जांत आरोप लागू होतांच (formada a culpa) कोमुनदादींच्या वरिष्ठ मंडळाकडे म्हणजे कामर जॅराल द प्रोव्हींसिय (Camara geral da Provincia) कडे खटला निवाड्याकडे जाई. देहांत शिक्षा देण्याचा (ती कायदेशीरपणें देत येई तेव्हां) अधिकार देखील या सभेला असे. मात्र ह्या सभेचे निवाडे कायम होण्यासाठीं हायकोर्टांत त्यानां मजुरी मिळावी लागे. दिलेला निवाडा फिरविण्याचा अधिकारहि हायकोर्टाला होता.

**कायदेः**—जुन्या काबिजादींतील न्यायदान, इतर बाबतींत पोर्तुगालच्या तत्कालीन कायद्याप्रमाणें चालत होतें; दिवाणी खटले Livro 4° das ordenações do reino या कायद्याप्रमाणें चालत व फौजदारी खटले Ordenações Filipinas या कायद्याप्रमाणें चालत.

कोमुदादींतील खटले त्यांना दिलेल्या १५२६ सालच्या सनदेप्रमाणें चालत. ही सनद म्हणजे त्याचे फौजदारी, मुलकी, जमाबंदी इत्यादि कायदेच होते. १७३५ सालीं या कायद्यांना व्हायसरॉय कोंद द सांदोमिल यानीं आणखी कांहीं नवे जोडले होते. आणि नव्या काबिजादींतील न्यायदान त्यांच्या स्वतंत्र कानू-

प्रमाणें होई. हे कानु इ स. १८२४ सालीं पहिल्यानेंच एकत्र करून सरकारनें प्रसिद्ध केले अशी ही परिस्थिति १८३६ सालापर्यंत न्यायखात्यांत चालत होती.

**न्यायखात्यांतील नेमणुकाः**—रॅलासांवाचे सारे जज्ज पूर्वीपासूनच पोर्तुगालहून कोईंब्रच्या युनिव्हर्सिटीच्या बाशारेल यँ दिरैत ( बार ॲट लॉ ) मधून नेमणुक होऊन येत असत. खालच्या कोर्टांपैकीं दमण व दीव येथील जज्जांची नेमणूक गव्हर्नरसाहेब करीत व बाशारेलांच्या अभावीं एतद्देशीय सनदी वकिलांतून देखील नेमणूक करण्याची मुभा होती. तिसवाडी, सासष्ट व बारदेश येथील जज्जांचीहि नेमणूक वरीलप्रमाणेंच गव्हर्नरकडून होत असावी. परंतु इ. स. १८१६ सालीं तिसवाडी व बारदेश प्रात यांवर एकच अव्वल कोर्ट ठेवलें गेलें; सासष्टीचें निराळें होतेंच तेव्हापासून या दोन जागा देखील बाशारेलांमधून भरावयाचा दंडक पडला तिसवाडीच्या जज्जसाहेबांस आपलें काम सांभाळून कोर्टमार्शलमध्यें कायद्याचें काम करावें लागे आणि सासष्ट प्रांतांतील न्यायाधीशास रॅलासांवांत फुलबेंचच्या प्रसंगीं ( देहांतशिक्षा इत्यादि जबर शिक्षा देण्याच्या बाबी उपस्थित होत, त्या वेळीं फुलबेंचासमोर न्याय चाले ) न्यायसभेंत भाग घ्यावा लागे.

**जमाबंदी खात्याची स्वतंत्र योजनाः**—जमावदी खातें व वसुली खातें अव्वलपासूनच स्वतत्र होतें. प्रारंभीं इ स. १५१७ त या खात्यावर व्हेदोर द फाझेंद ( vedor da fazenda ) नांवाचा एक कामगार असे. अगदीं सुरुवातीला वसुलाचा मक्ता १ लाख क्रुझादन तिमय्याला देण्यांत आला होता व त्यानतर मल्हारराव नांवाच्या इसमालाहि २५ हजार असर्फ्यांचा मक्ता देण्यात आला होता. पण पुढें वर सांगितलेल्या अधिकाऱ्याकडून जमावदी व वसूलाचें काम करण्यांत येऊ लागलें. सरकारी उत्पन्नाच्या एकंदर बाबींवर त्याचे अधिकार अनियंत्रित असे होते. हा क्रम जवळ जवळ एक शतकभर चालला. इ. स. १६१५ सालीं ही योजना बदलण्यांत आली. व जमावंदीची व्यवस्था कोंसेल्यु द फाझेंद ( Conselho de fazenda ) नांवाच्या कौन्सिलाकडे संपविण्यात आली. व्हायसरॉय हे त्या कौन्सिलाचे अध्यक्ष होते व व्हेदोर जॅराल द फाझेंद हा उपरोक्त अधिकारी, हायकोर्टाचा मोर्तबगार व इश्क्व्हांव जॅराल द फाझेंद ( जमाबदी खात्याचा मुख्य चिटणीस ) हे त्याचे सभासद असत हा इश्क्व्हाव कौन्सिलाची चिटणिसी करीत असे. पुढें इ. स. १७६९ सालीं या कौन्सिलाची रचना जरा निराळी होऊन त्याला ज्युंत जराल द फाझेंद ( junta geral

da fazenda ) हें नाव मिळालें. या नव्या योजनेप्रमाणें बनलेल्या कौन्सिलात अध्यक्ष, व्हायसरॉय व्हेंदोर जॅराल द फाझेंद, प्रोकुरादोर जॅराल द कुरेय द फाझेंद ( गव्हर्नरचे कायद्याचे सल्लागार व हायकोर्टातील सरकारी वकील ) असे सभासद असत. शिवाय मुख्य खजिनदार व मुळच्या कौन्सिलचा चिटणीस यांनाहि या कौन्सिलात बसण्याचा हक्क होता. इ स. १७७४ साली, व्हेंदोर द फाझेंद हा हुद्दा काढून टाकण्यांत आला व बाकीच्याच सभासदाचें कौन्सिल राहिलें. ही योजना सन १८३५ पर्यंत राहिली. मध्यतरीं १८१९ त जुन्या गोव्यातून राजधानी पणजी येथें नेण्यांत आली तेव्हा ह्या कौन्सिलाच्या सभाहि पणजींतच भरू लागल्या.

**सांप्रतच्या जमाबंदी कचेरीचा उगमः**—वर सांगितलेल्या १७६९ च्याच साली इस्क्रिव्हाव द ज्युंत हा नवा हुद्दा निर्माण करण्यात आला व त्याला खजिन्याच्या चिटणिसीचें काम नेमून दिलें होतें. हाच तूर्तच्या जमाबंदी खात्याचा मुख्य अधिकाऱ्याचा कायदेशीर पूर्वज होय शिवाय एक कोंतादोर, ( हिशेबनवीस व त्याच्या हाताखालीं चार ऑफिसर नेमून त्यांचें कोंतादारीय जॅराल नावाचें ऑफिसहि याच कायद्यान्वयें स्थापलें गेलें होतें प्रारंभीं या ऑफिसाकडे एकदर आवक जावक हिशेबाची तपासणी व लेखन हें काम संपविलें होतें पुढें त्याचे अधिकार उत्तरोत्तर वाढत जाऊन त्यांतूनच तूर्तच्या जमाबंदी कचेरीचा उद्भव झाला.

**प्रजेची स्थितिः**—एवढ्या ह्या टप्प्यावर पोंचताच, ह्या कालविभागांत प्रजेला काय काय हक्क होते, त्याचा थोडासा विचार करणें आवश्यक असल्यामुळें, तेवढा करून आपण सनदशीर राज्यपद्धतीकडे वळू. या कालविभागात प्रजा चार वर्गांत वाटली गेली होती. खास युरोपमधून आलेले अधिकारी, पाद्री इत्यादि लोक याना रैनॉइश म्हणत असत. व स्थायिक बनलेल्या युरोपियनाचे वंशज ( ह्यांना कास्तीस म्हणजे जातिवंत अशी संज्ञा रूढ झाली होती ); एतद्देशीय मुसलमानी व हिंदु स्त्रियाशीं झालेल्या युरोपियनाच्या विवाहांपासून झालेली संतति ( ह्यांना मिश्तीस म्हणजे मिश्र अशी संज्ञा रूढ होती ); प्रस्तुत ग्रथांत आम्हीं त्यांना लुझोइंडियन हें नाव योजिलें आहे धर्मांतरित होऊन ख्रिस्ती बनलेले हिंदी लोक ( ह्याना कानारीं म्हणजे कानडी अशी संज्ञा होती; ) व शेवटीं अद्याप चिकाटीनें गोव्यांत राहिलेले हिंदुधर्मीय ( याना जेंतीयु gentio म्हणजे

भाखडी असें नाव मिळालें होतें, युरोपियन वर्ग हा जेत्यांचाच वर्ग असल्यामुळें, त्यांची परिस्थिति सर्वतोपरी उत्तमच असे. त्याच्या खालोखाल लुझोइंडियन वर्गाला, सरकारी अधिकार वगैरे मिळत असत आणि इतर दोन वर्गांना युरोपियन तुच्छतेनेंच वागवीत असत त्यांतल्या त्यांत एतद्देशीय ख्रिस्त्याना प्रारंभापासूनच शिक्षण मिळाल्यामुळें खालच्या सरकारी जागा, धर्मखात्यातील जागा वगैरे त्याना सहज मिळत. गुलामगिरीची पद्धत सर्रास चालूच होती. बिचाऱ्या हिंदु लोकाना सरकारी दफ्तरांत अस्तित्वच नव्हतें. वर्णभेद तर १७७४ पर्यंत युरोपियनाकडून कडकपणें पाळला जात असे. त्याच्या दृष्टीनें हिंदु लोक हे मानवी प्राणीच नव्हते म्हटलें तरी चालेल ही दृष्टी त्याना जेसुइट लोकाच्या वर्तणुकीमुळें व प्राबल्यामुळें प्राप्त झाली होती. खास युरोप मधून आलेले युरोपियन रैनॉइश याचा एक वर्ग व कास्तीस मिस्तीस व कानारीं याचा दुसरा, असे दोनच वर्ग पूर्वीं सरकारी नेमणुकातून वगैरे राज्यकर्ते पाळीत असत. १७७४ सालीं मार्केझ द पोंबालनें या वर्णभेदास मूठमाती दिली व हिंदुलोकाशिवाय इतर सर्व वर्गांचा दर्जा कायद्यानें समान ठरवून तो न पाळणारास कडक शिक्षा ठरविल्या. फार तर काय पण निग्रो, मिस्तीस इत्यादि अपमानास्पद विशेषणें हिंदी ख्रिस्ती प्रजेला देणें हादेखील कडक शिक्षेस कारणीभूत होणारा गुन्हा ठरविला गेला. न्यायखातें, लष्करी खातें, किंवा इतर कोणत्याच खात्यांत अथवा नैसर्गिक हक्कानें प्रजेला जे अधिकार प्राप्त होतात, त्यांत साऱ्या ख्रिस्त्यांचा दर्जा समान ठरवून जित व जेते हा भेद त्यानें गाडून टाकला. ह्या धोरणाचा भरपूर फायदा आमच्या ख्रिस्ती बंधूनीं घेतला सनदशीर राज्यपद्धति गोमतकांत चालू करावयाचा मान हिंदी इसमाला याच धोरणामुळें मिळाला

**करपद्धतिः**—गोमंतकांतील ग्रामसंस्थानीं पूर्वकालीन कदंबादि राज्यकर्त्यांकडे जे करार केले होते, त्यांत प्रत्येक गावानें खुषीनें स्वीकारलेल्या कराला **खुशीव्रत** हें नाव मिळालें होतें. पोर्तुगीज अमलांत ह्या पूर्वीच्या कराशिवाय दुसरा कर सरकार मागणार नाहीं असा कौल मिळाला असताही, इ. स १५३३ त **घोडेव्रत** नावाचा दुसरा कर पोर्तुगीजांनीं प्रजेवर लादला. या करातून स्वारांच्या पथकाचा खर्च चालावयाचा असे. ह्या खेरीज गवत, तांदूळ, लव्हाळें, चुडतें इत्यादींची मागणी दरसाल जरूरीप्रमाणें होई ती निराळीच. इ. स. १५३९ त कुळकर्णांच्या वतनी जमिनीवर **कुळकर्ण पापोशी** नावचा कर बसविण्यात आला. गांवशी नावाचें एक खाजन ( खारी जिरायती जमीन ) त्याच नांवच्या कोमुनदादीचें

होतें तें कांहीं कारणासाठीं पूर्वकाळीं सामुदायिक उपयोगास घेण्यांत येऊन त्याच्या उत्पन्नाची भरपाई सर्व कोमुनदादी आपल्या उत्पन्नाचा एक ठराविक भाग देऊन करीत, तो हक्कही सरकारनें आपणाकडे ओढून, त्याला "गावशीच्या कानुवा जमिनीचा कर" असें नांव दिलें. ज्या कोमुनदादींतून चुडताचा पुरवठा होत नसे, त्यावर **तारवांचें झांकण** ( cobrimento das naus ) नावाचा कर बसविण्यात आला. ह्या सर्व करांचा समावेश मग **फोर** या एकाच नावाखालीं होऊन, सरकारची जमिनीवरील मालकी शावीत करण्यासाठीं, त्याचा उपयोग होऊं लागला

इ स. १५१८ सालीं या ग्रामसंस्थांकडील जमिनींवर पोर्तुगीज राज्यकर्त्यांनीं **दिझीमूश** दशमभाग नांवाचा कर बसविला होता. पुढे लवकरच तो घेण्याचें बद झालें असावें कारण, इ. स. १७०२ सालीं पुनःसाऱ्या जमिनीवर मग ती कोणाच्याहि मालकीची असो, हाच कर **मैयुश दिझीमूश** या नावानें शेंकडा पांच टक्क्याचा बसविण्याचा जाहीरनामा प्रजेच्या प्रमुख प्रमुख पुढाऱ्यांना बोलावून त्याच्या समोर प्रसिद्ध केला. परंतु या कराविरुद्ध महाल पचायतींनीं ( Comaras gerais ) व पुष्कळ कोमुनदादींनीं तक्रार करताच १७०४ सालीं तो रद्द करण्यात आला तथापि दुसऱ्याच वर्षी ( सरकार, प्रजा व कोमुनदादी ) या तीनही संस्थांच्या सयुक्त बैठकींत व्हायसरॉयनें दीझिमुशचा ठराव पास करून घेतला व त्या ठरावास अनुसरून, कोमुनदादीकडून शेंकडा पांच टक्के मैयुश फोरुश घेण्यांत येऊ लागले कोमुनदादींनीं त्या विरुद्ध पुष्कळ तक्रारी केल्या. परंतु त्याचा काडी मात्र उपयोग न होतां उलट इ. स. १७४५ त हा कर कायम राखूनहि कोमुददादीं व इतर सर्व वहिवाटदार यांवर पूर्वीचाच **दीझिमुश** हा कर बसविण्यांत आला व त्याची आकारणी, भात शेती, नारळ, ताडी व मिठागरें, यावर होत गेली मात्र कोमुनदादींचें उत्पन्न कायतें शेतजमिनींतच एकवटलें असून आजवर त्यांनीं सरकारी खर्चाकरितां ठोकठोक अशा रकमा दिल्याचें लक्ष्यांत आणून त्यांच्या शेतावर हा कर शेंकडा पाचच टक्के बसविला गेला.

इ स. १७७७ सालीं जुन्या काबिजादींतील सर्व जमिनींच्या नक्की उत्पन्नावर शेंकडा अर्धा टक्क्याचा एक कर बसविला गेला होता करमळीचा तलाव भरून काढणें, धक्क्यांची दुरुस्ती, मोऱ्यांचा उपसा व शहरातील झाडीचा नायनाट करण्याकडे त्याचें उत्पन्न खर्च व्हावयाचें होतें. हा कर दहा वर्षांच्याच मुदतीचा म्हणून बसविला होता तरी पण तो अजूनहि कोमुनदादींतर्फे वसूल होत आहे.

पोर्तुगीजाची भोंसल्याशीं लढाई चालली होती तेव्हां तिच्या खर्चाच्या तरतू-दीसाठीं म्हणून कोमुनदादींकडून, सरकारनें त्यांच्या नक्की उत्पन्नाचा एकतृतियांश लढाई चालू असे तोंवर दरसाल कर्जाऊ म्हणून घेण्याचा ठराव केला. तोहि सुमारें चाळीस वर्षेपर्यंत म्हणजे सनदशीर राज्यपद्धति अमलांत येईपर्यंत, कोमुनदादींनीं भरला. सनदशीर राज्यपद्धतीचे पहिलेच गव्हर्नर बेर्नार्दु पॅरिश द सील्हव यांनीं तो भूदंड आपल्या कारकीर्दींत काढून टाकला. परतु तोंवर ह्या जुलमी कराचें उत्पन्न ३४७५७७३ असफर्या म्हणजे १७२७८८६ रुपये सरकारनें घेतलें होतें।

**सनदशीर राज्यपद्धतिः**—पोर्तुगीज राजकुटुब फ्रेंच स्वाऱ्यामुळें ब्राझील देशात जाऊन राहिलें होतें व खुद्द पोर्तुगालांत इंग्रजी सैन्याचा तळ बरींच वर्षे जनरल बेरेस्फोर्ड याच्या हाताखालीं होता. इंग्रजी सैन्यानें पोर्तुगीज लोकांवर करडी सुलतानशाही गाजविली होती. त्या सर्व कारणांचा फायदा घेऊन तत्कालीन पोर्तु-गीज तरुणांनीं, इ. स १८२० सालीं, क्रांतीचा झेंडा उभारला. आणि इंग्रजी सैन्यास पोर्तुगाल सोडावयास लावून जबाबदार राज्यपद्धतीचा पाया घातला. परंतु आपसातील यादवी युद्धें बंद पडून पद्धतशीरपणें पार्लमेंट भरू लागण्यास १८३२ साल उजाडलें. दरम्यानच्या काळांत सिव्हिल वॉर, तटे इत्यादींस जणूं काय भरतीच आली होती. या अदाधुंदीच्या काळात रीयु द जानैरु येथें भरावयाच्या पार्लमेंटांस पोर्तुगीज हिंदुस्थानतर्फे जे तीन मेंबर निवडले गेले होते, त्यात भावी हिंदी गव्हर्नर, बेर्नार्दु पॅरिश द सीलव्ह कोंस्तासियु रॉकि द कॉस्त हे दोन हिंदी इसम व डॉ. लीम लैतांव हे युरोपियन होते. परंतु ही सडळी ब्राझील येथें पोंच-ण्यापूर्वींच ब्राझील देश पोर्तुगालपासून स्वतत्र झाला होता. तेव्हां हे मेंबर तसेच लिज्बोअला गेले आणि तेथे देखील ते पोंचण्याच्या आधींच दों मीगेल द ब्रागास (राजाचे धाकटे भाऊ) यानीं सनदशीर राज्यपद्धतीला खो देऊन पार्लमेंट उधळलें होतें कोंस्तासियु रॉकि दा कोश्त लागलींच गोव्यांत परत आले. परंतु बॅर्नार्दु पेरिश द सील्ह हे युरोपांतच राहून पुढील यादवी युद्धांत सनदशीर राज्यपद्धतीतर्फे लढले व सन १८३४ त सारें स्थिर स्थावर होतांच पहिलेच गव्हर्नर या नात्यानें गोव्यांत आले.

**कार्त कोंश्तितु सियोनाल पार्लमेंटांतील गोमंतकीय सभासदः**—ज्या सनदेच्या द्वारें पोर्तुगालात ही राज्यपद्धती अमलात आली होती, ती राजे दों पेद्रु, चवथे (स्वतत्र ब्राझीलचे पहिलेच बादशहा) यानीं प्रजेला बहाल केली होती. वर मथळ्यात घातलेलें नांव तिचेंच होय. या सनदेमुळें राजसत्तेचे चार अधिकार

बनून ते एकमेकांपासून स्वतंत्र राखण्यांत आले होते. या अधिकारापैकीं कायदे करण्याचा अधिकार हा पार्लमेंटाकडे होता; अमलबजावणीचा प्रधानमडळाकडे सोंपविला गेला, न्यायाचा न्यायकोर्टाकडे राहिला व नियामक अधिकार, ( poder moderador) म्हणजे पार्लमेंट बरखास्त करणें, शिक्षेची माफी देणें, इत्यादि अधिकार राजेसाहेबाकडे राहिले. कामर दुश पारिश ( लॉर्डस् ) व कामर दुज देपुतादुश ( कॉमन्स ) अशा पार्लमेंटाच्या दोन सभा होत्या. देपुतादाच्या निवडणुकीस उभें राहण्यास पोर्तुगीज लिहितां वाचता येऊन पंचवीस वर्षें उमर बस्स होती. कामर दुशपारिशू मध्यें बिषप्स, वशपरंपरा पार दुरैनु (लॉर्ड) व राजेसाहेबांकडून तहाहयात नेमणूक झालेले पारिश असत. निवडणूक चतुर्वार्षिक होती पोर्तुगीज इंडिया तर्फे जाणाऱ्या देपुतादाची संख्या प्रारंभीं तीन होती. ती १८५३ सालीं चार झाली. व त्याच वेळीं निवडणुक प्रत्यक्ष पद्धतीनें झाली. त्यापूर्वी मतदारांनीं प्रातिक मतदार निवडावयाचे व या प्रातिक मतदारानीं देपुतादांची निवडणूक करावयाची असा परिपाठ होता १८६९ त ह्या चारांऐवजी दोनच देपुताद राखले गेले. पुन: १८७८त दोहोंचे तीन झाले, आणि १८९५ त एकच देपुताद राहिला. निवडणुकींत नवी काबिजाद सन १८४५ सालापासून भाग घेऊ लागली. रिपब्लीक पुकारलें जातांच पार्लमेंटाला कॉंग्रेसु दे रॅपूब्लिक ही संज्ञा मिळाली व '–कामर दुश पारिश ' नष्ट होवून तिच्या ऐवजीं दर सहा वर्षांनीं निवडलीं जाणारी '–सॅनादु नावाची सभा आली आहे. आणि देपुतादाची सभा तशीच राहून तिची निवडणूक त्रैवार्षिक झाली आहे सॅनादोर व्हायला निदान पस्तीस वर्षांचें वय आवश्यक आहे. गोव्यांतून एक सॅनादोर व एक देपुताद, असे दोन सभासद कॉंग्रेसु दे रेपुब्लिकला जात होते परंतु तूर्त मिलिटरी सत्तेवर अधिष्टित झालेली जनरल कार्मोनाची डिक्टेटरशीप चालत असून गोव्यांचे प्रतिनिधि नाहींसे करण्यांत आले आहेत. १९२६ पासून ही व्यवस्था झाली असून खुद्द पोर्तुगालांतहि पार्लमेंट भरणें बंद आहे.

**जबाबदार राज्यपद्धतीनें मिळालेले हक्क:**—उपरोक्त कार्तकोंस्तीतुसियोनाल मध्यें पोर्तुगीज प्रजेला जे मुख्य व महत्वाचे हक्क मिळाले ते पुढें देत आहों.

**व्यक्तिस्वातंत्र्य:**—न्यायासनासमोर पूर्व चौकशी होऊन न्यायाधिकाऱ्यानें वारंट दिल्याशिवाय कोणत्याहि व्यक्तीला पकडतां येत नाहीं. सरकारविरुद्ध बंड किंवा कट करणें, खोटी नाणीं पाडणें, जाळपोळ, घरफोडी, खून, असल्या गंभीर

स्वरूपाच्या गुन्ह्यांना व मुद्देमालासकट पकडल्या जाणाऱ्यांना मात्र हें कलम लागू नाहीं. स्वसंरक्षणाचा हक्क habeas corpus प्रत्येकाला आहे

**निवास स्वातंत्र्यः**—मालकाच्या परवानगीशिवाय त्याच्या घरात शिरण्याचा हक्क कोणालाच नाही. दिवसा मात्र न्याय सत्तेला, आरोग्य रक्षक खात्यांतील लोकानां व आदमिनिस्त्रादोरांनां, कायद्याचीं विशिष्ट बधनें पाळून आंत शिरतां येईल.

**विचार स्वातंत्र्यः**—कोणतेहि विचार मनांत बाळगणें हा गुन्हा होऊ शकत नाहीं.

**उच्चार स्वातंत्र्यः**—भाषण द्वारा किंवा लेखनद्वारा होणाऱ्या विचारप्रसाराला, आगाऊ परवानगीचें वगैरे कोणतेंच बंधन नाहीं. मात्र आपल्या रास्त हक्काचें अतिक्रमण केल्यास न्यायासनासमोर त्याची चौकशी होईल ह्या स्वातन्त्र्याच्या विशेष अटी स्वतंत्र कायद्यानें ठरविल्या जातील. मुद्रण स्वातन्त्र्याच्या कायद्याचीं स्थित्यंतरें वृत्तपत्राच्या वर्णनांत देण्यांत येतील भाषणस्वातंत्र्याची अट अशी आहे कीं, सभेची जागा व विषय, तालुक्याच्या गांवीं सभा भरावयाची असल्यास २४ तासांपूर्वीं, व इतर गांवीं भरणाऱ्या सभेची ४८ तासांपूर्वीं आदमिनिस्त्रादोर किंवा पोलिस अधिकाऱ्याला नोटिशीच्या द्वारें कळविलें पाहिजे.

**आचार स्वातंत्र्यः**—कायद्यात विशेषें करून उल्लेखिलेल्या बाबींखेरीज केल्यास, अप्रिय असलेला धंदा करायला भाग पाडणें किंवा प्रिय असलेला धंदा करूं न देणें, हा गुन्हा समजला जाईल मनसोक्त वागण्यास प्रत्येक व्यक्ती स्वतन्त्र आहे मात्र तेणेंकरून सरकारी धर्म, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक नीति व इतर व्यक्तींचे हितसंबध यांनां बाध येऊं नये.

**संस्थापन स्वातंत्र्यः**—कार्त कोंस्तितुसियोनाल या सनदेस अनुसरून केलेल्या रचनेच्या वाटेल त्या प्रकारच्या संस्था स्थापण्यास कोणतेंच बंधन नाहीं.

**परिश्रम स्वातंत्र्यः**—इतर व्यक्तींच्या हक्कांचें अतिक्रमण न करता, उत्पन्न केलेल्या मालमत्तेवर, मग ती वाङ्मयात्मक असो, आर्थिक किंवा भूमिजनित असो उत्पादकाचा हक्क अबाधित आहे.

**तक्रार स्वातंत्र्यः**—अनिष्ट वाटणारे कायदे मोडून किंवा त्याविरुद्ध तक्रार करून बदलून घेण्याचा हक्क प्रत्येक प्रजाजनास आहे. मात्र न्यायसनासमोर कायदेभंगाचा परिणाम भोगावा लागेल.

**समतेचे हक्कः**—कायद्यासमोर सर्व व्यक्तींचा दर्जा सारखा मानला जाईल. वर्ण, धर्म, जात, इत्यादि बंधनें कायद्यानें मानलीं जाणार नाहींत. एका लायकीच्या मुद्याखेरीज सरकारी नोकरीच्या वगैरे बाबतींत इतर कोणतींच बंधनें विचारात घेतलीं जाणार नाहींत.

**शिक्षणः**—प्रजाजनानां प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीनें देण्याविषयीं सरकार बांधलें गेलें आहे.

**न्यायः**—न्यायखातें इतर राजकीय खात्यांपासून पूर्णपणें स्वतंत्र राहील.

**पत्रव्यवहारः**—इतरांचीं पत्रें परवानगीशिवाय फोडून वाचणें हा गुन्हा समजला जाईल.

**धार्मिक बाबः**—रोमन क्याथॉलिक पंथ हा सरकारी धर्म मानला जाईल. इतर धर्मीयांना आपापले धार्मिक विधि करण्याची पूर्ण मुभा आहे. मात्र तेणें करून सरकारी धर्म, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक नीतिमत्ता यांना धक्का पोंचतां कामा नये.

**राज्यकारभारः**—गोमंतकांतील राज्यकारभार चालविण्यासाठीं गव्हर्नरला junta geral da provincia ज्युंत जॅरालदा प्रोव्हींसिय व Conselho do governo कोंसेल्यु दु गोव्हेर्नु नावाच्या दोन सभा असत. परंतु त्यांचे ठराव गव्हर्नरला बंधनकारक नव्हते. शिवाय या संस्था देखील प्रतिनिधिक स्वरूपाच्या अशा नव्हत्या ज्युंत जॅरालच्या सभासदासाठीं गोमंतकांतील प्रत्येक म्युनिसिपालिटी किंवा म्युनिसिपल कमिटी तीन तीन नावाची यादी सरकारास पाठवीत असे व त्या नांवांतून गव्हर्नरसाहेब एका एका गृहस्थाची निवड करीत असत. कोंसेल्यु दु गोव्हेर्नु ही संस्था तर पूर्णपणें सरकारीच होती. खास गव्हर्नर अध्यक्ष, जनरल सेक्रेटरी, आर्चबिशप रॅलासांवांचे प्रेसिडेंट, कायद्याचे सल्लागार, आरोग्यरक्षणखात्याचे चीफ सर्जन, जमाबंदी खात्याचे मुख्याधिकारी, लष्करी ऑफिसचा मुख्य अधिकारी व एक उच्च हुद्याचा लष्करी अमलदार हे तिचे सभासद होते. कोणत्याही महत्वाच्या प्रश्नाबद्दल ह्या संस्थेचें मत घ्यावें लागे. परंतु तें निर्णयात्मक नसून प्रश्नाच्या आवश्यकतेबद्दल व जरूरीबद्दलच होतें. अखेरचा निर्णय गव्हर्नरसाहेबांचाच होता. या दृष्टीनें पाहतां, ज्युंत जॅराल दा प्रोव्हींसिय हें कायदेमंडळ, व कोंसेल्यु दु गोव्हेर्नु ही सभा कार्यकारी कौन्सिलच्या जागीं होत्या असें म्हटलें तरी चालेल.

सासष्ट बारदेश व तिसवाडी या महालांवर आदमिस्त्रादोर नावाचा अधिकारी राज्यकारभारासाठीं होता आणि नवी काबिजादींचा सारा कारभार इतेंदेंत जेंराल दज् नॉव्हश कोंकिस्ताश् या अधिकाऱ्यामार्फत होई. १८६४ च्या सुमारास इतेदेंत जेंरालची जागा नष्ट करून त्या ऐवजीं नव्या काबिजादीचे पेडणें, साखळी, फोंडें व केपें असे चार विभाग पाडून त्यावरील अधिकाऱ्यास हें नांव देण्यांत आलें आणि इ. स. १८८३ च्या सुमारास मूळचे चार विभाग कायम राखून सांगें व काणकोण हे कौंसेल्य नवे निर्माण करण्यात आले.

**रिपब्लिकची स्थापना व हक्कांतील फेरफारः**—१९१० सालच्या अक्टोबर ५ रोजीं पोर्तुगालात क्रांति होऊन राजसत्ता नष्ट करण्यांत आली. तात्पुरतें मंत्रिमंडळ बनवून राज्यकारभार सुरू झाला आणि सर्वत्र निवडणुका होऊन इ स. १९११ सालच्या आगस्ट २१ तारखेस कौंस्तितुइसाव द रेपूब्लिक पोर्तुगेझ. ही पोर्तुगीज रिपब्लीकची मूळभूत घटना मंजूर झाली. ह्या घटनेन्वयें पोर्तुगीज नागरिकांना जे हक्क मिळाले ते सारे कार्तकौंस्तितुसियोनाल प्रमाणेंच होते महत्वाचा असा त्यात एकच फेरफार झाला आणि तो धार्मिक बाबतींत होय. या सनदेन्वयें सरकारनें आपला स्वत चा असा धर्म म्हणून न मानतां सर्व धर्मांची समानता स्पष्ट कबूल केली. व स्वत· रिपब्लिकसरकार धर्मापासून अलिप्त राहिलें. राजकुटुंबाचें उच्चाटन व ड्युक, मार्कझ इत्यादि किताब व तदनुषंगिक अधिकार याचा उच्छेद हें रिपब्लिकचें दुसरें महत्वाचें कार्य होतें पोर्तुगाल खेरीज इतर पोर्तुगीज मुलुखाच्या कारभारासाठीं स्वतंत्र वसाहत खातें निर्माण झालें गव्हर्नरची नेमणूक वसाहत मंत्र्याच्या शिफारसीवरून कॉंग्रेसुदरेंपुब्लिक मध्यें पास झाल्यानतर पोर्तुगाल सरकार करीत होतें.

**प्रांतिक स्वायतत्ता:**—इ. स. १९१४ सालीं राज्यव्यवस्था व जमाखर्च या बाबतींत वसाहतींना स्वायतत्ता दिल्याचें जाहीर झालें. यापूर्वी जमाखर्चाच्या बाबतींत गोवा सरकार पूर्णपणें पोर्तुगीज सरकारच्या आधीन होतें. ता. २७ जुलै १९१७ रोजीं, वरील जाहिरनाम्यास अनुसरून, पोर्तुगीज हिंदुस्थानाला प्रांतिक स्वायत्ततेचा फायदा मिळाला. आणि त्या कायद्यान्वयें गोमंतकाचा राज्यकारभार चालविण्यास "कौंसेल्यु दु गोव्हेनु" (सरकार सल्लागार मंडळ) नावाची सभा निर्माण करण्यात आली. गव्हर्नरसाहेब हे त्या मंडळाचे अध्यक्ष असून त्यांत त्यांनीं नेमलेले ९ व १० लोकनियुक्त असे

एकंदर वीस सभासद होते. त्याप्रमाणें निवडणुकाहि झाल्या. परंतु या मंडळाची स्थापना व्हावयाच्या दिवशींच, म्हणजे ता. १ जुलै १९१८ रोजीं, सल्लागार मंडळाच्या तहकुबीचा हुकूम पोर्तुगालहून तारेनें आला. लोकांनीं त्याविरुद्ध बरीच चळवळ केली परंतु तत्कालीन गव्हर्नर फ्रैतश रिबैर यांनीं चळवळीकडे लक्ष्य न देतां आपल्या मतानुसार १० सरकारी व ६ लोकनियुक्त अशा १६ सभासदांचें मंडळ बनवून ती योजना पोर्तुगाल सरकारकडून मंजूर करून घेतली. या योजनेप्रमाणें झालेल्या निवडणुकांवर प्रजेनें बहिष्कार घातला परंतु त्यामुळें उलट प्रजेस अप्रिय माणसें मात्र सदर मंडळात निवडून आलीं. लोकाची चळवळ सारखी चालूच होती तिला यश येऊन, ता. २३ मे १९१९ सालीं फ्रैतश रिबैर यांना राज्यसूत्रें बॉबेल मोंत यांच्या हातीं देऊन ताबडतोब पोर्तुगालास जाण्याचा हुकूम पोर्तुगालहून आला नव्या गव्हर्नरनीं पूर्वीं १९१८ च्या मार्चमधील निवडणुका झाल्या होत्या त्याच कायम करून त्याप्रमाणें पूर्वीच्या सनदेनुसार राज्यकारभार चालविण्यास सुरवात केली.

ही योजना देखील टिकली नाहीं. १९२० च्या नवबरात ह्या मंडळाची पुनर्घटना झाली व अध्यक्ष गव्हर्नरसह ७ सरकारी व ११ लोकनियुक्त अशा १८ सभासदांचा समावेश होऊन त्याला कोंसेल्यु लेजिलातीव्ह ( कायदेमंडळ ) असें नांव मिळालें. अर्थात् स्वायतत्तेच्या दृष्टीनें ही थोडीशी वाढच झाली होती.

१९२६ सालीं पोर्तुगालमध्यें लष्करी क्रांति होऊन सांप्रतचें लष्करी सत्तेचें सर्वाधिकारी सरकार, जनरल कार्मोना यांच्या अध्यक्षतेखालीं सत्ता चालवीत आहे. या सरकारनें रिपब्लिकच्या मूलभूत घटनेवरच घाव घालून पोर्तुगालमधील प्रजाजन व वसाहतींतील प्रजा असा फरक केला. वसाहतींना पार्लमेंटांत प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क होता तो नष्ट केला व त्या ऐवजीं वसाहतीचा कारभार चालविणें ( Conselho superiar das Colonias ) 'कोंसेल्यु सुपेरियोर दश कोलोनियश' नांवाचें मंडळ स्थापन केलें त्यांत पोर्तुगाल सरकारनें नेमलेल्या सभासदाशिवाय प्रत्येक वसाहतीनें निवडलेला एक एक सभासद असे परंतु अलीकडे हा प्रतिनिधि देखील काढून टाकून वसाहत मंडळ केवळ सरकारी सभासदांचेंच बनविलें. या पिच्छेहाटीप्रमाणेंच त्यानीं प्रांतिक कायदेमंडळाचीहि छाटाछाट केली. आणि हल्लीं अमलात असलेल्या सरकार सल्लागार मंडळांत अध्यक्ष गव्हर्नर असून त्याच्यासह पांच सरकारी अधिकारी सभासद, पांच सरकारनियुक्त बिन अधिकारी व पांच लोकनियुक्त मिळून एकंदर १५ प्रतिनिधि असतात.

गव्हर्नर साहेब, कायद्याचे सल्लागार या नात्यानें प्रोकुरादोर दा रॅपुब्लिक, अनर्गत खातें, जमाबंदी खातें, व पब्लिक वर्क्स खातें इतक्यांचे डायरेक्टर हे ५ सरकारी अधिकारी सभासद आहेत. व लोकनियुक्तांपैकीं सासष्ट, बारदेश, मुरगाव व तिसवाडी, ह्या चारहि तालुक्याचे मिळून तीन, दमण व दीव प्रांतातर्फे एक व नवीन काबिजादींतर्फें एक, अशी वांटणी झाली आहे. वयांत आलेल्या पोर्तुगीज लिहितां वाचतां येणाऱ्या पोर्तुगीज नागरिकासच मताधिकार आहे. सर्व सभासदास बदली सभासद असून त्यांची नेमणूक किंवा निवडणूक मुख्य सभासदांबरोबरच होत असते नेमणुका किंवा निवडणुका द्विवार्षिक असतात. मंडळाच्या बैठका वर्षांतून जानेवारी फेब्रुआरींत एक व जुलै ऑगस्टांत दुसरी अशा दोनदां भरतात. शिवाय जरूरीप्रमाणें असाधारण बैठकाहि गव्हर्नरसाहेब बोलावूं शकतात.

**सरकारसल्लागार मंडळाचे अधिकारः**—न्यायखातें आमूलाग्र स्वतन्त्रच असल्यानें, त्याचा विचार निराळाच राहिला. राहिलेल्या खात्यातून लष्करी कारभार, नाविक खातें, दुय्यम व उच्च शिक्षण, स्थानिक सरकारचे पोर्तुगाल सरकारशीं व इतर वसाहतींशीं असणारे संबंध आणि परराष्ट्रीय व्यवहार, त्याचप्रमाणें खात्याच्या डायरेक्टरच्या नेमणुकी व पगार, ह्या बाबी पोर्तुगाल सरकारकडे अहेत. आणि बाकी सर्व व्यवहार सरकारसल्लागार मंडळाकडे आहेत. तरी पण मंडळाचे निर्णय समतीसाठीं वसाहत मंन्त्र्याकडे जावे लागतात व त्यांना ते बदलतां येतात किंवा रद्दही करतां येतात. अर्थात् अखेरची सत्ता पोर्तुगाल सरकारकडेच रहाते. १९१७ च्या कायद्यान्वयें रद्द करण्याचाच अधिकार वसाहत मंन्त्र्याकडे होता–बदलण्याचा नव्हता याही दृष्टीनें ही पिच्छेहाटच आहे. जेणेंकरून खर्चाची वाढ होईल, अशीं बिलें पुढें आणण्याचा अधिकार लोकनियुक्त सभासदांस नाहीं. आणल्यास तो खर्च भागविण्यास लागणारी योजनाही बरोबरच पाहिजे

सरकारसल्लागार मंडळाचा एक 'खास विभाग' असतो. त्यांत गव्हर्नर अध्यक्ष, प्रोकुरादोर दा रॅपूब्लिक, सरकारी अधिकारी सभासदातून गव्हर्नरनें नेमलेला एक सभासद व बिनसरकारी पांच सभासदातून एक आणि लोकनियुक्त सभासदांतून एक असे पांच सभासद असतात. शेवटच्या दोन सभासदाची निवडणूक सरकारसल्लागार मंडळानें करावयाची असते. मंडळानें पास केलेल्या ठरावास अनुसरून कायद्याची रचना करणें व त्यांच्या अम्मलबजावणीची व्यवस्था करणें, इत्यादि कार्यकारी कौन्सिलसारखे अधिकार या विभागाकडे असतात राज्यकारभारासंबंधीं प्रश्न विचारण्याचा हक्क सर्व बिनसरकारी सभासदाना असतो. आणि ही प्रश्नविषयक बाब गुप्त स्वरूपाची नसेल तेव्हां तिचे जबाब देण्यास त्या त्या खात्याचे अधिकारी लग्निक आहेत.

**कौंसेल्यु द दिश्त्रीतु**:—हें गव्हर्नरचें खास सल्लागार मंडळ आहे. त्याचा अध्यक्ष खात्यांच्या डायरेक्टरांपैकीं गव्हर्नरनें नेमावयाचा असतो. तिसवाडी कोमार्कांचा सरकारी वकील, आरोग्य खात्याचा दुय्यम डायरेक्टर, पब्लिक वर्क्स खात्याचा दुय्यम डायरेक्टर, जमावदी खात्याचा दुय्यम डायरेक्टर, तिसवाडी म्युनिसीपालिटीचा अध्यक्ष, व्यापारी संस्था व उद्यमीय संस्था यांनीं निवडलेला एक इसम, गोव्यातील नागरिकांतून जास्तींत जास्त कर देणाऱ्या ६० नागरिकानीं निवडलेला एक इसम, जमीनदार व शेतकरीसंघानें निवडलेला एक इसम व सरकार-सल्लागार मंडळानें निवडलेला एक इसम, असे त्यांत दहा सभासद असतात. पोर्तुगीज हिंदुस्थानास लागू करण्यांत आलेल्या कायद्यांची अम्मलबजावणी गोमांतकापुरती योग्यप्रकारें कशी करावी, या विषयीं गव्हर्नरास सल्ला देणें व सरकारी संरक्षणाखालीं चाललेल्या धार्मिक, शैक्षणिक, दीनसहाय्यक संस्था, म्युनिसिपालिद्या, ग्राममंडळें इत्यादिकांचे जमाखर्च, ठराव आणि सरकारी बांधकामें व एतद्विषयक करार, यावर निर्णायक मत देणें हे या मंडळाचे अधिकार आहेत. गव्हर्नरचा या मंडळाशीं मतविरोध झाल्यास अखेरचा निर्णय सरकारसल्लागार मंडळाच्या खास विभागाच्या सल्ल्यानें लागत असतो.

**त्रिबुनाल आदमिनिस्त्रातीव्ह फिस्काल इ दश कौंतश्**:—गव्हर्नर खेरीज करून मुलकी खात्यांतील कोणत्याही अधिकाऱ्याचे हुकूम किंवा निवाडे; कौंसेल्यु द दिस्त्रीतु, म्युनिसिपालिद्या वगैरेंतील, निवडणुका; धार्मिक, शैक्षणिक व दीनसहाय्यक संस्थांचीं कृत्यें; सरकारी कचेऱ्या व कंट्राक्टरमधील करार मदार, जकात खातें व जमावदी खातें यांच्या कचेऱ्याचीं कृत्यें, वगैरे संबंधीं लोकांकडून किंवा सरकारकडून, आलेल्या तक्रारींचा निकाल देणें व गव्हर्नरनें काढलेल्या फर्मानात खर्चाच्या बाबी असल्यास त्यांच्या कायदेशीरपणाबद्दल मत देणें, हीं या मंडळाचीं मुख्य कामें आहेत.

रॅलासांवाचे पांचही जज्ज, गव्हर्नरनें नेमलेला मुलकी खात्यांतील डायरेक्टरपैकीं एक डायरेक्टर व सरकारसल्लागार मंडळानें आपल्या सभासदांपैकीं निवडून दिलेला एक सभासद असे ह्याचे सात सभासद आहेत. विचारांत घेतलेली बाब जमाबंदी खात्यासंबधीं असली, तर त्या खात्याचा डायरेक्टर व जकातखात्याची असली तर त्याचा डायरेक्टर हाही एक सभासद असतो. प्रोकुरादोर द रॅपूब्लिक हा या मंडळात सरकारी हितसंबध जपण्यास असतो. या मंडळाच्या निकालावर किंवा गव्हर्नरच्या निकालावर अपिल करावयाचें झाल्यास पोर्तुगालांत वसाहतमंडळाकडे करावें लागतें.

४३०५



**राज्यव्यवस्थेचीं खातीं:**—राज्यव्यवस्थेच्या सोईसाठीं खालील खात्यांतून सारा कारभार चालविला जातो.

रेपार्तिसांव दु गाबिनेति—यांतून पोर्तुगाल सरकारशीं व्यवहार, परराष्ट्रीय व्यवहार, कॉन्सलचे व्यवहार व न्यायखात्यांतील जे व्यवहार प्रांतिक सरकार-मार्फत होतात, ते सर्व याच खात्यांतून चालत असतात याच्या मुख्यास सुमारें ६८०० रु. पगार असतो.

लष्करी खातें—लष्करचा व पोलिसकोरचा सारा कारभार या खात्यामार्फत चालतो याचा मुख्य सामान्यत कर्नलच्या दर्जाचा असतो. व त्याला वार्षिक सुमारें १३८०० रुपये पगार असतो.

नाविक खातें—बंदरतपासणी व रक्षण, जलमार्गावरील नियंत्रण, मच्छि-मारीवरील देखरेख, दीपगृहें, धक्के, पणजीची वेधशाळा, यांचा कारभार या खात्यातून चालतो. याचा डायरेक्टर नाविक दळांतील ऑफिसर असून त्याला वार्षिक सुमारें १५५०० रुपये पगार असतो.

ह्या तीन खात्यांवर सरकारसल्लागार मंडळाचा अधिकार चालत नसतो.

अंतर्गत मुलकी व्यवस्थेचें खातें:—(पूर्वीचें सेक्रेटरिएट) यांतून शांतता व सुव्य-वस्था, शिक्षण, व्यापारउदीम, कोमुनदादी, म्युनिसिपालिट्या, देवस्थानें व इतर सार्वजनिक सस्था, स्टॅटिस्टिक्स, रेजीश्त सिव्हिल (जन्ममरण व विवाह यांची नोंदणी करणारें खातें), सरकारी छापखाना व ग्याझेट, सरकारी वाचनालय, इत्यादि व्यवस्था चालते. डायरेक्टरच्या जागीं बाशारेल (बार ॲट लॉ) असतो. त्याला वार्षिक दहा हजार रु. पगार असतो.

आरोग्यरक्षण खातें—प्रजेचें आरोग्यरक्षण व सुधराई हीं या खात्यांतून चालतात. डायरेक्टर पोर्तुगालच्या युनिव्हर्सिटीची परिक्षा दिलेला असून त्याला वार्षिक सुमारें १० हजार रु. पगार मिळतो.

जमाबदी खातें.—करांची आकारणी, वसूल, खर्चाची व्यवस्था, अंदाजपत्रक तयार करणें, हिशेब राखणें व अबकारी, हें काम या खात्याकडे असतें. मुख्या-धिकाऱ्यास वार्षिक सुमारें ९००० रु. पगार असतो.

जकात खातें:—मुख्याधिकाऱ्यास सुमारें ८ हजार वार्षिक पगार असतो.

पब्लिकवर्क्स—मुख्याधिकारी पोर्तुगीज युनिव्हर्सिटीचा सिव्हिल इंजिनियर असून त्याला सुमारें १४ हजार वार्षिक पगार मिळतो.

शेतकी खातें—शेतकी, जगल व्यवस्था व पशुसरक्षण हीं या खात्यामार्फत चालतात. डायरेक्टर शेतकी इंजिनियर असून त्याला वार्षिक सुमारें ८॥ हजार रुपये पगार आहे.

तार व टपाल खातें:—डायरेक्टरला सुमारें ५॥ हजार रुपये पगार मिळतो. तार, टपाल, टेलिफोन व विजेच्या कारखान्यांवरील देखरेख हीं कामें यांतून चालतात.

जमीन मोजणी व खनिज खातें:—भूमापन, खाणींवरील देखरेख, नकाशा तयार करणें, वगैरे यातून चालतात. डायरेक्टर सिव्हल इंजिनियर असून त्याला वार्षिक सुमारें ६॥ हजार रु. पगार मिळतो

रेल्वे व मुरगांव बंदरावरील देखरेख:—यावरील अधिकाऱ्यास वार्षिक सुमारें १२॥ हजार पगार मिळतो.

**अंतर्गत मुलकी कारभाराची व्यवस्था:**—मागें सांगितल्याप्रमाणें या कारभारासाठीं जुन्या काबिजादीचे (तिसवाडी) जंजिरे गोवा, सासष्ट, मुरगांव व बारदेश असे चार कोंसेल्य आणि नव्या काबिजादीचे पेडणें, सांखळी, फोंडें, केंपें, सांगें व काणकोण असे सात कोंसेल्य आणि सत्तरचा लष्करीविभाग, असे एकदर अकरा विभाग पाडण्यांत आले आहेत त्यांवर आदमिनिस्त्रादोर नावांचा अधिकारी गव्हर्नरनें नेमलेला असतो. याची नेमणूक कमीशनच्या स्वरूपाची असून चतुर्वार्षिक असते. गव्हर्नरच्या विश्वासांतील माणसांतून या जागा भरावयाच्या असल्यानें, त्यांच्या नेमणुकी सामान्यतः प्रत्येक गव्हर्नरच्या बदलीप्रमाणें बदलत असतात. परतु तसाच लवचीक धोरणाचा व कर्तबगार आदमिनिस्त्रादोर तीन चार गव्हर्नर देखील पाहू शकतो. सनदी वकीलातून किंवा पेन्शनरांतून या जागा भरावयाच्या असा कायद्याचा दंडक आहे. परंतु गव्हर्नरच्या इच्छेस आलें तर, इतर माणसांतूनही ही नेमणूक करावयाची त्याला मुभा असते. मात्र खऱ्या लष्करी अधिकाऱ्याची नेमणूक करणें वर्ज्य आहे. आदमिनिस्त्रादोरांना पगार नसतो. भत्यादाखल वार्षिक सुमारें चोविसशें रुपये मिळतात शांतता व सुव्यवस्था, जंगल खात्याची व्यवस्था, धार्मिक सस्था, कोमुनदादी व इतर संस्था आणि म्युनिसिपालट्यांवरील देखरेख हीं कामें यांच्याकडे असतात सासष्ट कोंसेल्य, जंजिरे गोवा व बारदेश, या कोंसेल्यातून कोमुनदादींच्या कारभारासाठीं एक व धार्मिक सस्थांच्या कारभारासाठीं एक, असे दोन निराळे स्वतंत्र आदमिनिस्त्रादोर असल्यानें तेथें आदमिनिस्त्रादोर दु कोंसेल्यु याचे अधिकार तेवढ्यापुरते मर्यादित असतात आदमिनिस्त्रादोराच्या हाताखालीं प्रत्येक फ्रेगेझींत शांतता व सुव्यवस्था राखण्याकरितां, रॅजिदोर नावाचे बिनपगारी अधिकारी असतात. त्यांची नेमणूक आदमिनिस्त्रादोरच्या शिफारसीवरून गव्हर्नर करतो. कायद्यानें या अधिकाऱ्यांची मुदत ठरविलेली असली, तरी व्यवहारात दहा पंधरा वर्षेंहि हा अधिकार एकाच इसमाकडे राहतो. शेवटीं प्रत्येक गावांतून गांवाच्या क्षेत्राप्रमाणें व

महत्वाप्रमाणें कमी जास्त 'काब द पुलीस' नांवाचे विनपगारी शिपाई असतात. त्याची नेमणूक आदमिनिस्त्रादोरकडून रॅजिदोरच्या शिफारसीनें होते.

हे कोंसल्य नांवाचे विभाग पाडतांनां लोकसंख्या, क्षेत्रफळ व सांस्कृतिक भेद हे लक्ष्यांत घेतलेले दिसत नाहींत पूर्वकालीन राज्यव्यवस्थेंतील महालांप्रमाणें थोड्याबहुत फेरफारानेंच हे कोंसल्य पाडण्यांत आलेले आहेत, हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

सत्तर महाल हा गोमंतकांतील महालांत अत्यंत मागसलेला असल्यामुळें, त्यांतील कारभार लष्करी स्वरूपाचा आहे. महालाचा मुख्याधिकारी व रॅजिदोराच्या जागीं असलेले अधिकारी लष्करी आहेत. सामान्यतः सारेच अधिकार या मुख्याधिकाऱ्याला आहेत. न्यायखातें मात्र स्वतन्त्र असल्यामुळें त्यांत या अधिकाऱ्याचा हात नसतो.

## कोंसल्यांची स्थिति दाखविणारें कोष्टक.

| नांव | पूर्वींचे महाल | क्षेत्रफळ चौ. मै. | लोक संख्या | गांवें. | रॅजि-दोर | कचेरीचें स्थान. |
|---|---|---|---|---|---|---|
| जंजिरे गोवा | गोवा बेट व इतर बेटें | ५४॥ | ५७२६३ | ४९ | १८ | पणजी शहर |
| सासष्ट | मुरगांव खेरीज सासष्ट | ९५॥ | १००८४२ | ५० | २४ | मडगाव |
| मुरगांव | सासष्ट प्रांतांतून निराळा काढलेला भाग | २५॥ | २०२५७ | १६ | ५ | वास्को दा गामा |
| बारदेश | बारदेश | ८१ | ९९९२५ | ४८ | २६ | म्हापशें |
| पेडणें | पेडणें | ८७ | ३३३८८ | २७ | २१ | कसबे पेडणें |
| सांखळी | भतग्राम | ८७ | २९७२६ | ३० | १८ | ,, साखळी |
| सत्तर | सत्तर | १५७॥ | १७३१३ | ८५ | ६ | ,, व्हाळपै |
| सांगें | हेमाड बार्शें व अष्टाग्रहार | २९३ | १९६९६ | ५४ | १० | कसबे सांगें |
| फोंडें | अंत्रुज | ९१ | ४७३९५ | २८ | १७ | ,, फोंडें |
| केपें | चंद्रवाडी, बाळ्ळी व काकोडें | १२४॥ | २१२०९ | ४२ | १५ | ,, केपें |
| काणकोण | काणकोण | १२५ | १९४५१ | ११ | ६ | चावडी |

**आरोग्यरक्षण खातें:**—ह्या खात्याची रीतसर सुरवात इ स. १८४४ त झाली इ. स १९०४ सालाच्या सुमारास यांत जंतुविज्ञानशाळेची सोय झाली व त्यानंतर अगदीं अलीकडे पृथक्करणशाळा उघडण्यांत आली आजमितीस ह्या खात्यातर्फे पणजी येथें एक मिलिटरी हॉस्पिटल चालत असून, जंतुविज्ञान शाळा, रासायनिक पृथक्करण शाळा, सूतिकागृह या संस्था एकंदर अर्वाचिन साधनसामुग्रीसह जय्यत चालत आहेत गोव्यांतील वैद्यकीय पाठशाळा याच खात्यामार्फत चालते. तिचें वर्णन पुढें शैक्षणिक परिस्थितींत येईल. प्लेगची साथ उद्भवल्यावेळीं त्याची लस टोंचणें व देवी टोंचणें हें गोमंतकात सक्तीचें आहे घरें, गांवें, विहीरी, वगैरे स्वच्छ करून देणें, सांथीच्या वेळीं तत्शमनार्थ उपायांची लोकांना माहिती देणें व सांथीच्या प्रसारास हरएक उपायांनीं आळा घालणें, परमुलखातून येणाऱ्या प्रवाशांना तपासून ससर्गजन्य रोग नसलेल्यांनांच आत येऊं देणें, येणाऱ्यांचें सामान धुरी देऊन स्वच्छ करणें, इत्यादि कामें या खात्यामार्फत चालत असतात व त्यासाठीं प्रत्येक कोंसेल्याच्या मुख्य कचेरीच्या गांवीं एक एक असे अकरा, पणजी, कुळें, रेजमाग, डिचोली व वेळ्ळी येथें प्रत्येकीं एक, असे जादा पांच मिळून एकंदर १६ डाक्टर, प्रतिनिधि म्हणून ठेवले आहेत. खुद्द पणजीच्या हॉस्पिटलांत डायरेक्टरसहित सहा डॉक्टर, एक केमिस्ट व सुमारें ६० रुग्णपरिचारक असतात. सरकारी नोकरांची प्रकृति काम करण्याच्या लायकीची आहे किंवा नाहीं हें याच वैद्यानीं ठरवावयाचें असतें.

प्रारंभापासूनच आरोग्यरक्षण खात्याला प्रजेची सक्रिय मदत असल्यामुळें प्लेग, पटकी, देवी, इत्यादि साथींचा जोर गोव्यांत फारसा किंवा मुळीच दिसून येत नाहीं. प्लेग वगैरे सांसर्गिक रोगांत स्थलांतर किंवा इतर उपाय सरकार करतेंच आणि त्याला प्रजेकडून कोणालाच अडथळा न येतां, परस्परांच्या सहकारित्वानें सांथीचा नायनाट लागलीच होत असतो. गोमंतकीय वैद्यकीय पाठशाळेच्या पदवीधर डॉक्टरवर्गानेंही या कामीं महत्वाची मदत केली आहे. इकडचे पोर्तुगीज डॉक्टर सर्जरीच्या कामीं ब्रिटिश डाक्टरांइतके कुशल नाहींत, अशी एक समजूत प्रचलित आहे प्रस्तुत लेखकाला ती विश्वसनीय वाटत नाहीं. औषधोपचारात ते जगातील कोणत्याही डॉक्टरांना हार जाणार नाहींत. विषम किंवा टायफॉइडसारख्या दूषित तापात सांपडलेला रोगी जगणें कठीण, ही जी समजूत ब्रिटिश हिंदुस्थानांत प्रचलित आहे, तिचें गोमंतकीयांना आश्चर्यच वाटतें, इतक्या सुलभतेनें असले ताप हे डाक्टर बरे करतात. तूर्त साऱ्या गोमंतकांत मिळून १९२१ च्या शिर-

गणतीप्रमाणें २१६ डॉक्टर्स व ५७ केमिस्ट धंदा करतात. ह्या सरकारी हॉस्पिटलांत दरसाल सुमारें १२०० रोग्याना उपचार होत असतो. त्यांतून सुमारें अर्धी संख्या सरकारी नोकरांची असते. या शिवाय रायबंदरचें मिझेरकोर्दीचें हॉस्पिटल व मडगावचें ओस्पीसचे हॉस्पिटल अशीं दोन निराळीं आहेतच. मिझेरकोर्दीच्या हॉस्पिटलांत तीन डॉक्टर, १ केमिस्ट व सोळा रुग्णपरिचारक आहेत. दरसाल सुमारें सातशें रोग्यांनां उपचार करण्यांत येतात. मडगांवच्या ओस्पीसच्या हॉस्पिटलात सहा डाक्टर, एक केमिस्ट व तेवीस रुग्णपरिचारक आहेत. दरसाल सुमारें १००० रोग्यांना उपचार करण्यांत येतात. सामाजिक परिस्थितीचा विचार करताना स्वच्छतेची बाब येणार असली, तरी जातां जातां येथें एक गोष्ट सांगणें आवश्यक वाटतें व ती हीच कीं, सामान्यतः गोव्यातील शहरें व गांवें इतर ठिकाणच्या गांवापेक्षा कितीतरी विशेष स्वच्छ असतात. त्याचें कारणही बऱ्याच अंशीं आरोग्यरक्षण खात्याच्या परिश्रमांतच आहे.

सरहद्दीवर देण्यांत येणाऱ्या धुरीविषयीं व तपासणीविषयीं येथील सरकारावर गोमतकांत बाहेरून येणाऱ्या प्रवाशाचा एक प्रकारचा रोष दिसून येतो. वास्तविक पाहतां या आक्षेपांत मुळींच राम नाहीं. एका देशांतून दुसऱ्या देशांत जाणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला हा त्रास सहन करावाच लागतो. राजसत्ता भिन्न असल्यामुळें इकडे तो विशेष जाणवतो. परदेशांत जाणाऱ्या प्रवाशाची आगबोटीवर चढण्यापूर्वी मुबईंत जी तपासणी होते, ती अशाच प्रकारची असते. प्लेगदूषित जागेंतून येणाऱ्या इसमावर त्या तपासणीचा विशेष कटाक्ष असतो. वास्तविक धुरी दिल्याशिवाय कोणतेंही सामान सरहद्दीवरून आंत जाऊं नये असा कायदा आहे. परंतु व्यवहारांत मात्र त्याची सक्त अंम्मलबजावणी तशाच कारणाशिवाय होत नसते. आणि त्याचमुळें प्रवाशाच्या रोषास व थट्टेस हा विषय कारणीभूत झाला असावा.

**जमाबंदी खातें:**—पोर्तुगीजानीं हें खातें अव्वल अमदानींत देखील इतर खात्यांपासून बरेंच स्वतन्त्र ठेविलें असल्याचें आपण मागें पाहिलेंच आहे. इ. स. १८३५ पर्यंत या खात्याची व्यवस्थाही आपण मागें पाहिली. त्यासालीं झालेल्या घटनेप्रमाणें, ज्युत द फाझेंद हें मडळ मोडून त्या जागीं कोसिसांव द फाझेंद या नांवाचें तत्सम मंडळ बनविण्यांत आलें खरें, पण लागलीच १८३७ त ज्युत द फाझेंदाचें पुनरुथ्थान झालें, त्यांत गव्हर्नर प्रेसिडेंट, हायकोर्टेचे चीफ जज्ज, प्रोकुरादोर रॅजिउ, ( गव्हर्नरचे कायद्याचे सल्लागार व हायकोर्टांतील सरकारी वकील ) मुख्य खजीनदार आणि इस्पिक्त्हांव द फाझेंद ( जमाबंदी खात्याचा

चिटणीस ) इतके सभासद त्या मडळांत होते. ही व्यवस्था १८८८ सालापर्यंत चालली आणि कोंतादोरीयही त्याच सालीं नष्ट करण्यात येऊन त्या ऐवजीं रेपार्तिसाव द फाझेंद प्रोव्हिंसियाल नावाचें खातें निर्माण करण्यात आलें. त्यावरील मुख्याधिकाऱ्यास इस्पेक्तोर द फाझेंद ही संज्ञा मिळाली. खर्चाचीं कलमें पास करण्याचा अधिकार गव्हर्नरकडे संपविण्यात आला. दरम्यानच्या काळांत साऱ्या गोमंतकांत जमाबदीची एकच कचेरी गैरसोयीची असल्याचें दिसून आल्यामुळें, १८७९ सालीं, जजिरे गोवा, बारदेश, सासष्ट, पेडणें, साखळी, फोंडें व केंपें या कोंसेल्यांतून पणजीच्या मुख्य खात्याच्या हाताखालीं, "रेपार्तिसांव द फाझेंद कोंसेल्थीय" नांवाच्या, कोंसेल्यांतील जमाबंदी पोटकचेऱ्या निर्माण करण्यांत आल्या व तीच व्यवस्था १८८३ सालीं सांगें व काणकोण कोंसेल्यांतून करण्यांत आली या प्रत्येक कचेरींत एक मुख्य चिटणीस, एक खजीनदार व कामाप्रमाणें कमजास्त कारकून असतात. सासष्ट व बारदेश कोंसेल्यांत काम वाढल्याचें दिसून आल्यामुळें, १८९८ सालीं तेथे एका कचेरीऐवजीं दोन कचेऱ्या करण्यांत आल्या. पण पुढें १९०५ सालीं बारदेशची दुसरी कचेरी मोडण्यांत आली व १९०७ त सासष्ट येथेंहि दोहोंऐवजीं एकच कचेरी करण्यांत आली. इ. स. १८९७ सालीं सत्तर प्रातांत जमाबदीचें एक ठाणें ( Delegação ) उघडण्यांत आलें व इ. स. १९०२ सालीं डिचोली येथेंहि ज्यूडीशियल खात्याच्या व लोकाच्या सोयीसाठीं तसलेंच ठाणें उघडलें गेलें. १९०७ सालीं हीं ठाणीं मोडून त्यांच्या जागींही पोटकचेऱ्याच उघडण्यांत आल्या

वरिष्ट कचेरींतही या दरम्यानच्या काळांत बरीच महत्वाची घडामोड झाली. आजवर स्वतंत्र असलेली गोव्यातील जमाबंदीची व्यवस्था, १९०१ सालापासून पोर्तुगाल सरकारच्या हातीं गेली व मुख्य खजीनदाराची जागा कमी करण्यांत येऊन खजीनदारी "बांकु नासियोनाल उल्त्रामारीनु" या ब्यांकेकडे संपविण्यात आली. अर्थात्च मग मुख्य कचेरीऐवजीं प्रांताचें अदाजपत्रक इकडून जाणाऱ्या कच्च्या खरड्याप्रमाणें पोर्तुगालांत तयार होऊ लागलें. व तेथील कामगारांच्या सोयीसाठीं, इ. स. १९०३ पासून त्याची आकारणी रुपयाला ४०० रैस हा भाव धरून पोर्तुगालच्या नाण्यात म्हणजे रैसांत होऊ लागली. रिपब्लिकच्या अगोदरच्या काळांत जमाबदी खात्याचा कारभार, पणजीची मुख्य कचेरी व प्रत्येक कोंसेल्यातील एक एक मिळून अकरा व डिचोलीची एक अशा बारा पोटकचेऱ्यातून चालत होता.

**जमीनीवरील कर:**—इ. स. १८३५ सालीं कोमुनदादी व इतर वहिवाट-दार या कडून येणारा फोर व जुन्या काबिजादींतून वसूल होणारा "दीझिमुश" नांवाचा प्रत्यक्ष उत्पन्नावर ऐनजिनसी वसूल करण्यात येणारा दशमभाग, हेच कायते जमिनीवरील कर होते, हें आपण मागें पाहिलेंच आहे १८८३ सालीं दीझिमुश हा कर काढून टाकून त्या ऐवजीं तूर्त अमलात असलेला "देस्सिम प्रेदियाल" (जमीनीच्या उत्पन्नाच्या दशमाश) या नांवाचा कर जमिनीच्या नक्की उत्पन्नावर घेण्याचें ठरलें व त्याप्रमाणें प्रथम सासष्ट, बारदेश, जजिरेगोवा या तीन कोंसेल्यांत त्या ठरावाची अम्मलबजावणी झाली. इ. स. १८९८ च्या सुमारास सांखळी, पेडणें, काणकोण व केपें या कोंसेल्यात प्रेदियाल बसविलें जाऊन मुळचा कोमुनदादीचा फोर काढून टाकण्यात आला. दीझिमुशचा वसूल मक्तेदारामार्फत होई. ती पद्धति नष्ट करून हा नवा कर प्रत्यक्ष नाण्यात घ्यावयाची वहिवाट सुरू झाली. अलीकडे हा कर शें. १० ऐवजीं १२ टक्के आकारला जाऊ लागला आहे.

प्रत्येक कोंसेल्यात ज्युत फिस्काल दश् मात्रीझिश Junta fiscal das matrizes नांवाचें एक बोर्ड असतें ह्या बोर्डाचा अध्यक्ष आदमिनिस्त्रादोर दु कोंसेल्यु हा असून जमाबंदीच्या पोटकचेरीचा मुख्य चिटणीस हा चिटणीस असतो. म्युनिसिपालिटीनें निवडून दिलेले दोन सभासद व सरकारी वकील किंवा त्याचा प्रतिनिधि असे त्याचे सभासद असतात. खातेदाराचीं नावें दस्तऐवजां-नुसार न बदलल्यास त्याबद्दलच्या तक्रारींचा निकाल करणें, करांच्या आकारणी-विरुद्ध तक्रारी ऐकून त्याचा निकाल लवादामार्फत करणें व प्रेदियालचे फेरबदल सुचविणारे दोन इन्फोर्मादोर ( माहितगार ) नेमणें, हेंच या बोर्डाचें काम असतें. हे इंफोर्मादोर प्रतिवार्षिक किरकोळ फेरआकारणी सुचवितात. करांच्या आकार-णीविरुद्ध तक्रार करावयाची झाल्यास, तिचा निकाल लवादमार्फत होतो. लवादा-पैकीं कुळानें एक लवाद नेमावयाचा असून दुसरा जमाबंदी खात्यामार्फत नेमला जातो व सरपंचांची नेमणूक न्यायखात्यांतून होत असते. प्रेदियालाची जनरल फेर तपासणीची मुदत २० वर्षांची आहे. आकारणीच्या सालीं व्यवहारांत अस-लेल्या बाजारभावाप्रमाणें कराची रक्कम ठरत असल्यामुळें, कधीं कधीं त्यांत चुका राहतात. तथापि एकंदरींत ब्रिटिश सरकारच्या वहिवाटीपेक्षा आकार-णीची ही पद्धति पुष्कळच न्यायी असते यात संशय नाहीं.

**वसुलाचे हप्ते व पद्धति:**—सपलेल्या सालचें प्रेदियाल दुसऱ्या वर्षाच्या जानेवारीच्या अखेरपर्यंत कचेरींत भरावयाचें असतें. परतु कुळांच्या सोयीसाठीं

दहा रुपयावरील कर भरणाऱ्या खातेदारांना दोन हप्त्यांनीं सारा भरावयाची सवलत दिलेली आहे. पहिला हप्ता जानेवारी अखेर व दुसरा मे अखेर असे भरावयाचे असतात त्यांतही जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यांत कोंसेल्यांतील खजीनदारानें नेमलेले फिरते वसूलदार प्रत्येक गांवांत किंवा गांवाच्या गटात वसुलासाठीं जात असतात. दहा रुपयाखालचें खातें किंवा त्या वरच्या खात्यांतील पहिला हप्ता जानेवारींत भरला नसल्यास, त्यावर शेंकडा तीन प्रमाणें व्याजाची सहामाहीची एकदम आकारणी होते. मे अखेर न भरता राहिलेल्या प्रेदियालाच्या खातेदारांना जूनच्या पहिल्या आठवड्यांत भरपाईच्या सूचना (aviso) जातात. इतक्याहिउपर न भरणारांचीं नांवें गांवच्या रॅजिदोराकडे जातात व ही दुसरी सूचना देण्यांत येते. आणि त्या सूचनेनतरच खातेदाराला वसुलीखात्या-मार्फत दहा दिवसात भरणा करण्याचें समन लागू करण्यांत येतें. दहा दिवसांत खातेदारानें भरपाई न केल्यास, त्याच्या घरसामानाची किंवा जमिनीच्या एका वर्षाच्या उत्पन्नाची जप्ती पुकारण्यात येते. जप्तीचा विषय कोणता असावा हें खातेदाराच्या मर्जीवर अवलंबून असतें. मात्र हा निर्णय त्यानें समन लागू झाल्या-पासून दहा दिवसांच्या मुदतींत कळविला पाहिजे. पुढें जप्त केलेल्या वस्तूचा किंवा उत्पन्नाचा जाहीर लिलाव होतो. व त्यानें देखील भरपाई न झाल्यास ऐन जमीनच लिलांवास काढण्यासाठीं न्यायखात्यात कागद रवाना होऊन जमिनीचा लिलांव होतो. अशी ही वसुलाची पद्धत आहे.

**रिपब्लिक नंतरची घडामोडः**—रिपब्लिकच्या स्थापनेनंतरची पहिली घडामोड म्हणजे, मागें सांगितलेल्या अंदाजपत्रकाच्या पोर्तुगीज नाण्यातून झालेल्या आकारणीमुळें, प्रजेवर बसलेला शेंकडा सव्वाचौदा टक्याचा वाढावा होय. १९१३ सालीं युरोपियन अम्मलदारांनीं व लष्करी अम्मलदारानीं अशी तक्रार केली कीं, पोर्तुगीज नाण्याची पत पूर्वीपेक्षां वाढली असून रुपयाची किंमत ४०० रेसांऐवजीं ३२ रेसांवर आली आहे. अर्थात् त्या मानानें पोर्तुगालात ज्यांना पैसे पाठवावे लागतात अशा नोकरांचें नाहक नुकसान होत आहे. त्यासाठीं रुपयाची किंमत बाजारभावाप्रमाणें धरून त्याना पगार देण्यांत यावा. अंदाजपत्रक पोर्तुगीज नाण्यांत होतें व त्याचा बटवडा तत्कालिन हुंडणावळीप्रमाणें धरल्यास त्यात तिजोरीचें नुकसान निश्चित ठरलें होतें. तत्कालिन गव्हर्नर कौसेर दा कोश्त यांनीं त्या तक्रारीस प्रारंभी किंमतच दिली नाहीं. परंतु मागाहून तक्रारी ऑफीसरानीं संपाची तयारी केली. तेव्हा रुपयाची किंमत ३५० रैस धरून पगार-वांटणी करण्यांत आली अर्थातच पूर्वीच्या १०० रुपयाऐवजीं आतां ११४८४८७ देणें भाग झालें.

दुसरी महत्त्वाची घडामोड म्हणजे, प्रांतिक स्वायत्ततेमुळें उत्पन्न झालेलें "आवदीतोरीय फिस्काल" नांवाचें ऑफिस होय. स्वायत्ततेच्या कायद्यामुळें जमाखर्चाच्या बाबतीत पोर्तुगीज हिंदुस्थान स्वतंत्र बनलें व जमाबदी खात्याची पुनर्घटना होऊन तिच्या अन्वयें 'दिरेक्सांव दुश सेव्हींसुश द फाझेंद' हें नांव त्या खात्याला मिळून जमाखर्चाच्या बाबी निश्चित झाल्या. त्याच्या कायदेशीरपणा-बद्दल व योग्यायोग्यतेबद्दलचा निर्णय देण्याचा अधिकार उपरोक्त आवदितोरीकडे सोंपविण्यात आला. मागाहून बऱ्याच फेरफारानतर हा अधिकार कांहीं अंशीं मागें सांगितलेल्या त्रिबुनाल आदमिनिस्त्रातीव्ह फिस्काल ई दश कोंतश या मंडळाकडे व कांहीं अशीं पोर्तुगालच्या वसाहत मंडळाकडे जाऊन १९२६ सालीं आवदी-तोरीय हें खातें नष्ट करण्यांत आलें.

करांच्या बाबतींत, इ. स १९१६ सालीं सागें व फोर्डे कोसेंल्याना प्रेदियाल लागू करण्यांत आलें व पूर्वकालीन कागदपत्रावरून तेथील "फोर" प्रेदियाला-च्याच स्वरूपाचा ठरल्यामुळें तो रद्द करण्यांत आला.

पोटकचेऱ्यांपैकीं डिचोलीची पोटकचेरी काढून टाकण्यात आली व सत्तर प्रांतांत १८९८ सालाप्रमाणें जमाबंदीचें ठाणेंच राखण्यांत आलें.

**सरकारी जमाखर्चः**—सरकार सल्लागार मडळाच्या जानेवारींतील बैठकींत जमाखर्चाचें अदाजपत्रक चर्चेस येत असतें. हिशेबी साल जुलई तें जूनचें धरतात. १९२७ ते १९२८ ह्या सालीं पोर्तुगीज हिंदुस्थानचें एकंदर उत्पन्न ५२,६४,६४७ रुपये होतें. उत्पन्नाच्या मुख्य मुख्य बाबी खालीं दिल्या आहेत आंकडे हजारांचे आहेत.

| | | |
|---|---|---|
| प्रेदियाल ( जमीन महसूल ) | | ५५८ |
| फोर ( कोमुनदादी वगैरेकडून येणारा जमीनीचा मालकी हक्क ) | | १६९ |
| व्याजावरील शें. १२ टक्के कर | | ११९ |
| स्टांप | | ५५४ |
| ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी | | १५५ |
| अबकारी उत्पन्न | | १०१२ |
| नारळीची सूर काढण्याचे परवानें, झाडामागें १० रु प्रमाणें | ५६० | |
| दारू गाळण्याचे परवाने | १४४ | |
| गुत्त्याचे परवाने | ११९ | |
| दमण व दीव येथील महुडाव खजूर इत्यादि दारू गाळण्याचा फायदा | १८९ | |
| जकातीचें उत्पन्न | | १७५० |

| | |
|---|---|
| आयात | १६८९ |
| निर्गत | ६१ |
| खास सरकारी जमिनीचें उत्पन्न ( जप्त झालेलीं देवालयें ग्रामसंस्था इत्यादिकांतून ) | ११८ |
| जंगलाचें उत्पन्न | ११७ |
| तार व टपाल खातें | १३४ |
| परदेशगमनावरील डोईपट्टी माणसीं १० आणे | ४७ |

खर्चाचें कोष्टक १९२९ ते १९३० सालच्या अंदाजपत्रकांतून घेतलें आहे.

| अंदाज पत्रकांतील कलमें. | | विल्हेवारी | रक्कम. रु | खर्चाशीं शेंकडा प्रमाण. |
|---|---|---|---|---|
| क. १ लें | १ | सिव्हिल कारभार, गव्हर्नरचा पगार, मुलकी अंतरव्यवस्था, सरकारी प्रेस वगैरे | २९०९१३ | ५·३ |
| | २ | शिक्षण पोटखातें | ३५१७३१ | ६·३ |
| | ३ | आरोग्यरक्षण खातें | २७१६१५ | ४·८ |
| क. २ रें | १ | जमाबंदी खातें | २२२१५३ | ३·९ |
| | २ | जकात खातें | १५२०९५ | २·८ |
| क. ३ रें | | न्यायखातें | ३०६१४१ | ५·५ |
| क. ४ थें | १ | पब्लिक वर्क्स व रेल्वेची देखरेख | ४३१६५२ | ७·८ |
| | २ | तार टपाल | २१०५७८ | ३·८ |
| | ३ | शेतकी व जंगल | १७१८७२ | ३·० |
| | ४ | जमीन व मोजणी | ६००१० | १·० |
| क. ५ वें | १ | खडें लष्कर | ९१४९०९ | १६·३ |
| | २ | पेन्शनर लष्कर | ३९६३७२ | ७·१ |
| क. ६ वें | | नाविकखातें | ९९२०२ | १·८ |
| क. ७ वें | | अवांतर खर्च | १६१९०० | २·८ |
| क. ८ वें | १ | पोर्तुगाल सरकारांतील कलोनियल ऑफीसर | ३४७४५ | ०·७ |
| | २ | सिव्हिल पेन्शनर | ४३१२७५ | ७·८ |
| | ३ | जनरल खर्च | २७२२०४ | ४·८ |
| क. ९ वें | | कर्जफेड | २०५२०४ | ३·६ |
| क. १० वें | | मागील खर्चाचीं कलमें | २५००० | ०·४ |
| | | एकूण खर्च | ५००९४२१ | ८९·५ |

१९२९-३० सालच्या अंदाजपत्रकात जमेच्या बाजूस संपलेल्या सालांतील शिल्लक ३,३२,१३० रुपये हिशेबीं धरली होती त्यामुळें एकंदर उत्पन्न ५५,९६,७४६ ठरलें होतें त्याचीच वरील टक्केवारी आहे. अर्थात् खर्च वजा जातां १९२९-३० सालीं पूल, रस्ते, इत्यादि लोकोपयोगी कामांसाठीं ५,८७,३१५ रुपये राखतां आले आहेत.

**विशेष महत्वाच्या बाबीः—**सरकारी करांची रचनाच अशा प्रकारची असते कीं, प्रत्यक्ष करापेक्षां अप्रत्यक्ष करच विशेष असतात. वसुलाची पद्धति कमी जाचाची आहे. एकंदर उत्पन्नाच्या मानानें जमीन महसूल शेंकडा १·७ आहे. प्रेदियालाच्या थकलेल्या बाकीबद्दल कुळाला व्यक्तिशः मुळींच जबाबदार धरण्यात येत नाहीं. प्रेदियालाबद्दल जमीन विकून गेली असूनही त्याची बाकी राहिल्यास कुळाला पुढें त्रास नसतो सरकारी जमाखर्चांतील जगलविक्री व खास जमिनीचें उत्पन्न सोडल्यास माणशी फक्त सरकारी कराचें प्रमाण ९८७८३ पडतें. आणि त्यांत मुनिसिपालिट्या व मुरगावचा पोर्टट्रस्ट यांचें उत्पन्न भरीस घातल्यास हेंच प्रमाण माणशीं १०८२ पडतें.

**रेजीश्त सिव्हिलः—**हें पोटखातें अंतर्गत मुलकी व्यवस्थेच्या खात्यातून चालतें. जन्म, विवाह व मृत्यू याची नोंद याच खात्यामार्फत होत असते. मूल जन्मल्यापासून तीस दिवसाच्या आत त्याची नोंद न केल्यास आईबापाना दंड होतो. या नोंदणीबद्दल आठ आणे फी द्यावी लागते. मृत्यूच्या नोंदीस ४ आणे फी पडते. मृत्यूच्या नोंदीस डाक्टरचा दाखला लागतो, परंतु डाक्टर नसलेल्या गांवीं रॅजिदोराच्या दाखल्यावर भागतें. तसेंच रजिश्त सिव्हिलचा अधिकारी दूर असल्यास मृत्यूची नोंदही रॅजिदोरकडेच करतां येते आणि तशी ती केल्याशिवाय अंत्यसंस्कार करिता येत नाहींत विवाहाच्या बाबतींत लागणारे एकंदर सरकारी संस्कार होईतोंपर्यंत सुमारें ८।१० रुपये खर्च येतो. सरकारमार्फत विवाह रजिस्टर झाल्याचा दाखला हातीं आल्याशिवाय धार्मिक विधि करता येत नाहींत. केल्यास वधुवरांबरोबरच धर्माधिकाऱ्यालाही दंड होतो वधुवराचें वय १८ व २१ असावें लागतें. ख्रिस्तीतरांना मात्र वयाच्या बाबतींत सवलत असते. सांगें, सत्तर व काणकोण या कोंसेल्यांत प्रजेच्या हलाखीच्या स्थितीस अनुसरून ही फी अर्ध्यावर आणून ठेविली आहे. सरकारी रजिस्त सिव्हिलमध्यें जें नांव बार झालें असेल तेंच खरें नांव, असें कायद्यासमोर ठरतें व तें बदलावयाचें असल्यास, जज्ज साहेबांसमोर बरेच विधि करावे लागून, सरकारी ग्याझेटचर गव्हर्नरच्या मार्फत बदलावें लागतें व या कामीं प्रत्येक व्यक्तीला सुमारें

तीस पस्तीस रुपये खर्च येतो. मात्र हिंदुस्त्रियांना पतिगृहीं जीं नावें मिळतात त्यांना ही भानगड लागू नसते. साऱ्या गोमंतकांत ह्या सिव्हिल नोंदणीच्या ६२ कचेऱ्या आहेत.

**जकात खातें:**—ह्या खात्याचा उगम गोव्यांत फार प्राचीन काळीं झाला होता. कदंब जयकेशी याच्या कारकीर्दीत ( म्हणजे १०५४ इ. च्या पूर्वी ) गोवें शहरांत आयात निर्गत मालावर शेंकडा ६ टक्के जकात घेण्यात येत होती, असा नदीनगरच्या ताम्रपत्र्यांत उल्लेख आहे. मोतीं, रत्नें, सोनें, रुपें आणि घोडे, यांना मात्र अपवाद होता. जकातीच्या कचेरीला त्यावेळीं माडवी म्हणत व तेंच नाव जकातीच्या नाक्याजवळच्या नदीस मिळालें. इ. स. १५४१-१५४२ त जकातीचें उत्पन्न मक्त्यानें देण्यांत येई व त्या मक्त्याची रक्कम त्यावेळीं २५००० असर्फ्या येत होतें. मुख्य कचेरीशिवाय पणजी, धावजी, भाणस्तार, अधशी, नावें, सांतेती व चोडण हीं नाकीं असत.

पुढें ही नाकीं निराळीं झालीं व १५९४ त फक्त मुख्य कचेरीचें उत्पन्न १,८९,४८० असर्फ्या होण्याइतका गोवें शहरचा व्यापार वाढलेला होता.

पुढें सासष्ट व बारदेश प्रांत हातीं येतांच त्यातही नाकीं निर्माण करण्यात आलीं व नव्या काबिजादीच्या भरीनें ह्या नाक्यांत घाटांतील बैल लमाणाच्या वाहतुकीवर जकात घेण्यासाठीं, तिनई, केशी, दिगी, खडळ, दोंकोपें, रामघांट, मावळींगे, केळघांट, परवर, धामेगड व तेलघाट हीं नाकीं स्थापण्यांत आलीं. यातून पूर्वीच्या राज्यकर्त्यांच्या ठरावाप्रमाणें जकात घेण्यात येई व तिचें उत्पन्न पूर्वकालीन राजांनी आपल्या सरदारांस इनामादाखल दिल्यामुळें, त्यांना व देवळांनां देण्यांत येई शिवाय फोंडेंच्या जकात नाक्यावर देवालयांच्या ५० बैलांच्या लमाणास जकात माफी असे.

पोर्तुगीज राजवटींत जकातीच्या दरांत पुष्कळदां फेरफार झाले. पैकीं सुरुवातीस इ स. १५६८ ते १५७० पर्यंत जकातींचा दर ६ टक्यांवरून सात टक्यांवर गेला व वाढलेल्या एका टक्याचें उत्पन्न तारवें बांधण्यास गोव्याच्या सीनेटला ( म्युनिसिपालिटीला ) मिळावें असें ठरलें होतें. नतर हॉलंडशीं चाललेल्या युद्धाच्या काळीं युद्धखर्चाची तरतूद करण्याकरतां हा कर वाढवून ९ टक्के करण्यात आला. त्यापैकीं सीनेटला तीन टक्के देऊन सरकारनें आपल्याला ६ टक्केच राखले होते. १७२४ त जकातीचा दर उतरून ९ चा पांच टक्यांवर आणला गेला. परंतु त्याची वांटणी मात्र इ. स. १७४४ पर्यंतच पूर्वीप्रमाणेंच

दोहोंस १ या प्रमाणांत सरकार व म्युनिसिपालिटीमध्यें होऊं लागली. पुढें त्या सालापासून ही वांटणी आठांस एक या प्रमाणांत करण्याचें सरकारनें ठरविलें.

इ. स. १८४० त जकात कचेऱ्यांची संख्या १० ऐवजीं पणजी, असोळणें व कायसूव येथें बंदरी कचेऱ्या आणि साखळी व सांगें येथें खुष्कीच्या कचेऱ्या मिळून पांचावरच आली. १८४१ त दोडोमार्ग येथेंही नवी खुष्कीची कचेरी उघडण्यात आली.

इ. स. १८७८ त इंग्रजी सरकारकडे अबकारीचा करार करण्यांत येऊन खुला व्यापार सुरू झाल्यामुळें, १८९२ पर्यंत जकातीची माफी होती

१८९२ सालीं करार संपताच पुनः जकातीचा उगम झाला व १८९४ सालीं त्या खात्याचें रीतसर उद्घाटन झालें. नंतर १८९५ व १८९६ सालीं त्यात थोड्या दुरुस्त्या होऊन इ स. १९१७ सालीं प्रांतिक कौन्सिलाकडूनही त्यांत थोडे फेर-फार झाले.

आज १ पणजीची मुख्य कचेरी, २ मुरगांवची कचेरी, ३ कुळेंची कचेरी अशा तीन कचेऱ्या असून पणजीच्या कचेरीच्या हाताखालीं दोडोमार्ग, सांखळी, सांवरजूल व कायसूव, अशा ४ पोटकचेऱ्या व २३ नाकीं आहेत. मुरगांवच्या कचेरीच्या कक्षेंत, तर्पण व बेतूल या पोट कचेऱ्या असून १२ नाकीं येतात व कुळ्यांच्या कचेरीच्या हाताखालीं मळें येथील पोट कचेरी असून पाच नाकीं आहेत सर्वांवर मुख्य कचेरीचा अधिकार चालतो. दमण व दीव येथील कचेऱ्या देखील पणजीच्या मुख्य कचेरीच्याच अधिकारमर्यादेंत येतात.

जकातीचें स्वरूप संरक्षण पद्धतीचें असून तिचा आयातीवरील, दर १४ पासून २० टक्क्यांपर्यंत असतो. निर्गत मालावर जी जकात घेण्यात येते, तिचे दर सामान्यतः केवळ निर्गत मालाची नोंद व्हावी एवढ्याच हेतुसिद्धिपुरते असतात कच्चा माल, उत्पादक यंत्रें, शेतकीचीं आऊतें, खतें याना जकात माफ आहे. आयात जकातीची आकारणी, कांहीं मालावर नगाप्रमाणें, तर काहीं मालावर किंमतीप्रमाणें करण्यांत येत असते. थोडेसे अपवाद गाळले तर, धातूचे जिन्नस, वस्त्रें, अन्नसामुग्री व जनावरें, यांची जकात आकारणी नगावरून किंवा वजनावरून होते व इतर कलाकौशल्याचे जिन्नस व यन्त्रें यावरील जकात किंमतीवरून घेण्यांत येते. जकातीचें उत्पन्न दमण व दीवचाही समावेश केल्यास सुमारें १९ लक्ष होतें.

**तार व टपाल खातें:**—टपलाच्या ने आणीस १७९८ सालीं सुरुवात झाली. त्यापूर्वी पोर्तुगालशीं होणारा पत्रव्यवहार अवाशाकडून पाटविलेल्या पत्रांतून व जहाजावरून होत असे. पोर्तुगालला पाठवावयाच्या पत्राना चार वौताव्ह (अर्ध औंस) पर्यंत ८० रेंस (सुमारें ६ आणे) व पुढें दर पाव औंसास ४० रेंस ( सुमारें तीन आणे ) पडत. मोझांबिक, मकाव, दमण व दीवला हे दर ५० रेंस (२ आणे) व २५ रेंस (आणा) असे होते.

इ. स. १८२२ त ब्रिटिश सरकारशीं पोस्टल करार होऊन, गोवें, बेळगाव व मालवण यांच्या दरम्यान टपालचें रीतसर दळणवळण सुरू झालें व १८२३ त टपाल खात्याची कायद्यानें स्थापना झाली. पत्रांचे दर ब्रिटिश सरकारनें आपल्या हद्दींत पत्र जेथें जावयाचें त्या ठिकाणच्या अतराप्रमाणें कमीजास्त ठरविले होते. परंतु त्या दरांशिवाय एक रुपया भाराला अर्धी असर्फी व पुढें प्रत्येक रुपया भारास अर्धी असर्फी, असा आणखी चार्ज पोर्तुगीज हद्दींत द्यावा लागत होता. ३६ रुपये भारावरचीं पत्रें घेण्यात येत नव्हतीं. सन १८३८ त वेंगुर्लें येथून पत्रांची ने आण होऊं लागली आणि पोर्तुगाल व गोवें या दरम्यान आलेक्झांड्रिया मार्गें टपालाचा व्यवहार पद्धतशीरपणें सुरू झाला इ. स १८५७ त दीवचें टपाल नियमितपणें चालू झालें. प्रारंभीं महिन्यांतून दोनदाच टपाल जाई. पुढें १८५९ त तीन खेपा, १८६२ त चार व १८६५ मध्यें महिन्यांतून पाच खेपा टपाल जाऊं लागलें १८६८ त ब्रिटिश हद्दीचें टपाल रोज सुरु झालें. इ स. १८७१ त पहिल्यानेंच पोस्टल स्टँप उपयोगात आले. मूळचे स्टाप पोर्तुगालहून छापून येत व १८७७ त ते गोव्यातच तयार होऊं लागले. इ.स. १८७४ त बर्नच्या काँग्रेसमुळें पोर्तुगालचा समावेश जागतिक टपालसंघांत झाला व टपालाची सारीच व्यवस्था सुधारली गेली. दमणला इंग्रजी पोस्ट कचेरी होती ती १८८४ त बद होऊन पोर्तुगीज कचेरी उघडण्यांत आली व गोव्यांतील नद्यांतून स्टीम लॉंच मधून सांवर्डेपर्यंत टपाल दररोज जाऊं लागलें. त्याच सालीं पार्सलाची ने आण टपाल मार्फत सुरू झाली. एक पैशाचें एक व एक आण्याच्न एक अशा कार्डांची सुरुवात इ. स. १८९२ सालीं झाली. इ. स. १९०२ व १९१५ सालींही टपालाच्या व्यवस्थेंत हरीच सुधारणा झाली व शेवटीं १९२० सालीं पुष्कळच नवीं आफिसें उघडण्यात येऊन बटवड्याची व्यवस्था सुधारली गेली.

**टेलिग्राफ व टेलिफोन:**—इ स. १८४३ सालीं सूर्यकिरणांच्या योगानें पणजी, रोज्माग, आग्वाद व काब यांमध्यें संदेश नेण्याची सुरुवात झाली. पुढें

१८५८ सालीं वेंगुर्ले मार्गानें बेळगांव शहर पणजीस जोडणारी तार घालून ब्रिटिश सरकारनें ती स्वतःच्याच हातीं ठेविली. १८७३ सालीं पणजीचें ऑफीस बंद करण्याचा विचार झाला होता परंतु पोर्तुगीज सरकारनें त्याला अडथळा करून ही सोय कायम ठेवण्यासाठीं ब्रिटिश सरकारला १६३८ असफ्यांची ग्रँट देण्याचा करार केला नंतर १६३८ असफ्यांऐवजीं तेवढेच रुपये देण्यांत येऊं लागले. आणि १९११ सालीं, फक्त ऑफिसाच्या भाड्यासाठीं शंभर इरूद म्हणजे सुमारें २५० रुपये अंदाजपत्रकांत मंजूर होऊन ग्रँट बंद करण्यांत आली. यानंतर डब्ल्यु. आय. पी रेल्वेनें तारेची सोय दर स्टेशनवर केली व पणजीचें ब्रिटिश ऑफीस कुठ्ठाळ मार्गानें मुरगावच्या रेल्वे स्टेशनला जोडण्यात आलें

अद्याप पोर्तुगीज सरकारचें तारखातें सुरू झालें नव्हतें, तें दादा राण्याच्या बंडामुळें १८९८ त सुरू होऊन पणजी, फोंडें, वाळपै व सांखळी अशीं ४ ऑफिसें उघडलीं गेलीं. आरंभीं तारखात्याचा कारभार पब्लिकवर्क्स खात्यांतून पोट-खात्याच्या रूपानें चालत होता व पणजी शहरापुरती टेलिफोनची व्यवस्था १८९३ तच सुरू झाली होती, ती देखील पब्लिकवर्क्स खात्यामार्फतच चालत होती.

इ. स. १९१६ सालच्या ( नं. २८४२ ता. १९ नवंबर ) कायद्याप्रमाणें तार व टेलिफोन हीं खातीं टपालखात्यास जोडण्याचा ठराव होऊन १९१९ त तो अमलांत आला. दरम्यानच्या काळात तार व टपाल आफिसांची संख्या वाढतच होती. इ स १९२५ सालीं ब्रिटिश सरकारचें पणजींतील ऑफिस पोर्तुगीज सरकारच्या हातीं आलें व दीव आणि दमण येथें तार ऑफिसें उघडण्यांत आलीं.

तूर्त साऱ्या गोमंतकांत ७२ सरकारी पोस्ट ऑफिसें आहेत. त्यांपैकीं ३४ ऑफिसांतून तारेची व्यवस्था आहे. शिवाय रेल्वे लाइनीवर एक फिरतें पोस्ट ऑफिस असतें.

हिंदुस्थानांतल्या पत्रास १५ ग्रामापर्यंत अर्धा आणा व कार्डास एक पैसा पडतो; वर्तमानपत्रास गोव्यांतल्या गोव्यांत १ पै व हिंदुस्थानांत अर्धा पैसा; पोर्तुगाल किंवा इतर पोर्तुगीज मुलखात, पत्राला दीड आणा, कार्डाला पाऊण आणा व वर्तमानपत्रांस अर्धा पैसा; जगांतील इतर ठिकाणीं पत्राला अडीच आणे

व कार्डाला दीड आणा असे पोस्टाचे दर आहेत. रजिस्टर पत्रांना दोन आणे जादा तिकिट लागतें.

पोर्तुगीज ऑफिसांतून गोव्यांतल्या गोव्यांत तार पाठवायला बारा शब्दांस आर्डिनरी आठ आणे व अर्जंट १ रुपया पडतो आणि ब्रिटीश हद्दींत पाठवायचा तारेला किंवा रेल्वे स्टेशनातून जाणाऱ्या तारेला ब्रिटीश दर लागू पडतात.

तार व टपालखात्यामार्फत ज्या मनिआर्डरी येतात, त्याचे पैसे किंवा व्ही. पीचा बटवडा पोस्टमनमार्फत करण्याची वहिवाट गोव्यात नाहीं. मनिऑर्डरीचे पैसे घेण्यास मालकानें कोंसेल्याच्या रेसेबेदोरींत जावें लागतें व व्ही पीचें पार्सल किंवा पत्र वगैरे मालकानेंच पोस्ट ऑफिसांत स्वत· जाऊन आणावें लागतें

पोस्टल सेव्हिंग ब्यांकेला सुरुवात इ. स. १९१६ त झाली असून १९२७ सालीं त्यांत २३,१८,४९९ रुपये शिल्लक होते.

**पब्लिकवर्क्स खातें:**—ह्या खात्याचे डायरेक्टर सिव्हिल इंजिनिअर असतात. पगार ४१२ हजार व सामान आणि बांधकामासाठीं ४४० हजार एवढा खर्च दरसाल ह्या खात्याप्रीत्यर्थ होत असतो. त्यांत दोन इंजिनियर्स व ६ ओव्हर्सीयर्स असतात. इतरत्रप्रमाणें इकडेही ह्या खात्याविरुद्ध प्रजेंत ओरड आहे. तरी पण थोडेसे अपवाद खेरीज केल्यास, रस्ते, पूल वगैरे बांधकामें बरींच समाधानकारक असतात. रिपब्लिकच्या स्थापनेपासून आजवर केंपें, सांगें, सांखळी, डिचोली व भाणस्तार येथील लोखडी पूल, पणजीचें सूतिकागृह, मडगांव व पणजीचीं हॉस्पिटलें, इत्यादि बऱ्याच महत्वाचीं कामें या खात्यामार्फत झालीं आहेत. तूर्त नेरीचा पूल व उसगावचा पूल हीं दोन कामें चालतात. इ. स. १८७० सालीं बांधलेला खडेपारचा ल्याटरॉइट दगडाचा पूल याच खात्यामार्फत बांधला गेला होता, तो फारच मजबूत व प्रेक्षणीय आहे.

**जमीनमोजणी व शेतकी:**—ह्या उभय खात्यांची स्थापना अगदीं अलीकडची आहे. त्यांपैकीं जमीन मोजणी खातें इ स. १९०३ सालीं स्थापन झालें असून त्याच्यामार्फत तूर्त गोमंतकाची सर्व्हे चालत आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या मोजणीपेक्षां ह्या सर्व्हेची पद्धत जरा विशेष कसोशीची व पद्धतशीर असल्यामुळें मोजणीचें काम रेंगाळत चालतें. सर्व्हे नंबरांच्या नकाशावरून गांवचा नकाशा, मग कोंसेल्याचा व शेवटीं गोमंतकाचा नकाशा, असा याचा क्रम आहे.

व त्यासाठीं गोमंतकाचें त्रिकोणमापन करून गावानिहाय थिओडोलाइटनें लहान लहान बहुकोण ( Polígonos ) पाडून त्यातून टेबल मोजणीच्या द्वारें सर्व्हे नंबराचा नकाशा काढण्यांत येतो. आजवर फोंडें, तिसवाडी, सांखळी, वगैरे कोंसेल्यांची मोजणी झाली असून इतरत्र चालू आहे. तसेंच शेतीसाठीं नवी जमीन लागवडीस देण्याचें काम याच खात्याकडे असतें. खात्याचे डायरेक्टर सिव्हिल इंजिनियर असावे लागतात.

शेतकी खातें तर रिपब्लिकच्या स्थापनेनंतर सुरू झालें असून त्यांतून बऱ्याच ठिकाणीं प्रयोग चालत आहेत. नवीन खतें व औतें यांचा प्रसार अद्याप ह्या खात्यांतून म्हणण्याजोगा झालेला नाहीं. शेतकीचे प्रयोग बरींच वर्षे करून पाहिल्यानंतरच त्यांची उपयुक्तता लोकांस पटत असते. त्यामुळें तूर्त तरी ह्या खात्याविषयीं सर्वत्र ओरडच आहे. परंतु आपल्या हातीं असलेल्या फॉरेस्ट खात्यांत, सागाची, रबराची वगैरे लागवड ह्या खात्यानें चालविली आहे व तींत बरेंच यश मिळविलें असल्याचें रिपोर्टांवरून दिसून येतें. खात्याचे डायरेक्टर शेतकी इंजिनियर असून तूर्त त्यात आणखी तीन इंजिनियर, एक पशुवैद्य व ४ बी. एजी. काम करतात

**म्युनिसिपालिट्याः**—पोर्तुगीज अमलापूर्वीं म्युनिसिपालिट्याचें कामही कोमुनदादींच्याच हातून होत होतें. ही संस्था हिंदुस्थानात प्रथम पोर्तुगीजांनींच आणली. सुरुवातीला पणजीची म्युनिसिपालिटी ( पूर्व काळात गोवें शहरांत आल्बुकेर्कनें स्थापन केलेली सैनाद द गोअ ) स्थापन झाली. नंतर क्रमाक्रमानें इतर कोंसेल्यांतही म्युनिसिपालिट्या स्थापन झाल्या. गोमंतकांतील म्युनिसिपालिट्याची रचना कांहींशी लोकल बोर्डांच्या धर्तीची आहे. इ. स. १९१९ पर्यंत जुन्या काबिजादींतल्या तीनच म्युनिसिपालिट्या केवळ लोकनियुक्त अशा होत्या, व बाकीच्या कोंसेल्यात दोन सरकारनियुक्त सभासद व आदमिनिस्त्रादोर अशा तीन मेंबरांची म्युनिसिपल कमिटीच काम करी. त्याचा अध्यक्ष आदमिनिस्त्रादोर होता. प्रांतिक स्वायत्ततेच्या हक्काबरोबरच साऱ्या म्युनिसिपालिट्या लोकनियुक्त बनल्या. खालील कोष्टकावरून त्यांची रचना व जमाखर्च यांची माहिती मिळेल.

| नाव | सभा-सद | उत्पन्न | खर्च | म्युनिसिपालिटी किंवा कमिटी केव्हां स्थापन झाली. |
|---|---|---|---|---|
| पणजी | ९ | ८०९७० | ८०९७० | गोवें घेतल्यानंतर लागलीच |
| बारदेश | ६ | ६०४५१ | ६०४१४ | इ. स. १७७८ च्या सुमारास |
| सासष्ट | ९ | ३४०५६ | ३७७६१ | ,, ,, ,, ,, |
| मुरगाव | २ | | | (तूर्त मुरगाव सुधराई कमिटीमार्फत काम चालतें ) १९१७ |
| पेडणें | ३ | ८१९४ | ७५०४ | ९ फेब्रुवारी १८८१ |
| साखळी | ३ | ९१०१ | ८८८६ | ,, ,, |
| सत्तर | २ | ५६३१ | ५६११ | १० डिसेंबर १९०९ |
| फोंडें | ३ | १७९८१ | २२२२३ | २२ मार्च १८८१ |
| सांगें | ३ | ९१८८ | ८२६६ | १८ फेब्रुआरी १८८१ |
| केपें | ३ | ६७२९ | ६७२५ | २१ डिसेंबर १८४९ |
| काणकोण | ३ | ४८४५ | ५०६० | ३१ मार्च १८८१ |

सर्व म्युनिसिपालिट्यांचे अध्यक्ष मेंबरांनींच आपल्यापैकीं वार्षिक निवडणुकीनें निवडावयाचे असतात. सत्तर कोंसेल्यांतील म्युनिसिपालिटीचें अध्यक्षस्थान मिलिटरी कमांडरकडे असतें.

म्युनिसिपालिट्यांच्या उत्पन्नाच्या बाबी म्हणजे जकात व जमीन महसुलावर आडीशिनल कर, वजनें मापें तपासणीचा कर, दुकानें, धंदेवाले, कारागीर व वाहतुकीचीं साधनें यांची लायसेन्सफी, सूर येणाऱ्या नारळीच्या झाडावर कर, सर्पण व

इमारती लाकडावरील कर, मांसविक्रीवर दर रत्तलीं कर, फेरीवाल्यांवर कर, नद्यांवरील तरींचें उत्पन्न, इत्यादि होत. गोव्यांत तरींची सख्या बरीच असून एक दोन अपवाद सोडल्यास साऱ्या तरी म्युनिसिपल आहेत. या उत्पन्नाखेरीज कोंसेल्यांतील रस्ते बांधण्यासाठीं, करभरूच्या सोयीप्रमाणें प्रत्यक्ष मजुरीच्या रूपानें किंवा मजुरीचा निरख असेल त्याप्रमाणें प्रत्यक्ष नाण्यांत, माणशीं दोन दिवस मजुरीची डोईपट्टी घेण्यांत येते. खर्चाच्या बाबी इग्लिश लोकल बोर्डांप्रमाणेंच असतात. मात्र सबअसिस्टंट सर्जनच्या दवाखान्यांतील खर्च व प्राथमिक शिक्षकाचा पगार हा खर्च इकडच्या म्युनिसिपालिट्यांना लागत नाहीं. खेरीज आदमिनिस्त्रासांव दु कोंसेल्यु या कचेरींतील खालच्या नोकराचा पगार व पेन्शन, (आदमिनिस्त्रादोरचा भत्ता सरकारी तिजोरींतून मिळतो) शहरांतून व प्रसिद्ध खेड्यांतून दिवाबत्ती, दुरुगांची डागडुजी, रेजिस्त सिव्हिलची कचेरी, सरकारी इमारती नसतील तेथें आदमिनिस्त्रासाव व न्यायकोर्ट यांना जागा देणें, रजिस्ट्रारच्या कचेरीची जागा देणें, प्राथमिक शिक्षकांना घरभाडें देणें इत्यादि खर्चाच्या बाबी असतात. क्वचित् ठिकाणीं म्युनिसिपालिटीनें डाक्टर ठेवलेला असून बऱ्याच म्युनिसिपालिट्यांनीं सुइणी ठेवल्या आहेत.

म्युनिसिपल निवडणुका द्विवार्षिक असतात. प्रत्येक मेंबरास बदली मेंबरही निवडला जात असतो. निवडणुका वॉर्डवार विभागणीनें न होतां, एकाच पूर्ण मतपत्रिकेंत साऱ्या मेंबराचीं व बदली मेंबरांचीं नांवें घालून गुप्त मतदान पद्धतीनें होत असते.

**लष्करी खातें:**—अतर्बाह्य शत्रूपासून गोमंतकाचें रक्षण करण्यासाठीं ४ इंची ४ तोफा, ६ हलक्या जलदबाऱ्या, २८०० पायदळ व ५७ ऑफीसर इतका सरंजाम गोव्याच्या लष्करात आहे. आणि त्याला वार्षिक तेरा लाख रुपये खर्च येतो. यांतलेच शिपायी पोलिसचें व अबकारीचें काम करतात पोलिसची फौज किंवा अबकारीची फौज यांचाही यातच समावेश होत असल्यानें आणि बाह्य शत्रूपासून रक्षण करावयास हें सैन्य निरुपयोगी व अपुरें असल्यामुळें, हा खर्च पोलिसी बंदोबस्त व अबकारी देखरेख एवढ्याचसाठीं एवढा सोसावा लागतो म्हणायला प्रत्यवाय नाहीं. सैन्याचा चीफ कमांडरचा हुद्दा गव्हर्नर जनरलकडेच असतो व तो आपल्या मिलिटरी सेक्रेटरीच्या द्वारें हा कारभार चालवितो. वास्तविक पोलिसचा बंदोबस्त आदमिनिस्त्रादोर दु कोंसेल्यु याकडे असावयाचा, परंतु १९२४ पासून या बाबतींत घोंटाळा माजून राहिला आहे. कारण पोलिसची व्यवस्था कायद्यानें जरी आदमिनिस्त्रादोरांकडे सोंपविलेली असली, तरी सदर

सालापासून लष्करी पोलिस ऑफीसरहि हे अधिकार चालवीत असल्यामुळें, ह्या बाबींत एका म्यानांत दोन सुर्‍यांसारखा प्रकार झालेला आहे.

**न्यायखातें:**—मागील विवेचनांत न्यायखात्याची माहिती आम्ही सनदशीर राज्यपद्धतीच्या सुरुवातीपर्यंत आणून पोंचविली होती. न्यायखात्याची अम्मलबजावणीखात्यांशीं खरी फारकत याच सुमारास झाली होती. सनदशीर राज्यपद्धतीची स्थापना गोमतकांत होतांना, इ. स. १८३८ त न्यायखात्यांत बराच फेरफार झाला. हायकोर्टांचे जज्ज पांचाच्या ऐवजीं तीनच राहिले व तिसवाडी, बारदेश व सासष्ट अशा तीन कोमार्कांत गोमंतक प्रांत विभागला गेला. प्रत्येक फ्रेगेझींत ( रॅजिदोरीच्या क्षेत्रांत ) लोकांनीं निवडलेला एक जज्ज व दुसरा जे. पी. असे. याच सालीं रॅलासांवांत व कोमार्कांत सरकारी वकिलाची जागा स्वतंत्र होऊन त्यांचे अधिकार निर्णित झाले. इ स. १८३७ त प्रजेचा ज्युरीचा हक्क काढून घेण्यांत आला. १८५४ सालीं पीनलकोड गोमतकास लागू करण्यांत आलें व त्यांत जें हद्दपारीचें कलम होतें तें १८५६ सालीं हिंदूपुरतें रद्द करण्यांत येऊन त्या ऐवजीं हिंदु गुन्हेगारांना गोव्याच्या गोदींत सक्तमजुरीची शिक्षा भोगावयाला लावण्याचें ठरलें. परंतु पुढें १८७० त गोदी काढून टाकतांच हें कलम पुन: हिंदूना लागू झालें. इ. स. १८५६ त रॅलासांवाच्या जज्जांची संख्या तीनाऐवजीं ४ करण्यांत आली. व १८६४ सालीं पेडणें, सांखळी, फोंडें व केपें येथें एक एक जुल्गाद ( डिस्ट्रिक्ट कोर्टाखालच्या दर्जाचें कोर्ट ) निर्माण करण्यांत आलें व इ. स. १८६६ सालीं तसलींच दोन जुल्गादें, असोळणें व कळंगूट येथें स्थापन झालीं. फ्रेगेझींतील ( रॅजीदोरीच्या क्षेत्रांतील ) लोकनियुक्त जज्जाची व्यवस्था नष्ट करून त्याचेही अधिकार जे पी नांच देण्यात आले. १८६७ त रजिस्ट्रेशन कचेर्‍या स्थापन झाल्या. पण या कचेर्‍यांतील रजिस्ट्रेशनपेक्षां पूर्वींच कोमुनदादींत जी ( तील ) ठिकाणझाड्याची पद्धति होती तीच चागली होती. कारण सीमाचीं नांवें बदलून एकच इस्टेट दोन तीन नबराखालीं रजिस्टर करतां येणें कोमुनदादीच्या ठिकाणझाड्यांत शक्य नव्हतें. सर्व्हेच्या अभावानें तें रेजिस्ट्रेशनमध्यें आज शक्य झालें आहे. इ. स १८७० त गोव्याला कोड नेपोलियन थोड्याच फेरफारानें लागू करण्यांत आलें व लष्करी गुन्ह्याशिवाय इतर गुन्ह्यांस देहांत शिक्षा देणें बंद केलें.

इ. स. १८७८ त रॅलासावाच्या जज्जांची संख्या ४ ऐवजीं ५ जज्जांची झाली व डिचोली व केपें अशीं दोन नवीं कोमार्कें स्थापन झालीं. गोमतकांतील सहाही

जुलादें ( खालचीं कोर्टें ) काढून टाकून त्या ऐवजीं दुसरे लहान जुलाद निर्माण झाले.

**रिपब्लिकच्या स्थापनेनंतरः**—तूर्त उपरोक्त रॅलासावांत ५ जज्ज आहेत व एक सरकारी वकील आहे. त्याला प्रोकुरादोर द रॅपूब्लिक अशी सज्ञा आहे. हाच गव्हर्नरचा कायद्याचा सल्लागार असतो. त्याचप्रमाणें रॅलासांवांत एक सेक्रेटरी, त्याचे दोन मदतनीस, जज्जानां खटले विभागून देण्यास व कोर्ट फी आकारण्यास कोंतादोर दिस्त्रिबुइदोर या नांवाचा अधिकारी व दोन बेलिफ असतात. १५०० रुपयांपर्यंतच्या खटल्यांचे जे निकाल रॅलासावातून होतात त्यांवर पुढें अपील चालत नाहीं. इतर दाव्यांवर पोर्तुगालच्या सुप्रीम कोर्टांतून अपील चालतें. या सुप्रीम कोर्टाचा निवाडा शेवटचा असतो.

हायकोर्टाच्या हुकमतीखालीं गोमतक प्रांतांत तिसवाडी, बारदेश, सासष्ट, डिचोली व केंपें अशीं ५ कोर्टें कोमार्कांचीं आहेत; त्यांत एक एक जज्ज असतो. सरकारी वकिलाला या कोर्टांत दॅलॅगादु दु प्रोकुरादोर द रॅपुब्लिक म्हणतात. हे उभय अधिकारी पोर्तुगालच्या युनिव्हर्सिटीचे बाशारॅल (बार ॲट लॉ) असावे लागतात. अज्ञानाचे हितसबध, क्रिमिनल खटले चालविणें, सरकारी दिवाणी कामकाज चालविणें, सरकारच्या संरक्षणाखालच्या संस्थांचे हितसंबंध, रेजिस्ट्रेशन कचेरी, तुरुंगावरील देखरेख, हीं कामें दॅलॅगादु यानें पहावयाचीं असतात. दस्तऐवज व मुखत्यार पत्रें लिहिणें हीं कामें करावयाला ताबेलियाव नांवाचे दोन बिनपगारी अधिकारी ( पब्लीक नोटरी ) प्रत्येक कोमार्कांत असतात दस्तऐवजाच्या लेखनासाठीं सरकारी बुकें असून दस्तऐवज विषयक बाबींच्या क्रयाप्रमाणें कुळाकडून नोटरीला फी मिळते. १५० रुपयांवर क्रय असलेले दस्तऐवज खासगी व्यक्तीनें लिहिण्याची कायद्यानेंच मनाई आहे.

तिसवाडी कोमार्कांतील फोंडें कोंसेल्यांत एक व सासष्ट कोमार्कांतील मुरगांव कोंसेल्यात एक, अशीं दोन जुलादें (कोमार्का खालचीं कोर्टें ) गोव्यांत आहेत या कोर्टांना दिवाणी दाव्यांत निकाल देतां येत नसतो सारा पुरावा मात्र घेतां येतो. व फौजदारी दाव्यांत अतिम सीमेचे निवाडे देखील देतां येतात परंतु त्यावर कोमार्कांत अपील होऊन शिक्षा कायम व्हावी लागते कोमार्कांच्या जज्जाचा अधिकार देखील दिवाणी दाव्यांत दीडशें रुपयांपर्यंत व फौजदारी दाव्यांत १ महिन्यांची साधी कैद व ९९९ रुपये दंड इतक्यापुरता कायमचा असतो.

कोमार्कांत निवाडे मात्र सर्व दर्जाचे देतां येतात आणि फौजदारी निवाड्यांत शिक्षा देण्यात आल्यास ती हायकोर्टानें मजूर करावी लागते

कामाच्या मानानें कोमार्कांत दोन ते तीन शिरस्तेदार व ६ बेलीफ असतात त्याचप्रमाणें शिरस्तेदारांस खटले वांटून देणें व कोर्ट फी आकारणें, या कामासाठीं एक कोंतादोर दिस्त्रिबुइदोर असतो. जुल्गादांत एक शिरस्तेदार व दोन बेलीफ असतात. न्यायाचें काम सारें पोर्तुगीज भाषेंत चालत असल्यानें, मराठी व कोंकणी जाणणारा एक एक दुभाषी प्रत्येक कोमार्कांत व जुल्गादांत नेमतात. मुरगाव जुल्गादात ताबेलियांवचें काम शिरस्तेदारच करतो पण फोंडें जुल्गादांत स्वतंत्र ताबेलियांव असतो.

**महत्वाच्या बाबीः**—फौजदारी कायद्यांतील महत्त्वाच्या बाबी म्हणजे खोटे दस्तऐवज करणाराला इकडे काळ्या पाण्याची शिक्षा मिळते, केवळ सक्त मजुरीनें हे गुन्हेगार सुटत नाहींत, त्याचप्रमाणें माफीचा साक्षीदार हा प्राणी पोर्तुगीज कायद्यांत अजून जन्म पावलेला नाहीं; तिसरा महत्त्वाचा फरक म्हणजे कोर्ट फी व स्टांपसंबधीं होय एकदम सुरवातीसच कोर्ट फीची आकारणी न होता, खटला जसजसा चालेल तसतशी होत जाते. आणि वारवार आठ किंवा सहा आण्यांचे (सामान्यतः फुलस्केप साइजचे) स्टांप कागद विकत घेऊन त्यावर खटला चालवावा लागल्यानें, एकदम सुरवातीसच स्टांपही पण आकारला जात नाहीं. खटला थोडक्यांत आटपला तर या पद्धतीनें कुळांचा फायदाच होतो उलट पक्षीं मात्र नुकसान होतें.

आई किंवा बाप मरण पावल्यावर अज्ञानाच्या संरक्षणासाठीं कोर्टामार्फत इस्टेटीची वाटणी होते तिला इन्हेंतार्यु ऑर्फानोलॉजिक म्हणतात. परंतु या पद्धतींत पुष्कळ खर्च येत असल्यामुळें बरींच कुटुंबें हलाखीस पोंचलीं आहेत

तुरुंगव्यवस्था सूडाच्या स्वरूपाची नसून सुधारणेच्या स्वरूपाची आहे. अंधारकोठडीचे घरफोडीचे खुनी वगैरे भयकर कैदी सोडल्यास, बेड्याची पद्धत इकडे मुळींच नाहीं लेखनवाचनाची, घरचा पोषाख व खाणें पिणें घेण्याची, जानवें ठेवण्याची, तंबाखू ओढण्याची, रात्रौ दिवा ठेवण्याची, नातेवाईकांच्या भेटी घेण्याची वगैरे पूर्ण मुभा असते. गरीब गुन्हेगारांना सरकारातून कोरडा शिधा मिळत असतो. पणजीच्या सेंट्रल जेलांत तर भाडें देण्याची ऐपत असल्यास कैद्याला स्वतंत्र खोली देखील मिळूं शकते. "बापाच्याऐवजीं मुलानें किंवा एका इसमाच्या ऐवजीं दुसऱ्यानें शिक्षा भोगल्यास गोव्यांत चालतें" या प्रवा-

दास कायद्यांत किंवा व्यवहारांत मुळींच आधार नाहीं. कडक तुरुगव्यवस्थेंत वागलेल्यांना असल्या प्रवादांची शक्यता वरील सवलतींमुळेंच वाटत असावी.

**कोमुनदादींची आजची स्थितिः**—कोमुनदादींच्या मुळच्या सर्वाधिकारी पद्धतीपेक्षा आजचें त्यांचें स्वरूप कितीतरी बदललें आहे. न्याय, म्युनिसिपालिटी, इत्यादि स्वरूपाचे त्याचे हक्क नष्ट होऊन आज त्याना केवळ शेतकी संस्थाचा दर्जा मिळाला आहे सरकारी दप्तरांतही त्यांना "कोमुनदादीश् आग्रीकुलश" (कृषिविषयक संस्था) हें नाव मिळत आहे.

पूर्वी नवीन काबिजादींत कोमुनदादी नव्हत्या परंतु तो प्रांत पोर्तुगीज अमलाखालीं येतांच वसुलाच्या सोयीसाठीं पोर्तुगीजांनीं तेथें प्रजेला कोमुनदादी उत्पन्न करायला लावलें व त्याप्रमाणें त्या उत्पन्नहि झाल्या जुन्या काबिजादींतून धर्मच्छलाच्या काळीं तिकडे पळून गेलेल्या गौड सारस्वत ब्राह्मण कुळकर्ण्यांच्या अस्तित्वांतच याचें कारण शोधलें पाहिजे. त्यानींच त्या संस्था स्थापन करण्यास मदत केली असली पाहिजे.

तूर्त साऱ्या गोमंतकांत मिळून २११ कोमुनदादी आहेत. सपन्न कोमुनदादींचे उत्पन्न ५०।६० हजार रुपयापर्यंत असतें.

कुळकर्ण्यांची नेमणूक द्विवार्षिक लेखी परिक्षा घेऊन पास झालेल्या उमेदवारांतून गुणानुक्रमें करतात व ती तहाहयात असते. त्यांना वार्षिक पगार जास्तींत जास्ती सहाशें रुपयेपर्यंत असतो. कमी उत्पन्नांच्या दोन दोन तीन तीन कोमुनदादींचे गट पाडून त्यात एकच कुळकर्णी नेमला जातो गटांतील प्रत्येक कोमुनदादींचें दप्तर निरनिराळेंच असतें. कुळकर्ण्याला आपल्या पगाराचे दोन तृतीयांश मात्र दरमहा मिळतात व बाकी एक तृतीयाश वर्षअखेर हिशेब पास झाल्यानतरच घेतां येतो.

खर्चवेंच जाऊन राहिलेला फायदा, कोमुनदादीच्या रचनेप्रमाणें तिच्या हक्कदारांना वांटला जातो. यासाठीं, १ शेअरवाल्या कोमुनदादी, २ जणांच्या कोमुनदादी (per capita हक्कदार कुटुंबातील पुरुष संततींत सारख्या प्रमाणानें फायद्याची वांटणी करणाऱ्या), ३ कांहीं भाग जणांवर व कांहीं भाग शेअरवर वाटणाऱ्या कोमुनदादी व ४ फायदा ताक्षमानां वांटणाऱ्या (per stirpe) कोमुनदादा, असे त्यांचे चार प्रकार आहेत. शेअरवाल्या कोमुनदादींचा व तक्षिमवाल्या कोमुनदादींचा हक्क विकत देतां घेतां येतो. व तसा तो विकत घेणाऱ्या इस-

माला कोमुनदादीचा गांवकर ( हक्कदार ) समजण्यांत येतें. पण जणाचा हक्क तसा नसतो. तो प्राप्त व्हावयाला त्या त्या कुटुंबांत जन्मच घ्यावा लागतो. जणकारांच्या व तक्षिमदाराच्या कोमुनदादींचीं मूळचीं जीं कुटुंबें होती त्यांना वांगड म्हणतात.

कोमुनदादींच्या शेअर्सची मूळ किंमत वीस रुपये होती. पण फायदा कमी-जास्त सुटत असल्यानें, संपन्न कोमुनदादींत ती शंभराच्या घरांत देखील गेली आहे. व उलट पक्षीं कित्येकदां मूळातच खालींही गेली आहे. संपन्न जणकरांच्या कोमुनदादीत जणाला ( प्रत्येक भागीदाराला ) वार्षिक तीन तीनशें रुपये देखील मिळतात आणि कित्येक कोमुनदादींत पुरते दोनही मिळत नाहींत. तरीपण ह्या हक्काचा मोह गोवेंकरांत इतका प्रबळ असतो कीं, हे वतनी दोन रुपये वसूल करायला पदरचे पैसे खर्च करणारे जणकार पुष्कळच असतात. फायदा वांटण्याच्या चोपडींत जणकरांचीं नावें दाखल व्हायला त्यांनीं आपल्या अस्तित्वाचा दाखला दर-साल ठराविक मुदतींत कुळकर्ण्यास पटवावा लागतो

**मुरगांवची सुधराई कमिटीः**—वास्कोदागामा शहर व कुडचडें उपनगर सुधारण्यासाठीं म्हणून ही कमिटी १९१९ सालीं निर्माण करण्यांत आली. प्रारंभीं ह्या कमिटीची रचना खालीलप्रमाणें होती.

प्रेसिडेंटः—रेल्वे व मुरगांव बंदरावरील देखरेख खात्याचे डायरेक्टर.

सभासदः—१ बदर तपासणी कामगार.
२ वास्को किंवा हारबर येथील सरकारी डाक्टर.
३ मुरगांव जुलगादचे सरकारी वकील.
४ मुरगांव जकात कचेरीचे डायरेक्टर.
५ मुरगावच्या म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष.
६ केपेंच्या म्युनिसिपालीटीचे अध्यक्ष
७ गोमंतकातील जमीनदारानीं निवडलेला प्रतिनिधि.
८ गोमतकांतील व्यापाऱ्यांनीं निवडलेला प्रतिनिधि.

कमिटीचा उपाध्यक्ष उपरोक्त पहिल्या ६ सभासदांतून नेमण्याचा अधिकर गव्हर्नरला होता.

उत्पन्नाच्या बाबींत जकात वाढींतील भाग, लोकाकडून लँड आक्विझिशन ॲक्टान्वयें घेतलेल्या जमिनीच्या विक्रीची किंमत, फोराचें उत्पन्न, वगैरेंचा समावेश होत होता प्रत्यक्ष कारभार कमिटीच्या अध्यक्षांकडेच असे.

इ. स १९२४ त असें दिसून आलें कीं, जकातीचा वाढावा कमिटीच्या नांवें जमा करून देतानां हिशेबांत बरेच घोटाळे माजतात. म्हणून सरकारानें हा कर तिजोरीकडे घेऊन कमिटीला त्याबद्दल सालिना दीड लक्षाची नेमणूक करून दिली. त्याचप्रमाणें मुरगांव म्युनिसिपालिटी काढून टाकून तिचे अधिकारही याच कमिटीला द्यावे, असा अर्ज बऱ्याच रहिवाशांनीं केल्यामुळें व या योजनेनें फायदाही होईल असें दिसून आल्यावरून, सदर सालीं खालीलप्रमाणें कमिटीची पुनर्घटना करून मुरगावची म्युनिसिपालिटी काढून टाकली.

प्रेसिडेंट·—पूर्वीचेच रेल्वे तपासणी डायरेक्टर.

सभासद·—१ बंदर तपासणी कामगार.
२ मुरगांवचे सरकारी वकील.
३ मुरगांवचे सरकारी डॉक्टर.
४ जकात कचेरीचे डायरेक्टर.
५ मुरगांवच्या जमाबंदी कचेरीचे मुख्य.
६ केपेंच्या म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष.
७ गोव्याच्या व्यापारीवर्गानें निवडलेला प्रतिनिधि.
८ गोव्याचा जामीनदार व शेतकरी यांनीं निवडलेला प्रतिनिधि.
९ व १० मुरगांव कोंसेल्यांतून निवडलेले दोन प्रतिनिधि.

कमिटी स्थापन झाल्यापासून रस्ते, इमारती, नळाची थोडी सोय, झऱ्याच्या पाण्याचा उपयोग, इत्यादि बरींच महत्वाचीं कामें तिनें मुरगांवात घडवून आणिलीं आहेत. त्यामुळें मुरगांव शहर हें, प्रशस्त रस्ते, इमारती, इत्यादिकांनीं शोभिवंत दिसतें. त्याचप्रमाणें कुडचडें उपनगराची रचना व सुधारणा याच कमिटीकडे असून तेथेंहि बाजार, मार्केटची सोय, वगैरे सुधारणा कमिटीनें घडविल्या आहेत. १९२७ सालीं कमिटीचें उत्पन्न ३,०६,७३५ रुपये झालें व त्यातून खर्च ९८,३०४ रुपये झाला शिल्लक पुढच्या सालीं ठेवण्यांत आली. मुरगांवांत पाणी पुरवठ्याची सोय व विजेची रोषणाई करण्याचा तूर्त तिचा संकल्प आहे.

**राज्यव्यवस्थेचें सामान्य धोरणः**—पुष्कळ दृष्टींनीं हिंदुस्थानापेक्षां हें धोरण प्रजेला विशेष हितकर आहे, असें या प्रकरणांतील सामान्य विवेचनावरून दिसून येईल. एकच दोष मात्र या धोरणांत दिसून येतो व तो प्रांतिक स्वायत्ततेच्या बाबतींत केलेल्या पिच्छेहाटीचा होय.

इग्रजी राज्यपद्धति जुलमाची असेल, नव्हे आहे. त्यांनीं प्रजाजनाना पिळूनही काढलें असेल. पण एक मेहेरबानी केली ती मात्र विसरता उपयोगी नाहीं. त्यांनीं प्रजेला दिलेलें शिक्षण धर्माधिकाऱ्यांच्या अश्मीभूत झालेल्या सांच्यातून न देतां, विद्यार्थ्यांची दृष्टि कांहीं थोड्या प्रमाणानेंच कां होईना, पण विकसित करून त्यांना स्वतंत्र विचारशक्तीची प्राप्ति करून दिली राष्ट्रीयत्वाची वाढ ह्या स्वतंत्र विचारामुळेंच हिंदुस्थानांत झपाट्यानें झाली. त्या शिक्षणामुळें लोकाना जगाकडे पाहण्याची नवदृष्टि प्राप्त होऊन ते आपल्या हक्कांस जपणारे निघाले.

आमची गोष्ट तशी नव्हती व तूर्तहि नाहीं. सर्व प्रगतीचा पाया जें शिक्षण, तें मुस्कट दाबींत, थापाथापींत व चाणाक्यनीतींत प्रवीण अशा जेझुइटांसारख्या धर्मवेड्या पाद्र्याकडे बराच काळ होतें; प्राथमिक शिक्षण अजूनही राजभाषेंतूनच चालतें; शिक्षणात पुढारलेला ख्रिस्ती समाज, भूतकालाभावामुळें भविष्यहीन बनून केवळ आजच्या दिवसापुरता व पोटोबा पुरताच पाहणारा; भविष्यकालाची अधुक तरी कल्पना असणारा हिंदुसमाज, राज्यकारभारातील आपला हक्काचा अर्धा वांटा मिळविण्यात, केवळ १९ वर्षांच्या तुटपुज्या तयारीनें ख्रिस्ती समाजाकडे अखड झुझ खेळण्यांत ग्रासून गेलेला; अर्थात् खास प्रजेच्या न्याय्य हक्काची बजावणी करून घ्यायला तो रिकामा नाहीं व राज्यकारभाराच्या एकदर आगाउपांगांत ही त्याची हक्काची जागा जोंवर त्याला मिळाली नसेल, तोंवर तरी त्याची या बाबतींत हीच स्थिति कायम राहणार; तेव्हां या परिस्थितीचें नवल वाटायला नकोच.

---

## प्रकरण तिसरें.

# पोर्तुगीजांनीं केलेल्या जुलमांची जंत्री.

**प्रास्ताविक विज्ञापनाः**—प्रस्तुत इतिहासाच्या कथनास सुरुवात करण्यापूर्वी, दोन प्रास्ताविक शब्द वाचकांना सांगावयाची परवानगी घेतों यांतील शब्दान् शब्द सरकारी कागदपत्रांतून आणि सरकारमान्य व इतिहास सशोधक असे जे फिलिप नॅरि शाव्हियॅर नांवाचे सुप्रसिद्ध गोमांतकीय विद्वान होऊन गेले त्याच्या, "गोमातकातील कोमुनदादींच्या इतिहासाची रूपरेषा" या प्रमाणभूत ग्रंथांतून किंवा पणजीच्या हायकोर्टाचे आजचे सर न्यायाधीश, दोतोर आंतोनियु

दा नोरोन्य, यांच्या "गोव्यातील हिंदु व पोर्तुगीज रिपब्लिक" नामक ग्रंथातून घेतलेला आहे. उभय ग्रंथकार ख्रिस्ती समाजांतीलच आहेत. वाचकानीं खालील इतिहास एकदा तरी नजरेखालीं घातल्याशिवाय राहू नये, अशी त्यांना लेखकाची नम्र विज्ञापना आहे.

**बिशपच्या गादीची स्थापनाः**—गोवें सर केल्यावर लागलीच त्या शहरांत आल्बुकेर्कनें एक क्याथेड्रल उघडलें होतें व आपल्या शिपायांपैकीं कित्येकांचीं लग्नें "नायटयांच्या" (मुसलमान चांच्यान्च्या) पकडलेल्या स्त्रियांशीं लावून दिलीं होतीं. सतीची चाल त्याला रानटी वाटली म्हणून त्यानें बंद करविली. परंतु त्याच वेळीं प्रजाजनाना आपापल्या धर्माप्रमाणें व चालीरीतींप्रमाणें वागण्यास पूर्ण मुभा देणारा कौल जाहीरनाम्याच्या द्वारें त्यानें दिला होता पुढें सन १५२६ त आफोंस मेशीय यानें गोमांतकीय प्रजेला जो कौल (फॉराल) दिला, त्यांतही ह्या हक्काचा पुन: उल्लेख केला होता. पण १५३४ त पोर्तुगीज सरकारनें गोव्यांत बिशपची गादी स्थापन केली. ह्या बिशपनां गोव्यांत प्रारभीं काहींच काम नव्हतें. कारण ख्रिस्ती लोकांची संख्या केवळ पोर्तुगालहून आलेल्या शिपाई लोकापुरतीच मर्यादित होती. ती वाढविण्यासाठीं "इतका काळ पर्यंत सैतानाच्या हवाली झालेल्या ह्या देशाची व लोकाची प्रभूला आठवण झाली व त्यांना तारण्यासाठीं या देशात असलेलीं सारीं देवळें, त्यांतील एकही राहू न देतां, नष्ट करण्याची त्या प्रभूनें प्रेरणा केल्याचा" पहिला सरकारी हुकूम इ. स. १५४१ त सुटला. तिसवाडींतील सारीं देवळें "प्रभूच्या प्रेरणेनें" धुळीस मिळालीं व त्या देवळांची इस्टेट कोमुनदादींस वाटून देण्यात येऊन त्याबद्दल कोमुनदादींवर "जोरजुलमाशिवाय व त्याच्याच राजी खुषीनें" ७८६ असर्फ्यांचा कर लादण्यांत आला (Bosquejo Histórico das Comunidades de Gôa por Filipe Nery Xavier, Vol I Pg. 106) जमिनीचें उत्पन्न केवळ २८०० असर्फी होतें ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. इ स १५४५ सात जेसुइटांच्या नुकत्याच स्थापन झालेल्या, सेंट पॉलच्या कॉलेजला सरकारनें ह्या जमिनी बक्षीस दिल्या. परंतु कोमुनदादींवरचा कर मात्र तसाच राहिला. (Bos. His. Vol I Pg. 107).

इ. स. १५४६ सांत "गोव्यांतील पाखंड मत नष्ट करा, त्यांतील सारीं देवळें व मशीदी जमीनदोस्त करा; पाखंडी व ब्राह्मणी उत्सवास मनाई करा व लांकूड, माती किंवा धातूची मूर्ति करणारास कडक शासन करा." असा हुकूम राजेसाहेब

-दों जुवांव तिसरे यांनीं दिला. (Os Hındús de Gôa e a Repùblıca Portuguesa por Antónıo de Noronha Pg 9)

इ. स. १५४८ सात फ्रै जुवाव द आल्बुकेर्के नावाच्या विषयनें लोकाचीं पुस्तकें एकत्र करून पाखंडमतखंडनार्थ जाळून टाकलीं ( Pg. 12 )

इ. स. १५५७ त हिंदूना सरकारी नोकऱ्यातून हाकण्यांत आलें व अशा रीतीनें आल्बुकेर्केच्या मुळच्या जाहिरनाम्यातील, "ठाणेदारीसहीत साऱ्या सरकारी जागा हिंदूच्याच हातीं ठेवण्याच्या" वचनाला हरताळ फांसला गेला. (Pg 14-15)

इ स. १५५९ त पुन: हाच हुकूम सुटला व "जोडीला हिंदूच्या व ब्राह्मणाच्या वतीचीं कोणतींच सरकारी कामें, दस्तऐवज किंवा इतर सरकारी कामकाज, सरकारी अम्मलदारांनीं करूं नयेत. केल्यास अम्मलदारांस बडतर्फी व हिंदूस गुलामगिरी अशी शिक्षा फर्मांविण्यांत आली, मृत हिंदूच्या विधवा किंवा मुली ख्रिस्ती धर्मांत आल्यास, मनूच्या कायद्यास न जुमानतां, त्याना मृत इसमाची सारी संपत्ति वाटून द्यावी; स्त्रिया ख्रिस्ती धर्मांत न आल्यास, मृत इसमाचा जो कोणी दायाद बाप्तिस्मा घेईल, त्याला ती संपत्ति मिळावी; पाखंडी उत्सव घरांतून चालले असतील, तर त्याची चुगली करणारास पाखंड्याच्या संपत्तीचा अर्धा वाटा बक्षिस देऊन अर्धा त्या भागातील चर्चेला मिळावा व पाखंड्यास आजन्म गुलागिरीची शिक्षा द्यावी, ( Pg 15 ) त्याच प्रमाणें मातापितरें किंवा वडील माणसें नसणाऱ्या हिंदु मुलांना, सरकारनें आपल्या ताब्यांत घेऊन त्याना सा पाव्लच्या कॉलेजांत बाप्तिस्मा द्यावा; ( Pg 17 ) व ख्रिस्ती होणाऱ्याना दीझिमुश माफ असावें ( Pg. 16 ) असे हुकूम सुटले.

इ. स. १५६० त ब्राह्मणांना हद्दपारीचा हुकूम सुटला. " आपली चीजवस्त व स्थावर मिळकत ख्रिस्त्यांना विकून एक महिन्याच्या अवकाशांतच त्यानीं गोवें सोडावें, न पेक्षा आजन्म गुलामगिरी व मिळकतीची जप्ती ही शिक्षा देण्यात येईल." असा त्या हुकुमाचा इत्यर्थ होता. हें थोडें वाटल्यामुळेंच कीं काय, पुन: त्याच वर्षी, " सुवर्णकारानीं आपलीं मुलेंबाळें घेऊन दहा दिवसांच्या आंत गोवें सोडावें, नाहींतर आजन्म गुलामगिरी व जिंदगीची जप्ती होऊन तींतील अर्धी वातमीदारास व अर्धी सां तोमेच्या चर्चेला देण्यात येईल" असा दुसरा हुकूम सुटला. त्याच सालीं सासष्ट प्रांतांतील ४०९ माणसाना पकडून मोठ्या समारंभानें बाप्तिस्मा देण्यात आला ( Pg. 16-17 )

**इंकिझिसांवांचें आगमन**—याच दरम्यान युरोपभर गाजलेल्या इंकिझिसांवांचा ( धर्मसमीक्षणन्यायसभेचा ) गोव्यांत उदय झाला आजवरचे हिंदुविषयक कायदे लक्ष्यांत घेतल्यास, इंकिझिसावांनें गोव्यांत काय काय अत्याचार केले असतील, त्याची पूर्ण नसली तरीपण बरीच कल्पना करतां येईल. त्याचा इतिहास मोठा आहे पण तो स्वतन्त्रपणेंच प्रसिद्ध करण्याचा विचार असल्यामुळें येथें दिला नाहीं. इंकिझिसांवाला त्यावेळीं हिंदुसमाजांत व्हडलें घर ( थोरलें घर ) असें टोपण नांव मिळालें होतें.

**इ. स. १५६१** त सान्या जमिनी पडीत राहिल्या. नद्याचीं पात्रें मातीनें भरून आल्याकारणानें, " लोकानीं परत यावें, त्यांच्या जमिनी त्यास परत मिळतील " असा कौल पोर्तुगालहून मिळाला होता. परंतु ह्या कौलाविरुद्ध आर्चबिषपनें व जेजुइटांनीं तक्रार केल्यामुळें, इ. स. १५५३ तच त्याच्याविरुद्ध दुसरा हुकूम, राजे दों सेबास्तियांव यानीच पाठवून नेहमीं आर्चबिषप व जेसुईट याच्या सल्ल्यानेंच वागण्याचा उपदेश व्हाइसरॉयांना केला. ( Pg. 21 )

**इ. स. १५६३** त उपरोक्त फेर हुकुमान्वयें हद्दपारीचा कायदा पुनः जारीनें अमलांत आला. मात्र ह्या खेपेस ही हद्दपारी ब्राह्मण व दैवज्ञ ब्राह्मणापुरतीच नसून सार्वत्रिक होती. ख्रिस्ती समाजाला नुकसानकारक नसणारे जे शेतकरी, वैद्य, सुतार, लोहार, व्यापारी, मक्तेदार वगैरे असत, त्यानां मात्र ह्या हद्दपारींतून वगळण्यांत आलें होतें. अर्थात् सर्वच उजाड झालें. ज्याना पुरुषसंतति होती, त्यानींच मात्र कोमुनदादींतील हक्कांच्या लोभामुळें, पोर्तुगीज हद्दींत घरेंदारें ठेविलीं इतर लोक केवळ उपरी कुळाप्रमाणें राहून जरा कुठें जुलुमाचें चिन्ह दिसताच परहद्दींत ( आजच्या नव्या काबिजादींत ) पळून जात. (Pg. 21)

**इ. स. १५६६** त हद्दपारीच अधिकार आर्चबिषपच्या हातीं आला. आणि कोमुनदादीचे कुळकर्णी हिंदू असू नयेत, असल्यास त्यांनीं आपलीं वतनें ख्रिस्ती इसमांना विकावीं. तसेंच ' गावकीचा हक्क म्हणजे गावकरांना जीव कीं प्राण वाटत असल्यामुळें त्याना कोमुनदादींत मज्जाव करावा म्हणजे ते लागलेच ख्रिस्ती होतील ' असे हुकूम सुटले ( Pg. 21 )

**इ. स. १५६७** त हिंदूनां आपलीं धर्मपुस्तकें वाळगण्याची बंदी झाली. प्रार्थनेला नवख्रिस्ती हजर न राहिल्यास, त्यांपैकीं अभिजात वर्गीयास दंड करण्याचा व गरिबांस पालमातोंर्यें ( कलथ्याच्या आकाराचें तळहातावर मारण्याचें लांकडी शस्त्र ) मारण्याचा अधिकार पाद्रींनां देण्यांत आला.

त्याच सालीं गोव्यांत पहिलीच ख्रिस्ती कौन्सिल भरली. तींत असे ठराव पास झाले कीं, "कोमुनदादींच्या लिलावात ख्रिस्त्याचा सवाल हिंदूच्या सवालाइतकाच असल्यास ख्रिस्त्यालाच मक्ता द्यावा. कोमुनदादांचे कुळकर्णी, मुखत्यार, वसुलदार, इत्यादि अधिकारी ख्रिस्तीच असावे." इतकेंच नव्हे, तर "ख्रिस्त्यांनी ख्रिस्तीतरांशीं संभाषण देखील वर्ज करावें व सैतानाचीं (हिंदूंचीं) सारीं स्थानें, म्हणजे देवळें, झाडें, दगड, वगैरे भंगून टाकून, पाखंड्यांचे विवाह, अंत्येष्टि, व्रतबंध, होम हवन, इत्यादि सारे संस्कार बंद करावे; आज्ञाभंगास कडक शिक्षा फर्मावाव्या; ख्रिस्तीतरांना कोणताही हुद्दा देऊं नये व दिल्यास तो गुन्हा समजला जावा" असाहि हुकूम याच सालीं सुटला. ( Pg. 22-23 )

**सासष्टकरांवर हल्ला; देवळांचा विध्वंसः**—याच सालीं सासष्टकरांना धर्मच्छलाच्या वणव्यानें घेरलें. रायतुरचा किल्लेदार, "बहाद्दर" दियोग रुद्रिगिश, यानें लोटलीच्या गावकरांना किल्यांत हजर होण्याचा हुकूम केला होता. पण तो त्यांनीं पाळला नाहीं. म्हणून चिडून त्यानें येथील मुख्य (श्रीरामनाथाच्या) देवालयाचा विध्वंस केला. लोटलीकरांनीं न्यायासनासमोर आपली तक्रार मांडली व न्यायाधिशांनीं, 'किल्लेदारानें तें देऊळ पूर्वींप्रमाणेंच बांधून द्यावें," असा हुकुमनामा दिला. परंतु गोव्यांतील जेसुइटांच्या प्रोव्हिंसियालानें (मुख्याधिकाऱ्यानें) व आर्चबिशपनें त्या हुकूमनाम्याविरुद्ध तक्रार केल्यामुळें, व्हाइसरॉय दों आंतांव द नोरोन्य यांनीं, तो निंद्य (indecente) ठरवून, किल्लेदाराला सासष्ट प्रांतातील सारींच देवळें पाडून टाकण्याचा हुकूम फर्मावला अर्थातच त्यानें वेर्णें येथील श्रीम्हाळशेच्या देवळापासून सुरवात करून २८० देवळांचा विध्वंस केला. देवळाचें लांकूडसामान तारवांच्या गोदीकडे गेलें व उत्पन्नापैकीं बरेंचसें उत्पन्न १५७२ सालीं त्याच किल्लेदाराला बक्षिसादाखल मिळालें [1] अशारीतीनें सासष्ट प्रांता-

---

1 इ स १५६७ सालींच वारलेल्या दियोग रुद्रिगला हें बक्षिसपत्र मिळणें शक्य दिसत नाहीं तें त्याच्या विधवेलाच मिळालें असावें. तिनेंही तें उत्पन्न इ. स. १५८४ त रायतुरच्याच दोघां ख्रिस्त्यांना विकलें. पुढें इ स १६०३ सालीं त्यांतील बरीचशी इस्टेट अंतोनियु रुद्रीगिश नांवाच्या ख्रिस्त्याला सरकारनें बक्षिस दिली. कारण ख्रिस्ती धर्म स्वीकारासाठीं त्यानें आईबाप, गणगोत इत्यादि सारें सोडलें होतें व जेसुइट पाद्र्यांना बाटाबाटींत मदत केली होती शेवटीं ही सारी इस्टेट मिझेरिकोर्द संस्थेला बहाल करण्यांत आली, ती अद्यापिही तिजकडेच आहे. इस्टेटीचें उत्पन्न त्यावेळीं दहा हजार असर्फ्यांचें होतें.

तील देवळाचा नाश झाला. रायतुरच्या चर्चमध्यें असलेल्या त्याच्या थडग्यावर खालील मृत्युलेख अद्याप चमकत आहे.

**रायतुरचा किल्लेदार दियोग रुद्रिगिश,**
**ज्यानें ह्या प्रांतांतील सारीं देवळें पाडून टाकलीं,**
**त्याचें हें कबरस्थान आहे.**

**त्याचा मृत्यू २१ एप्रील सन १५६७ त झाला.**

(Pg. 24-26 व Bosq. Hist. Vol. 1 Pg. 109)

**बारदेश प्रांतावर घाड; देवळांचा नाशः—**इ. स. १५६९ त बारदेश प्रांतांतील सारीं देवळें पाडून टाकण्यांत येऊन त्यांचें व सासष्टींतील देवळाचें राहिलेलें उत्पन्न सरकारात जप्त झालें. याचेळीं देवळाच्या उत्पन्नाची चौकशी झाली व तींत असें दिसून आलें कीं, 'गांवकर पळून गेल्यामुळें तीनतीनदां दवंडी पिटली तरी, वाइगणें (रब्बी) पेरायला कोणीच येईना फक्त कुकळ्ळी सांखवाळ, मुरगाव, इसशीं व केळशी एवढीं गांवें मात्र वसलीं आहेत. कुशाळ (कुशस्थली) गांवांत तर खाऱ्या पाण्यानें सारी जमीन नासून गेल्यामुळें, सर्द (खरीप) किंवा वांइगण कांहींच करतां येईना'

इ. स. १५७१ त ह्या परिस्थितीनें सरकारचे डोळे पुन: उघडले व पोर्तुगाल-हून पुन: हुकूम सुटले कीं, "हिंदूवर होणाऱ्या जुलमाची चौकशी करावी. त्यांना बेकायदेशीरपणें गुलाम बनविलें गेलें असल्यास, त्यांची जिंदगी लुटली गेली असल्यास, त्यांच्या मर्जीविरुद्ध त्यांकडून पैसे उपटले गेले असल्यास, त्याचा सर्व निवाडा व्हावा व त्यांतच आपला पुरावा सादर करण्याची नोटीस, हिंदूंना असतील तेथें देण्यात यावी. या सर्व प्रकारची योग्य ती दुरुस्ती व्हावी, मग तिजमुळें कोणत्याही व्यक्तीला व कितीही मोठ्या दर्जाच्या इसमांनां दुखवावें लागलें तरी हरकत नाहीं." हिंदूना वाटलें कीं, आतां मात्र आपला न्याय झाल्याशिवाय राहत नाहीं. न्यायाचा, शांततेचा व सहिष्णुतेचा हाच प्रभातकाळ आहे. मोठ्या आशेनें भग्न देवालयांच्या तळावात त्यांनीं स्नानें केलीं व देवाकडे केलेले मोठमोठे नवस फेडले. पण हा त्यांचा भ्रम क्षणभंगुर होता आणि तो अल्पावधींतच नष्ट झाला. आजवर त्याचें धार्मिक स्वातंत्र्यच कायतें नष्ट करण्यांत आलें होतें. त्या पाखंड्यांना याही पेक्षां जबर शिक्षा मिळावयाची राहिलीच होती. त्याचा

६

पोटच्या घांस अद्यापि काढून घेण्यात आला नव्हता. त्याबाजूनें आजवर प्रयत्न झाले नव्हते असें नाहीं, परंतु शेवटचा घाव अजून बसावयाचाच होता. (Pg. 28-29)

**पोटावर पायः**—इ. स. १५७३ त खोल गांवांतील गांवकऱ्यांनीं फोर (सरकार देणें) न देतां उठावणी केली म्हणून तो गांव सरकारजमा झाला. ख्रिस्ती गांवकर ज्या कोमुनदादींत अल्पसंख्य होते, तेथें त्यांच्या गैरहजिरींत, हिंदु गांवकरांना सभांतून बोलण्याची व ठराव आणण्याची बदी झाली आणि बहुसंख्य ख्रिस्ती गावकरांच्या कोमुनदादींतून त्यांना अजीबातच हांकलून देण्यांत आलें. (Pg. 29-30)

**अपमानकारक हुकूम-वाहनांची बंदीः**—इ. स १५७४त ब्राह्मण पंडितांना व वैद्यांना, घोड्यावरून, डोलींतून किंवा पालखींतून फिरण्याची बदी करण्यांत आली. आज्ञाभग करणारास, पहिल्या खेपेस १० असर्फ्यां दंड, दुसऱ्या खेपेस २० असर्फ्यां दंड आणि वाहनांची जप्ती व तिसऱ्या खेपेस गुलामगिरी अशी शिक्षा फर्मावण्यांत येऊं लागली. सरकारवाड्यांत जाणाऱ्या वैद्यांना मात्र ती लागू करण्यांत आली नाहीं.

**इ. स. १५७५** त ही बंदी ब्राह्मणाप्रमाणेंच इतरानांही लागू करण्यांत आली. हुकूम मोडणारांस वाहनाची जप्ती व ५० असर्फ्यां दंड होऊन त्यांतील निम्मा बातमीदारास व निम्मा सरकारात घेण्यात येई.

**इ. स. १५८७** त गोव्यांत तिसरी ख्रिस्ती कौन्सिल भरली व तींत झालेल्या ठरावांन्वयें, हिंदूना जानवें वापरण्याची बंदी झाली, विवाहसंस्कार बद करण्यांत आले व अनिष्ट हिंदूंना हद्दपारीचा हुकूम जारीनें अमलात आला; या संस्कार-बंदीच्या हुकुमाला १५९४ सालींच सरकारी मान्यता मिळाली. (Pg. 42)

**इ. स. १५९२** त चौथी कौन्सिल भरली व तींतील ठरावांनीं हिंदु नापिता-कडून स्मश्रु करविणें व हिंदु नोकर ठेवणें, ह्या गोष्टी नवख्रिस्त्यांना निषिद्ध ठरविण्यांत आल्या.

**इ. स. १५९५** सालीं या साऱ्या जुलमांचा कळस झाला. त्याचा झालेला परिणाम 'तोंबु जॅराल', (Tombo geral) नांवाच्या इतिहासांत फ्रांसीस्कु दीयश नामक लेखकानें पुढील प्रकारें वर्णन केला आहे. "सासष्टींतील उत्कृष्ट शेती

म्हणजे आरोग्याच्या बाबतींत व सुपीकपणांत अख्या कोंकणातील उत्तमोत्तम जमीनीच आहेत परंतु तूर्त लोकवस्तीच्या अभावीं त्या साऱ्या पडीत आहेत. देवळांचा विध्वंस व बाटाबाटीचा जुलूम या गोष्टीला लढायीइतकाच कारणीभूत झाला आहे.'' पण या इशाऱ्याचा काहींच उपयोग न होतां इ. स. १५९८ त हिंदु कारागिरानें ख्रिस्ती शिष्यांना शिकविणें हा गुन्हा ठरविण्यांत आलाच. ( Pg 42 )

**त्यांच्या चिकाटीची धन्य असोः**—परंतु इतक्याही जुलुमांतून वाट काढून मातृभूमीचा मोह न सोडवल्यामुळें, ज्यानीं तेथेंच वस्ती केली होती त्यांची धन्य असो. आणि असे बहाद्दर तरी थोडे होते ? एका गोवा शहरातच त्यांची संख्या वीस हजारांवर होती त्यांनीं अडचणींना जुमानलें नाहीं, ते जुलुमानीं गांगरले नाहींत, त्यानीं संकटास दाद दिली नाहीं, ते अपमानानें हतप्रभ झाले नाहींत. साऱ्या संकटाना, साऱ्या अडचणींना व साऱ्या जुलुमांना, मोठ्या चिकाटीनें आणि धैर्यानें तोंड देऊन ते गोव्यालाच चिकटून राहिले! पण पापभीरु ख्रिस्त्याना हें कसें सहन व्हावें. त्याचे प्रयत्न पुन जोरानें सुरू झाले.

इ. स. १६६० त राजे साहेब फिलीप 'भक्तिमान' यांना गोव्यांतून एक पत्र गेलें कीं, "प्रभूच्या गौरवासाठीं, व ह्या राज्याच्या आणि आमच्या धर्माच्या हितसंबधाकरितां, अनिष्ट अशा ( हिंदूंना ) लोकांना अपिलाचा किंवा तक्रारीचा हक्क न देतां ह्या बेटांतून हद्दपार करून पुनरेव गोवा बेटात किंवा आसपासच्या मुलुखांत आल्यास, देहांत शिक्षेसहित सर्वस्वनाशाची शिक्षा देण्याचा अधिकार ( व्हॉइसरायांना ) द्यावा." 'अपिलाचा किंवा तक्रारीचा हक्क न देतां' या शब्दावरून असें वाटतें कीं, तोंवर बिचाऱ्या अनाथ हिंदूंना न्यायसत्तेचा थोडा तरी फायदा मिळत असावा आणि तोच तर ह्या "पापभीरूना" सलत होता.

**कुंकळ्ळीचें बंड व त्याचे परिणामः**—येथें आपल्याला जरा मागें जावें लागणार आहे. ह्या बंडाची हकीकत बरीच महत्वाची असल्यामुळें ती येथें स्वतन्त्रच दिली पाहिजे. मागें आम्ही सांगितलेंच आहे कीं, कुंकळ्ळी, वेळ्ळी, आंबेली, वेर्डें, व असोळणें, हीं गांवें दूर असल्यामुळें, तेथें जेसुईट पाद्र्यांचा उपद्रव किंवा रायतुरच्या किल्लेदाराचा हात नीटसा पोंचत नव्हता आणि त्याच कारणानें, सासष्ट प्रांतांतील इतर ठिकाणची बरीच मंडळी, या गांवाच्या आसऱ्यास गेली होती. तेव्हां पासूनच (इ. स. १५६७) कुंकळ्ळीकरावर जेसुइटांचा व किल्लेदाराचा दांत बसला. त्यामुळें इ. स. १५६९ सालापासून कुंकळ्ळीकरांच्या व जेसुइटाच्या ( म्हणजे सरकारच्या ) झटापटी सुरू झाल्या. या झटापटींतच पांच सात वर्षें गेलीं. दर-

म्यानच्या काळांत सासष्ट प्रांताचा तगादेदार, इस्तेव्ह रद्रीगिश, हा सरकारी वसुलास तिकडे गेला असतां, कांहीं बाचाबाची होऊन मारला गेला. बाचाबाचीचें कारण दुसऱ्या कौन्सिलचे ठराव होते. त्या ठरावामुळें संतापलेल्या गांवकऱ्यांनीं फोर ( सरकार देणें ) देण्याची नाखुषी दाखविली व तिचा परिणास बाचाबाचींत झाला.

जेसुइटाच्या सांगीवरून श्री शांतादुर्गा कुंकळ्ळीकरीण इच्या फाल्गुनोत्सवाला इ स. १५७५ मध्यें सरकारनें बंदी केली. कोचीहून सरकारी पत्रव्यवहार घेऊन एक हरकारा गोव्याला व्हॉइसरॉयकडे जात होता त्याच्याकडून पत्रें हिसकून घेऊन कुंकळ्ळीकरांनीं त्याला येशूच्या भेटीस पाठविलें आणि बंडाचा पुकारा केला. आदिलशाहीकडे चालत असलेली लढाई बंद होऊन यावेळीं सरकारला थोडासा विसावा मिळाला होता.

लागलीच दर्यासारंग, दों जील आनिश् माश्कारेन्यश्, याला जलमार्गानें व रायतुरचे किल्लेदार, गोमिश आनिश् द फिगेरेद याला खुष्कीनें, कुंकळ्ळी व असोळण्यावर हल्ला करण्यासाठीं पाठविण्यात आलें. उभयतांनीं मिळून कुंकळ्ळीची व असोळण्याची बरीच नासाडी केली. सैन्यानेंच काम भागणार नाहीं असें वाटल्यावरूनच कीं काय, विशेषत देवळाचा विध्वंस त्या शिपायाच्यानें होणार नाहीं, असेंही दिसून आल्यामुळें असावें, त्याच्या मदतीला पाद्रि आंतोनियु प्रांसिश्कु हे ओडलीचे व्हिगार्यु व पाद्रि पॅरु बॅर्नु हे कोलवेंचे व्हिगार्यु, ह्या जेसुइटानाही तेथें रवाना केलें ओडलीच्या व्हिगार्युनें असोळण्याच्या देवळाना आग लावण्याचें शतकृत्य केलें व दुसऱ्यानें कुंकळ्ळीच्या देवळाची राखरांगोळी करून टाकली.

सैन्य परत गेलें व शांतता झाली. हिंदूनीं आपलीं घरें व देवळें पुन जशाचीं तशीं बांधून काढलीं. पुनः पाद्रि आंतोनियु प्रांसीश्कु व पाद्रि पॅरु बॅर्नु यांनीं चुगली करून सैन्य रवाना करविलें. आणि परत एकदा त्या गांवांचा उच्छेद करण्यांत आला. मात्र यावेळीं देवळांवर किंवा घरावरच सक्रांत न येतां, त्यां बरोबरच नारळीचीं भाटें ( बागा ) व पेरलेलीं शेतें देखील उभय पाद्रींच्या चिथावणीवरून, त्या लोकांनीं तोडून तुडवून उजाड करून टाकलीं. शेवटीं आत्यंतिक अपमान म्हणून भग्न देवळाच्या जागेवर एक गाय तोडून तिच्या रक्तमांसाचा सडाही पण घातला. बिचारे असहाय्य गांवकरी ! गौरवरक्षणाचा मार्गच त्यांना राहिला नाहीं पोर्तुगीजांच्या ह्या सैतानी व भीषण अत्याचारांमुळें घरें, दारें व

देवळें तर त्यांना अंतरलींच होतीं, पण आतां नारळीच्या भाटांच्या विध्वसामुळें उपजीविकेचीच भ्रांति पडणार होती व तीही एक दोन वर्षें नसून, पुन: नारळी उत्पन्न होईतोंवर, म्हणजे निदान आठ दहा वर्षें तरी पडणार होती. अर्थात्‌च त्यांनीं तहाचें बोलणें लावलें व व्हॉयसरॉयनेंही तें कबूल करून त्यांना जरतारी वस्त्रें देऊन कौल दिला.

पुन: एकदा शांतता झाली. पण जेसुइटाना तर तीच नको होती. इ स. १५८३ त, जेसुईट पाद्रि रोदोल्फ आकाव्हीव्हा यांना, उल्लेखित पाद्रि आतोनियु फ्रांसिस्कु, पाद्रि बॅर्नु, मडगावचे व्हिगार्यु पाद्रि आफोंस पाशेकु, यांच्यासहवर्तमान कुंकळ्ळी येथें चर्च बाधण्यासाठीं म्हणून पाठविलें. पाद्रीवर्गांबरोबर, नोकर वगैरे इतर माणसें मिळून जवळ जवळ पन्नास माणसाचा लवाजमा होता. आपल्या नाशास कारणीभूत झालेले ते उभय पाद्री दिसतांच, गांवकऱ्याचें रक्त पुनः उसळलें आणि पाद्रीवर व त्यांच्या लवाजम्यावर ते बेफामपणें तुटून पडले. सर्व लवाज-म्यासहित पाद्रींचा चेंदामेंदा झाला. दुमींगुश आगियार नांवाचा एकच इसम काय तो इतक्या माणसांतून बचावला.

परंतु गांवकऱ्यांचा हा गुन्हा अत्यत क्रूरपणानें शासिला गेला. स्वत: व्हॉय-सरॉय आणि रायतुरचा किल्लेदार, यानीं जलमार्गानें व खुष्कीनें जाऊन त्या गावाचा तिसऱ्यानें नाश केला, व त्यांच्या कोमुनदादी जप्त करून कुंकळ्ळी व वेंडें हे गाव जुवांव दा सील्व्ह याला बक्षिस दिले (ते आता त्यांच्या वशजाकडे—मार्केझिझ द फोंतैर इ आलोर्न याच्याकडे—आहेत )व बाकीचे दों पेद्रु द कास्त्रु यांना बहाल करण्यात आले त्यानें ते १५८५ सालीं जेसुईट कपनीच्या नांवें केले. सरकारनें हें दानपत्र प्रथम मजूरच केलें नव्हतें परंतु मागाहून जेसुइटांनीं भगिरथ प्रयत्नानें त्यांचें उत्पन्न आपल्या सा पाव्लच्या कॉलेजकडे घेतलें इ स. १८३२ सालीं, सनदशीर राज्यपद्धति पुकारली जातांच, आबेली, वेळ्ळी व असोळ्णें हे तीन गांव सरकारनें पुनः आपल्या ताब्यात घेतले ते अजून त्यांच्याचकडे आहेत.

बंडाचीं अतस्थ कारणें समजून घ्यायचीं झाल्यास, उपरोच्चारित फिलिफ नॅरि शाव्हियॅर यांनींच लिहिलेल्या ग्रथांत असें स्पष्टच सांगितलें आहे कीं, "अत्यंत निंद्य व तिरस्करणीय अशीं साधनें उपयोगात आणून जेसुइटानींच ते गांव त्याच्या हक्कदार गांवकऱ्याकडून हिसकवून सरकाराकडून जप्त करविले."

कत्तल झालेले पाद्री, हुतात्मे धर्मवीर म्हणून प्रसिद्धि पावले व पुढें त्यानीं पुष्कळ दैवीचमत्कार (!) केल्यामुळें, १८९३ त त्यांना पोपकडून साधुत्वाचा शिक्का मिळाला. आणि बिचारे हिंदु हुतात्मे! त्यांचीं तर इतिहास नावें देखील विसरला आहे!!

**बाहेर जाणारांवर डोईपट्टीः**—राजकारणापेक्षां धर्मकारण श्रेष्ठ मानून त्याप्रमाणें राजसत्तेचें वर्तन सुरू झालें, म्हणजे राजकीय अधिकाऱ्यांपेक्षां धर्माधिकाऱ्यांना विशेष महत्व प्राप्त होऊन, राज्यकारभारांत गोंधळ माजल्याशिवाय राहत नाहीं असें इतिहास सांगतो. हीच परिस्थिति पोर्तुगीज साम्राज्यांत आमूलाग्र निर्माण झाली होती. हिंदूंवर झालेल्या जुलुमांप्रमाणेंच राजसत्तेवर देखील सोळाव्या व सतराव्या शतकांत पाद्र्यांनीं बरेच जुलुम केले होते. परंतु प्रस्तुत ग्रथाचा तो विषय नव्हे. एकट्या जेसुईट कंपनीचेंच या बाबतींतील वर्तन पहावयाचें असल्यास, तें प्रस्तुत लेखकानें विद्यासेवकाच्या १९२७ च्या सप्टेंबरच्या अकात दिलेलें आहे. पण आपण आपल्या विषयाकडे वळूं. इ. स. १५८७ पासून पोर्तुगीज हद्दींत हिंदूना धार्मिक संस्कार करण्याची बंदी असल्यामुळें, ते पोर्तुगीज हद्दींतून परसत्तेंत जाऊन त्या ठिकाणीं आपले विवाहादि संस्कार उरकीत असत. परंतु जेसुइटांनीं यातच पैसा उत्पन्न करावयाचा मार्ग शोधून काढला. बाहेर जाणाऱ्या प्रत्येक इसमावर त्यांनीं कर बसवून तो कंपनीसाठीं वसूलही करण्यांत येऊं लागला. इ स. १६०२ मध्यें गोवा शहरानें ह्या कराविरुद्ध पोर्तुगाल सरकारकडे तक्रार केली तेव्हां राजे फिलिप ३ रे ऊर्फ भक्तिमान् यांनीं इ स. १६०४ त व्हालादोलीद शहरातून या कराच्या चौकशीचा हुकुम सोडला. परंतु तो कर काढून टाकल्याचा उल्लेख मात्र इतिहासांत नाहीं.

**विवाह संस्कारांवरील धाडः**—येथवर धार्मिक संस्कारांची पुन पुनः बंदी झालेली आपण पाहिलीच आहे. परंतु सतराव्या शतकांत विवाहसंस्कारावरच स्वतंत्रपणें धाड पडली होती. आनुषंगिक या बाबतींत सतराव्या शतकांतदेखील पुष्कळच हुकुम सुटले होते. आम्ही केवळ ठळक ठळकच देऊं.

इ. स. १६१३ त व्हॉयसरॉय दों जॅरोनिमु अझेव्हेदु, यांनीं असा हुकुम दिला कीं, "चर्चेनें जे दिवस लग्नास निषिद्ध ठरविले आहेत त्या दिवसांत, आणि इतर दिवसांतही, पाखंड्यांनीं लग्नें करू नयेत. केल्यास एक हजार असर्फी दंड होईल व त्यापैकीं एक तृतीयांश बातमीदारास देऊन बाकीचा सरकारजमा केला

जाईल. ज्यांना दंड देण्याची ऐपत नसेल, त्यांना तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा मिळेल. ज्या नारळीच्या भाटांतून हीं लग्नें होतील त्यांच्या मालकांनांही अशीच शिक्षा मिळेल." परंतु हा हुकूम अपुरा आहे अशी आर्चबिशपनें तक्रार केली त्यामुळें तो रद्द झाला.

इ. स. १६२० सालीं उपरोक्त कायदा बदलून त्या ऐवजीं "कोणत्याही राष्ट्रांतील पाखंड्यांनीं यापुढें आपले विवाह, गोवा बेट, त्याच्या हद्दींतील मुलूख व बेटें यांत करूं नयेत. केल्यास त्यांना हजार असर्फ्यांचा दंड करण्यांत येईल" असा दुसरा सुधारलेला कायदा झाला. परंतु याचा परिणाम असा झाला कीं, हिंदूंचे विवाह परमुलुखांत होऊं लागले आणि विवाहप्रसंगीं होणाऱ्या खरेदीचा फायदा, अर्थात्‌च बाहेरील व्यापाऱ्यांस मिळूं लागला. शिवाय विवाहाच्या बंदीमुळें लोकवस्ती देखील कमी होऊन एकंदरींत पोर्तुगीज सरकारचेंच नुकसान होऊं लागलें. त्यामुळें

इ. स. १६२१ तच त्याचें उच्चाटन होऊन मूळच्या १६१३ चाच कायदा पुनः अमलांत आणला गेला. तरीपण या गोष्टीला पोर्तुगाल सरकारची मंजुरी १६२४ व १६२५ या सालांत मिळाली आणि या कायद्याची अमलबजावणी विकृत होऊं लागून सारा गोंधळच माजला.

इ. स. १६७८ त गोव्यांतच विवाह करायची परवानगी हिंदूंना मिळाली. परंतु त्या परवानगीच्या शर्ती इतक्या गमतीच्या होत्या कीं, हिंदूंनीं यापेक्षां परप्रांताचाच आश्रय घेणें श्रेयस्कर ठरविलें. "घरांत दरवाजे बंद करून हे विवाह केले पाहिजेत व तेथें विवाहप्रसंगीं देवळाचे पुजारी, भट, वैदिक इत्यादिकांनीं हजर असतां कामा नये किंवा होमहवनादिक कृत्येंहि करूं नयेत." असा तो हुकूम होता. त्याची अंमलबजावणी दुरुस्त रीतीनें होण्यासाठीं, विवाहसमारंभ चालू असलेल्या घरांभोंवतीं सुप्रसिद्ध अशा इंकिझीसांवांच्या देखरेखीखालीं हत्यारबंद शिपायांचे चौकीपहारे बसविण्यात येऊं लागले.

---

१ घरांतून लग्नें करूं नयेत असा पूर्वीचा हुकुम असल्यामुळें हिंदूनीं आपले संस्कार बाहेर मंडप घालून करण्याचा परिपाठ पाडला होता. शिवाय एरवीं देखील मंगलकार्यप्रसंगीं मंडपाशिवाय हिंदुसमाजाचें मुळींच चालत नाहीं. तेव्हां हे मंडप ज्या बागांतून असेल त्या बागावरील हा हल्ला होता.

हिंदूनीं सरकारांत असा अर्ज केला कीं, " अशा रीतीनें आपल्याला विवाह-संस्कार करितां येत नाहींत. कारण धार्मिक विधीशिवाय संस्कार मुळींच संभवत नसल्यानें, असे हे विवाह म्हणजे व्यभिचारच ठरतात. तेव्हां इतःपर आपल्याला उघड्या हवेंत, सूर्यप्रकाशांत विवाह करायला परवानगी मिळावी."

व्हायसरॉय दों आंतोनियु पाइश् द साद यांनीं ही परवानगी ताबडतोब देऊन १६७८ तील हुकूम रद्द ठरविला. परंतु वरील हुकुमापेक्षांही ही नवी परवानगी गमतीची होती. " विवाह समारंभ होड्यांतून करावे व होड्या सरहद्दीवरील नद्यात राखाव्या. जवळपास ख्रिस्ती इसम असतांना मात्र विवाह करू नयेत. " असा तिचा आशय होता. मासल्यासाठीं हें इतकेंच पुरे.

**मातापुत्रांची ताटातूटः**—मागें आपण पाहिलेंच आहे कीं, पोरक्या मुलांचा ताबा घेऊन त्यांना ख्रिस्ती बनविण्याचा हुकूम, इ. स. १५५९ त सुटला होता. आणि इ. स. १५६०त ह्या हुकुमांतून १४ वर्षांवरील मुलांना वगळण्यांत आलें होतें. तथापि पुढें १६४६त जेसुइट पाद्रि आंतोनियु सिकैर यानें असा एक हुकूम मिळविला कीं, बाप वारलेल्या मुलाला आई व इतर वडील माणसें असलीं तरी, त्याचा ताबा घेऊन त्याला ख्रिस्ती करावें. अर्थातच हजारों मुलांना पकडण्यांत येऊन बेतीं येथील ख्रिस्ती शाळेंत कोंबण्यात आलें. पुष्कळ हिंदूंना हा जुलूम असह्य झाला व त्यांनीं आपलीं घरें दारें उचलून मुसलमानी अमलात नेलीं. पुढें इ. स १६८१ त परत मुळचाच १५५९ तील हुकूम कायम करण्यांत आला.

**भाषेवरील संकट—इ. स. १६८४ः**—हें वर्ष हिंदूच्या मातृभाषेवरील संकटांच्या योगानें संस्मरणीय झालें आहे. आजवर ख्रिस्ती पाद्री व कौन्सिलनें केवळ ग्रंथच जाळून टाकले होते. आणि धर्मप्रसारासाठीं भाषेचा उपयोग होत असल्यानें, पाद्यानीं देशभाषा शिकावी असा प्रयत्न सां पाव्लच्या कालेजात करण्यांत आला होता. त्यास अनुसरूनच एका जेसुइट पाद्यानें कोंकणी भाषेचें व्याकरण तयारही केलें होतें. फादर स्टीफन्सचें ख्रिस्तपुराण देखील याच प्रयत्नाचा परिणाम होता. पण १६८१ ते १६८६च्या सुमारास हा क्रम बदलला व " पोर्तुगीज मुलखात राहणाऱ्या एकंदर इसमानीं, मग ते कोणत्याही धर्माचे किंवा राष्ट्राचे असोत, पोर्तुगीज भाषाच बोलली पाहिजे. या साठीं तीन वर्षांची मुदत देण्यांत येईल. त्या मुदतीनंतर देशभाषेचा उपयोग करणारास वाटेल ती शिक्षा करण्यांत येईल " असा हुकूम निघाला.

**कलावंत स्त्रियांवर घाडः**—गायक समाजांतील कलावंत स्त्रियांना पोर्तुगीज अमलांत राहण्याची बंदीही याच सुमारास झाली. हुकूम तोडणाऱ्या कलावंतांना देहांत शिक्षेचा दंड ठरविला होता. 'त्यांना कोणींच आपल्या हद्दीत आश्रय देऊं नये दिल्यास त्यांना शिक्षा ठरविल्या होत्या त्या अशा'—देणारा फिदाल्ग (बड्या घराण्यांतील सरदार) असला तर त्याला एक हजार असर्फी दंड व मान मरातब वगैरेंची जप्ती ही शिक्षा ठरविली होती; इतर वर्गांतील असल्यास, कैद व हद्दपारी; ख्रिस्ती इसम असल्यास फटके व ९ वर्षें तारवांवर सक्तमजूरी आणि पाखंडी असल्यास शेंडी कापणें, भररस्त्यात फटके मारणें व दहा वर्षें तारवांवर सक्तमजुरी इतकी शिक्षा मिळत असे.' अर्थात् ख्रिस्ती बनल्यापासून फटके भररस्त्यांत न मिळतां गुप्तरीतीनें मिळत व सक्तमजुरी एक वर्ष कमी मिळत असे, इतका फायदा होई.

**अठरावें शतकः**—ह्या शतकांत जुलूम करायला नवीन असें आणखी कांहींच राहिलें नव्हतें. परंतु धर्मकारणाच्या पुरस्कर्त्यांना नवीन नवीन क्लृप्त्या सुचल्याच.

**शेंडीवरील करः**—इ. स. १७०५ सालीं शेंडीवर माणसीं सुमारें आठ रुपये प्रमाणें कर बसविला गेला व १७०६ सालीं त्याची वसुली सुरू झाली. दरसाल सुमारें ८ हजार रुपये उत्पन्न त्या करांतून वसूल होत.

**इ. स १७१५** त "ख्रिस्ती भोयांनीं हिंदूंचीं मचलें (डोलीसारखें वाहन) उचलूं नयेत. हिंदूंनां सरकारी मक्ते देऊं नयेत. कां कीं, तसे ते दिल्यानें हिंदुलोक संपन्न होतात व ह्या रीतीनें मिळविलेल्या संपत्तींतून पांखडी देवांचा भजनपूजनाचा खर्च चालवितात. अर्थात् हें प्रभूच्या गौरवास उणेपणा आणणारें असल्यानें हा दोष सरकारवर येतो" असा हुकूम गोंव्याच्या आर्चबिषपच्या सूचनेवरून राजे साहेबांनीं व्हॉयसरॉयाना दिला. पण व्हॉयसरॉयांनीं उलट उत्तर दिलें कीं, "ख्रिस्ती भोयांचा उपयोग हिंदुलोक करतात तो आपल्या सोयीसाठीं करीत असून ख्रिस्ती लोक भोईपणा पत्करतात ते आपल्या श्रमाचा मोबदला मिळविण्यासाठींच पत्करतात. धर्माचा त्यांत बिलकूल संबंध नाहीं. तसेंच सरकारी उत्पन्नाचे मक्ते हिंदूंकडून काढून ख्रिस्त्यांना दिल्यास त्यांत सरकारी तिजोरीचेंच नुकसान होईल" परंतु हें उत्तर कोणासच रुचलें नाहीं. दुष्ट पाखंड्याच्या नाशापुढें सरकारी तिजोरीला कोण पुसतो!

**इ. स. १७१५** सालीं दुसरा एक धुळींत पडलेला हुकूम जारीनें अमलांत आला. १५६७ त ख्रिस्ती कौन्सिलकडून झालेल्या ठरावानुसार असाही एक हुकूम सोडण्यांत आला होता कीं, गोव्यें शहरांतील हिंदूनीं बायबलाच्या उपदेशाच्या वेळीं हजर राहिलेंच पाहिजे. परंतु त्याची अंमलबजावणी मात्र फारशी झाली नव्हती. उपरोक्त १७१५ सालीं जेसुइटांच्या प्रोव्हिंसियालनें वरील ठराव जारीनें अमलात आणावा, असा ठराव पाद्रीमंडळाकडून (Cabido) पास करून घेतला. देवळें उध्वस्त झालीं, उत्पन्नें, इस्टेटी जप्त झाल्या, सस्कारांची बंदी झाली, भाषेचा नायनाट करण्याचे प्रयत्न झाले, मातापुत्रांची ताटातूट करण्यांत आली, वाहनाची बंदीही झाली, तरी पण धर्मप्रसारकाचा अंतरात्मा शांत झाला नव्हता. कारण अजूनही पाखंड्याना जीव होता. त्यानीं परसत्तेत देवळें नेलीं, त्यांनीं घरें दारें दुसरीकडे बाधलीं, इस्टेटी पुन: मिळविल्या किंवा न मिळविल्या तरी ते भुकेनें मेले नाहींत. तेव्हां त्यांना निर्जीव व हतप्रभ करण्यासाठीं, या कायद्यानुसार त्यांच्या घरांत शिरून, आतील माणसांना फरफटत खेंचीत नेऊन, बायबलचें प्रवचन चालत असलेल्या ठिकाणीं नेण्यात येऊ लागलें. बायाबापड्यावर, म्हाताऱ्या कोताऱ्यांवर, मुलांबाळावर, ह्या हुकुमानुसार काय काय जुलूम झाले असतील त्यांची कल्पना देखील होणें अशक्य आहे.

**इंकिझिसांवानें काय केलें?**:—अजून आम्ही कोणत्याच प्रकारची टीका किंवा चर्चा केली नाहीं नुसते कायदे व हुकूम यांची जत्रीच देत आलों आहों कारण वरील हुकूम वाचतांच चर्चेचें कारणच मुळीं राहत नाहीं. तरीपण ज्यांना ती चर्चा हवी असेल, त्यांनीं उपरोक्त नोरोन्य यांचा मूळ ग्रंथच वाचावा. हा ग्रंथ गोव्यांतील उच्च न्यायकोर्टाच्या चीफ जज्जानें लिहिलेला असून तो सरकारी पैशानें, सरकारी छापखान्यात, पणजी येथें मुद्रण होऊन, सरकारी रीत्याच प्रसिद्ध झाला आहे.

इतक्या ह्या गडबडींत धर्मसमीक्षण सभेनें कांहींच का केलें नाहीं, असा प्रश्न वाचक करतील. परंतु ह्या पुस्तकाच्या आकुंचितपणामुळें त्याला येथें सविस्तर उत्तर देतां येत नाहीं. थोडासा नमुना देत आहों. पाद्रि आंतोनियु व्हियैर नांवाचे जेसुईट कंपनींतील एक गृहस्थ, पोर्तुगीज राजकारणात बऱ्याच उच्च दर्जाचे मुत्सद्दी व वाङ्मयातही बरेच मोठे वक्ते होऊन गेले होते. इ. स. १८९७ सालीं, पोर्तुगालांत त्याचा त्रिशत सांवत्सारिक उत्सव सरकारी रीत्या मोठ्या समारंभानें साजरा झाला होता. उत्सवात व्हियैरविषयीं स्तुतिपर भाषण

करण्याचा मान, यॅन्होर शहराच्या बिषपला मिळाला. त्यांनीं काढलेले उद्गार येथें देत आहों.

"इंक्विझिसावाचा कारभार इतरत्रही लज्जास्पद रीतीनें व बेअब्रुकारक पद्धतीनेंच चालला होता, हें जरी खरें असलें तरी, ऐहिक फायद्यासाठींच करण्यांत येणाऱ्या त्यांच्या हलकटपणास व निंदास्पदतेस गोव्यांत जसा ऊत आला होता, तसा तो इतर कोणत्याही ठिकाणीं आला नव्हता. ज्या स्त्रिया तेथें त्यांच्या पापवासनांस बळी पडावयास तयार नसत, त्यांना आपल्या कैदेंत ठेवून, त्यांच्याकडून आपली पाशवी वासना तृप्त करून, शेवटीं पाखडी ठरवून त्यांनीं जाळूनही टाकलें" ( A. Noronha Pg. 53 )

हे उद्गार साध्या सभेंत निघालेले नाहींत. तर सरकारी रीत्या प्रसिद्धपणें झालेल्या उत्सवांत निघालेले आहेत, व ते काढणारा हिंदू नसून ख्रिस्ती आहे, नव्हे पाद्री आहे, इतकेंच नव्हे तर चर्चेचा बिषपसारखा अधिकारी आहे. ह्या गोष्टीकडे वाचकांचें लक्ष्य खेंचण्याची आम्ही परवानगी घेतों.

इ. स. १७४५ त गोव्याच्या आर्चबिषपनें असेंही फर्मान सोडलें कीं, सासष्ट, बारदेश व तिसवाडी प्रांतात, पोर्तुगीज न जाणणाऱ्या ख्रिस्त्यांचीं लग्नेंच होऊ नयेत. पोर्तुगीज शिकायला, ब्राह्मण व चाड्डे याना सहा महिने व इतरांना एक वर्ष, अशा मुदती देण्यात आल्या होत्या. परंतु पुढें लवकरच या हुकुमांतील मूर्खपणा लक्ष्यांत येताच स्वत: आर्चबिषपनेंच तो रद्द केला.

**नवीन काबिजादींचा परिणाम :—** इ. स. १७६३ त सोंधेकर राजांकडून अंतरूज व पंचमहाल ( फोंडें, सांगें, केपें व काणकोण कोंसेल्य ) तहान्वयें पोर्तुगीज सरकारकडे आले. आणि त्याबद्दल सोंधेकरांना २० हजार असर्फ्यांचें वर्षासन ठरलें.*

ह्या मुलखालाच नवीन काबिजाद असें नांव मिळालें. परलोकवासी विठ्ठल गोरक्षराव वर्दे वालावलीकर या मुत्सद्याच्या प्रयत्नांमुळें, ह्या मुलुखांतील लोकांना पोर्तुगीजांनीं आपापल्या चालीरीती व धर्म चालविण्याचा कौल ता. ५ जून सन

* हें वर्षासन तीस हजार रुपयांचें होतें, असें श्री शांतादुर्गा संस्थानच्या इतिहासांत, माझे मित्र श्रीयुत विष्णु रंगाजी शेळडेंकर व मुकुंद सदाशिव शेळडेंकर यांनीं एका जुन्या लेखावरून उल्लेखिलें आहे. परंतु सरकारीरीत्या वीस हजारच असर्फ्या होतें असें दिसून येतें.

१६६३ रोजीं जाहीरनाम्यानें दिला. परंतु हिंदुलोक आतां स्वानुभवानें शहाणे झाले होते. अर्थात् फोंड्याच्या कामर जँरालनें (कोमुनदादींच्या महाल कौन्सिलनें) धार्मिक हक्करक्षणाविषयीं स्पष्ट वचन द्यावें असा अर्ज केला. त्या अर्जाला·

"त्या महालातील प्रजेला, वाटेल त्या प्रकारचें नवें बांधकाम करण्यास, व जुनें मोडलेलें दुरुस्त करण्याला बिनहरकत परवानगी आहे"

असें वचन उत्तरादाखल मिळालें. वचनांतदेखील स्पष्टपणें देवळाचा उल्लेख करायला सरकार कचरलें! कारण त्यामुळें पाद्रींचा क्षोभ अनावर झाल्यास काय करावें? परंतु परवानगीचा प्रच्छन्न हेतु मात्र तसा होता खरा. पुढें इ. स १७७१ त आपले रीतिरिवाज, वैयक्तिक स्वातन्त्र्य व इस्टेटीचा कबजा अखंड राखण्याची हमीही देण्यांत आली. याचा परिणाम अर्थातच जुन्या काबिजादींवर झाल्याशिवाय राहिला नाहीं.

**उलटा वारा: मार्केझ द पोंबालचें युग:**—इ. स. १७७१ त देशी ख्रिस्ती व युरोपियन असे जे भेदभाव अजूनही सरकारांत मानले जात होते. ते ह्या सुप्रसिद्ध पोर्तुगीज मुत्सद्यानें नष्ट करून सर्व पोर्तुगीज प्रजाजनास कायद्यानें सारखाच दर्जा दिला. हिंदूंचा समावेश मात्र या समानतेंत करण्यांत आला नाहीं जेसुइटांची हकालपट्टी इ. स. १७५९ तच झाली होती. इ. स. १७७४ त त्यांनीं हद्दपार करविलेल्या एकदर प्रजाजनाना परत येण्याचा हक्क मिळाला. तरीपण साऱ्या जुन्या काबिजादींत सुमारें दहा हजार पाद्री होतेच. इ. स. १७८३ त पोर्तुगीज मिनिस्टर मार्तीन्यु मेल्लु इ कास्त्रु यांनीं गोव्यांतील पाद्रींना काबूत ठेवण्याबद्दल आर्चबिषपला कडक हुकूम देऊन पाद्री या पुढेंही जर बेलगाम वागतील तर सरकार त्यांच्या साऱ्या संस्थाच बंद पाडील अशी धमकीही दिली होती. इ. स. १७८९ त जगप्रसिद्ध फ्रेंच राज्यक्रांति झाली व तिजमुळें झालेल्या नवमतप्रसारानें जोरजुलमांतील पूर्वीचा आवेशही बराच कमी झाला होता. इ. स. १८१२ त इंक्विझिसांवाचीच उचलबांगडी झाली. अर्थात्च ह्यापुढें आणखी जुलुम होण्याचे बंद पडले इंक्विझिसाव बंद होण्यास हा नवमतप्रसारच कारणीभूत झाला असावा. ह्या सहिष्णुतेच्या धोरणानें प्रेरित होऊनच व्हॉयसरॉय कोंद द रीयु पार्दु यांनीं आर्चबिषपच्या विरोधास न जुमानतां मयें येथील सामान आणून पणजी येथें श्री महालक्ष्मीचें देऊळ बांधण्यास हिंदूंना परवानगी दिली. परंतु असल्या हुकुमांनीं प्रभू येशू ख्रिस्ताची इतराजी होणार म्हणून ते पाद्रींनीं पाळूं नयेत असा उपदेश प्रत्यक्ष लेखी सरक्यूलर काढून आर्चबिषपनें केला. आणि इतक्यावरच न थांबतां, इ. स. १८३० त जुन्या काबिजादींत देवळें बांधू नयेत

असा जो हुकूम पूर्वी अमलांत होता तो पुनः जारीनें अमलात आणण्याबद्दल खास राजेसाहेबाकडूनच फर्मान मिळविलें.

**सनदशीर राज्यपद्धतींत**:—जुलुमाचें विहंगम दृष्टीनें अवलोकन करीत करीत, चर्चा, टीका, किंवा विवेचन न करतां, किंबहुना ह्या वेळोवेळच्या फर्मानां-मुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीचें फारसें वर्णन देखील न करितां, आपण सनद-शीर राज्यपद्धतींत पोंचलों आहों. "कार्त कोंश्तितुसियोनाल"मुळें सरकारी धर्म जरी क्याथॉलिक ठरला होता, तरी इतर धर्मांना बंदी नव्हती, हें दुसरीकडे केलेल्या विवेचनावरून वाचकांना दिसून आलेंच असेल. ( राजकीय परिस्थिति—सदनशीर राज्यपद्धति पहा. ) हिंदूंना विवाहादि संस्कार करण्याची मुभा मिळाली; त्यांच्या देवळांवर आतां हल्ले होत नव्हते; त्यांच्या पोरक्या मुलांना आतां बाप्तिस्मा देण्यात येत नव्हता, इंकिझिसांव तर नामशेष झालें होतें; जेसुईट कंपनीसारख्या धार्मिक संस्था बंद होऊन त्यांनां पूर्वी दिलीं गेलेलीं, असोळणें, वेळ्ळी, आंबेली हीं गांवें व इतर सारी इस्टेट सरकारनें तिजोरींत जप्त केली होती; हिंदूंच्या देवालयांच्या व्यवस्थेचा कायदा ( महाजन मंडळीचा कायदा ) सरका-रातूनच तयार होऊन अमलातही आला होता, फार तर काय, पण इ. स. १८५१ सालीं त्यांच्या मनुस्मृतींतील कायद्याचीं कित्येक तत्वें ग्रहण करून सरकारनें त्यांना कायद्याचें स्वरूप हिंदूंसाठीं दिलें होतें; १८८० सालीं हा कायदा पुनः दुरुस्तही होऊन गेला होता. परंतु म्हणून कांहीं त्यांच्या मागचा धार्मिक ससेमिरा सुटला नाहीं.

**ससेमिऱ्याचीं कारणें व स्वरूप**:—सासष्ट प्रांतातील असोत किंवा इतर प्रांतांतील असोत, परंतु सामान्यतः ख्रिस्त्यांचें शिक्षण थेट १९ व्या शत-काच्या सुरुवातीपर्यंत तरी, केवळ पाद्र्यांच्याच ताब्यांत होतें. आणि विशेषेंकरून गोंव्यातील शिक्षणाचीं मुख्य सूत्रें जेसुइटांसारख्या कडव्या, कुटीलनीतिनिपुण व अत्यंत असहिष्णु ख्रिस्त्यांकडेच एकवटलीं होतीं. हिंदू म्हटला म्हणजे तो त्याज्य; तो जेंतीव्ह, त्याचा धर्म म्हणजे सैतानाशीं केलेला करार, त्याचे रीतिरिवाज केवळ रानटी; तो प्रामाणिक असणें किंवा सद्गुणी असणें अशक्यच आहे; अशा सम-जुती शेंकडों वर्षें ज्या शिक्षणांत चालत आल्या, तें ज्यांच्या नसांनसांतून भिन-लेलें होतें, ते जेसुइटांचे उत्तराधिकारी अद्याप गोमंतकात होतेच. मुळचा धार्मिक आवेश थंड होऊ नये म्हणून कोंफेसियोनायुं ( पातकोच्चाराची जागा ) व पूल्पितु ( व्यासपीठ ) ह्या उभय स्थानांवरून हिंदुधर्माची निंदा चालवून, मुळच्या

धर्मद्वेषाच्या विझत्या कुंडांत पाद्रीमंडळी हरघडीस नव्या समिधा टाकीतच होते. आणि त्यांना उत्तर देण्याचीही सुराणी नव्हती कारण उत्तर दिलें गेल्यास सरकारी धर्माच्या अपमानाचा गुन्हा पदरीं पडत होता. धर्मकारणाचें प्राबल्य खुद्द पोर्तुगालांतून निघून गेलें होतें, परंतु पोर्तुगीज संस्कृतिसंवर्धनाच्या नांवाखालीं वसाहतींतून त्याचा उपयोग करावयाचें धोरण मुत्सद्यानीं अंगिकारलें होतें; गोव्याच्या गव्हर्नरच्या सल्लागार मंडळांत आर्चबिषपची जागा अजूनही अढळ होती; ज्या कौन्सिलकडून गव्हर्नरच्या गैरहजिरींत राज्यकारभार चालत असे, त्यांत देखील आर्चबिषपला जागा होती; अर्थात् मूळच्या जुलुमाची तयारी होतीच. तथापि परिस्थिति मात्र बदलली होती. Ultramar सारखीं ख्रिस्ती वर्तमानपत्रेंच मधून मधून ख्रिस्ती पाद्र्यांवर टीका करून हिंदूंना कचित सांवरून धरीत होतीं. परंतु Ultramar वर आर्चबिषपनीं बहिष्कार पुकारला; गव्हर्नर जोआकीं जूजे माशादु यानीं जगद्गुरूंना आमंत्रण करून, आपणासमोर त्यांचें समान दर्जानें स्वागत करून सहिष्णुतेचा धडा घालून दिला. त्यामुळें जुलुमांचें स्वरूप थोडेंसें सौम्य झालें होतें

ख्रिस्ती वर्तमानपत्रातून वेळोवेळ हिंदुदेवतांची निंदा केलेले लेख येऊ लागले. ख्रिस्ती लोक हिंदुदेवताची निंदा करण्याची एकही संधि गमावीत नसत, हिंदूंच्या तक्रारींस न जुमानता लोलयें ( काणकोण ) येथील श्री केशवाच्या देवालयाजवळच ख्रिस्त्यांनीं चापेल बांधलें, बादिवडें येथील देवालयांच्या मधोमध असणाऱ्या उंच टेंकडीवर देवालयांना जणुं काय दटावीतच आहे असें दिसणारें दुसरें चापेल उद्भवलें; हिंदूंच्या धर्मगुरूंना छत्र चामरादि चिन्हें वापरून रस्त्यावरून जाण्याची बंदी होऊ लागली; हिंदूंचे जे रथसप्तमी, चैत्रीपौर्णिमा, इत्यादि उत्सव होत, त्यांना पणजी येथें वारंवार अडथळे येऊं लागले; नेरूल येथें होणाऱ्या श्रीरामनवमीच्या उत्सवाला घातलेला मंडप देवळाच्या आकाराचा आहे, या सबबीवर तो उत्सवच बंद पाडण्यात आला; केपें कोंसेल्यांतील कोठंबीच्या श्री महादेवाच्या देवालयाजवळ ख्रिस्ती पाद्रींनीं प्रेत ठेवून देवालयाचा उपमर्द केला. इ. स. १९०७ च्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानें हिंदूना प्राथमिक शिक्षक होण्याची बंदी झाली.

पारोड्याच्या श्री चंद्रेश्वराची पालखी सीमोल्लंघनाच्या प्रसंगीं पारोडें गावात येते. पण वाटेंतच हिंदूंच्या तक्रारीस न जुमानतां, ख्रिस्त्यांनीं अगदीं रस्त्यावरच चर्च बांधलें व त्या चर्चेजवळून पालखी गेल्यानें सरकारी धर्माची बेअदबी होते, या सबबीवर तेथील दसऱ्याचा उत्सवच बंद पडला. गव्हर्नर साहेबांनीं दिलेल्या उत्सव-

बदीच्या हुकुमावर केलेलें अपील, पोर्तुगालांतच धूळ खात पडलें होतें. तेव्हा सासष्ट प्रांताच्या त्या वेळच्या जज्जसाहेबाच्या मार्फत, नुकेच परलोकवासी झालेले, डॉक्टर आंतोनियु जुजे दा आल्मैद, या रिपब्लिकन देपुतादाकडे (पार्लमेंटच्या प्रतिनिधीकडे) हिंदूनीं धांवणें केलें. त्यानीं पार्लमेंटांत भाषण करून ह्या प्रकाराकडे सरकारचें लक्ष खेंचलें आणि अपिलाचा निकाल हिंदूच्या बाजूनें झाला. आणि हा निकाल ग्याझेटात प्रसिद्ध होतो न होतो, इतक्यांतच पोर्तुगालात क्रांति होऊन रिपब्लिक स्थापन झाल्याची सुवार्ता आली. उपरोक्त जज्जसाहेब कौसरु दा कॉश्त हे पहिलेच रिपब्लिकन गव्हर्नर झाले. डॉक्टर आल्मैद हे मुख्य प्रधानकीच्या आसनावर पोंचले. डॉ. आल्मैद यांनां रिपब्लिकच्या प्रेसिडेंशल चेअरचा मानही पुढें मिळाला. असो. असा हा आमचा धार्मिक व सामाजिक इतिहास आहे. रिपब्लिकच्या स्थापनेनंतरच्या १९ वर्षांच्या अवधींत हिंदुसमाजानें काय केलें तें पुढें सामाजिक परिस्थितीत वर्णन केलेली त्यांची सद्यःस्थितीच सांगेल.

**पोर्तुगीज राज्यकारभारांतील मुख्य धोरणः**—जीत राष्ट्रावर आपलें जू ठेवणाऱ्या जेत्यांचीं, राज्यकारभाराचीं दोन धोरणें ठेवलेलीं आजवर दिसून येतात. Assimilação व Sujeição हींच तीं दोन धोरणें होत. आपली संस्कृति जीत राष्ट्राला स्वीकारावयाला हरएक उपायानीं भाग पाडावयाचें, या धोरणाला पहिलें नाव आहे. तर जीत राष्ट्राची संस्कृति राखून त्यावर सत्ता चालवायची व संपत्तिशोषण करावयाचें, हें धोरण Sujeição ह्या सदराखालीं पडतें. जीत राष्ट्राची भाषा, धर्म, रीतिरिवाज, इत्यादि नष्ट करून त्याला आत्मसात् करावयाचें Assimilação चें धोरणच पोर्तुगालनें आपणासमोर ठेविलें होतें. व त्याला अनुसरूनच अव्वल पोर्तुगीजशाहीपासून आपल्या प्रजाजनांवर यांनीं अनन्वित जुलूम केले. आमच्यातील सोंवळयाओंवळयाच्या, भ्रष्टाभ्रष्टतेच्या, इत्यादि कल्पना हिंदुसमाजाच्या दुर्दैवामुळें त्या काळीं अत्यंत कडक होत्या. त्यांच्या योगानें जुलुमानें देखील परधर्मांत गेलेल्या आमच्या बधूंना, आम्हींच आमचे शत्रू बनविलें. एकदा बाटला कीं तो कायमचाच बाटला. आणि पुष्कळदां हें बाटणें पण कसें ? एखाद्या गल्लींत ख्रिस्त्यांनीं टाकलेल्या खऱ्या खोट्या हाडकानें देखील त्या वेळीं, गल्ल्याच्या गल्ल्या, नव्हे—गांवचीं गावें, ख्रिस्त्यानीं नव्हे, तर आम्हींच बाटविलीं आहेत.

स्वदेशाऐवजीं पोर्तुगाल हा देश, स्वभाषेऐवजीं पोर्तुगीज भाषा ही भाषा, देशी रीतिरिवाजांऐवजीं राज्यकर्त्यांचे रीतिरिवाज, इत्यादि बाबी ह्या धर्मांतरित

लोकांनीं प्रारंभीं प्रारंभीं तरी केवळ अपरिहार्यतेमुळेंच व मोठ्या जुलुमानेंच स्वीकारल्या असाव्या. युरोपियनांशीं सहवास होताच कालांतरानें मूळची नावड जाऊन प्राप्त परिस्थितीच त्यांना आगवळणीं पडून बरी वाटूं लागली व तिच्या विरुद्ध येणाऱ्या बाबींना ते शत्रुत्वानें लेखूं लागले.

याच Assimilação च्या धोरणामुळें गोव्यातील राज्यकारभारात देश-भाषेला जागा नाहींशी झाली आहे; याच धोरणामुळें आमची पूर्वपरंपरा समजून घेण्याचें साधन जो हिंदुस्थानचा इतिहास, त्याला शिक्षणात स्थान नाहीं; याच धोरणामुळें गोव्यातील मराठी शिक्षणाकडे सरकारनें दुर्लक्ष्य केलें आहे; याच धोरणामुळें, देशभाषेच्या संवर्धनासाठीं चाललेल्या हिंदूंच्या प्रयत्नांकडे आमचे ख्रिस्ती बंधु संशयात्मक दृष्टीनें पाहत असतात; याच धोरणामुळें प्रारंभींच्या काळीं गोमंतकांतील कुलस्त्रियांवर बाटून पुनर्लग्नें करण्याचा घोर जुलूम ओढवला. संस्कृतींचीं मुख्य आधारस्थानें म्हणजे आचारप्रधानधर्म व भाषा हींच होत. या उभय बाबींवरच हल्ला झाल्यामुळें त्यावेळचा गोमंतकीय समाज अगदींच नामोहरम होऊन गेला. पोर्तुगीज संस्कृति स्वीकारणारांना मात्र त्याचें राज्य हिंदूंपेक्षा पुष्कळच फायदेशीर झालें. मोठमोठ्या हुद्याच्या जागा, संपन्न अशी आर्थिक स्थिति, मुळच्या हिंदुधर्माच्या मानानें पाहिल्यास, आहार विहाराची अतीम सीमा या एका धर्मांतरानें व संस्कृतिस्वीकारानें त्याना प्राप्त झाल्या.

"**स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती**":—एका बाजूनें सत्तेचा पराकाष्ठेचा जुलूम व दुसरीकडून आत्यंतिक प्रलोभन, हीं शस्त्रें जय्यत असतांना त्यांना न जुमानतां ज्यांनीं आपल्या धर्माची, आपल्या देशाची, आपल्या भाषेची, आपल्या आचारांची व आपल्या परंपरेची कास सोडली नाहीं, भुरट्या चोरांसारखे लपून, निराश्रित परागंदासारखे धावपळ करीत, हालाहालांत देखील आपली संस्कृति जतन करण्यांत, ज्यांनीं मृत्यूही आनंदानें पत्करला, रानावनांतून देव हिंडविले, देवधर्मासाठीं महारांची देखील याचना केली; देशत्याग व सर्वस्वत्यागही पत्करला, त्यांची धन्यता काय वर्णावी!

आणि इतकाही जुलूम सहन करून, सोट्याला न जुमानता आणि प्रलोभनाला बळी न पडता, देशांतच चोरून राहून ज्यानीं स्वत्वरक्षण केलें; "हिंदूकडून मक्ते घेऊन ख्रिस्त्यांस दिल्यास त्यांत तिजोरीचीच नुकसानी आहे" अशी आपल्या कर्तबगारीची कबुली खुद्द जुलमी राजसत्तेच्या तोंडूनच वदविली; त्यांच्या चिका-टीची, त्यांच्या धैर्याची, त्यांच्या स्वत्वनिष्ठेची, त्यांच्या चिवटपणाची आणि

त्याच्या कर्तबगारीची वाखाणणी करणें, मानवी मनाच्या आवांक्याबाहेरची गोष्ट आहे! असे ते आम्हा गोवेंकरांचे पूर्वज होते ही गोष्ट प्रस्तुत लेखकाला तरी अत्यंत अभिमानाची व भाग्याची वाटते!

तसेंच ख्रिस्ती धर्म स्वीकारणें बाह्यत: भाग पडलें असतां; स्वजनांनीं दूर लोटलें असतांना; तिरस्करणीय व उपेक्षणीय परिस्थितींत चारशें वर्षें, चार शतकेंपर्यंत ज्यांनीं गुप्त रीत्या आपापले कुलधर्म राखले; चारशें वर्षें ज्यांनीं आचारभ्रष्टतेचें वारें आपल्याला लागूं दिलें नाहीं; एवढा अखंड काल कीं, ज्या अवधींत मोंगल आले, चढले व नामशेष झाले, मराठेशाही उत्पन्न झाली, आसेतु हिमाचल गाजली व विराम पावली, अमेरिकेसारखें अभिनव राष्ट्र निर्माण झालें, एवढ्या प्रचंड कालविभागापर्यंत त्यांनीं अप्रतीम चिकाटीनें, अवर्णनीय प्रेमानें आणि अद्वितीय भक्तीनें, हिंदुधर्मावरील व हिंदुसंस्कृतीवरील आपली निष्ठा जिवंत ठेविली, त्या गावडे समाजाची धन्यता!...ती वर्णन करायला केवळ हृदयाची मूक भाषाच झाली तर समर्थ होईल! आणि हे आमचे बंधु आहेत असें म्हणण्याचें महद्भाग्य आमचेंच आहे!

गोमंतकीयेतर हिंदूनें हा इतिहास लिहिला असता, तर त्यानें देखील हेच उद्गार काढले असते. परंतु भाषेच्या परकीपणामुळें असो किंवा इतर अडचणीं-मुळें असो, आजवर महाराष्ट्रीयाचें लक्ष्य त्याकडे मुळींच वेधलें नव्हतें. त्याचमुळें हें काम आमचें आम्हालाच स्वीकारावें लागलें.

---

प्रकरण ४ थें.

# सामाजिक परिस्थिति

**दोन विभाग:**—गोव्याच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करताना, तुल्य-संख्य व विसदृश संस्कृतीचे असे त्यांत दोन विभाग आहेत, ही गोष्ट प्रामुख्यानें नजरेसमोर आल्याशिवाय राहत नाहीं. एक युरोपाभिमुख तर दुसरा हिंदी राष्ट्राभिमुख; एक पोर्तुगीज व इंग्रजी शिक्षणानें मंडित तर दुसऱ्याचें लक्ष पाश्चात्य विद्येकडे लागल्यास पुरतीं तीस वर्षें देखील झालीं नाहींत; एक आर्थिक दृष्ट्या संपन्न, तर दुसऱ्याला उद्याचीच फिकीर! एक जुनी परंपरा विसरलेला तर

दुसरा तिला मगरमिठी मारून बसलेला; एकानें जगाचें घर केलेलें तर दुसरा घराचेंच जग बनविणारा; एक जातिभेद केवळ शरीरसंबंधापुरताच पाळतो तर दुसरा रोटिबेटी बंद; एकाला सामुदायिक हितसंबंधाची फारशी परवा नसण्याइतकी सुस्थिति प्राप्त झालेली, तर दुसऱ्याला सामुदायिक हितसंबंधांकडे लक्ष दिल्याशिवाय वैयक्तिक हितसंबंध पूर्ण झाले, असें वाटत नाहीं; एवच हे दोन समाज आमूलाग्र विसदृश आहेत. तेव्हां सामाजिक परिस्थितीचें वर्णन करताना, हे भेद दृष्टीसमोर ठेवूनच तें केलें पाहिजे पहिला समाज, ख्रिस्ती बनलेला, किंवा बनविलेल्या लोकाचा, आणि दुसरा, आपल्या पूर्वपरंपेस व धर्मास कवटाळतांना शक्तिपात करून घेतलेला हिंदुसमाज, हे ते दोन समाज होत.

# विभाग पहिला.

## ख्रिस्ती समाज.

**ख्रिस्ती समाजांतील पोटवर्ग–लूझोइंडियनाचें प्राबल्यः—**मागें राजकीय परिस्थिति वर्णनांत "कास्तीस" ( स्थायिक झालेले युरोपियन )" मिस्तिस" ( मिश्रसंतती ) "कानारीं" ( बाटलेले ख्रिस्ती ) व "जेंतिव्ह" ( हिंदु ) असे चार वर्ग असल्याचें आम्ही सांगितलेंच आहे. बाटलेल्या ख्रिस्त्याना मूळच्या युरोपियनांनीं बाटाबाटीच्या काळीं फारच चागलें वागविलें व त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारण्याइतका खुराक, न बाटलेल्या प्रजेच्या संपत्तींतून, त्यांनां चारण्यांत काडीमात्र कसूर केली नाहीं. परंतु, पुढें जसजसे हे नवख्रिस्ती पुढें येऊं लागले, तसतसा पोर्तुगालमधून राज्यरक्षणार्थ येणाऱ्या युरोपियनांना त्यांचाच हेवा वाटू लागून, सतराव्या शतकापासून रैनॉइश व कास्तीस युरोपियन यांचा एक आणि "मिस्तिस" व "कानारीं" यांचा दुसरा, असे दोन निरनिराळे तट पडल्यामुळें सतरावें शतकभर मिस्तीस व देशी ख्रिस्ती यांना जेत्यांनीं एका शिक्षणाशिवाय ( व तेंही धार्मिक संस्थांतून मिळालेलें, ) इतर राजकीय, सामाजिक वगैरे बाबतींत तुच्छतेनेंच वागविलें होतें. पुढें हे जित जेत्याचे भेद १८७४ त मार्केझ द पोंबालनें नष्ट करतांच ख्रिस्त्यांनीं डोकें वर केलें. तथापि राजसत्तेचें त्यावेळचें प्रमुख आंग जें लष्कर, त्यांत मिस्तिसाचेंच प्राबल्य असल्यामुळें, १७७४ त ते १८३५ पर्यंत देखील देशी ख्रिस्त्यांना आपल्या उद्धाराची वाट धक्केचपाटे खाऊनच काढावी लागली. लष्करी सत्तेच्या प्राबल्यामुळेंच लूझोइंडियनांनीं, पहिलेच हिंदी गव्हर्नर बॅनोर्दु पॅरिश द सील्व्ह याना, एका वर्षाच्या अवधींतच पदच्युत

करून केंद्रेंत घातलें होतें. इतकेंही असलें तरी ख्रिस्ती वर्गाच्या सर्वांगीण उन्नतीस अठराव्या शतकाच्या सुरवातीपासूनच खरा प्रारंभ झाला होता. शिवाय युरोपियन किंवा लष्करी लुझोईंडियन समाजाच्या विरुद्ध चाललेल्या झगड्यात त्यावेळच्या ख्रिस्ती धार्मिक संस्थांनीं आणि आर्चबिषपनीं, ख्रिस्त्यांना वेळोवेळ मदत केली होती ही गोष्टही लक्ष्यात घेतली पाहिजे. परंतु वर सांगितल्याप्रमाणें, जेसुईट कंपनीची व इंक्विझिसावांची नांगी मार्केझ द पोंबालनें मोडतांच, लुझोइंडियन समाजानें गोमतकांत धुडगूस घालण्यास प्रारंभ केला. पुढें माशेलातील बंड झाल्यावर लुझोइंडियन समाजाचें प्राबल्यही लष्कराच्या नाशाबरोबरच लयास गेलें व गोमतकांत सगळीकडे देशी ख्रिस्त्याचाच बोलबाला झाला. एका काळीं प्रबळ असलेल्या लुझोइंडियन वर्गाचे लोक, आजला साऱ्या गोमांतकात मिळून फारतर दोन हजारांच्या आंत बाहेर आहेत. परंतु "मिझेरिकोर्द" सारखी अत्यंत सधन अशी संस्था या वर्गाच्या पाठीशीं असल्यामुळें व अजूनही गोमंतकीय लष्करांत पूर्वपरंपरेस अनुसरून, त्यांचीच वर्णी विशेष लागत असल्यानें, हा समाज आहे त्या स्थितींत जीवंत राहण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. खावें, प्यावें, मजा करावी व युरोपियन समाजात मिसळू पाहून इतराशी तुच्छतेनें वागावें, हा या समाजाचा आजचा क्रम आहे तरी पण गतकालांत या समाजांतून चांगले चांगले लष्करी अमलदार, वैद्य, राजनीतिनिपुण मुत्सद्दी, निपजले आहेत. बारांव द कुभारजुव तोमाझ मौराव, हा त्यांच्यांत नामांकित विद्वान होऊन गेला. त्याच प्रमाणें खास पोर्तुगालांतील विद्वान यॅस द कैरोझ, रामाल्यू द ओर्तिगांव, ओलिव्हैर मार्तीश इत्यादिकांच्या मंडळांत बरेंच महत्त्व मिळविलेले, फ्रेदेरिक दिनीझ द आयाल हेही या समाजांत नामांकित लेखक होऊन गेले. इ. स. १८९५ च्या सुमारास या समाजांतील एल्व्हीन द ब्रीत हे, खास पोर्तुगीज प्रधानमंडळात, पब्लिक वर्क्स खात्याचे प्रधान झाले होते.

**देशी ख्रिस्ती व त्यांच्यांतील वर्गः**—पोर्तुगीज अमदानींतील पहिलें शतक दीड शतक युरोपियनांच्या प्राबल्याचें गेलें, तर १७७४ पासून पुढें त्यांचें प्राबल्य नष्ट झालें व रणांगणांत लुझोइंडियन विरुद्ध देशी ख्रिस्ती, असे दोन पक्ष दिसू लागले. १८७० सालीं लुझोइंडियनांचें प्राबल्य नामशेष झालें. व देशी ख्रिस्त्यांच्या सवत्या सुभ्याच्या युगास प्रारंभ झाला. तथापि दरम्यानच्या काळांत देशी ख्रिस्त्यांना वरील वर्गाकडून मार बसत असतानाच, खालीं जेंतींवाचा (हिंदूचा) वर्ग तुडवायला मिळत होता. हिंदूंची असहाय स्थिति तर जवळ जवळ

४०० वर्षेपर्यंत होतीच. शिवाय पाश्चात्य शिक्षणाचा लाभ देशी ख्रिस्त्यांनां त्याच्यापेक्षां पुष्कळ वर्षे पूर्वी मिळाला होता, त्यामुळें व धर्मसादृश्यानें जेत्याकडून मिळणाऱ्या थोड्याफार मदतीमुळें ख्रिस्ती वर्ग प्रारंभापासूनच हिंदूपेक्षां चांगल्या स्थितींत होता. ही गोष्ट वरील विवेचनावरून स्पष्ट दिसून येईल.

ख्रिस्त्यांत झालें तरी अजूनही बेटीबद्द असे ब्राह्मण, चाड्डो (क्षत्रिय व वैश्यांमुळें बनलेला), शूद्र व महार असे वर्ग आहेत. आणि सारें १९ वें शतकभर या वर्गांपैकीं, पुढारलेल्या ब्राह्मण व चाड्डो या वर्गांत गोमतकातील राजकारणांत पुढें होण्याची स्पर्धा, उभय वर्गांच्या लूझोइडियनाशीं चाललेल्या सामन्यावरोबरच चालू होती. परंतु वरिष्ठाशीं भांडतांता, सांपडेल तेथें हिंदूना खालीं रेटण्याचे प्रयत्न मात्र या समाजांतून नेहेमीं चालूच होते. धर्मामुळें, सस्कृतिस्वीकारामुळें व शिक्षणप्रसारामुळें, हा समाज 'पाखंडी' हिंदु समाजापेक्षां, युरोपियन जेत्यांनां साहजिकच जवळचा आहे. अर्थात्, जेथें जेथें हिंदूविरुद्ध ख्रिस्ती असा लढा पडत होता, तेथें तेथें त्यांना त्यावेळीं जेत्यांकडून मदतच मिळत गेली होती. ह्या परिस्थितीचा फायदा त्यानीं भरपूर घेतला व प्रगतीचें शिखर गांठलें आजला गोमतकीय स्पर्धाक्षेत्रातून युरोपियन मुळींच दिसत नाहींत; आहे त्याच परिस्थितींत समाधान मानण्याशिवाय गत्यतर नाहीं, असें मानण्याइतका लूझोइडियन समाज निष्क्रिय झाला आहे. अर्थातच ख्रिस्ती समाजांतील ब्राम्हण व चाड्डो ह्या दोन वर्गांतच गेल्या वर्षांतून झगडा चाललेला होता. हिंदुसमाजाच्या दृष्टीनें पाहिल्यास, सारी सत्ता ह्याच वर्गांच्या हातीं एकवटली होती व अजूनही तिला फारसा खो बसला नाहीं. आणि म्हणूनच सामाजिक परिस्थितीचा विचार करतांना, हिंदु व ख्रिस्ती यातून हें अंतर दिसून येऊन तदनुसार विभाग पाडावे लागत आहेत.

**ख्रिस्त्यांच्या चालीरीति व संपन्नताः**—सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां, ख्रिस्तीधर्म स्वीकारामुळें या समाजानें मुळच्या साऱ्याच चालीरीति सोडल्या आहेत असें दिसत नाहीं. जातिभेद, रोटिव्यवहाराच्या बावतींत नसला तरी बेटिव्यवहारापुरता तरी अजूनही कडकपणें पाळला जातो. हुंड्याची चाल तर त्या समाजात इतकी बद्धमूल झालेली आहे कीं, सामान्यतः दोन तीन हजार रुपये उत्पन्नाच्या कुटुंबातील सुशिक्षित मुलाला, कमींत कमी दहा बारा हजार रुपये हुंडा द्यावा लागतो. त्यांतही मुलगा जर उच्च शिक्षण घेतलेला असला, सरकारी किंवा व्यापारी नोकरींत त्याला मध्यम प्रतीची जागा जरी असली, तर हें मान वीस पंचवीस

१०१ ४३०५ दा.



हजारांपर्यंत सहज चढतें. आणि वरिष्ठ नोकरींत प्रवेश झालेला नवरा मुलगा असल्यास त्याला ४० ते साठ हजार किंमत देखील पडते ! त्यामुळें ह्या समाजात वृद्धा कुमारिकांचा भरणा व जरठ कुमारांची संख्या बरीच असते. संपन्न अशा कुटुंबांत ३।४ मुलगे असले तर त्यांतून एकादा तरी पाद्री असतोच व एकादाच विवाहबद्ध झालेला दिसतो. इतर मुलगे वकीली किंवा नोकरी पत्करून अविवाहितच राहत असलेले दिसणें अगदीं सामान्य आहे. त्याचप्रमाणें एकाददुसऱ्याच मुलीला विवाहसौख्य मिळतें. कुटुंबांतील साऱ्याच मुलींचीं लग्नें झाल्याचीं उदाहरणें, संपन्न स्थितींत देखील फारशीं आढळून येत नाहींत. याचें कारण हुंड्याची अडचण हेंच असावें. लग्नें, धड अनुनय पद्धतीनेंही होत नाहींत, किंवा धड वडिलांमार्फतही होत नाहींत. वडील मंडळीनें पसंत केलेल्या मुलीला, नवरा मुलगा एकाद्या बॉलमध्यें किंवा चर्चेच्या उत्सवांत पाहतो व एकमेक एकमेकाना पसंत पडल्यास, वधूला वरपक्षीयाकडून मागणी घालण्यांत येऊन हुंडापाडा ठरल्यावर मग वधुवरांना अनुनयाची परवानगी मिळते. अभिजात वर्गांत असो किंवा खालच्या वर्गांत असो, पण विवाहमर्यादा बरीच वाढलेली आहे. रेजीस्त सिव्हिलचा कायदा झाल्यापासून तर, वयात आल्याशिवाय विवाहच करतां येत नाहीं. परंतु त्यापूर्वी देखील सामान्यतः १८ वर्षे झाल्याशिवाय मुलीचें, व २५ वर्षांपूर्वी मुलाचें लग्नच होत नव्हतें आजला साधारणपणें वराची वयोमर्यादा २५ पासून ३५ पर्यंत असून वधूची २० ते ३० पर्यंत असू शकते.

उच्च शिक्षणाचा प्रसार या लोकांमध्यें बराच झाला आहे डाक्टरी पास झालेल्या व धंदा करीत असलेल्या गोमंतकांतील २१६ डाक्टर्समध्यें ५०।५५ डाक्टर हिंदू आहेत. गोमंतकीय ५७ केमिस्टांतून सुमारें आठ दहाच हिंदू असतील. त्याचप्रमाणें वकिलीचा धंदा तर पूर्णपणें याच लोकांच्या हातीं आहे. वरिष्ठ नोकऱ्यांपैकीं, न्यायखात्यात या वर्गातील बार-ॲट-लॉ सुमारें ५० सावर असून त्यांचा शिरकाव थेट पोर्तुगालच्या सुप्रीम कोर्टांत सुद्धां झालेला आहे. गोमंतकांतील सरकारी नोकऱ्यांतून यांची संख्या, शेंकडा सुमारें ७५ च्या वरच असेल. व एकंदर दहा खात्यांपैकीं, आरोग्य रक्षण, तार व टपाल, जमीन मोजणी खातें, या तीन खात्यांचे मुख्याधिकारी याच वर्गांतले आहेत ! शिवाय ब्रिटिश हिंदुस्थान, केनिया, मोझांबिक, फारतर काय पण ब्राझीलपर्यंत या लोकांच्या सुशिक्षित वर्गानें, द्रव्यसपादनासाठीं आक्रमण केलें आहे जगाच्या कोणत्याही देशांत महत्वाचें एकही शहर असें नसेल, कीं जेथें एखादा तरी गोमंतकीय ख्रिस्ती नाहीं. अशिक्षित

ख्रिस्त्यांनीं व्यापारी आगबोटीवर नोकऱ्या मिळविल्या आहेत. त्यांतल्या त्यात पी. ॲंड ओ. कंपनी व बी. एस. एन. कपनी, यांतून त्यांची संख्या बरीच महत्वाची आहे. शिंप्यांचा धंदा तर त्यांच्यात इतका पूर्णावस्थेस पोंचलेला आहे कीं, मुबईंत किंवा इतर ठिकाणीं टेलरिंग कॉलेजें निघालीं, लंडन डिप्लोमा मिळविलेले टेलर्स असले, तरी गोमंतकीय 'फ्रांन्सिस'चें किंवा 'कैतान'चें गिऱ्हाइक उत्तरोत्तर वाढलेलेंच दिसतें. बूटमेकरचा धंदाही तसाच त्यांच्या हातीं आहे. युरोपियन मालाशीं स्पर्धा करण्याइतका सुबक व टिकावू माल गोमतकीय ख्रिस्ती तयार करतात. स्वदेशीं जाताना प्रत्येक युरोपियन गोमतकांत तयार झालेले बूट, संख्याबद्ध घेऊन जात असतो. इतका हा माल सुबक असून युरोपच्या मानानें सस्ता असतो. अलीकडे चार पांच वर्षांत, रबरी स्लीपरच्या आयातीमुळें हा त्यांचा धंदा बसत चालला आहे. शिवाय कांहीं महाराष्ट्रीय "हाराळे" मोचीही त्यांच्याचकडे उमेदवारी करून वाकबगार झाल्यामुळें, मुळचा फायदा त्यांनां मिळत नाहीं सुतारकामांतही हा समाज मागें नाहीं. लांकूड विकत घेऊन घरीं स्वतः त्याचें फर्नीचर बनवून मग जत्रांतून तें विक्रीस मांडायचा त्याचा धदा अजून जोरांत आहे. गोव्यांत भाजीपाल्याची शेती यांच्याइतकी फायदेशीर करणारा दुसरा समाजच नाहीं. आणि अत्यंत फायद्याचे असे, मच्छिमारी व नारळाच्या ताडीची दारू गाळणें हे दोन धदे तर केवळ त्याच समाजाच्या खास मॉनॉपोली आहेत

थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास, हा समाज अत्यत उद्योगी आहे, असेंच म्हणावें लागतें. गोमतकाच्या आयात निर्गतींतील वार्षिक लाखों रुपयांची तूट, आजवर याच समाजाच्या परदेशगमनामुळें भरून निघत आहे. अर्थात् या दृष्टीनें पाहता, गोमतकाच्या सांपत्तिक स्थितींत त्याला बरेंच महत्वाचें स्थान आहे. त्यांतही सरस निरस निवडावयाचें झाल्यास, बारदेशी ख्रिस्ती, सासष्टकरापेक्षां विशेष उत्पादनशील आहेत असें म्हणावें लागतें. घरीं स्त्रीवर्ग देखील रिकामा नसतो. घरच्याघरीं बसल्या बसल्या, निरनिराळ्या पीलोलेसीस, सुताच्या गुंड्या व इतर सुईचें काम, अत्यंत कुशलतेनें करण्यात अभिजात वर्गीय स्त्रियांचा हातखंडा आहेच, परंतु अशिक्षित स्त्रियादेखील आपल्या उपजीविकेचा बोजा कुटुंबावर पडूं देत नाहींत व नेहेमीं बारदेश प्रांतात शेतकीचें झाडून सारें लहानमोठें काम ह्या स्त्रियाच करतात.

**नाण्याची दुसरी बाजूः**—इतकें झालें तरी प्रत्येक नाण्याला दुसरी बाजू ही असतेच. त्याप्रमाणें या नाण्यालाही ती आहे. खिस्ती समाजाचा सर्वांत मोठा दोष म्हणजे तो समाज, स्वदेश, स्वभाषा, पूर्वपरंपरा, इत्यादि राष्ट्रीय सद्गुणांस पारखा झालेला आहे हाच होय. एवढी मोठी प्रचंड अशी स्वदेशीची लाट १९०८ सालीं साऱ्या हिंदुस्थानांत उसळली व महात्मा गांधीजींनीं अलीकडे ती खेडोखेडीं देखील पोंचविली. परंतु आमच्या गोमतकीय खिस्ती समाजांत स्वदेशीचें व्रत पाळणारा इसम औषधालाही सापडावयाचा नाहीं. अव्वल अमदानींत झालेल्या धर्मच्छलामुळें त्यांच्यावर जो प्रहार झाला, त्यानें जणुं काय त्यांची पूर्वपरपराच तोडली गेली. आज पूर्वसस्कृतीची काडीइतकी देखील जाणीव त्या समाजांत राहिली नाहीं. त्यामुळें हा समाज भूतकाळशून्य बनून त्याला भविष्यकाळही नाहींसा झाला आहे. एकादी रेषा वाढवायची असली, तर तिचे कोणतेही दोन बिंदु मुक़र करून त्यांच्या अनुरोधानेंच ती वाढवितां येते. आणि ह्या उभय बिंदूमधील अतर ज्या मानानें मोठें असेल, त्या मानानें पुढील वाढही विशेष सुसूत्र निघत असते. आमच्या खिस्ती समाजाला, केवळ वर्तमानकाळच तेवढा आहे म्हटलें तरी चालेल, इतके ते स्वत्वशून्य आहेत. मराठी भाषेविषयीं, मराठी शिक्षणाविषयीं, हिंदुसमाजाचे जे प्रयत्न त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येतात त्यांचा सबध ते क्रांतीशीं देखील लावू शकतात, एवढें सांगताच या त्याच्या स्थितीविषयीं विशेष सांगणें नको. आणि म्हणूनच त्यांच्या चळवळी, मग त्या सामाजिक असोत किंवा राजकीय असोत, पण केवळ व्यक्तिगत हितापलीकडे अशा त्या फारशा जाऊ शकतच नाहींत. इतकेंच नव्हे, पण सामायिक हितसंबंधाची चळवळ कर-णारा एकादा माणूस त्याच्यात निपजलाच, तर त्याला समाजांत पुढाऱ्याची जागा न मिळतां, उलट विरोधच होत असतो आणि याचमुळें हिंदुसमाजाच्या पूर्वसं-स्कृत्यनुसारी चळवळींकडे हे लोक सशयी दृष्टीनें पाहत असतात व शक्य तेवढा विरोध करतात

युरोपियनांसारखे बनणें हें त्यांचें अतिम ध्येय असतें. उच्च शिक्षणासाठीं पोर्तु-गालांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांतून बरेचसे इसम पोर्तुगीज युवतींशीं विवाहबद्ध होऊन परत येत असतात व अशांचा संसारही तदनुरूप होत असतो. प्रस्तुत लेखकाला तर अशीं कित्येक उदाहरणें माहित आहेत कीं, या असल्या विवाहानंतर नवऱ्यांचा भक्कम पगारही न पुरतां गोऱ्या पत्नीच्या थाटाच्या राहणीसाठीं वडिलार्जित हजारों रुपयाची इस्टेट विकावी लागली आहे.

दुसरा महत्वाचा विशेष म्हणजे नैतिक बंधनाच्या शैथिल्याचा होय. एका बाजूनें पाद्री व अविवाहित पुरुषांचा भरणा आणि दुसरीकडून हुंड्याच्या जबऱ्या भानामुळें प्रौढा कुमारिकांची फुगलेली संख्या; भरीला स्त्रीपुरुषमिश्र समाजरचना, व तिचे नयाक, ब्रँडी, बॉल, इत्यादि सहकारी, आणि पुरवणीदाखल पुरुषवर्गाच्या परदेशगमनामुळें उत्पन्न झालेली परिस्थिति ! तेव्हां "एकेकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टय" ? ।

काहीं थोडेसेच युरोपियन किंवा देशी दारू विकणारे व घड्याळें, पुस्तकें किंवा चिल्लर ऐषआरामाच्या चिजा यांचे थोडेसे व्यापारी वगळले, तर गोव्यांतील व्यापाराकडे हा समाज फारसा वळलेला दिसून येत नाहीं निर्गतीपैकीं मीठ, नारळ वगैरे माल, व आयातीपैकीं, खाद्य जिन्नस, वस्त्रपात्र, इत्यादि मालाचा व्यापार बहुतांशीं, नव्हे तर एकदोन किरकोळ अपवाद सोडून दिले, तर सर्वांशीं ख्रिस्तीतरांकडेच एकवटला आहे. तरीपण व्यापारी सद्गुण समाजांत मुळींच नाहींत, असें म्हणतां येत नाहीं. कारण, अवघ्या तीस वर्षांमागें वस्त्राप्रावरणाचा बराचसा व्यापार बारदेशकर ख्रिस्त्यांकडेच होता शिवाय आफ्रिका खंडात बऱ्याच ठिकाणीं, या समाजांतील लोकांनीं मोठमोठ्या पेढया अजूनही सपन्न रीतीनें चालविल्या आहेत

**स्वभाव वर्णनः**—या दृष्टीनें विचार करतानां बारदेशकर, तिसवाडीकर व सासष्टकर, असे प्रथमत. तीन विभाग पाडावे लागतात, व तसे ते पाडले तर, बारदेशकर सामान्यत' मोकळ्या दिलाचा, धार्मिक बाबतींत कमी कडवा, सद्भावनाप्रधान व तीनही विभागांत विशेष उद्यमशील असा असतो. युरोपियन सस्कृति या विभागानें उचललेली असली, तरी तिच्या स्वीकारानें त्याची दृष्टि, तेवढी दिपलेली दिसून येत नाहीं. साऱ्या ख्रिस्ती समाजांत बारदेशकर विशेष उत्साही व आतिथ्यशील दिसतो. इतरांपेक्षां याच विभागाचें लक्ष्य इंग्रजी शिक्षणाकडे अगोदर वळलें त्या शिक्षणाचें कार्यक्षेत्र जें ब्रिटिश हिंदुस्थान, तेथें संख्याबद्धतेनें जाणाऱ्यातही हाच विभाग प्रमुख आहे कांहींसें त्यामुळें व कांहींसें ख्रिस्तीकरण होतांना व तदुपरही पोर्तुगीज शिकतांना, दोमिनिकान व फ्रांसिस्कान ह्या, त्यातल्या त्यांत कमी कडव्या, ख्रिस्ती सांप्रदायाकडे त्यांचा प्रांत संपविला गेला असल्यानें, हे गुण त्याच्यांत आले असावे, असा लेखकाचा कयास आहे. केवळ बुद्धिमत्ताच घेतली, तर सासष्टीकर ख्रिस्ती सर्वांत श्रेष्ठ आहेत. ख्रिस्ती धर्मस्वीकारास ४०० वर्षें झालीं असतांही, जो जातिभेदजन्य गोंधळ सासष्टकरांत किंवा

थोडाफार तिसवाडकरांतही दिसून येत असतो, तो बारदेशकरांत तेवढा प्रखर दिसत नाहीं. सासष्टकरांतील चाड्डे व ब्राह्मणवर्गांतून, गेल्या शतकाच्या अखेरीस ज्या परस्परविरोधक चळवळी झाल्या, त्यांचा प्रतिध्वनि तिसवाडींतही उठला. पण बारदेशांत त्याची फारशी हाक पोंचली नाहीं. सारें हिंदुस्थान या वर्गानें आक्रमन सोडलें आहे. खालच्या परिस्थितींतून, अडचणींना न जुमानतां, स्वपराक्रमानें वर येण्याच्या त्याच्या प्रवृत्तीला जोड मिळालीच तर हिंदुस्थानांत मारवाडी समाजाची व युरोपियन समाजांत यहुद्यांचीच मिळेल, इतका हा समाज कार्यक्षम व उद्यमशील आहे. कोणत्याही गोमंतकीयास परदेशांत मदत करण्यास, याच्या इतक्या तत्परतेनें पुढें होणारे दुसरे ख्रिस्ती विरळाच दिसतील.

सासष्टकरांचें धर्मपरावर्तन, कुटील नीतींत चाणक्याचाही परात्पर गुरु शोभणाऱ्या, जगप्रख्यात अशा जेसुइट कंपनीमार्फत झालें आणि पुढें दोन शतकेंपर्यंत त्यांचें शिक्षण देखील जेसुइटांच्याच देखरेखी खालीं झालें होतें. शिवाय जात्याच [illegible] हा विभाग हिंदुसमाजाला विशेष वक्रदृष्टीनें पाहणारा, त्यांच्या चळवळींना शक्य तेवढे अडथळे व आणतां येतील तेवढ्या अडचणी आणणारा आणि राष्ट्रीयत्वपराङ्मुखतेंत अग्रगण्य असा आहे. या विभागाचा विचार करतांना त्यांतील जातिभेद लक्ष्यांत घेतल्याशिवाय राहणें शक्य नाहीं. सामान्यतः चाड्डो हा ब्राह्मणांपेक्षा बुद्धिमत्तेंत कमी, विशेष भावनाप्रधान व एक धार्मिक बाबत सोडल्यास इतर बाबींत मोकळ्या दिलाचा असतो आणि ब्राह्मण हा आंतल्या गाठीचा, जवळ जवळ उच्च मनोवृत्तींना पारखा, कमी आतिथ्यशील, असा असतो. देशभाषा जी कोंकणी तिला उत्तरोत्तर विसरून जाऊन पोर्तुगीज भाषा कवटाळण्यांत याच्या इतका कडवा ख्रिस्ती दुसरा सांपडायचाच नाहीं. उद्यमशीलतेंत हा समाज आपल्या बारदेशकर किंवा तिसवाडकर बांधवांपेक्षां बराच खालीं आहे. परंतु गोमंतकीय सरकारी नोकऱ्यांतून याच समाजानें आघाडी मारलेली आहे. धार्मिक कडवेपणांत सासष्टकराना मुसलमानांचीच उपमा शोभली तर शोभेल.

तिसवाडकर ख्रिस्ती हा कांहींसा बारदेशकरांस जवळ असतो म्हणजे बारदेशकर व सासष्टीकर यांच्यांतील स्वभाव गुणाचें मध्यमस्थान तिसवाडकरांत दिसून येतें.

**सार्वजनिक कार्यें:**—सार्वजनिक कार्य ख्रिस्ती समाजांतून फारशीं दिसून येत नाहींत. स्वार्थत्यागाचें वळणच या लोकांना फारसें नाहीं, म्हटलें तरी चालेल.

गप्पा टप्पा मारायच्या, नाच तमाशे व बैठे खेळ खेळायच्या, सोशल क्लबसारख्या संस्था मात्र कोठें कोठें दिसतात. परंतु त्याही रुटुखुटु चाललेल्या दिसतात. नाहीं म्हणायला "साताकाझ द मिझेरिकोर्द" (पणजी); ओश्पीस्यु दु साग्रादु कुरासांव द मारीय (मडगांव); आझीलु द नोस्सा सेन्योरा दुज् मिलाग्रिश (म्हापशें); आसिश्तेंसिय आउझ् इंदिर्जेतिझ इ आ इफासिय दिज्व्हालीद द गोअ (पणजी); आसोसियासांव द कारिदादि (लोटली); व पांव द सांतु आंतोनियु (कुडतरी) या संस्था चागल्या चाललेल्या आहेत. परंतु यापैकीं बहुतेकांचा योगक्षेम सोडतींसारख्या जुगारावरच चाललेला असतो हें त्याविषयीं पुढें विशेष माहिती देण्यांत येईल, तेथें दिसून येईल. स्वार्थत्यागाची प्रवृत्ति या समाजात अगदीं कमी आहे म्हणायचें दुसरें प्रमाण हें कीं, गोव्याच्या कोणत्याही शहरीं सोडतविक्यांच्या मागोमाग भिक्षेकऱ्यांची जी हुल्लड प्रवाशांना सतावीत असते, ती केवळ ख्रिस्ती समाजांतीलच असते. हिंदू भिक्षेकरी गोव्यांत मुळींच नाहींत म्हटलें तरी चालेल. कारण हिंदुसमाजांतील अनाथादिकांना, त्यांच्या कोठल्या ना कोठल्या तरी नातेवाइकाची नेहेमीं मदत असते. जे हिंदु भिकारी गोव्यांत दिसतात ते ब्रिटिश हिंदुस्थानांतील आयातीच्या मालापैकींच असतात. असे धंदे-वाईक भिक्षेकरी इकडे दिसत नाहींत. परंतु संपन्न मुलाच्या, भिक्षा मागत फिरणाऱ्या म्हाताऱ्या आया, अशिक्षित ख्रिस्ती समाजात अगदीं सामान्य चीज आहे. त्यांत भिक्षा मागणारांना जसें वाईट वाटत नसतें, तसें संपन्नावस्थेंतील त्यांच्या नातेवाइकांनाही वाटत नसतें. आणि ख्रिस्ती समाजाच्या संपन्नावस्थेशीं हिंदु-समाजाची सांपत्तिक परिस्थिति ताडून पाहिली, म्हणजे हा विरोध विशेष खुलून दिसतो.

**मिझेरिकोर्दीची हालहवाल:**—आफोंर्स द आल्बुकेर्क यानें या संस्थेचा स्थापना इ. स. १५११ त केली. पोर्तुगालच्या वैभवकालीं जे शिपाई व योद्धे आपल्या राजाकरितां व धर्मासाठीं इकडे धारातीर्थी देह ठेवीत, त्यांच्या अनाथ विधवाना व संततीला मदत करण्याच्या हेतूनेंच ती स्थापली गेली होती. अर्थातच त्यातून पूर्वी केवळ युरोपियन व लुझोइंडियन समाजालाच कायती मदत मिळत असे. आशिया व आफ्रिका खंडात, जेथें जेथें पोर्तुगीजांनीं मुलूख मिळवेला होता, तेथें तेथें ह्या संस्थेच्या शाखा उघडल्या गेल्या जाऊन व एकेकाळीं त्यांची संख्या २५ पर्यंत पोंचली होती. पुढें पोर्तुगीजाच्या साम्राज्याला जसजशी ओहोटी लागली, तसतशा ह्या शाखाही हळुहळू नामशेष होऊन आज मुख्य संस्थाच

कायती जिवंत आहे. सुरुवातीला या संस्थेतून केवळ अनाथ विधवांना व बाल-कांना घरोघर मदत पोंचविण्यांत येई. पण पुढें या संस्थेतर्फे जुन्या गोव्यांत हॉस्पिटल उघडण्यांत आलें व इ. स. १६०६ सालीं एका आर्चबिषपनें विधवा-श्रम व अनाथबालिकाश्रम स्थापन करून ते या संस्थेच्या हवालीं केले. नंतर हे दोनही आश्रम अनुक्रमें चिंबल व रायबंदर येथें नेण्यांत आले व अलीकडेच ते पणजी शहरांत "आताईदाचा वाडा" या नांवानें ओळखण्यात येत असलेल्या डोंगरावरील, भव्य व सुंदर वाड्यांत चालत आहेत. जुन्या गोव्यांतील हॉस्पिटल देखील आतां रायबंदर येथील मुद्दाम बांधलेल्या भव्य इमारतींत चालत आहे. देवळांचीं जप्त केलेलीं उत्पन्नें ज्या इसमास दिलीं गेलीं होतीं, त्यापैकीं पुष्कळा-कडून तीं ह्या संस्थेस मिळत गेलीं. या इस्टेटीचें उत्पन्न त्या काळीं १० हजार असर्फी होतें. आणि पुढें लॉटरी उघडण्याची सवलतही सरकारातून मिळाली. त्यामुळें ही संस्था आज बरीच भरभराटींत आहे. आजदेखील ह्या संस्थेचा सारा कारभार युरोपियन व लुझोइंडियन समाजाच्याच हातीं असतो. हॉस्पिटलां-तील हालचालींची माहिती पूर्वीं दिलेलीच आहे. संस्थेची मुख्य कचेरी पणजी येथें भव्य इमारतींत आहे. १९२८ सालीं संस्थेची इस्टेट सुमारें ६६८ हजाराची असून साडे नऊ लाख रुपये शिलकी खात्यात जमा होते. संस्थेचें नक्की उत्पन्न ३,५३,७४३ रुपये आहे त्यांत इस्टेटीचें उत्पन्न ४०,७४७ रुपये असून केवळ-लॉटरीचेंच उत्पन्न ३,०४,८८८ रुपये आहे !

हॉस्पिटलातील रोग्यांत लुझोइंडियनांचीच वरणी इतरांच्या अगोदर लागते. हास्पिटलप्रीत्यर्थ ६६,९८० रु., दोनही आश्रमांकडे साडे एकोणतीस हजार, गरीब मुलींना हुंडा, पेन्शनें, इत्यादि कार्यीं ६१ हजार, शिक्षणासाठीं ३१॥ हजार असा खर्च होतो. एक हास्पिटल खेरीज करून इतर बाबींत मिझेरकोर्दीमुळें केवळ लझोइंडियन समाजाचाच फायदा होतो म्हटल्यास तें सत्यास मुळींच सोडून नाहीं.

**मडगांवची ओझ्पीस्यु:**—ह्या संस्थेची स्थापना बरीच अलीकडे झाली. इ. स १८६७ सालीं, मडगांवचे पाद्रि आतोन्यु जुवांव द मिरांद यांनीं, अनाथ अपंगांना व्याजांतून मदत करण्यासाठीं म्हणून सासष्ट कोंसेल्यांतील रहिवाशांमध्यें एक फंड उघडला त्या फंडास त्यांनीं १२००० असर्फी मिळविली, व लागलीच संस्थेच्या इमारतीच्या पायाचा दगड बसवून १८६८त इमारत पूर्ण केली. इ. स. १८७२ त तिची नियमावली पास झाली व १८७८ सालीं संस्थेला

लॉटरी काढण्याची परवानगी मिळून १८७९ सालापासून लॉटरीचें उत्पन्न मिळूं लागलें. पहिल्याच लॉटरीचें उत्पन्न केवळ ५१२ असर्फ्या मिळालें होतें. आज संस्थेची कचेरी मडगाव येथें असून तिच्या तर्फे एक हॉस्पिटल साऱ्या आधुनिक सामुग्रीनें मंडित असें चालत आहे. व त्यात दरसाल सुमारें १००० रोग्यांना उपचार होतात हें मागें सांगितलेंच आहे या हॉस्पिटलात किंवा मिझेरकोर्दीच्या हॉस्पिटलात हिंदूंना मज्जाव नाहीं. परंतु त्यांच्यासाठीं निराळी सोय फारशी नाहीं, त्यामुळें व काहींसें धार्मिक स्वरूपामुळें, हिंदूलोक या उभय संस्थांचा फायदा घेत नसतात.

ओश्पीस्युचें नक्की उत्पन्न १९२७ सालीं २,४६,७४७ रु. होतें त्यांत फंडाच्या व्याजाचें उत्पन्न ७३,६०० रुपये होतें व केवळ लॉटरीचेंच उत्पन्न १,६६,९८२ रुपये होतें. हॉस्पिटल प्रीत्यर्थ दरसाल ६०,२४८ रुपये खर्च होतात. निरनिराळ्या मदतीदाखल २३००० रुपये खर्च होत असतात. आणि चालू खर्च काढल्यास सुमारें दीड लाख रुपये दरसाल शिल्लक राहते ! शिल्लकेशिवाय संस्थेचें भांडवल १३,१४,२५१ रुपयाचें असून त्यातील रोकड शिल्लक ९,९१,९२० रुपये आहे. ओश्पीसतर्फे चाललेल्या दीनजनाच्या आश्रमाचें वार्षिक उत्पन्न २२,७८७ रुपये असून खर्च सालिना ८,८२० रुपये आहे व स्थायिक फंडासहित मालमत्ता १,०३,११५ रुपयांची असून यांत व्याजीं लावलेला फंड ९० हजार रुपये आहे. ह्या दोनही जोड संस्थाचा कारभार सासष्ट प्रातांतील ख्रिस्ती ब्राह्मणांच्याच हातीं आहे.

**म्हापशेंचा आझील:**—ही संस्था न्यायमूर्ति मौर यांनीं १८६३ सालीं दिलेल्या १०४ पौंडाच्या भांडवलावर स्थापन झाली. पाद्रि दालगाद या बारदेशकर पाद्र्यानें २३०० पौंड देऊन संस्थेला मदत केली. १९२४ सालीं वर्षांतून एकदां सोडत खोलण्याची परवानगी मिळाली आहे १९२३ सालीं बारदेशकरांनीं फंड सुरू करून हॉस्पिटल उभारलें आहे परंतु अजून तें चालू झालें नाहीं. यात देखील बारदेशकराच्या स्वभावाची छटा दिसून येते. तूर्त जरी संस्था लॉटरी काढीत असली, तरी हॉस्पीटलचा फंड ख्रिस्त्यांनींच उभारला आहे. १९२७ सालीं संस्थेचें उत्पन्न १५४२ रुपये होतें व १९२८ सालच्या लॉटरींत त्याना ७४,२२० रुपये फायदा झाला. या संस्थेतर्फे चालणाऱ्या अनाथालयात १९२७ सालीं ७३ अनाथ व १६ महारोगी होते.

**पांव द सांतु आंतोनियु:**—ही संस्था वस्तूंच्या रूपानें बक्षिसें देणारी लॉटरी काढीत असून दरसाल हिचें उत्पन्न सुमारें तीन हजारांचें असतें. १९२७ सालीं उत्पन्न ३४९६ रुपये होऊन ३१६२ रुपये खर्च झाला संस्थेंतून गरीब दुबळ्यांना भिक्षा वांटण्यात येते.

**आसिश्तेंसिय इ. ( पणजी ):**—ही एकच संस्था मात्र लॉटरीशिवाय केवळ लोकाश्रयानें चाललेली आहे. हिनें अनाथ अपंगासाठीं पणजींत एक इमारत घेतली असून तिच्यात अनाथांना रहावयास जागा व उपजीविकेसाठीं दर आठव-ड्यास शिधा वाटण्यात येतो. हिचे सभासद जसे ख्रिस्ती तसेंच युरोपियन व हिंदूही आहेत. १९२७ सालीं हिचें उत्पन्न ७,९६४ रुपये होतें व खर्च ५,५९६ रु. होतें.

हा सारा तपशील वाचला असता, सार्वजनिक कार्यास स्वार्थत्यागपूर्वक मदत करावयाची प्रवृत्ति ख्रिस्ती लोकात किती कमी आहे हें सहजच दिसून येईल. वाङ्मयात्मक संस्था तर या वर्गांत मुळींच नाहींत म्हटलें तरी चालेल, इतकी त्याची संख्या कमी आहे, व असलेल्याही केवळ जीव धरून आहेत म्हणण्या-जोग्या स्थितींत दिसतात. तरीपण मोठमोठ्या लोकांना मेजवानीसहित मानपत्रें देणें व वेळीं प्रसंगीं नाच मेजवान्यांसाठीं फंड काढणें, इत्यादि कार्यांत त्यांच्या-कडून पुष्कळ खर्च होत असतो.

**घरेंदारें व राहणी:**—ख्रिस्ती समाजातील अभिजात वर्गाचीं घरेंदारें सामान्यत: टुमदार व स्वच्छ असतात योग्य तें फर्नीचर घरांतून ठाकठीकपणें मांडलेलें आढळतें समाविक कुटुंबपद्धतीला केव्हांच फांटा मिळाला असल्यानें, व अविवाहित मुलांमुलींमुळें, कुटुंबाचा आवरही कमी दगदगीचा बनत असतो. मध्यम स्थितींतील प्रत्येक कुटुंबांत एकाददुसरा नोकर व स्वयपाकी असल्यामुळें, स्त्रीवर्गाला तेवढे कमी श्रम पडून इतर कामांकडे लक्ष द्यायला फुरसत मिळते. बहुतेक कुटुंबात घरची व्यवस्था व बाजारहाट देखील स्त्रियाच करतात. जमि-नीची मशागत, नारळाचा पाडा, भात वसूली, यांवर अभिजातवर्गीय स्त्रिया देखरेख करतात व कनिष्ठ वर्गांतील स्त्रिया जातीनें [illegible] तर हा समाज बराच पुढारलेला आहे मध्यम कुटुंबांत देखील एखादा पिआनो असतोच व बहुतेक स्त्रीपुरुषांना पाश्चात्य संगीताचें सशास्त्र ज्ञान मिळालेलें असतें. ब्रिटिश हिंदुस्थानातच नव्हे, तर जगावरील पुष्कळ ठिकाणीं, गोमंतकीय ख्रिस्ती संगीतज्ञ आपल्या कलेच्या जोरावर पैसा व मानमान्यता मिळवीत असलेले दिसन

येतात. त्याची सौंदर्योपासक प्रवृत्ति इतकी उच्च आहे कीं, मुंबईच्या व्हाइट वेलेडलॉ, इव्हन्स फ्रेझरसारख्या युरोपियन फर्ममध्यें, कपड्यांची प्याटर्नें निवडायला गोमतकीय खिस्तीच नेमले जातात. आहारांत, उकडा तांदूळ व तोही गोमतकात पिकणाऱ्या भाताचा, बीफ, डुकराचें मांस, कोंबड्या यांची रेलचेल असते. गोमंतकांतील फळाचा खपही याच समाजांत जास्त असतो उलटपक्षीं दारूचा प्रसार देखील याच समाजात विशेष आहे. दारूच्यापायीं सर्वस्व गमावलेलीं किंवा संततीचें शारीरिक नुकसान करून वेडी, अपग अशी संतति निर्माण करणारींही कुटुंबें बरींच असतात या लोकांच्या घरांच्या बांधणींत एक विशेष असतो; मध्यें राजांगण व सभोवतीं चौक असलेलीं घरें, या समाजांत मुळींच नसतात. स्वयपाकघर बहुतकरून युरोपियन पद्धतीप्रमाणें स्वतन्त्रच असतें. मात्र तें अत्यंत गलिच्छ असतें शौचकूप व स्वयंपाकघर एकमेकांना लागून असलेल्या दोन खोल्यातून असतात. हें दृश्य परक्या इसमाला होतां होईतों न दिसण्याची दक्षता मात्र बाळगण्यांत येते. घरें बांधतांना, त्यांच्या सुरक्षिततेपेक्षां सुखसोयीकडेच विशेष लक्ष पुरविण्यांत येत असतें. जेवणघर व दिवाणखाना हीं दोन दालनें घराच्या सर्व भागांत विशेष प्रेक्षणीय दिसतात. संपन्न कुटुंबांतील दिवाणखाना इतक्या उच्च अभिरुचीनें शृंगारलेला असतो कीं तें एक छोटेंसें संग्रहालयच असतें म्हटलें तरी चालेल; इतकें सारें असूनही सामान्यतः कपड्यांच्या आतून, खिस्ती बहुजनसमाज बराच घामट असतो. व्यसनी व फटींग अशी थोडी मंडळी सोडून दिली तर व्यवहार व देव-घेव या बाबतींत या समाजाची टापटीप वाखणण्याजोगी असते. आणि त्याचमुळें एकंदरींत त्यांचा ससार व्यवस्थेशीर व फायदेशीरच बनतो.

**प्रसिद्ध पुरुषः**—खिस्ती समाजांत आजवर बरेच प्रसिद्ध पुरुष होऊन गेले. परंतु चिरस्थायी महत्वाचीं व लोककल्याणकारक अशीं कार्यें ज्यांच्या हातून झालीं, असे त्यातून फारच थोडे आहेत. या रीतीनें पाहिल्यास, **कायतानु व्हितोरीयु द फारीय**, व त्यांचे पुत्र **जुजे कुरतोदियु फारीय** यानीं १७८७ च्या सुमारास युरोपांतील मोठमोठ्या शहरांतून रसायनशास्त्रज्ञ व जादूगार म्हणून ख्याति मिळविली होती, ब्रिटिश साम्राज्यांत लॉर्डशिप मिळविणारा पहिलाच हिंदी इसम **सुबारिश** नांवाचा गोमतकीय होता. १८२० च्या पोर्तुगीज राज्यक्रांतीच्या वेळीं, इकडून पार्लमेंटांत निवडून गेलेले, **बेर्नार्दु पेरिश् द सील्व्ह**, ज्याना त्यानतर १८३५ त पार्लमेंटातर्फे नेमण्यांत आलेल्या पोर्तुगीज इंडियाच्या गव्हर्नरचा मान मिळाला. हे एक, ज्याचा शतसावत्सरिक उत्सव मुंबईत व गोव्यात नुकताच साजरा करण्यात

आला ते **फ्रांसिस्कु लुईश गोमिश** हे दुसरे व पहिल्याच हिंदी गव्हर्नरच्या हाताखालीं जनरल सेक्रेटरी या नात्यानें आलेले, **कोश्तांस्यु रॉकि दा कॉश्त** ( विद्यमान असलेले नव्हेत तर त्यांचे पूर्वज ) हे तिघेहीजण पोर्तुगीज पार्लमेंटचे विख्यात सभासद होऊन गेले. सिन्योर **गोमिश** हे जशी पोर्तुगीज तशीच फ्रेंच भाषाही अस्खलितपणें लिहीत व बोलत असत व त्यांच्या लेखनपद्धतीमुळें पोर्तुगीज वाङ्मयात देखील त्यांनीं बरीच महत्वाची जागा मिळविली होती. मडगांवचें कॉश्तांचें घराणें तर सुप्रसिद्धच आहे. त्या घराण्यांतून पिढीजाद विद्वान कर्तृत्वशाली पुरुष गोव्याला मिळाले आहेत. **बॅर्नार्दु फ्रांसीस्कु दा कॉश्त** यांनीं गोमतकांतील पहिलें प्रजापक्षीय वृत्तपत्र Ultramar हें इ. स. १८५९ सालीं स्थापन केलें. आपल्या पाउणशें वर्षांच्या हयातींत हे गृहस्थ पांचदां पार्लमेंटांत निवडून गेले होते. यांचा कार्याचा व्याप बराच मोठा होता. भाषा, वाङ्मय, शिक्षण, राजकीय उलाढाली, सांपत्तिक चळवळी, इत्यादि सर्व अंगांत तत्कालीन परिस्थितींत त्यांनीं महत्वाची कमगिरी केली आहे. त्यांच्या हयातींत चालू असलेल्या एकंदर महत्वाच्या उलाढालींत त्यांचा हात प्रामुख्यानें असे. मागें सांगितल्याप्रमाणें १८९५ सालच्या दादा राण्याच्या बंडात यांच्यावर सरकारची इतराजी होऊन दीव येथें त्यांना हद्दपार व्हावें लागलें व तेथेंच त्यांचा अंत झाला पोर्तुगीज प्राथमिक शाळांचे ते इन्स्पेक्टर होते. त्यांनीं त्या वेळीं तयार केलेली क्रमिक पुस्तकें अजूनही शिळीं वाटत नाहींत. उल्त्रामार पत्रातून प्रसिद्ध होणारे त्यांचे लेख, गोमतकाभिमानानें ओथंबलेले व धार्मिक पक्षाभिनिवेशापासून बरेचसे अलिप्त असे असत, म्हणून आर्चबिषपनें त्या पत्रावर बहिष्कार देखील पुकारला होता. **जुजे इग्नासियु द लॉयॉल** हे चाड्डो या वर्गांतील गृहस्थ, ब्राह्मण व चाड्डो याच्यामधून गोमतकाच्या पुढारीपणासाठीं त्या वेळीं चाललेल्या चकमकींत, बरेच पुढें आले होते उल्त्रामारच्या मागोमाग १८६१ सालीं, मानवेल लोरेंस द मिराद फ्रांकु नावाच्या गृहस्थानें स्थापन केलेलें " अ इंदिय पोर्तुगेज " नांवाचें वर्तमानपत्र याच गृहस्थाच्या ताब्यांत गेलें होतें. त्यातून ते आपल्या पक्षाचें समर्थन करीत असत. लॉयॉलाचा पक्ष त्या वेळीं हिंदुसमाजात देखील बराच लोकप्रिय झाला होता परंतु कां तें अद्याप सागतां येत नाहीं, इतकीं त्या लोकप्रियतेचीं कारणें क्षुल्लक होतीं त्यांचे समकालीन उल्त्रामाराचे संपादक **आंतोनियु अनाश्ताझिट** **ब्रूत दा कॉश्त**, परोक्ष कोश्तांसियु रॉकि दा कॉश्त ह्यांचे पुत्र, हे कॉश्त घराण्यांतील तिसरे धडाडीचे पुरुष होते. सन १८६७ पासून १९११ पर्यंत सुमारें ४२ वर्षें यानीं उल्त्रामारचें संपादकीय

स्थान शोभविलें होतें. या गृहस्थांनीं लिहिलेले बरेच ग्रंथ आहेत. त्यांपैकीं ( Gôa sob a Dominação Portuguesa ) "पोर्तुगीज सत्तेखालीं गोव्याची स्थिति" नांवाचा ग्रंथ इतिहासांत प्रमाणभूत मानला जातो. हें पुस्तक लिहितांना प्रस्तुत लेखकाला त्या ग्रंथाचा पावलो पावलीं उपयोग झाला आहे. कॉस्ताच्या घराण्यांत तूर्तदेखील बरेच पुरुष या मालिकेंत येण्याच्या लायकीचे आहेत, परंतु त्यांचा हयातींतच उल्लेख करणें ठीक न दिसल्यावरून तो इकडे केला नाहीं.

**फिलिफ नॅरी शाव्हियॅर** हे गृहस्थ १९ व्या शतकाच्या मध्यभागापर्यंत गोमंतकांत नांवाजलेले लेखक म्हणून गाजले होते. सेक्रेटरिएट मध्यें ह्याच्याकडे अंतर्गत कारभाराचें अत्यंत महत्वाचें खातें संपविण्यांत आलें होतें तेथें त्यांनी सेक्रेतारीय जॅराल ( सेक्रेटरीएट ) मधील दुय्यम सेक्रेटरीच्या जागेपर्यंत मजल गाठली होती. सरकारी कामें सभाळून गाबिनेति लितेरार्यु द फोंताईन्यश् या नांवाचें एक लहानसें नियतकालिक ते प्रसिद्ध करीत, त्यांतून त्यावेळची व तत्पूर्वकालीन दुर्मिळ माहिती संकलित केली होती. त्याचप्रमाणें ( Bosquejo Histórico das Comunidades de Gôa ) "गोमंतकीय कोमुनदादींची ऐतिहासिक रूपरेषा" या नांवाचेंही एक पुस्तक प्रसिद्ध केलं. हीं उभय पुस्तकें इतिहासांत प्रमाणभूत मानलीं जातात. प्रस्तुत पुस्तकाच्या लेखनांत या उभय पुस्तकांचीही पुष्कळच मदत झालेली आहे. **इज्मायॅल ग्रासीयश्** हे अलीकडच्या विद्वानांतील होत यांनीं वेळोवेळ संशोधनात्मक असे अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. लिसेव नासिओनालमध्यें हे अर्थशास्त्राचे अध्यापक असतांना त्यांच्या अध्यापनकौशल्याचा लाभ प्रस्तुत लेखकाला मिळाला होता. अर्थशास्त्रासारखा विषय अत्यंत सुगमपणें दृष्टांत उदाहरणांनीं पटवून द्यायची त्यांची हातोटी इतकी विलक्षण होती कीं, त्यांचें व्याख्यान ऐकल्यानंतर पुस्तक देखील उघडण्याची विद्यार्थ्यांना गरज पडत नसे. हे देखील सेक्रेटरिएट मध्यें एक नांवाजलेले ऑफीसर होऊन गेले. दुय्यम सेक्रेटरीची जागा त्यांनीं बरींच वर्षें उपभोगिली होती. यांच्या निधनानंतर कांहीं काल सेक्रेटरीएटमध्यें त्यांची उणीव तीव्रपणें भासण्याइतकी त्यांची कामगिरी अष्टपैलू होती. **पाद्रि रोदोल्फु दालगाद** हे बारदेशकर ख्रिस्ती पोर्तुगालच्या युनिव्हर्सिटींत संस्कृत भाषेचे प्रोफेसर होते. त्यांनीं पोर्तुगीज–कोंकणी व कोंकणी–पोर्तुगीज असे दोन कोश तयार करून प्रसिद्धही केले आहेत ऐतिहासिक संशोधनांतही त्यांची

कामगिरी बरीच आहे असें त्यांच्या ग्रथांवरून दिसून येतें. **इझिदोर येमीलियु वातीश्त** हे पारीसच्या युनिव्हर्सिटीचे डॉक्टर ऑफ फिलॉसफी व मेडीकल डॉक्टर होते. आणि त्याच युनिव्हर्सिटींत त्यांना प्रोफेसरीची जागा मिळाली होती विख्यात शास्त्रज्ञ Wurtz यांनीं लावलेल्या शोधांतील महत्वाचा भाग त्याच्या ज्या पोर्तुगीज शिष्यानें तयार केल्याचें इतिहास सागतो तो शिष्य म्हणजे **आगुश्तीन्य व्हिसेंतीन्यु लौरेंसु** या नांवाचा गोमतकीयच होय. रसायन शास्त्रांतील त्याची पारंगतता जगप्रसिद्ध होती. लोटलीचे **फ्रै कोंश्तांसियु द फारीय** हे कोईंब्र युनिव्हर्सिटींत देवविद्येचे प्रोफेसर होते. **रायमुंदु व्हेनांसियु रुद्रीग्रिश** व **मार्किज् लोब** हे दोन गोमंतकीय त्याच युनिव्हार्सिटींत अनुक्रमें तत्त्वज्ञान व गणीत या शाखांचे प्रोफेसर होते. अगदीं अलीकडच्या काळात देखील **डॉ. आल्फ्रेदु दा कोश्त** हे लिज्बोअ युनिव्हर्सिटींत व **डॉ. रोबेर्तु फ्रीयश** हे पोर्तुगीज युनिव्हर्सिटींत प्रोफेसर होते. खिस्ती धर्मपीठांच्या विषपसारख्या उच्च हुद्यावर पोंचून पोर्तुगालांत मानमान्यता मिळविणारे खिस्ती बरेच होऊन गेले. त्यापैकीं **दों मातेउश्न द काश्त्रु** व **दों तोमाझ द काश्त्रु** हे दोन लोटलीचे गृहस्थ, **दों कुश्तोदियु दु पिन्यु** हे वेर्णेचे व **दों व्हिसेंति दु रुझारीयु** हे रायचे अशा चौघांचींच नांवें आम्हांला मिळालीं. **नासिमेंत मेंदोंस** हे बारदेशकर व **डॉ. पाव्लीन दीयश्** हे तिसवाडीकर, पोर्तुगीज कवींत बऱ्याच उच्च दर्जाचें स्थान मिळविलेले कवि होते. केरीच्या दादासाहेब वैद्यांनीं सुरू केलेल्या Luz de Oriente मासिकांतून या उभय कवींच्या कविता, अनुक्रमें " नीतिपाल मुनि " व " प्रीतिदास" या टोपण नांवांखालीं प्रसिद्ध होत असत. डॉ. पाव्लीन दीयश् यांनीं भगवद्गीतेचें पोर्तुगीज भाषांतरही प्रसिद्ध केलें असून " विष्णुलाल " व ( Paiz do Sol ) "सूर्यावर्त" हीं दोन खडकाव्यें रचून प्रसिद्ध केलीं आहेत. " विष्णुलाल " हें काव्य संशयवादी व दुःखपर्यवसायी असून फारच उत्कृष्ट आहे पणजीच्या नॉर्मल स्कुलांत ते सायन्सचे प्रोफेसर होते. त्यावेळीं प्रस्तुत लेखकाला त्यांच्या शिष्यत्वाचा लाभ झाला होता. नेमलेलीं ठराविक पुस्तकें शिकवून झाल्यावर विषयाची बरीच अवांतर माहिती शिष्यवर्गाला देण्यांत त्यांचा हातखडा असल्यामुळें त्यांचा तास केव्हां संपे याची त्यांना व आम्हां शिष्यांना जाणीव देखील होत नव्हती. गोव्यांतील नामांकित संगीतज्ञांतही त्याची गणना होत होती त्याचप्रमाणें चित्रकलेचें स्वतन्त्र शिक्षण मिळालें नसतांना देखील तींतही त्यांचा हात बराच कुशल होता. थोडक्यांत सांगायचें झाल्यास ते एक अष्टपैलू

विद्वान होते असेंच म्हणावें लागेल. पराकाष्टेच्या भावनाप्रधान हृदयामुळें त्यांचा स्वभाव अत्यंत गोड झाला होता. वैद्यकीची परिक्षा ते बऱ्याच उच्च वर्गांत पास झाले असतांही हृदयाच्या जन्मजात मार्दवामुळें त्यांना तो धंदा अशक्य झाल्यावरून सोडून द्यावा लागला. फ्रेंच भाषा त्यांना करतलामलकवत् होती व मराठी वाचन करण्याचा त्यांना बराच नाद होता. पणजीच्या लिसेव सेंत्रालांत त्यांना फ्रेंच भाषेचे प्रोफेसर नेमण्यांत आलें होतें परंतु या जागेचा उपभोग घेण्यास ते फारसे जगले नाहींत.

## पोर्तुगीज वृत्तपत्रें.

**मुद्रणकलेचा प्रवेशः**—गोमंतकांत मुद्रणकलेचा प्रवेश बराच अगोदर झाला होता. इ. स १५५६ सालीं जेसुइटाच्या सां पाव्लच्या कॉलेजांत Conclusiones Philosophicas नांवाच्या ग्रंथाचें मुद्रण झाल्याचें आज सप्रमाण सिद्ध झालें आहे. छपाईचें काम सुरुवातीस Juan Bustamante या स्पॅनिश इसमाकडून व L. Fernandes या पोर्तुगीज माणसाकडून होई. इ. स १६५४ त या छापखान्यांतून फादर स्टीफन्सचें ख्रिस्तपुराण मुद्रित झालें.

**वृत्तपत्रांची सुरुवातः**—मुद्रणयंत्राचा प्रवेश जरी सतराव्या शतकांत झाला होता, तरी इ. स १८५१ पर्यंत विचारस्वातंत्र्याला मुळींच वाव नसल्यामुळें तोंवर वृत्तपत्राचा उदय मुळींच झाला नव्हता इंक्विझिसांव, सीलाबुश (धर्माध्यक्षानीं त्याज्य ठरविलेल्या ग्रंथांची यादी), रेयाल मेझ सेंसोर्य, इत्यादि अडचणींमुळें स्वतंत्र विचारांना मुळींच वाव नव्हता. इ. स. १८२१ सालीं सरकारनें गोव्यांत छापखाना आणला व त्यांतून Gazeta de Gôa नांवाचें स्वतःचें वर्तमानपत्र काढण्यास सुरुवात केली. डॉ लीम लैतांव हेच त्याचे संपादक होते. तत्कालीन राजकीय घडामोडींचा या वृत्तपत्रांतून ऊहापोह होत असला, तरी हें सरकारी कामकाजालाच विशेषेंकरून वाहिलेलें होतें.

या छापखान्यातून आणखीही पुष्कळ वर्तमानपत्रें निघालीं होतीं परंतु चार वर्षांवर त्यांतलें एकही जगलें नाहीं. खालीं त्याची यादी कालानुक्रमानें जात आहे.

Chronica Constitucional de Goa, Echo da Lusitania, Vigilante, O observador, O Encyclopedico, O Compilador, O Correio de Nova-Goa, Appenso ao Boletim Official, A Voz dos Povos da India, Jornal da Santa

Egreja Lusitana do Oriente, Gabinete Literario das Fontainhas, O Mosaico, O Defensor da Ordem e da Verdade, O Defensor do Real Padroado व A Revista Illustrativa परंतु या साऱ्या पत्रांत नांव घेण्यासारखें म्हटलें म्हणजे Gabinete Literario das Fontainhas हें मासिकच होतें मागें उल्लेखलेले फिलिप नॅरि शाव्हियॅर या विद्वानानें तें १५-१-१८४६ रोजीं सुरू करून १८४८ च्या डिसेंबरपर्यंत चालविलें. त्यांत तत्कालीन व जुन्या इतिहासांतील बरीच उपयुक्त माहिती आली आहे.

या नियतकालिकांशिवाय Boletim do Governo do Estado da India हें सरकारी ग्याझेटही याच छापखान्यांत मुद्रित होई. ता. ७-१२-१८३७ रोजीं त्याचा पहिला अंक निघाला. इ. स. १८४३ पर्यंत तें साप्ताहिकच होतें. १८४३ जानेवारी ते मेपर्यंत द्विसाप्ताहिक झालें होतें; पुनः १८५५ पर्यंत साप्ताहिक झालें; जानेवारी १८५६ पासून १८७९ च्या आगस्ट पर्यंत पुनः द्विसाप्ताहिक झालें, सप्टेंबर १८७९ ते १८८२ एप्रिलपर्यंत पुनः साप्ताहिक, १८८२ मे पासून १८८७ नवंबरपर्यंत दैनिक, १८८७ डिसेंबर ते १८९७ पर्यंत त्रिसाप्ताहिक व तेव्हांपासून आतां द्विसाप्ताहिक असे त्यानें अनेक फेरबदल केले. इ. स. १८७९ सालीं त्याचें नाव बदलून Boletim Oficial असें नवें नाव घेण्यात आलें. प्रारंभींच्या काळीं त्यात अग्रलेख, बातम्या वगैरे येत होत्या आणि संपादकही स्वतंत्र होते पण पुढें कायद्यानेंच त्याची संपादकीय जबाबदारी जनरल सेक्रेटरीवर टाकण्यांत येऊन तें केवळ सरकारी बातम्या देणारें ग्याझेट बनलें.

**खासगी छापखान्याची स्थापना:**—वर दिलेलीं एकदर नियतकालिकें जवळ जवळ निमसरकारीच होतीं, म्हटलें तरी चालेल. कारण, खासगी छापखान्याच्या अभावीं ती सारीं सरकारी छापखान्यांतच मुद्रित होत असत. इ. स. १८५९ सालीं ख्रिस्तवासी बॅर्नार्दु फ्रासीस्कु दा कॉश्त यांनीं मडगांव येथें छापखाना आणून पूर्णपणें स्वतंत्र असें स्वत:चें O Ultramar हें वृत्तपत्र सुरू केलें. तेंच पहिलें लोकपक्षीय नियतकालिक होतें.

O Ultramar:—ता. ६-४-१८५९ रोजीं पहिला अंक निघाला, ता. २-११-१९०५ पर्यंत साप्ताहिक व तेव्हांच्यानें आजवर द्विसाप्ताहिक स्वरूपांत प्रसिद्ध

होत असलें. उपरोक्त बॅर्नार्दु फ्रासीस्कु दा कॉश्त यांनीं १८६७ पर्यंत त्याचें संपादकीय स्थान भूषविलें. तेव्हापासून १९२१ पर्यंतच्या दीर्घ कालावधींत खि. वा. आंतोनियु आनाश्ताझियु ब्रुत दा कॉश्त हे त्याचे सपादक होते. पुढें त्यांचे पुत्र ब्राझ आतोन ब्रूत दा कॉश्त यांनीं तें आपल्या हातीं घेऊन कालच्या फेब्रुवारी पर्यंत चालविलें. फेब्रुवारींत ब्राझ दा कॉश्त हे निधन पावल्यावर आतां सि. आल्व्हरु व्हियॅगश् हे त्याचे सपादक आहेत.* यातील लेख पूर्वी निर्भीड व धर्मवेडापासून अलिप्त असे होते म्हणून त्यावर आर्चबिषपनीं बहिष्कार देखील घातला होता. आजही त्याचे लेख निर्भीड व सडेतोड विचारसरणीचे असतात. सासष्ट प्रातांतील ख्रिस्ती ब्राह्मणसमाजाचें तें मुखपत्र समजलें जाई व एकाकाळीं तें अत्यत वजनदार समजलें जात होतें. अजून गोव्यातील एकदर वृत्तपत्रांत याची सांपत्तिक स्थिति चांगली आहे. स्वत चा भरपूर फंड असल्यामुळें तें वर्गणीवर फारसें अवलवून नाहीं म्हटलें तरी चालेल.

A India Portuguesa:—सि. मिरांद फ्रांकु नावाच्या गृहस्थानीं हें साप्ताहिक ता. ४–१–१८६१ रोजीं सुरू केलें. इ. स. १८६६ ते १९०२ पर्यंत तें डॉ. जुजे इनासियु दा लॉयॉल यांच्या हातीं राहिलें. त्यानीं तें ओडली थेथें आपल्या गांवीं नेलें. लॉयॉल यांच्या निधनानतर १९०२ ते १९११ पर्यंत त्याचे बधु, आन्व्हेतॉन दा लॉयॉल यानीं तें चालविलें. त्यांच्यामागून डॉ. मिगेल दा

* ख्रिस्तवासी ब्राझ दा कॉश्त यांच्या संपादकीयत्वाखालीं दो० रोबेर्त ब्रूत दा कॉश्त हे Ultramar पत्रांतून सहसपादक या नात्यानें लिहीत होते. रोबेर्त दा कॉश्त यांनीं गोव्याच्या अलीकडच्या ८–१० वर्षांच्या घडामोडींत बरीच कामगिरी केली होती. विशेषत फ्रैंतश रिबैर या गव्हर्नरच्या अमदानींत कौन्सिल-बहिष्काराच्या झालेल्या चळवळींत त्यांनीं प्रामुख्यान भाग घेतला होता. सि. मिनेझिश ब्रागांस यांच्याबरोबर पोर्तुगीज वसाहतपरिषदेचे ते गोव्यातर्फे प्रतिनिधि निवडले गेले होते त्यानीं Hidra de Nativismo नांवाचें पुस्तक लिहून आपल्या पित्यानें लिहिलेल्या Goa sob a Dominação Portuguesa या ग्रथाचें कामच त्यानीं पुढें चालविलें कौन्सिलात त्यांनीं बरेंच महत्वाचें स्थान मिळविलें होतें. वधूंमागें एका आठवड्यांतच त्यांनाही काळानें ओढून नेलें. इतक्या लवकर त्याचें निधन होईल ही कल्पना देखील करता येत नव्हती.

लॉयॉल फुर्तादु यानीं १९११ ते १९१८ पर्यंत चालविलें; डॉ. लोयोल फुर्तादु यांच्या मृत्यूनंतर १९१९ ते १९२१ पर्यंत व्हिसेंति द ब्रागांस कून्य यांच्या हातीं राहिलें व १९२१ पासून आतां माजोडें येथें पाद्री आंतोन ग्रेगॉरियु दा कॉश्त हे तें चालवित असतात. पूर्वकाळीं Ultramar चा पक्ष व India चा पक्ष असे दोन पक्ष राजकारणात गाजत होते तेव्हां या पत्राला बरेंच वजन होतें. आता तें चाड्डे वर्गांतील एका लहानशा कंपूचें पत्र समजलें जातें.

या नंतरच्या काळांत उत्पन्न झालेल्या पत्रांची नांवनिशी पुढें जाते. सारीं साप्ताहिकेंच होतीं. नसलेल्या समोर तसा उल्लेख आहे.

O Phenix de Goa, कळंगुट, ६–४–१८६१ ते ३०–१२–१८६२; A Harmonia, पणजी, ता. १२–४–१८६२ ते २७–१०–१८६४; A Aurora de Goa, कळंगूट, ता. ६–१–१८६१ ते १–७–१८६५; A Sentinela da Liberdade, बाणावली, ता. ७–१०–१८६४ ते ३१–१२–१८६९; Jornal de Noticias, रायबंदर, ता. १–१०–१८६८ ते ३०–४–१८६९; A Imprensa, रायबंदर, ता.१८–२–१८७० ते एप्रिल १८७६; A Gazetta de Goa, पणजी, १६–७–१८७२ ते ३०–१२–१८७३, O Mensageiro, म्हापशें, १६–८–१८७२ ते १२–११–१८७३; O Paiz, मडगाव, ता ४–२–१८७३ ते २७–१०–१८७४; O Progresso, पेडणें, ता. ७–४–१८७३ ते २१–६–१८७३; Opinião Publica, ओडली, ता. २–७–१८७३ ते २२–१२–१८७५; O Oriente, कामुर्ली, ता. ७–३–१८७४ ते २७–११–१८७४, Gazeta de Bardez, आसगांव, ता. १७–१०–१८७४ ते २२–१–१८८४, Nova-Goa, पणजी, ता. ४–५–१८७६ ते १२–५–१८७८; A Cruz, पणजी, ता. १५–७–१८७६ ते २६-७-१८८२ A Patria, म्हापशें, ता. १०–१–१८७७ ते १४–१२–१८९४ व पुनः ता. ६–१०–१९०० ते २७–९–१९०१; A Civilização, रायबंदर, ता. ६–२–१८७७ ते २८–११–१८७८; O Imparcial (पाक्षिक) म्हापशें ता. १–७–१८७८ ते आगष्ट १८९९ पर्यंत. (शेवटच्या काळांत मासिक); A União, कळंगूट, ता. ५–९–१८७८ ते १८–१०–१८८०; A Semana, मडगाव, ता. ४–३–१८८० ते १०–९–१८८०; A Verdade, पणजी, ता. १६–७–१८८२ ते १३–१२–१८८५, O Echo Popu-

lar, कळंगूट, ता. ७-१-१८८३ ते ७-८-१८८४; O Correio da India, पणजी, ता. ७-८-१८८३ ते २८-१२-१८९२, दैनिकाच्या स्वरूपात ता. १४-९-१९११ ते ३१-११-१९१२ आणि पुढें ता. ८-४-१९१३ पर्यंत साप्ताहिक; O Correio de Gôa, पूर्वी परवरी व मग म्हापशें, ता. ७-८-१८८३ ते १४-४-१८८८; O Crente क्याथॉलिक धर्मपीठाचें मुखपत्र, पूर्वी पणजी व मग फोंडें, ता. ९-८-१८८३ ते १९२८; Periodico do Povo, सांतोमें, ता. २५-१०-१८८३ ते ११-१२-१८८६; O Progresso de Goa, पणजी, १८८३ ते ?; The Times of Goa, पणजी, इंग्रजी व मराठी भाषेंत प्रसिद्ध होई, ता. २१-९-१८८५ ते १८९९; A Discussão पणजी, ता. १२-८-१८८६ ते १८८९; A Convicção, साळगांव, ता. १५-१-१८८७ ते १८९५; Farpas मडगांव १८८७ ते ?, O Reporter da India, पणजी, ता. ३-१०-१८८८ ते २२-३-१८८९; A Democracia, मडगांव, ता. ११-१०-१८८८ ते ३-१०-१८८९; Ortigas, मडगांव, ता. १-१-१८८९ ते ?; Mandovy, पणजी, १८९० ते ?; O Vinte um de Setembro, मडगांव, ता २८-१०-१८९० ते २९-१२-१८९२; A Voz do Povo, कळंगूट, ता. ७-११-१८९० ते १९०७; मध्यें १८९५ त बंद पडून १८९८ सुरू झालें होतें Correspondencia de Goa, पणजी, १८९१, फक्त तीनच अंक निघाले; Gazeta da India, प्रथम कादोळी व मग हडफडें, ता. १-२-१८९३ ते १८-८-१८९४; O Investigador, (पाक्षिक) मडगांव, ता. २९-१-१८९४ ते २१-७-१८९४; Noticias, (त्रैमासिक) मडगांव, ता.१-९-१८९४ ते १८९७ पुढें द्विसाप्ताहिक व नंतर साप्ताहिक. अगदीं अलीकडेच बंद झालें. यांत सुंदर कार्टून्स येत असत; O Brado Indiano, पणजी, १५-१२-१८९४ ते १२-१०-१८९५; O Liberal, (मासिक) कळंगूट, जानेवारी ते अक्टोबर १८९५ पर्यंत. पोर्तुगीज इंग्रजी व कोंकणी भाषांत प्रसिद्ध होई, O Paiz, (पाक्षिक) पणजी, ता. १-१-१८९५ ते अक्टोबर पर्यंत; A Evolução पणजी, ता. २-१-१८९५ ते १३-११-१८९५; Bibliotheca de Noticias, (मासिक) आगष्ट ते नवंबर १८९५ पर्यंत, A Era Nova, पणजी, ता. ३-११-१८९७ ते ६-१-१९०२ पुढें ३०-४-१९०३ पर्यंत दैनिक; O Portuguez, पणजी, ता. १६-१२-१८९७ ते १६-११-१९०१.

O Heraldo.—हें गोमतकातील पहिलेंच दैनिक पणजी येथें ता. २२-१-१९०० रोजीं सुरू झालें. प्रारंभीं त्याला सिं. मिनेझिज ब्रागांस, दो. आंतोनियु दा नोरोन्य, डॉ. आंतोनियु मारीय दा कून्य, डॉ. कॉश्त आल्व्हरिश् इत्यादि कसलेल्या व विद्वान लेखकाची जोड मिळाली होती. प्रजाहिताचें बरेंच काम या पत्राकडून तेव्हा झालें. परंतु पुढें मतभेदामुळें व इतरही अनेक कारणांमुळें त्यांत फाटाफूट होऊन चांगले चांगले निस्पृह लेखक त्याला सोडून गेल्यानंतर, आजला हें दैनिक म्हणजे हाजी हांजी करणारें बनलें आहे. मध्यतरीं १९१२त ५ महिने, १९१९ त वर्ष दोन वर्षें बद पडलें होतें. अभिजात वर्गांत आज त्याला तेवढें वजन नाहीं.

O Nacionalista, सां तोमॅ, ता. १०- १- १९०४ ते १२-१२-१९१०; O Bardezano, म्हापशें, ता. ४-२-१९०४ते२२-१२-१९०६; O Indio, चिंचोणें, ता. ९-२-१९०४ते६-४-१९०८; O Oriente, म्हापशें, ता. ९-३-१९०५ते १२-१२-१९०५; Diario de Goa, (दैनिक) पणजी, १६-१०-१९०५ ते १२-२-१९०६; Echo da India, (प्रारंभीं दैनिक होतें पण लागलीच साप्ताहिक बनलें) मडगांव, ९-९-१९०५ ते २८-६-१९०७; A Reforma, पणजी, ता. १६-१०-१९०५ ते१-१-१९०६ हें साप्ताहिक अत्यत निर्भीड होतें त्यामुळें गव्हर्नरनीं तें बद पाडलें. लिसेंवचे जर्मन भाषेचे प्रोफेसर दों तोमाझ द नोरोन्य हे त्याचे संपादक होते. O Imparcial, पणजी, ता. ५-३-१९०६ ते १८-८-१९०६; O Pygmeu (दैनिक), पणजी, ता. ४-२-१९०८ ते ३१-१२-१९०९; पुनः ता. १-६-१९१० ते १४-१०-१९१० पर्यंत चाललें. तें अत्यत टारगट होतें.

O Heraldo:—O Heraldo मधून फुटून निघालेल्या मंडळीनें काढलेलें हें दैनिक पणजी येथें ता. २१-५-१९०८ रोजीं सुरू झालें एक धार्मिक बाबत सोडल्यास इतर बाबींत अत्यत नेमस्त दैनिक. चागल्या चागल्या लेखकांनीं लिहिलेले अभ्यासपूर्ण लेख यांत मधून मधून येत असतात. ताज्या बातम्यांचा पुरवठा व नियमितपणा यांत तें नेहमीं वाखाणलें जातें.

O Ariano, चिंचोणें, ता. १६-७-१९०८ ते२७-१२-१९११ व पुनः १९-८-१९१४ ते २५-१२-१९१५ O Futuro, बार्दें, (बारदेश) ता. ११-४-१९०९ते १२-१-१९१७. मध्यें थोडा वेळ द्विसाप्ताहिकही झालें

होतें; O Commercio ( दैनिक ) पणजी, ता. १–१०–१९०९ ते ३०–१२–१९१२. हें रात्रीचें प्रसिद्ध होई;

O Debate हें साप्ताहिक पणजी येथें सि. मिनेझिझ ब्रागास यांनीं ता. ३–४–१९११ रोजीं काढलें. भारदस्त व व्याजोक्तिपूर्ण अशी अभियुक्त भाषा, निर्भीड व सयुक्तिक विचारसरणी आणि केवळ एकाच माणसाचें धोरण, यामुळें गोमंतकीय नियतकालिकांत त्यानें कायमचें नांव ठेविलें आहे. रिपब्लिकनें गोव्यांत पाठविलेले पहिलेच गव्हर्नर दो. कौसेर दा कॉश्त यांचा उत्कृष्ट पाठपुरावा या पत्रानें केला होता. त्यामुळें तत्कालीन राजकारणांत याचें धोरण प्रजेस पुष्कळदां नावडतें झालें होतें. परंतु धर्म व राजकारण यांची फारकत व्हावी असें प्रतिपादण्याचें धैर्य आणि क्याथॉलिक धर्मवेडाचा निःपक्षपाती टीकाकार बनण्याची धडाडी याच पत्रानें दाखविली. अजूनही त्याचे लेख ताजे वाटतात ता. १६–२–१९२१ रोजीं तें बंद पडलें.

* O Popular. वाकें, ता. ४–१०–१९११ ते २०–५–१९१२; O Povo, (द्विसाप्ताहिक) मडगांव, ता. २६–७–१९१२ ते १२–२–१९१३; * Jornal da India, ओडली, ता. १४–३–१९१३ ते २६–८–१३; Boletim do Comercio, पणजी, ता. २९–३–१९१३ ते २९–३–१९१५; A Patria, पणजी, ता. ९–८–१९१३ ते २०–१०–१९१४ आणि पुन ६–७–१९१९ ते १९२३ पर्यंत चाललें. * Rebate, ओडली, ता. १–१०–१९१३ ते १२–६–१९१४; Vida Nova, म्हापशें, ता. १७–११–१९१३ ते २२–९–१९१७; Jornal do Povo, पणजी, ता. १४–७–१९१४ ते १०–१०–१९१८; *Lanterna, ओडली, ता. १–१०–१९१४ ते २–१२–१९१६; O Liberal, साळगांव, ता ५–१०–१९१६ ते १२–३–१९१९.

A Terra.—O Ultramar मधून फुटून निघून सि. लिबॅरियु पैरैर यांनीं हें साप्ताहिक मडगांव येथें ता. १–१–१९१७ रोजीं सुरू केलें असून

* हीं सारीं वर्तमानपत्रें जुजें इनासियु फ्रांसीस्कु दा लॉयॉल ऊर्फ फांच्यु लॉयॉल या सुप्रसिद्ध चळवळ्या गृहस्थानें चालविलीं होतीं. भरमसाट लिहून आपला मतलब साधणें हेंच या पत्रांचें धोरण दिसे. तरी पण भाषा आकर्षक असल्यामुळें त्यांना बरेच वाचक मिळत.

आजवर चालू आहे. हिंदूच्या रास्त आकांक्षांना विरोध करण्याचा एकही प्रसंग त्यानें दवडला नाहीं. ख्रिस्तीसमाजांत त्यामुळें याला बराच मान आहे.

O Progresso, म्हापशें, ता. १०–३–१९१७ ते १५–११–१९१९; * Opinião, प्रारंभीं ओंडली व मग वास्कोदागाम, ता. १२–११–१९१७ ते २९–३–१९१९; O Português, पणजी, ता. ९–८ १९१९ ते २६–९–१९१९ Nacional, पणजी, ता. ३–११–१९१९ ते ९–३–१९२०

Diário de Noite:—हें दैनिक पणजी येथें ता. १–१२–१९१९ रोजीं सुरू झालें व आजवर चालतें. वक्रनीति, कुटिलपणा व भरमसाट लिहिणें, यांत याचा हात धरणें अशक्य आहे. प्रागतिक हिंदूचा द्वेष करण्यांतच हें आपली इतिकर्तव्यता मानतें. हें रात्रीचें निघत असल्यामुळें व त्याच्या धोरणामुळें त्याला "रात्रींचर" असें सार्थ नांव पडलें आहे.

A Tribuna कळंगूट ता. २–१–१९२० पासून सुरू आहे.

Provincia·—सुप्रसिद्ध पोर्तुगीज पत्रकार सि. पेरैर बाताल्य हे याचे संपादक होते. हें युरोपियन समाजाचें पत्र होतें. परंतु निर्भीड व सडेतोड लेख, सरकारी बातम्याच्या पुरवठ्याबरोबर नूतन वृत्तसार व आकर्षक स्वरूपाची मांडणी यांमुळें हें वाचनीय होतें पाद्रीशाही व धर्मवेड यावर या पत्राचा तोडगा रामबाण होता. पेरैर बाताल्य हे इकडून जातांच तें बद पडलें.

India Portuguesa हें दैनिक उपरोक्त लांतेर्न, रेबाति इत्यादिकाचेंच भावड आहे. इ. स. १९२६ सालीं उल्लेखित फाच्युलॉयॉल यानीं तें पणजी येथें सुरू केलें. हिंदुद्वेषांत तें बरेंच अग्रेसर असून त्यांत लिसेवाच्या प्रोफेसरांचा हात असतो. पूर्वीं तें मडगांव येथें साप्ताहिकाच्या स्वरूपांत निघत होतें.

Pracasha.—हें द्विसाप्ताहिक पणजीच्या हिंदु पुढाऱ्यांनीं ता. २२ मार्च १९१८ रोजी शुद्धीकरणास मदत करण्याकरिता सुरू केलें अभियुक्त भाषासरणी व निर्भीड व सडेतोड विचार, यांमुळें हें बरेंच लोकप्रिय झालें होतें विशेषतः ख्रिस्ती पत्रकर्त्यांकडून हिंदुसमाजावर वेळीं अवेळीं होणारे हल्ले परतविण्याची व प्रजेच्या रास्त हकाची राजदरबारीं पाठराखणी करून प्रस्तुतच्या लष्करी डिक्टेटर पद्धतीला विरोध करण्यांत या पत्रानें अग्रेसरत्व मिळविलें होतें. अलीकडे सुप्रसिद्ध लेखक सिं. मिनेझिझ ब्रागांस यांचे लेख याच पत्रांतून प्रसिद्ध होत असत. माजी नामदार दो. व्यंकटेश वि. सूर्यराव सरदेसाई हे याचे सपादक होते. गेल्या नववरअखेर स्वतः सपादकानींच तें सेन्सॉरच्या त्रासामुळें बद केलें.

O Oriente नावाचें एक साप्ताहिकही अलीकडेच निघूं लागलें आहे

Pradipa:—हें नियतकालिक प्रकाशाचेंच धाकटें भावंड शोभतें. प्रकाश बंद होतांच डॉ. बाळकृष्ण दत्ताराम साखरदांडे यांनीं तें ता. ४ डिसेंबर १९२९ रोजीं सुरू केलें. याचें धोरण देखील प्रकाशासारखेंच असल्यामुळें, दुसऱ्याच अंकाच्यावेळीं सरकारनें त्याला सेन्सॉरचा रस्ता दाखविला. सेन्सॉरची योजना कोणत्या कायद्यान्वयें केली गेली आहे, असा प्रश्न संपादकांनीं सरकारला केला व त्याचें उत्तर न आल्यामुळें पत्र सेन्सॉरकडे न पाठवितां तसेंच चालू केलें. तेव्हां सरकारच्या हुकूमावरून त्याचे अंक टपालांत जप्त करण्यांत आले. त्याचप्रमाणें आदमिनिस्त्रादोरानें प्रदिपाच्या कचेरींत शिरून तेथील अंकही जप्त करून नेले. बेकायदेशीर रीतीनें टपालांत अंक अडकविल्याबद्दल त्या खात्याच्या डायरेक्टर-वर, आणि बेकायदेशीरपणें घरात शिरून अंक जप्त केल्याबद्दल, निवासस्वातंत्र्याच्या भंगासाठीं आदमिनिस्त्रादोरावर, फौजदारींत केस चालविली आहे पत्राचा तिसरा अंक पुनर्मुद्रण करून माणसांकडून गोवेंभर वांटला गेला. त्याचप्रमाणें पुढील अंकही वाटण्यांत येतात; पत्र मुळचें साप्ताहिक होतें तरी या प्रकारामुळेंच तें अनियमित बनलें आहे

या शिवाय पोर्तुगीज भाषेंत वाङ्मयात्मक, शास्त्रीय, कायद्यांविषयीं लिहिणारीं, बरींच वृत्तपत्रें होऊन गेलीं विस्तारभयामुळें त्यांचा गोषवारा देण्याची इच्छा मागें सारावी लागत आहे. तूर्त Oriente Português हें पुराणवस्तुशास्त्र-विषयक, Boletim Geral de Medicina e Farmácia हें वैद्यक-विषयक, Boletim Sanitário हें आरोग्य विषयक, Gazeta da Relação de Nova-Goa हें कायद्याविषयींचें, Boletim de Agricultura हें शेतकीविषयक, अशीं उत्कृष्ट छपाईचीं नियतकालिकें चालू आहेत.

**मुद्रणस्वातंत्र्याचा कायदा:**—मुद्रणस्वातंत्र्याचा हक्क कार्त कोंदिंतुसियोनालच्या कलमामुळें प्रजेस मिळाला आहे. त्याचा जो स्वतंत्र कायदा होता त्यांत वारंवार फरक झाला होता. जनरल कार्मोनाच्या प्रस्तुतच्या लष्करी सर-कारनें वसाहतीसाठीं मुद्रणस्वातंत्र्याचा स्वतंत्र कायदा करण्यापूर्वी, पत्राचा एडीटर हा पोर्तुगीज नागरिकाचे हक्क असलेला असावा लागे व त्यानें एतद्विषयक कायद्यांत ठरविलेल्या दीड हजार रुपयांची जामिनगिरी न्यायकोर्टांत मांडावी लागे. पत्रांत आलेल्या निनावी लेखांबद्दल हा एडिटर जबाबदार समजला जाई व सहीनिशीं

प्रसिद्ध झालेल्या लेखांबद्दल लेखक व एडीटर हे दोघेही जबाबदार ठरत. जनरल कार्मोनाच्या नव्या कायद्यान्वयें, नियतकालिकांचा डायरेक्टर कोठची तरी उच्च शिक्षणाची पदवी असलेला किंवा वैशेषिक शिक्षण घेतलेला पोर्तुगीज नागरिक असावा लागतो. प्रसिद्ध झालेला लेख डायरेक्टरला न कळतां छापला गेल्यास त्या लेखनाची जबाबदारी, लेख सहीनें प्रसिद्ध झाल्यास लेखकावर व निनावी असल्यास पत्राच्या मालकावर पडते. पोर्तुगीज भाषेशिवाय इतर कोणत्याही भाषेंत नियतकालिक काढावयाचें झाल्यास, या पदवीधराला सरकारची आगाऊ परवानगी मिळवावी लागते. आणि ती देणें न देणें हें सरकारच्याच मर्जीवर अवलंबून असतें पोर्तुगीज इंडिया बाहेरचीं जीं नियतकालिकें आंत येतात तीं पोर्तुगीजेतर भाषेंत असल्यास, अशा पत्रांची आवक पेनाच्या एका फटकाऱ्या-सरशीं बंद करण्याचा अधिकारही या कायद्यानें सरकारला मिळाला आहे तरीपण नियतकालिकांवर सेन्सॉर बसविण्याचा किंवा जामिनगिरी मागण्याचा अधिकार मात्र त्यांत नाहीं. नियतकालिकांशिवाय पत्रकें, पुस्तकें, वगैरे काढावयाचीं असल्यास, त्याचा प्रकाशक लिसेबची पांचवी इयत्ता पास झालेला असावा लागतो. प्रस्तुत पुस्तक जर गोमंतकांत प्रसिद्ध झालें असतें, तर असा प्रकाशक लेखकाला मिळवावा लागला असता. पत्रांत प्रसिद्ध झालेल्या मजकुरामुळें एकाद्या गृहस्थाची किंवा संस्थेची बदनामी झाल्यास त्या मजकुरास देण्यांत येणारें उत्तर त्याच जागीं व दुसऱ्याच अंकात प्रसिद्ध करण्याची जबाबदारी कायद्यानें संपादकावर आहे. मुद्रणस्वातंत्र्याच्या कायद्याचें स्वरूप थोडक्यात याप्रमाणें आहे.

---

विभाग पहिला समाप्त

# गोमंतक परिचय.

### प्रकरण ४ थें

### सामाजिक परिस्थिति

## विभाग दुसरा

## हिंदुसमाज

**सामान्य वर्णन व प्रमुख जाती.**—गोमंतकीय हिंदू समाज सामान्यतः इतर ठिकाणच्या हिंदु समाजासारखाच आहे त्यांतील प्रमुख प्रमुख जाती म्हणजे गौड सारस्वत ब्राह्मण, कऱ्हाडयांतील पद्ये ब्राह्मण, चित्पावनब्राह्मणाची थोडीशी वस्ती व दैवज्ञ शिवाय वैश्य, मराठा, क्षत्रिय, भंडारी समाज, कुणबी, नापित, मराठा गायक इत्यादि होत. शिक्षणात किंवा राजकीय बाबतींत सामान्येंकरून गौड सारस्वतब्राह्मणच पुढारलेले आहेत. गौड सारस्वतांत चारपाच पोटभेद आहेत, परंतु अलीकडे ते पूर्वीसारखे रोटीबद नाहींत. गौड सारस्वतब्राह्मणांचे माध्वसंप्रदायी वैष्णव व अद्वैत मतानुयायी स्मार्त, असे दोन मुख्य भेद दिसून येतात येथील गौ सा. ब्राह्मणाच्या व इतर देवस्थानांत व सार्वत्रिक, वैदिकी व पौरोहित्य चालविणारीं घराणीं गौड व द्रविड या दोन्ही शाखेचीं आहेत. गौडात शिक्षणसंपन्नता जास्त व षटकर्माधिकारातील प्रतिग्रहाकडे ओढा कमी अर्थात् भिक्षुकहि कमी. गौड सारस्वतब्राह्मणांच्या खालोखाल शिक्षणात किंवा इतर घडामोडीत पुढारलेला वर्ग म्हणजे वैश्यसमाजीय होय मराठा समाजात शिक्षणविषयक आकांक्षा नुकत्याच उत्पन्न होत असल्या, तरी हा वर्गहि राजकीय, सामाजिक वगैरे चळवळींत नुकताच पडू लागला असून आपल्या परिस्थितीच्या जाणिवेमुळे उन्नत्यर्थ बराच धडपडत आहे भंडारी समाज, दैवज्ञ ब्राह्मणसमाज, नापित समाज देखील आपली कित्येक शतकाची झोंप सोडून प्रगतिपथ झपाट्यानें आक्रमण करीत असलेले दिसून येतात. परंतु निदान प्रस्तुत लेखकाला तरी या सर्व समाजांच्या चळवळीपेक्षां गोमंतकांतील मराठागायकसमाजात जी तीव्र जागृति उत्पन्न झालेली दिसून येते, आपल्या दीर्घकालीन त्याज्य अशा परिस्थितीं-तून वर येण्याची त्याची जी धडपड चाललेली आहे, तिचेंच विशेष कौतुक वाटतें.

पुढारलेल्या गौड सारस्वतब्राह्मणवर्गात सामान्यत स्पृश्यास्पृश्यतेच्या समजुती दक्षिणी द्रविडब्राह्मणांइतक्या तीव्रतेनें दिसत नसल्यामुळें असो किंवा

गोमंतकीय हिंदु समाजांत मध्यम वर्गाचेंच प्राबल्य असल्यामुळें असो किंवा ब्राह्मण व ब्राह्मणेतर जातींतील पुढाऱ्यांच्या समंजसपणामुळें असो, पण तीव्रतर सामाजिक विरोध किंवा ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद इकडे तेवढे बद्धमूल होऊं शकत नाहीत. कांहीं कांहीं वेळां सार्वजनिक चळवळींत हा वाद डोकावूं पाहूं लागतो खरा, परंतु उभयपक्षीय समंजस पुढाऱ्यांच्या थोड्याशा प्रयत्नानें ह्या ठिणग्या, आगीचें स्वरूप प्राप्त होण्यापूर्वीच नाहींशा होतात, इतकेंच नव्हे तर अशी कोणतीहि सामाजिक चळवळ उपस्थित झाली–मग ती वैश्यवर्गातील असो, मराठा वर्गातील असो किंवा इतर कोणत्याहि वर्गातील असो, फार काय, पण वेळीं अवेळी महाजन मंडळीवर रुसणाऱ्या गायक समाजातील असो, एकंदर समाजातून, त्या चळवळीला जोराचा पाठिंबा मिळाला नाही असें आजवर झालें नाहीं. गेल्या दोनतीन वर्षांतून गोव्यात भरलेल्या, वैश्य परिषद्, दैवज्ञ ब्राह्मण परिषद्, भंडारी शिक्षण परिषद्, मराठा गायक समाजाची परिषद, इत्यादि परिषदातून किंवा निरनिराळ्या वर्गा-कडून दरसाल ठिकठिकाणी साजऱ्या करण्यांत येत असलेल्या व्याख्यानमालांतून जरी पाहिलें, तरी हेंच दृश्य दिसून येतें. जातिभेदाच्या तत्त्वावर उभारलेली द्वेषात्मक चळवळ इकडे फारशी तग धरूं शकतच नाहीं म्हटलें तरी चालेल. कारण गोव्याचें एकंदर वातावरणच असें आहे कीं, त्यात अशा चळवळी फार. तर एखाद दुसरे वर्षच टिकतात त्यापुढें हे जंतु ह्या वातावरणांत सजीव राहूं शकतच नाहीत. कांहीतरी देवाण घेवाण होऊन प्रकरणाचा निकाल लागतो. एखाद्या वर्गाच्या प्रत्यक्ष हितसंबंधावरच जेव्हा आघात होतो, त्याच वेळीं ह्या चळवळी जरा जोराच्या चालतात. पण त्या बद्धमूल मात्र होऊं शकत नाहींत. आणि तसेंच पाहिलें तर हितसंबंधाचा प्रश्न आल्यावर, खास ब्राह्मण वर्गातच तरी तट पडल्याशिवाय कोठें राहातात ? तेंच स्वरूप या चळवळींनाहि असतें. मड-गांव, पणजी, म्हापशें वगैरे ठिकाणी जातीच्या तत्त्वावर चालविलेल्या बऱ्याच संस्था आहेत; परतु त्या संस्थातून संस्थापक कोणीं व्हावें, ( म्हणजे पैसे कोणीं द्यावे ) किंवा कारभार कोणी करावा याच मुद्यावर जातीचें तत्त्व शिरतें, संस्थेचा फायदा कोणीं घ्यावा, या मुद्यावर जातीचें तत्त्व अमलात येत नाहीं. कारण बहु-तेक वाङ्मयात्मक, शैक्षणिक किंवा सामाजिक संस्था सार्वजनिक व मोफत उपयोगाच्याच आहेत.

केवळ एक देवालयाचा प्रश्न मात्र निराळ्या स्वरूपाचा आहे पुढें योग्य स्थळीं देवालय प्रकरणांत याचा विचार होईलच परंतु जातांजातां दिग्दर्शनादाखल एवढेंच सांगितलें म्हणजे बस्स आहे कीं, गोमंतकातील बहुतेक प्रमुख देवालयें एखाद्या कुलाचीं कुलदेवतेची तरी असतात, मूळच्या ग्रामसंस्थातर्फे चाललेली ग्रामदेवतेचीं तरी असतात किंवा प्रांतिक दैवतांचीं ( प्रांतिक मंडळांनीं Camaras gerais चालविलेलीं ) तरी असतात अर्थात्च कुलदैवतें त्या त्या कुलाच्या मालकीचीं, ग्रामदैवतें ग्रामसंस्थेच्या ( कोमुनदादीच्या ) मालकीची व प्रातिक दैवतें, ज्या ज्या कोमुनदादी मिळून तो प्रांत बनलेला आहे,त्या त्या कोमुनदादीच्या घटकाच्या मालकीचीं असतात पूर्णपणें सार्वजनिक अशीं देवालयें गोमंतकात मुळींच नाहींत असें म्हणायला हरकत नाही आणि म्हणूनच ब्रिटीश हिंदुस्थानातल्यासारखीं हक्काचीं भांडणें सार्वजनिकतेच्या मुद्यावर येथे चालू शकत नाहींत प्रत्येक देवालयाचा स्वतंत्र असा कायदा (Compromisso) महाजन मंडळीच्या सरकारी कायद्यास अनुसरूनच झालेला असल्यामुळें, कायद्यानेंच देवालयात महाजनपणाचा हक्क प्रस्थापित करून घ्यावा लागतो, तेव्हां असा वाद चालतो, परंतु त्याला जातिभेदीय स्वरूपाच्या तंट्याऐवजीं व्यक्तिगत हितसंबंधाच्या तंट्याचें स्वरूप येतें.

अस्पृश्यता तर गोमंतकांत आजला देवालयप्रवेशापुरतीच शिल्लक राहिली आहे. सार्वजनिक जागा, सरकारी शाळा, पुष्कळशा खासगी शाळा, बाजार, विहिरी, पाणवठे इत्यादि जागातून ती मुळींच पाळली जात नसते इतकेंच नाहीं तर ब्राह्मणाच्या विहिरींवर अस्पृश्य पाणी भरीत असलेलें दृश्य गोमंतकात सर्व सामान्य आहे. खेड्याची रचना महाराष्ट्रातल्याप्रमाणें गावठाण निराळें व शेती जमीन निराळी अशी नसल्याने, सामान्यत खेडेगावांतून एकमेकांना लागून अशीं घरें फारशीं नसतात तर बागाइती किंवा इतर जमिनींतून स्वैरपणे विखुरलेलींच दिसतात आणि त्यांतच मधून मधून अस्पृश्यवर्गाचींहि घरें असतात निराळा असा महारवाडा क्वचितच दिसतो

**घरेंदारें व राहणी**—हिंदु समाजांतील घरें, सुखसोयींच्या दृष्टीनें ख्रिस्त्याइतकीं नीटनेटकी व आरामशीर नसलीं, तरी स्वच्छतेच्या बाबतींत त्यांना दोष देण्याला फारशी जागा नसते आणि प्रस्तुत लेखकानें पुणें, महाराष्ट्रांतील किंवा गुजराथमधील बरींच खेडेगावें आणि शहरें पाहिलीं आहेत, त्याशीं तुलना केल्यास, आमचीं खेडेगावें व शहरें पुष्कळच स्वच्छ आहेत, असें कोणीहि कबूल करील. त्या

मानानें इकडचीं हिंदूंचीं घरें किती तरी स्वच्छ व टुमदार दिसतील. गोमंतकांतील घरांच्या तोडीला उतरलींच तर दक्षिण कोंकणांतीलघरें मात्र उतरतील.त्याचप्रमाणें महाराष्ट्रातील सातारा शहरहि इतर शहरांच्या मानानें गोमातकीय शहरांइतकेंच, स्वच्छ दिसतें. जुन्या काबिजादींतील हिंदूंचीं घरे बरींचशीं ख्रिस्ती वळणावर गेलेली दिसतात. परंतु नव्या काबिजादींतून दर पंधरावीस वर्षांनी एखादें तरी बंड उद्भवून लूटफाट होते.लोकवस्तीहि विरळ असल्यामुळें ही घरे बांधतांना, सोयीपेक्षां सुरक्षिततेकडेच साहजिकच विशेष लक्ष द्यावें लागतें. हिंदूचीं घरें जर निराळींच ओळखायची झालीं,तर चौकाचीं घरें तीं सारी हिंदूचीं, असें म्हणता येईल.खाणेंपिणें सामान्यत. इतर ठिकाणच्या हिंदूंप्रमाणेंच असतें. फरक एवढाच कीं, येथे खाद्य पदार्थांतून नारळाचा भरपूर उपयोग होत असतो आणि घाटावर किंवा देशात नारळ तादृश मिळत नसल्यानें, त्याऐवजी दुधातुपाचा उपयोग होतो. डाळभात, भाजीपाला, ताजे व सुके मासे, हेंच मुख्य अन्न असतें. केवळ भाकरीवर राहाणारें कुटुंब इकडे मिळणे अशक्यप्राय आहे. पोर्तुगीजाच्या कृपाप्रसादामुळें, सृष्टिनिर्मित) ग्रामसूकररूपी भंगी इकडे फार आहेत अर्थात्‌च स्वच्छतेची तेवढीच काळजी कमी करावी लागते. सूकर वर्गाचा दुसरा फायदा म्हणजे खताकडे त्याचा मळ फारच उपयोगी पडतो. म्हणून त्यांची घाणहि माजत नसते. महाडच्या " चव-दार " तळ्याचें बेंचव पाणी पिण्याचें भाग्य प्रस्तुत लेखकाला पधरवडाभर मिळालें होतें. तशा प्रकारचें पाणी इकडे खालचा वर्ग देखील वापरांत आणणार नाही. नदीनाल्यांचें पाणी वापरण्याचें घातकी खूळ इकडे केवळ कर्यादीत ( सह्याद्रीच्या लगतच्या भागात ) मात्र प्रचलित आहे. तळ गोमंतकात तें मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल कारण भरती ओहोटीमुळे तेथें सारे प्रवाहच मुळीं खाऱ्या पाण्याचे असतात. क्वचित् स्थळीं त्याचा उपयोग झालाच तर त्याचे दुष्परिणाम भोगावे लागत असल्यानें, तोहि परिणाम उत्तरोत्तर बंद पडत चाललेला आहे. शिवाय, म्युनिसिपालिट्यांकडून जागोजाग विहिरी खोदण्यांत येऊन या प्रचाराला आळा घालण्यांत येतो.

**ललितकला**—ललितकलाप्रियता तर आम्हां गोमंतकीयाचें बाळ-कडूच आहे जात्याच सृष्टिसौंदर्यसंपन्न अशा प्रदेशात जन्म घेण्याचें भाग्य वाट्यास आल्यामुळें, सौंदर्योपासनेचें वळण सृष्टिदेवीनेंच गोमंतकीयांना लावलें आहे म्हटलें तरी चालेल. शहरातूनच काय, परंतु खेड्यांतूनहि होणाऱ्या भजनादिकात हार्मोनिअम, तबला, इत्यादि साज नेहमीं मिळतो आणि

रागरागिण्याचें स्थूल ज्ञानहि असलेले बरेच लोक खेडोखेडीं मिळतात. ग्रामोफोनच्या द्वारें फुरसदीचा वेळ घालविणारे हौसीजन इकडे पुष्कळच आढळतील. नाट्यकलानिपुण असा नटवर्ग गोव्यांत उत्पन्न होऊं शकतो, हें बलवंत व रंगबोधेच्छु नाट्यसमाज यातील रा दीनानाथ रा. सावकार इ गोमंतकीय प्रसिद्ध नटाच्या कामगिरीवरून दिसून आलेंच आहे बाकी आमची ही नाट्यप्रियता महाराष्ट्रीय नाटकमंडळ्यांच्या तरी पूर्ण परिचयाची आहे. कठीण अशा आर्थिक परिस्थितीतहि गोमंतक हा नाटक मंडळ्यांचा पूर्वापार आश्रयदाताच आहे. गायक समाजांतील गायिकाशिवाय इतर हिंदु स्त्रीवर्गांत मात्र शास्त्रोक्त गायनाचा-संगीताचा मुळींच प्रसार झाला नाही म्हटलें तरी चालेल. चित्रकला, फोटोग्राफी, वास्तुकला या दृष्टीनें पुष्कळ गोमंतकीय महाराष्ट्राच्या परिचयाचे आहेत. मूर्तीचें काम पाहावयाचें झाल्यास, गणेशोत्सवात पणजी, म्हापशें, डिचोली, इत्यादि ठिकाणचे मूर्तिकार शिक्षण मिळालें नसतांहि इतक्या चांगल्या मूर्ति बनवितात कीं, त्या पाहून तज्ज्ञ पोर्तुगीज युरोपियनांनींहि त्यांची वाहवा केली आहे.

**व्यापारधंदा** —व्यापारधंद्यात हिंदु लोकाचा हात बराच मोठा असतो. गोमंतकांतील नारळ, मीठ, इत्यादिकांचा निर्गत व्यापार चारदोन गुजराथी व पांचदहा घांटवाले व्यापारी सोडले तर सारा गोमंतकीय हिंदूंच्याच हातीं आहे. त्याचप्रमाणें वस्त्र जिनसाची आयात बहुतांशी त्यांचीच असून खाद्यपेयादि मालाच्या आयातीपैकीं जवळजवळ दोनतृतीयांश व्यापार हिंदु लोकच करतात. त्यातल्यात्यांतहि पाहावयाचें झाल्यास, व्यापारात वैश्यवर्गाखालोखाल माध्व सांप्रदायी सारस्वत ब्राह्मण पिढीजात आहेत. पूर्वी तर दीव सारख्या व्यापारी गुजराथी प्रातात देखील गोमंतकीय सारस्वत ब्राह्मण व्यापारा निमित्त गेलेले होते.

कलाकुसरीचें, सुबक व उच्च अभिरुचीचें फर्नीचर करणारे सुतार गोमंतकात हिंदूंशिवाय फारसे सापडावयाचे नाहींत शिसवी लांकडावर देवादिकांच्या मूर्ति, निरनिराळे देखावे वगैरे खोदणारे सुतार इकडे बरेच आहेत. त्यांचा हा माल फार महाग पण सुबक असल्यानें युरोपियन लोक पोर्तुगालांत घेऊन जातात. मुंबईच्या मार्केटात पुष्कळदां दिसणारें कुंभारकाम कुंड्या, स्टुलें, तुळशी, दिवाणखान्यांत शोभेसाठीं ठेवावयाचे खांब, सुंदर व चित्रविचित्र आकाराचे खुजे, हीं सर्व डिचोलीच्या हिंदु कुंभारांच्या हातचीं असतात. रंगीत लाकुडकाम करणारे चितारीहि गोव्यांतील हिंदुसमाजांत बऱ्याच ठिकाणीं आहेत.

दैवज्ञ ब्राह्मण वर्गांत सोन्यारुप्याचें, मिन्याचें, जडावाचें वगैरे काम, तुटपुंज्या शस्त्रसामुग्रीनेंहि इतकें उच्च अभिरुचीचें होतें की, मुंबईच्या जव्हेऱ्यांच्या कारखान्यांत देखील या सामानाला मागणी असते इतकेंच नव्हे तर इकडचे बरेच दैवज्ञ त्यांच्या कारखान्यात कामाला नेण्यात येतात.

तरीपण आर्थिकरीत्या हिंदुसमाज हा ख्रिस्ती समाजापेक्षां खालावलेलाच आहे. बाटाबाटीच्या काळापासून झालेले जुलूम, निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या वर्गांच्या हातीं पुढारीपण गेल्यामुळें झालेली हानि धर्मांतराच्या भीतीमुळें असो, सोयीच्या अभावामुळें असो किंवा सोवळेपणाच्या धास्तीमुळें असो, पण राज्यकारभारात प्रवेश मिळण्यासाठीं आवश्यक असलेल्या पोर्तुगीज भाषेच्या ज्ञानाकडे दुर्लक्ष करण्याचें आत्मघातकी धोरण, इत्यादि अनेक कारणामुळें हा समाज वरींच वर्षें इतर समाजाचें कुरणच बनला होता. रेनॉइश ( खास पोर्तुगालमधून आलेले ) काशतीस ( येथें स्थायिक बनलेले ) लूझोइंडियन व कानारी हे जरी आपआपसात कितीहि भाडले तरी, " रेडयापाडयाचें झुझ झाडावर काळ " या कोंकणी म्हणीप्रमाणें शेवटी त्यामुळें नुकसान व्हावयाचें तें हिंदु समाजाचेंच, असा काळ गोमंतकात निदान तीन सव्वातीन शतकें तरी चालू होता; त्याचा परिणाम म्हणून किंवा बदललेल्या परिस्थितींत योग्य वेळीं शीड फिरवून निरनिराळ्या वेळी ख्रिस्ती समाजात माजलेल्या दुहींचा फायदा घेण्याइतका दूरदर्शीपणा न दाखविल्याचें प्रायश्चित्त म्हणून, आजची आर्थिक स्थिति हिंदुसमाजाला प्राप्त झाली आहे

**विवाहवयोमर्यादा व हुंडा वगैरे**—पांढरपेशा समाजांत बालविवाह बंद झाल्याला बरींच वर्षें झालीं रेजीदतसिव्हिलच्या कायद्याचें वयोमर्यादेचें बंधन हिंदूंना लागू करण्यात आलेलें नसलें, तरी वधुवराच्या वयाची मर्यादा अभिजात हिंदुसमाजात बरीच वाढलेली दिसते. आजला वधूचें वय १५ ते १८ च्या दरम्यान असतें व वराचें २० ते २५ पर्यंत वाढलें आहे. १८ च्या वरची वधू व २५ च्या पलीकडचा नवरदेव ह्या गोमंतकात दुर्मिळ वस्तु आहेत. युरोपियन लोकाचा व युरोपियनाइज्ड ख्रिस्त्यांचा सहवास, मुलांमुलींचें शिक्षण व कांहीं अंशी हुंड्याची अडचण हीं कारणें देखील वय वाढवावयाला कारणीभूत झालीं असावी. वयोमर्यादेच्या बाबतींत हिंदूना मनुस्मृति लागू करण्यात येत असल्यामुळें, बालवयांत लग्न करावयाला कायद्यानें त्यांना मुळींच आडकाठी नाहीं. विवाहाची जुळवाजुळव अजूनहि पालकांकडूनच होते. प्रीतिविवाहाची ओळख गोमंत-

कीयांना नाटकें—कादंबऱ्यांतूनच काय ती झालेली आहे. अविवाहित स्थिति पतकरणें भाग पडण्याइतकें शिक्षण अद्याप गोमंतकीय स्त्रीवर्गाला लाभलें नाहीं. लिसेवचें शिक्षण पुरें झाल्याशिवाय विवाह नाकारणारे तरुण आतांशा कोठें दिसू लागले आहेत. बाकी त्यातहि कांहींच नवल नाहीं. कारण, गोमंतकीय हिंदुसमाज पोर्तुगीज शिक्षणाकडे वळू लागल्याला अद्याप पुरतीं तीस वर्षेंहि झालेलीं नाहींत, हें पुढें शैक्षणिक परिस्थितीच्या विचारात दिसून येईलच खालच्या वर्गांत मात्र वधूचा बालविवाह, पण वराचा प्रौढ वयात विवाहच रूढ आहे दक्षिणी ब्राह्मण घराण्यातूनहि वधुवरांची वयोमर्यादा फारशी वाढलेली नाहीं.

मध्यम स्थितीतील कुटुंबातून हुंडयाचें मान किमान एक हजारापासून कमाल अडीच हजारांपर्यंत असतें यावर हुंडा घेणारीं—देणारीं कुटुंबें केवळ जुन्या मोठमोठया घराण्यांतून किंवा नव्या नुकत्याच संपन्नावस्थेंत येणाऱ्या कांहीं थोडयाशा वर्गांतच दिसून येनात परंतु अशा दर्जाचीं कुटुंबें गोमंतकीय हिंदु समाजात अगदीं थोडीच आहेत. आणि या कुटुंबांतूनहि हुंडा घेतला जातो तो पाचसहा हजारांच्या आंतच असतो. अशिक्षित व खालच्या कुणबी वगैरे लोकातून व कित्येक दक्षिणी ब्राह्मणांतून उलट हुंडा घेण्याची चाल दिसते. कुणबी वगैरे समाजांत त्याला " मायपाना " अशी संज्ञा आहे. विहिणींचा रुसवा, मानपानासाठीं नवरदेवाचें अडणें, विवाहसमारंभांतील ' विहिणींचा कलकलाट " इत्यादि दृश्यें गोमंतकात आजला तरी कौतुकास्पद विजा आहेत. त्याच प्रमाणें भुकेकंगालांप्रमाणें जेवणासाठीं वधुपक्षाकडे घालण्यात येणारी इतर ठिकाणची हुल्लड गोमंतकीयांना कशीशीच वाटते. आग्रहाचें व अगत्यानें केलेलें आमंत्रण असल्याशिवाय वरपक्षीय वऱ्हाडयांपैकीं एकही इसम वधुपक्षाकडे जेवावयाला जावयाचा नाहीं.

**स्त्रियांची परिस्थिति.**—' हिंदु स्त्रियाची कायदेशीर दुर्दशा ' गोमंतकांत तरी अनुभवास येत नाहीं. ख्रिस्ती समाजाचा सहवास व " कोड नेपोलियन " यांतील स्त्रीवर्गाचे हक्क राखणारी कलमें, तसेच खास हिंदूंसाठी म्हणून इ. स. १८५४ त झालेला व १८८० सालीं सुधारलेला पोर्तुगीज कायदा, हींच याची कारणें आहेत. गोमंतकीय स्त्री ही आपल्या पतीची खरीखुरी अर्धांगी असते. लग्न होताच पतीच्या इस्टेटीचा अर्धा वांटा तिच्या मालकीचा बनत असतो. पत्नीच्या कायदेशीर अशा लेखी संमतीशिवाय, पतीला महत्त्वाचा असा व्यवहार करतांच येत नसतो. इस्टेट विकावयाची असली, कर्जवाम काढावयाचें असलें, तर होणाऱ्या

दस्तऐवजावर पत्नीची सही कायद्यानेंच आवश्यक ठरविली आहे. अर्थात् तद्-भावीं सर्व करारच निराधार बनतो. त्याचप्रमाणें पितृधनावर देखील कन्येचा अधिकार पुत्राइतकाच असतो. हा हक्क बजावून पितृगृहाची इस्टेट नेणाऱ्या मुली मात्र अद्याप फारशा दिसून येत नाहीत ह्या हक्कामुळें, पितृगृही असो किंवा श्वशुरगृहीं असो, स्त्रीवर्गाची स्थिति बरीच समाधानकारक असते. सासूशीं पटत नाही म्हणून, नवऱ्याला नको म्हणून, वांझ निघाली म्हणून, फार तर काय, पण हुंडा भरपूर न मिळाल्यानें अथवा वाईट चालीची निघाली म्हणून, एक बायको टाकून दुसरी केल्याचीं उदाहरणें, गोमांतकीय अभिजातवर्गात आजवर दोनचारापेक्षां अधिक नाहींत. वास्तविक पाहातां, उपरोच्चारित हिंदु कायद्यानें, बायको वांझ निघाल्यास किंवा रोगी असल्यास, दुसरें लग्न करावयाला पुरुषांना मुभा दिलेली आहे. परंतु व्यवहारांत तिचा उपयोग करण्याची पाळी आली असतांहि तसा फायदा घेणें कमीपणाचें मानण्यांत येतें. इतका दर्जा व चांगली वागणूक स्त्रीवर्गाला मिळते. व ती हिंदु समाजांत,अजूनहि कोठें कोठें रूढ असलेल्या समायिक कुटुंबांत देखील मिळते, हें त्यांत विशेष आहे.

**राजकीय दर्जा व सार्वजनिक कार्यः**—इ. स. १८३५ पर्यंत तरी हिंदूंना राजकीय रीत्या कायदेशीर असें अस्तित्वच नव्हतें. ' हें जुलुमाच्या जंत्री-वरून स्पष्ट दिसून आलेंच आहे. आणि त्यानंतरच्या काळात झालें तरी, मत-दानाचा अधिकार, मग तो पार्लमेंटातील प्रतिनिधीसाठीं असो, किंवा जुन्या काबिजादींतील म्युनिसिपालिट्यासाठीं असो, पण तो सार्वत्रिक असा, फारच थोड्या प्रसंगी झाला होता. कधीं कधीं कर भरण्याच्या लायकीमुळेंहि तो मिळाला होता त्याचें सार्वकालीन गमक म्हणजे पोर्तुगीज लिहितावाचतां येणें हेंच होतें. अर्थात्च पोर्तुगीज शिक्षणांत बराच मागें असलेल्या हिंदु समाजानें, तत्कालीन परिस्थितींत पुढारलेल्या ख्रिस्ती समाजाकडे, राजकीय स्पर्धेत आपलें महत्त्व प्रस्थापित करणें ही अशक्यप्रायच गोष्ट होती. मतदानाचा प्रसंग येतांच लोयोल पक्षीय किंवा कोस्तपक्षीय,पण ख्रिस्ती पुढाऱ्यानीं चिठ्ठी पाठवून एखाद्या 'श्रीमंता'ला किंवा पुढारी म्हणविणाऱ्या लटपट्या "होयबा" हिंदूला बोलावून न्यावें व तो सांगेल तेथें इतरांनी मत द्यावें, हाच प्रकार जवळ जवळ साऱ्या सनदशीर राज्यपद्धति-विभागात चालला होता.हिंदूंच्या स्वतंत्र अशा कांहीं तरी आकांक्षा असू शकतात, ही कल्पनाच मुळी फार थोड्यांच्या लक्षात आली होती. व त्याना ती छातीठोक-पणानें ख्रिस्ती पुढाऱ्यांसमोर मांडण्याचा हिय्याहि झाला नाही. मध्यें पणज

येथें हिंदुसमाजानें 'सार्वजनिक सभा' या नावाची एक संस्था काढली होती खरी, पण आपापसांतील दुहीमुळें व अंशत बेफिकीर वृत्तीमुळें, ती लवकरच बंदहि पडली. १९०१ पासूनच हिंदुसमाजानें पोर्तुगीज शिक्षणाकडे थोडें फार लक्ष दिलें होतें. हिंदुपुस्तकालय ही वाङ्मयविषयक संस्थाहि त्यापूर्वी "उत्पत्ति, स्थिति व लय" पावली होती बंगालची फाळणी व तिच्यामुळें उत्पन्न झालेली अभिनव चळवळ, महाराष्ट्रीय वर्तमानपत्रातून गोमंतकीयाच्या कर्णपथावर आदळली. सारा गोमंतक त्या वेळीं खडबडून हालला. पणजी येथें पूर्वीच्याच हिंदु पुस्तकालयाच्या इमारतीत, गोवा-हिंदु-क्लबाची स्थापना झाली. प. वा. डॉक्टर पुरुषोत्तम वामन शिरगांवकर हे गोव्यात स्थायिक झाल्याला नुकतींच दहा वर्षें झाली होतीं. डॉक्टरसाहेबाचा आत्मा हिंदूच्या असहाय व दुबळ्या स्थितीमुळें जळफळत होता परंतु या स्थितीतून समाज कसा वर निघेल याचा मात्र नीटसा बोध त्यांना झाला नव्हता. तरीपण त्याचें एतद्विषयक चिंतन अह-र्निश चाललेलेंच होतें गोवा-हिंदु-क्लब काढण्यात त्यांचेच परिश्रम विशेष होते. गोवा-हिंदु-क्लबाच्या स्थापनेच्या मागोमाग साऱ्या गोमंतकभर वाचनालयेंच वाचनालयें उघडलीं गेलीं. पुढें स्वदेशीची लाट आली, हिंदु-क्लबामार्फत स्वदे-शीचें छोटेंसें दुकान उघडलें गेलें व स्वदेशीच्या शपथाहि भराभर घेतल्या गेल्या. गोव्यासाठी, गोमंतकांतील हिंदूंसाठीं कांहीं तरी झालें पाहिजे, काही तरी केलें पाहिजे, ही जाणीव याच वेळी विशेष जोरानें गोमंतकीयात दिसू लागली. जवळ जवळ समकालीनच अशीं या जाणीवेला दोन कारणेंहि मिळालीं होती पारोडेंच्या दसऱ्याची बंदी आर्चबिशप दों व्हालेंति यांनी करविली व १९०७ च्या पोर्तु-गीज प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानें हिंदूना प्राथमिक शिक्षकवर्गात शिरण्याचा मज्जाव केला. पणजी येथे प्रचंड जाहीर सभा भरून त्या कायद्याचा निषेध केला व तद्विरुद्ध वरिष्ठ सरकारांत तार, तक्रार अर्ज, इत्यादि प्रयत्न करण्यांत आले. १९०८ सालीं पोर्तुगालांत राजे दों कार्लुश यांचा भरदिवसा आणि भररस्त्यांत क्रांतिकारकानी बळी घेतला आणि पुढें दोनच वर्षांनीं मोनार्कीचा अंत होऊन धार्मिकदृष्ट्या समदृष्टि असें रिपब्लिक स्थापन झाल्याची सुवार्ता आली.

हिंदु समाजाला ती बातमी आकाशवाणीप्रमाणें भासली. चारशे वर्षांचा धार्मिक जुलूम मेला, नाहींसा झाला, पुढें तो उद्भवणें सुतराम शक्य नाही, असें साग-णारी ती आकाशवाणी होती. हिंदू हो, इत पर तुम्ही स्वतंत्र झालात, तुमच्या प्रगतीला आता कोणतेंच बंधन राहिलें नाहीं, अशी दवंडी पिटणारी ती धर्मराजाची

नौबतच होती. त्या वातमीनें हिंदूंना असा इशारा दिला कीं, हिंदूंचे दसरे बंद होण्याचा काळ यापुढें नष्ट झाला आहे, त्या नौबतीनें असें आश्वासन दिलें कीं, इत पर तुम्हांला केवळ धर्मभेदामुळें कोणत्याच जागी मज्जाव राहिला नाहीं, त्या आकाशवाणीनें असें सांगितलें कीं, सासष्ट प्रांतांतील देवळें एका रात्रींत धुळीस मिळविणारी घातकी धर्मसत्ताच धुळीस मिळाली आहे, कुंकळ्ळीच्या प्रजेला तुडविणारी, त्याचीं घरेंदारें जप्त, नव्हे भस्मीभूत करणारी, ती उन्मत्त राजसत्ता ४ ऑक्टोबरच्या तोफांच्या आगींत स्वतःच भस्म झाली, असेंच त्या दवंडीनें सांगितलें, हजारों लोकांनां जबरदस्तीनें पकडून बाप्तिस्मा देणारी ती पाशवी सत्ता, शेंकडों अर्भकांची मातांपासून ताटातूट करणारी ती सैतानी सुलतानशाही, इंक्विझिसावाच्या नावाखालीं शेंकडों कुलस्त्रियांची अब्रू घेणारी ती बेशरम पाद्रीशाही कोसळून तिचा भुसा झाल्याची ती द्वाही होती.

हिंदुसमाजानें तो दिवस अवर्णनीय उत्साहानें साजरा केला. रिपब्लिकनें राजकीय स्वातंत्र्य दिलें होतें, पण हिंदूंनीं त्याकरितां रिपब्लिकचा जयजयकार केला नव्हता, रिपब्लिकनें समतेचा घोष केला होता, परंतु हिंदूंनीं केलेल्या जयघोषाचें तेंही कारण नव्हतें· रिपब्लिकनें जित व जेते हा भेद नष्ट केला होता, पण तेंहि हिंदूंच्या उत्साहाचें कारण नव्हतें; रिपब्लिकन पुढाऱ्यांनीं वसाहतींना प्रांतिक स्वातंत्र्य देण्याची योजना जाहीर केली होती,परंतु तें देखील हिंदूंच्या अनिर्वचनीय आनंदाचें कारण नव्हतें.

राजधर्माच्या नांवाखालीं, हिंदूंच्या देवालयांना घालण्यांत आलेले कायद्याचे लंगर तुटून पडल्याच्या आनंदाचा तो जयजयकार होता, कॅथोलिसिझमच्या पांचरुणाखाली, घरच्या भेद्यांनीं माजविलेल्या भीषण जुलमाच्या अखेरच्या आरोळीमुळें उद्भवलेला तो स्वयंस्फूर्त जयघोष होता. खंडित मूर्तींच्या, उच्छेदित देवालयांच्या, भ्रष्ट धर्मभूमीच्या अर्चाशुद्धीच्या समयीं हिंदुमात्राच्या हृदयातून निघालेल्या आनंदाचा तो जयघोष होता

१९११ च्या निवडणुकीतच ह्या बदललेल्या परिस्थितीचें माप हिंदूंच्या प्रतिपक्षाच्या पदरात पुरेपूर पडलें सत्तेचा बागुलबोवा, पैशाचें पाठबळ, आणि पाद्रींकडून पुकारली गेलेली बहिष्काराची दहशत इत्यादि कशाचाहि उपयोग न होतां हिंदूंनीं पाठबळ दिलेला प्रतिनिधि पार्लमेंटांत पोंचला. हाच हिंदूंचा राजकीय स्पर्धेतील पहिला विजय होता.

पुढें १९१७ त प्रांतिक कौन्सिलच्या निवडणुकी जाहीर झाल्या. पूर्वकालीन परंपरेवर विश्वासून नव्या काबिजादींत उभे राहिलेल्या ख्रिस्ती उमेदवारांचा तेथें प्रचंड अशा बहुमतानें पराजय झाला त्याच वेळी आमच्या ख्रिस्ती बंधूंना समजले की, हिंदुसमाज मेला नाही, त्याच वेळीं हिंदूंना समजलें कीं, आपल्या उद्धाराचा मार्ग मोकळा झाला.

दरम्यानच्या काळात हिंदुमत, प्रभात, भारत, इत्यादि हिंदूंनीं चालविलेलीं, हिंदूंकरता उत्पन्न झालेली, व हिंदूसाठी मतप्रसार करणारीं वर्तमानपत्रें निघालीं. मडगांव, पणजी, म्हापशें, फोंडें, इत्यादि ठिकाणी शाळा, वाचनालयें, व्याख्यानमाला, इत्यादि रूपानें आजवरचा दाबून राहिलेला, जन्मभूमीचें ऋण फेडण्याचा हिंदूंचा उत्साह उसळत्या जोमानें बाहेर पडला.

गोव्याच्या तिजोरीवर प्रचंड दडपण पाडणारे बनाव पोर्तुगालात होऊं लागले व त्यांना हिंदूंनी स्वत निवडून दिलेले पार्लमेंटचे सभासदच कारण झाल्याचेंहि वर्तमान आलें. दुसऱ्याच निवडणुकींत त्या सभासदांचा प्रचंड बहुमतानें पराजय झाला नवीन काबिजादीमध्यें तर ख्रिस्ती उमेदवाराना उभें राहाण्यालाहि धीर होईना म्युनिसिपालिटच्या, कायदेकौन्सिलच्या निवडणुकी, साऱ्या हिंदूंच्याच मताप्रमाणें बनू लागल्या

'आम्हांला अमूक पाहिजे,' 'आमच्या मागण्या अशा अशा आहेत असें सांगण्यास वीसच वर्षांमागें ज्या हिंदूंना हिय्या होत नव्हता, त्याच हिंदूंकडे, आजला त्याचीं मतें समजून घेण्यासाठी, ख्रिस्ती पुढारी खेपा घालीत आहेत. स्वतःच्या खास बहुमताच्या, नव्या काबिजादींतच, ज्याना दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी प्यावें लागत होतें, तेच आज जुन्या काबिजादींतील राजकारणातहि प्रामुख्यानें भाग घेऊन बहुमत आपल्या बाजूचें करू शकतात.

राजकीय वर्चस्वाचें दुसरें गमक म्हणजे सरकारी नोकऱ्यातून प्रमाणशीर भाग मिळणें हें होय. इ स. १९०० त सरकारी नोकऱ्यांतून खालच्या जागा व त्याहि अगदीं थोडयाच, हिंदूंच्या वांटयाला आल्या होत्या. लिसेवांतील मराठी भाषेचे प्रोफेसर, कोमार्कांतील जज्जकचेरीच्या कारकुनांच्या जागा व रेसेबेदोरच्या काहीं जागा, पोस्ट खात्यातील काहीं जागा, इतकेंच काय तें हिंदुसमाजाचें भांडवल होतें. व हीच स्थिति १९१० सालीं होती. मात्र जमीनमोजणी खात्यांत व पब्लिक वर्कस् खात्यांत नुकताच प्रवेश मिळत होता. रिपब्लिकन समतेच्या १९ वर्षांत हिंदूंनीं आपल्या बुद्धिमत्तेच्या व कर्तबगारीच्या जोरावर, जाहीर परीक्षा देऊन,

( सेक्रेटरिएट ) अंतर्गत मुलकी व्यवस्थेचें खातें, जमाबंदी खातें, जकात खातें, ( सर्व्हेखातें ), पब्लिकवर्क्स खातें, तार व टपाल खातें, आरोग्य खाते, जमीन मोजणी खातें, प्राथमिक शिक्षण, दुय्यम व नॉर्मलमध्यें अशा बहुतेक खात्यांतून बरेच महत्वाचे हुद्दे मिळविले आहेत. तथापि ह्या जागा अजूनहि हिंदूच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नाहींत. अजूनहि ती मजल गाठावयाचीच आहे. आणि थोडक्याच वर्षांच्या अवधींत, हिंदुसमाज ती गांठल्याशिवाय राहावयाचा नाहीं, याची खात्री पटल्यामुळेंच कीं काय, ज्यांच्या हातीं आजवर हें कुरण मक्त्याप्रमाणें होतें, त्यांचे हिंदुसमाजाविरुद्ध भगीरथ प्रयत्न चालत आहेत. वकीलीच्या धंद्यातून आपल्या बुद्धिमत्तेस साजेशी जागा हिंदुसमाजानें अद्याप मिळविलेली नाहीं.

भारत, हिंदु व प्रकाश व त्यानंतर प्रदीप हीं वर्तमानपत्रें, ठिकठिकाणची वाचनालयें व व्याख्यानमाला, शाळा, गौड सारस्वत ब्राह्मण समाजाच्या उभयपक्षीय परिषदा, क्षत्रिय भंडारी शिक्षण परिषद्, वैश्य परिषद्, दैवज्ञ ब्राह्मण परिषद्, गोमंतकीय हिंदुसभा, मराठा गायकसमाजाची परिषद्, इत्यादि बाजूनी गोमंतकीय समाज आपल्या उन्नतीचा प्रयत्न करीत असून, त्याच्या प्रयत्नाला आजवर तरी खंड पडला नाहीं यंदां बोलावण्यांत आलेलें महाराष्ट्र-साहित्य सम्मेलन हें देखील या प्रयत्नाचेंच एक अंग आहे. पुढें जरी योग्य स्थळीं त्याचा उल्लेख होणार असला, तरी साऱ्या गोमंतकांत मिळून वाङ्मयविषयक, शैक्षणिक, व्यायामविषयक, सामाजिक, राजकीय मिळून सुमारें ७० वर संस्था व्यवस्थितपणें चाललेल्या आहेत. मराठी शिक्षणाकरिता खेडोपाडीं असणाऱ्या शाळा याखेरीज निराळ्याच आहेत.

**प्रागतिक संघः**---राजकीय वर्चस्वाच्या बाबतींत–विशेषत निवडणुकांतून–हिंदुसमाजांत सामुदायिक आकांक्षा उत्पन्न करण्याचें सारें श्रेय आमच्या मतें प्रागतिक संघालाच द्यावें लागेल इ स. १९२०त फोंडें येथें आमचे मित्र दोतोर व्यंकटेशराव सरदेसाई याना निवडणुकींत यश आल्याबद्दल झालेल्या लहानशा पानसुपारीच्या समारंभात ह्या संस्थेची स्थापना व नामकरण झालें. परंतु तिचें कार्य इतकें फलद्रुप झालेलें पाहाण्यास मिळेल असें त्या वेळीं फारच थोड्याना वाटलें असेल. प्रतिपक्षाकडून तर संघाविषयीं प्रारंभीं तरी थट्टेशिवाय काहींच ऐकू येत नव्हतें, परंतु हा भ्रम थोडाच वेळ टिकला. प्राब्लेरिझ दा कोस्तासारख्या जडबुडाच्या प्रतिनिधीला ज्या वेळी निवडणुकींत यशापयशाचा भरंवसा वाटेनासा झाला त्याच वेळीं संघाबद्दल विरुद्ध पक्षांत थोडीशी जिज्ञासा उत्पन्न होऊं लागली. आणि आज पण असो. संघांतील कार्यकारी मंडळाशी प्रस्तुत लेखकाचा पुष्क-

कदा मतविरोध झाला असला, तरी संघाचा एक सामान्य शिपाई असें म्हणवून घेण्यांत त्याला भूषणच वाटतें. कारण हिंदुसमाजाच्या हिताचा प्रश्न येताच मता-मतांचा गलबला, वैयक्तिक हितसंबंध, शत्रुत्व किंवा मैत्री इत्यादि चटसाऱ्या बाबींना बाजूस सारून आजवर तरी संघानें अभेद्य एकी प्रकट केली आहे गोमं-तकीय हिंदु सुशिक्षितांना संघाबाहेर राहाण्यास जागाच मिळू नये इतकें व्यापक व सर्वगामी स्वरूप आज तरी संघाला प्राप्त झालें आहे

**स्वभावविशेषः**—येथील गौड सारस्वतब्राह्मण वर्ग हा जात्याच बुद्धिमान व कर्तबगार आहे. पोर्तुगीजांच्या अव्वल जुलुमांचा, अंगावर शहारे आणणारा पहिला धक्का, याच समाजाला बसला. वतनें, देवस्थानें, धर्म, व्यापारउदीम, इत्यादि सर्वच बाबतींत याला पुष्कळ नुकसान झालें होतें. परंतु तेवढ्याहि जुलुमातून या वर्गानें आपला समाज बराचसा निभावून नेला. नेकी, प्रामाणिकपणा, धडाडी, चिकाटी, हे गुण या समाजात वंशपरंपरेचे आहेत. व्यापारउदीम संभाळण्याची जबाबदारी माध्वसांप्रदायी वैष्णवांनीं स्वीकारली होती व स्मार्तांनां राजकीय वर्चस्वापायी त्रास भोगावे लागले होते. पण उभयतांनी मिळून आपलें कर्तव्य शक्य त्या चिवटपणानें व धडाडीनें केलें आहे वैश्यसमाज हा प्रारंभापासून स्थाईक असा वतनदार नव्हता. तरीपण व्यापाराची घडी पुन बसविण्यांत या समाजानें बरीच मोठी कामगिरी केली आहे. मराठा समाजाविषयी म्हणावयाचें तर ह्या समाजानें आपले मूळचे, उसळून वर निघण्याचे, जे गुण महाराष्ट्रांत दाखविले होते, त्यांचाच थोडासा कोंकणी मासला पोर्तुगीजांना साऱ्या अमदानींत वेळोवेळीं दाखविला आहे. सारें १८ वें शतक व १९ व्या शतकाच्या बऱ्याच मोठ्या भागात ह्या समाजानें पोर्तुगीजांना यावच्छक्य त्रास दिला आणि आपला नाश जरी करून घेतला, तरी त्यापासून इतरांचें हित साधलें. गोमंतकीय हिंदूंत एक मात्र विशेष मोठा महत्त्वाचा गुण दिसून येतो व तो हाच कीं, वतनी किंवा मालकी जमीन कितीहि क्षुल्लक असली तरी तिचा मोह त्याला अनावर असतो. याच मोहामुळें त्यानी त्रास भोगले, याच मोहामुळें त्यांना भयंकर संकटें भोगावीं लागलीं. दुसरा महत्वाचा विशेष म्हणजे त्याची धर्मप्रवृत्ति होय तिच्यामुळे त्यांनीं देशोधडीहि पतकरल्या, त्यांना चोरासारखें लपून छपून वावरावें लागलें, गुन्हेगारासारखी धांवपळींत वर्षेंच्या वर्षे घालवावी लागलीं, नानाप्रकारचीं संकटें त्यांनीं पतकरली, पण पूर्वसंस्कृति सोडली नाहीं. परवाच्या गावडे लोकांच्या शुद्धींत देखील हीच प्रवृत्ति उपयोगी

पडली आहे. शुद्धीकृतांना देवालयप्रवेशाची सवलत, त्यांच्या पौरोहित्याची व्यवस्था, साराश आलेल्या हरएक अडचणींत त्यांना मदत करावयाला गोमंतकीय हिंदुसमाज, आपापसांतील इतर भेदाभेद विसरून,अहमहमिकेनें व अंत. स्फूर्तीनें पुढें आल्यामुळें ही शुद्धि शक्य झाली. हा पाया नसता तर...पण सांप्रत ह्या ताज्या प्रकरणाविषयीं एवढाच उल्लेख पुरे तिसरा म्हत्वाचा विशेष म्हणजे त्यांचा पराकाष्टेचा प्रांताभिमान, होय. प्रांताभिमानामुळेंच त्यांनीं वर सांगितलेल्या चळवळी, मग त्या ज्ञातिसंस्थेच्या पायावरच का असेनात, पण जातिद्वेषाशिवाय चालविल्या आहेत. अखिल गोमंतकाच्या उन्नतीचा प्रश्न येताच आम्ही आपापसातले सारे भेदाभेद व वैयक्तिक भांडणेंहि विसरून एकत्र होतों चवथा महत्वाचा विशेष म्हणजे गृहस्थाश्रमाची मर्यादा पाळण्याचा त्यांचा पराकाष्टेचा प्रयत्न होय. ह्या मर्यादेचा विचार नैतिक व आर्थिक अशा दोन बाजूनीं करता येईल.नैतिक बाजूनें पाहिल्यास पूर्वींचा एखादा व्यसनप्रिय, जुगारी, बाहेरख्याली किंवा तटेबाज गांवकर आज अपवादात्मक स्वरूपानें, केवळ एखाद्या पुराण वस्तूसारखाच, कोठें तरी दिसत असतो. पण त्याला समाजात बिलकूल दर्जा नसतो. आणि आर्थिकदृष्ट्या सांगावयाचें झाल्यास आतिथ्यशीलतेत गोमंतकीय इसम, मग तो कोणत्याहि दर्जाचा किंवा जातीचा का असेना, इतर कोणत्याहि समाजाला हार जावयाचा नाही. मागें सांगितल्याप्रमाणें गोमंतकीय हिंदूंची आर्थिक स्थिति, वाढत्या मजूरीच्या व गरजाच्या ह्या काळांत,बरीच ओडगस्तीची बनली आहे पूर्वीं चांगल्या संपन्न स्थितींत असलेली कुटुंबें देखील, आपला गतकालीन रुबाब व दर्जा राखतां न आल्यामुळें आजला आपल्या जमाखर्चाचा कसा तरी मेळ घालण्यात चूर झालेली दिसतात. तरी देखील त्यांची मूळची हाडींमासी खिळलेली आतिथ्यशीलता त्यात दिसून येतेच या त्याच्या गुणामुळेंच गोमंतकात औषधाला देखील हिंदु भिक्षेकरी मिळणें कठीण झालें आहे, याचा प्रस्तुत लेखकाला पराकाष्ठेचा अभिमान वाटतो. कित्येकदां तर ही आतिथ्यशीलताच आमच्याविषयीं निरनिराळे गैरसमज, थट्टा, प्रस्तृत व्हावयाला कारणीभूत झालेली दिसते प्रसंगी स्वतःचे महत्त्वाचें काम देखील क्षणभर बाजूला सारून पाहुण्याच्या व्यवस्थेसाठीं खपणारा गृहस्थ हिंदुसमाजात अगदी सामान्य चीज आहे

गृहस्थाश्रमाच्या मर्यादेविषयीं विचार करतांना तो दोन प्रकारें करावा लागतो. त्यापैकीं नैतिक दृष्टीनें पाहातां गोमंतकीय हिंदु समाजावर मराठा गायक समाजासारख्या जाती इकडे देवळांतून बद्धमूल करून ठेविल्याचा व तशा त्या राहिल्यानें

स्वत'च्या नैतिक बाजूवर डाग लावून घेतल्याचा असे दोन आरोप येतात. ज्या पूर्वयुगांत, त्या समाजाकडे गायनकलेची उपासना व तदनुषंगिकच, देवसेवेच्या निमित्तानें अभिजात समाजाच्या विवाह-संस्थेचें पावित्र्य-रक्षणार्थ, अपवित्र धंद्याची जबाबदारी सोंपविण्यांत आली होती, तें युग कालाच्या धुक्यात दिसेनासें झालें आहे त्या वेळच्या समाज नेत्यांना ही योजना करण्यासाठीं कदाचित् कारणेंहि तशींच बलवत्तर असतील. इतकेंच नव्हे, तर ह्या उभय धंद्या-पासून उपरोक्त गायक समाजाचें हित देखील साधलें असेल, म्हणून आजच्या या 'मदायत्त तु पौरुषम्''च्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या काळात, ही पूर्वयुगीन परिस्थिति आहे तशींच राखू पाहाणें म्हणजे केवळ तातस्य कूपोऽय मिति. . सारखेंच आहे बाकी ही परिस्थिति गोमातकांतून बदलत जाऊन तिचें केंद्रस्थान मुंबईसारखें सुधारणेचें आगर व इतर धनकनकसंपन्न शहरें झालीं. हल्लीच कुठें मुंबईंत यावावर्तात सुधारणेचे उपाय व कायद्याची कलमें पास होऊं लागली आहेत.

**पोषाख** —गोमंतकीय हिंदूंच्या पोषाखांत परस्थ इसमाला विलक्षण वाट-णारा विशेष म्हणजे तांबड्या मखमालीची टोपी होय. परंतु त्या टोपीलाहि इति-हास आहे. धार्मिक जुलुमांच्या काळीं जुन्या काबिजादींतील हिंदुवर्गाला पाद्रीशाहीच्या जबरदस्तीमुळें, मूळचा रुमाल किंवा पुडासें टाकून काळ्या मखमा-लीची टोपी घालावी लागली. पुढें काळ्या टोपीएवजीं तांबडी घातली तरी पाद्र्याची हरकत होईनासी दिसताच, आमच्या सासष्ट, बारदेश व तिसवाडी प्रांतातील हिंदूंनी तो प्रघात पाडला आणि होतां होता मूळच्या त्याच जुलुमाच्या चिन्हाला शिष्टसंमत रूप येऊन तिचाच प्रसार झाला गेल्या शतकात प्रतिष्ठित वर्गाचा पोषाख म्हणजे, चुण्यांचा अंगरखा, मुडासें किंवा फणीचा रुमाल असा होता. पुढें त्याची जागा अनुक्रमें पारशी किंवा शॉर्टकोट, पुणेरी पगडी व जरी रुमालांनीं घेतली आणि आतांशा टोपीवाल्यांच्या अमदानींत टोप्या व रेशमी कोशा आणि केवळ समारंभाच्याच प्रसंगीं पुणेरी झिळमिळ्यांच्या पगडीनें ती घेतली आहे. तांबडी टोपी आतांशा वापरातून जाऊं लागली आहे.

अनवाणी चालण्याचा प्रघात अभिजात वर्गांत मुळींच नाहीं. स्त्रियांचा पोषाख अजून फारसा बदलला नाही. चोळीलुगड्याचें साम्राज्य स्त्रीवर्गांत अजून अबा-धित असेंच आहे पोलकीं व ब्लाउझ यांचा प्रवेश बालावर्गापुरताच मर्यादित आहे. घरगुती वापरात लुगड्याऐवजीं परदेशी पातळें व खणाच्या चोळीऐवजीं

परदेशी मोहक कपड्याच्या, लेस वगैरे लावलेल्या चोळ्याहि कांहीं दिसतात. केशरचनेंतील मूळच्या तंग ताणून बांधलेल्या वेण्या, दक्षिणीब्राह्मणातच मात्र दिसतात. इतर वर्गांतून त्याऐवजीं बुचड्याची चाल रूढ होऊन आजला त्याची मजल सैल बुचडा व थोड्याशा तिरप्या भागापर्यंत आली आहे. जपानी आंबाडा वगैरे पद्धति अजून आली नाहीं,त्याचप्रमाणें लेडी फॅशनच्या छोट्या छत्र्यांचा वापर अजून नाही. स्मार्त गौ सा. ब्रा. स्त्रीवर्गांत आडवें लांबट कुंकू लावण्याचा जुना प्रघात आहे व वैष्णव वर्गांत उभ्याचा प्रघात आहे.

**प्रसिद्ध पुरुष** —ह्या सदरांत पोर्तुगीज पूर्वकालीन पुरुषाची माहिती देण्याजोगी माहिती लेखकाला मिळाली नाहीं तरीपण जी तुटपुंजी सामुग्री त्याला मिळाली आहे तीतूनच खालील माहिती देण्यांत येत आहे.

**रामकृष्ण शेणवी धोंडेकर:**—हे गृहस्थ अव्वल वाटाबाटीच्या काळीं म्हणजे सुमारें इ स. १७००च्या सुमारास कुंभारजुव्यांत होऊन गेले. हे पोर्तुगीज उत्तम प्रकारें जाणत होते व तत्कालीन जुलुमास आळा घालण्याचे प्रयत्न करून त्यांनी एक दोन व्हायसरॉयाना बडतर्फ करविलेंहि होतें. इ. स. १७३२ जुलै ११ रोजीं तत्कालीन पोर्तुगीजानीं शिद्दी मारेकऱ्यांकडून त्याचा खून करविला.

**महेश्वर रामचंद्र भट्ट सुखठणकर** —या महापंडिताचें नाव हिंदुस्थानात प्रख्यातआहे. यांचा जन्म इ. स. १७१९ त महाशेल ( माशेल ) या गांवीं झाला. यांचें सारें शिक्षण गोमांतकातच झालें होतें संस्कृत भाषेवर यांचें असामान्य प्रभुत्व होतें विशेषत अभिधान ग्रंथ म्हणजे कोश यामध्यें त्यांनी विश्वप्रकाश नावाचा अनेकार्थ कोश, एकाक्षरी कोश इत्यादि कोश-रचून फारच भर घातली. अमरविवेक ही अमरकोशावरील टीका विद्वन्मान्य आहे. याशिवाय बऱ्याच टीका त्यानी लिहिल्या असून त्याचे अप्रकाशित असे आणखीहि ग्रंथ होते असें म्हणतात. देहावसानसमयी त्यांचें वय ९८ वर्षांचें होतें ! थेट काशीचे पंडितहि ज्ञानसंपादनार्थ त्याच्याकडे येत अशी त्याची विद्वत्ता दांडगी होती. इ स. १८१७ त ते कैलासवासी झाले जातीनें गौ सा ब्रा होते.

**नारायण विठ्ठल शेणवी धुमे:**—हेहि कुंभारजुव्याचेच गृहस्थ असून ते इ. स. १७७६ पासून १७९२ पर्यंत पेशव्याच्या दरबारीं पोर्तुगीज वकील होते. इ स. १७८६ सालीं उभय सरकारांत त्यांनीं तुल्यारिमित्र संधिहि घडवून आणला होता. त्यांच्या मागून त्यांचे पुत्र विठ्ठल नारायण शेणवी धुमे यानांहि पोर्तु-

गीज सरकारनें १७९२ त तेंच वकिलीचें काम दिलें होतें. तूर्त त्यांचे वंशज कुंभारजुवें येथें असतात. हे गौ. सा. ब्रा. होत.

**विठ्ठल गोरक्षराव वर्दे वालावलीकरः**—हे गृहस्थहि इ. स. १७९३ सालापासून पेशव्यांचे दरबारी वकील होते. ज्ञात गौ. सा ब्रा यांच्या वजनामुळेंच हिंदूवरील पाद्रीशाहीचा जुलूम मंदावला होता. ह्याचा जन्म इ स. १७३१मध्यें जुवें बेटांत झाला होता. नवीन काबिजादीतील हिंदूंना आपल्या रीतरिवाजरक्षणाची जी सनद मिळाली होती ती याच्याच सल्लयामुळें पोर्तुगीज सरकारनें दिली होती. इतकेंच नव्हे तर त्या सनदेचा मसुदा देखील विठ्ठलरावाच्याच हातचा होता. १७५४ साली पोर्तुगीज सरकारनें त्यांना कॅप्टनचा हुद्दा देऊन शेवटी पेशव्यांच्या दरबारी वकील नेमलें. इ स. १८०८ सालीं त्यांचें देहावसान झालें. मुंबईचे श्री वामनराव र वर्दे वालावलीकर हे प्रसिद्ध लेखक व कोंकणीचे अभिमानी, यांचेच वंशज होत.

**बक्षिबहादूर जिवबादादा केरकर**—यांचा जन्म पेडण्यांतील केरी गावी इ. स १७४० त झाला पानिपतच्या घनघोर संग्रामापासून खड्यांच्या लढाईपर्यंतच्या एकंदर संग्रामांत शिंद्यांच्या सैन्यांत राहून जिवबादादानी तलवार गाजविली आहे. शिंद्यांच्या इतिहासातच नव्हे तर मराठ्याच्या उत्तरेकडील इतिहासांत बक्षिबहाद्दरांचें नाव इतकें प्रख्यात आहे की, तें वगळल्यास इतिहासच लंगडा होईल हें इतिहासज्ञांस सांगावयाला नको. ता. ६ जानेवारी इ. स. १७९६ रोजीं त्यांचें देहावसान जांबगांव मुक्कामीं झालें. त्यांच्या मागून त्यांचे बंधु जगोबादादा, पुत्र, चुलत बंधु वगैरे केरकर बरेच प्रसिद्धि पावले होते. तूर्त त्यांचे वंशज केरी मुक्कामीं असतात ज्ञात गौ सा ब्राह्मण.

**लखबादादा लाडः**—हेही गृहस्थ मूळचे बारदेशांतील चिखली गावचे असून जिवबादादाचे समकालीन होते. तत्कालीन राजकारणात ते प्रख्यात मुत्सद्दी गणले जात. शिंद्याच्या सैन्यांत यांच्याकडे तोफखान्याचा अधिकार होता. पुष्कळ लढायांत त्यांनीं भाग घेतला होता. आग्र्याच्या किल्ल्याच्या वेढ्यात त्यानीं मोठी मर्दुमकी दाखविली होती. ता. २७ जानेवारी इ स. १८०३ रोजीं सालेंबर मुक्कामीं त्यांचें देहावसान झालें त्याच्या मृत्यूनंतर शिंदेशाहीस सारखी उतरती कळा लागली. यांचे वंशज चिखली व आरोवा येथें आहेत. ज्ञातीनें गौ. सा. ब्रा. होत.

**पुरुषोत्तम वामन कोंकरे:**—गौ. सा. ब्राह्मण. यांचा जन्म कुंभारजुवें येथें इ. स. १८१२ त झाला. यांना पोर्तुगीज सरकारनें तत्कालीन कौन्सिलचे सभासद

देखील नेमलें होतें हिंदु लोकाना राजकीय हक्क मिळण्याकरितां यांनीं पुष्कळ खटपट केली होती. १८५७ त पडलेल्या दुष्काळांत यांनीं हजारों रुपयांचें धान्य आणून लोकांना कमी दरानें दिलें होतें. मनुस्मृतीवर हल्ला करणाऱ्या पोर्तुगीजांना यांनीं पोर्तुगीज भाषेंत जबाब देऊन निरुत्तर केलें होतें. सरकारनें यांना 'ब्यारन' व "व्हिस्कोंद" या पदव्याहि दिल्या होत्या. इ स. १८७४ च्या जुलैंत यांचें देहावसान झालें.याचें घराणें आजमितीसहि गोमंतकांत पिढीजाद श्रीमंत म्हणून ओळखलें जातें.

**गोविंद नारायण माडगांवकर:**—यांचा जन्म जुन्या गोव्याजवळच्या पेरी येथें १८१५ त झाला. हे विल्सन हायस्कुलांत हेड मास्तर होते. डॉ. भाऊदाजी, नामदार नारायण वा. दाभोळकर इत्यादि यांचेच शिष्य होते. यांनीं सृष्टींतील चमत्कार, मुंबईचें वर्णन, उद्भिज्ज पदार्थविज्ञान इ० ग्रंथ लिहिले आहेत. त्यांची भाषाशैली शुद्ध, सरळ व गोड होती. यांचा मृत्यू, इ. स. १८६५ मार्च १५ ला झाला.

**डॉक्टर भाऊदाजी लाड:**—गौ सा. ब्रा. मांद्रें येथें इ.स.१८२२ त यांचा जन्म झाला. मूळ पारसें गांवचे होत. मुंबईंतील हे फारच कुशल वैद्य होते. यांचें रक्तपितीवरील औषध युरोपांतहि प्रसिद्ध झालें होतें इतिहासाच्या आद्य संशोधकांपैकीं हे एक प्रख्यात संशोधक होते. मुंबईच्या शेरिफचा मान एतद्देशीयांत पहिल्यानें यांनांच मिळाला होता. ता. ३१ मे इ स.१८७४ रोजीं यांचें देहावसान झालें.याच्या अंगच्या अनेक गुण समुच्चयामुळें यांना मुंबईत " अवंतीचा भोज " अशी संज्ञा होती.

**माधव चंद्रोबा डुकले.**—याचे जन्मस्थान बारदेशातील कळंगुट गाव होय. इ स.१८२५ सालीं त्यांचा जन्म झाला. उपजीविकेसाठीं त्यांनीं कारकुनी पतकरून इदूर,कराची,वगैरे ठिकाणी प्रवास केला होता हे फार मानी होते. यांचें 'शब्दसंग्रह' हें मासिक म्हणजे जुन्या संस्कृत कवींच्या अप्रकाशित काव्यांचा संग्रह होता. त्याचप्रमाणें ' शब्दरत्नाकर नांवाचा एक मोठा संस्कृत मराठी कोशहि यांनी प्रसिद्ध केला होता. इ स.१८८५च्या डिसेंबर महिन्यांत याचें निधन झालें **अनंत चंद्रोबा डुकले** हे उपरोक्त माधव चंद्रोबाचे धाकटे बंधु होते. कळंगुट येथेंच त्याचा जन्म इ. स. १८२९ त झाला. वयाच्या २० व्या वर्षी डॉक्टरीची परीक्षा पास होऊन त्यांनीं इदूरच्या फलटणींत नोकरी धरली, परंतु यांचें खरें कार्य मुंबईत देवी टोंचण्याच्या प्रयत्नात दिसून आलें. यांना सिंधी व फारशी या भाषा येत होत्या. वडील बंधु माधव चंद्रोबाच्या 'सर्व संग्रहा'स यांचें मोठें साह्य होतें.

त्यावेळच्या मुंबईच्या प्रख्यात डॉक्टरांत यांची गणना होत होती. इ. स. १८८४ सालीं त्यांना देवाज्ञा झाली. हे गौ. सा. ब्रा. होत.

**सूर्याजी आनंदराव देशपांडे**:—हे स्मार्तसंप्रदायी गौडसारस्वत ब्राह्मण पणजीचे रहिवासी असून यांचा जन्म १८२८ त झाला. मराठीच्या अध्यापकाचें काम त्यांनीं ३८ वर्षे केलें व तेथून रिटायर झाल्यानंतर सरकारनें १८८५ सालीं त्यांना रैतोर नेमलें पण या जागेचा लाभ त्यांना फार काळ मिळाला नाहीं. १८८८ त ते निधन पावले. मराठीपोर्तुगीज व्याकरण व सुमारें ५३ हजारांवर शब्दसंख्या असलेला मराठीपोर्तुगीज कोश हे ग्रंथ त्याच्या परिश्रमाचें व विद्वत्तेचें प्रमाणच आहेत. हा कोश सरकारनें घेऊन छापला आहे. सांप्रत त्याच्या प्रती दुर्मीळ आहेत

**भिषग्वर पांडुरंग रामचंद्र वैद्य**·—हे केरीचे पद्ये ब्राह्मण. प्रसिद्ध वैद्य होते. यांचें घराणें आर्यवैद्यकांत बरेंच नांवाजलेलें आहे. गोरगरीबांसच नव्हे तर दाराशी येणाऱ्या सर्व रोग्याना यांच्याकडून औषधोपचाराची मदत विन मोबदला होत असे याचें नांव अजूनहि गोमंतकात फार प्रसिद्ध आहे. जन्म १८३४—निधन १९०२.

**भिषग्वर सुब्राव लक्ष्मण नायक** हे माध्वसंप्रदायी गौड सारस्वत ब्राह्मण. मडगांवच्या सुप्रसिद्ध शखावलीकर घराण्यातील गृहस्थ इ. स. १८५५ च्या सुमारास जन्मले आर्यवैद्यकसंस्कृतभाषा व जवाहिराची परीक्षा यांत ते निष्णात होते. हे अत्यत परोपकारी होते. मडगावात येणाऱ्या गोमंतकीयेतरांस “सुब्राव नाईक का घर” म्हणजे आश्रयस्थानच होतें. श्रीमद्विवेकानंद स्वामी गोमंतकांत आल्या वेळीं त्यांच्याच येथें होते. व्यवहारांत यांचा हातखंडा होता. १९११ सालीं त्यांनीं संन्यासदीक्षा घेतली होती, परतु श्रीसुब्रह्मण्यानदतीर्थ या नांवानें समाजांत वावरत असतांनाहि त्यांनीं आपलें परोपकाराचें व्रत सोडलें नाही इ स १९१९ त ते समाधिस्थ झाले. त्यांनीं आपल्या मागें वैद्यकींत बरेच शिष्य तयार केले आहेत.

**भिषग्वर त्रिविक्रम रामचंद्र प्रभू लंवदे** —ज्ञात गौ. सा. ब्रा. माध्वसंप्रदायी. हेहि गोमंतकांत आर्यवैद्यकात नाणावलेले होते. याचा जन्म रायबदर येथें झाला. त्यांचें रोगनिदान—नाडीज्ञान अचूक असे. स्वभावानें ते अत्यंत निस्पृह होते. शके १८३९ आषाढ शु. ११ सीस त्यानीं आपली देहयात्रा संपविली.

**डॉक्टर पुरुषोत्तम वामन शिरगांवकर**—हेहि माध्वसंप्रदायी गौड-सारस्वत ब्राह्मणातीलच होते. सांखळी कोंसेल्यातील शिरगांवच्या कोमुनदादीचे ते गांवकर होते ते हॉस्पिटल असिस्टंटची परीक्षा पास झाले होते. बेळगांव येथें आपल्या बंधूकडे ( प. वा. डॉ. विष्णु वामन शिरगांवकर ) ते प्रारंभीं होते, पण इ. स. १८९६ च्या सुमारास ते गोव्यांत आले व पुढें त्यांचें सारें कार्यक्षेत्र गोमंतकच बनलें. १९०५ ते १९१५ पर्यंतच्या गोमंतकांतील हिंदूंच्या साऱ्या चळवळींशी डॉक्टरसाहेबाचें नाव निगडित झालें आहे त्यांचा स्वभाव पराकाष्ठेचा निगर्वी व प्रेमळ होता. व त्यामुळें त्याचा परोपकारहि मोठा होता. पणजींत त्यांची डॉक्टरीमदत न मिळविलेला इसम विरळाच सांपडेल. विद्यार्थ्यांवर त्यांचें फार प्रेम असे. गोमंतकीयेतराना मडगांवला जसें सुब्राव नाईक यांचें घर होतें तसेंच पणजीला डॉक्टरसाहेबांचें घर असे. प्रस्तुत लेखकाला त्यांच्या सहवासाचा लाभ बराच काळ मिळाला होता. गोमंतकीय हिंदूंच्या उन्नतीसाठीं त्यांचा जीव तिळतिळ तुटत होता. इ स. १९१८ सालीं बेकनहळ्ळी ( बेळगांव ) मुक्कामीं त्याना क्षयानें देवाज्ञा झाली. त्याच्या निधनानिमित्य पणजीचा बाजार स्वयंस्फूर्तीनें बंद झाला होता. ' प्रभात ' नांवाचें वर्तमानपत्र त्यानींच काढलें होतें.

---

**पांडुरंग सदाशिव दणाईत**:—हे म्हापसे येथील प्रसिद्ध दणाईत घराण्यातील स्मार्तसंप्रदायी गौडसारस्वत ब्राह्मण होत. गोमंतकांतील प्रमुख पुढाऱ्यांपैकीं हे एक होते. म्हापशेंच्या संयुक्त गौडसारस्वतब्राह्मणपरिषदेचे ते सेक्रेटरी होते. परिषदेमार्फत म्हापशांत स्थापन झालेलें सारस्वतविद्यालय यांच्याच देखरेखीखाली चालत होतें. त्यांनीं आपलें पुढचें सारें आयुष्य त्या विद्यालयालाच वाहिलें होतें. गोवापंच हें वर्तमानपत्र त्यांच्या मदतीने चालत होतें. त्यांच्या मत्यनें गोमंतकातील प्रमुखत्वें म्हापशातील चळवळींची बरीच हानि झाली. इ स. १९२७ सालीं त्यांना जलोदराच्या विकारानें देवाज्ञा झाली.

गोमंतकीय ग्रंथकार वगैरे वाङ्मयसेवकाची माहिती वाङ्मयसेवा-प्रकरणात पुढें येणार असल्यामुळें तिचा केवळ उल्लेख करून हें प्रकरण संपवीत आहों.

## प्रकरण ५ वें.

# आर्थिक परिस्थिति

**गोव्याची सांपत्तिक स्थितिः—** अर्थ शास्त्रात अशा एक नियम आहे कीं, ज्या देशाचा निर्गतव्यापार आयातीपेक्षां समृद्ध आहे तो देश समृद्ध व संपन्न समजावा. राजकीय सत्तेमुळें इतर देशांतून बलपूर्वक संपत्ति खेंचून आणणाऱ्या इंग्लंडसारख्या देशाची बाब येथें विचारात घ्यावयाची नाहीं. दुसरी अगदीं आधुनिक कसोटी म्हणजे देशातील बेकारीचें प्रमाण व व्याजाचा दर ही होय. ज्या देशांत हें प्रमाण कमी असेल तो देश संपन्न व जेथें हें प्रमाण जास्त असेल तो देश आर्थिक दृष्ट्या खालावलेला समजावयाचा तिसरी कसोटी म्हणजे मजुरीचें प्रमाण हें जेथें जास्त असेल तेथें संपन्नावस्था नांदते असें समजतात. गोमंतक प्रांत पहिल्या कसोटीनें पाहिल्यास अत्यंत हलाखीचा समजला पाहिजे. परंतु पुढील दोन प्रमाणें जर त्याला लावून पाहिलीं तर मात्र प्रकार निराळ्याच स्वरूपांत दिसतो. प्रस्तुत प्रकरणांत हीं तीनही प्रमाणे विचारांत घेऊन गोव्याच्या सांपत्तिक स्थितीचा विचार करावयाचा आहे. आणि तो करताना होतां होईतों अधिकृत अशा सरकारी, जकात खाते, पोस्ट खातें, जमाबंदी खातें इत्यादि खात्यांतील आकड्यांनींच तो करणार आहों.

**आयात व निर्गत व्यापारः—** ह्या तुलनेसाठीं १९०९ हें साल व १९२८, ही दोन सालें विचारात घ्यावयाचीं आहेत. पुढील कोष्टकात ही माहिती दिली आहे. आंकडे हजाराचे आहेत

| साल. | १९०९ | १९२८ | वाढावा | वाढाव्याचें शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| आयात | ६३६४ | १६४३२ | १००६८ | २५८ टक्के |
| निर्गत | २८८५ | ४५११ | १६२६ | १५६ ” |
| त्यांतील फरक | ३४७९ | ११९२१ | ८४४२ | ३४२ ” |
| निर्गतीचें आयातीशीं प्रमाण | ३७,७६ | २७,४५ | | |

गोव्याच्या आयातीशी शेंकडा प्रमाण किंवा उभय आंकड्यामधील फरक पाहिल्यास गोवाप्रांत इतक्या वर्षांच्या अवधींत बाहेरील सावकारांच्या आहारीं केव्हांच पडला पाहिजे होता. पण तसा तो पडलेला अजून दिसून येत नाहीं.

१९०९ ते १९२८ दरम्यानच्या वीस वर्षांच्या काळातच, आयातीतच अडीच पटीचा वाढावा झाला आहे, तर निर्गतींत तो फरक दीडपटींतच झाला असून आजमितीस आयातनिर्गतींतील फरकामुळे गोमंतकाला दरसाल समारें १ कोटि, वीस लक्ष रुपये बाहेर पाठवावे लागतात. तरी पण गोमंतकीय लोकांच्या, मुंबई वगैरे ठिकाणच्या बँकातून लक्षावधि रुपयांच्या ठेवी अजूनहि आहेत. इतकेंच नव्हे, तर गोवा सरकारच्या पोस्टल सेव्हिंग बँकेचे २४२५ हजार रुपये, कर्ज मागणारे नसल्यामुळें, इतर बँकातून ठेवीदाखल ठेवलेले आहेत ( V. Boletim da Agencia Geral das Colonias Vol V no 49 pg 272 ) हा चमत्कार होतो कसा, तें पुढें सांगण्यात येईलच, पण अगोदर आपण आयातनिर्गतींतील महत्वाचे घटक कोणते ते पाहूं.

**आयातीचे घटकः**—गोमंतकाच्या आयातीचे प्रमुख घटक म्हणजे, खाद्य जिन्नसापैकीं तांदूळ व भात, गूळ, व साखर, वस्त्र, म्यासलेट, आणि इतर चैनीच्या वस्तू होत. १९१९ सालापासून आयातींत दुसऱ्या दोन महत्त्वाच्या घटकांची भर पडलेली दिसून येते. हे घटक म्हणजे मोटारी व पेट्रोल हे होत.

| साल | १९०७ | १९२७ | १९२८ | १९०७ ते १९२७ मधील फरक |
|---|---|---|---|---|
| तांदूळ खंडी | ९७ ह. | १२७ ह. | १२१ ह. | ३० ह. |
| ,, रु. | १३१८ | ३०६६ | २६१३ | १७४८ |
| भात खंडी | ६७ | ८१ | ९५ | २८ |
| ,, रु. | ३५४ | ९३२ | १०८८ | ७३४ |
| साखर मण | १२ | ८६ | ८७ | ७५ |
| ,, रुपये | १९५ | ८४९ | ७२५ | ५३० |
| गूळ खंडी | १७ | २९ | २१ | १२ |
| ,, रुपये | ९६ | २९८ | २०७ | १११ |
| वस्त्र रु. | ८८० | २५०७ | २२७१ | १३९१ |
| म्यासलेट | | ७१७ | ७०२ | |
| ,, रु. | | ४२५ | ३९७ | |
| पेट्रोल कीलोग्राम | | ४८९ | ७०३ | |
| ,, रु. | | २३७ | ३१७ | |

आंकडे हजारांचे आहेत

वरील कोष्टकावरून तर स्पष्ट दिसून येतें कीं, १९०७ ते १९२७च्या दरम्यान आयातींत भक्कम वाढ झालेली आहे. व १९१० सालच्या शिरगणतीपेक्षां १९२० सालीं लोकसंख्येंत उलट १६२९०ची घटच झाली असतांही आयातीतील वाढ झाली आहे. महायुद्धामुळें चलनी नाण्याच्या किंमतींत जगभर जो घोटाळा माजला होता त्यामुळें ही वाढ झाली असेंहि म्हणतां येत नाही. कारण झालेली वाढ केवळ किंमतींतच झाली नसून ऐन मालाच्या संख्येतच झाली आहे. यावर असेंहि म्हणतां येईल कीं, गोमंतकांत या वीस वर्षांत उत्पन्नाची तूट झाली म्हणूनच आयात वाढली. परंतु तसें मुळींच झालें नाहीं. बाकी तें गृहित धरलें तर त्यामुळें दिवाळें उलट जास्तच लवकर वाजावयाला पाहिजे होतें. तें तर अजूनहि वाजलेलें नाहीं. पुढें निर्गत व्यापाराचा विचार करतांना उत्पन्न मुळींच घटलें नाहीं हें सिद्ध होणारच आहे शिवाय आयातींतील साखर, वस्त्र, जिन्नस, स्यासलेट अशासारखे जिन्नस गोव्यात मुळीं उत्पन्नच होत नाहींत. आणि त्यांची आयात देखील वाढली आहे. त्याचप्रमाणें आयातींत मोटार व पेट्रोलची भर पडलेली आहे हें वर सांगितलेंच आहे

**निर्गतीचें विवेचन**--निर्गतींतील महत्वाचे घटक म्हणजे नारळ, मीठ, आंबे, सुपारी, मासे, खोबरें व काजूचे गर हे होत या विषयींचे आंकडे दिलेलें कोष्टक पुढें दिलें आहे त्यावरून पाहातां, निर्गतींत घट तर झालीच नाही, पण उलट तीहि कितीतरी वाढलेलीच दिसून येते. आणि इतकेंहि जमेस धरून, एकंदर आयातीचें एकंदर निर्गतीशी प्रमाण, गोमंतकाला नुकसानकारकच आहे हें तर आपण सुरवातीसच पाहिलें आहे. शिवाय या बाबतींत दुसरीहि एक गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे कीं, गोमंतकाच्या आकुंचित क्षेत्रामुळें असो, किंवा गोमंतकात येऊन व्यापार करणाऱ्या परस्थ व्यापाऱ्याच्या अस्तित्वामुळें असो, पण आयात-निर्गत व्यापाराचीं अखेरचीं सूत्रें बहुश: बाहेरच्याच व्यापाऱ्यांच्या हातीं राहातात. नारळाचाच व्यापार घेतला, तर त्यासाठीं परस्थ लिंगायत, गुजराथी व्यापाऱ्यांनीं देखील इकडे पेढ्या घातलेल्या आहेत. तांदूळ, तंबाखू, फळें, वस्त्र-जिन्नस इत्यादि विषयीं पाहिल्यास त्यांतही गोमंतकीयेतरांची बरीच मंडळी दिसते. आणि इतकेंहि असून आर्थिक बाबतींत गोमंतक दिवाळखोर बनला नाहीं. गोमंतकांत व्यापाऱ्यांचीं दिवाळीच वाजलीं नाहींत असें आमचें म्हणणें नाहीं. परंतु आयातनिर्गतींतील फरकाच्या मानानें पाहिल्यास, तीं जेवढीं निघणें शक्य होतें तेवढीं तर असोच, पण त्यांच्या शतांश किंवा सहस्रांशानेंही निघालीं नाहींत.

## निर्गत मालाचें कोष्टक. आंकडे हजारांचे आहेत.

| जिन्नसाचें नांव | | १९०७ | १९२७ | १९२८ | १९०७ व १९२७ सांतील फरक. |
|---|---|---|---|---|---|
| नारळ नग | | ३३०८८ | ४२३२० | ३३६६६ | ५७८ |
| किंमत | | १५८० | १५९८ | १६३९ | २८ |
| मीठ | मण | ७४९* | ३१५ | ३२५ | — |
| | किंमत | १५९ | ३१३ | ३२२ | १५४ |
| आंबे | नग | ९०४१ | ९५४५ | ११३७१ | ५०४ |
| | किंमत | १६० | २७३ | ५८० | ११३ |
| सुपारी | इंडू. | १० | २४ | ३३ | १४ |
| | किंमत | ८० | २९२ | ३८७ | २१२ |
| मासे | इंडू. | ३० | ४९ | ३० | १९ |
| | किंमत | ११० | ४०६ | ३५२ | २९६ |
| काजू | इंडू. | २७ | २७ | ३३ | — |
| | किंमत | ११८ | २६४ | २९४ | १४६ |

* १९०७ मधील मिठाची निर्गत पूर्वी सांचलेल्या मिठाचीहि झाली. म्हणून आंकडा फुगला आहे.

**व्याजाचा दर, हुंडणावळ वगैरे** —व्याजाच्या दरात ह्या वीस वर्षांच्या अवधीत केवळ सव्वाकीनेंच फरक पडला आहे देवाल्यें,मिझेरिकोर्द,ओस्पीस इत्यादि संस्थातून व्याजाचे दर पूर्वीप्रमाणेंच ५ ते ६ टक्के जवळ जवळ आहेत. परंतु इतर सावकारी व्याज पूर्वीच्या सहा टक्क्याऐवजीं आतां आठातहि जरा कमीच आहे. आणि याचा पडताळा जमाबंदी खात्यात व्याजावरील कराच्या आकारणींत दिसून येतो. वास्तविक हा दर याच्यापेक्षां खालींच गेला असता. परंतु ह्या त्या प्रसंगीं हाताशीं पैसे मिळावे या हेतूनें व अंशत: सुरक्षितपणाच्या हेतूनें गोमंतकीय लोकांचे पैसे अलीकडे बाहेरील बँकांतूनच विशेष असतात. बांकु नासिओनाल उल्त्रामारीनु ही पोर्तुगीज बँक चालू खात्यावर व्याज देत नसते म्हणूनच व्याजाचा दर इतका तरी वाढला. व्यापारी व्याज मात्र पावणोत्रा आहे व तें पूर्वीहि तेवढेंच होतें. हुंडणावळीचा दर शेंकडा आठपासून बारा आणे आहे. व इंग्रजी नोटांना शेंकडा चार ते सहा आणे वटाव मिळतो. मजुरीचे दर १९०७ सालीं नव्या काबिजादींत ८५ व जुन्या काबिजादींत ८८ होते त्याऐवजीं आतां १ रु. व

१॥ रु. असे वाढलेले दिसतात. याशिवाय विमा कंपन्यांचें जें काम इकडे चाललेलें आहे त्यामुळें प्रिमिअमच्या रूपानें दरसाल सुमारें ८ लक्ष रुपयांवर रक्कम बाहेर जाते ती कायमची जाते असें म्हणावयाला हरकत नाहीं कारण, विम्याच्या भरपायीबद्दल दरसाल जे ५०।७५ हजार रुपये मिळतात त्यांशिवाय मुद्दलाचा कांहींच पत्ता नसतो. अर्थात् ह्या रकमेवर दरसाल सुमारें ९। टक्के व्याज मात्र मिळतें असें सिद्ध झालें. आणि हा क्रम आज जवळ जवळ वीस वर्षें चालू आहे

**बेकारीचें मानः**—कोणत्याहि देशाच्या सांपत्तिक सुस्थितीचा विचार करताना त्यांतील बेकारीचें प्रमाण लक्षात घेतल्याशिवाय राहाता येत नाहीं. कारखान्यांवर व मोठमोठ्या उद्योगधंद्यावर उपजीविका चाललेल्या व समाजात लक्षाधीश व भिक्षाधीश असे दोनच वर्ग असलेल्या देशाची गोष्ट, जरा निराळी म्हणून सोडून दिली तर, इतरत्र बेकारीचें मान हें सांपत्तिक सुस्थितीचें महत्वाचें गमक समजलें पाहिजे. गोमंतकाल बेकारी अगदींच नाहीं असें प्रस्तुत लेखकाला वाटतें. आणि याचीं कारणें पुढें दिलीं जात आहेत. रेल्वेचें काम, माइनिंग कंपन्यांचें काम, आगबोटींवरील लोडिंग अन्लोडिंगचें काम, सरकारी रस्ते दुरुस्तीचें काम, ठिकाणदारांचीं जमिनींची मशागत इत्यादि कामें करावयाला इकडचे मजूर पुरे पडत नसल्यानें मद्रास, धारवाड, इत्यादि प्रांतातील मजूर व पठाण, मोपला, इत्यादि जातीचे मजूर गोमंतकांत बाहेरूनच आणवावे लागत आहेत, इतकेंच नव्हे तर, देशांत कामाला मजुराचा पडणारा तुटवडा नष्ट करण्यासाठीं उपाययोजना म्हणूनच गोवा सरकारनें गोव्याबाहेर जाणारावर माणशीं दहा आणे डोईपट्टी बसविली आहे. इतकेंहि असता, सरकारी शिरगणतीच्या रिपोर्टांतील माहितीवरून गोमंतकाल १४५३९४ लोक निरुद्योगी म्हणून दिले आहेत. म्हणजे गोव्याच्या ४६९४९४ लोकसंख्येंत जवळ जवळ एक तृतीयांश लोक बेकार ठरतात ! याचा उलगडा असा कीं,प्रत्यक्ष फेरीवाल्यांचें किंवा इतर कामें करणाऱ्या स्त्रिया वगळल्यास इतर स्त्रीवर्ग शाळेंत जाणारीं मुलें खेरीजकरून बाकीचीं सारीं मुलें, पुष्कळसे मजूर इत्यादि साराच वर्ग ह्या संख्येंत सामावला गेला आहे व अशा रीतीनें तो आंकडा तयार झाला आहे. व्याज कमी, मजुरी वाढलेली, मध्यमवर्गाचें प्राबल्य, इत्यादि लक्षणांत बेकारी संभवतच नाहीं व सर्वांत बलवत्तर प्रमाण म्हणजे इकडे कामाला हजारों मजूर बाहेरून आणावे लागतात हेच होय. गोव्यांतून परप्रांतीं जाणारे सुशिक्षित किंवा अशिक्षित लोक संपन्नतेच्या भजनी लागून बाहेर जातात. म्हणून त्यांचा विचार बेकारांत जमेस धरता येत नाह

**भरपाई कशी होते ?**—आयातनिर्गतींतील अंतराची भरपाई व ठेवीच्या रूपानें दिसून येणारी बचत, याचा उगम शोधून काढावयाचा झाल्यास, गोव्यांतून परप्रांतांत किंवा परदेशीं जाणाऱ्या लोकांकडेच धांव घेतली पाहिजे बाहेर गेलेल्या गोमंतकीयांची संख्या सुमारें ७५ हजारांच्या जवळ असावी शिरगणतीच्या रिपोर्टांत याविषयी जी माहिती आहे ती पुष्कळ अशीं चुकीची असण्याचा संभव असल्यावरून तिचा उल्लेख केला नाही. या मंडळीकडून येणाऱ्या पैशानें 'ओस्पीस' आणि 'मिझेरिकोर्द' या संस्थाच्या लॅाटरींचीं जीं तिकिटें बाहेर खपतात, त्यांतून येणाऱ्या पैशानें ही सारी बचत होते. या त्यांच्या परिश्रमाचा नक्की आंकडा मिळण्याचें साधन मिळणें अशक्य आहे केवळ इन्शुअर्ड पत्रांतूनच, १९२७ सालीं ५५९५ हजार रुपये गोव्यांत आले व ९६७ हजार रुपये गोव्यांतून बाहेर गेले. म्हणजे इन्शुअर्ड पत्रातूनच नक्की ४५४८ हजार रुपये गोव्यांत आले. याशिवाय चेक, हुंड्या व रोकडीच्या रूपानेंहि गोव्यांत बाहेरचे पैसे येतात त्याचा हिशेब मिळत नाहीं. त्याचप्रमाणें बाहेरच्या बँकातून परभारें ठेवींच्या रूपानें पैसा सांठविला जातो, त्याचे व्याज इत्यादि साधनांनीं आयात निर्गतींतील अंतराची भरपाई होत असते. राष्ट्रातील संपत्ति अजमावण्याच्या अनेक साधनापैकीं विकाऊ जमिनीची किंमत, हें एक महत्त्वाचें साधन होय याहि दृष्टीनें विचार केल्यास, गोमंतकाची स्थिति समाधानकारकच आहे असें दिसून येतें ज्यात रस्ते वगैरे वाहतुकीच्या साधनांची तादृश सोय नाही, आरोग्यरक्षण व सुरक्षिततेच्या बाब-तींत जो भाग अजून मागसलेला आहे, अशीं सह्याद्रीलगतचीं खेडीं सोडून दिल्यास, नवीन काबिजादींतील इतर ठिकाणीं, शेंकडा पांच टक्क्यापेक्षां जास्त व्याज जमिनीच्या उत्पन्नाच्या रूपानें सुटत नसतें आणि जुन्या काबिजादींत हेंच प्रमाणशेकडा दोहों इतकेंहि नसतें. सारांश, बेकारी कमी, मजुरी चांगली, व्याजाचा दर कमी व जमिनीचे दर चढलेले अशा चिन्हांनीं युक्त अशी गोमंतकाची परिस्थिति आहे व तशी ती व्हावयाला मध्यम वर्गांचेच परिश्रम मुख्यत्वें-करून कारणीभूत झालेले आहेत परदेशगमन व परप्रांतगमन करून, निढ-ळाच्या घामानें बाहेरची संपत्ति गोव्यांत खेंचून आणणारा असा वर्ग हाच होय मात्र त्या मानानें त्यांचें जीवन तेवढें सुखाचें नसतें ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. प्रत्येक साठविलेल्या रुपयामागें कितीतरी खस्त, किती तरी त्रास लपलेले असतात ! शिवाय रोगराईचा प्रसादहि याच वर्गाला विशेष स्वीकारावा लागतो तो निराळाच.

**हिंदुसमाजास धोक्याची सूचना** — प्रस्तुत पुस्तक जसें गोमंतकीयेतरांना तसेंच गोमंतकीयानांहि उपयोगी व्हावे या दृष्टीने लेखकाचा प्रयत्न आहे. त्यांत आर्थिक बाबाचा विचार करतांना वाचकांनीं पाहिलेंच असेल कीं, गोमंतकाचें भवितव्य बहुतांशीं आमच्या परदेशगमन करणाऱ्या बंधूंच्याच हातीं आजवर आहे व पुढेंहि त्यात बदल होण्याचें साधन तूर्त तरी उपलब्ध नाहीं. गोमंतकांतील सुपीक जमीन तर सगळी वहिवाटीस आलेलीच आहे जी काहीं थोडीबहुत पडीत आहे तिच्यात वसाहत करावयाला आज तरी अनेक अडचणी आहेत उद्योगधंद्याची वाढ करावयाला गोमंतकात वाव आहे खरा, पण गोमंतकाच्या आकुंचितपणामुळें, संरक्षक जकाती असतांहि, बाहेरच्या जगड्व्याळ कारखान्यांतून निघणाऱ्या स्वस्त मालासमोर टिकाव धरण्याजोगी उत्पादन शक्ति या कारखान्यातून दिसणें शक्य नाहीं. तेव्हा केवळ परदेशगमन करूनच आम्हां गोमंतकीयांना आपला बचाव करणें तेवढें राहिलें. त्यांत आज तरी अशी स्थिति आहे कीं, परदेशगमन करणाऱ्यांत, ख्रिस्ती समाजाचाच वरचा नंबर लागत असल्यानें, नवीन काबिजादींतील बऱ्याच जमिनी देखील त्या समाजाच्या हातीं गेल्या आहेत व प्रत्यहीं जात आहेत. ज्या कोणाला याचा पडताळा पाहावयाचा असेल त्यानें न्याय खात्यामार्फत पुकारण्यांत येणाऱ्या जाहिरातीच वाचल्या तरी त्यांत तो मिळेल अशा जाहिरातीतून धनको नेहमी ख्रिस्ती असून ऋणकोची भूमिका हिंदूसाठी राखली गेलेली आज सुमारें १५।२० वर्षे तरी दिसेल ही परिस्थिति हिंदु समाजानें लक्षांत न घेतल्यास, आणखी थोड्याच काळात त्याची स्थिति आजच्यापेक्षाहि बिकट होऊन, त्याला आपल्या हक्काच्या घरातच भाडेकरी व हक्काच्या जमिनीत उपरी कूळ म्हणून काळ कठावा लागेल त्यासाठीं हिंदूंनीं आपले प्रयत्न एकवटून, सरकारी नोकऱ्या, व्यापारधंद्यातील जागा तर शक्य तेवढ्या जास्त मिळविल्या पाहिजेतच, पण त्याशिवाय ज्या मार्गानें आजचा ख्रिस्ती समाज आपली संपन्नावस्था टिकवून धरून वर नव्या काबिजादीचें आक्रमण करूं शकतो, तोच परदेशगमनाचा मार्ग हिंदुसमाजानें पकडला पाहिजे नाहीं तर त्याची धडगत नाहीं.

प्रकरण ६ वें

# शैक्षणिक परिस्थिति.

## विभाग पहिला.

## पोर्तुगीज प्राथमिक शिक्षण

**पोर्तुगीज पूर्व परिस्थितिः**—पोर्तुगीजाच्या आगमनकालापूर्वी गोमतकांत शिक्षणाची स्थिति काय होती, हें समजण्याचें विश्वसनीय साधन तूर्त उपलब्ध नाही. परंतु अनुमानिक पुराव्यावरून एवढेंच सांगतां येतें कीं, निदान ब्राह्मणवर्ग व वैश्य वर्ग हा बराचसा साक्षर होता कांहीं ठिकाणीं ही साक्षरता देवनागरी लिपींत तर कांहीं ठिकाणीं कानडी लिपींत ( जिला गोयकानडी असें नांव होतें ) अशी होती. इतिहासकथनांत आपण पाहिलेंच आहे कीं, इ. स. ११० पासून १३१४ पर्यंतच्या दीर्घ कालावधींत हा प्रदेश कदंबाच्या सत्तेखालीं नादत होता. परंतु सत्ता कोणाचीहि असली तरी कोमुनदादींच्या प्राबल्यामुळें अंतस्थ कारभार सारा कोमुनदादींच्याच हातांत होता. त्यामुळें साहजिकच गांवांतील शिक्षणाची बाजू नेहमीं कोमुनदादींच्या कुळकर्ण्यांकडे असे. कंबरेला कलमदान, एका हातात कोमुनदादीची चोपडी व दुसऱ्या हातांत लेखणी घेऊन कदंब, चालुक्य, राष्ट्रकूट, सोंधेकर, मुसलमान इत्यादि अनेक राजवटींत या वर्गानें, एका बाजूनें वतनें साभाळतांना, दुसरीकडून भाषा राखण्याचा जो प्रयत्न केला, त्याला भाषांच्या इतिहासांत दुसरी तोड मिळणें कठीण आहे. जुन्या कुळकर्णी दप्तरात असा एक कालखंड आहे कीं, ज्यांत कानडी लिपींत लिहिलेलीं देखील मराठी लिखाणें आहेत. देशभाषेच्या शिक्षणाविषयीं पूर्वीं चाललेले प्रयत्न पुढें मराठी शिक्षणाच्या विभागांत सांगण्यात येतीलच.

विवेचनाच्या सोयीसाठीं प्रस्तुत प्रकरणाचे पोर्तुगीज प्राथमिक शिक्षण, दुय्यम शिक्षण व उच्च व वैशेषिक शिक्षण असे आम्ही तीन विभाग केले आहेत. विवेचनासाठीं आम्हांला जे ग्रंथ उपयोगी पडले त्यात " पोर्तुगीज हिंदुस्थानातील प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षणाची रूपरेषा ' नावाचा पाद्री फिलिप नेरी सौज यांचा १८७९ त प्रसिद्ध झालेला ग्रंथ सिन्योर लुईज दे मिनेजिस ब्रागांस याचा १९२२ साली सरकारी रीतीनें प्रसिद्ध झालेला "पोर्तुगीज हिंदुस्थानांतील शिक्षण" नांवाचा ग्रंथ याचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे.

**पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाचीं स्थित्यंतरें.**—आपल्या आगमना-नतर पोर्तुगीजानीं लागलीच इकडे शिक्षणप्रसाराची जी खटपट केली, तिचें स्वरूप, निदान शतक दीड शतक तरी, केवळ धर्मप्रसाराच्या साधनाच्या ' दृष्टीनेंच ठर-विलेलें होतें आल्बुकेर्कनें नोकरवर्ग तयार करण्यासाठी पोर्तुगीज भाषेच्या पहिल्या शाळा, गोवा बेट व कोचीं येथे स्थापन केल्या होत्या खऱ्या, परंतु त्याचें अस्तित्व कालोदरात केंव्हाच गडप होऊन गेले आणि गोवें घेऊन पचवीस तीस वर्षें होतात न होतात तोंच ह्या पोर्तुगीज शाळा व इतरत्र मिळणारें शिक्षणदेखील पाद्र्यांच्याच हातीं गेलें आणि त्याच्याहि हातीं तें फार काळ न राहाता, मठवासी व कोंग्रेगानीस्त जोगयाच्या हाती उच्च शिक्षणाची सारी सूत्रें गेली. साक्षरता-प्रसार हा चर्चच्या पाद्र्याच्याच देखरेखीखालीं पारोकियाळ शाळामधून चालला होता. ह्या शाळा चर्चच्या उत्पन्नातून चालत असून, त्यात पोर्तुगीज लिपींतून लेखन-वाचन व ख्रिस्ती धार्मिक गाणीं म्हणतां येण्यापुरतें संगीतज्ञान, एवढाच शिक्षण-क्रम असे. ह्या शाळा व्हायसरॉय दोंजुवांव द कास्त्र यानें इ स १५४५ त स्थापन केल्या होत्या आजमितीस देखील प्रत्येक चर्चला जोडून ह्या शाळा कोंफा-रीयश ( चर्चच्या महाजन मंडळया ) व क्वचित् स्थळीं कोमुनदादीच्या पैशावर चालत आहेत. इ. स. १७७२ पर्यंत ह्याच शाळातून पोर्तुगीज शिक्षणप्रसार चालत होता. त्या सालीं प्रसिद्ध मुत्सद्दी मार्केश द पोंबाल यानें प्राथमिक पोर्तुगीज शिक्षणासाठीं गोव्याला दोन शिक्षक बहाल केले आणि त्याच्या व इतर शिक्ष-णाच्या खर्चासाठीं, मासावर रत्तलीं १ पै व दारूवर दर गोळयास ( चार शेरास ) १० पै प्रमाणें कर बसविला या कराला सुब्सीदियु लितेरारियु (शैक्षणिक कर) असें नांव आहे. तेव्हांपासूनच प्राथमिक शिक्षणांत राजसत्तेचा प्रत्यक्ष हात शिरला. परंतु पोर्तुगीज राजकारणातून पोंबालचें उच्चाटन होताच त्या शाळांकडचे सरकारचें लक्ष कमी होऊन त्यांची प्रगतीच खुंटली, पोंबालची सत्ता लयास गेल्यावर एकाच वर्षानें त्यानें स्वत.च उत्पन्न केलेल्या 'रेयाल मेझ सेंसोरिय' ह्या बोर्डानें ह्या संस्था पाद्रींच्या हातीं सोंपविल्या आणि शैक्षणिक कराची स्थिति अशी झाली कीं, १७९७ पासून शिक्षकांचा पगार देखील त्यांतून भागेना

पुढें इ. स. १७९८ त व्हेग काब्राल व्हायसरॉयानें इतर खर्चापुढें ह्या शाळांची मातब्बरी न वाटल्यामुळें ह्या शाळा बद केल्या. जवळ जवळ वीस वर्षे ह्या शाळा चालल्या होत्या. परंतु ह्या प्राथमिक शिक्षणापेक्षा, ल्याटिन व ख्रिस्ती धर्मशिक्षणच पाद्र्यांना जास्त जरूरीचें वाटत असल्याबद्दल, बिशपनीं व गव्हर्नरनीं वारंवार

वरिष्ट सरकारांत तक्रारी केल्या होत्या. पारोकियाल शाळांतील शिक्षक स्वतःच अपुऱ्या पोर्तुगीज शिक्षणानें युक्त होते. त्यामुळें इ. स. १८२३ त शिक्षणाची स्थिति असमाधानकारकच होती.

**सनदशीर राज्यपद्धतिः**—इ. स १८२१ त, पोर्तुगालात सनदशीर राज्यपद्धति सुरू झाल्यानंतर व्हायसरॉय दोंमानुएल द पोर्तुगाल यांनीं शिक्षणाची पुनर्घटना केली व गोव्यांतील रायबंदर, पणजी, मडगाव, फोंडें, डिचोली व कोलवाळ अशा ६ शाळा स्थापन केल्या. प्रत्येक शाळेंत दोनदोन शिक्षक असून एक रायबंदरची शाळा खेरीजकरून इतर शाळा त्यावेळीं लष्करी छावण्यांच्या जागीं म्हणूनच स्थापन करण्यांत आल्या होत्या. लेखनवाचन, वाक्यरचना, शुद्धलेखन, पोर्तुगीज इतिहास व लुझीयदश हें महाकाव्य टेक्स्ट बुकादाखल ठेवण्यात आलें होतें.

इ. सन १८३५ मध्यें पोर्तुगालांतील यादवी युद्ध थांबतांच गोमंतकातील शिक्षण पूर्णपणें सरकारच्या हातीं गेलें व तेव्हांपासून प्राथमिक शिक्षणाचा कारभार पोर्तुगालातील तत्सम शाळाप्रमाणे आजवर चालत आहे.

इ. स. १८४१ सात ॲक्टिंग गव्हर्नर लोपिश द लीम यानीं गोव्यांत एक नॉर्मल स्कूल व ४९ पोर्तुगीज प्राथमिक शाळा स्थापन केल्या. ११ तिसवाडी, १७ सासष्ट प्रांत व २१ बारदेश अशीं त्यांची वाटणी झाली होती. डिचोली व कोलवाळ येथील शाळा बंद करून त्या ऐवजीं २ रेजिमेन्टल स्कुलें उघडली. या शाळा सुरू होतांच पारोकियाल शाळांतून पोर्तुगीज भाषा शिकण्याची बंदी झाली. नॉर्मल स्कूल आरंभीं अगदींच तुटपुंज्या ज्ञानाच्या पायावर चालविलें जात असे. ह्या शाळांचा बराच खर्च कोमुनदादी व म्युनिसिपालिट्या यांच्यावर बसविला गेला होता. पुढें कोंद द आंतश् या व्हायसरॉयानीं कोमुनदादींना व म्युनिसिपालिट्यांना हा खर्च झेपत नसल्याच्या सबबीनें ह्यांपैकीं तिसवाडी येथें ६, सासष्ट प्रांतात ९ व बारदेशांत १० एकूण २५ शाळा राखून बाकीच्या बंद केल्या व नॉर्मल स्कूलासहित त्याचा खर्च शैक्षणिक कराच्या उत्पन्नांतून व्हावा असें ठरविलें. खेरीज नव्या काबिजादींमध्यें, पेडणे, डिचोली, सत्तर, फोंडें, जांबावली व काणकोण अशा सहा शाळा उघडून त्यांत ख्रिस्ती धर्मशिक्षणास फांटा दिला. पुढें १८४३ सालीं याच व्हायसरॉयनें आणखी सात शाळा उघडल्या व त्यांतील ६ फोंडें व डिचोली या दोन महालतून ठेविल्या.

इ सन १८४४ मध्यें पोर्तुगालात शैक्षणिक सुधारणेचा जो कायदा पास झाला, त्यानें प्राथमिक शिक्षणाचे दोन टप्पे Graus पाडण्यात आले. प्रिमेर ग्रावांत, लेखनवाचन, थोडें गणित, नीतीचे सामान्य नियम, ख्रिस्ती डॉकट्रीन व शिष्टाचार, व्याकरणाचे एक्झरसाईझीस् व प्रांतिक भूगोलाची व पोर्तुगीज इतिहासाची मूलतत्वें इतकाच अभ्यासक्रम होता. सेगुदग्रावांत या शिवाय भूगोलाची सामान्य माहिती, इतिहास व ख्रिस्ती पुराणें, रेषाचित्रकला, अंकगणीत व भूमिती याचें व्यावहारिक हिशेबलेखनापुरतें ज्ञान इतक्या विषयाचा समावेश होई.

नॉर्मेल स्कुलचा अभ्यासक्रम दोन वर्षांचा करण्यात येऊन त्यात अक्षर वळविणें, रेषाचित्रकला, व्याकरणाचे सामान्य नियम, पोर्तुगीज व्याकरण, शिक्षणपद्धति व प्राथमिक शिक्षणविषयक कायद्याचें ज्ञान, भूगोल, कालमापन व इतिहास; ख्रिस्ती डाक्ट्रीन व पुराणें, अध्यात्मविद्या व नैतिक तत्वज्ञान; व अंकगणीत आणि भूमितीचें व्यावहारिक भूगोलापुरतें ज्ञान इतक्या विषयांचा समावेश झाला. नॉर्मलच्या पहिल्या वर्षांचें सर्टिफिकीट प्रिमेरग्रावाच्या शिक्षकांना व दुसऱ्या वर्षाचें सेगुद ग्रावाच्यां शिक्षकांना आवश्यक ठरविलें होतें. परंतु हा कायदा गोव्यांत अमलांत यावयाच्या पूर्वींच उभय ग्रांवांचें शिक्षण पुन एकत्र करणारा व गव्हर्नरना हवीं तेवढीं स्कुलें उघडण्याच्या कुलमुखत्यारी देणारा दुसरा कायदा पोर्तुगालांत पास झाला. तथापि हे दोनहि कायदे १८५४ पर्यंत दप्तरांतच पडून राहिले. दरम्यानच्या काळात पणजी येथें एक मुलींची प्राथमिक शाळा मात्र स्थापन झाली. याच शाळेनें स्त्रीशिक्षणाचा गोव्यांत प्रारंभ झाला.

इ. स १८५४ सालीं व्हिस्कोंद द औरें या गव्हर्नरनें १८४४ च्या कायद्याची अंमलबजावणी करून नॉर्मल स्कूलची सुधारणा केली सेगुद ग्रावाच्या पाच शाळा व मडगाव आणि म्हापशें येथें एक एक मुलींची शाळा उघडली.

**३५ वर्षांचा आढावा–इ. स. १८७० ची स्थिति** —पस्तीस वर्षांच्या अवधींत साऱ्या गोमंतकांत मिळून सरकारी प्राथमिक शाळाची संख्या ३७ झाली होती शिवाय पारोकियाल शाळा ( चर्चच्या ) ७५ निराळ्याच होत्या. हिंदूंची वस्ती असलेल्या नव्या काबिजादींत या एकंदर ११२ शाळांपैकीं १२ सरकारी व ४ चर्चच्या मिळून केवळ १६ च शाळा होत्या! सरकारीरीत्या प्रसिद्ध झालेला सेन्सस रिपोर्ट विश्वसनीय मानल्यास, १८७० सालीं, या ११२ शाळांतून ५६१९ मुलगे व ३०५ मुली शिकत होत्या. म्हणजे ३८५ हजार लोकसंख्येंतून ६१२४

मुलें पोर्तुगीज शिकत असत. या संख्येंतून २३०५ मुलें सरकारी शाळांत शिक्षण घेत. अर्थात् दर शाळेच्या वाट्याला ६२ मुलांची सरासरी पडते. नॉर्मल स्कुलात १७ विद्यार्थी होते. ज्या शिक्षण तपासणी कमिट्या नेमल्या होत्या, त्या वेळच्या कायद्यानुसार त्यांचे अभिप्राय त्या शाळांतील शिक्षणाविषयीं फारच प्रतिकूल होते. मुलांना धड पोर्तुगीज बोलताहि येत नव्हतें. शिवाय स्वच्छता, टापटीप, शिस्त इत्यादि गुणात देखील त्या शाळा बऱ्याच असमाधानकारक होत्या, असा त्या अभिप्रायाचा सारांश होता. पोर्तुगीज भाषाज्ञान सुलभपणें होण्यासाठीं देशभाषेंतून पोर्तुगीज भाषांतरासहित संवाद द्यावे व नव्या काबिजादीतील शाळा मराठी–पोर्तुगीज कराव्या म्हणजे त्यातून मराठी भाषेच्या द्वारें पोर्तुगीज शिकविण्यात यावें अशा सूचनाहि याच कमिट्यांनी केल्या होत्या.

**इ. स. १८७० ची सुधारणा. सक्तीच्या शिक्षणाचा प्रादुर्भाव** — १८६९ सालच्या नवंबरात शिक्षणाची पुनर्घटना होऊन शाळातून पूर्वीप्रमाणेंच दोन टप्पे ठेवण्यात आले. परंतु विषयाची वाटणी निराळ्या प्रकारची व विशेष उपयुक्त करण्यात आली प्रिमेर क्लासात लेखनवाचन, अपूर्णांकापर्यंतचीं चार कृत्यें, विविध परिमाणें आणि वजनामापांची माहिती आणि केवळ ख्रिस्त्यानाच ख्रिस्ती डाक्ट्रीन ठेवण्यात आली त्याचप्रमाणें सेगुंद क्लासांत पोर्तुगीज व्याकरणाचें सामान्यज्ञान, पोर्तुगीज प्रांताचा भूगोलेतिहास, व्यवहारोपयोगी गणीत व भूमिती व शेतकीविषयीं सामान्य माहिती इतके विषय येत. शाळेपासून तीन किलोमिटरच्या त्रिज्येत असणाऱ्या ९ ते १२ वर्षांच्या मुलांना शिक्षण सक्तीचे ठरविण्यात आले. मुलींना वजनें, मापें व विविध परिमाणें यांचें ज्ञान न देता, त्या ऐवजीं स्त्रियोपयुक्त अशी सुईदोऱ्याचीं कामें शिकविण्याचा ठराव होता. सरकारी तिजोरीची परिस्थिति समाधानकारक नसल्यानें सेगुंदक्लासाच्या शाळा न उघडतां प्रिमेर–क्लासाच्या शाळातूनच थोडा अभ्यासक्रम वाढवून १८८१ पर्यंतचा दहा वर्षांचा काळ काढण्यात आला.

**इ. स. १८८१** साली झालेला कायदा आजवरच्या साऱ्या कायद्यात विशेष व्यवस्थेशीर स्वरूपाच्या सुधारणा सुचविणारा होता. या कायद्यान्वयें गोमंतकाचे सहा शैक्षणिकविभाग पाडण्यांत येऊन प्रत्येक विभागांतील शाळांच्या संख्येइतके त्याचे पोटभाग पाडण्यांत आले होते. शाळेपासून दोन किलोमिटरच्या त्रिज्येंतील मुलांना सक्तीचा नियम लागू करून मुलांना शाळेंत न पाठविणाऱ्या पालकांना

शिक्षा ठेवण्यात आल्या. व या नियमाच्या अंमलबजावणीसाठीं शालेय मुलांची खानेसुमारी फर्माविण्यांत आली. खेरीज मुलांच्या अभ्यासक्रमांत, त्रैराशिक, प्रमाणगणीत, आरोग्यशास्त्र व पोर्तुगीजभाषेचें जरा विशेष ज्ञान, इतकी वाढ होऊन मुलींना, गृहोपयोगी अर्थशास्त्र, सूपशास्त्राची माहिती, रंगाचें भरतकाम, टेलरिंग इत्यादि विषय नवे ठेविले होते परंतु याच्या अंमलबजावणीला हवी असलेली साधनसामुग्री नसल्यामुळें हा कायदा पुस्तकांतच राहिला. फर्नीचरची थोडीशी सोय मात्र शाळांतून झाली

इ स. १८८२ सालीं नॉर्मलचा कोर्स सुधारण्यात आला नॉर्मल कोर्स काढल्याशिवाय शिक्षकाची जागा मिळू नये, असें १८७९ सालीच ठरलें होतें हा कोर्स पूर्वी प्रमाणेंच द्विवार्षिक होता पहिल्या वर्षी पोर्तुगीज व्याकरणाचें पूर्ण ज्ञान व निबंधलेखन, प्रमाणगणीत व त्याचे निरानिराळे उपयोग, वजने मापें, गोमंतक व पोर्तुगीज मुलुखाची भौगोलिक माहिती आणि जगाच्या भूगोलाची सामान्य माहिती; व शिक्षणशास्त्राचें सप्रयोग ज्ञान इतके विषय होते आणि दुसऱ्या वर्षांत प्रथम वर्षांतील विषयाशिवाय जगाच्या इतिहासाचें ज्ञान, कालमापन विद्या, चित्रकलेचें जरा विस्तृत ज्ञान व सप्रयोग शेतकी इतके विषय होते शिक्षणकलेच्या प्रयोगाकरितां पणजीच्या प्राथमिक शाळा नॉर्मल स्कुलास जोडण्यात आल्या.

**इ. स. १८९२ चें स्थित्यंतर** — या सालच्या सप्टेंबर महिन्यात प्राथमिक शिक्षणविषयक असा जो कायदा पास झाला, त्यांत शाळांसाठीं पाडलेल्या पूर्वीच्या सहा विभागाचे, क्षेत्रफळाच्या प्रमाणानें ११ विभाग ठरविण्यांत आले. अभ्यासक्रमांत छाटाछाट होऊन तो १८६९ च्या स्वरूपावर नेण्यात आला. परंतु या कायद्याचीही अंमलबजावणी झाली नाहीं. कारण त्याच सालीं त्या वेळचे मिनिस्टर फेरेर द आमाराल यानी शिक्षणाची पुनर्घटना केल्यामुळें त्याचीच सुधारणा इकडे अमलांत आली. या सुधारणांनी अभ्यासक्रम जवळजवळ १८६९ चाच ठेविला, तरी त्यात नागरिकांचीं कर्तव्ये व रेषाचित्रकला ह्यांचा समावेश झाला होता. आठ वर्षांनीं या अभ्यासक्रमात व्यायाम, सामुदायिक गायन व शेतकीचें ज्ञान, हे विषय पहिल्या क्लासांत आणि अर्थशास्त्राचे शेतकी व व्यापारोपयोगी नियम, पदार्थविज्ञान, रसायन व सृष्टिशास्त्र यांची मूलतत्वे व आरोग्यरक्षणाचें सामान्य ज्ञान, हे विषय दुसऱ्या क्लासात वाढविण्याचा अधिकार गव्हर्नरसाहेबांना दिला होता. मुलींच्या शाळांतूनही गृहोपयुक्त अर्थशास्त्र, आरोग्यशास्त्राचे नियम, ऑर्नामेंटल चित्रकलेचें शिवणकलेपुरतें ज्ञान, हिशेब व सृष्टिज्ञानाचे नियम हे विषय वाढवावयाचे होते. परंतु हा वाढावा देखील कागदातच राहिला.

शाळांच्या संख्येंतही बरीच भर पडली. त्यामुळें पहिल्या क्लासाच्या सरकारी शाळा ८६ होऊन मुलींसाठीं ८ शाळा झाल्या. त्याचप्रमाणे दुसऱ्या क्लासाच्या शाळा १४ करण्यात आल्या.

नॉर्मल स्कूलचा अभ्यासक्रम पूर्वीसारखा दोनच वर्षें राहिला व त्यांत अंकगणीताची संपूर्ण माहिती, नीतिनियम व ख्रिस्तीपुराणें, अर्थशास्त्राचें गृहोपयोगी व व्यवहारोपयी ज्ञान, हे विषय नवे घेण्यात आले. जगाच्या इतिहासाला काट मिळाला. तसेच आणखीही किरकोळ फेरफार झाले.

**इ. स. १९०७ मधील फेरफारः**—या सालीं प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थेंत बरेच फेरफार झाले. अभ्यासक्रम पूर्वीप्रमाणेंच दोन ग्रावांत ( डिग्रींत ) विभागला गेला. प्रिमैर ग्रावांत लेखनवाचन, गणिताचीं साधीं चार कृत्ये, दशांश अपूर्णांक, मेट्रिक सिस्टीम व देशी वजनेंमापें यांची सप्रयोग माहिती, साधा व्यायाम व उघडचा हवेंतील खेळ, देशी शेतीची सामान्य माहिती, रेषाचित्रकलेचीं मूलतत्वें, नीतिनियम व ख्रिस्त्यांसाठीं डॉक्ट्रिन, गृहोपयोगी अर्थशास्त्राचें सामान्य ज्ञान, संगीताचें व गायनाचें कांहींसें ज्ञान हे विषय असून, स्त्रीवर्गासाठीं सुईदोऱ्याचें काम विशेष असे. सेगुद ग्रावांत ह्या विषयांखेरीज, पोर्तुगीज व्याकरणाचें सामान्य व व्यावहारिक स्वरूपाचें ज्ञान, शेती, सृष्टिज्ञान, व्यवहारी अपूर्णांक व नेहेमींच्या व्यवहारांतील उदाहरणें, एकंदर पोर्तुगीज प्रांताचा भुगोलेतिहास, कालमापन, भूगोल खगोलाची सामान्य माहिती, राज्यपद्धतीचें ज्ञान, नागरिकाचीं कर्तव्यें व हक्क, रेषाचित्रकला, भूमितीच्या व्याख्या आणि साध्या जिनसांची नक्कल करण्यापुरतें चित्रकलेचें ज्ञान, इतके विषय येऊं लागले. अर्थात् गणितांत बराच काट बसला.

पूर्वी शाळांचे दोन वर्ग असत ते नष्ट होऊन साऱ्याच शाळा सेगुद ग्रावपर्यंत शिक्षण देणाऱ्या बनविल्या गेल्या. पूर्वीच्या प्रिमैर क्लासाच्या शाळांतील, नॉर्मलचें १ वर्षाचें सर्टिफिकीट घेतलेल्या शिक्षकांना आजूत हें नाव मिळालें व त्यांना पगारही इतरांपेक्षां पूर्वीप्रमाणें कमीच राहिला. संस्थांनीं स्थापलेल्या शाळाही सरकारनें आपल्या ताब्यात घेतल्या आणि त्यातील शिक्षकांचा पगार इतरांबरोबर करून, तो सरकारी तिजोरींतून द्यावयाची वहिवाट घातली. संस्थांतून जो पगार शिक्षकाना मिळे, त्याची रक्कम सरकारी तिजोरींत भरावयास लावून शालेय फंडांत ( Fundo Escolar ) जमा केली. स्त्रीशिक्षणाच्या शाळा पूर्वीप्रमाणेंच अजूनही स्वतंत्रच होत्या. शिवाय ज्या ठिकाणीं अशा स्वतंत्र शाळा नव्हत्या, त्या ठिकाणीं मुलांच्या शाळांतूनच मुलींचीही सोय करविली.

पूर्वी प्रिमैर ग्रावाच्या परीक्षा कोंसेल्याच्या ( तालुक्याच्या ) गावीं, तीन मेंबऱ्यांच्या ज्युरीसमोर लेखी व तोंडीं घेण्यांत येत होत्या. परिक्षकांत दोन शिक्षक व एक सरकारनियोजित प्रेसिडेंट असे. त्याऐवजीं आता त्या, प्रत्येक शाळेंत इन्स्पेक्टर, आदमिनिस्त्रादोर, किंवा देलेगाद लोकाल ( इन्स्पेक्टरचा बिनपगारी हस्तक ) यांच्या समोर स्वत. शिक्षकानेंच घ्यावयाचें ठरलें. पूर्वी शाळेंत येणाऱ्या मुलांनां, प्रवेश फी चार आणे व जातेवेळींची फी चार आणे द्यावी लागे, त्याऐवजीं आतां ती फक्त सेगुंद ग्रावाच्यास्च मुलांकडून घेण्यात येऊं लागली. प्रिमैर ग्रावाच्या परिक्षेस चार आणे व सेगुंद ग्रावाच्या परिक्षेस एक रुपया फी ठेवण्यांत येऊन ती शालेय फंडाच्या स्टांपच्या रूपानें वसूल होई.

**नॉर्मल स्कुलांतील फेरफार**—नॉर्मल स्कुलाचा कोर्स तीन वर्षांचा केला. आणि त्याचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणें आंखण्यांत आला.

१ पोर्तुगीज भाषा व वाङ्मय
२ फ्रेंच भाषा
३ अंकगणीत व साधी भूमिति ( Plana )
४ सृष्टिशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, आणि त्याचे शेतकी व आरोग्य यांच्याशीं संबंध.
५ शेतीचें प्रत्यक्ष ज्ञान
६ शेतीविषयक व व्यापारी जमाखर्च
७ नीतिशिक्षण, नागरिकांचे हक्क व कर्तव्यें, अर्थशास्त्राचें गृहोपयोगी ज्ञान व स्त्रियांसाठीं गृहिणीधर्म
८ खगोल विद्या, कालमापन, जगाचा भूगोलेतिहास
९ पोर्तुगाल व त्याच्या सत्तेखालच्या प्रदेशाचा भूगोलेतिहास
१० अक्षर, रेषाचित्रकला, ऑर्नमेंटल ड्राइंग व नकाशांच्या नकला.
११ आजारी मुलाना तात्पुरते उपचार ( फर्स्ट एड )
१२ शिक्षणपद्धतिशास्त्र, त्याचा इतिहास, प्रायोगिक शिक्षणकला व प्राथमिक शिक्षणाचें ज्ञान.
१३ व्यायाम
१४ संगीतशास्त्र व गायन
१५ स्त्रियाकरतां शिवणकला व विणकाम.

नॉर्मल स्कुलात प्रवेश मिळावयाला, लिसेवाच्या तिसऱ्या वर्षाचें सर्टिफिकिट आवश्यक ठरविलें होतें. परंतु ज्यांना हें सर्टिफिकिट नव्हतें, त्यांच्यासाठीं स्वतंत्र प्रवेशपरिक्षा ठेवण्यात आली होती. वरील अभ्यासक्रमावरून पाहता, नॉर्मल-कोर्साची सुधारणा बरीच झाल्याचें दिसून येतें. दुसऱ्या वर्षाचें सर्टिफिकिट आजूदाना ( असिस्टंटना ) आवश्यक ठेविलें होतें व संपूर्ण अभ्यासक्रम असलेल्यानाच रॅजेंत ( हेडमास्तर ) होतां येई

**हिंदूंना प्राथमिक प्रोफेसर होण्याची बंदी**:—ह्या कायद्यात असेंहि एक कलम होते कीं, प्राथमिक शिक्षणांत ख्रिस्ती डॉक्ट्रीन हा विषय असल्यामुळें, केवळ सरकारीधर्म पाळणाऱ्या इसमाना मात्र नॉर्मल शाळेंत प्रवेश मिळेल. हिंदुलोक पूर्वी प्राथमिक प्रोफेसर झालेच नव्हते. कारण, पोर्तुगीज शिक्षणाकडे त्याचा कल पूर्वीपासूनच एकंदरीत कमी होता. पण, ज्या कार्त कोंस्तितुसियोनालच्या पायावर सनदशीर राज्यपद्धति पोर्तुगालात स्थापन झाली होती, त्यांतील कलमात ‘ सरकारी नोकऱ्यांत पात्रता व गुण यांशिवाय दुसरी कोणतीच कसोटी लावण्यात येणार नाहीं’ असें स्पष्ट सांगितलें होतें. ( कलम १४३ पोट कलम १३ ) त्यामुळें हिंदुसमाजास उपरोक्त बंदी म्हणजे आपल्या कायदेशीर हक्कांवरील अतिक्रमणासारखीच वाटली. व त्यासाठीं पणजी येथें एक प्रचंड जाहीरसभा भरवून हिंदुसमाजानें सदर बंदीचा निषेध केला. तथापि राजसत्ता नष्ट होईतोंवर ही बंदी कायमच राहिली. पुढें रिपब्लिकची स्थापना होताच धर्म व राजकारण यांची फारकत झाली व त्याबरोबरच ख्रिस्ती डॉक्ट्रीन शिकविण्याचें इत पर कारण नसल्यामुळें ही अपमानकारक बंदीही गेली

**शालेय फंड** (Fundo Escolar) —ही १९०७ सालच्या सुधारणेंतील एक व्यवस्था अंमलांत आली. सेगुंद ग्रावाच्या प्रवेशफीचे पैसे, परिक्षेची फी, लिसेवची प्रवेशफी, पूर्वीचा शैक्षणिक कर, व यापूर्वी ज्या संस्थानीं आपल्या स्वतंत्र शाळा ठेविल्या होत्या, त्यांच्याकडून शिक्षकास मिळत असणाऱ्या पगाराची रक्कम, इत्यादि सर्व एकत्र करून त्याचा शालेय फंड नांवाचा एक फंड स्थापण्यात आला व त्यांतून, शाळागृहें बांधणें, संस्थातर्फे चालणाऱ्या शिक्षकांचा पगार, इत्यादि खर्च होऊं लागला. फंडाचा कारभार पूर्वी जमाबंदी खात्यातूनच चालत होता परंतु अलीकडे तो स्वतन्त्र बोर्डाकडून होत असतो.

**रिपब्लिकन अमदानींत**:—रिपब्लिकच्या अमदानींत साऱ्याच शिक्षणाची सुधारणा झाली आहे. शाळांची संख्या, शिक्षणपद्धतींत सुधारणा, शिक्षणोपयोगी

उपकरणें, इत्यादि सर्वच बाबतींत या १९ वर्षांत महत्त्वाचे फेरफार झाले आहेत. परंतु त्याचें विवेचन करण्यापूर्वी, दरम्यानच्या काळांत झालेल्या सरकारी उपक्रमाचा आढावा घेणें आम्हांला योग्य वाटतें. हा आढावा पुढें दिलेल्या कोष्टकावरून वाचकांना मिळेल.

## १९१० ते १९११ चें कोष्टक.

| कोंसेल्य | शाळा | | एकुण | प्रिमैरग्राव | | सेगुंदग्राव | | एकुणमुलें | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पु. | स्त्रि. | | दाखल | पास | दाखल | पास | दाखल | पास |
| तिसवाडी | १२ | ४ | १६ | १५०४ | १७० | ३४० | ८० | १८४४ | २५० |
| बारदेश | १८ | ६ | २४ | २००४ | १७५ | २२३ | ६७ | २२२७ | २४२ |
| सासष्ट | २१ | ४ | २५ | २४४४ | २८६ | ४६९ | १५२ | २९१३ | ४३८ |
| पेडणें | ३ | ० | ३ | ९९ | १६ | ३३ | १२ | १३२ | २८ |
| सांखळी | ३ | ० | ३ | २६७ | १८ | ४० | १५ | ३०७ | ३३ |
| सत्तर | १ | ० | १ | १३ | ४ | ४ | २ | १७ | ६ |
| फोंडें | ४ | ० | ४ | २५१ | १७ | ५६ | ११ | ३०७ | २८ |
| सांगें | १ | ० | १ | ६६ | ११ | ६ | १ | ७२ | १२ |
| केपें | २ | ० | २ | १७८ | ३१ | २२ | १४ | २०० | ४५ |
| काणकोण | ३ | ० | ३ | ४६ | १३ | १३ | ३ | ५९ | १६ |
| एकुण | ६८ | १४ | ८२ | ६८७२ | ७४१ | १२०६ | ३५७ | ८०७८ | १०९८ |

नॉर्मल स्कुलांत एकंदर २८ विद्यार्थी शिकत होते. प्रथम वर्षं १० मु. ७ मुली; द्वितिय वर्षं ९ मुलगे १ मुलगी व तृतीय वर्षः १ मुलगा अशी त्यांची वर्गवारी होती.

प्रारंभापासून हिंदूंची नजर या शाळेकडे फारशी वळली नव्हती. ख्रिस्तीधर्म-शिक्षणाचा त्यांत अंतर्भाव होत होता, हेंच त्याचें कारण असावें. १९०१ ते १९-०७ च्या दरम्यान सारे पांचच हिंदू या शाळेंत दाखल झाले होते, पण त्यांपैकीं केवळ दोघेच प्रथम वर्षी पसार झाले व त्या दोहोंतूनही एकटाच दुसऱ्या वर्षाचा अभ्यासक्रम पुरा करूं शकला.

१९१३ सालच्या एप्रिलांत पोर्तुगाल सरकारनें, पेडणें येथें ३, सांखळींत २, सत्तर प्रांतांत २, फोंडें १, सांगें ३, केपें ३ व काणकोण ३, अशा एकंदर १९ नव्या शाळा मंजूर केल्या. परंतु या शाळांपैकीं जागेच्या व मुलांच्या कायदेशीर संख्येच्या अभावीं १९१३–१९१४ सालीं केवळ १० च कायत्या उघडतां आल्या.

त्याशिवाय गव्हर्नर कौसेर दा कॉस्त यानीं जुन्या काबिजादींत १४ शाळा स्थापन करण्याचें ठरविलें. अर्थात् पोर्तुगीज शाळांची संख्या ३४ नीं वाढली. शिक्षण-क्रमांत मात्र मुळींच फरक झाला नाही.

**कायश द बेनेफिसेंसिय इस्कोलार**—इ. स. १९१७ सालीं प्रत्येक शाळेला जोडून वरील नावाची एक नवी संस्था उघडण्यांत आली. सद्गृहस्थांकडून मिळालेली मदत व मुलांकडून किंवा इतर सभासदांकडून आलेल्या वर्गण्यानीं ही शाळेची लहानशी दीनसाहाय्यक संस्था चालते. गरीब मुलाना पुस्तकें, पाट्या, कपडे, व ( शक्य तर ) जेवण देणें, शाळेंतील मुलाना सहल करावयाला नेणें, शाळेची लायब्ररी चालविणें, मुलांच्या हस्तकामाचें प्रदर्शन व शाळेचा वार्षिक उत्सव साजरा करणें, इत्यादि कामें या संस्थेतर्फे होतात. वर्गणीदार दोन प्रकारचे आहेत. शाळेंतील मुलें कायम सभासदवर्गांचीं असून त्याना किमान वर्गणी मासिक अर्धा आणा व इतर सद्गृहस्थ साहाय्यक सभासद-वर्गांत मोडत असून, त्यांना किमान वर्गणी मासिक २ आणे ठरविली आहे. आद-मिनिस्त्रादोर किंवा रॅजिदोर हा संस्थेचा अध्यक्ष असतो, व नियामकमंडळ सभासदांनी निवडावयाचें असतें मात्र उपाध्यक्षाची जागा शिक्षकापैकी एकाला मिळावी असा कायदा आहे. ह्या सोयीमुळें एक्सकर्शनें बरीच सोपीं होऊन दरसाल प्रत्येक शाळा एखाद्या प्रसिद्ध ठिकाणीं मुलांना नेऊं शकते.

**प्रांतिक कायदेकौन्सिलची योजनाः**—इ. स. १९२० साली, गव्हर्नर ज्याइम द मोराइश यानी प्रांतिक कायदेकौन्सिलांत एक महत्त्वाचें बिल पास करून घेऊन पोर्तुगाल सरकारच्या समंतीसाठी पाठविलें होतें. ह्या बिलानें गोव्यातील साऱ्याच शिक्षणात सुधारणा होणार होती परंतु पोर्तुगाल सरकारनें हा कायदा पास केला नाहीं. मात्र प्राथमिक शिक्षणात व नॉर्मल स्कुलात त्यातील हस्तकामाचा समावेश केला व डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन ही जागा तेवढी भरून पाठविली. बाकी सुधारणा जशाच्या तशाच राहिल्या

**१९१० पासून १९२० चा आढावाः**-रिपब्लिक स्थापन झाल्यापासूनच्या या दहा वर्षांच्या कालावधींत प्राथमिक शिक्षणाची जी प्रगति झाली, तिचें सिंहा-वलोकन केल्याशिवाय पुढें जाणें योग्य होणार नाहीं.

| कॉंसेल्य | प्रिमैर ग्राव | | सेगुंद ग्रांव | | एकूण संख्या | | शाळा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दाखल | पास | दाखल | पास | दाखल | पास | . |
| तिसवाडी | १४३० | १८६ | ३३५ | १०९ | १७६५ | २९५ | २१ |
| बारदेश | २९१९ | ४३३ | ११६ | ८५ | ३०३५ | ५१८ | ३४ |
| सासष्ट | २१५६ | ३१६ | ५२३ | १८३ | २६७९ | ४९९ | ३२ |
| मुरगाव | ४२५ | ५३ | ७१ | ३३ | ४९६ | ८६ | ५ |
| पेडणें | १२० | १० | १६ | ८ | १३६ | १८ | ४ |
| साखळी | २६१ | ३१ | ४२ | ९ | ३०३ | ४० | ५ |
| सत्तर | ४१ | ३ | १३ | २ | ५४ | ५ | २ |
| फोंडें | २२० | ३० | ५५ | १९ | २७५ | ४९ | ६ |
| सांगें | ५ | ३ | १४ | १ | १९ | ४ | १ |
| केपें | १२७ | २६ | ३४ | ९ | १६१ | ३५ | ३ |
| काणकोण | ९९ | १३ | १८ | ५ | ११७ | १८ | ३ |
| एकूण | ७८०३ | ११०४ | १२३७ | ४६३ | ९०४० | १५६७ | ११६ |

रिपब्लिकच्या दहा वर्षांत शाळांची संख्या ३४ नीं वाढली, शिकणाऱ्या मुलांची सख्या ९६२ नीं व पास मुलांची सख्या ४७९ नीं वाढल्या, मागें दिलेल्या उभय कोष्टकांवरून असें दिसून येतें

एकंदर दहा वर्षांत नॉर्मल स्कुलांतून झालेली वाढ खालीलप्रमाणें आहे

| वर्ष | हजीरी | | पैकीं हिंदू | | पास | | पैकी हिंदू |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पु. | स्त्रि. | पु. | स्त्रि. | पु. | स्त्रि. | |
| प्रथम वर्ष | १८० | १३९ | ६६ | ... | | | |
| द्वितिय वर्ष | १२५ | ८५ | ४१ | . | | | |
| तृतीय वर्ष | १६१ | १०३ | ४४ | | ७१ | ३२ | १५ |

प्राथमिक शाळांच्या कोष्टकांतून हिंदू निराळे दाखवितां आले नाहींत. ह्या शाळांखेरीज मुळच्या ज्या पारोकियाल शाळा पूर्वीप्रमाणेंच चालत आहेत, त्यांची संख्या सुमारें १०८ आहे. त्या शाळांत रोमन लिपींतून लेखन वाचन, संगीत आणि सामुदायिक गायन, एवढेंच शिकवितात. सामान्यतः प्रत्येक शाळेंत ४० ते

६० मुलें असतात. म्हणजे एकंदरींत ५४०० मुलें या शाळांतून साक्षर होतात. पण पुढें यांपैकीं निम्मी मुलें सरकारी शाळांतून शिकावयास जात असल्यानें, सुमारें अडीच हजार मुलांना या शाळाचा खरा फायदा मिळतो.

**प्राथमिक शिक्षणाचा खर्च मुलांवर किती पडतो:**—इ. स. १९०७ च्या सुधारणेपूर्वीची हकीकत मागें आलीच आहे. म्हणजे प्राथमिक कोर्स पाच वर्षांचा धरल्यास, ह्या पाच वर्षांत सव्वा रुपया प्रवेश फीबद्दल, सेगुंद ग्रावाच्या परिक्षेस जातांना हजीरी बुकावर शेवटचा शेरा घ्यावयाचा त्याला चार आणे व उभय परिक्षाच्या सर्टिफिकिटाचा एक रुपया, एकून पूर्वी दर मुलास सेगुंद ग्रावपर्यंत शिक्षण मिळवायला अडीच रुपये बसत. १९०७ सालापासून १९२४ पर्यंत, पहिल्या चार क्लासांत (प्रिमेर ग्रावपर्यंत चार पुस्तकें) प्रवेश फी नव्हती, सेगुंद ग्रावाची प्रवेश फी चार आणे व शेवटचा शेरा ४ आणे मिळून आठ आणे; प्रिमेर ग्रावाच्या परिक्षेची फी ४ आणे, सेगुंद ग्रावाच्या परिक्षेची फी (१९१२ पूर्वी एक रुपया व पुढें रेसाचा दर वाढून रु. ४०० रेसांऐवजीं ३५० रेंस ठरल्यानें) १८२८४ व सेगुंद ग्रावाच्या सर्टिफिकीटास सुमारें १२ आणे मिळून २८६८४ खर्च साऱ्या प्राथमिक शिक्षणक्रमास येई. वर्ग बदलावयाच्या वेळीं प्रत्येक क्लासाच्या ज्या परीक्षा होतात, त्याच्या सर्टिफिकिटाला ४ आणे प्रमाणें एकंदर पांच क्लासांना सव्वा रुपया, सेगुंद ग्रावाची प्रवेश फी ६ आणे व निर्गत फी ६ आणे, एवढा खर्च १९२४ सालीं नवा आल्यानें आतां सुमारें पावणे पांच रुपयात प्राथमिक पोर्तुगीज कोर्स होतो मग त्यात मुलानें कितीही वर्षें घालविलीं तरी फींत वाढ होत नसते

**प्राथमिक शिक्षणावरील देखरेख**—मागें सांगितल्याप्रमाणें प्राथमिक शिक्षण सरकारच्या हातीं १९३६ सालीं गेलें. प्रारंभीं शाळांची तपासणी मिलिटरी अम्मलदाराकडेच होती. पुढें १८४१ सालीं त्यासाठीं तपासणी कमीशनें (Corpos Inspectores) नावाचीं मंडळें उत्पन्न करण्यात आलीं. या मंडळांत, कोंसेल्याचे आदमिनिस्त्रादोर, म्युनिसिपालिटीचा मुखत्यार, कोमुनदादींनीं निवडलेले दोन सभासद व प्राथमिक शिक्षकांपैकीं एक शिक्षक, मिळून पांच सभासद असत. शाळेंत शिक्षक योग्य वेळीं येतात कीं, नाहीं, तें गांवच्या रॅजिदोरानें त्रैमासिक सर्टिफिकिटाच्या द्वारें सांगावयाचा परिपाठ होता. इ. स. १८६९ सालीं सार्वजनिक शिक्षणतपासणीमंडळाची स्थापना झाली. पण या मंडळाची कार्यपद्धति कायद्यानें ठरविली गेली नव्हती. हें मंडळ शिफारसी करी व त्या शिफा-

रसीवरून स्थानिक तपासणीमंडळें गव्हर्नर नेमी. फार अंतरावर असलेल्या शाळांची तपासणी स्थानिक मंडळें आपल्या प्रतिनिधींकडून करीत असत. इ. स. १८८१ सालीं, सार्वजनिक शिक्षणतपासणीमंडळाचें काम कायद्यानें नियमबद्ध झालें. आणि पुढें १८८४ त पहिल्यानेंच इन्स्पेक्टरचा हुद्दा निर्माण करण्यांत येऊन, गोव्यातर्फेचे पार्लमेंटचे सभासद, फ्रांसीस्कु लुइझ गोमिश् याची त्या जागीं नेमणूक झाली. परंतु सिन्योर गोमिश् हे ह्या हुद्याचा चार्ज घ्यावयास आपल्या मातृभूमीस येताना वाटेंतच त्यांचें निधन झाल्यामुळें ही योजना तशीच राहिली. नंतर १८९२ सालीं प्रत्येक शिक्षणक्रमावर तपासणीची स्वतंत्र योजना झाली व प्राथमिक शिक्षणाच्या इन्स्पेक्टरच्या जागीं मडगांवचे रहिवासी, सुप्रसिद्ध बेर्नार्दु फ्रांसीस्कु दा कोस्त, पार्लमेंटचेच गोव्यातर्फेचे देपुताद ( सभासद ) हे नेमून आले. यांनीं आपल्या तीनच वर्षांच्या कारकिर्दीत शाळांची पुष्कळ सुधारणा केली. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें, १८९५ च्या बडात त्यांच्यावर सरकारची इतराजी होऊन त्यांना दीव येथें हद्दपार करण्यांत आलें. तेथेंच ते निधन पावल्यामुळें, पुढें हा हुद्दा तोमाझ मौरांव, बारांव द कुंभारजुव या गृहस्थाकडे गेला. त्यांच्या निधनानंतर १९०४ सालीं ही जागाच काढून टाकून प्राथमिक शाळांची तपासणी कोमिसार्यु सुपेरियोर दुज इस्तुदुश या नात्यानें सरकारचे जनरल सेक्रेटरी यांनींच करावी असें ठरविण्यांत आलें. १९०७ सालीं पुन इन्स्पेक्टरची जागा भरण्यांत आली. आणि तूर्त ह्या जागीं, सिं. मानुयेल आतूनिज् द आमोर नांवाचे लिपझिग येथें शिक्षण घेतलेले युरोपियन आहेत. त्यांना आतां 'प्राथमिक शिक्षणाचे चीफ' असे सरकारी संबोधन आहे. मध्यंतरी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन हा हुद्दा इकडे निर्माण करण्यात आला,तेव्हा त्याच्या हाताखालीं दोन सब-इन्स्पेक्टर काम करीत व आमोर यांना दप्तरखान्यावर ठेविलें होतें तूर्त आमोर रजेवर गेले असल्यानें त्यांचें काम नॉर्मलचे "डायरेक्टर पाहतात.

**तपासणांची पद्धति** —दरसाल एकदांतरी प्रत्येक शाळा इन्स्पेक्टरनें तपासलीच पाहिजे. त्यांचा शेरा शिक्षकांना प्रतिकूल असला, तर त्यावर शिक्षण-बोर्डाकडे अपील करण्याचा हक्क शिक्षकांनां आहे. तसें अपील न झाल्यास शेऱ्यांत नमूद केलेल्या उणीवा काढून टाकल्या आहेत की नाहीं, तें पाहण्यासाठीं दुसरी तपासणी करावी लागते व लागोपाठ ४ तपासण्यांतून न सुधरणारा शिक्षक कायम नेमणुकीचा असल्यास, गव्हर्नरकडून त्याची बदली करण्यात येते आणि तात्पुरता प्रोबेशनर असल्यास काढून टाकण्यांत येतें.

**शिक्षकांचा दर्जा व आर्थिक स्थिति**—सुरुवातीच्या काळात शिक्षकाचें काम पाद्र्याच्याच हातून होई व त्याबद्दल त्यांना निराळें वेतन लागत नसे. आणि पुढेंदेखील इतर शिक्षकांना मिळत असलेल्या पगाराच्या निंमे वेतन घेऊन पाद्री शिक्षकाचें काम करीत. त्याचप्रमाणें सरकारी दुभाषांकडूनहि शिक्षकाचें काम घेण्यात येत होतें. इ. स. १८०० सालीं, गोवें शहरांतील व पणजीच्या प्राथमिक शिक्षकाना सालिना ३०० असर्फ्या (१५० रु.) वेतन होतें आणि म्हापशें व मडगाव येथील शिक्षक सालिना २०० असर्फ्यांवरच काम करीत. इ.स. १८३१ त जुन्या काबिजादींतील शिक्षकांस ६०० असर्फ्या व नव्या काबिजादींत ३०० असर्फ्या सालिना पगार मिळे.

मध्यंतरींही पगारात बरीच घडामोड झाली असावी, परंतु तिची नीटशी माहिती मिळाली नाही.

इसवी सन १९०२ सालीं सेगुंद क्लासाच्या शिक्षकाना सालिना ३६८८५८ (म्हणजे ३०८११६१ दरमहा) व प्रिमैर क्लासाच्या शिक्षकांना २२७८१२८ (म्हणजे दरमहा १८८१५८८) मिळत असत. आणि ह्या पगारावर दर पाच वर्षांनीं एक तृतियांशाची बढती दोनदा मिळे. आणि पचवीस वर्षें नोकरी भरताच भर पेन्शन मिळे (पोर्तुगीज राजवटींत पेन्शन पगाराइतकेंच असतें). १९०३ सालापासून गोव्याचें अंदाजपत्रक पोर्तुगालमधून तेथील नाण्यातून तयार होऊन येऊं लागून त्यात रुपयास चारशे रैसाप्रमाणें वरीलच पगार आकारण्यात आला. परंतु वर सांगितलेली पगारवाढ काढून टाकून त्याऐवजीं प्रोफेसरच्या नोकरीच्या मुदतीप्रमाणें, पगाराच्या बाबतींत त्यांचे तीन वर्ग पाडण्यांत आले. शेवटच्या तिसऱ्या वर्गांतून दुसऱ्या वर्गांत प्रवेश मिळावयाला ८ वर्षें नोकरी करावी लागे व दुसऱ्या वर्गांतून पहिल्या वर्गांत प्रवेश ४ वर्षांनीं होई.

मासिक पगाराचें स्केल खालीलप्रमाणें होतें.

| | प्रिमैर ग्रावाचे शिक्षक | सेगुंद ग्रावाचे. |
|---|---|---|
| तिसरा वर्ग | २५८. | ३५ |
| दुसरा वर्ग | २८॥ | ३९ |
| पहिला वर्ग | ३७॥ | ४७॥ |

१९१३ सालीं रैसांचा भाव रु. ४०० ऐवजीं ३५० केल्यामुळें ह्या पगारांत साहजिकच थोडीशी वाढ झाली. आणि त्यांना खालील स्केलानें पगार मिळू लागला.

| | आज्युंत ( असिस्टंट ) | रॅजेंत ( हेड मास्तर ) |
|---|---|---|
| तिसरा वर्ग | २८॥- | ४०८-८. |
| दुसरा वर्ग | ३२॥- | ४४॥-८ |
| पहिला वर्ग | ४२॥|- | ५४। |

पगारातून पेन्शनफंडाला शेंकडा पाच टक्के कापून घेण्याची पद्धति पूर्वी-पासून होती त्यामुळें ह्या सान्या पगारात तेवढा काट होई.

१९१७ साली रॅजेंत व आज्युत याच्या पगारांतील फरक काढून सर्वांना एकाच स्केलानें पगार मिळू लागला. आणि स्केलातही वदल होऊन वर्गांची प्रमो-शनें सहा सहा वर्षांनीं होऊं लागली. त्यात तिसरा वर्ग ४०८६८, दुसरा वर्ग ५०८१३८ व पहिला वर्ग ६०८६८ असा दरमहा ठरला. पेन्शनफंड शेंकडा पांच टक्के कापून घेण्यात येतच होता.

इ. स. १९२२ साली महायुद्धामुळें नाण्याची किंमत उतरून सान्याच नोकर-वर्गांचे हाल होऊं लागले, तेव्हां सरसि झालेल्या पगारवाढींत तिसरा वर्ग ५९८८८, दुसरा वर्ग ७४८३८, व पहिला वर्ग ८५८११८ असा मासिक पगार मिळत आहे. यांतून शेकडा पांच टक्के पेन्शनफंड व दोन टक्के इन्कमटॅक्स कापला जातो

प्राथमिक शिक्षकाना प्रोफेसर ही संज्ञा असून त्याना ज्या ज्या वेळीं सरकारां-तून प्रवास खर्च मिळतो, त्या त्या वेळीं तो रेल्वेंतून सेकंड क्लासचा व आगबोटीत फर्स्ट क्लासचा असतो. शिवाय राहावयास घर सरकार देते. घरें देता न आल्यास घरभाडे देण्याची जबाबदारी म्युनिसिपालिटीवर असते शेवटच्या कायद्याप्रमाण ह्या भाड्याचे दर पणजी व वास्को शहरांतून मासिक ३० रुपये, मडगांव व म्हापशें शहरांत मासिक २० रुपये, आणि इतर ठिकाणी दहा रुपये ठरले असून, शिक्षकांना घरें नसलेल्या ठिकाणीं तें मिळत असतें.

**सहशिक्षणाचा उपक्रम व त्याचे परिणाम**:—१९०७ सालापूर्वी मुलींच्या स्वतंत्र शाळा नसणाऱ्या गांवी त्याना मुलाच्याच शाळेंत घेण्यात येत होत, असं आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे. अशा शाळाना सहशिक्षणाच्या शाळा ( Escolas mixtas ) हें नांव मिळून त्यावर नेमण्यांत येणाऱ्या शिक्षकात प्राधान्येंकरून स्त्रीशिक्षकाचीच नेमणूक व्हावयाचें ठरलें. ह्याच सहशिक्षणाचा

उपक्रम होय. फ्रान्स, जर्मनी, इत्यादि प्रगत देशांतून बाल विद्यालयें असतात व त्यांतून स्त्रीशिक्षकांची नेमणूक होत असते, तिचा हा प्रतिध्वनि होता. परंतु त्यादेशांत शिक्षण मातृभाषेंतून चालत असून, प्राथमिक शाळांतील मुलाचें वय १० च्या आंतच असतें आणि तेथील सामाजिक व्यवस्था इकडच्यापेक्षा पुष्कळच भिन्न असून स्त्रियांना त्या समाजात इकडच्या ख्रिस्तीसमाजापेक्षांही पुष्कळच स्वातंत्र्य असतें. स्त्रीशिक्षणाचा प्रसार इकडे फारसा झाला नसल्यानें, साहजिकच असें होऊं लागलें आहे कीं, नॉर्मल स्कुलातून उत्तीर्ण होणाऱ्या स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा, पुरुष विद्यार्थ्यांपेक्षां नेहेमींच कमी असतो. याला अर्थात्‌च अपवाद आहेत पण ते अगदींच थोडे आहेत आणि उपरोक्त प्राधान्यामुळें, लायक पुरुष उमेदवारांना मागें जावें लागून, अशा स्त्रीउमेदवारांना जागा मिळू लागल्या शाळेंत येणाऱ्या मुलाचें वय ६ पासून वीसपर्यंत असतें. त्यांत मुलगेही असतात व मुलीही असतात. अर्थात् त्यामुळें शिस्तींत थोडासा ढिला-ईचा भाग दिसणें अपरिहार्य झालें. त्याचप्रमाणें, प्राथमिक शिक्षण परभाषेंतून व तेंही कमी लायकीच्या स्त्रीशिक्षकाकडून मिळावें लागल्यानें, शिक्षणाचें काम जरा असमाधानकारकच होऊं लागलें परंतु युरोपियन समाजाचें व त्यांतील एकदर सुधारणांचें कलम या समाजावर करूं पाहणाऱ्या व्यक्तींचेच प्राधान्य सार्वजनिक शिक्षणबोर्डांत असल्यामुळें, हीच योजना पुढें चालली व १९२१ सालीं गोमंतकातील साऱ्याच शाळा मिश्र बनून, झालेल्या विरोधास न जुमानतां प्राथमिक शिक्षणांत सहशिक्षणाचें तत्व सर्वसामान्य करण्यात आलें अर्थात्‌च जुन्या योजनेप्रमाणें असलेलीं स्वतंत्र गर्लस्कुलें नाहींशीं होऊन, त्यांतील शिक्षकिणी पुरुष शिक्षकांसह एकाच शाळेंतून आज शिक्षण देत आहेत. वरवर पाहिल्यास शाळांची संख्या कमी झाल्यासारखी दिसते खरी. परंतु शिक्षकांची संख्या वाढल्यानें ती लक्ष्यांत घेतां येत नाहीं. नेमणुकांच्या बाबतींत, आजला तरी स्त्रियांचीच बहुसंख्या असण्याजोगा कायदा आहे. शिक्षणाचा दर्जा अर्थात्‌च त्या मानाचाच आहे. नैतिक बाबतींतही काहीं अनिष्ट उदाहरणें या सात वर्षांच्या अवधींत दिसून आलीं आहेत. परंतु एकदर ९४ शाळांतून ९४ पुरुष शिक्षक व ५४ स्त्री शिक्षक मिळून १५२ प्रोफेसर ९२३१ मुलांमुलींना शिक्षण देतात, त्यात हीं उदाहरणें विशेष लक्ष्यांत घेण्याइतकीं आहेत असें वाटत नाहीं. लूतं अमलांत असलेल्या कायद्यानें शाळेंत एकच जागा असली, तर ती लिंगभेदाचा विचार न करता, गुणानुक्रमानें लायक अशा उमेदवाराला मिळते. आणि पुढच्या जागा आळीपाळीनें

वाटण्यात येतात. म्हणजे पहिली जागा स्त्रियाना मिळाल्यास दुसरी, चौथी अशा पुरुषाना मिळून तिसरी, पांचवी अशा स्त्रियांना मिळतात.

**शाळेचे दिवस, वेळपत्रक व शिक्षकः**—शाळा १० जूनला उघडते व १५ जूनपर्यंत नावें रजिस्टर करायची मुदत असल्यानें, १६ जूनला वर्ग सुरू होऊन १५ मार्चला बंद होतात. दरम्यान रविवार व गुरुवार अशा दोन सुट्या दर आठवड्यास असतात. रिपब्लिकच्या स्थापनेची ५ आक्टोबरची सुट्टी, ६ आक्टोबर ते २५ पर्यंत आक्टोबर व्हेकेशन्स, स्वातंत्र्य दिनोत्सवानिमित्य (स्पेनच्या कचाटीतून पोर्तुगाल सुटलेला दिवस) डिसेंबरची पहिली तारीख २४ डिसेंबर ते ६ जानेवारीपर्यंत नाताळची रजा, रिपब्लिकच्या हुतात्म्याप्रीत्यर्थची ३१ जानेवारीची रजा, प्रत्येक म्युनिसिपालिटीनें ठरविलेली एक दिवसाची रजा (ही प्रत्येक कोसेल्यात निरनिराळी असू शकते) आणि ख्रिस्ती शिमग्याचे चार दिवस अशा रजा असतात. म्हणजे एकदरींत शाळेचे दिवस वर्षातून १६५ ते १७० पर्यंत असतात. १६ मार्च ते तीस मार्चपर्यंत प्रिमैर ग्रावाच्या व एप्रिल महिन्यांत सेगुंद ग्रावाच्या परीक्षा असतात आणि त्यांतून शिक्षकाना काम करावें लागत असतें, त्यामुळें मेचा सारा महिना व जूनचे ९ दिवस अशी ४० दिवसांचीच खरी सुट्टी त्यांना मे व्हेकेशन मध्यें मिळते शाळा सकाळीं नऊ ते बारा व संध्याकाळा तीन ते पांच अशी दुवक्ता मिळून पांच तास असते. मध्यें प्रत्येक तासानतर दहा मिनिटांची सुट्टी मिळते

ज्या शाळांतून मुलांची रोजची सरासरी पन्नासाच्या खाली असते, तेथें एकाच शिक्षकानें पाचही वर्ग चालवावयाचे (!) असतात. पन्नास ते साठाच्या दरम्यान संख्या असली, तर देखील एकाच शिक्षकाला काम करावें लागतें. मात्र मुलाचे दोन गट पाडून सकाळीं तीन तास व संध्याकाळीं तीन तास असें सहा तास काम शिक्षकाला करावें लागतें. ही सरासरी साठांच्या वर गेल्यास दोन शिक्षक, १०० च्या वर ३ अशा प्रमाणानें पुढें शिक्षकांची संख्या वाढते.

**तूर्तची मुलांची संख्या वगैरे.**—१९२७–१९२८ च्या शैक्षणिक सालीं, गोव्यात सरकारी प्राथमिक शाळा ९४ होत्या व त्यातून १५२ शिक्षक ९२३१ मुलांमुलींना शिक्षण देत होते. पैकीं १०२९ मुलें प्रिमैर ग्राव पास झालीं होतीं व ५९६ मुलें सेगुंद ग्रावाच्या परिक्षेंत उत्तीर्ण झाली होती. शिकणाऱ्या मुलातून

७९९४ ख्रिस्ती, १०२९ हिंदु ९३ मुसलमान होते. ह्या नंबरांकडे पाहातां, हिंदु मुलाची संख्या पोर्तुगीज शाळातून बरीच कमी दिसते. हिंदूतील अभिजातवर्ग खेरीज केल्यास इतर समाज या शिक्षणाकडे वळलेला नाहीं. कारण त्याला पुढील शिक्षण मिळावयाचें नसतें व व्यवहारोपयोगी कामांत मराठी शिक्षणानें विशेष मदत मिळते. परंतु याखेरीज दुसरें कारण असें आहे कीं, हिंदुवस्तीच्या नवीन काबिजादींत पोर्तुगीज शाळांची व शिक्षकांची संख्या अगदींच तुटपुंजी आहे. व याची जबाबदारी सरकारवरच येते.

नव्या काबिजादींतील १९१२०७ लोकसंख्येकरितां पोर्तुगीज शाळा केवळ २० च असून त्यातून २२ शिक्षक काम करीत होते. म्हणजे दर ८६९१, लोकाना एक शिक्षक वांटणीस येतो. आणि क्षेत्रफळाच्या मानानें पाहिल्यास २६८६ चौरस किलोमीटर जागेंतून हे २२ शिक्षक काम करीत असल्यानें, दर १२२ चौरस किलोमीटर ( ४७ चौ. मै. ) नां एक शिक्षक पडतो.

पण हीच जुन्या काबिजादींची स्थिति पाहिल्यास, २७८२८७ लोकांना १३० शिक्षक शिक्षण देतात. म्हणजे दर २१४० माणसाना एक शिक्षक वाटणीस येतो. क्षेत्रफळाच्या मानानें पाहता, ६४१ चौरस किलोमीटर जागेंतून हे शिक्षक विभागले तर दर ४ ९ चौरस किलोमीटरनां एक शिक्षक पडतो.

अर्थात नव्या काबिजादींत सरकारनें शिक्षणाची तरतूद अगदींच तुटपुंजी केली असल्यानें हजीरींत असा फरक पडतो.

प्रकरण सहावें

# विभाग दुसरा

## दुय्यम शिक्षणाची व्यवस्था.

**अव्वल पोर्तुगीज अंमलांत** —पोर्तुगीजाच्या आगमनकाळीं प्राथमिक शिक्षणाप्रमाणेंच दुय्यम शिक्षणदेखील त्यांनी धर्माध्यक्षाच्याच ताब्यांत दिलें होतें त्यास अनुसरून इ. स. १५४१ त पाद्रि बोर्ब व ख्रिस्तीतराच्या छळात प्रामुख्यानें भाग घेणारा पाद्रि मिगेल व्हास या उभयतानीं " कानडी, ' उत्तरेंतील दक्षिणी' (!), मलबारी, सिंहली, बंगाली, पेगू, मलायी, जावानीज, चिनी, हबशी, इत्यादि लोकांच्या मुलाना साक्षर बनवून सुसंस्कृत करण्यासाठी " सेमिनार्यु द सांत फॅ नांवाची शिक्षण संस्था उभारली तींतून निघालेल्या विद्यार्थ्यांनीं पुढें ' आपापल्या देशांत जाऊन देशबांधवांत ख्रिस्ती पवित्रशास्त्राचा प्रसार करावयाचा ', हेतु ही सेमिनार्यु स्थापन करण्यांत प्रमुख होता. म्हणजे ही शाळा केवळ मिशनरी व धर्मप्रसारक तयार करण्यासाठींच उत्पन्न झाली होती. या शाळेच्या स्थापनेनंतर दोनच महिन्यांनीं त्या वेळचे व्हॅदोर दा फाझेंद, कास्तेल ब्राकु हे ॲक्टिंग गव्हर्नरच्या जागीं असतांना, तिसवाडींतील भग्न देवालयांच्या उत्पन्नाच्या हिशेबीं, मागें जुलुमाच्या जंत्रींत सांगितल्याप्रमाणें ७६८ असर्फ्यांचा कर ग्रामसंस्थावर बसविला व तो या शाळेला बहाल केला.

युरोपांत लॅयोला यानें जेसुइट कंपनी याच वेळीं, स्थापन केली होती. ल्युथरनें उत्पन्न केलेल्या धर्मक्रांतीचें उच्चाटण करणें, हाच या कंपनीचा हेतु होता, ही गोष्ट इतिहासात प्रसिद्धच आहे. जेसुइटाचें शिक्षण म्हणजे क्याथॉलिक कंद्रानुसारी होतें. क्याथॉलिक धर्मतत्त्वाना ज्या शिक्षणानें बाधा येईल तें, ज्ञान या संज्ञेला पात्रच नव्हतें हेंच त्यांचे मुख्य तत्त्व होतें. त्याचीं धर्मप्रसाराचीं साधनें इतकीं व्यापक होतीं कीं, त्यांतून बाल, तरुण, किंवा वृद्ध यापैकीं कोणताच वर्ग सुटला नव्हता. कातेकीस्त ( धर्मांचा शिक्षक ) बनून ते लहान मुलांना प्रार्थना वगैरे शिकवीत, मोठ्या माणसांसाठीं त्यांनीं व्यासपीठाचा आधार घेतला होता; आबालवृद्ध, रोगी, तरुण इत्यादि सर्व समाजासाठी कोंफेसियोनार्यु ( पातकोच्चाराची जागा ) तर त्यांच्याच हातीं होती; बेवारसी अर्भकांसाठीं अनाथ बालकाश्रम, पतीत स्त्रियांसाठीं वनिताश्रम, इत्यादि संस्था स्थापन करून हे जेसुइट लोक

म्हणजे ' सर्वांसाठीं सर्व करून ' संपूर्ण लोकसमूह आपल्या कबजांत घ्यावयालाच अवतीर्ण झाले होते. ग्रीक व रोमन ज्ञानाच्या पुनरुज्जीवनाची जी लाट सतराव्या शतकात उत्पन्न झाली होती, तिच्याशीं स्पर्धा करण्यासाठीं जेसुइटांनीही आपल्या शिक्षण संस्था उत्पन्न केल्या.

वर सांगितलेली सेमिनार्यु स्थापन होतांच कांहीं महिन्यानतर फ्रान्सिस झेवियर हा अत्यंत कर्तबगार जेसुइट पाद्री गोव्यात आला. पाद्रि बोर्व व व्हाम हे दिवंगत होताच या फ्रान्सिस झेवियरनें त्याची सेमिनार्यु कपनीच्या नांवें आपल्या ताब्यांत घेतली गव्हर्नरनेंही या फेरबदलास समति दिली. कंपनीसाठीं एक व सां पाव्लच्या कॉलेजसाठीं एक, अशा दोन इमारतीहि लागलीच बांधल्या गेल्या कॉलेजांतून धर्माध्यक्षांच्या शिक्षणाची सोय केली होती. पुढें राजे दोंजुवाव ३ रे याच्या हुकुमावरून तेथें, ल्याटिन, तत्त्वज्ञान व नीतितत्त्वें याचें शिक्षण मिळू लागलें. काही काळानें थिऑलॉजीहि ( ईश्वरविषयक ज्ञान ) शिकविण्यांत येऊं लागली. उत्तरोत्तर हें कॉलेज इतके वाढलें कीं, त्याच्या पुढें सेमिनार्यु फिकी पडली. या सां पाव्लच्या कॉलेजात आलेला छापखाना हाच गोमातकांत स्थापन झालेला पहिला होय. दुय्यम शिक्षणाची व्यवस्था सारें अठरावे शतकपर्यंन्त याच प्रकारे चालली होती. सतराव्या शतकाच्या पहिल्या दशकात ( Pyrard Laval ) पीरार्द लाव्हाल हा प्रख्यात् फ्रेंच प्रवासी गोमंतकांत पोंचला होता. त्या वेळीं या कॉलेजांत त्यानें तीन हजारांपेक्षाही जास्त विद्यार्थी पाहिले होते. पण पुढें थोड्याच काळानें ही संपन्न स्थिति जाऊन कॉलेज डबघाईस आलें व जुन्या गोव्यात माजलेल्या सांथींचा धक्का त्याला बाधून गोवें शहरातील रोझार्यु नांवाच्या टेंकडीवर त्याची बदली झाल्यामुळें यापुढे कॉलेजला सा पाव्लु नोव्हु हें नाव मिळालें. या बदलीमुळें नंतर सुमारें तीस वर्षेपर्यन्त जेसुइट व आगुस्तीन्यपंथीय पाद्रींच्या कटकटी चालल्या होत्या.

**सासष्ट प्रांतांतील योजना**—इ. स. १५६० त जेसुइटानीं सासष्ट प्रातात प्रवेश केला व रायतुरच्या प्रसिद्ध किल्लेदार बहादूर दियोग रद्रीग याच्या शतकृत्याबद्दल देवळाचें जें उत्पन्न इ स. १५७२ त त्याच्या विधवेला मिळालें होतें, त्याचें दानपत्र जेसुइटानीं आपल्या कपनीच्या नांवें करून घेतलें. दानपत्राचा कायदेशीरपणा सिद्ध होताच १५७४ साली त्यानीं या इस्टेटी ताब्यात घेऊन मडगाव येथे आपलें कॉलेज स्थापन केलें. इ. स.

१५६९ त मुसलमानांनीं सासष्ट प्रांतावर हल्ला केल्यावेळीं ह्या कॉलेजचाही विध्वंस झाला. तेव्हां इ. स १६०६ सालीं तें रायतुरच्या तटबंदींत बांधण्यांत आलें व इ. स १६१० सालीं पाद्रींनीं तेथें वर्गही सुरू केले याच इमारतींत तूर्त रायतुरची सेमिनार्यु आहे त्यावेळीं, उपरोक्त कॉलेजांत थिऑलॉजीचा कोर्स, कोंकणी भाषेची शाळा, पोर्तुगीज लेखन वाचन, नीतितत्वें आणि धर्मशिक्षण इतकें शिक्षण मिळे. एक छापखानाही तेथें त्यानीं उभारला होता व त्याच छापखान्यांतून पाद्रि इस्तेव्ह याचें ख्रिस्त पुराण १६५४ त छापलें गेलें होतें हा छापखाना १५५६ सुरू झाला. म्हणजे हिंदुस्थानांत छापण्याची कला याच छापखान्याच्या द्वारें सुरू झाली असें वाटतें

**बारदेश प्रांतांतः**—बारदेश प्रातात जेसुइट गेले नाहींत. कारण अव्वल पोर्तुगीजशाहींतच तो प्रांत फ्रासिस्कान पाद्र्यांनीं व्यापला होता. १५१८ तच त्यांचें बस्तान गोव्यात बसलें व त्यानीं आपल्या कार्यक्षेत्राची जागा बारदेशांत निवडली इ. स. १५५५ त मांडवी नदीच्या उजव्या किनाऱ्यावर, पणजीच्या समोरच रेइज्माग येथें त्यांनीं आपलें पहिलें कॉलेज स्थापन केलें परंतु देवळाच्या जप्त केलेल्या उत्पन्नावर ब्रह्मार्पण सोडून, जेसुइटांनां जशी सरकारनें सढळ हातानें मदत केली होती तशी यानां मिळाली नाहीं आणि म्हणून बारदेशांतील देवळांचा नाश करून त्याचीं उत्पन्नें आपल्याला देणारा एकादा दियोग खीगिश उत्पन्न न झाल्याबद्दल उपरोक्त साधूंनीं दुःखाश्रु ढाळले आहेत. कॉलेजला जोडूनच अनाथ बालकांच्या शिक्षणासाठीं सेमिनार्यु द सां जेरॉनिमुश ही संस्था स्थापन केली होती आणि नवागत ख्रिस्त्यांना लेखन वाचन शिकविण्यासाठीं काझ द कातेकूमेनुश् नांवाची शाळाही त्यानी काढली परंतु जेसुइटांच्या शिक्षणासारखी लोकमान्यता व त्यांची संपन्नावस्था या कॉलेजला केव्हांच प्राप्त झाली नाहीं.

**तिसवाडींतील व्यवस्थाः**—इ स १५४० सालीं दोमिनिकान गोव्यांत आले व १५८५ त त्यानीं पणजी येथें सां तोमाझचें कॉलेज नांवाचें एक शिक्षणालय उघडलें पणजीच्या चर्चजवळच ह्या कॉलेजची इमारत होती. तेथें सापांचा उपद्रव फार होऊं लागला व वारंवार येणाऱ्या पुरांमुळें हें कॉलेज पुढें १६२२ त रायबंदर जवळच पानेल येथें नेण्यांत आलें इ स १५९९ त त्यांना; पोर्तुगीज दारूचीं ४ पिपें, आठ बुधले ऑलिव्हचें तेल, १२ खंडी गहु, २० खंडी तांदुळ, २० कोर्जी ( २० गठ्यांची एक कोर्जे ) म्हणजे ४०० सुती कपड्याचे गठ्ठे, एवढें सामान सरकारांतून मिळत असल्याचा दाखला मिळतो पुढें हा क्रम बंद करण्यांत येऊन ह्या साऱ्या सामानाबद्दल नक्त १२०० असर्फ्यांची ( ६०० रु. ) नेमणूकच त्यांना मिळूं लागली.

आगुस्तीन्यु ऑर्डरचे पाद्रींचा प्रवेश १५७२ त झाला व इ. स. १६२२ त कॉलेजियु द पॉपुल नावाचें त्यांचें कॉलेज तिसवाडींतील नेवरें येथें सुरु झालें. पण कॉलेजची जागा पाद्रींच्या कॉन्व्हेंटपासून बऱ्याच अतरावर असल्यामुळें, आणि नेवरेंच्या हवापाण्याच्या तक्रारीमुळें, पणजी येथें भव्य इमारत उभारून तेथेंच हें कॉलेज नेण्यांत आलें थिऑलॉजी, तत्वज्ञान व ल्याटिन हेंच ज्ञान या कॉलेजांतही मिळत असे.

इ. स. १७५९ त मार्कीझ द पॉंबालनें जेसुइटांचीं कॉलेजें बंद केलीं व पोर्तुगालच्या राजकीय क्रांतीमुळें सनदशीर राज्यपद्धती सुरु होताच, इ. स १८३५ सालीं ह्या साऱ्या संस्था बंद करण्यांत येऊन शिक्षणाचीं सारीं सूत्रें सरकारच्या हातीं गेलीं.

**शिक्षणाचा दर्जा व परिणामः**—" जेसुइट लोकाना वाईट शिक्षक म्हणणें म्हणजे सत्यापलापच होईल. सातु इनासियु दा लॉयॉल याचें शिक्षणशास्त्र हें प्रोटेस्टंट मेलाच्टन (Melanchthon) पेक्षां मुळींच कमी नव्हतें त्यांच्या शिक्षकानीं युरोपभर नाव मिळविलें होतें " असें म्हणण्यात येतें. जर्मनींतील म्युनीचच्या युनिव्हर्सिटीचे प्रख्यात प्रोफेसर ऱ्यांक यांचें तर असेंहि म्हणणें आहे कीं, इतर शाळांतून दोन दोन वर्षांत होत नसलेली प्रगति जेसुइटाच्या शाळांत केवळ सहा महिन्यांच्या अवधींतच होई. परतु आम्हाला हें ग्राह्य दिसत नाहीं मानवी मनाचा अनियन्त्रित विकास हेंच शिक्षणाचें अतीम कार्य होय बुद्धि, भावना, अवलोकनशक्ति, धारणाशक्ति, इत्यादि मनोवृत्तींचा परस्परसंवादी विकास ज्या शिक्षणांत होत नसेल, तें शिक्षण या संज्ञेला मुळींच पात्र नाहीं याच कसोटीनें शिक्षक व शिक्षण मापले पाहिजेत. जेसुइटांच्या शिक्षणांत बुद्धीच्या विकासाला नियन्त्रण घालण्यांत येत असे, असें त्याच्या Ratio Studiorum नावाच्या शिक्षणग्रंथावरून दिसून येतें सदर ग्रंथांतील नियमाचा विचार केल्यास खालील गोष्टी प्रामुख्यानें नजरेसमोर दिसतात. १ त्यांच्या शिक्षकवर्गांत स्वतंत्र बुद्धीच्या कर्तबगार व्यक्तींना जागा नव्हती २ त्याचें तत्वज्ञान त्यांच्या देवविद्येच्या सेवेसाठींच उत्पन्न झालें होतें ३ त्यांच्या विद्यालयांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना, कंपनीच्या मताविरुद्ध असलेल्या ग्रथांचें वाचन निषिद्ध होते ४ त्याच्याविरुद्ध असलेल्या सत्याचें प्रतिपादन करणाऱ्या ग्रथकाराची निंदा व कंपनीच्या मताला दुजोरा देणाऱ्या असत्यवादी ग्रंथकारांची स्तुति ही जेसुइटांच्या शाळेंत हमेश चालत असत. ५ कंपनीच्या अस्तित्वाला धोका आणणारीं किंवा आणूं शकणारीं सत्यें, कंपनीच्या शिक्षणसंस्थांतून प्रवेश करू शकत नसत मेकॉलेनें त्यांच्या-

विषयीं पुढील उद्गार काढले आहेत " बुद्धि प्रगल्भ होऊं न देतां शिक्षणाची मजदूर कोठवर नेणें शक्य आहे याचा त्यांनीं पक्काच शोध लाविला होता "

" त्यांच्या शिक्षणात राम नव्हता. स्थिर अशा ठशातून अश्मीभूत होऊन तें थंडावलें होतें उच्च शिक्षणाच्या शाखा ( Faculdades ) व विद्वन्मंडळें त्यांच्या संस्थांतून भरपूर होतीं परंतु त्याचीं विश्वविद्यालयें, बुद्धि जागरूक ठेवून ज्ञानप्राप्ती-विषयीं उत्सुकता उत्पन्न करणारीं ज्ञानमंदिरें नव्हतीं. ते जें शिकवीत तें उत्तम प्रकारें शिकवीत परंतु शिकवितांना विद्यार्थ्यांची विवेचकशक्ति थंडावल्याचें गृहित धरूनच मग शिकवीत. " असें सिन्योर मिनेझिझ् ब्रागास याचें मत आहे.

परंतु याच कालखंडांत पोर्तुगाल देशात मोठमोठे पंडीत निपजले होते व त्यांनीं पुनरुज्जीवनाला ( Renacença ) पुष्कळच मदत केली होती. पारिसच्या सोर्बोन युनिव्हर्सिटींतूनही पोर्तुगीज शिक्षकाची त्यावेळीं वाखाणणी होत होती. इतकेंच नव्हे, तर बरेच पोर्तुगीज त्या युनिव्हर्सिटींत शिक्षकाचें कार्यही करीत होते, असें इतिहास सांगतो.

१८३५ पर्यंत गोव्यांतील प्रमुख प्रमुख शिक्षणसंस्था ज्यांच्या ताब्यांत होत्या, त्यांचें शब्दचित्र हें असें आहे, अर्थात्च इंग्रजी विद्येप्रमाणें पोर्तुगीज विद्या हिंदुस्थानांत वाघिणीचें दूध बनूं शकली नसल्यास त्यात नवल नाहीं. ही झाली एकतंत्री अमलांतील गोष्ट परंतु आज तरी काय आहे ! पण जें काय आहे त्याचें वर्णन पुढें लिसेवची माहिती देतांना येईलच. त्याच्यापूर्वी आपण जेसुइटांच्या हकालपट्टीनंतरच्या परिस्थितीचें सिंहावलोकन करू

**तीन सेमिनारीः**—जेसुइटांना हुसकून लावताच त्यांचीं कॉलेजें बंद झालीं व चोडण बेट ( चूडामणि ) व रायतूर येथें दोन सेमिनार्यु स्थापन करण्यांत येऊन त्याची व्यवस्था सा फिलिप नेरीच्या कॉंग्रोगेसांवाच्या ताब्यांत देण्यांत आली. रायतुरची सेमिनार्यु सरकारनें इ. स १७७४ सालीं बंद केली. इ. स १७७९ त पोर्तुगाल सरकारनें व्हिसेतीन्यु कॉंग्रेगासांवाचे पाद्री गोव्यात पाठविले व त्याच्या ताब्यांत कोणती तरी एक सेमिनार्यु देण्याचा हुकूम गोवा सरकारला दिला. त्याप्रमाणें चोडणची जी एकच सेमिनार्यु अजून चालू होती, तीच त्याच्याकडे संपविण्यांत आली. तिला त्यावेळीं ३७२२ असर्फ्यांचें उत्पन्न होतें. अर्थात् तें अपुरें पडल्यानें, ९०३८ असर्फी करण्यात आलें. परंतु शैक्षणिक करांतून स्वतन्त्रपणेंच सरकार शाळा चालवित असल्यामुळें, हा जादा खर्च अनवश्यक वाटून ज्युंत जेराल द फाझेंद या जमाबंदी कमिटीनें हा वाढावा करण्याचें नाकारलें.

'रायतूरची सेमिनार्यु पुन: उघडून या उभय सेमिनार्युंना मदत द्यावी व गोवा शहरांतील बों जेजूसच्या कोव्हेंतांत एक नवी सेमिनार्यु उघडावी.' असा हुकूम इ. स. १७८१ त राणी मेरी पहिली इच्याकडून आला. ही नवी सेमिनार्यु नुकत्याच आलेल्या इटालियन पाद्र्यांकडे सोंपविण्यांत आली. चोडणच्या सेमिनारीस पूर्वी ठरलेलें ९०३८ असफ्यांचें वर्षासन मिळूं लागलें व राहिलेल्या सेमिनारींस प्रत्येकीं ९००० असफ्यां वर्षासन देण्यांत आलें.

इटालियन पाद्री सरकारची सत्ताही जुमानीत नसत, मग तिजोरींतून मिळणाऱ्या पैशाचा हिशेब देणें दूरच राहिलें अर्थात त्यांच्या हातून बों जेजूसची सेमिनार्यु काढून घेण्यांत आली व पुढें थोड्याच काळानें ती मुळांतच बंदही करून टाकण्यांत आली. राहिलेल्या उभय सेमिनारींतून ( १ ) ल्याटीन भाषेचें शिक्षण [ अनियमित मुदतीचें ] ( २ ) तत्वज्ञान व नीतितत्वें ( ३ ) थिऑलॉजीय दॉग्मातिक व थिऑलॉजीय मोराल असा तीन वर्षांचा अभ्यासक्रम होता. सुट्टीच्या दिवसांतून बायबल, धार्मिक गाणीं व चर्चमधील उपासना चालविण्यास शिकवीत असत. उभय सेमिनारींस दहा दहा हजार असफ्यांची नेमणूक मिळत असे व ती जेसुइटांच्या जप्त केलेल्या उत्पन्नांतून देण्यांत येई.

**मार्केझ द पोंबालची योजना:**—इ स. १७७२ मार्केझ द पोंबाल या मुत्सद्यानें जेसुइटांची हकालपट्टी केल्यावर शिक्षणाचीं सूत्रें सरकारनें आपल्या हातीं घेतल्याचें आपण प्राथमिक शिक्षणाच्या स्थित्यतरांत पाहिलेंच आहे व तत्वज्ञानाची एक, अलंकारशास्त्राची एक व ल्याटिन व्याकरणाची एक, अशा तीन शाळा दुय्यम शिक्षणाच्या सोईसाठीं निर्माण केल्या गेल्या होत्या. या शाळांतील प्रोफेसरांनां अनुक्रमें ४६० हजार रैस, ४४० हजार रैस व ४०० रैस असें वार्षिक वेतन पूर्वोक्त शैक्षणिक करांतून मिळत असे. पुढें इ. स. १७७८ त सासष्ट व बारदेश प्रांतांतून प्रत्येकीं एक ल्याटीनचा प्रोफेसर सालिना २०० हजार रैस देऊन ठेविला. ही परिस्थिति इ स. १८०० पर्यंत चालू राहिली त्या सालीं व्हेग काब्राल या गव्हर्नरनें काटकसरीच्या सबबीखालीं या एकंदर शाळा बंद केल्या. त्याच्यामतें सासष्ट प्रांतांतील लोकांना रायतुरची सेमिनार्यु व तिसवाडी आणि बारदेश प्रांतातील लोकांना चोडणची सेमिनार्यु पुरेशी होती. त्यामुळें पुन: एकदां दुय्यम शिक्षण पाद्र्यांच्याच हातीं राहिलें इ स. १८०८ त व्हायसरॉय कोंदि द सार्झेदाश् यांनीं ही परिस्थिति लक्ष्यात घेऊन ल्याटिन शिकविण्यासाठीं जुनें गोवें येथें एक, माजोर्डें, चिंचोणें (सास-

र्श्रीतील ) व म्हापशें आणि कांदोळी (बारदेशातील ) अशा पांच शाळा स्थापन केल्या. राजधानींतील शिक्षकांस सालिना ८०० असर्फ्या व इतरत्र ६०० असर्फ्या असें वेतन मिळत होतें.

इ. स. १८०३ त व्हॉयसरॉय दों मानुवेल द्दा कामर यांनीं जो खलिता राजेसाहेबांना लिहिला त्यात, " चोडण व रायतुरच्या सेमिनारींतून मुळींच शिक्षण मिळत नसून शिक्षकाचें ज्ञान देखील कच्चें आहे. केवळ तीस विद्यार्थ्यांपायीं सरकारला दरसाल वीस हजार असर्फ्यांचा खर्च करावा लागतो आणि हे तीस विद्यार्थी देखील केवळ धर्मोपदेशक होण्यासाठींच शिक्षण घेत असतात सामान्य प्रजेची यात सोय मुळींच नाहीं. तेव्हां सामान्य लोकांच्या शिक्षणासाठीं एक स्वतंत्र संस्था काढल्यास प्रजेवर फारच उपकार होतील " असा मजकूर होता परंतु सनदशीर राज्यपद्धतीची सुरुवात झालेली असली तरी पोर्तुगालांत अजूनही यादवी चालूच होती त्यामुळें या खलित्याचा विचार मात्र झाला नाहीं

इ स १८२९ त व्हॉयसरॉय दों मानुवेल द पोर्तुगाल इ कास्त्रु यानें हीच स्थिति पोर्तुगालांत पुन- कळविली व चोडणची सेमिनार्यु धर्मशिक्षणास राखून रायतुरची सेमिनार्यु इतर वर्गांच्या शिक्षणासाठीं घ्यावी आणि तिच्यावर बिशपचा अधिकार मुळींच चालू नये असें सुचविलें. परंतु ही सूचनाही अरण्यरुदनवत् ठरली. मुळच्या ज्या पांच ल्याटिनच्या शाळा होत्या, त्यांपैकीं प्रत्येक महालाच्या राजधानींत एक एक अशा केवळ तीनच राहूं देऊन बाकीच्या दोन त्यानें काढून टाकल्या.

**सनदशीर राज्यपद्धतींतः**—इसवी सन १८३५ पासून १८४१ पर्यंतच्या अवधींत दुय्यम शिक्षणाविषयीं गोव्यात मुळींच विचार होऊं शकला नव्हता १८४१ त गव्हर्नर लोपिज द लीम यानीं मिलिटरी आकादेमींत फ्रेंच व इंग्रजी शिकविण्याची सोय केली व त्याच सालच्या आगष्ट महिन्यात सासष्ट, बारदेश व तिसवाडी या कोमार्कांतून तीन तीन शाळा स्थापन केल्या पहिलींत ल्याटिन ग्रामर, तर्कशास्त्र व अलंकार शास्त्र, दुसरींत पोर्तुगीज व्याकरण, गणित व रेषा चित्रकला, व तिसरींत पोर्तुगालचा व जगाचा भूगोल, इतिहास व कालमापन असे विषय शिकवीत. धार्मिक शिक्षणाचें बाडमूळ नसतानां याच शाळातून दुय्यम शिक्षणाची सुरुवात सरकारानें केली या खेरीज पणजी शहरात एक स्वतंत्र शाळा स्थापन करून तींत जगाचा भूगोलतिहास, पोर्तुगालचा भूगोलेतिहास, कालमापन व स्टयाटिक्स इतके विषय शिकविण्याची स्वतंत्र सोय झाली होती.

वर सांगितलेल्या " आकादेमीय मिलितार " ची पुनर्घटना करून तिला त्यांनीं इस्कोल मातेमातिक इ मिलितार असें नांव दिलें. त्यामुळें तींत १ गणीत, बीजगणीत, भूमिति, त्रिकोणमिति व चित्रकला, २ पदार्थविज्ञान शास्त्र व रसायनशास्त्र, ३ भूगोल व इतिहास, ४ इंग्लिश, व ५ फ्रेंच भाषा इतक्या विषयांचा समावेश केला गेला. परंतु १८४२ तच लोपिज द लीम यांनां मिलिटरी क्रांतीमुळें अधिकारत्याग करावा लागल्यानें, मागून आलेले गव्हर्नर कोंदि द आतश् यांनीं १८४२ तच ही सारी सुधारणा बंद ठेविली तरी देखील लोपिज द लीम यानीं उघडलेल्या स्कुलांपैकीं, ल्याटीन, तर्कशास्त्र व अलंकारशास्त्र यांचा अभ्यासक्रम असलेलीं तीन स्कुलें, फ्रेंच व इंग्रजीचीं स्कुलें व पोर्तुगीज भाषा, गणीत, भूगोलेतिहास व कालमापन इतका अभ्यासक्रम असलेली पाच स्कुलें कायम राहिलींच

इ. स. १८५० त पणजी येथें दुसरा एक कोर्स उघडला गेला व त्यांत तत्वज्ञान, वक्तृत्वकला, काव्यशास्त्र व पोर्तुगीज वाङ्मय इतके विषय शिकविले जाऊं लागले त्याचप्रमाणें मडगाव येथें फ्रेंच भाषेची शाळा उघडण्यांत आली.

सारांश इतक्या अवधींत दुय्यम शिक्षणाची सोय म्हणजे इंग्रजी, फ्रेंच, ल्याटिन, तत्वज्ञान, गणीत, भूमिति आणि चित्रकला यांचें तुटक व विस्कळित शिक्षण यावयाच्या स्वतंत्र शाळांतून जी होत होती तेवढीच असे.

**दुय्यम शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्थाः**—इ स. १८५४ सालीं व्हिस्कोंदि द औरें या गव्हर्नरनीं दुय्यम शिक्षणाची सोय पद्धतशीरपणें केली दुय्यम शिक्षणाच्या शाळानां पोर्तुगीज भाषेंत लिसेव हें नाव आहे. लिसेव सेंत्राल, लिसेव नासियोनाल व व लिसेव मुनिसिपाल असे त्याचे तीन प्रकार आहेत. उपरोक्त गव्हर्नरनें गोव्यांत लिसेव नासियोनालची स्थापना केली. त्यांत पुढील अभ्यासक्रम येत होता.

१ पोर्तुगीज भाषा व ल्याटिन भाषा ( तीन वर्षें )

२ तत्वज्ञान, नीतितत्वें, नैसर्गिक कायदा, वक्तृत्वकला व काव्यशास्त्र, प्राचीन वांङ्मय, विशेषतः प्राचीन पोर्तुगीज वाङ्मय ( दोन वर्षें )

३ जगाचा भूगोलेतिहास, कालमापन व स्टयाटिक्स ( दोन वर्षें )

४ फ्रेंच भाषा ( २ वर्षें )

५ इंग्लिश ( २ वर्षें )

६ मराठी भाषा ( १ वर्षें )

गणीतविषय, भूमिति व बिजगणीत याचें शिक्षण पूर्ववत्च आकादेमीय मिलितार-मध्यें मिळत होतें. पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र यांच्या शिक्षणाची सोय, १८४५ साली प्राथमिक शाळांतून करण्यांत आली होती. परंतु गोमंतकांतील वैद्यक पाठशाळा व लष्करी शाळा या दोनच वरिष्ठ शिक्षणांच्या संस्थांत शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं, इ स. १८५३ त ते विषय शिकविण्याची सोय आकादेमीय मध्येंच करण्यांत आली. पुढें इ. स. १८६७ त पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र यांच्या अभ्यासक्रम मेडिकल स्कूलला जोडण्यांत येऊन १८९२ त लिसेवच्या झालेल्या पुनर्घटनेंत कायमचाच लिसेवला जोडला गेला

ह्या शिवाय १८९४ सालीं मडगाव व म्हापशें येथें ल्याटिनच्या शाळा उघडण्यात आल्या व बारदेशचे लोक इंग्रजी हिंदुस्थानांत बरेंच जाऊं लागल्यानें, त्यांच्या सोयी-साठीं म्हापशें येथें एक इंग्रजीची शाळाही उडघण्यांत आली. १८५५ त म्हापशेंच्या फ्रेंच शाळेची स्थापना झाली व १८६९ त मडगांव येथें इंग्रजीची शाळा सुरू करण्यात आली. ही सारी व्यवस्था विस्कळीतच होती कारण विद्यार्थ्यांच्या मानसिक वाढी-प्रमाणें शिक्षणाचा अनुक्रम या व्यवस्थेंत मुळींच नसून झेंपतील तेवढे विषय घेऊन क्रमाक्रमानेंच सारा अभ्यासक्रम त्यांना पुरा करावा लागत असे. मात्र तत्वज्ञानाचा कोर्स घेणारांनां ल्याटिनचा अभ्यासक्रम अगोदर पुरा करावा लागे व ल्याटिनचा कोर्स घेणारानां पोर्तुगीज व ल्याटिन व्याकरण अगोदर शिकावें लागत असे कोमिसार्यु सुपेरियोर दश् लेत्रश् ( डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन् ) यांची शाळेचे रैतोर ( हेडमास्तर ) या नात्यानें दुय्यम शिक्षणावर देखरेख चालत असे कोमिसार्युंच्या गैरहजीरींत लिसे-वच्या एखाद्या शिक्षकाचीच नेमणूक रैतोरच्या जागीं गव्हर्नरकडून होत असे.

इ. स. १८६९ त लिसेवचा शिक्षणक्रम विशेष व्यवस्थित होऊन सर्व विषय लिसे-वांतच शिकण्याची सोय झाली. अभ्यासक्रमांतही बराच बदल झाला होता. १ पोर्तुगीज भाषा व वाङ्मय, २ फ्रेंच, ३ इंग्लिश, ४ ल्याटिन्; ५ अंकगणीत, बिजगणीत, भूमिति ( प्लेन व सॉलिड ) व त्रिकोणमिति, ६ पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र व सृष्टशास्त्र यांचीं मूलतत्वें, ७ भूगोल व इतिहास, ८ तत्वज्ञानप्रवेश, ९ रेषाचित्रकला, इतक्या विषयाचा अभ्यासक्रम तीन कोर्सांतून वांटून दिला होता. पहिला सामान्य कोर्स हा चार वर्षांत पुरा करतां येई, हा पुरा होतांच भाषाविषय ( Curso de letras ) किंवा शास्त्रीय विषय ( Curso de sciências ) यांपैकीं मर्जी-प्रमाणें वाटेल तो घ्यावयाचा असे. भाषाविषयाच्या अभ्यासास १ वर्ष पुरत असे

व शास्त्रीय विषयाच्या अभ्यासास दोन वर्षें लागत. याखेरीज अर्थशास्त्र व राज्यपद्धीचें ज्ञान यांचा एक वर्ग आणि मराठी भाषेचा दुसरा वर्ग, हे स्वतंत्र असत. परंतु लिसेवच्या शिक्षणक्रमाच्या पूर्णतेस हे उभय वर्गही आवश्यक होते. दुय्यम शिक्षकाची जागा मिळवयाला, सरकारी नोकऱ्यांतील ऑफीसरच्या जागाना व सनदी वकिलीच्या परिक्षेस बसणाऱ्या उमेदवारांनां हा शिक्षणक्रम आवश्यक समजला जाई.

मडगाव व म्हापशें येथील शाळा कायम राखून त्या रायतुरच्या सेमिनारीस जोडण्यांत आल्या व फ्रेंच व इंग्रजीच्या शाळा लिसेवला जोडण्यांत आल्या

**आधुनिक सुधारणाः**—इ. स. १८९४ त पोर्तुगालांतच दुय्यम शिक्षणाची व्यवस्था आमूलाग्र बदलण्यांत आली. आजवर प्रत्येक विषय स्वतंत्रपणें शिकून, विषयवारी प्रमाणें वाटलेला अभ्यासक्रम पुरा करण्याऐवजीं, यापुढें प्रत्येक विषयाची वांटणीच अभ्यासक्रमाच्या वर्षांतून व्यवस्थित केली गेली लिसेव नासियोनालचा अभ्यासक्रम पांच वर्षांतून विभागला गेला इ. स १८९७ च्या जानेवारींत ही सुधारणा इकडे लागू झाली व त्याच वर्षाच्या जून महिन्यांत त्याप्रमाणें वर्गही चालू झाले. अभ्यासक्रमांत पुढील फेरफार होऊन शिक्षणाचा मगदूर कमी झाला

१ पोर्तुगीज भाषा व वाङ्मय, २ ल्याटिन भाषा, ३ फ्रेंच भाषा, ४ इंग्रजी भाषा, भूगोल व इतिहास ५ विशेषत पोर्तुगालचा भूगोलेतिहास, ६ अकगणीत, बीजगणिताचीं मूलतत्वें व साधी भूमिति, ७ सृष्टिशास्त्र पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र यांचीं मूलतत्वें व ८ चित्रकला पाच वर्षांच्या या कोर्सोला सामान्य कोर्स ( Curso Geral) असें नांव होतें शिवाय तत्वज्ञानाचा वर्ग, अर्थशास्त्र व राजनीतिशास्त्र याचा वर्ग आणि मराठी भाषेचा वर्ग, इतकें शिक्षण होतांच लिसेवचा कोर्स पूर्ण होई.

पूर्वीच्या शिक्षणक्रमापेक्षा यांत बीजगणीत, घनभूमिति ( Geometria no espaço ) व त्रिकोणमिति रसायनशास्त्र व पदार्थविज्ञानशास्त्र यांची खच्ची झाली होती व तत्वज्ञानाचा वर्ग स्वतंत्र करण्यात आला होता. परंतु याशिवाय शिक्षणाचा मगदूर कमी व्हायला जुन्या पद्धतीच्या शिक्षकाचा नव्या पद्धतीशीं अनभ्यस्तपणा देखील बराच कारणीभूत झाला त्याचप्रमाणें ह्या कामीं आवश्यक असलेली शिक्षणसामुग्री देखील लिसेवांत आणली गेली नव्हती इतर विषयांबरोबर वांटला गेलेला आपापला विषय शिकवितानां जुन्या शिक्षकांना वरेंच अवघडल्यासारखें होई.

हिंदूंच्या दृष्टीनें पाहिल्यास याच सुमाराला हिंदूंनीं लिसेवीय शिक्षणांत शिरकाव केला. पूर्वींच्या दुय्यम शिक्षणाचा पूर्ण अभ्यासक्रम पार पाडलेला एकाद्दुसराच हिंदु दिसे फार करून थोडें ल्याटिन, फ्रेंच, इंग्रजी किंवा गणीत इतके विषय शिकून हिंदु-विद्यार्थी पूर्वी अभ्यासक्रम सोडीत असत. आधुनिक इयत्तावार लिसेवातून उत्तीर्ण झालेले पहिलेच हिंदू म्हणजे तूर्त नव्या काबिजादीतर्फे सरकारसल्लागार मंडळात निवडून आलेले प्रतिनिधि, श्री नारायण अनंत शेट वांदोडकर हेच होत हे जातीनें वैश्य आहेत. त्यांनीं पांचव्या वर्षाची परिक्षा १९०३ सालीं दिली १९०१ सालीं प्रस्तुत लेखक लिसेवात दाखल झाला तेंव्हा त्यातील १६२ विद्यार्थ्यांत केवळ २५ च हिंदु विद्यार्थी होते।


**शिक्षणक्रमाची वांटणी व परिक्षा:**—पोर्तुगीज, ल्याटिन, अंकगणीत, भूमिति, चित्रकला, प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र यांचीं मूलतत्वें आणि भूगोल इतिहास हे विषय प्रथम वर्षापासूनच सुरू होत, दुसऱ्या वर्षी यांशिवाय फ्रेंच भाषा जास्त येई, तिसऱ्या वर्षी पूर्वींच्या विषयांशिवाय इंग्रजी किंवा जर्मन यापैकीं एक भाषा, फर्स्ट ग्रेड एक्वेशन्स पर्यंत बिजगणीत व स्पष्ट शास्त्रांच्या जोडीस रसायनशास्त्र व पदार्थविज्ञानशास्त्र येऊन पुढें पांचव्या वर्षा पर्यंत चालत. प्रथमच्या चार वर्षांतून शाळेंत भरपूर मार्क असणारांना परिक्षा निराळी द्यावी लागत नसे. अपुऱ्या मार्कांनींच येणाऱ्याना ती द्यावी लागत असे त्याचप्रमाणें पाचव्या वर्षीही परिक्षा असे. साऱ्या परिक्षा शिक्षकच घेत व त्या कांहीं भाग तोंडीं तर कांहीं लेखी घेऊन पूर्ण कराव्या लागत

**शिक्षणाची फी:**—दर साल प्रवेशफीचे २१०० रेंस व केवळ यशस्वी विद्यार्थ्यांनाच वर्ष पुरें होतानां २१०० रेंस मिळून ४२०० रेंस फी भरावी लागे म्हणजे रुपयाचा दर ४०० रेंस असताना साडे दहा रुपये व ३५० रेंस असतांना बारा रुपये प्रत्येक विद्यार्थ्याला पडत लागोपाठ पास होणाऱ्या विद्यार्थ्याला एकंदर अभ्यासक्रमास ५२॥ किंवा ६० रुपये फींचा खर्च येई.

**दुय्यम शिक्षणप्रसाराचें मान:**—विसाव्या शतकांत प्रवेश करतांच दुय्यम शिक्षणप्रसाराचा आढावा घेणें अनाठायीं होणार नाहीं शिवाय विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासूनच रिपब्लिकची अमदानी सुरू होत असल्यानें, हिंदुसमाजानें त्या अवधींत जो जोराचा प्रयत्न केला व सर्वच बाबतींत त्यांनीं जी जोराची मुसंडी मारली तिचें प्रगतिमान पहावयाला देखील हें कोष्टक उपयुक्तच ठरेल.


| शैक्षणिक वर्ष. | लिसेंवात शिक्षण घेतलेले. | | | | | | बाहेर शिक्षण घेऊन केवळ परिक्षेस बसलेले. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दाखल झाले | | निरनिराळ्या परीक्षा पास. | | पांचवी पास. | | परिक्षेस बसलेले पास. | | पाचवी पास | |
| | एकंदर. | हिंदू. | एकंदर. | हिंदू. | एकंदर. | हिंदू. | एकंदर. | हिंदू. | एकंदर. | हिंदू. |
| १९०१–१९०२ | १६२ | २५ | १०४ | १५ | ५ | ० | २२ | ० | ० | ० |
| १९०२–१९०३ | २०० | २४ | ९९ | २० | ८ | १ | २७ | ० | ० | ० |
| १९०३–१९०४ | २४१ | ३६ | १०६ | २५ | १० | १ | २१ | १ | २ | ० |
| १९०४–१९०५ | २७१ | ५४ | २१२ | ३८ | १० | १ | १४ | ० | १ | ० |
| १९०५–१९०६ | ३२८ | ७९ | १८१ | ५० | १५ | १ | २७ | ४ | १४ | १ |
| १९०६–१९०७ | ३५३ | ८८ | १०८ | २८ | १४ | २ | २० | ३ | १२ | २ |
| १९०७–१९०८ | २९९ | ७० | १६९ | ४२ | ११ | ४ | १४ | ० | ७ | ० |
| १९०८–१९०९ | २८१ | ६१ | १६६ | ३४ | २४ | ७ | १२ | २ | ३ | ० |
| १९०९–१९१० | २७९ | ६८ | १७८ | ३६ | २८ | १ | २२ | ३ | ४ | ० |
| १९१०–१९११ | २७० | ६१ | १४४ | ३० | २० | ३ | २१ | १ | १ | ० |

**स्वतंत्र रैतोरः**—रैतोरची जागा स्वतंत्र होऊन कधीं सरकारी नेमणुकीनें तर कधीं लिसेवच्या प्रोफेसरांपैकीं नोकरीनें वडील असलेल्यांना मिळूं लागली. त्यास अनुसरून कै. सूर्याजी आनंदराव देशपांडे यांनींही ती एकदां मराठीचे प्रोफेसर या न त्यानें उपभोगिली होती हिंदुसमाजांत आजवर हा मान फक्त त्यांनाच मिळालेला आहे



आग्वादचा किल्ला.

(गोमतकाचें जलमार्गीय प्रवेशद्वार)



आफोंस द आल्बुकेर्क सेंट्रल लिसेव.

(विश्वविद्यालय–पणजी)

**रिपब्लिकन युगः**—रिपब्लिकच्या अमदानींत इतर शैक्षणिक विभागांत जसे फेरफार झाले तसेच ते दुय्यम शिक्षणांतही झाले. लिसेवाचें शिक्षण देणाऱ्या 'लिसेव मुनिसिपाल' नांवाच्या आणखी दोन शाळा, अनुक्रमें मडगाव व म्हापशें येथें स्थापन झाल्या. त्यांतून लिसेवच्या इ स १९०५ च्या सुधारणामुळें झालेला जनरल कोर्सचा पहिला विभाग पूर्ण होऊं लागल्यानें पुष्कळच विद्यार्थ्यांची सोय झाली.

**लिसेव सेंत्रालची स्थापनाः**—इसवी सन १९१९ सालीं सरकारनें पणजीच्या लिसेवाची वाढ करून त्याला लिसेव सेंत्रालचा दर्जा दिला अभ्यासक्रमात झालेल्या वाढीमुळें आज जवळ जवळ वीस बावीस वर्षेपर्यंत झालेल्या पिच्छेहाटीनें, मेडिकल कोर्स घेणाऱ्या किंवा इतर वरिष्ठ अभ्यासास जाणाऱ्या विद्यार्थ्यांची तयारी अपुरी होऊन त्यांची जी कुचंबणा होत होती, तिची विल्हेवाट लागून इतक्या वर्षांची प्रजेची गरज पुरी झाली. त्यावेळचा अभ्यासक्रम अजूनही चालत असल्यामुळें, या अभ्यासक्रमाच्या इयत्तावार वांटणीची माहिती होतांच ब्रिटीश अभ्यासक्रमाशीं त्याची तुलनेनें लिसेवोत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचें माप महाराष्ट्रीयास समजणें सुलभ होणार असल्यानें आम्ही तो सविस्तर खालीं देत आहों

**प्रिमेर सेक्सांवः**—( पहिली व दुसरी इयत्ता )

**१ पोर्तुगीज भाषाः**—वाचन, शुद्धलेखन व धड्यांचा तोंडीं व लेखी सारांश देणें, कवितांचा अर्थ गद्यांत लिहिणें, शब्दविचार पुरा, उपसर्ग व प्रत्यय, साधित शब्दाची रचना, शब्दयोगी अव्ययाचीं कारकें, वाक्यपरिच्छेद आणि प्रसिद्ध ग्रथकाराच्या निवडक ग्रंथांचें वाचन

**२ फ्रेंच भाषाः**—शाळा, मानवी शरीर, काळ व त्याचे विभाग, कुटुंब, पोषाख, घर, त्याची बाधणी व विभाग, आहार, इत्यादि परिचित विषयांवर तुटक वाक्यानीं संभाषण, लहान लहान धड्याचें भाषांतर, वाक्यें तयार करून छोटे छोटे सारांश लिहिणें; तेवढ्याच पुरता शब्दविचार व वाक्यरचना.

**३ इंग्लिश भाषाः**—डायरेक्ट मेथडनें शब्दज्ञान, शाळा, शरीर, काळ, कुटुंब, आहार, इत्यादि विषयांवर साधीं संभाषणें व लहान लहान वाक्यानीं शिकलेल्या धड्यांचा आशय सांगणें, वाक्यांचें रूपांतर इ

**४ भूगोलज्ञानः**—प्रत्यक्ष परिचयानें व्याख्यांची समजूत, दोन ठिकाणांतील रस्ता निश्चित करणें, हवेंतील फेरफार, नकाशांचें वाचन, खगोलस्थ ज्योतींची वर्गवारी, मुख्य मुख्य तारकापुंजांची ओळख, ध्रुवताऱ्यावरुन दिशाज्ञान, पृथ्वीचा गोलाकार व

-त्यांचीं प्रमाणें, ऋतु व दिनमान, चंद्राची गति, ग्रहणें, अक्षांश रेखांशाची माहिती, हवामानातील फेरफारांची माहिती व त्यांचीं कारणें, प्राणी व वनस्पती यांची पृथ्वीवरील वाटणी व तिचा कटिबंधादि उपाधींशीं संबंध, प्रमुख खनिज पदार्थ व उपयुक्त वनस्पतींशीं ओळख, जगांतील मुख्य उत्पादक शहरांची, मोठमोठ्या जल-स्थल व आकाशमार्गांची माहिती, त्यांचा भूगोलविदेशीं सबंध, मानवी वंशांचा परिचय, त्यांची जगावर वांटणी व तिचीं कारणें, मानवी प्रयत्नांनीं जगात घडवून आणलेले फेरफार, महासागर व खंडें यांची वांटणी आणि आद्यकालापासून होत आलेली त्यातील स्थित्यंतरें, नद्या, डोंगर यांची जगांतील वाटणी व तिचे परिणाम, महासागरांतून दिसून येणारे हिमनग, अंत:प्रवाह, भरती आहोटी इत्यादि माहिती

**५ सृष्टिशास्त्र**--मानवी शरीराची माहिती, आणि प्राणीशास्त्रातील सपृष्ठवंशी व अपृष्ठवंशी यांचे वर्ग, सपुष्प वनस्पतींचें संपूर्ण ज्ञान, अपुष्प वनस्पति व त्यांतील वर्ग, दोहोंची तुलना, एकदल व द्विदल वनस्पति व त्यांचा उपयोग.

**६ गणीत विद्या:**—चार साधीं कृत्यें, व्यवहारी अपूर्णांक, विविध व दशांश अपूर्णांकांतील कृत्यें, घात प्रकरण व वर्गमूळ, प्रमाणगणीत, त्रैराशिक, पंचराशिक, व्याज, डिस्काउंट, नफा तोटा, सकेत वांटणी, इत्यादि, भूमितीच्या व्याख्या, वर्तुळापर्यंत क्षेत्रफळ व गोलापर्यंतचें घनफळ.

**चित्रकला** --रेषा चित्रकला व विशेषेंकरून भूमितींतील सारे घन यांचीं चित्रें.

**सेगूंद सेक्सांव:**--( तिसरी, चौथी व पाचवी इयत्ता )

**१ पोर्तुगीज भाषा**:--१६ ते १९ व्या शतकांतील ग्रंथकारांचें वाचन, महाकाव्य लुझीयदश, वाक्यमिमांसा, शब्दयोगी अव्ययांचा उपयोग, सपूर्ण साधित शब्दविचार, वृत्तदर्पणाचा अभ्यास, निबंधलेखन, स्थलवर्णन आणि पोर्तुगीज वाङ्मयाचा इतिहास.

**२ ल्याटिन भाषा:**—वाचनाचे नियम, विभक्ति प्रत्यय, क्रियापदें चालविणें, शब्दयोगी व क्रियाविशेषण अव्ययें, भाषांतर व पोर्तुगीज वाक्यांचें ल्याटिन रूपांतर, उपसर्ग व प्रत्ययांच्या द्वारें साधित शब्दविचार व अव्ययांचा पूर्ण विचार.

**३ फ्रेंच भाषा:**—शाळेंतील जीवनक्रम, घरांतील जीवनक्रम, व्यायाम व खेळ, शहरें, स्मारकें, शेती, डोंगर, जगल, समुद्र इ. विषयावर सभाषणें, आधुनिक फ्रेंच ग्रंथकाराच्या एक दोन ग्रंथाचें वाचन, भाषांतर, पोर्तुगीज लेखाचें फ्रेंच भाषेंत रूपांतर, फ्रेंच वाङ्मयाची संक्षिप्त रूपरेषा, फ्रेंच व्याकरणाचा अभ्यास.

**४ इंग्रजी भाषाः**—इंग्रजीचें पोर्तुगीज भाषांतर व पोर्तुगीजातून इंग्रजी रूपांतर, वाचन व त्याचा इंग्रजींत सारांश, इंग्रजी व्याकरण, पत्रलेखन, सपूर्ण वाक्यरचना, शब्दांचे घटक, इ

**५ इतिहासः**—जगाचा इतिहास व त्याचे स्थूल मानानें विभाग; पौर्वात्य देशांचा इतिहास· इजिप्त, खाल्डिया, आसीरिया, फेनीसिया, इज्रायलीत, पार्शी, (हिंदुस्थान व चीन इत्यादि मुळींच नाहींत हें विशेष आहे!) ग्रीस देश व मासिडोनिया, रोमन लोकांचा इतिहास, मध्ययुगीन इतिहास पूर्वसाम्राज्याचा नाश, अर्वाचीन इतिहासः नवे भौगोलिक शोध, रेनासेंस; ल्यूथरची क्रांति, फ्रेंच राजघराणें, आस्ट्रियन राजघराणें; इंग्लंडचा विस्तार, प्रशियाची प्रगति, रशियन साम्राज्य, इंग्रज व फ्रेंच यांतील चुरस, १८ व्या शतकांतील लढाया, अमेरिकन युनायटेड स्टेट्स, फ्रेंच राज्यक्रांति, तत्कालीन ग्रंथकार, नेपोलियनचें युग, इटालीचें एकीकरण, जर्मन साम्राज्य; त्रिकुटसंधि, जपानचा व अमेरिकेचा अभ्युदय, १९ व्या शतकांतील शास्त्रीय शोध व त्याचे उद्योगधंद्यावर झालेले परिणाम, विसाव्या शतकातील गेलें महायुद्ध आणि पोर्तुगालचा सपूर्ण इतिहास.

**६ भूगोल विद्याः**—मानवी समाजाची रचना, एकसत्ताक व प्रजासत्ताक राज्यपद्धति, केंद्रीभूत सत्ता (unitário) व फेडरेल राज्यपद्धति, स्वतंत्र राज्यें प्रोटेक्टरेट व जहागिरदार, वसाहती स्थापण्याच्या पद्धति; एशिया, आफ्रिका, अमेरिका, ओशियानिया व युरोप यांचें समग्र वर्णन, इजिप्त, ग्रीस इत्यादि जुन्या राष्ट्रांच्या काळची त्यांची भौगोलिक माहिती, रोमन सडका, जुने जलमार्ग व प्रवास, कारवानचे प्रवास व जुने प्रवास, पोर्तुगीज व स्प्यानिश राष्ट्रांचे शोध, अमेरिका, आफ्रिका व ध्रुवप्रदेश यावरील स्वाऱ्या, पोर्तुगीज राष्ट्राचा भूगोल, जगांतील प्रमुख राष्ट्रें, जगातील प्रमुख उत्पादक केंद्र, मोठीं बंदरें, प्रमुख जलमार्ग, स्थलमार्ग व त्यांची भौगोलिक कारणें.

**सृष्ट व पदार्थविज्ञान शास्त्रें**—गति व शक्ति, गुरुत्व, थर्मामीटर, बारोमीटर, लेव्हल, हायड्रोलिक प्रेस, मानोमीटर, प्रकाश उष्णता ध्वनि व विद्युत्, लाव्हुआझियेचे सिद्धांत, हायड्रोजन, ऑक्सीजन, नैट्रोजन, पाणी, हवा, प्रोस्टचा सिद्धांत, रासायनिक समीकरणें, व्हालेंसिय, आसिडें, ग्यासेस, धातुचे क्षार, डाल्टन, रीचर व गी द ल्युसाक याचे सिद्धांत, फॉर्म्युले व रासायनिक समीकरणें, सेंद्रिय पदार्थ, आल्कोहोल टर्पेंटाइन, इथर, हायड्रोकार्बोनेट्स, बेंझाइन, फेनॉल, कापुर, रक्त व दुध यांची घटना, प्राण्यांचें सपूर्ण वर्गीकरण, जीवपेशींचा अभ्यास, एकपेशी प्राणी व बहुपेशी प्राणी, शरीरांतील निरनिराळे पेशी, पचनेंद्रियें, श्वसनेंद्रियें, हृदय व रुधिर, अस्थिपंजर, हालचालींचे अव-

यव, ज्ञानतंतुसमूह व ज्ञानेंद्रियें, फिझियॉलॉजी, पचनक्रिया, रुधिराभिसरण, श्वसन-क्रिया, त्वचेचे व्यापार, प्राणीज उष्णता व तिचे व्यापार, प्राण्यांची उत्पत्ती, प्रमुख प्रमुख प्राणीज पदार्थ, संपूर्ण वनस्पतिशास्त्र, पृथ्वीच्या घटनेचे निरनिराळे थर ओळ-खण्याइतकें खनिजशास्त्र व भूगर्भशास्त्र.

**८ गणीत विद्याः**—बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार, बिजगणिताचे अपूर्णांक, साधीं समीकरणें, दिझीग्वालिदाद द प्रिमैर ग्राव, रादिकाइश, अपूर्णघाताचे वर्ग, लॉगारीत्मुश, श्रेढी, कोंबिनासांव, बिनोमियु द न्यूटन, वर्ग समीकरणें, चतुर्घात समी-करणें, संयुक्त समीकरणें, साधी भूमिति, घनभूमिति

**चित्रकलाः**—आर्किटेक्चरचे निरनिराळे प्रकार व त्यांची ओळख घेण्यापुरतें रेखाचित्रकलेचें ज्ञान. वास्तुशास्त्राचा इतिहास, इजीप्शन, ग्रीक, रोमन, बिझातीन, आरबी, ऑजीव्हाल, रेनासेंस व मॉडर्न या स्टाइल्सची ओळख ( हिंदी, मोंगल, चिनी व जपानी या कलांचा मागमूसही नाहीं ' ) परस्पेक्टिव्ह व त्याचे नियम, ऑर्नामेंटल चित्रांचें मेमरी ड्रॉइंग व कॉपी.

**कूर्स कोंप्लिमेतार द लेत्रश**—( भाषा विषयाची ६ वी व ७ वी इयत्ता )

**१ पोर्तुगीज भाषाः**—पोर्तुगीज वांग्मयाची प्रत्यक्ष ग्रंथाच्या द्वारें ओळख, त्यावर झालेला अगदीं अर्वाचीन टीका, बाह्य वांग्मयाचा पोर्तुगीज वांग्मयावर झालेले परिणाम, ग्रीक व रोमन वांग्मयाची माहिती; शब्दपरिच्छेद, वाक्यपरिच्छेद व वाक्यमीमांसा, वाग्मयाच्या इतिहासावर निबंध व टीका, पोर्तुगीज व्याकरणाची ऐति-हासिक स्थित्यंतरें, ल्याटिन भाषेंतून पोर्तुगीज शब्दनिर्मिति व व्युत्पत्तिशास्त्र.

**२ ल्याटिन भाषाः**—सीझरचें चरित्र, सिसरोचीं आमीसिया व व्याख्यानें, व्हर्जील, ओव्हिदियुची मेतामोर्फोझिश, ऑरासियु, यांचें वाचन व भाषांतर, वाक्यरचना व वाक्यपदच्छेदापर्यंत व्याकरण, वृत्तदर्पणाची माहिती; आणि ल्याटिन वाङ्मयाचा संक्षिप्त इतिहास.

**३ फ्रेंच भाषाः**—वृत्तपत्रें व नियतकालिकें यांचें वाचन, आजकालच्या प्रसिद्ध ग्रंथकारांच्या ग्रंथावर संभाषण, फ्रेंच भाषेच्या उत्क्रांतीचें ग्रंथाच्या वाचनावरून ज्ञान, मुख्य मुख्य वांग्मयप्रचारांचें वर्णन, काव्यशास्त्राची माहिती, इ.

**४ इंग्रजी भाषाः**—इंग्रजी लेखकांचे ग्रंथ वाचणें, भाषांतर, इंग्रजी वाङ्मयाचा इतिहास, निबंधलेखन, धड्यांचा सारांश लिहिणें, इंग्रजी भाषेचा संक्षिप्त इतिहास; काव्याची माहिती व साधित शब्दविचारापर्यंत व्याकरण.

**इतिहासः**—जगाच्या इतिहासाचें विवेचन, इतिहासाचे विभाग, इतिहासाचीं साधनें, पोर्तुगालच्या इतिहासाचें विस्तृत ज्ञान व विवेचन, जगाच्या सांस्कृतिक विकासाचें सामान्य स्वरूप

**६ भूगोलविद्या**—नकाशे काढणें, जमीन मोजणी, कॉज्मोग्राफी, ग्रह या नात्यानें पृथ्वीचा अभ्यास, पृथ्वीचा आकार, अक्षांश रेखांश, तिच्या गति व परिणाम, इ ; जमीन व समुद्र यांची वांटणी, समुद्रगर्भांगत उंचवटे, खंडाचीं स्वरूपें व त्यांची पाण्याशीं तुलना, भूपृष्ठाची रचना, वातावरणाचा विचार, हिमप्रदेश विचार, नद्याची व प्रवाहांची उत्पत्ति, तलाव, पाण्याचे भूगर्भांतील परिणाम, समुद्रप्रवाह, त्यांची उष्णता, वेग व नियम, भूगर्भीय कारणांनीं पृथ्वीचें उत्थापन, क्लायमेटचे नियम, वनस्पतीच्या वांटणीचीं कारणें व नियम, प्राण्यांच्या वांटणीची कारणें व नियम, मानवी वंशांची वाटणी व नियम, मोठमोठीं शहरें व बंदरें वगैरे वसण्याचीं कारणें, पृथ्वीवर मानवी प्रयत्नांनीं झालेले फेरफार, आर्थिक व औद्योगिक भूगोल, पूर्वयुगीन भूगोल, राजकीय भूगोल व त्यांचीं कारणें, पानजर्मानिझम्, पान ज्वाव्हिझम् बालकन प्रश्न, पान अमेरिकानिझम्, सामाजिक भूगोल व दळणवळणाचीं साधनें इ

**७ गणीत विद्या**—दृढभाजक, लघुतम साधारण भाज्य व अविभाज्य अंक ( primos ) यांची थिअरी, अक्ष² + बक्ष + क आणि अक्ष + ब यांचा समीकरणें सोडवायला उपयोग, Noção de limite, derivada, integral, diferencial, aplicações ao cálculo das áreas e volumes do movimento e das tangentes das curvas, त्रिकोणाचे कोन व बाजू यातील प्रमाण, त्रिकोणाचीं उदाहरणें Coordenadas cartesianas e polares de geometria a uma, duas e três dimensões, aplicação do estudo das curvas, das superficies e dos números ( negativos, complexos e quatérnios )

**कूर्स कोंप्लेमेंतार दश् सियेंसियः**—( शास्त्रीय शाखेची सहावी व सातवी इयत्ता

**१ पोर्तुगीज भाषाः**—अगदीं अर्वाचीन टीकेसहित पोर्तुगीज वांग्मयाचा ग्रंथाच्या वाचनानें अभ्यास, बाह्य वांग्मयाचा पोर्तुगीज वाग्मयावर झालेला ठळक परिणाम, निबंधलेखन, कविता, व्याकरणाची उजळणी, पोर्तुगीज भाषेंतील शब्दसंग्रहांत आलेल्या ठळक ठळक ल्याटीन व ग्रीक शब्दांची ओळख.

२ ल्याटिन भाषा.--( नाहीं )

३ फ्रेंच भाषाः--भाषाविषयाच्या शाखेंतीलच अभ्यासक्रम.

४ इंग्रजी भाषा--अवगत अभ्यासाची उजळणी, वाचन, भाषांतर, वाचलेल्या धड्यांचा तोंडी व लेखी सारांश, निबंध लेखन, व्याकरण इ

५ इतिहासः--भाषाशाखेपेक्षा जरा कमी विस्तृत असा पोर्तुगालचा इतिहास व पोर्तुगाल देशातील शास्त्रीय शोधाचा इतिहास.

६ तत्वज्ञानः--भाषाशाखे इतकेंच.

७ भूगोल.--भाषाशाखेप्रमाणेंच.

८ गणीतविद्याः--पूर्णांक व निरनिराळ्या अंक पद्धति, Números irracionais, càlculo de aproximação व्याज, चक्रवाढ व्याज, डिस्काउंट, आन्नुइदादीश्, शेअर्स, राखे, सरकारी कर्ज, हुडणावळ, ऋण व काल्पनिक संख्या, य=अक्ष+व याचा उपयोग, साध्या समीकरणाचें व वर्गसमीकरणाचें डिस्कशन, वर्ग समीकरणाचें डिस्कशन; वर्ग समीकरणापेक्षां वरिष्ठ समीकरणाचीं उदाहरणें, Càlculo infinitessimal, teoria de limites, derivada, noção integral साधी त्रिकोण मिति संपूर्ण, Geometria sintética e analitica, Cosmografia ( leis de Kepler )

९ चित्रकलाः--Projecções ortogonais e leis completas de perspectiva, Desenho topográfico

हा अभ्यासक्रम तूर्त बदलला आहे खरा परंतु त्या फेरबदलानें विषयांत कांहीं कमी जास्त झालें नाहीं तर केवळ त्याची वांटणी जराशी भिन्न झाली आहे. दुय्यम शिक्षणाच्या कोर्साचा मगदूर बाह्य प्रदेशांतील विद्वानांच्या लक्ष्यांत येण्यासाठीं हा अभ्यासक्रम द्यावा लागला आहे.

सनदी वकीलीची परिक्षा व बार-ॲट-लॉचा अभ्यासक्रम घेणारांस भाषाविषय आवश्यक असून मेडीकल स्कूल, गणीतविषय, लष्करी कॉलेज कोर्स, इत्यादि घेऊं इच्छिणारांस सायन्स शाखा आवश्यक आहे.

**शिक्षणप्रसाराची तुलना**--१९१०-१९११ सालच्या मानानें पाहिल्यास पूर्वीच्या २७० मुलांऐवजीं १९२० त तीनही लिसेव मिळून ९४२ मुलें शिक्षण घेतात व हीच तुलना १९२७-१९२८ सालाशीं केली तर एकंदर ८६५ मुलें शिक्षण घेत आहेत

मुळच्या ६१ हिंदु मुलांऐवजीं १९२०–१९२१ सालीं त्यांची संख्या तीनही लिसेवांत मिळून ३०८ ची होती व १९२७–१९२८ सालं तीच २९६ आहे. आतांशा लिसेवांत कमाल वयाची अट लागू केल्यामुळें, पुष्कळ हिंदुमुलांना लिसेवांत प्रवेश मिळत नाहीं हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे. हिंदूच्या प्रयत्नाचें प्रमाणच पहावयाचें असल्यास, तें हिंदूंतील परिक्षेत पास होणाऱ्या मुलांची संख्या पाहिल्यास लागलीच दिसून येईल. १९२०–१९२१ सालीं लिसेवात शिकणारे व बाहेर शिकून परिक्षेस बसलेले हिंदू ३४४ होते व त्यातून २१४ यशस्वी झाले. म्हणजे शेंकडा ६२ हें प्रमाण पडतें. शिक्षणाचीं सूत्रें ज्या प्रोफेसर वर्गाच्या हातांत आहेत, त्यांची हिंदुजनेतकडे जी दृष्टि आहे ती फारशी समाधानकारक नसतांना देखील हें प्रमाण एकंदर प्रमाणापेक्षा शेंकडा ११ नीं जास्त आहे, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे उल्लेखित सालीं एकदर १०५९ मुलांपैकीं ६४२ म्हणजे शेंकडा ५१ पास झालीं होतीं

**शिक्षकांची संख्याः**—१९२७–१९२८ सालीं लिसेव सेंत्रालांत एकंदर १९, म्हापशेंच्या लिसेवांत व मडगांवच्या लिसेवांत ४ असे प्रोफेसर होते.

**फीचें प्रमाणः**—पहिल्या व दुसऱ्या वर्षाला ( इयत्तेला ) प्रत्येकीं ३४/४/७; तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या वर्षांनां ( इयत्तांना ) प्रत्येकीं ४८ रु आणि सहाव्या व सातव्या वर्षांनां ( इयत्तांनां ) प्रत्येकीं ६१/११/७ असी फी पडते. बाहेर शिकून परिक्षेलाच येणाऱ्या मुलांस दुसऱ्या व तिसऱ्या इयत्ताना प्रत्येकीं २८/९/८; चवथ्या व पांचव्या इयत्तांना प्रत्येकीं ४०/४/७, आणि सहाव्या व सातव्या इयत्तांनां प्रत्येकीं ५२/४/७ इतकी फी आहे; तसेंच पहिल्या तीनही इयत्तांच्या संयुक्त परिक्षेस ४८/१३/८ चौथ्या व पांचव्या वर्षांच्या सयुक्त परीक्षेला ६७/११/३ आणि शेवटचा दोन वर्षांच्या सयुक्त परिक्षेला ८६/९/८ असी फी आहे

**अलीकडचा गोंधळः**—पोतुगालांत रिपब्लिकची घडी अजून नीटशी बसली नसल्यानें, वारंवार अधिकारक्रांत्याच नव्हेत तर इतर प्रकारच्या क्रांत्याही तेथे संख्याबद्ध होतच आहेत अधिकारावर आलेल्या प्रत्येक मंत्रिमंडळाला असें वाटतें कीं, शिक्षणाच्या बाबतींत कांहीं तरी सुधारणा न केल्यास पूर्वीच्या मंत्रिमंडळापेक्षां आपला दर्जा कमी ठरेल अर्थातच अलीकडच्या चार पांच वर्षांत दुय्यम शिक्षणविषयक रेग्युलेशन बऱ्याच वेळां बदललें असून इतका गोंधळ झाला आहे कीं, आज मितीस त्यापैकीं कोणता कायदा लागू आहे हें दुय्यम शिक्षणांतील तज्ज्ञांना देखील नीटसें

समजत नाहीं. शिक्षणक्रमाचे विषय व त्याची अतीम सीमा फारसी बदललेली नाहीं. परंतु, ' काहीं तरी केलें ' असें म्हणण्यासाठीं इकडचें तिकडे व तिकडचें इकडे असे क्षुल्लक फेरफार वारंवार होत आले आहेत. अर्थात् मागें आम्ही दिलेला प्रोग्राम आज ततोतंत पाळला जात नाहीं हें सांगायला नकोच.

**शिक्षकांची पात्रता व शिक्षणाचा दर्जाः**—पणजीच्या लिसेवांतील शिक्षक उच्च नॉर्मल कॉलेज, युनिव्हर्सिटी, किंवा इतर उच्च शिक्षण घेतलेले असतात. आणि म्युनिसिपाल लिसेवांतील शिक्षक लिसेव सेंत्रालच्या अभ्यासक्रम पुरा केलेले असतात. अर्थात् त्यांच्या कायदेशीर पात्रतेविषयीं शंका घेणें शक्यच नाहीं. परंतु शिक्षकाची कसोटी लावायचें खरें साधन म्हणजे विद्यार्थ्यांचें त्यांजवरील प्रेम व आपलेपणा हेंच होय या साधनाच्या कसोटीला उतरणारे प्रोफेसर आमच्या लिसेवांत बरेच विरळा आहेत धर्मभेद, राजकीय पक्षभेद, स्थानिक वैमनस्यें, इत्यादि बाबींचा प्रभाव परिक्षांच्या निकालावर बराच होत असतो. आणि त्यामुळें विशेषत हिंदूंचेंच नुकसान होत असतें, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. मुलाला शाळेंत घालायचें ठरताच, त्याच्या पुस्तकाविषयीं व जेवणाखाण्याविषयीं जी काळजी घ्यावी लागते, तिच्याही अगोदर शिक्षकांच्या मेहेरनजरेची काळजी पालकांना बाळगावी लागते व त्यासाठीं, मुलानीं करावयाच्या अभ्यासापूर्वी, पालकानीं त्यांच्या शिक्षकांच्या नात्या गोत्याचा, स्नेहसंबंधांचा व राजकीय मतांचा अभ्यास करावा लागतो

अशा व्यवस्थेंतून मिळणारें शिक्षणही तशाचप्रकारचें असल्यास नवल नाहीं. शिक्षणाच्या दर्जाविषयीं सांगायचें झाल्यास, तें व्यावहारिक उपयुक्ततेपेक्षां पुस्तकी खटपटपंचीकडेच विशेष कललेलें असतें इतकें सांगितलें म्हणजे बस्स होईल

# विभाग तिसरा.

## प्रकरण सहावें.

## उच्च व वैशेषिक शिक्षण.

**अव्वल पोर्तुगीजशाहींतील योजना:**—आधीं धर्म व मग राजकारण हें तत्व जेव्हांपासून पोर्तुगीज राज्यव्यवस्थेंत शिरलें, तेव्हांपासून त्याच्या अवनतीस आरंभ झाला, हें आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे जगाच्या कोणत्याही भागांत हें सत्य सारखेंच कटुफलदायी असतें पोर्तुगीज अमलाच्या पहिल्या शतक दीड शतकांत त्यांना पाखांडमतखंडन व सद्धर्मप्रसार यांशिवाय दुसरीकडे लक्ष्य द्यावयाला फुरसदच मिळाली नाहीं. जेसुइटांच्या हातीं शिक्षणाचीं सारीं सूत्रें असल्यामुळें त्यांनीं धार्मिक शिक्षणाचें बंड माजवून बाकी विषयाकडे दुर्लक्षच केलें होतें अर्थातच सत्प्रवृत्त असे जे कांहीं थोडेसे व्हॉइसरॉय होऊन गेले, त्याचा शिक्षणप्रसाराचा सारा प्रयत्न फुकट गेला

**मिलिटरी स्कुलें:**—तरीपण १८ व्या शतकांत त्याबाजूनें थोडेसे प्रयत्न झालेच त्यांपैकीं व्हायसरॉय कोंदि द यॆग याची नाविक शाळा आणि इ. स. १७७६ त स्थापन झालेलें, तोफखान्याचें शिक्षण मिळविण्याचें विद्यालय, हे प्रयत्न बराच काल टिकले. तोफखान्याच्या शाळेचें पुढें रूपांतर होऊन लष्करी बांधकामाची शाळा उघडली गेली व तिलाच उपरोक्त नाविक विद्यालय जोडलें गेलें इ. स. १८१७ सालीं या शाळांचें पुनः रूपांतर होऊन त्यांना आकादेमीय मिलितार द गोअ हें नांव मिळालें अभ्यासक्रमही विस्तृत करून तत्कालीन युरोपियन लष्करी शाळांबरोबर पंचवार्षिक करण्यांत आला. सँढर्स्ट कॉलेजची मागणी हिंदुस्थानांत नुकतीच वचुप्रवेशानें पुरी होण्याच्या पंथास लागली आहे, या दृष्टीनें पाहतां या विद्यालयाचें कौतुकच वाटेल. इ. स. १८४१ त व्हॉयसरॉय कोंदि द लीम यानें या विद्यालयाची पुनर्घटना केली व तिला इस्कोल मातेमातिक इ मिलतार ( गणीत व लष्करी शिक्षणाची शाळा ) हें नांव दिलें. नाविक विद्यालय नष्ट करण्यांत

येऊन त्या ऐवजीं पायलेटचें शिक्षण देण्याचा वर्ग याच शाळेला जोडण्यांत आला या इस्कोलाचा अभ्यासक्रम ६ वर्षांचा होता लष्करी इंजिनियर, तोफखाना व पायदळाचे ऑफिसर वगैरे याच विद्यालयांतून तयार होत पुढें १८४३ सालीं नाविक शाळेचें पुनरुज्जीवन झालें व तीही याच विद्यालयाला जोडण्यांत आली. मुख्य प्राथमिक शाळेंत चालणारा पदार्थ विज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र यांचा वर्ग इ. स. १८५३ सालीं याच विद्यालयाला जोडण्यांत येऊन तो इ. स. १८६५ पर्यंत चालला होता इ. स. १८६८ आणखी एकदां या विद्यालयाची पुर्नघटना झाली. त्यांत तिचें स्वरूप केवळ लष्करींच न राहतां सामान्य प्रजेची देखील वरिष्ठ शिक्षणाची सोय व्हावी असी तिची रचना झाली. पायदळ ऑफिसरांस दोन वर्षांचा, अभ्यासक्रम तोफखान्यावरील ऑफीसरांना ६ वर्षांचा व इंजिनियरिंग शाखेचा सात वर्षांचा ठरला होता. परंतु ही योजना फार काळ न चालतां, माशेलांतील बंडानतर गोव्यांतील लष्करच कमी झालें व विद्यालय देखील बंद करण्यांत येऊन त्या ऐवजीं इंस्तितूत प्रोफिसियोनाल ( धंदेशिक्षणाची शाळा ) नांवाचें विद्यालय उघडण्यांत आलें.

**शतवार्षिक उच्च शिक्षणाचा आढावाः**—प्राथमिक किंवा दुय्यम शिक्षणाच्या आढाव्याप्रमाणें हा आढावा आंकड्यानीं देणें साधनाभावीं शक्य नाहीं. परंतु एक गोष्ट मात्र सांगावयाला हरकत नाहीं व ती हीच कीं, पाद्रींच्या विद्यालयातून मिळालेल्या वांझोट्या व खच्ची शिक्षणाऐवजीं या मिलिटरी शाळांतून मिळणारें शिक्षण विशेष व्यापक स्वरूपाचें व पूर्वग्रहविरहित होतें. पहिलें जेवढें अधपरंपरेचें तेवढेंच हें व्यापक व उज्ज्वल होतें. हीं शभर वर्षें म्हणजे गोमंतकांतील उच्च शिक्षणाचें सुवर्णयुगच होय. बॅर्नार्दु पॅरिश द सील्व्ह, बॅर्नादु फ्रासीस्कु दा कोस्त, जुजे दा कोस्तकापुश, व्हिस्कोंदि द बुसेलुश्, इत्यादि विद्वान याच विद्यालयाचे विद्यार्थी होते.

**वैशेषिक शिक्षणः**—पशुवैद्यकाची शाळा, शेतकी शाळा, उपरोच्चास्ति कला व धंदे यांची शाळा, ( इस्कोल्द आर्तिज् इ ओफीस्युश् ) व्यापारी शाळा व वैद्यक शाळा, यांच्या द्वारें सरकारनें वैशेषिक शिक्षण देण्याचे प्रयत्न केले होते आज मितीस या सर्व प्रयत्नांतून केवळ वैद्यकपाठशाळाच काय ती जीवंत आहे. तिचा विचार स्वतंत्रपणें करावयाचा असल्यामुळें इतर प्रयत्नाचें थोडथोडें स्वरूपदर्शन आधी करूं.

पशुवैद्यकाची शाळा इ. स. १८६६ स्थापन करण्याचें ठरून त्याप्रमाणें एक पशुवैद्य नेमलाही गेला परंतु त्या शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचें लक्षच न गेल्यामुळें इ. स.

१८७० सालीं ही शाळा बंद करण्यांत येऊन तिच्या जागीं शेतकी व पशुवैद्यकाचीं मूलतत्वें याचें शिक्षण देणारी दुसरी योजना पुढें आली परंतु पणजी शहरातच ही शाळा चालवयाची असल्यानें, तिला व्यावहारिक स्वरूप न मिळता तीही पशुवैद्यक शाळेप्रमाणेंच कागदावरून बाहेर पडली नाहीं.

इ. स. १८७१ सालीं लष्करी शाळा बंद होताच तिच्याऐवजीं मागें सांगितलेला इंस्तितूत प्रोफिसियोनाल उघडला गेला. हा इंस्तितूत २१ वर्षें चालला होता व त्यात १ कामगाराचा कोर्स, २ कारखान्यांतील मेस्त्रींचा कोर्स, ३ पब्लिकवर्क्स मधील ओव्हर्सीयरचा कोर्स; ४ बाधकामाच्या मेस्त्रींचा कोर्स; ५ रासायनिक मेस्त्रींचा कोर्स; ६ इंजीन ड्रायव्हरचा कोर्स, ७ शेतकी कामगारांचा कोर्स, ८ सर्व्हेअर्सचा कोर्स, ९ कृषि-विज्ञानाचा कोर्स; ९ इंडस्ट्रियल इंजिनियरचा कोर्स व १० व्यापार शिक्षणाचा कोर्स इतक्या वर्गांची सोय करण्यांत आली होती जुन्या लष्करी विद्यालयाचे अध्यापकच या विद्यालयांत शिक्षकांचें काम करीत असत व त्यांच्या वांटणींत, पूर्वीचा लष्करी बांध-कामाचा अध्यापक, तोफखान्याचा ऑफिसर किंवा लष्करी इंजिनियरिंग मधील आफीसर या विद्यालयात शेतकी शिक्षणाच्या वर्गांवर आणि तसाच दुसरा लष्करी इंजिनियर पायले-टच्या वर्गांचें काम पाहत असे [1] अर्थात्च या साऱ्या धंदेशिक्षणास आवश्यक अशा व्यावहारिक व प्रत्यक्ष ज्ञानाची सोय करतां येणें अशक्य झाल्यामुळें, या विद्यालयातून धंदे कोणीच शिकला नाहीं. गणीत व चित्रकला या दोन विषयांचा मात्र विद्यार्थ्यांना थोडासा उपयोग झाला

इ. स १८९३ त ही वाझोटी शाळा बंद करून तिच्या जागीं वर सांगितलेली कला व धंदे शिकविणारी शाळा सरकारनें उघडली. गिलावा, पेंटिंग, गिल्टिंग, एन्ग्रे-व्हिंग, नकशी, कांतकाम, लोहारकाम, बाइंडिंग, स्कल्प्चर, सुतारकाम, सर्व्हेइंग, चांबडीकाम, वॉचमेकिंग इत्यादि सुधारलेल्या साऱ्या धंद्याच्या शिक्षणाची सोय तींत करण्यात येऊन त्या त्या कलेंतील व धंद्यातील वाकबगार कारागीर पोर्तुगालमधून किंवा ब्रिटिश हिंदुस्थानांतून आणले होते. शाळा पाचच वर्षें टिकली. परंतु बाकी साऱ्या भारेभार धंद्यापेक्षां बाइडिंगचा वर्गच कायतो बराच जोमानें चालला होता व त्याच धंद्याचा फायदा गोव्याला झाला आजमितीस गोव्यात जें बांइडिंगचें सुबक व टिकावू काम होतें तें याच शाळेमुळें होय, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं

हिंदुस्थानांत किंवा आफ्रिकेंत नोकरीप्रीत्यर्थ जाणाऱ्या गोमंतकीयांच्या सोयी-साठीं इ. स १८९९ सालीं बुककीपिंगच्या शिक्षणाची सोय त्यावेळचे गव्हर्नर माशादु यानीं केली. अभ्यासक्रम दोन वर्षांचा होता परंतु त्याचाही लवकरच अस्त झाला.

रिपब्लिकच्या स्थापनेनंतर इ. स १९१८ सालीं पणजी येथें इंस्तितूत कोमेर्सि, याल नांवाची व्यापारी शिक्षणाची शाळा स्थापन झाली इंग्रजी भाषा, फ्रेंच भाषा-पोर्तुगीज भाषा, बुककीपिंग, व्यापारी भूगोल व व्यापाराची सामान्य माहिती, व्यापारी कायदे व राज्य व्यवस्थेचें ज्ञान, इतके विषय तींल शिकविण्यांत येत पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतून जागा मिळण्याचें आमिष होतें तोंवरच या शाळेंत विद्यार्थ्यांची भरती आली होती आणि त्यानंतर त्या शाळेला उतरती कळा लागून शवटीं ती १९२८ मध्यें बंद झाली

सिंहावलोकनानें पाहिल्यास, व्यापारधदा किंवा कलाकौशल्य या बाबतींत पोर्तुगीज सरकारचे प्रयत्न, निदान गोव्यांत तरी, वाझोटेच झाले असेंच हा इतिहास सागतो पोर्तुगीज राष्ट्राच्या जन्मस्वभावाकडे लक्ष्य दिल्यास यांत मुळींच नवल वाटत नाहीं कारण पोर्तुगाल हें व्यापारी राष्ट्रच नव्हे कारखाने किंवा उत्पादक कला या मुळच्या तेथेंच नाहींत. मग विहिरींत नसलेलें पोहोऱ्यांत कोठून येणार.

**वैद्यक पाठशाळाः**—युरोपाबाहेर स्थापन झालेल्या एकंदर पाश्चात्य वैद्यक पाठशाळात पणजीची वैद्यक पाठशाळाच वयानें वडील आहे. आणि कर्तबगारीनेंही तिची योग्यता बरीच उच्च ठरते थेट सतराव्या शतकापर्यंत तिचा उगम शोधावा लागतो. इ. स १६९१ सालीं पोर्तुगालहून एक वैद्य व एक शस्त्रवैद्य असे दोन डाक्टर आले होते व त्यांना इतर कामाबरोबर विद्यार्थी तयार करण्याचें कर्तव्यही नेमून देण्यांत आलें होतें नंतर १७७९ त गोवा सरकारनें पोर्तुगाल सरकारकडे वैद्यांची मागणी केली असतां, " तेथील प्रवीण वैद्यांकडूनच काम भागण्यासारखें असतां वैद्यक-शाळेसाठीं इकडचीं ( पोर्तुगालचीं ) भारी पगाराचीं माणसें मागणें योग्य नव्हे "-असा जबाब गोवा सरकारला आला होता अर्थात् त्या सुमारास इकडे पाश्चात्य वैद्यक-प्रवीण असे डाक्टर होते असें दिसून येतें

परंतु वैद्यक शिक्षणाला व्यवस्थितपणें सुरुवात झाली ती इ. स. १८०१ सालीं झाली अभ्यासक्रम सारा तीन वर्षांचाच होता. यावेळच्या शिक्षकांत भावी हिंदी गव्हर्नर बॅर्नार्दु पॅरिश द सील्व्ह हे देखील होते

इ स १८२१ त अभ्यासक्रमांत थोडीसी सुधारणा होऊन त्याची मुदतही चार वर्षांची झाली हा सारा उपक्रम वैद्यक पाठशाळा या नात्यानें चालत नसून डाक्टर-वर्गाची प्रजेला जी वाढती गरज भासत होती, तिच्यामुळें ही तात्पुरती केलेली योजना होती. आणि इतर कर्तव्यें साभाळून सरकारी डाक्टर या विद्यार्थ्यांना शिकवित होते.

**पाठशाळेची रीतसर स्थापनाः**—गव्हर्नर कौंदि द आंतश् यांनीं इ. स. १८४२ सालीं लुव्हान ( Louvain ) युनिव्हर्सिटीचे पदवीधर, प्रख्यात डॉक्टर रुद्रीगिज् माशादु, यांच्या सल्ल्यानें या पाठशाळेची रीतसर स्थापना केली त्यांनीं आखलेला अभ्यासक्रम चारच वर्षांचा होता व वैद्यक शास्त्र ( मेडिसिन ) शस्त्रवैद्यक व औषधिक्रिया ( Pharmácia ) असे त्याचे तीन स्वतंत्र कोर्स प्रत्येकीं चार वर्षांचे होते या योजनेला पोर्तुगाल सरकारनें मान्यता दिली नव्हती, तरीपण त्यामुळें शिक्षणांत मात्र अडचण आली नाहीं. इ स १८४६ त वैद्यक पाठशालेच्या कौन्सिलनें स्वत.च अभ्यासक्रमाची नवी आखणी केली व ती पोर्तुगाल सरकारांत पाठविली असतां, इ. स. १८४७ तिला मंजुरी मिळाली. रोगनिदानाचे, सामान्य रोग निदान ( Pathologia externa ) व आंतर रोगनिदान ( Pathologia interna ) असे दोन विभाग पाडण्यात आले. त्याचप्रमाणें शस्त्रवैद्यकाचा अभ्यास वाढविण्यांत येऊन शस्त्रवैद्यक व वैद्यक मिळून एकच कोर्स बनला या वेळीं एकंदर ६ विषय होते औषधीक्रियेचा ( फार्मसी ) कोर्स तीन वर्षांचा करण्यांत आला.

इ स १८६५ सालीं वैद्यकीय कोर्स पांच वर्षांचा होऊन कित्येक विषयाचे विभाग पाडून त्यांची संख्या ९ वर आली. फार्मसीचा कोर्स पूर्ववत् तीनच वर्षांचा राहिला. परंतु विषयाच्या वाढीस अनुसरून अध्यापकाची संख्या मात्र ६ झाली.

इ. स १८८८ सालीं गोवा सरकारनें कमीशन नेमून वैद्यकीय शिक्षणाची सुधारणा केली, त्या योजनेनुसार अभ्यासक्रम ६ वर्षांचा झाला व त्याची वांटणी विशेष पद्धतशीर होऊन २१ विषयांपर्यंत त्यांची संख्या आली. परंतु ही योजना अमलांत आली नाहीं. पुढें १८९९ सालीं डॉक्टर वोल्फांग द सील्व्ह यांच्या शिफारसीवरून Bactereólogia व Anatomia microscòpica e pathológica यांचा अभ्यासक्रम आंखून तो मंजुरीसाठीं पोर्तुगालांत पाठविला होता परंतु तो पास झाला नाहीं. १९०७ सालीं व्हाक्सीन व रासायनिक पृथकरण करण्याची ल्याबोरेटरी स्थापन करण्यांत आली रिपब्लिकच्या स्थापनेनंतर आतां चालू असलेला अभ्यासक्रम पुढें दिला आहे.

## रिपब्लिकनंतरचा अभ्यासक्रम.

### प्रथमवर्ष

1. Anatomia discritiva
2. Fisiologia Geral e histològica

### द्वितीयवर्ष

3. Anatomia topogràfica
4. Fisiologia humana
5. Microbiologia

### तृतीयवर्ष

6. Anatomia Patológica c a e dermatològica
7. Materia médica e terapêutica
8. Patologia externa e propendêutica cirúrgica
9. Patologia geral
10. Farmàcia geral e prática परिक्षा नाहीं.

### चतुर्थवर्ष

11. Patologia interna e propendêutica médica
12. Patologia exòtica
13. Medicina operatòria
14. Higiene

### पंचमवर्ष

15. Clìnica mèdica परिक्षा नाहीं.
16. Clínica cirúrgica परिक्षा नाहीं.
17. Obstétrica e ginecologia
18. Medicina legal

इ. सन १८४२ पासून १९१० पर्यंतच्या ६८ वर्षांत ह्या पाठशाळेंतून एकंदर ४४४ डॉक्टर व १३५ केमिस्ट तयार झाले होते इ. स १९१० च्या शिरगणतींत डाक्टरची संख्या २७४ व केमिस्टची १०३ होती आणि १९२१ च्या शिरगणतींत ह्या संख्या अनुक्रमें २२१ व ५० होती. यांत फारतर ४०–५० डॉक्टर ब्रिटीश युनिव्हर्सिटीचे असतील गोव्याबाहेर हिंदुस्थान, आफ्रिका, पोर्तुगाल व त्याच्या वसाहती इत्यादि ठिकाणीं गोव्याच्या वैद्यक पाठशाळेचे बरेच डाक्टर आपला धंदा चांगला चालवित असलेले दिसतात.

१९२७-१९२८ च्या शैक्षणिक सालीं पाठशाळेंत एकंदर १२ अध्यापक होते. आणि वैद्यकीय शिक्षण, फार्मसी, मिडवाइफ्री, नर्सिंग इतके कोर्स तेथें शिकविण्यांत येत.

**डाक्टरीच्या धंद्यांतील हिंदूः**—१८९५ पूर्वीं गोमांतकीय शाळेंतून डॉक्टरी पास झालेले एकच हिंदू डॉ सखाराम विठ्ठल लाड हे होत. १८९६

सालीं ते पोर्तुगाल मध्यें गेले व नेत्रवैद्यकात प्राविण्य संपादन करून आले. त्यानंतरच्या १९२९ पर्यंतच्या काळांत ही संख्या ५०।५५ पर्यंत पोंचली आहे. शिवाय ब्रिटिश युनिव्हर्सिटींतून पास झालेले गोमांतकीय हिंदु डॉक्टर सुमारें १५।२० आहेत व केमिस्टची परिक्षा पास झालेले हिंदू सुमारें ८ १० आहेत.

**स्त्रीशिक्षणाचे प्रयत्न**:—इ स. १८७१ सालीं ज्यूंत जॅराल द प्रोव्हींसिय या कायदे कौन्सिलच्या सूचनेवरून स्त्रियांच्या शिक्षणासाठीं पणजी, म्हापशें व मडगाव, या ठिकाणीं एक एक स्वतंत्र कन्याशाळा उघडण्याचा विचार सरकारनें जाहीर केला. परंतु ही योजना अमलांत न येतां कागदावरच राहिली. पुढें इ. स. १८८७ सालीं मिझेरिकोर्दीच्या आश्रयानें फ्रासिस्कन पंथाच्या नन्सनीं चिंबल येथें एक कन्याशाळा उघडली तींत स्त्रियोपयोगी कामांशिवाय पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्लीश शिकवीत असत पुढें तें पणजीस आलें इ. स १९०१ सालापासून त्यावर सरकारची देखरेख सुरू झाली. रिपब्लिकच्या स्थापनेपर्यंत ती पणजींत कशी तरी खुडुखुडू चालत होती.

१९११ सालीं गोवा सरकारनें नन्स्नीं चालविलेल्या कन्याशाळेऐवजीं, इस्कोल नासियोनाल दु सेक्सु फेमिनीनु नांवाचें दुसरें स्कूल स्थापन केलें व त्यांत पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाच्या सोयी शिवाय पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्रजी या भाषा, संगीत, पेंटींग, पीलो लेसीस, भरतकाम व टेलरिंग इतके स्वतंत्र वर्ग सुरू केले आहेत. मात्र त्याचा उपयोग हिंदुमुलींना घेतां येणें आहारादिकांच्या गैरसोयीमुळें शक्य नाहीं.

या योजनेशिवाय तीनही लिसेवांतून मुलींनीं प्रवेश केला असून तेथें परिक्षेंत त्यांना बऱ्याच पक्षपातानें पास करून घेण्यांत येतें आणि सहशिक्षणाच्या उपक्रमामुळें व स्त्रीशिक्षकांच्या उत्तरोत्तर वाढत्या गरजेमुळें, नॉर्मल स्कुलातहि स्त्रीशिक्षणाची थोडीबहुत सोय होते परंतु एकंदरींत स्त्रीशिक्षणाकडे पोर्तुगीज सरकारचें लक्ष फारसें वेधलेलें दिसून येत नाहीं म्हटल्यास तें सत्यास मुळींच सोडून नाहीं.

**इंग्रजी शिक्षणाची सोय**:—गोमंतकांत ठिकठिकाणीं इंग्रजी शिक्षणाची सोय आहे खरी, परंतु बारदेश प्रांतांत जशी त्याची वाढ झाली आहे तशी इतरत्र कोठेंच झाली नाहीं हें पुढील माहितीवरून दिसून येईल. हळदुणें येथें तीन, आसगावांत पांच, गिरवडें येथें एक, म्हापशात तीन, हडफड्यांत एक, नेरूल येथें एक, सोकोन्डु एक, साळगावांत एक, शिवोली येथें एक, पऱ्हा येथें एक, थियेच्या तीन, मिळून २१ लहान मोठ्या शाळा असून, सेंट जोसेफ हायस्कूल, हडफडें, ( सुमारें ४ शें विद्यार्थी व दहा अध्यापक ), सेक्रेड हार्ट ऑफ जीजस, पऱ्हा, ( सुमारें ४२५ विद्यार्थी व १४ अध्यापक );

सेंट थॉमस हायस्कूल, हळदुर्णे, ( सुमारें साडेतीनशें विद्यार्थी व दहा अध्यापक ), मार्तेर दॅई इन्स्टीटयुशन, साळगाव, सुमारें २५० विद्यार्थी व दहा अध्यापक हीं चार हायस्कूलें असून इतर शाळांतून प्रत्येकीं सुमारें १५०।२०० तरी विद्यार्थी असतात

असोळणें पांच, बाणावली दोन, चांदर एक, चिंचोणें पाच, कोलवें तीन,कुकंळी एक, माजोर्डे दोन, मडगांव सतरा, नावेली दोन, ओडली दोन व राय दोन मिळून सासष्ट कोंसेल्यांत ४२ शाळा आहेत. परंतु यांपैकीं मडगाव येथेंच कायतीं दोन हायस्कूलें असून बाकी शाळांतून एकच अध्यापक असतो असें समजतें. मडगावच्या हायस्कुलांतून प्रत्येकीं सुमारें २०० विद्यार्थी असतात व इतर शाळातून विद्यार्थ्यांची सख्या सुमारें २५।३० चीच असते म्हटलें तरी चालेल

मुरगांव कोंसेल्यांत वास्कोचे रेल्वे स्कूल, सायमन्स हायस्कूल, व सेंट झेवियर स्कूल अशी तीनच स्कुलें आहेत विद्यार्थी देखील बारदेशप्रमाणें भरपूर नाहींत. तूर्त पोर्तुगीज सरकारच्या कायद्यामुळें या शाळातून प्रवेश मिळायला प्रिमैरग्रावाचें सर्टिफिकिट आवश्यक मानलें जाऊ लागलें आहे, किंवा शाळातून पोर्तुगीज प्रिमैरग्राव शिकविण्याची सोय करणें आवश्यक ठरविण्यांत आलें आहे त्यामुळें इंग्रजी शिक्षकवर्ग नाराज झाला आहे.

**आल्मैद कॉलेज, फोंडाः**—हें कॉलेज भिषग्वर दादासाहेब वैद्य यांनी श्री. सीताराम विश्वंभर केरकर याच्या मदतीनें, लिग द प्रोपागांद द इंस्त्रुक्सांव यँ गोअ नावाची जी शिक्षणविषयक लीग १९११ सालीं स्थापन केली, तिच्यामार्फत चालतें आरंभीं तरी कॉलेजचें स्वरूप केवळ किंवा प्राधान्यें करून इंग्रजी शाळेचें होतें. इतिहाससंशोधक दे. भ. द. वि आपटे, दे. भ हरीभाऊ फाटक वगैरे शिक्षक या कॉलेजला मिळाले होते. आज त्यांत प्राथमिक शिक्षणापासून सुरवात करून लिसेवच्या पहिल्या तीन इयत्तांपर्यंत पोर्तुगीज, पांच इयत्तापर्यंत इंग्रजी व मराठी ४ इयत्ता अशी शिक्षणाची व्यवस्था आहे. श्री वैद्य व केरकर यानीं हें कॉलेज टिकवून केवळ लोकाश्रयावर आज १८।१९ वर्षं तें चालविलें आहे हें त्यांना भूषणीय आहे देवालयाकडूनही कॉलेजला मदत मिळविण्याचा प्रयत्न करून त्यानीं तो यशस्वी केला हेंच आम्हाला विशेष कौतुकास्पद वाटतें

**साक्षरतेचें प्रमाणः**—शैक्षणिक परिस्थितीच्या वर्णनांत साक्षरतेचें प्रमाण देताच गोमतकाचा शिक्षणविषयक विचार पूर्ण होईल. मराठी शिक्षणाविषयीं आमच्या प्रयत्नाचें स्वरूप पुढील स्वतन्त्र प्रकरणांतच द्यावयाचें आहे, हें येथें नमूद केलें पाहिजे खालील कोष्टकांवरून साक्षरतेच्या प्रमाणाची कल्पना वाचकांना होईल.

| साल | पुरुष वर्ग. | | स्त्री वर्ग | | एकूण. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकंदर. | पैकींसाक्षर | एकंदर | पैकींसाक्षर | एकंदरलोक | साक्षर. |
| १९०० | २२७३९३ | ३८९६७ | २४८१२० | १२३८२ | ४७५५१३ | ५१३४९ |
| १९१० | २२०९२२ | ४५७८१ | २५५८२९ | १६३३७ | ४८६७५२ | ६२११८ |
| १९२१ | २२१४२९ | ३७९३८ | २४८०६५ | १७३५७ | ४६९४९४ | ५५२९५ |

## शेंकडा साक्षरतेचें प्रमाण.

| साल | पुरुष. | स्त्रिया | एकुण |
|---|---|---|---|
| १९०० | १७,॰ | ४,९९ | १०,७ |
| १९१० | २०,७ | ६,३८ | १२,७६ |
| १९२१ | १७,१ | ६,९९ | ११,७७ |

हे आंकडे केवळ गोमतकाचेच आहेत व ते सरकारी इयरबुकावरून घेतले आहेत. या आकड्यावरून १९१० ते १९२१ च्या दरम्यान् साक्षरतेंत घट झालेली दिसून येते आणि तीही ज्या दशकांत पोर्तुगीज किंवा मराठी शाळांची वाढ भरभक्कमपणें झाली त्याच दशकांत झाली आहे ! यांत कोठेंतरी चुकी झाली असावी असें वाटतें. बाकी ही टकेवारी देखील वास्तविक नाहीं. कारण, ७ वर्षांखालील मुलांचीही संख्या यांत हिशेबीं घेतली गेली आहे शाळांची म्हणण्यासारखी वाढ झाली नसतांही जर १९०० ते ९९१० च्या दशकांत शेंकडा २ ची वाढ झाली आहे, तर १९१० ते १९२१ या कालविभागांत निदान पांच टक्क्यांची तरी वाढ खात्रीनें झाली असली पाहिजे, असें साधारण अनुमान काढावें लागतें. आणि असें गृहित धरल्यास साक्षरतेचें आजचें प्रमाण शेंकडा १६।१७ च्या दरम्यान असलें पाहिजे.

## प्रकरण सातवें.

# मराठी भाषेप्रीत्यर्थ गोमंतकाचें कार्य.

**गोमतकीय भाषेचा प्रश्नः**—गोमतकाची भाषा कोणती असा जर प्रश्न पुढें आला, तर त्याला ती कोंकणी ऊर्फ सारस्वतीच आहे असेंच उत्तर देणें भाग आहे. कोंकणी भाषा तूर्त तरी केवळ बोली भाषा आहे. तिला पूर्वी ग्रांथिक स्वरूप होतें किंवा कसें असा एक व त्याही पलीकडे जाऊन ती स्वतंत्र भाषा होती, कीं तें मराठीचें पूर्वकालीन विकृत किंवा अपभ्रष्ट स्वरूप आहे, असा दुसरा असेहीं दोन प्रश्न आज थोडेसे वादाचा विषय होऊन बसले आहेत आणि या प्रश्नाच्या अभ्यासाला गोमंतकाचे सुपुत्र व कोंकणीचे अभिमानी इतिहाससंशोधक, श्री वामनराव वर्दे वालावलीकर यांनीं वाहून घेतलें आहे. अर्थात या प्रश्नांचा उलगडा सत्यान्वेषण दृष्टीनें त्यांच्याकडून होईलच. म्हणून तूर्त तरी आम्ही या वादांत पडूं इच्छित नाहीं बाकी एक गोष्ट मात्र सांगायला हरकत नाहीं कीं, कोंकणी भाषा ही अत्यंत गोड व गोमंतकीयांच्या जिव्हाळ्याची भाषा आहे व मराठी भाषेचें प्रचंड दडपण बऱ्याच कालापासून गोमंतकीयांवर पडलें असतानाही अनेक संकटांतून कोंकणी भाषा अजूनही गोव्यांतील लोकांच्या वापरात कायम आहे. पूर्व कालापासून मराठीचा प्रसार गोव्यांत बराच झाला असून लेखनव्यवहारात तिचाच उपयोग होत असल्यानें, गोमतकानें मराठीप्रीत्यर्थ काय काय प्रयत्न केले, त्याचें दिग्दर्शन करण्यासाठींच हें प्रकरण लिहिलें गेलें आहे

**मराठीचें शिक्षणः**—जुन्याकाळीं गांवच्या कुळकर्ण्यांनीं किंवा घरच्या वृद्ध मंडळीनें शेजारच्या मुलांना घेऊन बसावें व धूळपाटी, बोळू इत्यादि साधनाच्या द्वारें त्यांना अक्षरओळख करून द्यावी, स्वत किंवा उत्तम अक्षर असलेल्या मुलाकडून इतरांना गिरविण्यासाठीं लिखितें घालून द्यावीं. सामान्यत हीच स्थिति गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत चालू होती म्हटलें तरी चालेल पुढें हा क्रम बदलून मराठी शिक्षणाच्या शाळा सुरू झाल्या. अशा शाळा फारकरून देवळांच्या ‘ सोंडियां ’ वर किंवा एकाद्या घराच्या चौकांत भरत असत शिक्षक गौडसारस्वतब्राह्मणच होते त्यामुळें त्याना “ शेणवीं मामा ” या बहुमानार्थक विशेषणाच्या “ शणैमाम ”

या अष्टभ्रष्ट स्वरूपानेंच ओळखण्यांत येई. ज्या घरांत शाळा भरे, तेथेंच शणैमामाला जेवणखाण मिळत असे आणि दर फसलेवर भाताचा ठराविक खड मिळे. त्याचप्रमाणें दर सणाला नारळ, गूळ, पोहे, तांदूळ इत्यादि जिनसा मिळत. म्हणजे पगार असा जरी नव्हता, तरी आतांच्या पगारी मास्तरांपेक्षांही त्यांच्या कुटुंबपोषणाची सोय या जिनसांच्या रूपानेंच विशेष चांगली लागत होती व इतका त्यांचा योगक्षेम चांगला चालत होता समाजांत शणैमामाचा दर्जा कुळकर्ण्यांच्या खालोखाल महत्वाचा मानला जाई.

शिक्षणाचे विषयही त्याकाळीं फार नसत बालबोध वाचन, मोडी पत्रव्यवहार-वाचन, पत्रलेखन, रेघी अपूर्णांकांपर्यंत गणीत, व्यावहारिक हिशेबलेखन, बालबोध व मोडी लेखन आणि जुन्या कवींचे वेंचे पाठ करणें, इतका सुटसुटीत तो अभ्यास-क्रम होता. एक दोन ठिकाणचे अपवाद खेरीज करून प्रस्तुत लेखकाच्या बालपणा-पर्यंत तो तितकाच साधा असा गोव्यांत चालत होता या अपवादात्मक शाळा मड-गांव, म्हापशें, पणजी, इत्यादि शहरांतून व क्वचित् प्रसगीं एकाद्या खेड्यांतूनही दिसत होत्या.

दुय्यम शिक्षणाची कल्पनाच या जुन्या काळीं नव्हती. तरी एका अर्थी असे दुय्यम शिक्षणासारखे वर्ग गोमांतकांत बरोबर असत म्हटलें तरी चालेल. प्रत्येक पांढरपेशा गृहस्थाच्या ओटीवर, पावसाळ्यांत संध्याकाळीं व इतर ऋतूंत रात्रौ ९ वाजेपर्यंत, जुन्या कवींचीं काव्यें घेऊन जी पंडीतसभा भरत असे, तेथें अखंड चाललेल्या गुडगुडीच्या सरबत्तींतून जे वाद विवाद चालत, तेच दुय्यम शिक्षणाचे वर्ग होते म्हटलें तरी चालेल. ज्ञानेश्वर, मुकुंदराज, श्रीधर, मुक्तेश्वर, वामनपंडीत, मोरोपंत इत्यादिकांच्या ग्रंथांचें, व्याकरण शुद्ध, अलंकार व काव्य या शास्त्रांच्या नियमासहित जें ज्ञान या पंडितसभांतून मिळत होतें, त्याची सर आतांच्या विश्वविद्यालयीन मराठी शिक्षणांत तरी येईल कीं नाहीं याची शंकाच आहे.

हिंवाळ्यांतील जरा ऐसपैस रात्री, ओटीवर पेटलेल्या शेकोटीच्या भोंवतीं बसलेली घराची कर्ती मंडळी, समवयस्क मंडळींत एकाद्या करवलीच्या दिमाखानें वारंवार मिर-वणारी ती गुडगुडी, भिंतीशीं टेंकून ठाणवईच्या प्रकाशांत उंच स्वरानें आलापांत काव्य वाचणारे आसनाधिस्थ शणैमाम, आणि मधून मधून जरा संकोचानेंच शंका विचार-णारा व विद्यार्थीवजा असलेला बाल पौगंडांचा समुदाय, हें दृश्य पाहण्याचें भाग्य, ओझरतेंच झालें तरी प्रस्तुत लेखकाला प्राप्त झालें आहे. मुळचा दुय्यम व उच्च शिक्ष-

गाचा वर्ग हाच होता. आणि तो इतका कार्यक्षम होता कीं, काळाच्या कराल दाढेंतून चुकलेला त्यांतला एकादा मुरब्बी अद्याप जर कोठेंही सांपडला तर त्याचें मराठी भाषेचें छंद-शास्त्र, अलंकार इत्यादींचें ज्ञान ऐच्छिक मराठी घेतलेल्या कोणत्याही आधुनिक एम ए. पंडिताला चार धडे देण्याइतकें खात्रीनें असेल. या वर्गांचा दुसरा फायदा म्हणजे, मुलांना त्यांतून अनायासेंच भारतीय संस्कृतीचें ज्ञान होई. महाभारत व रामायण यातील महत्वाचे प्रसंग तर सोडाच, पण बारीक सारीक कथा व विशेष महत्वाचे वादविवाद माहित नसलेले तरुण त्या काळीं विरळाच होते.

**पहिल्याच आधुनिक मराठी शाळा:**—या विषयींची माहिती तत्कालीन वृत्तपत्राच्या फायलींच्या अभावामुळें, जुन्या माहितगार गृहस्थाकडून मिळविलेली तेवढीच देत आहों म्हापशें येथें नूतन पद्धतीनें मराठी शिक्षण देणारी शाळा इ. स. १८९० च्या सुमारास श्री. रामचंद्र दत्तात्रेय कुळकर्णी उर्फ रामभाऊ आजरेकर यांनीं स्थापन केली होती व तिच्या खालीं बारदेश प्रांतात बऱ्याच शाळा स्वत:च्या देखरेखीखालीं चालविल्या होत्या गोवापंच या साप्ताहिकांतही रामभाऊंचें अंग बरेंच होतें. गोमंतकांतील मराठी शिक्षणाच्या अभिवृद्ध्यर्थ यांनीं कांहीं रकम आपल्या दोन शिष्यांच्या नांवें ट्रस्ट करून ठेविली होती, पण पुढें तिचें काय झालें व कोणाच्या उदरांत ती गडप झाली, याची माहिती प्रस्तुत लेखकास नाहीं. मडगांव येथें श्री. अनंत रामकृष्ण रेडकर यांनीं शाळा घातली होती शाळेंतील भूगोलशिक्षणाची उणीव भरून काढण्यासाठा त्यांनीं गोमंतकाचा भूगोलही पण तयार केला होता हाच गोमंतकाचा पहिला भूगोल होय त्यांच्याच वेळीं श्री तात्याजी सीताराम पाटकर यांनींही शाळा उघडली होती व गोमंतकाचा मराठीत नकाशा श्री. पाटकर यांनींच छापून आणविला होता.

आरंभापासूनच या शाळांमधून मुलांमुलींनां एकत्र शिक्षण मिळत असे शणैमामांच्या काळीं मात्र मुली फारशा शाळेंत जात नव्हत्या. तथापि घरांतून रात्रीं जी पोथी वाचण्यांत येत असे, तिच्या श्रवणानें स्त्रीवर्गाला मराठीचें ज्ञान होई. त्याचप्रमाणें पुष्कळशा पांढरपेशा घराण्यांतून मुलींना बापाकडून किंवा भावंडांकडून लिहिण्यावाचण्यापुरतें ज्ञान मिळे.

अशी ही स्थिति इ. स. १९०० पर्यंत होती. तोंपर्यंत सारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील सर्व पुरुष वर्ग व कांहीं स्त्रिया, वैश्य वर्गांतील पुरुष, मराठा समाजापैकीं बरीच मंडळी व गायक समाजांतील कांहीं लोक, इतक्यानांच कायतें शिक्षण मिळत असे. त्यानंतर

च्या काळांत साऱ्या गोमंतकभर मराठीच्या शाळाच शाळा स्थापन होऊं लागल्या. परंतु त्याचें वर्णन करायच्या आधीं सरकारचे मराठीशीं काय संबंध होते तें पाहूं.

**पोर्तुगीज सरकार व मराठी भाषाः**—बाटाबाटीच्या काळीं झालेले अनन्वित जुलूम आपण तिसऱ्या प्रकरणांत सविस्तर पाहिलेच आहेत. धर्मप्रसार व संस्कृतिवर्धन हेंच कायतें पोर्तुगीजांचें प्रधान ध्येय होतें आणि म्हणूनच देशभाषा प्रचारांतून नष्ट करण्यासाठीं त्यांनीं भगीरथ प्रयत्न केले परंतु भाषा म्हणजे संस्कृतींतील अत्यंत महत्वाचा दुवा होय संस्कृतीच्या घटकांपैकीं इतर सर्व बाबी कदाचित् सोडतां येतील परंतु भाषेचा त्याग करणें अत्यंत दुर्घट गोष्ट आहे, हें सत्य पोर्तुगीजांच्या लक्ष्यांत यायला देखील फारसा काळ लागला नाहीं. परंतु त्या अगोदर धार्मिक वेडाच्या भरांत, हातीं सांपडले ते सारे ग्रंथ, त्यांतून पाखंडमताचा अनुवाद केला असल्याच्या सबबीखालीं, त्यांनीं जाळून फस्त केले होते सनदशीर राज्यपद्धति अंमलांत येऊन स्थिरस्थावर होतांच हिंदूंच्या भाषेकडे सरकारचें लक्ष गेलें

मराठी शिक्षणाकडे पोर्तुगीज सरकारचें लक्ष वेधण्याला, इ स १८६९ त शिक्षण तपासणी मंडळाच्या ज्या रिपोर्टांचा मागें पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाच्या विवेचनांत उल्लेख झाला आहे, तेच कारणीभूत झाले. त्यापैकीं नवीन काबिजादींच्या रिपोर्टांत खालील मजकूर होता. " शिरोड्यासारख्या खेड्यांत देखील मराठी शिक्षणाच्या शाळा चालत असून त्यांत पुष्कळच मुलें शिकतात परंतु पोर्तुगीज शिकण्यास विद्यार्थी मुळींच मिळत नाहींत तेव्हां देशी व पोर्तुगीज या उभय भाषा उत्तम प्रकारें अवगत असलेला शिक्षक ठेवून त्याकडून देशभाषेच्या द्वारें पोर्तुगीज शिकविणाऱ्या शाळा काढल्यास बराच फायदा होईलसें वाटतें " आणि हीच सूचना सरकारी मराठी शाळांच्या उत्पत्तीस कारण झाली इ. स १८७१ सालीं नवीन काबिजादींतील शाळा, लूझो-मराठी स्वरूपांत चालाव्या असा हुकूम सुटला परंतु उभय भाषांत प्रवीण असे शिक्षकच दुर्लभ असल्यामुळें, इ. स. १८७९ पर्यंत तरी नव्या काबिजादींतील साऱ्याच शाळा तशा बनूं शकल्या नाहींत इ स १८८७ सालीं नव्या काबिजादींतील एकंदर १२ शाळांपैकीं डिचोली, फोंडें, सांगें व काणकोण ह्या चारच शाळा काय त्या या स्वरूपांत चालत होत्या इ. स १८८८ सालीं केंपें येथें एक नवी शाळा उघडण्यांत आली व १८९७त दादाराण्यांच्या बंडाच्या गडबडींत, वाळपै येथें एक शाळा स्थापण्यांत आली. नंतर त्याच सुमारास सांगें येथील म्युनिसीपल कमिटीच्या खर्चानें रिवण मुक्कामीं तिसरी शाळा सुरू होऊन एकंदर सात शाळा पोर्तुगीज मराठी शिक्षण देणाऱ्या झाल्या.

यातून सांगें कोंसेल्यांतील दोनही शाळा फिरत्या स्वरूपाच्या (escolas móveis) असत व त्या सांगें, किर्लपाल, दाभाळ, कुर्पें, धारबांदोडें, मलें, सांकोर्डें, इत्यादि ठिकाणीं फिरत असत मेजर टी क्यांडी साहेबांच्या क्रमिक पुस्तकाच्या तीन इयत्ता, पोर्तुगालचा भूगोल व इतिहास, मेट्रिक सिस्टीम व दशांक अपूर्णांक, एवढाच त्यांचा अभ्यासक्रम होता.

पूर्वी सांगें कोंसेल्यातील प्रत्येक शिक्षकाला १५ रुपये, वाळपईच्या शिक्षकाला २२॥ रुपये व इतर ठिकाणच्या शिक्षकाना प्रत्येकीं वीस रुपये असा दरमहा मिळत असे.

इ स. १९११ सालीं साऱ्या शिक्षकांना एकाच स्केलानें पगार मिळूं लागला व त्याचें प्रमाण पोर्तुगीज प्राथमिक प्रोफेसराच्या तिसऱ्या वर्गाप्रमाणें ठरविण्यांत आलें. मात्र मराठीच्या शिक्षकांना वढती नव्हती. अर्थांतच त्याना आतां ३५ रुपये दरमहा मिळत होता

रिपब्लिकच्या स्थापनेच्या सालीं या सातही शाळात मिळून एकंदर १३६ मुलें शिकत होतीं. पैकीं परिक्षेला केवळ १२ च बसलीं होतीं. या मराठी शाळेच्या परिक्षेचा पुढें उपयोग नसल्यामुळें किंवा ह्या परिक्षा केवळ औपचारिकच दिसत असल्यामुळें, शाळांतूनही फारसे विद्यार्थी नसतात आणि असले तरी त्यांचें लक्ष्य परिक्षेचा अभ्यास करण्याकडे नसतें.

रिपब्लिकच्या स्थापनेनतर १९११ सालीं सांखळी येथें एक शाळा स्थापण्यांत आली व शाळांचा नंबर साताऐवजीं आठ झाला. शिक्षणाची स्थिति मात्र पूर्ववत होती. इ. स. १९०७ पासून आजवर ह्या शाळांतून रिकाम्या झालेल्या शिक्षकांच्या जागांवर कायद्याप्रमाणें उघड परिक्षा घेऊन एकाही शिक्षकाची नेमणूक झालेली नाहीं. सारे शिक्षक अक्टिंग याच सदरा खालीं कामावर होते.

इ स. १९२०-१९२२ सालीं या आठही शाळांतून २२८ मुलें शिकत होतीं. त्यापैकीं १४ परिक्षेस बसलीं होतीं. शिक्षणाचें गाडें यथातथाच असल्यामुळें अजूनही या शाळांचा फायदा प्रजेला मिळावा तसा मिळत नाहीं.

इ स १९१३ सालीं रुपयाची किंमत ४०० रैसा ऐवजीं ३५० रैसावर आणली गेल्यानें, ३५ ऐवजीं दरमहा ४० रुपये मिळू लागला व पुढें १९२२ च्या पगारवाढींत आज मितीस तो ५९॥ रुपये झाला आहे. यांतून शेंकडा ५ टक्के पेन्शनफंड व २ टक्के इन्कमटयाक्स घेण्यांत येतो.

इ. स १९२३ त शाळांची ही वांशोटी योजना बदलून शिक्षणक्रम दोन ग्रावांत विभागला गेला व मराठी सेगुंद ग्रावाच्या परिक्षेस पोर्तुगीज प्रिमैर ग्रावाची लायकी देण्यांत यावी असें कायद्यानें ठरलें होतें परंतु हा कायदा अमलांत येण्यासाठीं जे कानू करावे लागतात ते अजून झाले नसल्यानें, ती सुधारणा दफ्तरच्या वाढीला मात्र उपयोगी पडली. नाहीं म्हणायला या कायद्यानें एक दोन अॅक्टिंग शिक्षकांचा मात्र फायदा झाला व उघड उघड चढाओढीच्या परिक्षेशिवाय ते कायम झाले. दफ्तरदाखल अशा कायद्याची दुसरीही एक गोष्ट म्हणजे, रिपब्लिकन सरकारनें नव्या काबिजादींच्या हातावर १९१३ सालीं सोडलेल्या वीस शाळाची होय. या शाळातून नेमावयाचे शिक्षक मराठी जाणणारे असून त्यांनीं मराठींतूनच पोर्तुगीज शिकवावें असा ठराव झाला होता. परंतु मराठीच्या दुर्दैवामुळें ही अटही दफ्तरदाखलातच जमा झाली व पोर्तुगीज शाळांची सख्या फुगण्याकडे मात्र त्याचा उपयोग झाला त्यातील ९।१० शिक्षक देखील नव्या काब्रिजादीं ऐवजीं जुन्याच काबिजादींत नेमले गेले !

यानंतरची मह वाची घडामोड म्हणजे, सांगे कोंसेल्यांतील उभय मराठी शाळांची झालेल्या उच्चाटणाची होय १९२४ सालीं सांगें म्युनिसिपालिटी तात्पुरती बंद करून सरकारनें तिचा कारभार आल्फॅरिश ( सेकंड लेफ्टेनंट ) व्हिलार या पोलिस अंमलदाराच्या अध्यक्षतेखालीं एक कमेटी नेमून तिच्या हातीं दिला दाभाळच्या शाळेला जी वार्षिक १८० रुपयांची रक्कम म्युनिसिपल तिजोरींतून मिळत होती ती या कमेटीनें काटकसरीच्या सबबीखाल बंद केली. त्यामुळें १९२५ अखेरीस ही शाळा बंद झाली. कुर्डीच्या शाळेला घर व विद्यार्थी नाहींत म्हणून तीही यापूर्वींच १९२४ सालीं बंद झाली होती ही जरी बाह्य कारणें असलीं तरी अतस्थ कारणें निराळीं होती व त्यांचें मूळ त्यावेळच्या निवडणुकांच्या कारस्थानांतून उत्पन्न झालें होतें असें म्हणतात १९२६ सालच्या जुलई महिन्यांत कुर्डीची बद केलेली शाळा बऱ्याच प्रयत्नानें दाभाळ मुकामीं बदलून पुनः उघडण्यांत आली अर्थात् आजमितीस मुळच्या आठ शाळापैकीं सातच शिल्लक आहेत १९२७–१९२८ सालीं या सातही शाळांत मिळून २३३ विद्यार्थी होते, त्यात १७६ हिंदु, २८ ख्रिस्ती व २९ मुसलमान होते परिक्षा मात्र १० च जणांनीं दिली

**हिंदु प्रजेचे खासगी प्रयत्नः**––प्रस्तुत लेखकानें १९२५ सालीं गोव्यातील मराठी शिक्षणसस्थाची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला होता. त्या प्रयत्नांत सांगें, केपें, काणकोण, सासष्ट, सुरगांव, तिसवाडी व बार्देशाचा अर्धा अधिक भाग इतक्या क्षेत्रांतील एकंदर शाळा त्यानें स्वत हिंडून पाहिल्या होत्या. गोव्याची शिक्षणविषयक

गाहणी करावयाची असल्यामुळें बऱ्याच प्रयत्नानें एकंदर शाळांची संख्या व स्थळें अगाऊच मिळविलीं होती. पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें हा प्रयत्न तितक्यावरच राहिला.

परंतु ह्या मिळविलेल्या माहितीवरून गोव्यात सुमारें १७८ शाळा केवळ हिंदुजनतेच्या प्रयत्नानें चालत होत्या असें त्याला दिसून आलें होतें. वास्तविक पाहिल्यास, या शाळांना स्थैर्य असें मुळींच नाहीं. कारण गांवातील एखाद्या गृहस्थाच्या आश्रयाखालीं किंवा चार दोन होतकरू तरुणाच्या प्रयत्नानें या शाळांची उत्पत्ति होत असते अर्थात् उत्साहाचा हा पहिला वेग ओसरताच शाळा थडावतात असें जरी असलें तरी लोकांत शिक्षणाभिरुचि इतकी वाढली आहे कीं, कोणाच्याही प्रयत्नानें का होईना पण एकदां गावात चार दोन वर्षें शाळा चालली, म्हणजे ती बंद पडल्याचें उदाहरण सहसा दिसून येत नाहीं अधिकारी मंडळ, शिक्षक किंवा शाळेची जागा, यांत मात्र वारवार फेरबदल होतात. गोमतकीय शाळांपैकीं स्थैर्य मिळालेल्या अशा शाळा बऱ्याच कमी आहेत आणि व्यवस्थेशीर नियमबंदी व इतर कानु तयार होऊन ज्याचा कारभार चालतो अशा शाळा त्याहीपेक्षां थोड्या आहेत. मात्र या थोड्याच शाळांतील शिक्षणकार्य इतकें उच्च दर्जाचें असतें, कीं त्याला महाराष्ट्राच्या इतर भागांत देखील मोठ्या मुष्कीलीनेंच जोड मिळेल ब्रिटिश शिक्षण खात्यांतील बऱ्याच एज्युकेशनल इन्स्पेक्टरनीं या शाळांची परिक्षा घेतली असून त्यांनींही अशाच सारखे शेरे दिले आहेत. इ. स १८२५ सालीं मिळविलेली माहिती पुढील कोष्टकांत संकलीत केली आहे. माहिती न मिळालेल्या ७५ शाळांतील मुलांचें प्रमाण, शिक्षक व त्यांचा पगार, इत्यादि बाबी इतर शाळांच्या सरासरीवरून काढल्या तर या शाळांत आणखी ३४०० मुलें शिकत असून सुमारें सतराशें रुपये पगारादाखल आणखी जमेस धरावे लागतात. आणि हे आकडे वरील कोष्टकांत मिळविले म्हणजे गोमतकांतील २,१८,२२३ हिंदुलोक आपल्या मुलांना मराठी शिकविण्यासाठीं, दरसाल सुमारें ४८ हजार रुपये खर्च करतात. प्रत्येक हिन्दू साडेतीन आणे कर आपखुषीनेंच मराठी प्रीत्यर्थ भरतो असा त्याचा अर्थ झाला. दुसऱ्या रीतीनें पाहिल्यास हा खर्च ८०८४ मुलांप्रीत्यर्थ होतो. म्हणजे शाळेंत जाणारा प्रत्येक विद्यार्थी दरमहा आठ आणे फी देतो असेंच म्हणावें लागतें मराठी भाषेसाठीं गोमातकीय हिंदूंनीं कोणता स्वार्थत्याग केला आहे अशा प्रश्नास हें उत्तर पुरेसें नसल्यास, पुढे वाङ्मयविषयक प्रयत्न इत्यादि वर्णनांत तें मिळेलच. तूर्त आपण कांहीं प्रमुख प्रमुख विद्यालयांची भेट घेऊं. या शाळांची माहिती देतांना एक गोष्ट अवश्य लक्ष्यांत घेतली पाहिजे, कीं या बहुतेक शाळा रिपब्लिकच्या स्थापनेनंतरच उत्पन्न झाल्या आहेत.

| कौंसेल्य | शाळांची संख्या | | | दरमहा पगार | मुलांची संख्या | शिक्षकांची संख्या | विशेष माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पाहिलेल्या | न पाहिलेल्या | एकूण | | | | |
| तिसवाडी | १७ | ० | १७ | ४७५ | ८७५ | २२ | |
| बारदेश | २४ | ८ | ३२ | ६४५ | १२६४ | ४० | |
| सासष्ट व मुरगांव | २२ | २ | २४ | ६५२ | १२७५ | २८ | कांहीं शाळा शिक्षकांनींच स्वतः चालविलेला असून त्यांचा पगार फी इतका धरला आहे. |
| केपें | १३ | ... | १३ | २१५ | ४५८ | १४ | |
| पेडणें | ० | १४ | १४ | ... | ... | १४ | |
| सांखळी | ... | १६ | १६ | ... | ... | १८ | |
| फोंडें | | ३५ | ३५ | ... | ... | ३९ | |
| सांगें | ९ | ... | ९ | १७६ | ३१२ | ९ | |
| काणकोण | १० | ० | १० | १८५ | ३९६ | १० | कांहीं शाळा शिक्षकानीं स्वत- चालविल्या आहेत त्यांना १५ रु पगार धरला आहे |
| सत्तर | ८ | .. | ८ | ... | ... | ८ | |
| एकूण | १०३ | ७५ | १७८ | २३४८ | ४६७९ | २०२ | |

**१ मुष्टिफंड संस्था पणजी:**—ही संस्था मूठमूठ तांदूळ देणाऱ्या सभासदांच्या सहाय्यानें ता. ५ अक्टोबर १९०८ रोजीं उभारली गेली. इ. स. १९१३ आगष्ट २९ रोजीं तिची नियमावली सरकारांत पास झाली हिच्यातर्फे तूर्त दोन शाळा चालतात. श्री महालक्ष्मीच्या सभामंडपांत भरणाऱ्या श्री महालक्ष्मी विद्यालयांत तूर्त ९१ विद्यार्थी असून त्यांत ४२ मुली आहेत. आणि मळ्यांत संस्थेच्या मालकीच्या घरांत भरणाऱ्या श्री सरस्वती विद्यालयांत ११८ विद्यार्थी असून त्यापैकीं ४७ मुली आहेत. प्रत्येक शाळेंत दोन दोन शिक्षक आहेत. संस्थेच्या मालकीची अशी एक इमारत मळ्यांत असून दुसरी जवळ जवळ तयार होत आली आहे. पहिल्या इमारतीची जागा सरकारनें दिली होती व दुसरीची श्री महालक्ष्मी देवालयाच्या ताब्यांतली आहे.

तांदळाऐवजीं आतां रोकड वर्गणीच घेण्यांत येते. ह्या शाळेला परिक्षकाकडून उत्तमोत्तम शेरे मिळाले आहेत. शिक्षणक्रम मराठी चौथी पर्यंतच असतो.

**२ सारस्वत विद्यालय म्हापशें**:—म्हापशें येथें १९१० सालच्या डिसेंबरांत भरलेल्या दुसऱ्या संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेनें मिळविलेल्या फंडांतून ही मराठी शाळा चालली आहे. तिला १९११ सालीं सुरुवात झाली. सुमारें १५-२० हजार रुपये खर्चून बांधलेली प्रशस्त आणि सुंदर मध्यवर्ति इमारत या शाळेच्या मालकीची आहे बांकें, शालोपयोगी सामान, इत्यादि उपकरणांनीं युक्त अशी ही शाळा प्रमुखत्वें मुंबईचे श्रीमंत शांताराम नारायण दाभोळकर यांच्या दानशूरतेमुळें, प वा. काकासाहेब दणाईत ह्यांनीं अत्यंत परिश्रम करून नावारूपास आणली तूर्त या शाळेंत ५ शिक्षक काम करीत असून १९३ विद्यार्थी शिकतात त्यांपैकीं ४३ मुली आहेत. शिक्षणदानाच्या कामीं या ठिकाणीं स्पश्यास्पृश्यता, धर्मभेद, जातिभेद, वर्णभेद इत्यादि साऱ्या भेदानीं रजा दिली आहे परिषदेच्या फंडाचें व्याज सुमारें ४०० रुपये, श्री. शांताराम ना दाभोळकर यांच्या देणगीचें व्याज स्वतंत्रपणें सुमारें २५० रु, कै. बाळकृष्ण बाबुराव तेलग यांनीं दिलेल्या इस्टेटीचें उत्पन्न सुमारें १०० रुपये; फीचें उत्पन्न सुमारें ६०० रुपये, बारदेश म्युनिसिपालिटीची ग्र्यांट १८० रुपये; वर्गणीदारांची वर्गणी २५० रुपये व इतर देणग्या मिळून अजमासें १८०० रुपये उत्पन्न आहे. खर्चाचें मान वाढतें आहे. संस्थेची नियमावली सरकारांत नमूद व मंजूर झाली असून रिझर्व फंड १२७०० आहे सांप्रत संस्थेचे चिटणीस श्री शांबाराव सरदेसाई असून खजिनदार मुंबईचे श्री शांताराम ना दाभोळकर हे आहेत.

**३ श्री दामोदर विद्यालय मडगांव**—ह्या शाळेची स्थापना १९१२ च्या जानेवारींत झाली. मडगांवच्या मठग्रामस्थ हिंदुसभेमार्फत नेमण्यांत आलेल्या शिक्षणमंडळाकडून तूर्त तिचा कारभार चालतो आरंभीं बरींच वर्षे श्रीयुत विष्णु रामचंद्र नायक यांच्या देखरेखीखालींच ती चालत होती श्रीयुत नायक यांच्याकडे असलेल्या "दहाजण" नामक संस्थेच्या फंडाच्या व्याजातून ते ही शाळा चालवीत असत पुढें मडगांवांत शिक्षण प्रसारक संघ नावाची संस्था स्थापन होऊन तिच्या हातीं शाळेचीं सूत्रें गेलीं परंतु श्री. विष्णु नायक यांची अमोल मदत शाळेला होतीच या दोन वर्षांत मठग्रामस्थ हिंदुसभेची स्थापना होताच संघानें ही संस्था हिंदुसभेच्या ताब्यांत दिली. तूर्त या विद्यालयाच्या, मुख्य शाळा, शाळा क्रमांक १ ला व शाळा क्रमांक

दुसरा, अशा तीन शाळा चालतात, मराठी शिक्षणाकडे एकंदर ८ शिक्षक असून पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाचाही एक वर्ग मुख्य शाळेंत चालतो. पोर्तुगीज शिकणारे विद्यार्थी २५ आहेत मराठी विद्यार्थी एकंदर ३८१ असून त्यांतून १२० मुली आहेत मराठी अध्यापकांचा पगार १९७ रु दरमहा आहे. फीचें उत्पन्न सरासरी १३० रु असतें. शाळेला मठग्रामस्थ हिंदुसभेंतून मदत मिळते मडगांवच्या श्री दामोदर विद्या-भुवनाजवळ धर्मशाळा बांधून तींत मुख्य शाळा चालते व बाकी दोन शाळा भाड्याच्या घरांतून भरतात. शाळेच्या परिक्षा घेणाऱ्या तज्ज्ञांनीं वेळोवेळ तिला उत्तम शेरे दिले आहेत शिक्षणक्रम पांच इयत्तांचा आहे.

**शारदा विद्यालय, कुंभारजुवें:**—या विद्यालयाची स्थापना इ. स १९१३ झाली श्रीयुत गणेश शिवराम सामत हे या शाळेचे मुख्य अध्यापक आहेत किंबहुना ते तिचा आत्माच आहेत म्हटलें असता चालेल. त्यांच्या कळकळीमुळें कुंभारजुव्यांतील या शाळेला स्थानिक व इतर ठिकाणच्या सद्गृहस्थांची मदत मिळविता आली. तूर्त तींत तीन शिक्षक काम करित असून विद्यार्थ्यांची संख्या १६० आहे त्यांतून ४० मुली आहेत. शाळेचे वार्षिक उत्पन्न १ हजार व खर्च तेवढाच आहे. श्री. सामंत व स्थानिक पुढारी यांच्या प्रयत्नानें शाळेला दहा बारा हजार रुपयांची इमारत बांधता आली. तूर्त तिचें काम अजून अपुरेंच आहे. शाळेंत ५ इयत्तांचा अभ्यासक्रम चालत असून दर-साल श्री सरस्वती उत्सवांत व्याख्यानमालाही चालते नवीन पद्धतीनें शिक्षण देण्यांत या शाळेची प्रख्याती आहे. चांगल्या चांगल्या परिक्षकांनीं ही शाळा तपासून उत्कृष्ट शेरे दिले आहेत

**ज्ञानप्रसारक संघ, म्हापशें:**—ही संस्था वैश्य समाजानें स्थापन केली असून शिक्षण मोफत असणें हा तिचा विशेष आहे. इ स १९०८ सालीं तिची स्थापना झाली. शाळा व वाचनमंदिर अशा तिच्या दोन पोटसंस्था आहेत. शाळेंत तूर्त तीन शिक्षक असून १४० मुलगे व ४५ मुली मिळून १८५ मुले शिक्षण घेतात. शिक्षण ४ इयत्तापर्यंत चालतें संस्थेतर्फे इतर चळवळीही चालतात. म्हापशें येथील वैश्य समाजात जी जागृति दिसते तिचें श्रेय या संस्थेकडे आहे दासनवमी, शिवज-यंति, शारदोत्सव, गीताजयंति इत्यादि उत्सवही होतात. उत्पन्न सुमारें १५० व तेवढाच खर्च आहे.

**विद्यावर्धक मंडळ, डिचोली:**—इ. स. १९१२ सालीं आगस्टच्या १ ल्या तारखेस संस्था स्थापन होऊन ता. १ जानेवारी १९१३ रोजीं शाळा सुरु झाली.

हल्लीं तींत चौथ्या इयत्तेपर्यंत शिक्षण मिळतें. तींत १२१ विद्यार्थी असून त्यांतील १९ मुली व तीन अस्पृश्य आहेत. मासिक फी ३० रु., वर्गणी ४५ रु., फंडाचें व्याज २५ रु., मिळून दरमहा शंभर रुपये उत्पन्न असून तीन शिक्षकांचा पगार ८५ रुपये व किरकोळ खर्च १५ रु. मिळून नेवढाच खर्च आहे कायम फंडांत तूर्त ४ हजार रुपये आहेत. संस्थेला स्वतःची इमारत सुमारें ५ हजार रुपयाची हल्लींच बांधलेली आहे. संस्थेतर्फे वाचनालयही चालतें.

**वाङ्मयविषयक प्रयत्नः**--गोमतकीयाचे वाङ्मयविषयक प्रयत्न काव्य-रचना, गद्यग्रंथरचना व नियतकालिकें अशा तिहेरी स्वरूपाचे आहेत. क्षेत्राच्या आकुंचितपणामुळें किंवा इतर अनेक कारणांमुळें, गोमंतकाचे हे प्रयत्न बऱ्याच अंशी अप्रकाशितच राहिले आहेत सृष्टिसौंदर्याच्या विपुलतेचा परिणाम कविप्रतिभे-वर साहजिकच होत असतो. तसा तो इकडेही झालाच बहुतेक गोमंतकीय कवींची कृति सुलभता, प्रासाद, माधुर्य इत्यादि गुणांनीं रमणीय स्वरूपाची झाली आहे कुंवेचे रहिवाशी तुकारामबावा वर्दे यांची कविता भक्तिरसानें ओथबलेली आहे. त्यांच्या कवितेपैकीं नीतिशतकाचें भाषांतरच कायतें मुद्रित झालेलें आहे यांचा जन्म १५७२ च्या सुमारास झाला होता नायक स्वामींचीं पद्यें अजूनही श्रीस्थळ मगो-शींत पालखीकडे म्हणण्यात येतात. गोमंतकांत मोरोपंती आर्या श्रांनींच प्रथम आणिल्या. फोंडेंचे पांडोवा कैसेरे यांची कविता देखील रसाळ आहे. त्यांचें द्रौपदी-स्वयंवर फार प्रसिद्ध आहे. याशिवाय हनुमत सवाद, शिवनिशाख्यान, थालिपाक इत्यादि काव्येंही त्यानीं रचिलीं इ. स १७५० च्या सुमारास सुवृत्तमुक्तामाला नांवाचें काव्य हरी पंडीत यांनीं केलें. त्यांत छंदशास्त्राचे विवेचन आहे पांडोबा दुभाषी हे डिचोलीचे रहिवासी होते. त्यांचीं वेदांतपर पद्यें बरींच प्रसिद्ध आहेत. महाशेलचे रहिवासी शिवराम शास्त्री सुखठणकर उर्फ सोयरूभट्ट यानीं वेदांतचूडामणी ग्रंथावर समश्लोकी व संध्यामंत्रार्थदीप असे दोन ग्रंथ इ स. १८७७ साली रचलेले अप्रकाशित आहेत. डोंगरीचे कै कृष्णभट बांदेकर यांचीं भक्तिपर पद्यें फारच रसाळ आहेत १८८२ सालीं अबकारी खात्यांत कै अण्णा किर्लोस्कर इकडे आल्यावेळीं भटजींच्या डोंगरीवरील नाटकांचे प्रयोग पाहून ते खूष झाले व भटजींकडेच त्यांनीं नारळ प्रसादासह नाट्य-रचना व नाटक यांचा उपदेश घेतला होता बांदेकरांचा स्वात्मतत्वामृतशतक हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे पेडणेंचे राघोबा प्रभू देसाई यांनीं अनेकार्थध्वनिमंजिरी नांवाचा आर्याकोश केलेलाही चांगलाच आहे. कै. हिरबा नाईक सरदेसाई यांची

बरीच कविता चांगल्या पैकीं असून अजून अप्रसिद्धच आहे. कै माधव नारायण वैद्य याची महाडदोळची यात्रा हें पुस्तक फारच सुंदर आहे. कै भिमाजी मुकुंदराव देशपांडे हे पणजीचे गृहस्थ उत्कृष्ठ कविता करीत हे मराठी प्राथमिक शाळचे प्रोफेसर होते याची कविता स्फुट असून " वज्रदेही " या टोपण नांवानें मासिकांतून नि यतकालिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाली आहे.

विद्यमान कवींत श्री रामचंद्र पाडुरंग वैद्य यांची पथ्यबोध मासिक पुस्तकातील कविता फारच सुरस आहे. महाशेलचे श्री. रामचंद्र वामन नायक करंडेशास्त्री यांची सत्संग मासिकांतून " तोच मी " या सहीनें आलेली उपहासात्मक कविता उत्कृष्ट आहे. पेडण्याचे वे दत्तात्रेय तुकाराम पणशीकर यांची " जामात्यास नजराणा " " व्रतबंध वर्णन " इत्यादि कविता प्रासादिक व काव्यपूर्ण आहे. असोळडेंचे श्री विष्णु रंगाजी शेळडेकर यांचें चंद्रेश्वरमहात्म्य उत्तम काव्यांपैकीं आहे. या आमच्या मित्रांची बरीच स्फुट कविता अजून अप्रकाशित आहे यांच्या देवीचारितामृत या सुन्दर ओवीबद्ध पुस्तकाला दुसऱ्या आवृत्तीचें भाग्य लाभलें आहे. काकोडेंचे श्रीयुत रामकृष्ण अनंत काकोडकर हे देखील चांगल्यापैकीं कवि आहेत. त्यांचें " जिबबादादावक्षी चरित्र प्रसिद्ध झालेलें आहे.

आतां आमच्या सोबत्यापैकीं सांगावयाचें राहिलें. या मंडळींत श्री. यशवंत सू. सरदेसाई यांची काव्यशक्ति बऱ्याच उच्च दर्जाची आहे, नमुन्यादाखल "दुध सागर" 'गोमंतका जागा हो.' व दे दास यांच्या वरील त्यांच्या कविता मनोरंजन व हिंदूंत प्रसिद्ध झालेल्या पहाव्या शिवाय अनेक मासिकांतून त्यांच्या कविता पूर्वी आल्या आहेत त्यांनीं तूर्त 'गोमतक गीत ' नावांचें एक सुंदर गीत केलेलें प्रस्तुत लेखकानें पाहिलें आहे. फोंडेच्या स्वयंसेवक मासिकांतील देमांदमहात्म्याचे लेखक श्री विनायक का प्रियोळकर यांची काव्यशक्ति उत्तम असल्याची साक्ष तें काव्य वाचलेले देतीलच.

आमच्या पुढच्या पिढींतील कवींविषयीं सांगतानां श्री. विनायक स सुखठाणकर व दामोदर अच्युत कारे हे उभय कवि नांवारूपास येतील असें अनुमान करण्यास जागा आहे. उभयतांच्या कविता महाराष्ट्रीय वाचकांच्या पूर्ण परिचयाच्याच आहेत.

गोमांतकीय कवींचें विहगमदृष्टया दर्शन झाल्यावर आता ग्रंथकारांकडे वळूं.

ग्रंथकारांपैकीं कै. महेश्वरभट सुखठाणकर याचा उल्लेख प्रसिद्ध पुरुषांच्या मालिकेंत आलाच आहे. त्यांनीं केलेल्या बहुतेक साऱ्या टीका मराठी भाषेंतूनच आहेत महेश्वर-

बांबाच्या स्मारकाप्रीत्यर्थ महाशेल गांवांत " सारस्वत विद्यापीठ ' नांवाचें पुस्तकालय १९०३ सालच्या सुमारास स्थापनही झालें होतें

वै. सदाशिव नारायण वाघ यानीं इ. १८१९त मराठी व्याकरण केलें होतें, परंतु छापखान्याच्या अडचणींमुळें तें प्रसिद्ध झालें नाहीं. वै. वहुगुण कामत वाग यांची गोमतकाची बखर मात्र प्राचीप्रभेंत प्रसिद्ध झालेली आहे. कै सूर्याजी आनंदराव देशपांड्यांविषयींची माहिती देखील पूर्वीं आलेलीच आहे. मराठी पोर्तुगीज कोशा-शिवाय १८४७सालीं त्यानीं दोन क्रमिक पुस्तकें व मराठी पोर्तुगीज व्याकरण १८७५त सरकारी छापखान्यांत प्रसिद्ध केलें कै सूर्याजीरावांच्या कोशाचा ' अ ' पासून पुढचा भाग अद्याप अमुद्रित आहे निदान देशपांडे घराण्यातील मंडळीनें तो छापून घेण्याचा प्रयत्न करावा अशी आमची त्याना विनंति आहे. प वा सदाशिव शेणवीं साखर-दांडे यानीं इ स. १८५९ " स्तवनार्थ निबंध " नांवाचें छोटें पुस्तक " मुबईचे हिंदु " या टोपण नांवानें लिहून व्हास्कोंसेलुस ह्या पोर्तुगीज जज्जानें मनुस्मृति व हिंदु चालीरीति यावर केलेल्या टीकेला सडेतोड उत्तर दिलें आहे. कै. यशवंत फोंडबा नाईक दणाईत व रामचंद्र गोविंद वागळे यानीं १८७३ त " गोमांतकाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास" लिहून प्रसिद्ध केला एतद्विषयीं मराठींतील आजवर हा एकच ग्रंथ असल्यामुळें त्याचें विशेष महत्व आहे उपरोक्त दणाईत यांनीं मराठी पहिलें पुस्तक, युरोपा-काकूच्या शाळेंतील मारामारी, इत्यादि पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत कै सूर्याजी सदाशिव महात्मे यांनीं " वेषधारी पंजाबी" ही कादंबरी लिहिली व आनंदलहरी हें मासिक १८७०त चालविलें होतें कै मुकुंद व्यंकटेश शेणवीं सावर्डेकर यांनीं पोर्तुगीज मराठी कोश केला आहे श्री. शाबाराव सरदेसाई यांनीं त्याचें संशोधन करून प्रसिद्धीकरणही सुरू केलें होतें. परंतु लोकाश्रयाभावीं D या अक्षरावरच त्याची मजल बंद पडली कै मुकुंदबाबांनीं केलेलीं बऱ्याच पोर्तुगीज कायद्यांचीं भाषातरें त्याच्या पुत्रांकडे आहेत परंतु प्रसिद्धीचा मात्र त्यांना अद्याप लाभ झाला नाहीं श्री भास्कर गोविंद रामाणी यांनीं "गंगी आणि सूर्यराव " व " साध्वी तारा " अशा दोन कादबऱ्या लिहून प्रसिद्ध केलेल्या त्या वेळेच्या मानानें पाहतां बऱ्यापैकींच आहेत श्री चिंतामण गणेश भट वागाळी याचें हेममुक्तासंवाद हें नाटक चांगलें आहे मराठी शिक्षण पद्धतशीरपणें घेतलें नसतांना देखील श्री जगन्नाथ शेट नाटेकर यांचीं संगीत हरिश्चंद्र, स बाजीराव मस्तानी व सगीत गवळण काला, हीं नाटकें बरीं वठलीं आहेत त्याचप्रमाणें श्री. सदाशिव पांडुरंग वागळे याचें सगीत वासवदत्ता हें नाटकही चांगलें झालें आहे. कै. माधव



बहुगुण कामत

Lakshmi Art, Bombay, 8

विठ्ठल हेदे शिरोडकर यांचे भारतीवीर नावाचें नाटक लिहून प्रसिद्ध केलें. कै. विश्वनाथ पांडुरंग हेदे याची संगीत नलदमयंती व गवळणकाला ही नाटकें प्रसिद्ध केलीं आहेत कै भास्कर जयराम आजगावकर यांनीं ' सुशील रंगी रंगराव " ही दिपाजी राण्याच्या बंडावरील कादंबरी लिहिली. शिवाय दोन तीन फार्सहि लिहून प्रसिद्ध केले. श्री वामन नारायण घाटकार यांनीं "मराठी पोर्तुगीज भाषांतर पाठमाला " हें पुस्तक १८९३ सालीं प्रसिद्ध केलें व पुढें मराठी पोर्तुगीज कोशही तयार करून खडश छापला होता. परंतु लोकाश्रयाच्या अभावीं तोही अपुराच राहिला. कै दत्ताराम जगन्नाथ बोरकर यांच्या ' अवतार रहस्य या छोटेखानी पुस्तकात अवतारांवर तूर्तचें इंग्रजी राजकारण फारच खुबीनें रंगविलें आहे त्यामुळें तें इंग्रज सरकारनें जप्तही केलें आहे. श्री. विष्णु रंगाजी शेळडेकर व मुकुंद सदाशिव शेळडेकर या बंधुद्वयानें श्री शांतादुर्गा संस्थानचा इतिहास परिश्रमपूर्वक लिहून प्रसिद्ध केला आहे. त्यामुळें तो फार चांगला झाला आहे श्री मुकुंदबाबा शेळडेकर यांचें " बापाचा मुलास उपदेश " हें पुस्तक शाळाखात्यानें बक्षिसास लायक ठरविलें आहे या शिवाय रा. मुकुंदबाबा यांनीं दोन तीन पोर्तुगीज कादंबऱ्यांचीं भाषांतरें केलीं आहेत व पोर्तुगालच्या इतिहासाचा बराच भागही त्यांचा तयार आहे. परंतु या पुस्तकांना अजून प्रकाशक लाभला नसल्यानें तीं अप्रसिद्धच आहेत. श्री. वामन रामचंद्र नायक करंडे शास्त्री याचा श्री कैवल्यपूर मठाचा इतिहास १९११ त प्रसिद्ध झालेला आहे. अत्यंत परिश्रमपूर्वक मिळविलेल्या माहितीनें हा ग्रंथ भरलेला आहे. श्री यशवंत सू. सरदेसाई यांची " रुमेला जुमेला " ही छोटेखानी कांदबरी चित्रशाळेंतून द्वितीयावृत्तीचा लाभ मिळविण्यात भाग्यशाली झाली असून तिचें हिंदी भाषांतरही झाले आहे. श्री. दत्तात्रेय तुकाराम फणशीकर यांचा प्रमाणसहस्री हा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्याचप्रमाणें श्री सुब्राव रामकृष्ण सामंत यांनीं, हिंदी लोक व फिरंगी संस्कृती हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. डॉ. गणपत पांडुरंग काळोखे यांचे आरोग्य विषयावरील अनेक ग्रंथ महाराष्ट्रीयांच्या परिचयाचेच आहेत तूर्त तर गोमंतकात "उत्तिष्ठत जाग्रत" यांचाच काल असल्यामुळें लेखकांचा भर आलेला दिसतो श्री. दत्तात्रय व्यं पै यांचीं गोमांतकाच्या भूगोलाविषयींचीं दोन पुस्तकें विशेष सरस झालीं आहेत. श्री. पै यांनीं पोर्तुगीज भाषा प्रवेश हें पुस्तकही फारच उपयुक्त असें केलें आहे त्यांनी आणखी दोन तीन पुस्तकें लिहिलीं असून लवकरच तीं प्रसिद्ध होणार असें समजतें.

आतां नियतकालिकांकडे वळायचें तेवढें राहिलें. कमनशीबानें त्या विषयीं

चर्चात्मक असा मजकूर लिहायला जरूर असलेली साधनसामुग्री मिळाली नाहीं. तरीपण वाङ्मयाच्या या भागांत झालेले प्रयत्न होतां होईतों साकल्याने द्यावयाचा प्रयत्न केला आहे

**देशसुधारणेच्छु.**--हें आरंभी मासिक स्वरूपात रायबंदर येथें इ स. १८७२ जुलईच्या ५ ला प्रसिद्ध झालें. त्याचे संपादक कै. आत्माराम पुरुषोत्तम सुखठणकर हे होते. पुढें सप्टेंबरातच तें बंद पडलें आणि १८७७ त साप्ताहिक स्वरूपात पुनः प्रसिद्ध होऊ लागलें त्याला पोर्तुगीज बाजूही होती. एकाच वर्षानें तें बंद पडलें.

**जोर्नाल द्ज् नोव्हश् कोंकीश्तश्:**--( नवीन काबिजादीचें वर्तमानपत्र ) हें साप्ताहिक ता. ९ एप्रिल इ स. १८८२ सालीं पार्से येथें श्री गोविंद भास्कर पार्सेकर यांच्या संपादकीयत्वाखालीं प्रसिद्ध होत होतें त्यांत पोर्तुगीज विभागही होता चार वर्षे चालून ता. १७ जानेवारी १८८६ रोजीं तें बद पडलें

**गोवामित्र:**--हें मासिक इ स १८८२ सालीं ओडली येथें प्रसिद्ध होई. त्याचे सपादक कै. सुब्राव लक्ष्मण नाईक हे होते. एकाच वर्षानें तें बंद पडलें.

**गोवात्मा:**--हें साप्ताहिक मडगांव येथें श्री. व्यंकटेश रामचद्र नाईक यांनीं ता. ३ आगस्ट १८८५ रोजीं काढलें तें सुमारें चार वर्षे चालून १८८९ सालीं बंद पडलें

**आर्यबंधु:**--हें मासिक १८८५ च्या आगस्टांतच म्हापशें येथें सुरु झालें होतें. या मासिकांत देखील पोर्तुगीज विभाग होता. पांच सहा महिन्यातच तें बंद झालें. शेवटचा अक ता १६ जानेवारी १८८६ रोजीं निघाला होता

**गोव्यापंच**--हें साप्ताहिक श्री श्रीपाद व्यकटेश वागळे यांच्या सपादकत्वाखालीं म्हापशें येथें १८८५ पासून निघत असे. इ. स. १८८८ सालीं त्यांत पोर्तुगीज विभाग सुरू झाला व लागलीच तें बंद पडलें, पण पुनः इ. स. १८९१ सालीं तें श्री रघुवीर लक्ष्मण संजगिरी यांच्या नांवानें सुरू झालें व एक वर्ष चालून मग कायमचें बंद पडलें. त्या काळच्या म्हापशांतील पंच मडळीच्या, म्हणजे दणाईत, जोशी, वागळे, सावकार, तेलंग इत्यादि अनेक मंडळीच्या सामाजिक व राजकीय मतांचें तें दर्शक होतें व या साप्ताहिकानें जागृतिही बरीच केली होती

**गोमांतक.**—हें मासिक पणजी येथें कै व्यंकटेश यशवंत शिंगबाळ हे १८९० सालापासून काढीत होते. त्यांत कांहीं भाग पोर्तुगीज भाषेंतही येत होता एकाच वर्षांत तें बंद झालें

**न्यायचक्षुः**—हें मासिक श्री खाडये व कोळवाळकर ह्यांनीं पणजी येथेंच इ. स १८९० सालीं सुरू केलें व त्यात ४ थ्या अंकापासून पोर्तुगीज विभागही सुरू केला पण हेंही एकाच वर्षाच्या आंतच बंद पडलें.

**गाझेत द पेर्नें**—( पेडणें ग्याझेट ) श्री. रामचंद्र पुरुषोत्तम देसाई देशप्रभू ह्यांनीं पेडणें येथें ता २७ मार्च इ स १८९३ रोजीं हें मराठी व पोर्तुगीज पाक्षिक सुरू करून एक वर्ष चालविलें.

**कालिकादर्शन**—हें मासिक १८९८ सालीं श्री आर पी शेट नागवेंकर यांनीं पणजी येथें काढिलें. परंतु यालाही एका वर्षावर आयुष्य मिळालें नाहीं

**हितचिंतक**--हें साप्ताहिक पणजी येथें कै. मंगेश मुकुंदराव देशपांडे यांनीं १९०० सालीं सुरू केलें. परंतु १९०१ तच तें बंद झालें.

**सुदर्शन**--हें मासिक प्रो. भिमाजी मुकुंदराव देशपांडे यांनीं १९०० सालीं काढलें होतें परंतु दुसरा अंक न निघतांच तें विराम पावलें.

यापुढच्या नियतकालिकांची थोडी तरी ओळख देऊं शकत असल्यानें ती जात आहे.

**सत्संग**--हें मासिक चैत्र १८२४ त कुंभारजुवें येथें श्रीयुत श्रीनिवास लखू भांडारी यांच्या नांवानें निघालें तथापि संपादकीय काम श्री. रामचंद्र वामन नायक करंडेशास्त्री यांचेकडे होतें. श्री. दत्ताराम जगन्नाथ बोरकर, श्री. शांबा कृ सू. सरदेसाई इत्यादि लेखकांचे लेख यांतून प्रसिद्ध होत असत सत्य तेच विचार निर्भिडपणें जनतेंत फैलावण्याचें दुर्घट कार्य या मासिकानें बराच काल केलें. मागें ज्या ग्रंथाचा आम्ही उल्लेख केला आहे तें " अवतार रहस्य, " जुना इतिहास या सदराखालीं यांतूनच खंडशः येत होतें " सुचरित मालतिका, " ' वाक्कुठार प्रहार," " मोठ्यांचे छोटे दोष, " इत्यादि सदरें फारच बहारीचीं येत होतीं जुन्या इतिहासाच्या दर्शनानें चिडून इंग्लिश सरकारनें ह्या मासिकाचा ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रसार बंद केला आणि नुकत्याच स्थापन झालेल्या रिपब्लिकन सरकारकडे मागणी करून त्यांच्याकरवीं हें उत्कृष्ट मासिक बंद पाडविलें. सुंदर मराठी भाषेच्या लेखनास सत्संगानेंच प्रारंभ केला म्हटलें असतां चालेल.

**पथ्यबोधः**--हें आरोग्यविषयक मासिक केरी-फोंडें येथें सुप्रसिद्ध भिषग्वर रामचंद्र पांडुरंग वैद्य हे १९०४ सालापासून काढीत असत यांतील भाषा जरा जुन्या वळणाची होती, तथापि आरोग्यविषयक लेख व कवितांमुळें तें बरेंच लोकप्रिय झालें

होतें. " सखिरात्र दिवस रडवि मज हि सवत गुडगुडी " " खरें सांगा तेथें अनुचित असे काय घडलें " इत्यादि कविता फारच बहारीच्या होत्या इ. स. १९०८ सालीं तें बंद पडलें.

**चित्ताकर्षण:**--हें मासिक निर्णयसागरांत छापून पणजी येथे श्री शिवराम बळवंत राव देशपांडे हे इ स १९०६ सालापासून काढीत असत. मनोरंजन हाच त्याचा प्रधान हेतु होता श्री कारापुरकर यांची " मालिनी " कादंबरी व कै जिवाजी दत्त महात्मे यांची 'स्वदेशी चाकू' ही छोटेखानी कादंबरी याच मासिकातर्फे प्रसिद्ध झाल्या होत्या. दोनच वर्षांनीं तें बंद झालें.

**प्राचीप्रभा** (A Luz de Oriente):–हें पोर्तुगीज मासिक श्री रामचंद्र पांडुरंग वैद्य यांनीं १९०९ सालीं फोंडें येथें सुरू केलें व १९१४ सालीं तें बंद झालें यात येथील व पोर्तुगाल मधील लेखकांचे भारदस्त लेख येत असत प्रो० गोळ्यांच्या "हिंदुधर्म आणि सुधारणा" या सुप्रसिद्ध ग्रंथाचें पोर्तुगीज भाषांतर श्री. सीताराम विश्वंभर केरकर यांनीं यातूनच प्रसिद्ध केलें आहे श्री. दादासाहेब वैद्यांच्या नावानें जरी हें निघत होतें तरी सारी संपादकीय जबाबदारी श्री. केरकर हेच संभाळीत होते पोर्तुगीजांना हिंदी संस्कृतीची ओळख करून देणें हें या मासिकाचें ध्येय होतें व तें त्यानें शेवटपर्यंत उत्तम रीतीनें पाळलें. वास्तविक याची हकीकत पोर्तुगीज वृत्तपत्रांतून द्यावयाची पण प्राचीप्रभेला मराठी अपत्यें पुष्कळच झालीं होतीं. त्यामुळें तिची हकीकत येथें देण्यांत येत आहे. ह्याच नांवानें श्री वैद्य मराठीही मासिक चालवित होते. व त्याच्या संपादकाच्या जागीं श्रीमति सौ. सरस्वतीबाई वैद्य यांचें नांव झळकत होतें. मराठी मासिकाचा हेतू जरी स्त्री शिक्षणाचा होता तरी श्री द. वि आपटे, कै. विश्वनाथ रा. राजवाडे यांचे इतिहास, व्याकरण, इत्यादि गहन विषयांवरील लेखही यांत येतच असत. इ. स. १९२६ सालीं तें साप्ताहिक स्वरूपांत प्रसिद्ध होऊं लागून बंद पडलें

**हळदकुंकू** —हें मासिक श्रीमती. सौ. सरूबाई वैद्य यांनीं फोंडें येथें १९१० सालीं सुरू केलें. हें आमूलाग्र स्त्रियांकरतांच होतें दोन वर्षांनीं तें बंद पडलें

**प्रभात:**—रिपब्लिकच्या स्थापनेनंतर हिंदुसमाजांत उडालेल्या खळबळीच्या पोटीं या साप्ताहिकाचा जन्म झाला होता याचे संपादक प वा सन्मान्य डाक्टर पुरुषोत्तम वामन शिरगांवकर हे होते १९१३ सालीं हें जन्म पावलें. प. वा दत्ताराम ज. बोरकर. श्री. करंडे शास्त्री, श्री शांबाराव सर देसाई, इत्यादि कसलेल्या लेखकाची याला जोड

होती. इ. स १९१२ सालापासून तों १९१७ पर्यंत हें वर्तमानपत्र चाललें, दरम्यान डॉक्टर साहेबाच्या धोरणाशीं न जुळल्यामुळें उपरोक्त लेखक मंडळी १९१३ सालींच त्याला सांडून गेली. तरीपण डाक्टरसाहेब इहलोकांत होते तोंवर हें वर्तमानपत्र त्यांनीं चालविलें हे यांत जो पोर्तुगीज विभाग येत होता त्यांत इ. स १९१२ सालीं श्री हेगडे देसाई लिहीत असत. १९१७ सालीं तें बंद पडलें

**भारतः**—प्रभाताला सोडून निघालेल्या लेखकांनीं हें वर्तमानपत्र १९१२सालीं श्री. गोविंद पुंडलीक हेगडे देसाई यांच्या संपादकीयत्वाखालीं काढलें श्री. हेगडे देसाई यांकडे पोर्तुगीज विभाग होता इ स १९१४ सालीं हेगडे देसाई याच्या कडून श्री. दत्ताराम जगन्नाथ बोरकर शिवाय इतर मंडळी फुटली व वर्तमानपत्र हेगडे देसाई याच्या हातीं संपूर्णत्वानें आलें. त्यानीं १९१७ पर्यंत तें चालविलें व पुढें १९२१ सालपर्यंत तें बंद पडलें. दरम्यानच्या कालांत श्री दत्ताराम जगन्नाथ बोरकर यांचा १९१४ सालीं बंडवाल्यांनीं अमानुषपणें खून केला तोंवर या वर्तमानपत्राची पोर्तुगीज व मराठी बाजू सारख्याच दर्जाची राहिली होती परंतु पुढें श्रीयुत हेगडे देसाई यानां उभय विभाग झेंपेनासे झाल्यानें त्यातील मराठी विभाग नवशिक्यांच्या हातीं गेला ह्या नियतकालिकानें स्थलांतर करून केंपें येथें आपलें पुनरुज्जीवन केलें तें आजवर तेथेंच चालत आहे भारताचा पोर्तुगीज विभाग कसलेल्या लेखकांच्या हातीं असून, मराठी विभाग नवथराच्या हातींच आहे त्यामुळें नवे नवे लेखक तयार करण्याच्या दृष्टीनें मराठी बाजूचा गोमंतकाला उत्कृष्ट उपयोग होत आहे पोर्तुगीज सरकारनें या पत्रावर बरीच मेहेरनजर ठेविली आहे सुमारें २५ खटले त्यावर झाले असतील तरीपण केवळ दोन कीं तीनच खटल्यांत त्याला आजवर शिक्षा झाली आहे

**हिंदुमत**—हें वर्तमानपत्र पोर्तुगीज-मराठीच होतें श्री. शिवराम बळवंतराव देशपांडे यानीं तें पणजी येथें सुरू केलें. कांहीं काळ श्री. हेगडे देसाई यात पोर्तुगीज विभाग लिहित असत. गौडसारस्वत ब्राह्मण समाजांत त्या काळीं चालू असलेल्या एकीकरणाची विरुद्ध बाजू याच पत्रानें उचलून धरली होती. पब्लिक वर्क्सच्या कार-भारावर कांहीं टीका केल्यामुळें सरकारनें या पत्रावर खटला करून संपादकाला शिक्षाही देवविली होती इ स १९१६ सालीं तें बंद पडलें

**विद्याप्रसारः**—श्रीयुत रामचंद्र पांडुरंग वैद्य ऊर्फ दादासाहेब वैद्यांच्या अखंड उद्योगाचेंच हें वर्तमानपत्रही एक अग होतें इ. स १९१५ सालीं तें श्री वैद्य व केरकर यांच्या संपादकीयत्वाखालीं फोंडें येथें निघालें मागें उल्लेखिलेल्या लीग द प्रोपागाद द

इस्त्रुक्सांव ऍं गोअ ( गोमातकात शिक्षण प्रसार करणारी मंडळी ) या संस्थेचें मुखपत्र या नात्यानें त्याचा जन्म झाला. हें पाक्षिक स्वरूपांतच प्रसिद्ध होई व प्राचीप्रभेची पुरवणी म्हणून तें सरकारांत नोंदलें गेलें होतें. जुगार, मद्यपान इत्यादि विषयांवर यांत लेख येत असत इ. स १९२१ सालीं तें बंद पडलें.

**स्वयंसेवकः**--हें त्रैमासिक देमादमहात्म्याचे कर्ते, श्री विनायकराव प्रिय़ोळकर यांनीं १९१५ सालीं फोंडें येथें काढलें. प्रारंभीं तें केर्ने येथील भारताची पुरवणी म्हणून ३ वर्षें चाललें. व इ. स. १९१८ सालीं त्याचें प्रसिद्धीकरण फोंडें येथें होऊं लागून १९२६ सालीं तें बंद पडलें. यांत बरेच महाराष्ट्रीय लेखकही लिहित असत. गोमंतकांतील चांगल्याच नियतकालिकांपैकीं तें एक होतें. याच मासिकांतून देमांद-महात्य अवतरलें होतें यांतील कांहीं लेख बरेच उच्च दर्जाचे असत. हल्लींच तें साप्ताहिक स्वरूपांत पुन' निघालें आहे.

**अ पात्रियः**--' स्वदेश ' या पोर्तुगीज नावाचें हें पत्र, पोर्तुगीज व मराठी स्वरूपात कै. रामचंद्र मगेशराव देशपांडे कांहीं लूझोइंडियनांच्या मदतीनें चालवित होते. १९१८ च सालीं तें बंद पडलें. यांतील लेख हिंदूंच्या हितास फारसे पोषक नसत.

**गायक मित्रः**--हें मासिक गोमतकीय गायक समाजांतील व्यक्तींनीं आपल्या ज्ञातीच्या उन्नतीसाठीं फोंडें येथें काढलें होतें आणि तें भारताची पुरवणी म्हणून प्रसिद्ध होत असे. १९१८ च्या जुलईंत तें सुरू झालें व १९१९ त कांहीं अंक येऊन बंद पडलें.

**नवजीवनः**—हें नियतकालिक इ स १९२० सालीं श्री जनार्दन नारायण पै अस्नोडकर यांनीं साप्ताहिक स्वरूपात पणजी येथें सुरू केलें. व तें १९२१ सालापर्यंत चालविलें. त्या सालीं त्यानें मासिकाचें रूप घेऊन काहीं काळ तें चाललें. यांतील लेख साधारण बऱ्यापैकीं असत.

**प्रगतिः**—हें वर्तमानपत्र गायक समाजांतील काहीं तरुणांनीं इ. स. १९२० सालीं पणजी येथें सुरू केलें व इ. स. १९२१ सालीं तें बंद पडलें.

**भारतोदयः**--भारताची पुरवणी या नात्यानेंच हें मासिक निघत असे. इ. स. १९२१ त याचा जन्म झाला व थोड्यांच अकानंतर तें बंद पडलें

**भारतमित्रः**--हें मासिक लोकमित्राचें भावंड असून त्याच धनंजय छापखान्यांत प्रसिद्ध होत असतें. रिवणचे श्री. नारायण भास्कर नाईक हे याचे संपादक

आहेत. त्यांनीं तें १९२१ सालीं सुरू केलें व आजवर चालविलें आहे स्थलसंकोचामुळें त्याचें काम जसें चालावें तसें चालत नसलें तरी बरीच उपयुक्त माहिती त्यांतून नेहमीं प्रसिद्ध होत असते. आणि तें चालविण्यांत संपादकांनीं ज्येष्ठ बंधूंनरही ताण केली आहे

**नापितोदयः**—हें मासिक नापित समाजाच्या उन्नतीसाठीं नापित समाजानें पणजी येथें १९२१ सालीं सुरू केलें व काहीं अकांनंतर तें बंद पडलें. ज्ञातीची सेवा तें यथाशक्ति बजावित होतें.

**हिंदुः**—हें वर्तमानपत्र महाराष्ट्रीयांच्या परिचयाचेंच आहे श्री. जयवंत श्रीनिवास सुकेरकर यांनीं तें इ. स सालीं मडगाव मुक्कामीं सुरू केलें त्याचें संपादकीय स्थान श्री. दत्तात्रय व्यंकटेश पै याच्याकडे असून त्याचा लेखक वर्ग संशोधक बुद्धीचा व देशाभिमानी वर्गांतील आहे. आखलेलें धोरण चिकाटीनें, धडाडीनें व स्वार्थत्यागपूर्वक पुढें चालविण्याचा गुण जो संपादकांत दिसून येतो त्याबद्दल कोणालाही आदरच वाटेल. गोमंतकीय चळवळींत हिंदूनें आपल्या प्रयत्नानें स्वतःची जी जागा मुक्रर केली आहे, ती पाहून त्याचें कौतुक करावेसें वाटतें. गामाच्या चतुःशतसांवत्सरिक उत्सव झाल्यावेळीं हिंदूंतून प्रसिद्ध झालेल्या लेखांबद्दल हिंदूवर खटला होऊन शिक्षाही झाली होती मराठी नियतकालिकांत 'हिंदू' चें कार्य स्वतंत्रपणानें उल्लेख करण्यासारखें भरींव आहे.

या खेरीज लहानपणीं ज्ञानांजन व श्रीखंड हीं दोन नियतकालिकें लेखकानें पाहिल्याचें आठवतें परंतु त्यांची माहिती मिळत नसल्यामुळें त्याचा केवळ नामनिर्देशच करून मराठी वाङ्मयविषयक प्रयत्नाचें हें लांबलेलें दिग्दर्शन आटोपतें घेऊं.

आणि तसें तें घेतांना एका गोष्टीकडे मात्र आमच्या वाचकवर्गाचें लक्ष्य आम्हीं वेधूं इच्छितों व ती हीच कीं, या प्रयत्नांत काव्यरचना, ग्रंथलेखन किंवा वृत्तपत्रप्रकाशन यापैकीं कोणत्याही बाजूनें पाहिल्यास गोमंतकानें मराठी भाषेचें ऋण यथाशक्ति व अखंड फेडलेलें या विवेचनावरून दिसून येतें प्रतिकूल परिस्थिति, कोंकणीचा अभिमान, महाराष्ट्रीयांची उपेक्षा किंवा साधनाभावामुळें आधुनिक अभिरुचि मराठीचें तुटक ज्ञान कशाचीच अडचण त्यांना या ऋणविमोचनांत अडवूं शकली नाहीं

दुसरी महत्वाची गोष्ट ही कीं, निदान चार शतकांच्या या दीर्घ कालावधींत आमचे सन्मान्य मित्र श्री. वामनराव वर्दे वालावलीकर यांनीं लिहिलेल्या " मोगाचें

ल्म " गोंयकाराचो मुंबईकार, व " गोंयकारांचीं गोंयाभायलीं वसणूक " इ. या तीन सुंदर पुस्तकाशिवाय व " मजी बा खैं गेली " " वास शणैली पोपाय " दाम्मामालों पणस " " गोंयची कुट्टी " या प्रतिभावान व सुंदर लेखांशिवाय कोंकणींत ग्रंथरचना करण्याचे नाव घेण्याजोगे प्रयत्न इकडे मुळींच झाले नाहींत.

**वाचनमंदिरें इत्यादि संस्थाः**—यद्विषयक प्रयत्नाला रीतसर सुरुवात केव्हां झाली तें सांगणें साधनाभावीं आम्हाला शक्य नाहीं परंतु गोमंतकीय वाचनमंदिरांचा आद्य पूर्वज म्हणजे पणजीचें 'हिंदुपुस्तकालय 'च असावें असें त्याला वाटतें. त्याचप्रमाणे १८९९ सालच्या सुमारास सांवर्डे येथें प्रस्तुत लेखकाच्या घरीं श्री शांतादुर्गा वाचनालय या नावानें एक संस्था थोडा काळ चालली होती अशीही आठवण आहे. त्या सुमारास गोमतकांत इतरत्रही तशींच वाचन मंदिरें स्थापन झालीं असल्याशिवाय हें वाचनमदीर स्थापन झालें नसावें, एवढाच कयास यावरून निघतो पणजी येथें जी सरकारी लायब्ररी चालू आहे, ती इ. स १८१७ सालीं सुरू झाली होती खरी परंतु अजूनही तिच्यांत मराठी ग्रंथांना स्थान नाहीं गेल्या शतकात हिंदुलोकांचा प्रवेश पोर्तुगीज वाङ्मयांत मुळींच झाला नव्हता म्हटलें तरी चालेल, इतकें त्याचें पोर्तुगीज भाषेंतील अज्ञान मोठें होतें अर्थात् वाचनमंदिराचा प्रयत्न हा केवळ हिंदूंचा स्वतःचाच ठरतो गोमतकीय वाचनमदिरांचा एक मोठा विशेष म्हणजे, तीं मेंबरानाच खुलीं नसून सर्वांना मोफत असतात हाच होय विस्तारभयामुळें या सस्थांचा अल्प परिचय करून आपण पुढें जाऊ.

**गोवा-हिंदु-क्लब**—ही सस्था उपरोक्त हिंदु पुस्तकालयाच्याच जागेंत इ. स. १९०६ च्या १२ मार्च रोजीं डॉ पु बा शिरगांवकर याच्या चिकाटीच्या प्रयत्नांनीं जन्म पावली. परंतु अनेक कारणामुळें तिला स्थैर्य न लाभतां इ स १९०७ च्या सुमारासच ती बंद पडली

याच वेळीं पुन: गोमंतकांत जिकडे तिकडे वाचनमदिराचा पाऊसच पडला होता. परंतु श्रावणझडीमागून जसा आश्विन मास येतो, तसाच हा पाऊसही उघाडी देऊन विराम पावला. गोमतकांत तूर्त चालू असलेल्या एकदर वाचनमंदिरांची त्रोटक माहिती देण्याचा आमचा इरादा होता पण कित्येक ठिकाणीं माहिती मागविली असतांही मिळाली नाहीं आणि अगदीं एकीकडच्या अशा असोळण्यासारख्या गावांत लेखकाचें वास्तव्य असल्यामुळें, इतरत्र उपलब्ध होऊ शकणारीं साधनेंही त्याला भरपूर मिळू शकलीं नाहींत अर्थातच हा इरादा पूर्णपणें तडीस न गेल्याबद्दल दिलगिरी वाटते.

**श्री महालक्ष्मी प्रासादिक हिंदु वाचनमंदीर, पणजीः**—चालकाकडे मागविलेली माहिती न मिळाल्यामुळें केवळ १९१३ सालच्या रिपोर्टावरच भिस्त ठेवावी लागत आहे. इ. स. १९०७ च्या जानेवारींत या संस्थेची स्थापना झाली. ही संस्था नापित वर्गाची आहे. रिपोर्टाच्या सालींच तींत २ हजारावर ग्रंथ असून ५८ नियतकालिकें येत होतीं. आजला संस्थेला स्वतःची इमारतही आहे. वाचकाना भाड्यानें घरीं नेण्यास पुस्तकें देण्याचा स्तुत्य उपक्रम याच संस्थेनें केला. रिपोर्टाच्या सालींच शिशीरव्याख्यान माला सुरू झाली होती, परंतु आज ती बंद पडली आहे. मागासल्या समजल्या जाणाऱ्या समाजानें ही संस्था चालविली असून पुस्तकें भाड्यानें देण्याच्या बाबतींत इतरांनी तिचें अनुकरण केलें हें या समाजाला भूषणीय आहे.

**सारस्वत विद्यालय वाचनमंदीर, म्हापशें**—इ. स. १९०७ सालीं म्हापशें येथील सारस्वत ब्राह्मण समाजानें स्थापन केलेलें हें वाचनमंदीर इ. स. १९२० सालीं सारस्वत विद्यालयात नेण्यांत आलें. दीड हजार उपयुक्त ग्रंथ त्यांत असून २७ नियतकालिकें येत असतात. रोजची वाचकांची संख्या सुमारें २०।२५ असते. ही संस्था गौडसारस्वत ब्राह्मण समाजाची असून आजवर चांगली चालत आहे. दरसाल श्री सरस्वत्युत्सवांत तीनचार दिवस व्याख्यानमाला गुंफण्यात येत असते

**श्रीदुर्गा वाचनमंदीर, म्हापशें**—म्हापशें येथील वैश्य समाजानें स्थापन केलेल्या ज्ञानप्रसारक संघामार्फत इ. स. १९०८ सालीं हें मंदीर सुरू झालें. सुमारें एक हजार ग्रंथ मंदिरांत तूर्त आहेत. नियतकालिकें २३ येत असून रोजची वाचकांची संख्या सुमारें ३०।३५ असते. दरसाल तीन चार उत्सव होत असून शारदोत्सवानिमित्त दोन तीन दिवस व्याख्यानेंही होत असतात.

**श्री शांतादुर्गा वाचनमंदीर, कुंभारजुवेंः**—इ. स. १९१० सालीं मंदिराची स्थापना झाली. श्री. शारदा विद्यालयाची आधारभूत मंडळीच या मंदिराचे सभासद आहेत म्हटलें तरी चालेल. तूर्त ग्रंथसंख्या १५०० असून १३ नियतकालिकें येत असतात. वाढदिवसाप्रीत्यर्थ श्रीशारदोत्सवांत दरसाल दोन तीन दिवस व्याख्यानमाला चालते

**श्री शारदा वाचनमंदीर, रायबंदरः**—इ. स. १९११ सालीं स्थापन झालेल्या या मंदिरांत तूर्त एक हजारावर ग्रंथसंख्या असून बरींच नियतकालिकेंही येत असतात. स्थायिक फंड पांचशें रुपयाचा असून तो व्याजीं लावला आहे. समयानुसार व्याख्यानेंही होत असतात.

**सारस्वत ब्राह्मण समाज, मडगांव**—इ स. १९१३ सालीं केवळ नऊ तरुणानीं ही संस्था स्थापन केली कळकळीचा व मेहनती चालकवर्ग तिला लाभल्यामुळें, गोमतकातील संस्थांत हिचा दर्जा पहिल्या प्रतीचा झाला आहे वाढदिवसाप्रीत्यर्थ गुढी पाडव्याकडे होणाऱ्या बऱ्याच मोठ्या व्याख्यानमालेस प्रसिद्ध महाराष्ट्रीय वक्ते आमत्रून, महाराष्ट्राचें लक्ष्य गोमंतकाकडे खेंचून घेण्याचें महत्वाचें कार्य याच संस्थेनें प्रथम सुरू केलें. मडगावच्या आधुनिक इतिहासांत समाजाचें नाव चिरस्थायी झालेलें आहे तूर्त सुमारें सात हजाराजवळ ग्रंथसंख्या असून, ३०।३५ नियत-कालिकें येत असतात रोजची वाचकांची सख्या शभराच्या आंत बाहेर असते. आजवर सुमारें १८ हजार रुपये खर्चून पोष्ट ऑफिसाजवळच्या सरकारनें दिलेल्या मध्यवर्ति जागेवर संस्थेची इमारत उभारली आहे अजून तिचें काम पुरें झालें नाहीं व्याख्यानमालेशिवाय इतरही बरेच समारभ या सस्थेमार्फत होत असतात. तूर्त तरी ती गौड सारस्वत ब्राह्मणांचीच आहे. ग्रथसंख्येच्या मानानें गोमतकीय मराठी वाचनमंदिरांत हिचा नंबर पहिला लागतो वाचनालय-संग्रहालय सर्वत्रास मोफत आहे.

**श्री दामोदर वाचनमंदिर, मडगांव**—मडगांवच्या "श्री. दामोदर विद्याभुवन" नांवाच्या भव्य इमारतीच्या कांहीं भागात तूर्त मदीर चालतें. सुमारें तीन हजार ग्रंथसंख्या असून २५-३० नियतकालिकें येत असतात रोजची वाचकांची संख्या सुमारें ५०-६० असते. दरसाल शारदोत्सवात तीन चार दिवस व्याख्यान-माला चालत असून महाराष्ट्रीय वक्त्याकडूनही बरींच पुष्पें गुंफलीं गेलीं आहेत. त्यामुळे महाराष्ट्राचें लक्ष्य गोमतकाकडे लागायला या सस्थेनेंही बरीच मदत केली आहे.

**श्री सरस्वतीमंदिर, पणजीः**—माजी हिंदुपुस्तकाल्यातून गोवा-हिंदु क्लबांत आलेले ग्रंथ त्या संस्थेच्या अवतारसमाप्तीनंतर मंदिराला मिळाले. इ. स. १९१२ सालीं विजयादशमीच्या मुहूर्तावर मंदिराची स्थापना झाली सुमारें दोन हजार रुपये किंमतीची जमीन इमारतीसाठीं खरेदी करण्यांत आली आहे. स्थायिक फड अडीच हजार आहे. पांच हजारांवर उपयुक्त ग्रंथसख्या असून ४० नियत कालिकें येत असतात. रोजची वाचकांची सख्या सव्वाशांजवळ असते. वाचकांच्या संख्येच्या मानानें ही सस्था अग्रमानाची आहे. स्थापनेच्या दिवशीं एकाद्या वाङ्मयभक्ताचें व्याख्यान होत असतें. उल्लेखित श्री महालक्ष्मी प्रासादिक हिंदुवाचन मंदीर व हें मंदीर, अशा या उभय संस्था राजधानींत चालत असल्यामुळें, हिंदु-

समाजांतील चळवळींकडे खिस्ती समाजाचें व सरकारचें लक्ष खेंचण्यास बरीच मदत झाली आहे

**राष्ट्रीय वाचनमंदीर, डिचोली:**—इ स १९१३ सालींच या मंदिराचीही सुरवात झाली डिचोलीच्या विद्यावर्धक मंडळानेंच तें चालविलें असल्यानें, त्याच्याच इमारतींत मंदिराला जागा मिळाली आहे. आजला त्यांत सातशांवर ग्रंथ असून १३ नियतकालिकें येतात.

**श्री लक्ष्मी सरस्वती वाचनमंदीर, कुंकळ्ळी ( सांवरकटें ):**–इ. स. १९१५ सालीं स्थापना झाली रा. रा नारायण केशव केणी यानीं स्वतःच्या खर्चानें बाधून दिलेल्या इमारतींत मंदीर चालतें, मंदिराच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ तीन दिवस उत्सव होत असतो. ग्रंथसंख्या चारशें आहे. कांहीं नियतकालिकेंही येतात.

**श्रीवेताळ प्रासादिक वाचन मंदीर, असोळणें**—मंदिराची स्थापना १९१७ सालीं झाली. ग्रंथसंग्रह निवडक असून तूर्त सुमारें दोन हजारावर त्याची संख्या आहे १५।२० नियतकालिकें येत असतात. ता २१ मेला वाढदिवसाप्रीत्यर्थ होणाऱ्या उत्सवात दोन तीन व्याख्यानें दरसाल होत असतात

**दैवज्ञब्राह्मण समाज मोफत वाचनालय, म्हापशें**—दैवज्ञ ब्राह्मण-समाजानें १९१९ सालीं या संस्थेची सुरुवात केली सुमारें २ हजारांवर ग्रथसंख्या असून नियतकालिकें २५ येतात व वाचकांची रोजची सख्या २०।२५ असते वाच-नालयासाठीं पांच हजार रुपये किंमतीची इमारत खरेदी केली आहे

**श्री शांतादुर्गा वाचनमंदीर, कुंकळ्ळी ( म्हाळ्ळेकटें ):**—याची स्थापना वास्तविक १९०८ सालीं श्रीयुत अनंत नारायण पै वेर्णेकर यांनीं परिश्रम घेऊन केली होती परंतु पुढें तिचें काम बरेंच मंदावलें होतें. १९२८त तिचें पुनरुज्जीवन होऊन ती ज्ञानप्रसारक संघ, कुकळ्ळी या संस्थेतर्फे तूर्त चालत आहे. संघ एक मराठी शाळाही चालवितो. तूर्त मंदिरांत ३५० निवडक ग्रंथ असून २० नियतकालिकें येतात. दरसाल पांच सात उत्सव व्याख्यानांसहित साजरे करण्यांत येतात.

**श्री शांतादुर्गा वाचनमंदिर, वेरें ( रेइज्मागुश ):**—हें मंदीर गौडसार-स्वत ब्राह्मणांचें आहे १९२८ सालीं त्याची स्थापना झाली. तूर्त सुमारें ८०० ग्रंथ असून १४ नियतकालिकें येत असतात.

**नवहिंदु वाचनालय, चिंबल:**—रा. रा रामचंद्र नारायण प्रभु लंवदे यांनीं

१९२९ त हें स्थापन केलें. हें नवहिंदूंसाठीं आहे. ' ग्रंथसंग्रह व फंड वर्गणीही नाहीं. कारण, सार्वजनिक पैसा म्हणजे विष आहे असें श्री. लंवदे म्हणतात त्यांनीं वर्तमानपत्रांशीं पत्रव्यवहार करून वीस नियतकालिकें मोफत मिळविलीं आहेत. गावड्यांना जमवून त्यांना प्रचलित विषयाचें ज्ञान करून देण्यांत येत असतें ' असें, मंदिराचे सेक्रेटरी, श्री अनत कुडईकर याच्या पत्रावरून समजतें.

या शिवाय ज्या सस्थांचीं नांवें लेखकाला ठाऊक आहेत, पण माहिती मिळाली नाहीं त्यांचा नामनिर्देश पुढें केला आहे. साऱ्या संस्थांतून वाचन मोफतच असतें. आणि कमीत कमी ४००।४५० ग्रंथ तरी प्रत्येक संस्थेंत असतात

दैवज्ञब्राह्मण समाज, मडगांव, मुरगांव साहित्य सेवा संघ, वास्कोदागाम; गोरक्षण ज्ञानप्रसारक संघ, मुरगांव ( हारवर ), श्री रवळनाथ वाचनमंदिर, पेडणें; ज्ञातिोन्नतिसमाज, पेडणें, श्री हनुमानवाचनालय, मोर्जी, श्री महालक्ष्मी वाचनमंदिर, मांद्रें, श्री रामवाचनालय, मांद्रें; श्री भगवति मोफत वाचनालय, पार्से; श्री महात्मा वाचनमंदिर, कोरेगांव ( पेडणें ), लोकसेवक समाज, हरंवल, श्री मुरलीधर वाचनालय, सांखळी, मोफत वाचनालय, सत्तर, श्री शांतादुर्गा ग्रथसग्रह, श्रीक्षेत्र कवळें ( ४५० ग्रंथ आहेत ); महाराष्ट्रसारस्वत वाचनालय, फोंडें; श्री सरस्वती वाचनमंदिर आणि मराठी ग्रंथसंग्रहालय, कवळें, बालसंस्था वाचनमंदिर, म्हाडदोळ; श्री मांगिरीश वाचनालय, श्रीक्षेत्र मंगेशीं ( सुमारें सात आठशें ग्रंथ आहेत. व कित्येक नियतकालिकें येत असतात ) श्री महालक्ष्मी वाचनमंदिर, मंगेशीं; श्री विठ्ठल वाचनमंदिर, कुंडई, श्री सरस्वती वाचनमंदिर, मडकई; श्री कामाक्षा वाचनमंदिर, शिरोडें-गोवा, श्री भूमिपुरुष वाचनालय, फोंडें, श्री सरस्वती वाचनालय, दाभाळ ( किर्लपाल, सांगें ); श्री महालक्ष्मी वाचनालय, नेलुर्ली ( सांगें ); बालोन्नतिसमाज, केपें, श्री शारदासेवकमंडळ, फातर्फें ( बाळ्ळी ); सरस्वती सेवक समाज, काणकोण

यापैकीं बऱ्याच संस्था सरकारांत रजिस्टर झाल्या आहेत. सर्वांचें ज्ञानप्रसाराचें कार्य मोफतच चालतें संस्थेची मालकी व खर्च चालविण्यापुरतीच ती ज्ञाति किंवा संघनिष्ठ असते. '

## प्रकरण आठवें.

# प्रेक्षणीय स्थळें.

**सृष्टिसौंदर्याचा ठेवा:**—आम्हां गोमंतकीयाना हा ठेवा अतिपरिचयामुळें असूनही नाहींसाच झाला आहे. जन्मापासूनच हा प्रांत पाहत आल्यानें, त्यात कांहीं विशेष आहे ही जाणीवच गोमंतकीयांत नसते म्हटलें तरी चालेल गोव्याबाहेर प्रवास करावा, इतर प्रदेशात वास्तव्य करावें, तेव्हांच सापेक्षतेनें गोव्याचें सौंदर्य मनास पटतें अशी आम्हां गोमंतकीयांची तरी स्थिति आहे.

तीरावरील वृक्षराजीनें नजर केलेलीं छत्र चामरादि राजचिन्हें धारण करून आजूबाजूच्या हिरव्यागार शेतातून रौप्य मेखलेप्रमाणें शोभणाऱ्या व दुथडी भरून चालणाऱ्या अशा आमच्या नद्या, व्यवस्थित चौरसांमुळें एकाद्या विस्तीर्ण पटासारखीं दिसणारी हिरवीं पिवळीं शेतें; त्यांतूनच मधून मधून विखुरलेल्या व बुद्धिबळाच्या मोहोऱ्याप्रमाणें शोभणाऱ्या लहान मोठ्या लवणगिरींचे व गवताच्या गंजींचे तांडे, पश्चिमेकडे सायंकाळीं हिंदी महासागरांतून मांगल्याची दर्शक अशी आरक्तवर्ण छटा देणाऱ्या सवित्याची ती सुंदर प्रतिमा, पूर्वेकडे आमच्या रक्षणार्थ एकाद्या भिंतीप्रमाणें खडा असलेला, नेहेमीं नीलवर्ण शोभणारा आमचा प्रिय सह्याद्रि, आणि त्यांतूनच मधून मधून झुळझुळणाऱ्या प्रवाहांनीं डोळे आणि पोट यांना मनमुराद खुराक देत असलेला जीवन रस, चोंहोंकडे चवऱ्यांप्रमाणें दिसणारे व आमूलाग्र उपयुक्ततेनें थबथबलेले नारीकेळ रूपी कल्पवृक्ष, इतस्तत: विखुरलेलीं व मधून मधून डोकें उंच करून जणुं पहारा करीत असलेलीं आमचीं देवालयें, इत्यादि सौंदर्याभरणें ज्या भूमीनें लेइलीं आहेत अशी, आजन्म तारुण्यांतच विहरणारी, ही आमची प्रिय मातृभूमि आहे गोमंतकीय म्हटला म्हणजे तो रसिक, भावनाप्रधान, कलाप्रवण व सौंदर्यग्राही असतो, याचें कारण झालें तरी त्याच्या भोंवतालीं असलेल्या या परिस्थितींतच असावें गोमंतकीय सृष्टिसौंदर्याचें यथायोग्य वर्णन करायला आमची गद्यलेखणी असमर्थ आहे. एकाद्या कवीनें किंवा कादंबरीकारानेंच तें केलें तर करावें. उत्तरेस काठेवाडपर्यंत, दक्षिणेस कोची, पूर्वेस हुबळी, धारवाड, पर्यंत लेखकानें प्रवास केला आहे या एवढ्या प्रवासांत गोव्याशीं स्पर्धा करूं शकणारें सृष्टिसौंदर्य त्याला तरी इतरत्र दिसलें नाहीं.

प्रस्तुत प्रकरणांत गोवा प्रांताचें विहंगम दृष्टीनें वर्णन करण्याचा प्रयत्न लेखक करणार असून प्रेक्षणीय स्थळें, देवालयें, धर्मपीठें, चर्चे, झरे व समुद्रस्नानाच्या जागा या अनुक्रमानें तो करावयाचा आहे.

**दोन प्रवेशद्वारें:**—रेल्वे मार्गानें ब्रागांझा घाटांतून एक व जलमार्गानें, पणजी किंवा मुरगाव बंदराचा दुसरा, असे गोमंतकप्रवेशाला दोन प्रमुख दरवाजे आहेत. क्यासलरॉक स्टेशन सोडतांच, घनदाट वृक्षवनस्पतींमधून व हिरव्यागार जंगलातून नागमोडीनें उतरणारा आमचा लोहमार्ग फारच प्रेक्षणीय आहे कधीं मध्येंच आडवे येणारे गगनभेदी व कृष्णवर्ण पहाड तर कधीं भूगर्भांतून जाणारा रस्ता, कधीं पातालाचा ठाव घेणाऱ्या दऱ्या तर कधीं उंच पूलाच्या मालिका, कधीं नयनरम्य व सहज मनोहर असे जलप्रवाह तर कधीं दूरवर न्याहाळतां येणारा गोमंतकीय पुण्य-भूमीचा देखावा, अशा रमणीय व सौंदर्यपूर्ण दरवाजानें प्रवेश करणाऱ्या पाहुण्याला, पुढेंही आपल्याला असाच आल्हादकारक देखावा पहायला मिळेल अशी कल्पना झाली तर ती साहजिक ठरेल.

जलमार्गानें येणाऱ्या प्रवाशाना आरंभींच दुरून दिसणारा व मान उंच करून गर्वोद्धत दृष्टीनें मधून मधून तेजाचे फवारे सोडणारा आग्वादचा दीपस्तंभच सामोरा येत असतो. “ गोमंतकात येत आहांना ? अवश्य या मी जसा कधीं नम्र कधीं प्रखर प्रकाश देत असतों, तसाच गोमंतकही कधीं नम्र व जरूर पडल्यास प्रखर तेजस्वी आहे ” असेंच जणुं काय तो दर्शवित असतो. पुढें आग्वाद व मुरगांव या दोन टोंकांमध्यें प्रवासी पोंचतांच मांडवी व अघशी या उभय सवतींचा तो मधुर प्रेमसंगम त्याच्या दृष्टिपथात येतो एकीकडून मुरगांवचें भूशीर व दुसरीकडून आग्वादचें टोंक अशीं या संगमावर खडा पहारा करीत आहेत सवतींचाच संगम तो ! तेव्हां त्याचें मनोहारित्व काय वर्णावें ! शिवाय तो जितका मनोहर तितकाच चंचलहीपण आहे याचेंही नवल नाहीं गोमंतकाच्या प्रवेशद्वाराशीं होणारा हा संगम भीषणतेंतही मुळींच कमी नाहीं उभय सपत्नी खवळल्या, म्हणजे काबच्या भूशीरासमोर त्यांचा जो पिंगा सुरू होतो, संतापलेल्या नागिणींप्रमाणें त्यांच्या तोंडांतून जो फेंस निघतो, तो पाहतांनां निधड्या छातीच्या नावाड्यांची देखील हबेलडी उडते. गोमंतकीय नंदनवन जो अंत्रुजप्रांत, त्याचें इतरेजनाच्या दृष्टिपातापासून रक्षण करण्याकरितांच कीं काय, नदीच्या प्रवेशद्वारांत, एका बाजूनें मुरगाव व दुसरीकडून काब यांचा खडा पहारा आहे. त्याचप्रमाणें कदंबांची नगरी, आलबुकेर्केची वैभवशाली राजधानी, ती पूर्वकालीन उतारपेठ, आज कंगाल दशेला पोंचली आहे. तेव्हा अशा उपेक्षणीय

स्थितींत तिजवर परक्यांची नजर पडूं नये या हेतूनेंच कीं काय, पणजीच्या बंदराचा मार्ग आड वळणामुळें थोडा धोक्याचा बनला आहे

**धबधबे:**—दुधसागरच्या धबधब्याचें वर्णन करण्याचा प्रयत्न आम्हाला करावयाचा नाहीं लोकांची दृष्ट लागूं नये म्हणून हळुवार मनाच्या माता जशा आपल्या कोमल बालकाना नेहेमीं लपविण्याचा विफल प्रयत्न करीत असतात, त्याचप्रमाणें बिचाऱ्या सह्याद्रीनें या आपल्या बालकाला कित्येक वर्षें एका वळणांत लपविलें होतें पण हिंदुस्थानची सारी संपत्ति उघड्यावर टाकण्याचा विडा उचललेली पाश्चात्य संस्कृति रेल्वेच्या रूपानें अवरली व तिनेंच आम्हा गोमतकीयांची ही गुप्त संपत्ति प्रदर्शनात मांडली इतकेंच नव्हे, तर दुधसागररूपी बालकाला तिनें रेल्वे पुलाचा नवा कटिबंधही नजर केला तेव्हां आतां या संस्कृतीचे आभार मानावे कीं, तिचा द्वेष करावा हेंच कोडें आहे. दुधसागर स्टेशनांतच गाडी भुयारांत प्रवेश करिते तेथून बाहेर येतों न येतों, इतक्यांतच हा नयनरम्य प्रवाह डावीकडून सुमारें दोनशें मीटरवरून टप्याटप्यांनीं उड्या घेत प्रवाशाचें स्वागत करतो त्याचा तो दुधासारखा शुभ्र प्रवाह व श्रवण मनोहर खळखळाट, आमच्या इंद्रियाच्या आवाक्यांत येतात न येतात, इतक्यांतच पुन गाडी भुयारांत कोंबली जाते व ही घटना देखील दृष्ट लागेल या भयानेंच सह्याद्रीनें केली नसेलना असा क्षणभर संशय उत्पन्न होतो परंतु पाहुण्याकडे जाऊं नको असें प्रत्यक्षाप्रत्यक्ष बजावलें असतांही खेळकर बालक जसा पुन पुनः त्याच्या भोंवतीं दुरूनच घिरट्या घालीत असतो, तसा दुधसागरही पुढें दोन तीनदां प्रवाशाला जरा लावूनच दर्शन देत असतो

दुसरा मनोहर धबधबा म्हणजे हरवळेंचा होय. मांडवीला भेटणाऱ्या साखळीच्या नदीनें, सुमारें २५–३० मीटरच्या उंचीवरून एकदम खालीं उडी घेऊन हा धबधबा निर्माण केला आहे साखळीहून वाळपैस जाणाऱ्या रस्त्यानें मैल दीड मैल जाताच उजव्या बाजूला, आडवाटेनें सुमारें अर्ध्या मैलावर हा धबधबा मिळतो शेजारींच एक शिवालय असून तेथें शिवरात्रीची जत्रा भरते. त्याचप्रमाणें तेथें जुनीं बुद्धकालीन लेणींही आहेत

**शहरें व गांवें:**—पुराणवस्तुसंशोधनाच्या दृष्टीनें **थोरलें गोवें** हें नामशेष शहर व **चंद्रपूर** ( कदंबाचेंच ) हें दुसरें. हीं दोन अभ्यासनीय आहेत. **थोरलें गोवें** हें पणजीहून अवशी येथें जातांना सात मैलाच्या अंतरावर मिळतें व **चंद्रपूर** हें तर चांदर हें स्टेशन होय. अजून देखील शोधकांना तेथें जुने शिलालेख सांपडतात गांवांपैकीं रिवण येथें बुद्धकालीन खोदकामें दिसतात तेथें जाण्यास सांवर्डें स्टेशनावरून मोटारची

सोय आहे कुर्डी गावात नदीच्या धरणाजवळच एक जुनें पण लहानसेंच देवालय असून त्यांत सुदर सुदर तीन चार मूर्ति आहेत. त्याहि अभ्यासनीय आहेत. तेथें जाण्यास सांग्यापर्यंत मोटारीची सोय आहे पुढें मात्र सुमारें चार पांच मैल पायींच जावें लागतें हेमाडबार्शें महालांत तांबडी गावांत एक जुनें देऊळ आहे, त्यात तर कोरून तयार केलेला दगडी लावण दिवा आहे. या देवळाची माहिती देखील संशोधकानीं अजून मिळविली नाहीं.

**जुनें गोवें** —हें शहर पूर्वी मुसलमानांनीं इ स १४७९त वसविलें असें इतिहास सागतो पुढें इ.स १५१०त तें पोर्तुगीजानीं घेऊन आपली राजधानी केली विजयानगरचे माधव मंत्री यानीं ब्राह्मणास दान दिलेली भूमि व स्थापन केलेलें माधवतीर्थ ऊर्फ ब्रह्मपुरी, याच शहराच्या विस्तारांत समवतात त्याचप्रमाणें कदंबकालीन माडवी म्हणजे जकात-नाकेंही येथेंच होतें, तेव्हा हें शहर कदंबकालीनच असावें, असें अनुमान क्रमप्राप्त होतें. तूर्त माधवतीर्थाकडे श्रावण सोमवारांची जत्रा भरते. पोर्तुगीजांच्या आगमनकालींच हें शहर भरभराटींत होतें नंतर त्यांनीं तेथें, सा कायतान, बों जेजूस, सांत आगुस्तीन्य सां फ्रासीस्कु द आसीझ, से पात्रियार्कोल, पालासियु द इंकिझिसांव, ( धर्म समीक्षण सभेची प्यालेस कोंकणींत ती " व्हडलें घर ' या नांवानें ओळखली जात होती ) आर्सेनाल, पालासियु दुझ व्हिजोरेइश्, इत्यादि पुष्कळच इमारती उभारल्या. त्याकाळीं गोवा शहरांत सुमारें तीन चार लाख लोकवस्ती होती शहराचा काहीं भाग सपाट होता व कांहीं भाग टेंकडीवर वसलेला होता, त्यामुळें पोर्तुगीजांना तें आपल्या लिज्बोअ शहरासारखें दिसे. सपन्नता व हें सादृश्य यामुळें ' ज्यानें गोवें पाहिलें त्याला लिज्बोअ पाहण्याची आवश्यकता नाहीं " ( Quem viu Goa não tem de ver Lisbôa ) अशी म्हण तेव्हां रूढ होती इ. स १७६९ त तेथें एक भयंकर साथ आली व मुख्य मुख्य अधिकाऱ्यांनीं आपलें ठाणें तेथून पणजी येथें नेलें. आणि पुढें इ. स. १८०३ सालीं सारींच आफिसें तेथून निघून हें शहर उध्वस्त झालें. तूर्त तेथें केवळ चार पांच इमारतींच काय त्या सुस्थितींत दिसतात पैकीं सा कायतानची इमारत रोमच्या सेंट पीटरच्या धर्तीवर बांधली असून सुदर दिसते. बों जेजूसच्या कोंव्हेंतांत सेंट फ्रान्सिस झेवियरचें शव आहे व सेंट फ्रान्सिस द आसीझच्या कोंव्हेंतांत पुष्कळच जुन्या मूर्ति आहेत.

**पणजी**:—हें शहर नवीन–गोवा शहराचा एक भाग आहे. आग्वादच्या उपसागरांतून आत शिरतांच तें दिसूं लागतें तें एका डोंगराच्या पायथ्याशीं अर्धचंद्राकार वसलें आहे. सुंदर इमारती, शोभिवत रस्ते, नदीची पायघडी, इत्यादि आंगांउपांगांमुळें

हें शहर रमणीय दिसतें. लिसेव सेंन्त्रालची इमारत, प्रसूतिगृहाची इमारत, मिझेरिकोर्द संस्थेचा बालिकाश्रम, आल्बुकेर्केचें स्मारक, वास्को दा गामाचें स्मारक, म्युनिसीपल हाऊस, इत्यादि इमारती प्रेक्षणीय आहेत परंतु पणजीच्या साऱ्या इमारतींत तेथील चर्चची इमारत जितकी प्रेक्षणीय दिसते, तितकी आणखी कोणचीच दिसत नाहीं पोर्तुगीज हिंदुस्थानची राजधानी, गोव्याचें हायकोर्ट व तिसवाडी कोमार्क आणि कोंसेल्य याचें हें मुख्य स्थान आहे. गोव्यांतील व्यापाराचें तें मुख्य केंद्र आहे.

**मडगांवः**—जुन्या ऐतिहासिक काळीं हें शहर राजधानीचें होतें असें सांगतात. लहानसेंच असलें तरी तें टुमदार दिसतें विशेषत , नवा बाजार, म्युनिसिपाटीची इमारत, कार्तेलामळ नावाचें विस्तीर्ण मैदान, श्री दामोदर विद्याभुवन इत्यादि भाग मनोरम दिसतात हें शहर गोव्याच्या व्यापाराचें मुख्य केंद्र बनण्याचा संभव दिसतो. हिंदुसमाजांतील अलीकडच्या बऱ्याच चळवळींमुळें हें शहर प्रसिद्ध आहे. मोटारींची जंगी वाहतुक येथूनच होते. साऱ्या गोमतकभर येथून मोटारी जात येत असतात. सासष्ट कोमार्काचें व कोंसेल्याचें हें मुख्य स्थान आहे.

**म्हापशेंः**—हें शहर देखील लहानसेंच असलें तरी, बारदेशाच्या संपन्न कोंसेल्याचें व कोमार्काचें मुख्य स्थान आणि गोव्यांतील प्रमुख उतारपेठ या नात्यानें पूर्वीपासून बरेंच प्रसिद्ध आहे. गोमतकाच्या उत्तर विभागाचा व्यापार व रहदारी याच शहरामार्फत चालतात. सारस्वत विद्यालय येथेंच आहे. पणजीहून बेतीं वेरें या फेरी बोटीनें बेतीं येथें जातांच म्हापशाला जाणाऱ्या मोटारी हमेश मिळतात गोव्यांतील वैश्य समाजाचें केंद्र याच शहरांत आहे.

**वास्कोदागामाः**--रेल्वेच्या व बंदराच्या सोयीमुळें हें शहर उत्तरोत्तर वाढतच आहे. शहर सुधराई कमिटीच्या योजनेमुळें, प्रशस्त रस्ते, सुंदर इमारती, इत्यादि सोयी या शहरात वाढल्या आहेत स्टयाडर्ड ऑइल कंपनी, एशियाटिक पेट्रोलियम कंपनी, बर्मा ऑइल कंपनी यांनीं येथें आपापल्या मालाचे साठे केले आहेत गोव्याचा परदेशांशीं होणारा व्यापार येथूनच होतो. येथील डोंगरात विपुल पाणी असून वरून दूरवरचा देखावा मोठा प्रेक्षणीय दिसतो जुना किल्ला आतां भंगलेला आहे तरी त्याचे कांहीं अवशेष अजूनही सुंदर दिसतात. हें शहर राजधानीचें करावें असें सरकारनें इ. स. १८०३ त ठरविलें व एक दोन इमारतीही तेथें बांधल्या होत्या.

**पेडणेंः**--हा गाव कोंसेल्याची राजधानी असून कसब्याचा आहे प्रसिद्ध धानिक श्री वासुदेव आत्माराम प्रभु देसाई देशप्रभु यांच्या रहिवासामुळें येथें कित्येक इमारती

ठाकठीक झाल्या आहेत. गोव्यांतील प्रसिद्ध असा सरमळ्याचा झरा या कसब्याजवळच आहे. येथून उत्तरेस सावंतवाडीपर्यंत व दक्षिणेस म्हापशापर्यंत मोटारींची सोय आहे.

**हळर्ण:**—कायसुवच्या नदीकांठच्या या गावात इतिहासप्रसिद्ध असा हळर्णचा किल्ला असून तेथें पूर्वी पोर्तुगीज व वाडीकर भोंसले यांच्यामध्यें बरींच युद्धें झालीं होतीं

**चिखली व आरोबा:**—चिखली, हें लखबादादा लाड यांचें जन्मस्थान होय. आराबो गावात एक ल्हानसा किल्ला आहे. इतिहास प्रसिद्ध लखबादादा लाड यांचें वास्तव्य स्थान असा वाडा याच गावांत आहे प्रसिद्ध आरोबकर देसाई यांचेही निवासस्थान येथेंच आहे. चिखली येथें दोन व आरोबा येथें एक अशीं तीन लाड घराणीं आहेत.

**केरी:**—हा गांव वक्षिबहाद्दर जिवबादादा केरकर यांचें वसतिस्थान होतें अजूनही तेथें त्यांचे वंशज राहतात.

**पारसें**—हा गांव डॉ भाऊ दाजी लाड यांच्या घराण्यामुळें व लाड-घराण्याची ग्रामदेवता श्रीभगवती या देवस्थानामुळें प्रसिद्ध आहे

**डिचोली**—हा गांव पूर्वी उतारपेठेचा होता. त्याचप्रमाणें एकोणिसाव्या शतकाच्या तिसऱ्या विभागापर्यंत येथें पोर्तुगीज सरकारच्या लष्कराचें ठाणें होतें तूर्त डिचोली कोमार्कांचें मुख्य स्थान असल्यामुळेंच या गांवाला महत्व आहे. येथें मातीच्या मूर्ति व कुंभारकाम बरेंच प्रेक्षणीय होतें.

**सांखळी:**—कोंसेल्याचें हें मुख्यस्थान असून पूर्वी येथें बराच मोठा व्यापार चालत होता एक किल्लाही येथें होता. परंतु आतां त्याचा थोडासा भाग मात्र आहे त्यांतच सरकारी रेसेबदोरी व जकात नाकें असतें हरवळेंच्या धबधब्याजवळ जावयाची सोय येथूनच होण्याजोगी आहे श्री. दत्तात्रेयाचें जागृत स्थान व मंदिर सांखळींत आहे.

**फोंडें**—हें कोंसेल्याचें मुख्यस्थान आहे. इतिहासांत वर्णन केलेला मर्दनगड या गांवांतच आहे श्री. भिषग्वर रामचंद्र पांडुरंग वैद्य यांनीं स्थापन केलेलें आल्मेद कॉलेज याच गावांत असल्यामुळें, येथें साऱ्या गोमंतकांतून बरेच विद्यार्थी दरसाल येत असतात अंत्रुज प्रांतांतील सर्व ठिकाणीं जाण्यास येथूनच सोय होते गोमंतकांतील प्रसिद्ध प्रसिद्ध देवालयें याच्या आसपासच आहेत पणजीहून बेळगांवास जाणारी मोटार येथें स्टेशन करते विजापूर दरबार, सोंधेकर, मराठे, पोर्तुगीज इत्यादिकांच्या राजकीय घडामोडींचें हें इतिहासप्रसिद्ध स्थान आहे विजापूरच्या अमलाच्या वेळीं बांधलेली सफामशीद याच्या जवळच आहे मर्दनगड किल्ल्याचे बरेच अवशेष अजूनही पहायला मिळतात मराठ्यांच्या गोमंतकीय प्रांताची हीच राजधानी होती.

**केपें:**—हेंही कोंसेल्याचें व कोमार्कांचें मुख्य स्थान आहे. कुशावती नदीच्या

कांठीं हें वसलें असून सांगें व सावर्डें येथून मडगांवास जाणाऱ्या मोटारींचें हें स्टेशन आहे. येथें जवळच कुशावती नदीला धरण बांधून चादरपर्यंत पाणी नेणारा पारोडेंचा कालवा नेला आहे

**कुडचडें:**--हें उपनगर अगदीं नवीनच वसलें आहे सावर्डें स्टेशन याच उपनगरांत आहे रेल्वे व अघशीनदीचें बंदर या उभयविध सोयींमुळें, हें उपनगर लवकरच एक व्यापारी केंद्र बनेल अशी चिन्हें दिसतात आजदेखील येथून बराच मोठा व्यापार चालतो. दोन तीन कारखानेही येथें आहेत

**सांगें:**—कोंसेल्याचें हें मुख्य स्थान आहे. पूर्वीं हें गाव उतारपेठेचें होतें परंतु रेल्वे झाल्यापासून येथील व्यापार मोडला. येथें दोन नद्यांचा संगम झाला असून मध्यें प्रवाहातच संगमेश्वराचें एक कोरींव देऊळ आहे

**वाळपै:**--हें गाव सत्तर कोंसेल्याचें मुख्य ठिकाण आहे. केळघाटात जाणारा रस्ता येथूनच जातो

**सांवर्डें:**--हा गाव लहानसाच आहे सावर्डें स्टेशन हें नांव पडायला हाच गांव कारण झाला वास्तविक सावर्डें स्टेशन कुडचडें उपनगरांत आहे. स्टेशनाच्या उत्तरेस अघशी नदी उतरतांच प्रवासी या गांवात पोंचतो येथील सावर्डेंकर नाडकर्णी यांचा वाडा जुन्या बांधकामामुळें बराच प्रसिद्ध आहे. गोमंतकांत एवढा प्रचंड वाडा दुसरा नाहीं त्यांचे मूळपुरुष विठोबा सरदार हे १८ व्या शतकाच्या मध्यविभागांत रायतुरच्या किल्ल्यावर किल्लेदार होते व त्याना पोर्तुगीज सरकारनें क्यापिटनचा हुद्दा दिला होता येथें अघशी नदीवर रेल्वेचा दुमजली पूल सुमारें अर्धा मैल अंतरावर आहे तो प्रेक्षणीय आहे

**रायबंदर:**--नवीन गोवा शहराचा हा एक भाग आहे. पणजीहून याचा देखावा प्रेक्षणीय दिसतो शुद्धीचा पहिला बार याच्या जवळच्या चिंबल गांवातच उडाला होता मिझेरीकोर्दींचें हॉस्पिटल याच उपनगरांत आहे.


**देवालयें:**—पोर्तुगीज पूर्वकालात गोमंतकात कोमुनदादींचें प्रस्थ बरेंच होतें व त्यामुळें गांवगन्ना मोठमोठीं देवालयें होतीं बाटाबाटीच्या काळांत ह्या साऱ्या देवालयांची वाताहात होऊन गेली व तीं जुन्या काबिजादींतून नव्या काबिजादींत स्थलांतर पावलीं. त्यांचें मुळचे अग्रहार, इनामें, दानपत्रें, नेमणुका इत्यादि नष्ट झालीं व त्यांनां नव्यानें पहिले पाढे पंचावन असा क्रम सुरू करावा लागला तरी देखील आजला गोमंतकांत प्रेक्षणीय व संपन्न अशी बरींच देवालयें आहेत. त्यांतील प्रमुख प्रमुख देवालयांची माहिती पुढें देत आहों.

**श्री सप्तकोटीश्वर**, नारवें --हें देवालय हल्लीं सांखळी कोंसेल्यांतील नारवे गांवीं

आहे. अगदीं जुन्या काळीं तें कदंब राजाचें कुलदैवत होतें व विजयनगरच्या अमदानींत त्याचें मूळचें वसतिस्थान जें दीपवति बेट ( दिवाडी ) तें त्याला नंदादीपासाठीं माधवमंत्र्यांनीं सोडलें होतें पार्ड्यांच्या पुढाऱ्यांत तें देवालय विनाश पावलें आणि लिंगाचा उपयोग विहिरीवर फोपाळ्यासाठीं ( दोर ओढण्याची तुळई ) होऊं लागला. इ स १५४९ त नारायण शेणवी सूर्यराव देसाई यांनीं तें लिंग अचानक उचलून रातोरात पळवून भतग्राम प्रांतांतील लाटंबार्शें गांवात नेऊन ठेविलें व पुढें १५६९ त तूर्तेच्या जागीं त्याची स्थापना केली

इ. स. १६६९ सालीं क्षत्रीय कुलावतंस श्री शिवाजी महाराजानीं देवालयाचा जीर्णोद्धार करून आजचें देवालय बांधलें व त्याला सातशें होनाची नेमणूक करून दिली होती परंतु एका दुष्टानें हस्तलाघवानें मूळ सनदेंतील एक शून्य पुसून टाकल्या-मुळें, आतां पोर्तुगीज सरकारांतून देवालयाला केवळ १९१ रुपयेच मिळतात इ. स. १९१० नंतर याचें पूर्वीचें कमानींचें छप्पर, मध्यें भेग आल्यामुळें, मोडण्यात येऊन कौलारू छप्पर घातलें आहे परंतु जुनी कमान पाडून टाकण्यासच प्रचंड प्रयास पडले, इतकी ती मजबूद होती येथें दरसाल शिवरात्रीचा उत्सव होतो पणजीहून नदीमार्गानें नारवें बंदरावर येताच, श्रीसप्तकोटीश्वराकडे जावयाला सुमारें दोन मैलांचा चांगला रस्ता आहे याचे महाजन, सूर्यराव सरदेसाई, विश्वासराव देसाई, आमोणकर व दिवाडकर हे नैध्रुव गोत्रीय गौड सारस्वत ब्राम्हण व कांहीं द्रवीड ब्राह्मणही आहेत.


**श्री शांतादुर्गा संस्थान**, कवळें:— गोमंतकांतील कौशिक गोत्रीय गौड सारस्वत ब्राम्हणाचें हें कुलदैवत होय. याचें मूलस्थान सासष्ट प्रांतातील केळोशी हें गाव होतें इ स. १५६४ सालीं देवालयाचा विध्वंस करण्यांत आला. तेव्हां महाजन मंडळीनें मूर्ति पळवून सोंधेकरांच्या अन्त्रुज प्रांतात नेली. व मोठ्या प्रयासानें महारांकडून थोडीशी जागा मिळवून तेथें तिची स्थापना केली तेंच आजचें कवळें क्षेत्र होय श्री शाहु महाराजांचे मन्त्री, नारो राम शेणवीं, हे या देवीचे महाजन असल्यामुळे, त्यानीं इ स. १७०८ ते १७३८ च्या दरम्यान साम्प्रतचें भव्य देवालय बांधून दिलें व इ स. १७३९ त श्री. बाजीराव पेशवे यांकडून कवळें हा गाव देवीस इनाम देवविला अर्थात् पुनः या देवीची पूजाअर्चा मुळच्या इतमामानें होऊं लागली या शिवाय ठिकठिकाणच्या महाजन मंडळीनेंही शक्त्यनुसार देणग्या, नेमणुका वगैरे देण्याचें अखंड व्रत चालविलेंच आहे. देवाल्यासभोंवतीं भव्य अग्रशाळा असून समोर दीपस्तंभ व तलाव आहे. अग्रशाळांपैकीं एक अग्रशाळा इतिहासप्रसिद्ध रामचंद्र मल्हार सुखठाणकर यांनीं बांधून दिली होती तूर्त कौशिक गोत्रीयांशिवाय वत्स गोत्री वरदे ( भरणे,



श्री मंगेशाचें देवालय.

Rex Studio
Bombay No 7.

Lakshmi Art Bombay 8



श्री शांतादुर्गा—देवालय.

Rex Studio
Bombay, No. 7

बोरकर, वालावलीकर वगैरे ), भारद्वाज गोत्री पागदीकर व वसिष्ठ गोत्री साळशीकर नाडकर्णी हेही या देवीचे महाजन आहेत देवालयाचें आजचें उत्पन्न सुमारें १८।२० हजार रुपये असून १४।१५ हजार रुपये खर्च आहे. त्रिकाल नौबदीचा चौघडा, मुंबईचे दानशूर गृहस्थ कै. नारायणराव दाभोळकर यांनीं ठेविला आहे. देवालयांतून देवकृत्य व उत्सव होत नाहीं, असा एकही महिना जात नसतो मागें उल्लेखलेला ग्रंथसंग्रहही या देवालयांत आहे. सांगण्यास अत्यानंद वाटतो कीं, केळोशी येथील मुळची देवालयाची जमीन देवालयानें परत मिळविली आहे. देवालयाला मिळालेली शेवटची जमीन म्हणजे, केळशी येथीलच शातादीप, ऊर्फ देवतेचा जुवा ही होय. इचेंच उत्पन्न सुमारें चार हजारावर येतें

**श्री मांगिरीश संस्थान**, मंगेशीं—पूर्वी हें देवालय सासष्ट प्रांतांतीलच कुश-स्थळी ( कुठ्ठाळ ) या गावात होतें. रायतूरच्या किल्लेदाराच्या बहाद्दरीमुळें त्याचा विध्वंस होताच, इ. स १५६८ सालीं महाजन मंडळीनें हें लिंग प्रियोळ गावात स्थापन केलें. त्यामुळें त्या वाडयालाच तूर्त मंगेशीं हें नांव मिळालें आहे समोरचा दीपस्तंभ गोव्यांतील एकदर दीपस्तभांत उंच व शोभिवंत आहे. देवालयाच्या सभों-वार प्रशस्त अग्रशाळा असून, पुढच्या बाजूस विस्तीर्ण तलावही आहे वत्स व कौंडण्य गोत्राचे स्मार्त व थोडे वैष्णव असे उभय संप्रदायी गौडसारस्वतब्राह्मण श्री मांगिरीशाचे महाजन आहेत. देवालयांत दरसाल इतके उत्सव व देवकृत्यें होतात कीं, नवें देवकृत्य ठेवायला जवळ जवळ जागाच नाहींशी झाली आहे कुंभारजुवें हा गांव देवाल-यान विकत घेतला आहे तूर्त देवालयाचें उत्पन्न सुमारें २०।२५ हजार रुपयांचें असून १७।१८ हजार रुपये खर्च होत असतो. येथेंही त्रिकाळ नौबदीचा चौघडा झडत असतो. मागें उल्लेख केलेला श्री मांगिरीश ग्रंथसंग्रह संस्थानांतूनच चालतो.

**श्री महालक्ष्मी**, बांदिवडें:—हें देवालयही सासष्टींतीलच कोलवें या गांवांत होतें इ. स. १५६७ सालीं त्याचा उच्छेद होतांच तें बांदिवडें गावांत नेण्यांत आलें कवळें व मंगेशी येथील महाजन मंडळींचें हें उपकुलदैवत ( पालवी ) आहे. देवाल-याची इमारत अलीकडेच बांधली असून शोभिवंत दिसते

**श्री रामनाथ**, रामनाथीं ( कवळें ).—मागें जुलुमाच्या जंत्रींत ज्याचें त्रोटक वर्णन आलें आहे, तोच हा लोटलीचा श्री रामनाथ होय याच्या विध्वंसाबद्दल तें बांधून देण्याचा फैसला न्याय कोर्टानें रायतुरच्या किल्लेदाराविरुद्ध दिला होता. देऊळ बांधल्यामुळें या वाड्यालाच रामनाथीं हें अन्वर्थक नांव पडलें आहे. कवळें संस्था-नच्या उत्तरेस चार पांच मिनिटांच्या अंतरावरच हें आहे समोरच एक तलाव आहे

त्यामुळें हें बरेंच खुलून दिसतें सालिना याचें उत्पन्न सुमारें चार पांच हजार रुपये असून चार साडेचार हजार खर्च होत असतो.

**श्री नागेश** वादिवडें---हें देवालय, सोंधेकरांच्या राजवाड्याजवळ आहे. हें लहानसेंच असलें तरी पुढच्या नयनमनोहर तलावामुळें अत्यंत आकर्षक आहे. या तलावासारखा सुंदर व स्वच्छ तलाव गोमांतकांत दुसरा नाहींच म्हटलें तरी चालेल. याचें मूळस्थान देखील वादिवडेंच होतें असें दगाईत आपल्या इतिहासांत सांगतात कौशिक गोत्रीय प्रतापराव सरदेसाई व प्रियोळकर याचे महाजन आहेत

**श्री म्हाळसा,** म्हाडदोळ---ही देवी पूर्वी सासष्ट महालांतील वेर्णें या गावीं डोंगरावर होती अजूनही त्या देवालयाचा अवशेष तेथें असून त्याला जुनें म्हाडदोळ या नांवानेंच ओळखतात. रायतुरच्या बहादर दियोग रुद्रीगची कुन्हाड याच देवालया-वर पहिल्यानें पडली होती. प्रियोळ गांवात श्री मंगेशीच्या जवळच हें देवालय आहे आणि त्यावरूनच त्या वाड्याला म्हाडदोळ हें नांव मिळालें आहे. कौशिक, भारद्वाज, इत्यादि पांच गोत्रांचे गौड सारस्वत ब्राह्मण व कित्येक द्रविड ब्राह्मण, वैश्य, मराठे इत्यादिही याचे महाजन आहेत सालिना उत्पन्न सुमारें चार हजार रुपये असून तेवढाच खर्च आहे. देवालयाचें बांधकाम जुन्या धर्तीचें असून चौक मोठा विस्तीर्ण व प्रेक्षणीय आहे. वेर्णें येथील जुनें देवालय बरेंच प्रचंड व गढीसारखें होतें आणि तें एक दोन वेळा पोर्तुगीजांना किल्ल्याप्रमाणें आसरा घेण्यास उपयोगी पडलें होतें. सरकारी रीत्या होणारे शपथविधि याच देवळांत होत होते.

हीं एकदर देवस्थानें पहावयाचीं झाल्यास पणजीहून बेळगावच्या मोटारीनें निघावें, मडगावहून रासईच्या मोटारीनें येऊन दुर्भाट येथून जावें, किंवा सांवर्डें—पणजीच्या लॉंच सर्व्हिसनें निघालें पाहिजे. बहुतेक साऱ्या देवालयांतून त्रिकाल नौबदीचा चौघडा झडत असल्यामुळें हिंदी संस्कृतीचा हा ठेवा मनाला फारच आल्हाद देत असतो

**श्रीदामोदर,** जांबावलीः-हें देवालय मुळचें मडगांवचें होय रासईच्या रस्त्यानें जाताना उजवीकडे अजून त्याची जागा व तलाव दिसतात त्याचा पोर्तुगीजांनीं उच्छेद केल्या-वर रिवण गावच्या जांबावली वाड्यावर प्रतिमा नेण्यात आली देवालयाचे महाजन भारद्वाज, कौशिक, वगैरे गोत्राचे सारस्वत ब्राह्मण असून इतरही पुष्कळ लोक याला भजतात. उत्पन्न सुमारें सात आठ हजार असून तेवढाच खर्च होत असतो

**श्रीमल्लिकार्जुन,** काणकोणः-काणकोणच्या कसब्यातून या देवाळाकडे मोटारीनें जातां येतें. हें मुळचें द्रवीड वंशाच्या हबू लोकाचें देवालय होतें. सध्या त्याचे महाजन कोणकोण कोंसेल्यांतील मराठे व गौड सारस्वत ब्राह्मण आहेत. सालिना उत्पन्न

सुमारें १२ हजार रुपये असून ७ हजारांवर खर्च होत असतो श्री शांतादुर्गा व श्री मंगेश या देवस्थानाबरोबर या देवळासही पठाणानीं हात मारला होता

**श्री कालिकादेवी**, कांसारपाल--हें देवालय दैवज्ञ ब्राम्हणांचें असून सुंदर आहे. येथें बरेच उत्सव प्रेक्षणीय होतात देवालयाचें शिखर सोनेरी पत्र्यानें मढविलेलें आहे सालिना उत्पन्न सुमारें ३।४ हजारांचें असून तेवढाच खर्च होतो या देवालयाच्या उत्पन्नाची प्रमुख बाब म्हणजे, दैवज्ञ सुवर्णकाराच्या कार्यागारांतील केराच्या लिलांवांतून उत्पन्न होणारा पैसा हेंच आहे.

श्री महालक्ष्मी पणजी ( स्थापना इ. स. १८१७, ); श्री मारुती, म्हापशें, श्री सांतेरी, खोर्ली ( बारदेश ), श्री विठ्ठल, ओंसाभाट, म्हापशें, श्री शांतादुर्गा, असनोडें; श्री भूतनाथ, नांदोडें, श्री पांडुरंग, बेतीं, श्री शांतादुर्गा, पीर्ण; श्री लक्ष्मीनारायण शिवोली, श्री विठ्ठलमंदीर, मडगांव, श्री चंद्रेश्वर भूतनाथ ( पर्वतावरील ) पारोडें; श्री सांतेरी, पारोडें, श्री रामनाथ, तळ्वड, इतकीं देवालयें जुन्या काबिजादींत १९२९ त होतीं या पैकीं कांहीं अगदीं ( नवीन रिपब्लिकोत्तरकालीन ) आहेत.

प्रमुख प्रमुख देवालयांतून दरसाल शिलकीं पडणारी रक्कम सुमारें २५।३० हजा-रांची तरी असावी या रकमेमुळें गरजूंना ब्यांकेप्रमाणें देवालयाचा उपयोग होत असतो तरी पण तिचा यापेक्षाही उपयुक्त असा विनियोग म्हणजे धार्मिक शिक्षणा-कडे ती खर्च करणें हा होय पण तसा काल यायला अजूनही बराच कालावधि लोटला पाहिजे असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.


वर दिलेल्या प्रमुख देवालयाखेरीज जुन्या काबिजादींतील प्रत्येक गांवांत एक एक देऊळ असतेंच पण विस्तारभयास्तव त्याचा उल्लेख टाळला आहे.

**श्री कैवल्यपूर संस्थान, कवळें**:--हें संस्थान स्मार्त संप्रदायी गौड सार-स्वत ब्राम्हणाच्या धर्मगुरूचें आहे. व त्याची परंपरा परमपूज्य श्रीमद्गौडपादाचार्यां-पासून उत्पन्न झाली असल्यानें, मठाधीशाना श्री गौडपादाचार्य हें उपपद लावण्यांत येत असतें पूर्वीं हा मठ सासष्ट प्रांतांत मडगांव ( मठग्राम ), केळोशी व कुशस्थली येथें होता. परंतु जुलुमांच्या काळीं देवस्थानाबरोबर त्यावरही गदा आली व धर्मगुरूंना स्थलांतर करावें लागलें. संस्थानाला छत्रपति श्री शाहूमहाराज, सातारा, श्रीमंत माधवराव पेशवे, श्री. खेमसावंत भोंसले, सावंतवाडी; श्री लखम सांवत भोंसले, हेरें संस्थान, श्री सयाजिराव गायकवाड, वडोदें ( शके १६९७ ), श्री. कृष्णराव भगवंत पंत अमात्य इत्यादिकाकडून गांवगन्ना नेम-णुका मिळालेल्या आहेत मठाचें उत्पन्न सुमारें १०।१२ हजार रुपयांचें असून खर्चही तसाच दांडगा आहे मठांतून पूर्वी संस्कृत पाठशाळा चालत होती. मठातर्फे होणारा वार्षिक


श्री गणेशोत्सव प्रेक्षणीय असतो काशी, गोकर्ण, नाशिक, मुंबई, खानापूर, इत्यादि पुष्कळ ठिकाणीं मठ असून तेथें पूजा अर्चा होत असते. विद्यमान मठाधीश **श्रीमत्पूर्णानंद सरस्वती** हे ७४ व्या परंपरेचे आहेत. हे मोठे कर्तबगार व बुद्धिमान असून संस्थानची सांपत्तिक स्थिति त्यांनीं आपल्या अमदानींत पुष्कळच सुधारली आहे. तूर्तच्या मठाची इमारत नुकतीच जीर्णोद्धार करून यानींच बांधून घेतली असून ती भव्य व प्रेक्षणीय आहे

**श्री पर्तगाळ संस्थान, पर्तगाळः**—ह्या मठाची स्थापना अलीकडची म्हणजे पंधराव्या शतकातील आहे. उडपीच्या द्रवीड ब्राह्मणातर्गत फलमार मठापासून या संस्थानची परंपरा सुरू झाल्यामुळें, मठाधीशांना श्रीपादवडेर असें उपपद लागतें मठाकडे जायला कोणकोण येथून मोटारी जाण्याजोगा रस्ता आहे. मठाची इमारत भव्य व प्रेक्षणीय असून ती अलीकडेच जीर्णोद्धार करून बांधली आहे. गोमंतक, महाराष्ट्र, उत्तर हिंदुस्थान, इत्यादि प्रदेशांतील सारे माध्व मतानुयायी गौड सारस्वत ब्राह्मण याच मठाचे अनुयायी आहेत साम्प्रत **श्री मत्कमलाकांततीर्थ** स्वामींची कारकीर्द चालत असली, तरी त्यांचे गुरुवर्य **श्री मदिंदिराकांततीर्थ** स्वामी अद्याप विद्यमान आहेत. गुरूनीं मुद्दाम अधिकारन्यास करून शिष्यांच्या हाती अधिकार दिला आहे. **श्री मदिंदिराकांततीर्थ** स्वामी हे संस्कृतांत व वेदांतांत बरेच अधिकारी समजले जातात. मठाचें उत्पन्न सुमारें वीस हजार रुपयांचें असून सुमारें १५ हजार रुपये खर्च होतात. मठांतून दरसाल होणारा श्री रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटाचा होत असतो.


**पात्रियार्कादु द गोअ व चर्चः**—इ. स १६२४ सालींच गोव्यांत बिषपची गादी स्थापन झाली व इ स १५३८ सालीं त्याचा दर्जा आर्चबिषपचा करण्यांत आला बिषपचें वास्तव्य पूर्वी जुन्या गोव्यांत होतें परंतु त्या शहराचा नाश होतांच पणजीच्या टेंकडीवरील उच्च जागीं त्याना भव्य वाडा बांधून देण्यांत आला हिंदुस्थानातील पोर्तुगीज चर्चेवर याची अधिसत्ता चालत असून कोची, दमण वगैरे ठिकाणच्या बिषपवर त्यांचा अधिकार चालतो रिपब्लिकपूर्वकालीं या धर्मपीठाची सत्ता नेहमीं राजसत्तेवर कुरघोडी करीत असे गव्हर्नरच्या गैरहजीरींत पूर्वी कोंसेल्यु गोव्हर्नातीव्ह नांवाचें जें कौन्सिल राज्यकारभार हाकीत असे, त्याचें अध्यक्षस्थान आर्चबिषपकडेच येई. तूर्त गोवें व हिंदुस्थानांतील इतर पोर्तुगीज चर्चें मिळून आर्चबिषपसहित सुमारें दोनशांवर पाद्री नोकरींत आहेत ख्रिस्ती धर्मखात्यावर आजला दरसाल ६० हजार रुपये सरकार खर्च करितें त्यात आर्चबिषप, बिषप, हिंदुस्थानांतील मिशनरी पाद्री व सेमिनारी याचा खर्च येत नाहीं तो निराळाच राहिला.



श्री नृसिंहाचें देवालय-वेलिंग. Rex Studio Bombay, 7



श्री मंगेशी येथील दीपस्तंभ. Rex Studio Bombay, 7



श्री दत्तमदिर–साखळी.

Rex Studio
Bombay No 7

Lakshmi Art, Bombay, 8

साऱ्या गोमतकांत १०१ ख्रिस्ती चर्चे आहेत त्यातून बरींच प्रेक्षणीय आहेत परंतु त्यांची आठवण काढतांच आमच्या हिंदू मनावर अनेक विकार विचारांची झांप एकदम पडते, तेव्हा मधून मधून त्यांचें जें वर्णन आलें आहे तेवढेंच पुरेसें मानून विराम घेणें प्राप्त आहे

**गोमंतकीय झरे:**—औषधि पाण्याचे व मधुर जलाचे असे अनेक झरे गोमतकभर आहेत परंतु त्यांचा उपयोग आधुनिक वैद्यकीय साधनांनीं अजून करून घेण्यात आलेला नाहीं. त्यांची त्रोटक माहिती पुढें जात आहे

**लोहयुक्त झरे:**—१ सत्तर प्रांतांतील करंझोळ गांवीं असलेला झरा, याचें पाणी गोडें व चवदार आहे २ कांदोळी ( बारदेश ) येथें ' सकेली झर ' या नांवानें प्रसिद्ध असलेला झरा, याचें पाणी जरा चवीस कमी असतें आग्वादच्या तटाखालींच तो आहे. ३ काबच्या राजवाड्याजवळ असलेला झरा चवींत तसाच कमी आहे. ४ सासष्ट महालांतील आंबोडेचा झरा. ५ केगदी वेळेवरचा झरा ६ बेतींचा डोंगरातील मायणचा झरा ७ आग्वादच्या किल्ल्यांतील झरा हा झरा लोहयुक्त आहे खरा, पण पाणी मात्र पिण्याच्या लायकीचें नसतें.

**बोरेटेड पाणी:**—१ असनोडेच्या पाण्याइतकें चांगलें बोरेटेड पाणी गोव्यांत इतरत्र मुळींच मिळत नाहीं. शेंकडों माणसें दरसाल त्या स्नानाचा फायदा त्वचा रोगांवर घेत असतात. २ आंबेशेंचा झरा, हा देखील उत्कृष्ठ झरा असून त्याचें पाणी पिण्याला उत्तम असतें. ३ कादोळी येथें ' वैली झर ' नांवानें प्रसिद्ध असलेला झरा, याचें पाणी सांठलेलें व कुजकें असतें

**क्लोरेटेड पाणी:**—१ कादोळी येथील समुद्रकांठचा झरा. २ मांद्रें येथील अलकलीन झरा ३ कणसूव येथील व्होळ नांवाचा झरा ४ फोंडेची 'कोकांव' नांवाची झर. ५ फोंडें येथील सा प्रेद्रूचा झरा.

**कार्बोनेटेड पाणी:**—१ केळोशी येथील राइदोरचा झरा. याचें पाणी बरेंच कार्बोनेट असतें २ फातर्फेचा झरा. ३ सत्तरींतील बिंबलचा झरा. ४ बेतूलचा झरा व ५ सत्तरींतीलच दोवासो नांवाचा झरा

**म्यॉग्नेशियम् पाणी:**—१ कुंडई येथील झरा व २ केरी, (फोंडा) येथील झरा.

**गंधकमिश्र पाणी:**—१ फोंडें येथील "कामील पींत" झरा. २ शिरोडें येथील तरवळेचा झरा. ३ तेथीलच कराचा झरा ४ नाचनोडेचा ' गोंगो ' नांवाचा झरा.

खनिज पाण्याच्या या झऱ्याखेरीज बाह्य रोगाच्या शमनासाठीं उपयोगी असे असे पुष्कळ झरे आहेत ते पुढें जातात.

१ बाळनार्ति येमोलिय, सिंकेरी; २ वेलोय, नुव्हें; ३ चोर्वण, सिंकेरी, ४ कासुर्ळे, राय, ५ दोशाझर, आसगांव, ६ मार्यान प्रॅत, रेवोडें, ७ बोरचूण, ८ पेद्रुपींत, रेवोडें ९ तळें, आसगाव, १० तळें, उसकई, ११ तळें, सेरूला, १२ कोदय, बाग, १३ कोदय, नांदोडें, १४ गणेशतळें, सत्तरी, १५ लोखंडियें, फोंडें, १७ लोटविहिर, शिरोडें, १८ मायण, शिवोली, १९ नर्डा, कांदोळी; २० ओवेशीक, वेरें (फोंडें); २१ वैलोवाडो, वेर्तीं; २२ वागवेर्ले, उसकई, २३ बाळशाचा झरा, वेळ्ळी, व २४ शेळपें, म्हापशें.

**पिण्यास उत्कृष्ट पाण्याचे झरे:—**१ पणजीचा गोमुख झरा, २ पणजीचाच फिनिक्स झरा; ३ पेडणेंचा 'सरमळा' झरा, ४ पनवेलच्या वांयगिणी झरा, ६ आनाचा झरा, मडगांव, ७ चादर येथील मदेल्यातील झरा, ८ शिरोडेंचा वाजें येथील झरा व ९ आकें येथील झरा यांपैकीं कांहीं झऱ्यांतून स्नानासाठीं नळ वगैरे लावून सोय केली आहे

**समुद्रस्नानाच्या जागा:—**गोमंतकाच्या साऱ्या दर्याकिनाऱ्यावर या स्नानाच्या सोयी आहेत. उत्तेकडून दक्षिणेकडे यायचा क्रम स्वीकारून त्याचें पुढें वर्णन जात आहे.

**मांद्रें व मोर्जीची वेळ:—**ही उत्तरेस थेट तेरेखोलच्या खाडी जवळ सुरू होऊन कायसुऱ्च्या नदीमुखाशीं सपली आहे परंतु वेळेवर समुद्रस्नानास फारसें लोक जात नसतात

**कळंगुटची वेळ:—**म्हापशाहून मोटारीनें२०।२५ मिनिटांतच या वेळेवर जाता येतें. या किनाऱ्यावर मार्च एप्रिलच्या सुमारास बारदेश, साखळी इत्यादि भागातील बरीच कुटुंबें समुद्रस्नानासाठीं येत असतात. नामांकित डॉक्टर, कुशल लेखक, यशस्वी कायदे-पंडीत, धनिक व्यापारी, सुखवस्तु जमीनदार इत्यादि साऱ्या वर्गांचे व दर्जांचे लोक येथें येतात. दर्याकाठ देखील चार पांच मैल लांब आहे. सकाळीं ८ पर्यंत व सायं-काळीं साडे पाच ते सातपर्यंतच सारी गडबड असते.

**केगदीवेळ:—**हा किनारा आग्वादच्या किल्यापासून जवळच आहे. तसें पाहिल्यास हा दर्याकांठ विस्ताराच्या मानानें बराच संकुचित आहे परंतु बरींच युरो-पियन कुटुंबें देखील येथें येतात मधून मधून हिंदूंचीं कुटुंबेंही असतात पणजीहून वेरें येथें येतांच रेइजमागुश किल्ल्याखालूनच या किनाऱ्यावर जातां येतें यांच्या जव-ळच असणारा आग्वादचा किल्ला पोर्तुगीजांनीं इ. स. १६१२ सालीं बांधला. आग्वाद या शब्दाचा अर्थ पाणवठा असा आहे. जुन्याकाळीं गोव्यांतून पोर्तुगालला जाणारीं

जहाजें येथेंच पाणी पुरवठा करीत, म्हणूनच आग्वाद हें नाव त्या जागेला मिळालें आहे. किल्ल्याच्या मध्यभागीं एक २८ हात उंच बुरूज असून त्यावरच आग्वादचा प्रसिद्ध दिवा आहे हा दिवा पोर्तुगीजानीं प्रारंपासून तेवत ठेविला होता. पूर्वी तो फक्त उन्हाळ्यांतील अधाऱ्या रात्रींच पेटवीत असत. पुढें १८६८ सालापासून तो साऱ्या वर्षभर पेटाविण्यात येत आहे तूर्त हा दिवा तासाला तीस फेरे करणारा आर्गांद जातीचा. आहे आग्वादच्या किल्ल्यांत भूगर्भात एक विस्तीर्ण हौद बांधला असून, त्यात पावसाचें पाणी साठवून ठेवण्यांत येत असतें जुन्या गोव्यांतील सात आगुस्तीन्यचा कोन्व्हेंत जमिनदोस्त होताच, तेथील प्रचंड घटा याच किल्ल्यात आणून ठेविली असून तिचें वजन ४८ शें रत्तल आहे. दारू गोळ्याच्या सुधारणेमुळें तूर्त या किल्ल्याचा लढाईत उपयोग होणें शक्य नाहीं. येथें पोर्तुगीज सरकारचे लष्करी कैदी व राजकीय कैदी ठेवण्याचा रिवाज आहे

**करंझाळेंची वेळः**—पणजीहून दोना पाव्लास जाताना हा दर्याकाठ उजव्या हाताला मिळतो. तो सुमारें दोन मैल लांब आहे. पणजीचे सारे युरोपियन, ख्रिस्ती वगैरे वरिष्ठ अधिकारी व बरीच हिंदू कुटुंबें येथेंच उन्हाळा घालवितात

**कायचा राजवाडाः**—हा पूर्वी १६ व्या शतकांत फ्रांसिस्कान पाद्य्रांनीं आपल्यासाठीं कोंव्हेत म्हणून बांधला होता. याच्या भोंवतीं त्यावेळीं तटबंदी होती, तिचा कांहीं भाग अजूनही दिसतो सतराव्या शतकात आर्चबिषपनें हें आपलें उन्हाळ्याचें स्थान बनविलें. पुढें इ. स. १८१६ च्या सुमारास कोंदि द रीयु पार्दु या गव्हर्नरनें हा कोंव्हेंत दुरुस्त करून आपली तेथें राहण्याची सोय केली तरीपण आर्चबिषपनीं त्यावरील ताबा सोडला नव्हता. इ स. १८५५ सालीं गव्हर्नरनीं सरकारी खर्चानें पुनः कोंव्हेंताची दागडुजी करून त्याला राजवाड्याचें स्वरूप दिलें व तेव्हांपासून गोव्याच्या गव्हर्नरचें तें उन्हाळ्यांतील स्थान बनलें. अलीकडे तर सारें वर्ष गव्हर्नर तेथेंच राहतात व मोटारीनें कामापुरते पणजींत येत असतात.

**कांसावलीची वेळः**—विस्तीर्णतेंत हा दर्याकांठाएवढी मोठी दुसरी स्नानाची जागा गोव्यांत नाहीं. उत्तरेस दाभोली पासून सुरुवात होऊन ती दक्षिणेस बेतुलच्या खाडीपर्यंत पसरली आहे. सासष्ट, सांगें, केपें, इत्यादि कोंसेल्यातील सर्व धर्मांचीं व दर्जांचीं कुटुंबें येथें मार्च एप्रिलमध्यें दिसतात. दर्याकाठीं कांसावली, वेळसाव, माजोर्डें, कोलवें, बाणावली वगैरे सर्व ठिकाणीं अल्पस्वल्प भाड्यानें बंगले वगैरे सोयी होतात.

# उपसंहारात्मक दोन शब्द.

गोमंतक परिचय संपला, तेव्हां उपसंहारात्मक दोन शब्द सांगून मोकळे होऊं गोमंतक प्रांत व तेथील जनता यांचें वास्तविक स्वरूप हें असें आहे. इतक्या दीर्घ कालावधींत परकी संस्कृतीच्या वरवंटयाखालीं चेपला गेला असताही, गोमंतकीय हिंदुसमाज आपल्या उद्धारासाठीं जी धडपड नेहमीं करीत आला, तिचें प्रस्तुत पुस्तकांत उपयोगांत आणलेल्या ऐतिहासिक साधनावरून जें स्वरूप दिसून येतें, त्याचें प्रत्येक गोमंतकीयास साभिमान कौतुक वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

पुस्तकाच्या वाचनामुळें गोमंतकाची माहिती मिळून इतरत्र नांदत असलेल्या गैरसमजांचें निराकरण झालें व गोमंतकीयेतर हिंदूंचा दृष्टिकोन बदलण्यास याची किंचित देखील मदत झाली, तर लेखकाला श्रमसाफल्याचा अत्यानंद होईल त्याप्रमाणें आपल्या प्रांताविषयीं माहिती संकलित करून तो थोडातरी यशस्वी झाला तर प्रांताचें जें ऋण त्याच्या शिरावर आहे, त्यांतून तो मुक्त होईल. श्री. जगन्नियत्याच्या कृपेनें व वाचकवर्गाच्या प्रेमाशिर्वादानें त्याला या ऋण-मुक्ततेचा लाभ झाल्यास पुढें या ग्रंथांतील उणीव काढून गोमंतकाचा समग्र इतिहास वाचकांना सादर करण्याची फार दिवस हृदयाशीं बाळगलेली इच्छा पूर्ण करण्यास त्याला हुरूप येईल.

REFBK-0004305

दा. क्र. ८३०४